नाना फडणीस स्मा. मंडळ, भा. इ. सं. मं. पुणें पुरस्कृ

मंत्र्युत्तम नाना फडणवीस
उत्सवपन्नाशी व शकावली



भाषणें—लोकमान्य

चिं. गं. भानू
ग. भा. वैद्य
शि. म. परांजपे
दादासाहेब खापर्डे
दादा करंदीकर
शं. ना. जोशी
न. र. फाटक
चिं. ग. कर्वे
श्री. शं. नवरे
द. वा. पोतदार इ.

व्याख्यानमाला पुणें, मुंबई इ.
लेख—केसरी अग्रलेख १९००
भानूंची संपूर्ण वंशावळ
नानांचे मुक्काम
नानांचा व्यक्तिगत निर्देश

प्रकाशक व संपादक—
के. बी. जोशी, पंपवाले, मुंबई.

संग्राहक व शकावलीकार—
शं. ना. जोशी, भा. इ. सं. मं. पुणें.

साग्रपुस्तक मूल्य रुपये पांच

अनुक्रमणिका

चित्रांची अनुक्रमणिका

नाना फडणवीस शकावली

अनुक्रमणिका

हा वेळास
न्ताचा ग्रंथ, अ
कन्या सासरीं
आहे

निवेदन

हा वेळास येथील **नाना फडणीस उत्सवाचा** पन्नास वर्षांतील वृत्तान्ताचा ग्रंथ, आज होता निराळा होऊन प्रकाशित होत आहे, ह्याबद्दल, कन्या सासरीं म्हणजे आपल्या घरीं जात असल्या वेळचा आनंद होत आहे. असा आनंद म्हणण्याचें कारण हें कीं, एकदां असा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें योजल्यापासून ग्रंथसंपादकाच्या मनाची स्थिति एका अर्थी तशीच होते. हें मुद्रणकार्य केव्हां पुरतें होऊन जाईल, होईल तेव्हां धडपणें व निर्विघ्नपणें पार पडेलना, खर्चांत व मानापमानांत कोठें कांहीं न्यून पडणार नाहीं ना, आणि ग्रंथ प्रसिद्धीनंतर वाचकांस व इष्टमित्रांस तो कसा काय आवडेल अशा प्रकारची चिंता त्या कार्याप्रमाणें ह्याहि वेळीं वाटते. इतकेंहि करून म्हणजे जपतां जपतां ह्या ना त्या कारणानें कोणाचें तरी मन थोडेसें दुखावलेंच वाटतें असें मागाहून आढळून येण्याचा संभव. तात्पर्य, कार्य तर अवश्य व्हावयास पाहिजे, सर्वांचें समाधानहि त्यांत रहावें अशी साहजीकच इच्छा, व तदर्थ सर्व प्रयत्न; आणि ते करून झाला तसा हा **उत्सवपन्नाशीचा वृत्तान्तग्रंथ** आज मजकडून वाचकांच्या हातीं दिला जात आहे; मनाला एक प्रकारें ओढ होती ती ह्या रूपानें थोडी कमी होत आहे ह्याबद्दल चित्ताला समाधान व आनंद वाटणें सहज आहे.

२

निवेदनांत प्रथमच ही गोष्ट स्पष्टपणें व मुख्यतः सांगावयाची कीं, हा उत्सव, आपल्या भारताच्या अर्वाचीन राजकीय जीवनशालेचे आद्यगुरुजी जे गीतारहस्यकार कर्मयोगी, प्रति–सहकारवादी, विद्वन्मान्य लोकमान्य **टिळक**, यांच्या प्रेरणेनें, पुरस्कारानें व सहाय्यानें सुरू झाला. उत्सव प्रारंभाचें व त्याला अल्पावधींत प्रतिष्ठा मिळवून देण्याचें श्रेय त्यांना

व त्यांच्या '**केसरीला**' आहे. मी एक त्यांचा भक्त व शिष्य आहे. आणि असें म्हणवून घेण्यांत मला काडीइतकाहि कमीपणा नसून उलट तें पद मला यथार्थपणें पेलतां आलें तर तेंच माझें भूषण होय असें मी मानतों. माझा ह्या उत्सवाशीं अगदीं प्रथमपासून संबंध आहे हें खरें आणि तसा तो संबंध लक्षांत घेऊन राधारमण कविकृत फडणीस–काव्यांत (इ. १९०६) शेवटीं 'फडणिस संस्था' ही केशवेच्छें निघाली। स्मरणविरह–धूली झाडण्या सिद्ध झाली । अविरत करिताहे ती तदर्थ प्रयास । तिज गणपति देवो सिद्धिदाता यशास ॥' असें एक पद्य आलें आहे. ह्या काव्यांत

शिवनृपतिकरांहीं रोविला राज्यरोपा ।
विविध-पुरुष-रक्तें पावला नीट जोपा
जतन करूनि त्याला पाळिलें पेशव्यांनी।
मग फडणिस माला-कार झाले निदानीं २८

असें एक पद्य सर्ग १०मध्यें घातलें असून त्यांत श्री शिवराज छत्रपती, पंतप्रधान पेशवे आणि नाना फडणवीस ह्यांचा यथोचित उल्लेख करून त्याच्याच पुढील चौथ्या पद्यांत "नयनिपुण महात्मन् धीपते भानुराज । तव गुणगण साक्षात् गातसे काव्य आज । तुजसम भुवनीं या भाससी तूंचि मात्र । नच इतर नयज्ञ त्वत्तुला-लेश-पात्र ॥ ३२ " असें नानांचें गुणगान केलें आहे. असो. ह्या काव्यांतल्याप्रमाणें ह्या उत्सवाच्या पहिल्या दशवार्षिक अहवालांत श्री. म्हादेव कृष्ण महाजन ह्यांनींहि हाच माझा संबंध प्रकट केला आहे. त्यानंतरहि ह्या उत्सवाचें इ. १९४३ व १९४५ चें जें वृत्तान्तपुस्तक प्रसिद्ध झालें आहे त्यांतहि श्री. य. ना. सोमण ह्यांनीं हा संबंध उल्लिखित केला आहे. हे दोन्ही तिन्ही छोटे वृत्तान्तग्रंथ मीं प्रसिद्ध केलेले नाहींत. अर्थात् इतरांनीं मजसंबंधीं जें प्रसिद्ध केलें त्याचाच अनुवाद कोठें होत असला अथवा ह्या पुस्तकांतहि तोच अनुवाद आला असला तरीहि मी हें विसरूं

शकत नाहीं कीं, मजप्रमाणें इतरहि अनेक **वेळासकर** आणि **महाराष्ट्रीय** सद्‌गृहस्थ ह्यांचा ह्या उत्सवाशीं असाच प्रथमपासून संबंध आहे व ते ते गृहस्थ ह्या उत्सवाचे आधीं पासूनचेच सहाय्यक व चालक आहेत. आणि हेंहि लिहून ठेवतों कीं, पुढेंहि अशाच ह्या उत्सवप्रेमी साहाय्यकांच्या सक्रिय सहानुभूतीनें व एकोप्यानें हा उत्सव चालावयाचा आहे. असो. तर माझा संबंध ह्या उत्सवाशीं अगदीं अगदीं प्रथमपासूनचा आणि त्यामुळें एका प्रकारें मजवर ह्यासंबंधीचें ओझेंहि होतें व आहे; तें ह्या वृत्तान्त–पुस्तक–प्रकटीकरणानें मी थोडेसें हलकें करीत आहे, असें मला निदान माझ्या पुरतें तरी वाटतें. ३

ह्या वृत्तान्त–ग्रंथांत प्रारंभींच सूचित केल्याप्रमाणें बोलून चालून हा ग्रंथ अनुवादरूप किंवा उध्दृत–वृत्त असा आहे. म्हणजे इ. स. १९०० पासून तों १९५० पर्यंत जें जें वृत्त ' केसरींत ' तेव्हांचें तेव्हांच प्रसिद्ध होत आलें आहे तें तसेंच सर्व ह्या ग्रंथांत एकत्रित प्रकट केलें आहे. म्हणजे सामान्यतः ह्या ग्रंथांत पदरचें व आतांचें असें कांहींहिं आलेलें नाहीं; येण्याचें कारणहि नाहीं. ' केसरी ' प्रमाणें इतरहि तत्तत्कालीन वृत्तपत्रां-मधून ह्या उत्सवाची वार्ता आलेली आहे हें निश्चित. उत्सवाला जोडून जें ग्रंथप्रकाशन होत आलें त्याची पोंच विद्वान् प्रवक्ते प्रो. **शि. म. परांजपे** ह्यांच्या प्रसिद्ध ' **काळ** ' वृत्तपत्रांमधून आली व त्या अनुषंगानें उत्सवाचा उल्लेखहि आला. तसा एक निर्देश ह्या पुस्तकांत घेतला आहे हें वाचकांस दिसून येईल. सारांश, ह्याप्रमाणें काळ, विहारी, बाण, भाला, इंदुप्रकाश इत्यादि इत्यादि प्रसिद्ध वृत्त–पत्रांतून ह्या नाना फडणीस उत्सवाची वार्ता आलेली. पण त्या त्या वृत्तपत्राचे अंक आज उत्सवसंबंधीच्या दप्तरांत आढळले नाहींत आणि अन्यत्रहि ह्या वृत्तपत्रांच्या फाइली सांपडणें केसरीप्रमाणें सुलभ झालें नाहीं. म्हणून ह्या पुस्तकांत प्राधान्यतः केसरींतीलच वृत्तान्त घेतला व तेवढ्यावरच प्रस्तुत समाधानी रहाणें प्राप्त झालें.

४

ह्या वृत्तान्त–संग्राहक–ग्रंथाकडे पाहिलें व थोडासा विचार केला तर असें आढळून येईल कीं, ह्या उत्सवाचे दोन तीन टप्पे दिसून येतात. सतत ५० वर्षें हा उत्सव प्रसिद्धपणें चालला आहे असें दिसून येत नाहीं. व्यक्तीच्या आयुष्यांत ज्याप्रमाणें कांहीं वर्षें उत्साही व उद्योगधंद्याचीं जातात; मध्यंतरीं कांहीं विनाउद्योगाचीं; पुनः कांहीं वर्षें कामाधंद्यांत चाललेलीं आढळतात; त्याप्रमाणें ह्या उत्सवपुरुषाच्या आयुष्यांतहि झालेलें दिसतें. वस्तुतः एका व्यक्तीचा हा न्याय समष्टिरूपानें चालणाऱ्या उत्सवासारख्या सार्वजनिक संस्थांना लागू नाहीं व हें इतर संस्थांच्या उदाहरणांवरून उघड आहे. पण येथें तसें सातत्य मधल्या कांहीं काळांत सांभाळलें गेलें नसलें तरी सांप्रत हा उत्सव नियमानें कालमानाप्रमाणें चालला आहे व पुढेंहि दीर्घकाल हें सातत्य चालेल. त्या वाटचालीस ही शिदोरी थोडीशी उपयोगी पडेल हाहि भरंवसा वाटतो.

ह्या वृत्तान्त–ग्रंथांत प्रसंगोपात्त झालेल्या उत्सवाचें वर्णन आलेलें, म्हणून त्याला तत्कालिनच महत्त्व, चिरकालीन कमी, असें कोणास वाटेल. पण हा उत्सव ऐतिहासिक आहे आणि त्या दृष्टीनें अभ्यासपूर्ण अशीं भाषणें ह्या उत्सव-प्रसंगानें झालेलीं आहेत. हीं भाषणें जे कोणी वाचतील त्यांस आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल. लोकमान्यांचें भाषण, प्रो. चिं. गं. भानूंचें भाषण त्याचप्रमाणें श्री. शंकरराव जोशी, प्रा. फाटक, श्री. कर्वे, श्री. नवरे, महामहोपाध्याय प्रा. पोतदार प्रभृतींचीं भाषणें वाचलीं असतां नाना फडणविसांसंबंधानें आपणांस साधार सोपपत्तिक नवीन नवीन माहिती निश्चित मिळेल.

५

ह्या भाषणांप्रमाणें किंबहुना भाषणापेक्षांहि अधिक महत्वाचा असा '**मुत्सद्दी नाना फडणीस**' हा केसरींतील ५० वर्षांपूर्वींचा अग्रलेख ह्या वृत्तान्त-ग्रंथांत घेतला आहे. हा अग्रलेख आजहि इतका अभिनव व विस्तृत आहे कीं, नानांच्या चरित्र–ग्रंथाच्या दोन तीन आवृत्ती निघाल्या तरी, त्या ग्रंथांत न

आलेली अशी विश्वसनीय माहिती व मांडणी ह्या अग्रलेखांत येऊन गेली आहे. आणि चरित्र-ग्रंथ-कर्त्यांपुढें; हा अग्रलेख वर्तमानपत्राच्या आयुष्यक्रमामुळें स्थिरपणें राहिलेला नाहीं; यामुळें अग्रलेखांत आलेली नानाविषयींची अधिक माहिती अग्रलेख वाचनानेंच मिळणारी आहे. बरें, ही अग्रलेखांतील माहिती नवीन जशी वाटेल तशीच ती तत्कालीन मूळ अस्सल पत्रादिकांचे आधार उध्दृत करूनच दिलेली असल्यामुळें तिचें विश्वसनीयत्व परीपूर्ण आहे. सारांश, असा हा अग्रलेख ह्या वृत्तान्त–ग्रंथाचा विशेष म्हणून सांगतां येईल. ह्या अग्रलेख संग्रहाची कल्पना आम्हाला प्रा. बाबुराव फाटक ह्यांनीं दिली. ह्याबद्दल आमच्या प्रमाणें वाचकहि त्यांचे आभारी राहतील हें सांगणें नको. हा लेख चांगलाच आहे म्हणून घेणें इष्ट व आवश्यक हें खरें. पण पुण्यास वेळासप्रमाणें जो पहिला शतसांवत्सरिक श्राद्धतिथिदिन सार्वजानिक सभागृहांत महर्षी आण्णासाहेब पटवर्धन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला व **लोकमान्य** आणि प्रो. **जिनसीवाले** ह्यांचीं भाषणें झालीं, त्या भाषणांचा सारांश देतांना ह्या अग्रलेखाचाच हवाला दिला आहे. म्हणजे हा अग्रलेख, उत्सवांतील वृत्त म्हणूनहि म्हटलें तरी चालेल, येथें घेतला आहे.

ह्याप्रमाणें ह्या ग्रंथाचे एक दोन विशेष दर्शित केल्यानंतर दुसऱ्याहि एका विशेषाचा निर्देश करणें आवश्यक आहे. तो म्हणजे पुणें, मुंबई येथें गाजलेली **नाना फडणीस व्याख्यानमाला.** ह्या मालेंतील व्याख्यानांचें सारसंग्रहणच येथें केलें आहे. वस्तुतः त्या मालेचे अध्यक्ष श्री. **तात्यासाहेब केळकर** ह्यांनीं सांगितल्याप्रमाणें त्या मालेंत झालेल्या व्याख्यानांचें वृत्त त्या त्या वक्त्यांकडून लिहवून घेऊन तेंच अधिकृतपणें एखाद्या स्वतंत्र पुस्तकांत द्यावयास पाहिजे. व कळतें कीं, अशा पुस्तकाची योजना होत आहे. व ती आनंदाची गोष्ट आहे. 'प्रगतीस अडथळ्याची आवश्यकता' ह्या न्यायानें ह्या दोन्ही व्याख्यानमाला किंवा बृहन् महाराष्ट्रभर झालेलीं प्रा. फाटक, प्रो. पोतदार, श्री. जोशी ह्यांचीं व्याख्यानें, हीं नानांच्या रूपानें

महाराष्ट्रेतिहासाच्या इतिहासास उजळाच मिळण्यास कारण झाली. विशेषतः 'नवाकाळ'मध्यें प्रा. **बाबुराव फाटक** ह्यांची जी सुविस्तृत, साधार, सोपपत्तिक, लेखमाला आली त्यामुळें तर ही गोष्ट सर्वांशीं उल्लेखनीय अशी झाली; आणि हें सर्व नाना फडणविस उत्सवाशींच संबद्ध असल्यामुळें येथें ह्या दोन्हीतिन्ही वृत्तान्ताचा संग्रह केला आहे. मुख्यतः प्रा. फाटक ह्यांचा सत्कारहि मुद्दाम वेळास येथें एका उत्सवप्रसंगानें झाला व त्या प्रसंगीचें प्रा. फाटक ह्यांचें झालेलें भाषणहि येथें घेतलें आहे.

६

अशा प्रकारें ह्या ग्रंथाचें वैशिष्टय आणि चिरकालीन संग्राह्यपण कसें आहे हें सांगितल्यानंतर हा ग्रंथ जसा **वाचनीय** तसा **अवलोकनीयहि** झाला आहे हेंहि सांगणें प्राप्त वाटतें. म्हणजे ह्या ग्रंथांत, कोठेंहि प्रसिद्ध न झालेलीं व अवश्य दर्शनीय अशीं असलेलीं, छायाचित्रेंहि अनेक आलेलीं आहेत. नानांचा मेणवली येथील वाडा, घाट, प्रसिद्ध व अजस्र **घंटाघर**, पुणें येथील **बेलबाग मंदीर** म्हणजे नानांनीं बांधलेलें श्रीविष्णुमंदीर, नानांचे हस्ताक्षरांचा प्रो. पोतदार ह्यांच्या संग्रहांतील संपूर्ण पत्रांतील भाग हीं सर्व इतिहासकालीन शिल्पकृत्यें ह्या ग्रंथांत आलीं आहेत. श्रीविष्णुमंदिराचा आजचा सभामंडप ह्या छायाचित्रांत आलेला नाहीं. कारण तो पुढें बांधला गेला. नानांनीं स्वतः जो भाग ह्या मंदिराचा बांधविला तो म्हणजे 'देवगर्भगृह' व त्यापुढील श्रीशंकर गणपती असलेलें 'रंगगृह', एवढाच भाग इतिहासकालीन व तेवढ्याचेंच सुंदर छायाचित्र येथें देण्यास मिळालें तें दिलें आहे. मंदिरांतील **श्रीविष्णुलक्ष्मीचें** दर्शनहि एका स्वतंत्र छायाचित्रानें होत आहे. ही सर्व छायाचित्रें श्रीमंत तात्यासाहेब भानू फडणीस संस्थान बेलबाग ह्यांचेकडून मिळालीं हेंहि सांगणें इष्ट वाटतें. नाना म्हणजे तीन व्यक्ति. स्वतः **नाना**, **सवाई माधवराव** आणि **महादजी शिंदे**. ह्या त्रयींतच नानांचें

सर्व व मुख्य चरित्र केंद्रित झालेलें आहे. त्याहि जुन्या चित्राचा फोटो येथें दिला आहे व हाहि बेलबागकर तात्यासाहेब भानू ह्यांचेच संग्रहांतील आहे.

ह्या ऐतिहासिक मंदीर-शिल्प, मूर्ति-शिल्प, हस्ताक्षर ह्यांच्या चित्रांप्रमाणें कांहीं गत व्यक्तींचेहि फोटो ह्या ग्रंथांत प्रथमच आपणांस पाहण्यास मिळतील. जुन्या पिढींतील कार्यकर्त्यांना चांगले माहीत आहे त्या राष्ट्रीय कीर्तनकार व प्रवचनकार दांडेकर व अभ्यंकर ह्यांचेंहि छायाचित्र येथें दिलें आहे. त्याचप्रमाणें ४० वर्षांपूर्वींचा नाना फडणिसांच्या वेळास येथील मिरवणुकीचा फोटो येथें दिला आहे. ह्या फोटोंत वऱ्हाडचे पुढारी **दादासाहेब खापर्डे**, इतिहासकार **वासुदेवशास्त्री** खरे आले आहेत. पण हा फोटो तितका स्पष्ट **उठला न**ाहीं. म्हणजे इतक्या जुन्या फोटोचा–फार मागील नाहीं तरी त्याचा–ब्लॉक करण्याचीहि कलावंताची दृष्टि व कृति आमचेकडे नाहीं हें येथें सहज सांगणें अन्यथा होणार नाहीं, असो. आणखीहि कांहीं व्यक्तींचे, ऐतिहासिक स्थलांचे, फोटो द्यावयाचे होते पण तें जमलें नाहीं. असो. तरी पण बरींच अभिनव व दर्शनीय चित्रें ह्या ग्रंथांत दिलीं आहेत. अशा दृष्टीनें हा ग्रंथ **वाचनीय** आणि **प्रेक्षणीय** व म्हणून **संग्राह्य** करण्याचा यत्न केला आहे.

७

निवेदन संपविण्यापूर्वीं आणखी कांहीं गोष्टीचा निर्देश करणें आवश्यक आहे. व त्यांतील दोनतीन गोष्टी तर मूर्धाभिषिक्तच म्हणतां येतील. पहिली गोष्ट म्हणजे ह्या ग्रंथाचें प्रकाशन. हा ग्रंथ वर सांगितल्यावरून आणि प्रत्यक्ष ग्रंथावलोकनावरून वेळास येथील नाना फडणवीसांच्या ५० वर्षांतील उत्सवांची साग्र व यथार्थ वार्ता देणारा आहे; आणि ह्या उत्सवाचें व त्याला जोडून नानांच्या स्मारकाचें कार्य करणारें एक स्मारक मंडळहि आहे. अर्थात् ह्या मंडळाकरवींच हा ग्रंथ वस्तुतः प्रसिद्ध व्हावयाचा, असेंच कोणीहि

म्हणेल आणि इतकें तें खरें व सुयुक्तहि आहे. तथापि ह्या उत्सवाशीं माझा असलेला संबंध लक्षांत घेतां मीं तें करावें असेंच माझ्या मनानें घेतलें आणि त्या कामाला लागलों. ह्या संबंधीची प्रारंभीची थोडीशी माहिती ग्रंथारभीं पान तीनवर दिलेलीच आहे. पुढें हें काम थोडेसें मूर्तस्वरुपांत येऊं लागतांच 'काम कामाला गती देते' ह्या न्यायानें एकेक कल्पना अधिक स्पष्ट होऊं लागल्या व ह्यांत कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्यांपैकीं कोणचें प्राप्त होईल व तें ह्या ग्रंथांत कसें समाविष्ट करतां येईल, ह्याचाहि अंदाज येऊं लागून कांहीं कांहीं जमतहि चाललें व तें तें ह्या ग्रंथांत दाखलहि केलें. साहजीकच खर्च वाढत चालला. पण तो कारणी लागत आहे असें समाधान वाटत असलें तरी ग्रंथ वाढत चालला आणि आधीं योजल्यापेक्षां ह्या वाढत्या खर्चाची तोंड मिळवणी कशी करावयाची असा प्रश्न भेडसावूं लागला. पण सुदैवाची गोष्ट कीं, अशा वेळीं ह्या कार्याला आपण यथाशक्ति हातभार लावला पाहिजे असें मनापासून ज्यांना वाटतें अशी प्रेमी मंडळी, त्यांच्याशीं थोडेसें बोलतांच मला लाभली व हें ग्रंथकार्य आतां साजरें होऊन पार पडेल असा विश्वास वाटूं लागला आणि अशांच्याच सहाय्यानें व प्रोत्साहनानें हा ग्रंथ असा सालंकृत वाचकांच्या हातीं देतां येत आहे.

८

मध्यंतरीं असा एक प्रसंग घडला कीं, ज्यामध्यें हा ग्रंथ ह्या नानाफडणवीस स्मा. मं. मार्फत प्रकाशित करण्यास मीं संमति द्यावी असें योजून मला विचारणा झाली. मी व्यक्तिगत जबाबदारीवर हा ग्रंथ आरंभिला, संपूर्णहि होत आला आणि आतां ही विचारणा, ह्याचें मला नवल वाटलें. प्रथम मीं नकार दिला. पण अखेरीस मीहि त्या मंडळीस संमति दिली. उत्सवाशीं माझा आजवरचा संबंध लक्षांत घेतां, मीहि एक त्यांतीलच असतां, एवढ्या थोर व विख्यात मंडळींनीं मला ही विचारणा करावी व मीं नकार द्यावा हें युक्त नव्हे असें वाटून, कांहीं प्रती आणि देणगी रूपानें

जर कांहीं रक्कम ह्या ग्रंथाला मिळाली तर ती माझी असें ठरून, ह्या ग्रंथाचें प्रकाशन नाना फ. स्मा. मं. करवीं होण्याचें ठरलें व त्याप्रमाणें वेळास येथें नानांच्या स्मृतितिथीस हा ग्रंथ चिटणीस श्री. य. ना. सोमण ह्यांजकडून अर्पण होऊन प्रसिद्ध झाला. ह्या कामीं आमच्या एका दृढ व चिरपरिचित मित्रांची प्रेरणा मला मिळाली हें सांगणें येथें इष्ट दिसतें.

हा ग्रंथ नाना फ. स्मा. मं. मार्फत प्रकाशित झाल्यास इतर दृष्टीनेंहि ही मंडळी मला सहाय्य करून ह्या कामीं माझा भार हलका करण्यास मदत करतील असेंहि मला सांगण्यांत आलें. यावरून हें ध्यानांत येईल कीं, नाना फ. स्मा. मं. च्या एका बैठकींत हा प्रश्न निघाला व बैठकीनंतरच्या बोलण्यांत हें प्रकाशनाचें ठरलें. संस्था व व्यक्ति ह्यामध्यें संस्थेची पायरी वरची होय. त्या पायरीवरून ह्या ग्रंथाचें प्रकाशन होत आहे ह्यांतहि मला आनंदच आहे. आणि ह्या आनंददानाचे श्रेयांत प्रा. फाटक हे प्रमुख होत हीहि गोष्ट मला सांगावीशी वाटतें. ९

ग्रंथाच्या मूर्धाभिषिक्त गोष्टींत प्रकाशनापेक्षांहि अधिक महत्त्वाची कथनीय गोष्ट म्हणजे '**नाना फडणवीस शकावली**'. ह्या शकावलीची जोड मिळाल्यानें ह्या ग्रंथाची थोरवी महाराष्ट्रेतिहासाभ्यासकांस किती वाटेल हें माझ्यासारख्यानें सांगूं पहाणें अशक्य आहे. एकच गोष्ट ह्या शकावली संबंधानें सांगणें पुरेशी होईल कीं, नुसती ही नानाफडणवीसशकावली भा. इ. सं. मं. सारख्या इतिहासाभ्यासक मंडळींना हा शकावली ग्रंथ वृत्तान्ताआधीं व स्वतंत्रपणें पुरस्कृत करण्या योग्य आहे असें वाटलें. आणि ह्या त्यांच्या म्हणण्याप्रमाणें ही शकावली आधीं व स्वतंत्रपणें प्रसिद्ध करून नंतर ह्या शकावलीची जोड ह्या पुस्तकास देण्यास मिळत आहे. भाषेच्या अभ्यासाला जसें व्याकरण व कोश ह्यांची अत्यंत आवश्यकता त्याप्रमाणें इतिहासाविषयक एखाद्या व्यक्तिचरित्राला किंवा प्रकरण—विशेषाला त्याच्या त्याच्या शकावलाची आवश्यकता व महत्त्व फार आहे. ह्याहून ह्या शकावलीसंबंधानें अधिक व वेगळें येथें न

लिहितां केवळ **शकावली करतांहि हा ग्रंथ अभ्यसनीय व संग्राह्य** झाला आहे. एवढेंच लिहितों. आणि अशी शकावली भा. इ. सं. मं. चे संशोधक श्री. **शंकरराव जोशी** ह्यांनीं करून दिली ह्याबद्दल त्यांचें श्रेय व आभार येथें व्यक्त करणें माझें कर्तव्य होय.

'शकावली' ह्या ग्रंथास जोडावी असें मला वाटलें ह्याचें दुसरेंहि कारण येथें नमूद करणें प्राप्त आहे. ह्या नाना फ. उत्सवाची प्रथा ही कीं, उत्सवा-बरोबर एखादा इतिहासविषयक स्वतंत्र ग्रंथ प्रासिद्ध करावयाचा. नुसता पन्नास वर्षांचा वृत्तान्त प्रसिद्ध करणें हें कांहीं अशा ग्रंथप्रसिद्धींत येत नाहीं हें उघड आहे. तेव्हां ही जी मूळची स्वतंत्र इतिहासाविषयक ग्रंथ-प्रकाशनाची प्रथा, त्या प्रथेस अनुसरून हा 'शकावली ग्रंथ' स्वतंत्र आणि ह्या ग्रंथासहित प्रसिद्ध करणें इष्ट वाटलें. ह्यामुळें मात्र माझ्या मनाला फार फार समाधान होत आहे असें मुक्त कंठानें सांगणें मी कर्तव्य समजतों. आणि प्रसिद्ध इतिहास संशोधक व वक्ते श्री. **शं: ना. जोशी** भा. इ. सं. मं. पुणें ह्यांचें पुनः पुनः अगदीं हृदयापासून आभार मानतों.

१०

आभार. आधींच लांबलेलें हें निवेदन आतां आभार मानून पुरें करा-वयाचें. ह्या ग्रंथाच्या कामीं मला जें सांगावयाचें होतें तें वर सांगितलेंच आहे. त्यांत ज्यांचा निर्देश कार्यरूपानें सांगितला त्यांचा निर्देश आतां येथें नामतः करावयाचा.

मी कांहीं साहित्यिक नाहीं. उद्योग, व्यापार हा माझा पूर्व व मध्य आयुष्यांतील आवडता व्यवसाय आणि तो मीं पतकरलेला! अर्थात् ह्याहि व्यवसायांतील निरनिराळ्या शाखांमध्यें महाराष्ट्रीयांनीं शिरावें; आणि इतिहास कालांतील मुलुखगिरी ह्या प्रकारें या चालू कालांत करावी ही माझी साहजिक इच्छा. तेव्हां अशा पेशांत शिरून ज्यांनीं नांवलौकिक मिळविला त्यांचे विषयीं मला अधिक आपलेपणा वाटणें हेंहि सहज आहे. ह्याच दृष्टीनें माझें हें पुस्तक मी बृहन् महाराष्ट्रांतील पदवीधर (वकील)

आणि वर्धिष्णुदृष्टीचे, उद्योगश्रेष्ठी व विख्यात कारखानदार श्री. चं. गो. आगाशे बी. ए. एलएल बी. ह्यांस भेट म्हणून सादर करण्याचें योजिलें आणि त्यांनींहि आग्रहच केल्यावरुन आपली संमती दिली ह्या बद्दल मला आनंद झाला व तसें पुढील पृष्ठावर केलें आहे. ह्याच बाबतींत आणखीहि दोघातिघांचा नामनिर्देश येथेंच करणें माझें कर्तव्य आहे. श्रीमंत सर बाबासाहेब बिवलकर (पुणें), कोहिनूर सिनेमागृहाचे चालक श्रीमंत लक्ष्मण हरि कान्हेरे (मुंबई), श्रीमंत नानासाहेब पुराणिक (पनवेल) ह्यांनींहि आपापल्या कारखान्यांत व व्यवसायांत श्रेष्ठता संपादन केली आहे. व श्री. आगाशे ह्यांचे प्रमाणें ह्या पुस्तकाशीं त्यांचाहि तसाच हितसंबंध आहे. त्याचप्रमाणें श्री. एच्. ए. कीर्तने प्रिन्सिपाल बॉंबे ए. इन्स्टि. मुंबई ह्यांचेंहि सहाय्य मला झालें आहे. आणखी एक व्यापारी स्नेही शेअर ब्रोकर श्री. वामनराव पी. वर्दे ह्याचेंहि नांव येथें सांगणें प्राप्त आहे. ह्या प्रत्येकाविषयीं कांहीं लिहिण्याचें मनांत येतें. पण ह्यांच्याच सांगण्याप्रमाणें आवरतें घेणें भाग आहे. सर्वांच्या सहाय्याचा भार मजवर आहे. आणि आभारोल्लेखानें तो कमी होणारा नाहीं. पण ह्या चुंबळीमुळें तो मला थोडासा सह्य होईल इतकेंच. इतरहि अनेकांचें अनेक प्रकारें साह्य झालेलें आहे. तो ऋणोल्लेख मी आनंदानें करतो.

हा नानांचा **उत्सव-पन्नाशी** व **शकावली-ग्रंथ** सिद्ध होऊन प्रसिद्ध होण्याच्या बाबतींत अनेक नामवंत व्यक्ति व संस्था यांची अमोल मदत झालेली आहे. त्या सर्वांचा नामनिर्देश करणें शक्य नाहीं. तथापि कांहींचा उल्लेख करणें अगदीं अवश्य आहे. त्यांच्या मदतीच्या अभावी हें पुस्तक इतकें **सुंदर, यद्ययावत,** व **इतक्या लवकर बाहेर पडणें** शक्यच नव्हतें. या आर्थिक, शारिरिक, मानासिक, उत्तेजनात्मक अशा हरप्रकारें मला ज्यांचें साहाय्य झालें आहे त्यांचा कृतज्ञतापूर्वक नामोच्चार करून जाहीर आभार व्यक्त करीत आहे—

१. श्री. ग. वि. केतकर,—सं. "केसरी," पुणें. २. प्रा. न. र. फाटक व श्री. य. ना. सोमण ३. शंकरराव जोशी— भा. इ. सं. मंडळ. ४. म० म० प्रा. दत्तो वामन पोतदार. ५. केसरी संस्था, केसरी ग्रंथालय व संपादक वर्ग. ६. अनाथ विद्यार्थी गृह छापखाना व त्यांचे चालक. ७. चित्र–शाळा–प्रेस. ८. श्रीमंत सरदार बाबासाहेब बिवलकर, पुणें. ९. श्रीमंत नानासाहेब पुराणिक. १०. श्रीमंत लक्ष्मण हरि कान्हेरे, मालक–कोहिनूर सिनेमा गृह. ११. श्री. एच. ए. कीर्तने, "प्रिन्सि. बॉंबे एज्यु. इन्स्टिट्यूट, दादर. १२. श्री. देवराव विष्णू नाईक, मालक–श्रीगंगाधर प्रिंटिंग प्रेस, दादर. १३. डॉ. एस्. एन्. दाभोळकर, दादर. १४. श्री. नरहरि मोरेश्वर देशमूख तथा भाऊसाहेब देशमूख. १५. श्री. महादेव सखाराम जोशी. १६. श्री. कृष्णाजी बल्लाळ अभ्यंकर. १७. डॉ० व्ही. एस्. निजसुरे. १८. श्री. माननीय व्ही. पी. वर्दे. १९ रा. ब. सप्रे. इ. इ.

ह्या पुस्तकाचे बाबतींत पुस्तकाची कल्पना वगैरेपासून प्रा. म. म. दत्तोपंत पोतदार ह्यांचा संबंध आहे. तसेंच विद्यावृद्ध, तपोवृद्ध समर्थ पाठशालेचे अध्यापक, केसरीचे संचालक श्री. ज. स. तथा तात्याराव करंदीकर हे तर नानाफड. स्मा. चे अध्यक्षच आहेत. ह्या दोघां विख्यात पुरुषांनीं पुस्तकाला पुरस्कार व प्रस्तावना लिहून देऊन मला ऋणी करून ठेवलें आहे. प्रा. बाबुराव फाटक ह्यांचा उल्लेख वर आलाच आहे. पण ह्यांचें साह्य मला फार फार झाले. ह्यांना मी बंधु म्हणावें कीं मित्र म्हणून संबोधावें. सारांश, इतका आपलेपणा; ह्यांची सल्ला व लेखनात्मक मदत झाली. ह्यांचेहि पण आभार मानतों.

शेवटीं नाना फडणीस स्मारक-मंडळ, भारत इतिहास संशोधक मंडळ, ब्लॉक देणारे मंडळी, श्री. **तात्यासाहेब करंदीकर**, श्रीमंत तात्यासाहेब फडणवीस ह्या सर्वांचें आभार मानून व जगन्नियंत्याचे आशीर्वाद इच्छून हें निवेदन पुरें करतों.

पोपटलाल चाळ नं. २
रानडे रोड, मुंबई १४,
दादर.

के. बी. जोशी

लोकमान्य स्मृतिदिन १९५०

वेळास व त्याचे मार्ग

वेळास हा गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील अगदीं उत्तरेकडील गांव असून या गांवापासूनच रत्नागिरी जिह्याला आरंभ होतो असें म्हटल्यास चालेल. हा मंडणगड तालुक्यांतील गांव आहे. या गांवची लांबी सुमारे १ मैल व रुंदी सुमारें पाऊण मैल होईल. या गांवाच्या तिन्ही बाजूंस डोंगर असून पश्चिमेस अर्थात पश्चिम समुद्र विराजत आहे. गांव बागायती असून नारळ, सुपारी व हापूस आंबे यांचें उत्पन्न प्रामुख्यानें आहे. त्यांतल्या त्यांत आंब्याचें उत्पन्न सुमारें २।३ लक्षांचें आहे.

गांवांत ब्राह्मण, दैवज्ञ, कित्तेभंडारी, चौकळशी माळी, न्हावी, गुरव व कुळवाडी वगैरे मिळून सुमारें २०० घरांची वस्ती असून सुमारें १००० लोक-वस्ती आहे. येथील लोकांचा धंदा शेती व बागायतीचा आहे. गांवांत श्री बहिरी, रामेश्वर, श्री दुर्गादेवी, मारुती वगैरे देवालयें आहेत त्यांत श्री दुर्गादेवी हिचा वार्षिक उत्सव चैत्र शुद्ध ५ पंचमीला मोठ्या थाटानें साजरा होतो. श्री कालबहिरीचें देवालय उत्सव मूर्ति नाना फडणवीस यांनी बांधलें. त्यामुळें गांवास मोठी शोभा आली आहे. या गांवांस येण्याचे मार्ग दोन आहेत एक जलमार्ग व दुसरा मोटारीनें. जलमार्ग मुंबईहून श्रीवर्धन बंदरास उतरून तेथून हरिहरेश्वर बाणकोट यावरून आहे. व दुसरा स्थल-मार्ग मुंबई, पनवेल, पेण, दासगांव पर्यंत मोटारीनें. नंतर दासगांव ते बाणकोट मोटारलाँचनें, पूर्वीं हरेश्वर बंदरी बोट लागत होती त्या वेळीं या गांवीं येण्यास फार सोईचें होतें. हल्लीं तो मार्ग बंद आहे. पुणें साताऱ्याहून वाई महाबळेश्वर रस्त्यानें महाड किंवा वरंधाघाटानें महाड व तेथून दासगांव; पुण्याहून धरमतरमार्गानें दासगांव व दासगांव ते बाणकोट.

मोटरलॉंच म्हणजे वाफाऱ्यानें जावयाचें. जर महाडहून बाणकोट पर्यंत मोटार सडक होईल. तर येथील, व्यापार धंद्यास फार उत्तेजन मिळेल. व लोकांची आर्थिक स्थिति सुधारेल. आपल्या सरकारचें लोकांच्या सोईकडे लक्ष असल्यामुळें पुढें मागें बाणकोट ते महाड मोटार सडक होण्याचा बराच संभव आहे.

या गांवचें सृष्टिसौंदर्य सुंदर असून हवा साधारण चांगली आहे. तसेंच पाण्याचीही या गांवास एक मोठी ईश्वरी देणगीच आहे. गांवांत एक प्राथमिक शाळा असून ब्रॅन्च पोस्ट ऑफिस आहे. हा गांव जलमार्गानें मुंबई पासून सुमारें ६०।६५ मैल आहे. व मोटार मार्गानें सुमारें १५० मैल लांब आहे.

अर्पण

महाराष्ट्राला उद्योगावांचून खरें महान् होतां येणार नाहीं, हा चालू युगाचा आदेश ज्या ज्या महाराष्ट्रीयांनीं आपल्या आचरणानें दिला व त्यांतील शेखरस्थ मंडळींत जे चंद्राप्रमाणें शीतल प्रकाश दायक झाले आहेत त्यांपैकीं



श्रीमंत **चंद्रशेखर गोविंद आगाशे**, बी.ए., एल्एल्.बी., ह्यांना त्यांच्या ठिकाणच्या स्वदेशनिष्ठा, स्वधर्मप्रेम आणि उद्योगशीलता व दानप्रियता ह्या गुणांचें स्मरण म्हणून इतिहासकालीन एका श्रेष्ठ मंड्याच्या उत्सवाचें हें वृत्तान्त पुस्तक

सादर अर्पण करीत आहें.

पोपटलाल चाळ नं. २
रानडे रोड, मुंबई १४, दादर

के. बी. जोशी

पुरस्कार

पंपवाले जोशी म्हणून वंगभंगाच्या जुन्या चळवळीच्या काळीं श्री. के. बी. जोशी यांस क्वचित् पाहिलेलें होतें आणि वेळास मुक्कामीं होणाऱ्या नाना फडणवीस उत्सवाचे केसरींत येणारे वृत्तान्तहि तरुणपणीं उत्सुकतेनें वाचल्याचें स्मरतें. विशेषें करून ' नानांचा अधिकारयोग ' हा सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. वासुदेवशास्त्री खरे यांचा अप्रतिम ग्रंथ या उत्सवांतच प्रगट झाला. कै. राधारमण कवि (लिमये) यांचे ' नाना फडणीस काव्य ' हा सुरस व प्रौढ काव्यग्रंथ याच प्रेरणेचें फळ समजण्यास चिंता नाहीं. देशभक्त विनायकरावजी सावरकर यांचा ' ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव कां करावे ' हा तरुणपणीं लिहिलेला चटकदार निबंधहि याच उत्सवांतील बक्षिसाला पात्र ठरून प्रसिद्ध झाला. अशी या वेळास येथील उत्सवाची परंपरा चांगलीच गाजलेली होती.

नानांचा हा उत्सव एका दृष्टीनें श्री छत्रपति शिवाजी महाराज यांचा कै. लो. टिळक यांनीं सुरू केलेल्या मोठ्या उत्सवाचेंच एक अपत्य समजलें असतां तें उचित ठरेल. ऐतिहासिक पुरुषांच्या राष्ट्रीय उत्सवाचा टिळकांनीं केला एवढा पुरस्कार दुसऱ्या कोणींहि केला नाहीं, हें अगदीं सत्य आहे. टिळकांचे कर्तबगारी ' म्यानेजर ' व भाचे कै. धोंडोपंत विद्वांस हे वेळास पलीकडील केळशीचे, म्हणून टिळकांचा या फडणीस उत्सवाशीं निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध आला हें योग्यच समजलें पाहिजे. या उत्सवाचा पुरस्कार टिळकांचा ' केसरी ' अद्यापहि सोत्सुक करीत असतो ही समाधानाची गोष्ट होय.

प्रथमच उल्लेखिलेले पंपवाले जोशी हे या उत्सवाचे एक पहिल्यापासून-चे प्रमुख कार्यकर्ते आहेत. या उत्सवाचें कार्य हें त्यांनीं आपल्या

आयुष्यांतील महत्त्वाचें कार्य समजून त्याची जोपासना करण्यांत आपलें मन गुंतविलेलें आहे. वेळास येथील उत्सवास जाण्याचा जेव्हां १९४४ सालीं आम्हांला योग आला तेव्हां सभेंतच या उत्सवाबाबत एक प्रश्न विचारण्यांत आला. त्याचा शोध घेण्यासाठीं आपल्या संग्रहीं असलेल्या ' केसरी 'च्या फाईली चाळून पाहिल्या. तेव्हां या उत्सवाची सालोसालचीं केसरींत आलेलीं वृत्तें इतक्या वर्षांनीं पुनः वाचण्याचा योग आला. या उत्सवाला ४०।५० वर्षें झालीं. आतां जुन्या हकीगती नवीन पिढीस अगदींच माहीत नसणार, ही गोष्ट बरी नव्हे असें वाटल्यावरून, के. बी. जोशी (पंपवाले) यांचे भेटींत हा विषय त्यांचे समोर मांडला. ' केसरीच्या फाईलांतील जुनीं वृत्तें त्यांस दाखविलीं. के. बी. यांच्या समक्ष घडलेल्या त्या त्या जुन्या हकीगती त्यांनी मोठ्या कौतुकानें वाचल्या. तो जुना काळ आणि त्या वेळचा उत्साह त्यांचें ठिकाणीं पुनः इतक्या वर्षांनीं जागृत झाला. त्यांना मोठा हर्ष झाला. उत्सवाचीं जुनीं पत्रकें व अहवाल होते ते देखील सांप्रत दुष्प्राप्य झाले आहेत हें लक्षांत येतांच हें सर्व जुनें वृत्त लुप्त होऊं न देतां पुनर्मुद्रित करण्याची आमची सूचना त्यांनीं एकदम मान्य केली आणि काम आमचेवर सोंपविलें. मग आम्ही केसरीची फाईलें बारकाईनें तपासूं लागलों तों त्यांत उत्सवासंबंधीं पत्रकें, स्फुटसूचना वगैरे अन्य उपयुक्त मजकूरहि आढळला. कांहीं वर्षांचीं फाईलें आमचे संग्रहीं नव्हतीं, कांहीं अपूर्ण होतीं. तीं पाहण्यास व नकला घेण्यास मदत पाहिजे होती. तेव्हां आमचे उत्साही मित्र श्री. शंकरराव जोशी यांचें साहाय्य के. बी. यांनीं मिळविलें.

कामास प्रारंभ झाला. आमचे जुने मित्र, सहकारी आणि नाना-फडणीस उत्सवमंडळाचे उत्साही व शोधक सभासद प्रा. न. र. फाटक यांचें साहाय्यहि मिळविलें. आमची प्रथम इ. स. १९१० पर्यंतच्या जुन्या उत्सवाचीं वृत्तें वगैरे छापावीं एवढीच मर्यादित कल्पना

फाटक, जोशी प्रभृतींच्या विचारें आजतागायतचीं वृत्तेंहि
स पूर्णता आणावी असें ठरलें. मग उत्सवाशीं संबद्ध व्यक्ति,
ं वगैरेंचीं चित्रें मिळवून जोडावीं असेंहि ठरलें. कांहीं टीपा
हेतींत भर घालण्यांत आली.

ं बेळगांवचे कै. पां. गो. रानडे यांनीं एक चमत्कारिक वादळ
खूळ समूळ मोडून काढावें असा जोराचा प्रयत्न प्रा. फाटक
स. करंदीकर प्रभृतींकडून झाला. सप्रमाण व्याख्यानांच्या
यांत आल्या. त्या व्याख्यानांचें स्वतंत्र पुस्तक छापण्याचा
. पण त्याची विशेष प्रगति झाली नव्हती. याच ग्रंथांत
ामर्ष सारांशानें घ्यावा म्हणजे तेंहि काम अंशतः सिद्धीस नेल्या-
ळ असेंहि ठरलें. झालें. ग्रंथ वाढत गेला. आणि उत्साही
टप्याटप्याच्या वाढीला होकार भरीत गेले! हें पाहून आमच्या
व जोशांनीं नानांची एक शकावली तयार करण्याचा उद्योग
े शकावली', 'शिवाजी शकावली', 'माधवराव शकावली' वगैरे
ह्या क्षेत्रांतील उद्योग अभ्यासकांस अत्यंत उपयुक्त ठरले आहेत.
' रचना निश्चित पुराव्यानें अभ्यासपूर्वक करावी लागते. ती
शंकररावांचे ठायीं उत्तमांतली आहे. एवढ्या परिश्रमाचें
निमित्तानें पदरीं पडत आहे. हें पाहतांच तें श्रेय पदरीं
बी. यांनीं पदर पुढेंच केला! ही 'शकावली' टिकाऊ स्वरू-
ग्रंथांत' मोडते. या उत्सववृत्त ग्रंथांचें आणि शकावली–ग्रंथाचें
कांहीं अंशीं भिन्न आहेत. म्हणून शकावलीचा भाग
ावा. असा निर्णय केला. या प्रकारचा उत्सववृत्तग्रंथ प्रका-
वें कार्य वास्तविक रीत्या नानाफडणवीस–उत्सव–मंडळानेंच
ाचित ठरलें असतें. तथापि अद्यापि उत्सव मंडळास वेळासचें
अधिक निकडीच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा यत्न आधीं

आयुष्यांतील महत्त्वाचें कार्य समजून त्याची जोपासना करण्यांत आपलें मन गुंतविलेलें आहे. वेळास येथील उत्सवास जाण्याचा जेव्हां १९४४ सालीं आम्हांला योग आला तेव्हां सभेंतच या उत्सवाबाबत एक प्रश्न विचारण्यांत आला. त्याचा शोध घेण्यासाठीं आपल्या संग्रहीं असलेल्या ' केसरी 'च्या फाईली चाळून पाहिल्या. तेव्हां या उत्सवाची सालोसालचीं केसरींत आलेलीं वृत्तें इतक्या वर्षांनीं पुनः वाचण्याचा योग आला. या उत्सवाला ४०।५० वर्षें झालीं. आतां जुन्या हकीगती नवीन पिढीस अगदींच माहीत नसणार, ही गोष्ट बरी नव्हे असें वाटल्यावरून, के. बी. जोशी (पंपवाले) यांचे भेटींत हा विषय त्यांचे समोर मांडला. ' केसरीच्या फाईलांतील जुनीं वृत्तें त्यांस दाखविलीं. के. बी. यांच्या समक्ष घडलेल्या त्या त्या जुन्या हकीगती त्यांनी मोठ्या कौतुकानें वाचल्या. तो जुना काळ आणि त्या वेळचा उत्साह त्यांचें ठिकाणीं पुनः इतक्या वर्षांनीं जागृत झाला. त्यांना मोठा हर्ष झाला. उत्सवाचीं जुनीं पत्रकें व अहवाल होते ते देखील सांप्रत दुष्प्राप्य झाले आहेत हें लक्षांत येतांच हें सर्व जुनें वृत्त लुप्त होऊं न देतां पुनर्मुद्रित करण्याची आमची सूचना त्यांनीं एकदम मान्य केली आणि काम आमचेवर सोंपविलें. मग आम्ही केसरीची फाईलें बारकाईनें तपासूं लागलों तों त्यांत उत्सवासंबंधीं पत्रकें, स्फुटसूचना वगैरे अन्य उपयुक्त मजकूरहि आढळला. कांहीं वर्षांचीं फाईलें आमचे संग्रहीं नव्हतीं, कांहीं अपूर्ण होतीं. तीं पाहण्यास व नकला घेण्यास मदत पाहिजे होती. तेव्हां आमचे उत्साही मित्र श्री. शंकरराव जोशी यांचें साहाय्य के. बी. यांनीं मिळविलें.

कामास प्रारंभ झाला. आमचे जुने मित्र, सहकारी आणि नाना-फडणीस उत्सवमंडळाचे उत्साही व शोधक सभासद प्रा. न. र. फाटक यांचें साहाय्यहि मिळविलें. आमची प्रथम इ. स. १९१० पर्यंतच्या जुन्या उत्सवाचीं वृत्तें वगैरे छापावीं एवढीच मर्यादित कल्पना

होती. पण फाटक, जोशी प्रभृतींच्या विचारें आजतागायतचीं वृत्तेंहि जोडून ग्रंथास पूर्णता आणावी असें ठरलें. मग उत्सवाशीं संबद्ध व्यक्ति, प्रसंग, स्थळें वगैरेंचीं चित्रें मिळवून जोडावीं असेंहि ठरलें. कांहीं टीपा जोडून माहितींत भर घालण्यांत आली.

मध्यंतरीं बेळगांवचे कै. पां. गो. रानडे यांनीं एक चमत्कारिक वादळ उठविलें. तें खूळ समूळ मोडून काढावें असा जोराचा प्रयत्न प्रा. फाटक व श्री. ज. स. करंदीकर प्रभृतींकडून झाला. सप्रमाण व्याख्यानांच्या माला गुंफण्यांत आल्या. त्या व्याख्यानांचें स्वतंत्र पुस्तक छापण्याचा संकल्प होता. पण त्याची विशेष प्रगति झाली नव्हती. याच ग्रंथांत त्याचाहि परामर्ष सारांशानें घ्यावा म्हणजे तेंहि काम अंशतः सिद्धीस नेल्या-सारखें होईल असेंहि ठरलें. झालें. ग्रंथ वाढत गेला. आणि उत्साही के. बी. या टप्याटप्याच्या वाढीला होकार भरीत गेले! हें पाहून आमच्या श्री. शंकरराव जोशांनीं नानांची एक शकावली तयार करण्याचा उद्योग केला. 'आंग्रे शकावली', 'शिवाजी शकावली', 'माधवराव शकावली' वगैरे शंकररावांचे ह्या क्षेत्रांतील उद्योग अभ्यासकांस अत्यंत उपयुक्त ठरले आहेत. ' शकावली ' रचना निश्चित पुराव्यानें अभ्यासपूर्वक करावी लागते. ती पात्रता श्री. शंकररावांचे ठायीं उत्तमांतली आहे. एवढ्या परिश्रमाचें हें फलहि या निमित्तानें पदरीं पडत आहे. हें पाहतांच तें श्रेय पदरीं घेण्यास के. बी. यांनीं पदर पुढेंच केला ! ही 'शकावली' टिकाऊ स्वरू-पाच्या 'संदर्भग्रंथांत' मोडते. या उत्सववृत्त ग्रंथांचें आणि शकावली–ग्रंथाचें प्रयोजन हीं कांहीं अंशीं भिन्न आहेत. म्हणून शकावलीचा भाग स्वतंत्रपणें करावा. असा निर्णय केला. या प्रकारचा उत्सववृत्तग्रंथ प्रका-शित करण्याचें कार्य वास्तविक रीत्या नानाफडणवीस–उत्सव–मंडळानेंच तडीस नेणें उचित ठरलें असतें. तथापि अद्यापि उत्सव मंडळास वेळासचें स्मारक वगैरे अधिक निकडीच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा यत्न आधीं

केला पाहिजे. परंतु अनायासें के. वी. प्रभृतींनीं हें काम हातीं घेऊन तडीला नेत आणलें. तेव्हां आमचे मित्र न. र. फाटक यांनीं यशस्वी वाटाघाटी करून हा ग्रंथ आणि उत्सवमंडळ यांचा संबंध जुळवून आणला. के. वी. नीं हा ग्रंथ उत्सवमंडळाला बक्षिशीं अर्पण करण्याचा पर्याय त्यांतील औचित्य ओळखून स्वीकृत केला ही फार संतोषाची गोष्ट होय.

प्रस्तुत ग्रंथाची मनोरंजक जन्मकथा थोड्या विस्तारानें मुद्दामच येथवर सांगितली. यानंतर या ग्रंथाकडे वाचकांनीं कोणत्या दृष्टीनें पाहावें या विषयीं कांहीं लिहिणें अवश्य वाटतें. उक्त ग्रंथांत दिलेलें उत्सववृत्त प्रायः 'केसरी' वरून उध्दृत करून दिल्याचें वर लिहिलेंच आहे. वक्त्याचें भाषण वृत्तपत्रांत येतें तें कांहीं शब्दशः येतें नाहीं. सारांशरूपानें वक्त्यांचे वेंचक उद्गार शब्द यांच्या आश्रयानें त्याचा आशय शक्य तितका बिनचूक दिला म्हणजे वार्ताहरानें आपलें कर्तव्य चोख बजाविलें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. शिवाय वक्ता कांहीं निबंध लिहून वाचीत नाहीं. लिहि-लेला निबंध आणि तोंडानें केलेलें उत्स्फूर्त भाषण यांत अंतर पडणें साहजिक आहे. पहिलें बांधीव व नेमक असतें तर दुसरें ढिलें व मोकळें असतें. समंजसपणाची जोड सहानुभूतीपूर्वक देऊनच हे सारांश वाचल्यानें कार्यभाग योग्य प्रकारें साधतां येतो. त्यांतून आणखी लक्षांत घ्यावयाची गोष्ट अशी कीं, उत्सवविषयीभूत नाना फडणीस ही एक ऐतिहासिक व्यक्ति आहे. आज नानाप्रभृतींच्या चरित्रांतील विविध घटनांविषयीं जितकीं साधनें उपलब्ध झालीं आहेत तितकीं चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं अर्थातच नव्हतीं. ही सापेक्ष दृष्टि जागृत ठेवूनच त्या वेळच्या व्याख्या-त्यांचीं व्याख्यानें आज वाचलीं पाहिजेत. म्हणजे बापू गोखल्यांचा उत्सव (पृ. २४) किंवा देशाचा नकाशा (पृ. २७ व पृ. ५ व १९६) या अशा मुद्द्याबाबतचीं विधानें आपणांस प्रस्तुत काळांत घडणाऱ्या घटना आणि

पुढें आलेले नवे पुरावे यांच्या साहाय्यानें तारतम्यानें पडताळून पाहतां येतील. सारांश दिल्यानें क्वचित् संशयस्थळें निर्माण होतात. त्याचें प्रत्यंतर पृ. ८८ वर 'राघोबा इंग्रजाला मिळाला' या तळाकडून दुसऱ्या ओळींतल्या वाक्यावरून आपणांस मिळेल. कदाचित् उद्गारचिन्ह काढून पुढील संदर्भाशीं हें वाक्य जुळवितां येईल. पण तुटकपणा आला आहे यांत तरी शंका नाहीं. यामुळें असें वाटतें कीं, संपादकीय टीपा अधिक असत्या तर बरें झालें असतें. नाहीं पेक्षां थंडें मिशन व गरम मिशन (पृ. ३०) नानांचे आजोबा (पृ. ६९) नानांचीं दोन पत्रें (पृ. ६३) किंवा थो. माधवरावांचें मृत्यु पत्र [पृ. १५६] अथवा 'नवकलमी यादी' वगैरे कित्येक स्थळीं अशा टीपांची जरूर भासते.

पुस्तकांत १९०० सालचा 'केसरींत' नानांचे शताब्दि निमित्तानें आलेला अग्रलेख व चरित्रसमालोचन हेंहि जोडलें आहे. आज पन्नास वर्षांत माहितींत व मतांत किती तरी बदल झाला असला तर तें साहजिक आहे. ब्रह्मेंद्रस्वामींचाच विषय घेतला तर अनेक जाणत्या व अभ्यासी मंडळींचीं मतें ब्रह्मेंद्रास रामदासांच्या बरोबरीचा मान देण्यासंबंधांत कमी पडतील. हें मनांत आणिलें असतां या पूर्वी जो इशारा दिला आहे, त्यांत सुचविलेलें तारतम्य येथेंहि वापरावें लागेल. तसेंच नाना आणि महादजी हा विषय निरंतर घुमणारा असाच वाटतो. तथापि दोघे मराठशाहींतले अखेरचे दोन थोर पुरुष होते हा निर्णय सर्वमान्य होण्यास अडचण येणार नाहीं असें वाटतें. नानांचें कर्तृत्व मुक्तकंठानें वर्णन करणारे इंग्रज लेखकांचे उतारे 'केसरीच्या' वरील अग्रलेखांत दिले आहेत तेवढे जरी वाचले तरी पुष्कळांस नानांच्या थोरवीविषयीं संशय राहणार नाहीं.

प्रस्तुत ग्रंथाची जन्मकथा मागें सविस्तर वर्णन केलीच आहे. अर्थात् त्यांत सर्वत्र नानांची प्रशंसाच दृष्टीस पडली तर त्यांत गैर कांहीं नाहीं. समतोल, न्यायनिष्ठुर इतिहास ग्रंथाची भूमिका अर्थातच वेगळी राहणार.

पण तेथेंहि नानांची थोरवी ठसठशीतपणें प्रगट झाल्याशिवाय सहसा राहणार नाहीं. या ग्रंथाचें प्रयोजन नानासारख्या संस्मरणीय व थोर अशा आपल्या पूर्वपुरुषांच्या चरित्राविषयीं प्रीति व आदर उत्पन्न करण्याचेंच मुख्यतः आहे आणि तें उत्तम प्रकारें सिद्धीस जाईल यांत शंका नाहीं.

के. बी. तरुणपणापासूनच या कार्यांत पडलेले. नानांचा जन्म सातारचा. त्यांचे कर्तृत्वाचें केंद्र पुणें, निवासस्थान मेणवली, तीर्थस्थान काशीं, त्यांच्या सार्वजनिक कामाचें दृश्य खोपोलीचा सुंदर तलाव; पण हीं सर्व सोडून आज नानांचें नांव वेळास गांवांशीं विशेषत्वानें निगडित झालेलें आपण पाहतों. नाना हे भानू; भानूंचा वतनी गांव वेळास, के. बी. प्रभृति वेळासकरांनीं उत्सवरूपानें नानांची सेवा आस्थेनें आज पन्नास वर्षें केली आणि के. बी. चें उतार वय झालें तरी असा ग्रंथ प्रसिद्ध करण्यास त्यांनीं कमर कसावी याबद्दल त्यांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच होईल.

शेवटीं अपेक्षा एवढीच आहे कीं नानांचें स्मरण जागृत राहावें, त्यांचे काशी, पुणे, मेणवली प्रभृति ठिकाणचे वाडे स्मारक म्हणून जतन व्हावे, सार्वजनिक ऋणानुबंधानें त्यांची शोभा व महत्व वाढावें, नानांचें सुंदर चरित्र मराठींत व अन्य भाषांत व्हावें आणि जशी नानांनीं आपल्या काळीं 'मनसोब्याची तलवार चालविणारे मोठे धुरंधर मुत्सद्दी' म्हणून अद्वितीय कीर्ति मिळविली तशी कीर्ति नवीन युगांत मिळविण्याची धमक, पात्रता व स्फूर्ति आमच्या तरुण मंडळांत उत्पन्न व्हावी. ही अपेक्षा प्रस्तुतचा ग्रंथ अल्पांशानें कां होईना पण पूर्ण करील हा भरंवसा वाटतो.

[ज्येष्ठ व. १२–७२ ता. १२–६–५० पुणें] **दत्तो वामन पोतदार**

या ग्रंथाचें राष्ट्रीय महत्त्व

जिज्ञासा बुद्धीला 'कां' व 'कसे' या प्रश्नार्थक जोडगोळीनें रेखीव रूप दिलें आहे. राष्ट्रीय थोर पुरुषांचे उत्सव, म्हणजे त्यांची स्मृति राखण्याची ...स्था कां करावी यासंबंधानें स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा तरुणपणीं लिहिलेला निबंध वेळास येथील नाना फडणीसांच्या उत्सवाचेसाठीं लिहिला गेला. ऐतिहासिक विभूतींचे उत्सव कां करावे हें आतां सांगत बसण्याची आवश्यकता उरली नाहीं. अनेक ऐतिहासिक विभूतींचें आणि कर्त्या पुरुषांचे उत्सव सध्यांचे काळीं देशभर रूढच झालेले आहेत.



ग. वि. केतकर

" ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव कसे करावे ? " या प्रश्नाला उत्तर केवळ तात्विक दृष्ट्या नव्हे तर पन्नास वर्षांच्या कृतिसातत्यानें 'वेळास येथील नाना-फडणीस उत्सवाचे' रूपानें मिळालें आहे. अर्धशतक-पर्यंत चिकाटीनें आणि राष्ट्रीय बुद्धीनें चालविलेल्या ह्या उत्सवाच्या पन्नाशीच्या निमित्तानें प्रगट होणारा हा ग्रंथ म्हणजे, त्या कालांत नाना फडणीस चरित्रविषयक जीं महत्त्वाचीं व्याख्यानें झालीं व लेख प्रसिद्ध झाले त्यांचा संग्रह येवढें त्याचें स्वरूप असतें तरीहि तो ग्रंथ संग्राह्यच झाला असताच; पण त्याच्याहि पुढे या ग्रंथानें पाऊल टाकलें आहे. या सर्व व्याख्यानांचें व लेखांचें वाचन करणाऱ्या वाचकाला वाटाड्यासारखी उपयोगी पडणारी आणि अत्यंत परि-श्रमानें अद्ययावत् माहितीचा संग्रह करून लिहिलेली **श्री. शंकरराव जोशीकृत शकावली** या ग्रंथाला जोडली आहे. तसेंच या नव्या माहितीवर आधारलेले अभ्यासी लोकांचे लेखहि यांत आहेत.

श्री. के. बी. जोशी यांनीं वयाचे सोळाव्या वर्षी विद्यार्थीदशेंत अस-तांना वेळासच्या या उत्सवाची योजना मनांत आणली. ती लोकमान्य टिळकां-समोर मांडून त्यांचा पाठिंबा तिला मिळवण्याचा आत्मविश्वासहि त्यांनीं

त्याच वयांत दाखविला, आज त्यांचें वय ७० च्या पुढें आहे—पण उत्साह सोळाव्या वर्षीं जसा होता तसाच आहे हें आश्चर्य आहे. पूर्वीच्या उत्साहांत दीर्घकालीन अनुभवानें उत्पन्न झालेल्या योजकतेची आणि चिकाटीची भरच पडली आहे. त्यांची सतत प्रेरणा आणि प्रयत्न यांचेंच हें पुस्तक हें फळ आहे. आपण तरुणपणीं ज्या उत्सवाचे अनुषंगानें पारितोषिक मिळवणारा निबंध लिहिला तो उत्सव पन्नास वर्षें चालून त्यांचे अनुषंगानें संकलनात्मत व संशोधनात्मक असा नाना फडणीसांसंबंधीचा सर्वसंग्रह या ग्रंथाचे रूपानें सिद्ध होत आहे हें पाहून वीर सावरकर यांनीं श्री. के बी. जोशी यांस लिहिलें कीं एकाच कार्यांत निष्ठेनें व सातत्यानें इतकीं वर्षें प्रयत्नशील राहण्याचे श्री. जोशी यांचें उदाहरण दुर्मीळ आणि अनुकरणीय आहे.


अनेक वर्षांच्या पारतंत्र्यानंतर स्वायत्त भोगणाऱ्या आपल्या राष्ट्राला शौर्य, पराक्रम, प्रयत्नवाद, त्याग, निष्ठा यांचेप्रमाणेंच राजकार्य-धुरंधर मुत्सद्दीपणाची आवश्यकताहि कशी पदोपदीं आहे याचा प्रत्यय गेल्या तीन वर्षांत चांगलाच आला आहे. या राष्ट्रांतील ऐतिहासिक पराक्रमी आणि त्यागी पुरुषांच्या चरित्राप्रमाणेंच मुत्सद्यांचीं चरित्रेंहि राष्ट्रघटकांच्या डोळ्यापुढें मार्गदर्शक म्हणून ठेवणें हे आजहि आवश्यकच आहे. या पुरुषां-संबंधीचा अभिमान किंवा पूज्यभाव मोघम आणि अंधश्रद्धेचा न राहतां त्यांच्या कर्तृत्वाची यथातथ्य आणि सप्रमाण माहिती जाणत्या लोकांना मिळाली पाहिजे. या दृष्टीनें मराठेशाहींतील एक अपूर्व धोरणी मुत्सद्दी नाना फडणीस यांचे संबंधाचा हा ग्रंथ सतत संदर्भासाठीं अभ्यासी आणि जिज्ञासू अशा दोन्ही प्रकारच्या वाचकांना अत्यंत उपयुक्त झाला आहे. महाराष्ट्रीय वाचकवर्गाकडून त्याचें स्वागत झालें म्हणजे त्या कामीं परिश्रम करणारे श्री. के. बो. व शं. ना. जोशी प्रभृति अनेक लोकांना धन्यता वाटणार आहे.

ग. वि. केतकर



'श्री करणाधिप' बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणवीस

जन्म श. १६६३ माघ व. ४] [मृत्यु श. १७२१ फाल्गुन वद्य ३



बेलबाग—विष्णु मंदिर—स्थापना श. १६९१ इ. १७६९



'नवा काळ'—कृ. प्र. खाडिलकर, सं. पृ. १३३ पहा.

तरी ह्यांतहि ध्यानांत घेण्याजोगी गोष्ट ही कीं, हा उतार मधलीं कांहीं वर्षें झाला तथापि पुनः ह्या उत्सवास जोराची चालना मिळाली. इतकेंच नव्हे तर उत्सवाचें सातत्यहि राखलें जाईल अशी योजना होऊन अलीकडील पांचसात वर्षें त्याप्रमाणें हा *'मंत्र्युत्तम' नानांचा उत्सव चालू आहे.

अशा स्थितींत प्रारंभीं प्रारंभीं हा उत्सव कसा साजरा झाला, कोणकोण थोर राष्ट्रीय पुढारी व विद्वान् मंडळी ह्या उत्सवार्थ आली. उत्सवप्रसंगानें आनुषंगिक म्ह. वाङ्मयात्मक आणि औद्योगिक कार्य कोणचें झालें हें पुढील म्ह. अलीकडील पिढीस कांहींच माहीत नाहीं व माहीत असण्याचें साधनहि डोळ्याआड झालेलें. म्हणजे उत्सवाच्या वार्ता प्रारंभापासून केसरी-सारख्या लोकमान्य व प्रतिष्ठित वृत्तपत्रांतून ठळकपणें प्रसिद्ध झाल्या असतांना, इतरहि नियतकालिकांतून वा वृत्तपत्रांतून उल्लेख आलेले, बातम्या आलेल्या; तरी ते ते अंक आजच्या पिढीच्या डोळ्यापुढें नाहींत. व तें सहजहि आहे. पण त्यामुळें ह्या उत्सवाची माहिती अलीकडील पिढीला नाहीं; हा परिणामहि सहजच असला तरी तसें असणें उपयोगी नाहीं हें त्याहून खरें आहे. अर्थात् ही प्रारंभींची जुनी उत्सववार्ता एकत्रित करून ग्रंथरूपानें प्रकाशित करणें आवश्यक झालें. विशेषतः जवळ जवळ प्रारंभापासून ज्यांनीं ह्या उत्सवाचे कामीं यत्न केले, उत्सव सातत्यानें पाहिले, नुसतें पाहिले नाहीं तर घडवूनहि आणिले, अशी कांहीं मंडळी विद्यमान असतां, त्यांना, ही स्थिति असणें उपयोगी नाहीं असें फार वाटूं लागलें. आणि जेव्हां अशांना कांहीं नवीन मंडळी माहिती विचारीत तेव्हां त्यांपैकीं कांहींना तर ह्या अज्ञानास आपणच कारण आहोंत असेंच वाटलें. एकदां अशी माहिती देण्याचा प्रसंग स्वतः मजवरच आल्यामुळें मींच प्रो. पोतदार ह्यांच्या सांगण्यावरून ठरविलें

*'मंत्र्युत्तम' हें विशेषण रामशास्त्री प्रभुणे, न्यायाधीश, ह्यांनीं नाना फडणवीस ह्यांना योजिलेलें आहे. अहल्याबाईनींहि नानांचा असाच गौरव वेळोवेळीं आपल्या पत्रांतून केला आहे.

कीं अशी माहिती मिळवून व तींत जें काय आठवेल त्याची भर घालून, कांहीं आवश्यक त्या टीपा देऊन आपणच ही उत्सव-पन्नाशीची वार्ता प्रसिद्ध करावी.

दुसरें असें कीं, जुना वृत्तान्त ठाऊक असणें हेंच पुष्कळ वेळां प्रेरक-गुणाचें असतें. तिसरेंहि एक असें कीं, जें जें घडलें तें तें लिखित न करण्याचा दोष हा एक राष्ट्रीय अवगुण म्हणून आमच्या समाजाच्या माथीं मारला जातो. संस्थाप्रधान जीवन नाहीं; आणि झाल्या कारभाराचें चोख व दैनिक वा संकलनात्मक असा आढावा घेतलेलें कार्यवृत्त दप्तरीं नसावयाचें; असाहि त्या त्या कार्यवाहांना ठपका दिला जातो; ह्याहि दृष्टीनें ह्या उत्सवाचें जेवढें व जसें मिळालें तसें वृत्त एकत्रित ग्रथित करणें आवश्यक वाटलें व पुढील वृत्तांत प्रसिद्ध करण्याचें योजिलें.

प्रथम हें काम प्रो. म. म. पोतदार यांजकरवींच व्हावयाचें. पण त्यांच्याकडे इतर अनंत कामें, त्यांत त्यांना अवसर मिळेना. म्हणून नाना फ. स्मा. मं. च्या कार्यकारी समितीचे एक सदस्य श्री. शंकरराव जोशी यांजकडे तें सोंपविलें, त्यांनीं पोतदारांच्या सल्ल्यानें हें उरकलें आहे.

हा वृत्तांत पन्नास वर्षांचे केसरीवृत्तपत्राचे अंक पाहून त्यांतून जेवढा व जसा मिळाला तसा दिला आहे. ज्यांनीं ह्या उत्सवाच्या कार्यक्रमांत भाग घेतला त्यांचेंहि वृत्त व चित्र थोडी खटपट करून जें मिळालें तें टीपेंत दिलें आहे. त्यामुळें त्या त्या व्यक्ति कोण होत्या हें कळून येईल. वृत्तपत्र-संपादक व माहिती देणारे ह्या सर्वांचा मी आभारी आहे.

—के. बी. जोशी.

———

उत्सव-पहिला

वर म्हटल्याप्रमाणें नानांच्या शतवार्षिक उत्सवाचा दिवस शक १८२१ फाल्गुन वद्य तृतीया सोमवार म्ह. १९।३।१९०० हा येतो. ह्या तिथीचें परिपालन करून हा पहिला शतसांवत्सरिक उत्सव बऱ्याच ठिकाणीं व अखिल महाराष्ट्रांत सर्वत्र साजरा झाला. पंढरपूर, मंगळवेढें, नागपूर, डिग्रज, अथणी, धुळें, मिरज, करमाळें, शिराळें, काशी, वांई इत्यादि लहान मोठ्या गांवीं हा उत्सव झाल्याची वार्ता केसरींत (२७।३।१९००) आली आहे. कांहीं गांवीं ह्या वेळीं प्लेगसारख्या साथीचा उपद्रव सुरू झाल्यामुळें गांवकरी मंडळी गांव सोडून रानांतून झोंपड्या उभारून तेथें राहिली होती. तेथेंहि हा उत्सव झाला आहे. खुद्द मुंबईचीच गोष्ट अशी आहे.

घाटकूपर येथें झोंपड्यांतून राहिलेल्या मंडळींत श्री. **विष्णु मोरेश्वर गोविलकर** [1] ह्यांनीं वरील दिवशीं सभा केली. आणि सभेस डॉ. **मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब देशमुख**, एम्. डी.; श्री. रा. **म. रा. बोडस** एम्. ए. एल्एल्. बी. हायकोर्ट वकील इ. आले होते. ब्राह्मणसभेच्या दिवाणखान्यांतहि हा समारंभ झाला.

वांईस रा. चितळे यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. व वाइहून **मेणवली** हा नानांचा गांव; तेथें त्यांचा टुमदार वाडा आहे; तेथील सभेस मंडळी गेली होती. म्हणजे मेणवली येथेंहि सभा झाली. असो; **वेळास** येथील पहिल्या उत्सवाची वार्ता केसरींत थोडक्यांत अशी आली आहे.—

नानांचा शतसांवत्सरिक उत्सव

वेळास-मागें कळविल्याप्रमाणें **नानांनीं** बांधलेल्या श्री **कालभैरवाचे** देवळांतच (ता. १९।३।१९००) उत्सव करण्यांत आला. रोषणाई चांगली केली होती. उत्सवाकारितां दापोली, केळशी वगैरेकडील कांहीं मंडळी

१ हे मुंबईंतील प्रसिद्ध धरमसी-दीक्षित-सालिसिटर्स-फर्मचे मॅनेजिंग क्लार्क होते.

अगत्यपूर्वक आली होती. प्रथमतः [1]कालभैरव व रामेश्वर ([2]मोराबादादांनीं बांधलेलें देऊळ) यांस अभिषेक होऊन नंतर दोनप्रहरीं **कृष्णशास्त्री घैसास** केळशीकर यांचें पुराण झालें. पुढें **रामभाऊ वैद्य** यांचें गाणें व वैदिक ब्राह्मणांचें म्हणणें झाल्यावर **भानु**कृत नानांचें चरित्र वाचण्यांत आलें. नंतर **रा. बा. कानिटकर** यांचें व्याख्यान होऊन अखेर **वे. रा. रा. विष्णुशास्त्री** यांचें कीर्तन फार मनोवेधक झालें. नानांच्या येथें असलेल्या वंशजास (रा. ह. आ. भानु)[3] नानांच्या तसबिरीच्या उजव्या बाजूस बसविलें होतें. संकटांतही उत्सव चांगल्या रीतीनें पार पडला.

[केसरी २७।३।१९००

पहिल्या दहा वर्षांच्या उत्सवांचा वृत्तांत २३ । १० । १९०९ ला छापलेला आहे. त्यांत ह्या वर्षी श्री. कृ. र. उपाध्ये बी. ए. व श्री के. बी. जोशी ह्यांचीं वक्ते म्हणून नांवें आलेलीं आहेत.

उत्सव दुसरा

नाना फडणवीस यांची पुण्यतीथि

रा. रा. केसरी कर्ते यांस--

वि. वि. गुदस्त सालीं वेळास मुक्कामीं कै. श्रीमंत **नाना फडणवीस**

---

१ हें नानांनी बांधलेंलें.

२ मोरोबादादा हे नानांचे चुलतबंधु. हे नानांचे पेक्षां वयानें लहान.

३ ह्यांना वेळास येथील पूर्वार्जित महाजनकी असे. व म्हणून त्यांस 'हरबा अण्णा महाजन' ह्या नांवानें ओळखलें जाई. हे मनमिळाऊ, उदार व दानशूर होते. व ह्या गुणामुळें ते पुढें निष्कांचन बनले. गांवांतील व आसपासच्या खेडयांतीलहि तंटे यांचें मार्फत मिटले जात. कित्येक भांडणप्रसंगीं 'चल आण्णांकडे' म्हटलें कीं भांडण आपसांत मिटे, इतकें वजन व महत्त्व आण्णांना होते. हे १०।२।१९०४ रोजीं स्वर्गवासी झालें. वय ७५.

—'जासूद' मासिक.

यांचा शतसांवत्सरिक उत्सव करण्यांत आला; हें वर्तमान आपणांस माहीत आहेच. **वेळास** हा श्रीमंत नानांचा मूळगांव असून तो गांव त्यांचा वतनी आहे. या सालीं म्हणजे फाल्गुन वद्य ३ (शक १८२२) रोज शुक्रवार ते दिवशीं येथील ग्रामस्थ मंडळींनीं नानांचे पुण्यतिथिनिमित्त त्यांचा उत्सव केला. तत्संबंधीं आपणाला थोडी हकीकत कळविण्याकरितां हें पत्र लिहित आहें. हा उत्सव नानांनीं बांधलेल्या श्री **कालभैरवाचे** सभामंडपांत करण्यांत आला. मंडप कापडलेला असून त्याला रोषणाई फारच चांगली केली होती. देवालय उच्च स्थानीं असल्याकारणानें व इतर आरास फारच समाधानकारक केली असल्यामुळें तो देखावा विशेष रमणीय दिसत होता. उत्सवाचे दिवशीं सकाळीं ब्राह्मणांनीं देवावर अभिषेक करण्यास सुरुवात केली. अभिषेक



प्रो. रा. श्रीधर विष्णु परांजपे

वगैरे आटोपल्यावर वे. **वामनशास्त्री दातार**[१] (चौकर) यांचें दोन तास गायन झालें. तें झाल्यावर गांवांतील मंडळींचा उत्सवानिमित्त एके ठिकाणीं भोजन–समारंभ झाला. सायंकाळीं तीन वाजतां शास्त्रीबोवांचे पुराणास सुरुवात होऊन पांच वाजतां तें समाप्त झालें. पुराणानंतर कांहीं गवई मंडळींचें गायन होऊन ह्या दिवसाचा कार्यक्रम संपला. रात्रौ विद्वान् ब्राह्मणांनीं मंत्र वगैरे म्हटल्यावर रा. **केशवराव जोशी** आणि नागपूरचे रा. रा. **श्रीधर**

१ हे श्रीवर्धनचे राहणारे.

विष्णु परांजपे[२] बी. ए. यांचीं थोडक्यांत सुश्राव्य भाषणें झालीं. तीं झाल्यावर रा. **परांजपे** यांचेंच कीर्तनहि झालें. कीर्तनाचा विषय भक्ति व 'यथासांग पूजा कशी करावी' हा होता. रा. **परांजपे** यांचा मराठी तुकारामादिक कवींवर पुष्कळच व्यासंग असला पाहिजे असें दिसलें. त्यांचें कीर्तन संपल्यावर वे. **वामनशास्त्री** यांचें रात्रौ पांच वाजेपर्यंत रसभरित कीर्तन झालें. शास्त्रीबोवांनीं समयाला अनुरूप अशा संस्कृत कविता केल्या होत्या. नंतर पानसुपारी, अत्तर, गुलाब, राजनिष्ठा वगैरे रीतीप्रमाणें झाल्यावर समारंभ समाप्त झाला. उत्सवाला मंडळी बरीच जमली होती. कळावें.

वेळास
ता. १५।३।१९०१

फिरस्ता
[केसरी ता. १९।३।१९०१

उत्सव तिसरा

श्रीमंत नाना फडणविस यांची पुण्यतिथि

रा. रा. केसरीकर्ते यांस--

वि. वि. श्रीमंत **नाना फडणवीस** यांच्या पुण्यतिथीचा समारंभ **वेळास**

---

२ हे प्रसिद्ध प्रोफेसर असून ह्यांचे ग्रंथही विख्यात आहे. कीर्तनसुधा-धारा, मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन इ. 'मोरोपंतांची केकावली' हा ह्यांचा ग्रंथ अधिक कीर्तिकारक झाला आहे. मोरोपंत काव्याचे अभ्यासक म्हणून जर अंगुलिनिर्देश करावयाचा झाला तर ह्यांचा करावा असें ह्यांचे ग्रंथच सांगतील. हे स्वतःस 'रामदासानुदास' म्हणवीत. हे 'हनुमानगड' श्रीसूर्यदेवमठसंस्थापक होते. आयुष्याचा उत्तरार्ध पूर्वीइतका कीर्तिकारक झाला नाहीं !

या गांवीं आज दोन वर्षें होत असतो; हें आपणांस माहीत आहेच. या वर्षाचा हा समारंभ काल म्हणजे फाल्गुन वद्य ३ गुरुवार ता. २७ मार्च (शक १८२३) या दिवशीं येथील मंडळींनीं फार उत्सुकतेनें व थाटानें पार पाडला. समारंभ कै. श्रीमंत नानांनीं बांधिलेल्या **श्री कालभैरवाचे** सभामंडपांत साजरा करण्यांत आला. मंडप विस्तीर्ण घातलेला असून सर्वत्र



वे. शा. सं. विनायकशास्त्री अभ्यंकर

कापडलेला होता. शिवाय मेहरपा, चित्रें, कर्दळी वगैरे अनेक साधनांनीं मंडपाला विशेष रमणीयत्व प्राप्त झालें होतें. सकाळीं प्रथमतः ब्राह्मणांनीं देवावर अभिषेक वगैरे केल्यावर ह. भ. प. वेदशास्त्रसंपन्न **विनायकशास्त्री अभ्यंकर वांईकर**[1] यांचें दोन तास गायन झालें. नंतर दोन प्रहरीं

१ पृ. १० टीप पहा.

रा. रामचंद्र विष्णु करकरे[1] यांचे घरीं सर्व मंडळींचा भोजनसमारंभ झाला. सायंकाळीं ४ वाजतां शास्त्रीबुवांचे पुराणास सुरुवात झाली. गीतेच्या पहिल्या अध्यायांतील पहिल्या एकदोन श्लोकांवरच शास्त्रीबुवांनीं व्याख्यान चालविलें होतें. त्यांनीं आपल्या रसाळवाणीनें व वाक्चातुर्यानें कांहीं वेळ



रा. केशवराव बाळकृष्ण जोशी

श्रोतृसमाज अगदीं तल्लीन करून सोडला होता. रात्रौ दहा वाजतां व्याख्यानास सुरुवात झाली. प्रथम रा. **करकरे** यांनीं गेल्या सालचा

१. श्री. करकरे हे ह्या उत्सवाचे कामीं सर्व प्रकारें सहाय्य करीत. मांडव उभारणें, आरास करणें, भोजनाची व्यवस्था ठेवणें, मिरवणूक काढणें इ. अनेक कामें ह्यांचें सहकार्यानें साजरीं होऊन पार पडलेलीं आहेत. अर्थात् ह्यांनाहि इतर ग्रामस्थ मदत करीतच. पण ह्यांचा कार्यभाग त्यांत ज्यास्त असे व लोकहि ह्यांनाच पुढारी मानून मदत देत.

साधारण रिपोर्ट वाचून दाखविला. नंतर रा. रा. **केशवराव बाळकृष्ण जोशी** हे भाषण करण्यास उठले. भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी मुंबई व पुणें येथील विद्वान् व थोर गृहस्थांचीं पत्रें वाचून दाखविलीं. रा. **केशवराव बाळकृष्ण जोशी** यांनीं नंतर बराच वेळ रसभरित, मुद्देसूद व माहितीनें भरलेलें असें भाषण केलें. त्यांनीं **वेळास** या लहानशा गांवाच्या ऐतिहासिक महत्त्वाचा दोन तऱ्हेनें विचार केला. गेल्या शतकांत ज्या **भानु** कुळांतील दिव्य पुरुषानें पानपतचे रणकंदनांत अस्तास गेलेली पेशवाईची इमारत पुन्हा पूर्ववत् उठवून दिली, इतकेंच नव्हे तर, ज्याचें अलौकिक बुद्धिवर्चस्व, आटोकाट शहाणपण व असामान्य कर्तबगारी महाराष्ट्राचे भरभराटीस, अभ्युदयास व जगांतील लौकिकास कारणीभूत झाली, त्या भानुकुळाचा मूळ वतनी गांव हाच होय; अर्थात् ऐतिहासिक दृष्टीनें हा गांव विशेष महत्त्वाचा ठरतो, तसेंच वेळास गांवाशीं इंग्रजांचा संबंध कसा आला व जवळच्या 'व्हिक्टोरिया' किल्ल्यासंबंधीहि माहिती त्यांनीं नंतर सांगितली. राजकीय विभूतींच्या उत्सवाचें प्राचीनत्व, मराठी राज्याचे संस्थापक **छत्रपति** व **श्रीमंत नाना** या दोहोंमध्यें मुत्सद्दी या नात्यानें तुलना वगैरे मुद्द्यांवर बराच विचार केल्यावर त्यांनीं आपलें भाषण आटोपलें.

नंतर वे. रा. **आखवे** यांनीं बराच वेळ अस्खलित भाषण केल्यावर ह. भ. प. [1] **विनायकशास्त्री अभ्यंकर** हे बोलावयास उठले. शास्त्रीबोवांनीं

१. हे विनायकशास्त्री त्या कालीं फारच प्रसिद्ध व उत्कृष्ट प्रवचन करणारे म्हणून प्रख्यात होऊन गेले. हे वैय्याकरणी असून वेदांत प्रवक्तेहि होते. ह्यांची वृत्ति पूर्ण राष्ट्रीय होती. ह्यांचा वाक्प्रवाह जसा अखंड व तल्लीन करून सोडणारा होता तसे हे उत्कृष्ट व्यायामपटु होते. वेताचा मलखांब, कुस्ती, पट्टा हें ह्यांचे आवडते खेळ प्रेक्षणीय व बिनतोड होत. हे किर्तनहि करीत. जंजिऱ्याच्या नबाबांकडून ह्यांस किल्याचें उपाध्येपण व देणगी मिळाल्याचें कळतें. रायगड वरील शिवाजी उत्सवांतहि हे लो. टिळकां-बरोबर धडाडीनें भाग घेत. हे वांईस गंगापुरींत राहात. पुढें पुणें, दिवे-आगर ह्या बाजूस राहूं लागले. ह्यांचें पूर्ण नांव विनायक जनार्दन अभ्यंकर.

उपसंहाररूपानें फारच जोरदार, रसभरित व सुश्राव्य असें भाषण केलें. त्यांचें भाषण झाल्यावर **शास्त्रीबोवांचे** कीर्तनास सुरुवात झाली. कीर्तनांत नानांविषयीं त्यांनीं बरीच माहिती सांगितली. समारंभाकरितां दूरदूरच्या ठिकाणची बरीच मंडळी जमली होती. शेवटीं राजनिष्ठा प्रदर्शित करून समारंभाची समाप्ति झाली. कळावें.

ता. २८।३।१९०२]

आपला

फिरस्ता

[केसरी १।४।१९०२

उत्सव चौथा

नाना फडणवीस यांची पुण्यतिथि

नाना फडणविसांच्या पूर्वजांचा मूळ वतनी गांव वेळास. येथें गेल्या तीन सालाप्रमाणें यंदाहि ता. १६ मार्च सोमवार फाल्गुन वद्य ३ (शक १८२४) रोजीं नानांनींच बांधलेल्या श्रीकाळभैरवाचे मंडपांत नानांचे पुण्यतिथिनिमित्त थाटानें उत्सव झाला. देवावर अभिषेक, वे. शा. सं. **अभ्यंकरशास्त्री वांईकर** व ह. भ. प. **दांडेकर** यांचें गायन, शास्त्रीबोवांचें गीतेच्या २ अध्यायांतील पहिल्या १।२ श्लोकांवर पुराण व [1]**दांडेकर**-बोवांचें कीर्तन झालें. कीर्तनकारांनीं नानांच्या चरित्रावर केलेल्या कवितांनीं कीर्तनास रंग आला होता. रात्रीं रिपोर्ट वाचन झाल्यानंतर रा. **केशव बाळकृष्ण जोशी** यांनीं वेळास हा नानांचा वतनी गांव या नात्यानें

---

१ **कै. रामचंद्र विष्णु दांडेकर**, यांचा जन्म मिति आश्विन शु. १३ शक १७९६ रोजीं गुडघें येथें झाला. शक १८०८ पर्यंत गांवांतील प्राथमिक

[टीप पुढें चालू

आणि पुढें इंग्रजांच्याहि दृष्टीनें हा गांव व भोंवतालचीं आठ गांवें यांचें महत्त्व किती आहे हें सांगून व ऐतिहासिक उत्सवाचें महत्त्व आणि नाना व श्री शिवाजी महाराज यांची तुलना करून भाषण संपविलें. नंतर ह. भ. प.



राष्ट्रीय कीर्तनकार रामचंद्रबुवा दांडेकरशास्त्री

दांडेकर यांचें कीर्तन होऊन समारंभ आटोपला. **ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव कां करावे ?** या विषयावर आलेल्या निबंधांतून रा. **विनायक**

शाळेंत मराठी चार इ. पूर्ण झाल्या. पुढें ते आजारी झाले व औषधोपचारानें गुण न येतां देवप्रसादानें (अनुष्ठान करून) डोळे सुधारले. परंतु प्रा. शिक्षण सुटलें. शक १८११ मध्यें प्रथम विवाह झाला. वडील शक १८१२ मध्यें वारले. मातृनिधन शक १८०७ मध्येंच झालें. शक १८१२ ते १८१७ पर्यंत गुडघें येथें व्यवसाय शेती वगैरे. परंतु ही अशिक्षितावस्था रुचेना; म्हणून शक १८१७ म्हणजे वयाचे २१ व्या वर्षीं संस्कृत शिकणेचा श्री गणेशा

[टीप पुढें चालू

दामोदर सावरकर यांचा निबंध पसंत झाल्यावरून त्यासच **रा. केळकर**[1] यांनीं दिलेलें बक्षीस मिळालें. ऐतिहासिक पुरुषांच्या वार्षिक उत्सवाची आवश्यकता आणि महत्त्व वेळाससारख्या गांवांतील लोकांसही चांगलें समजून येऊन त्यांचे हातून ते उत्सव जुटीनें व व्यवस्थित रीतीनें पार पडत आहेत, हें अभिनंदनीय होय. [केसरी ३१-३-१९०३

भानु घराण्यांतील रा. रा. **हरी अप्पाजी भानू** यांस फाल्गुन शु. १ रोजीं देवाज्ञा झाली. येथें हे 'महाजन' या अधिकाराचें काम आज ५० वर्षें करीत आहेत. त्या गांवचे व आसपासचे लोक त्यांस फार पूज्य मानीत असून दातृत्व, धर्माचरण व गरिबांविषयीं कळवळा हे गुण त्यांचे अंगीं विशेष होते. पेशवाईपासून चालत आलेलें इनाम, सावकाराचे घरांत त्यांच्या या

करून शक १८२३ पर्यंत संस्कृत अध्ययन झालें. अध्ययन श्रीवर्धन, सांगली येथें अत्यंत गरिबीनें करावें लागलें. या वेळीं कुटुंब माहेरीं असे. शक १८२४ पासून कीर्तनकार म्हणून संचारास सुरुवात झाली. शक१८२४।२७ वेळासला **श्री फडणवीस** उत्सवास गेले होते. शक १८२८ सालीं **कलकत्ता** व **बंगालमध्यें** प्रवास व मुक्काम. शक १८२८ पासून गुप्त पोलीसांचा त्रास फार होई. शक १८३३ मध्यें मु. बडोदा येथें कायम राहाण्याकरितां गेले. त्याच वर्षी गायकवाड सरकारकडून सत्कार झाला व "कीर्तन-भूषण" पदवी मिळाली. परंतु ब्रिटिश सरकारकडून समज मिळाल्यामुळें, गायकवाड

[टीप पुढें चालू

१ कृष्णाजी रघुनाथ केळकर 'जासूद' मासिकाचे संपादक. ह्या मासिकाचे अंकास पहिला अंक म्हणजे 'भेट पहिली', दुसरा अंक म्हणजे 'भेट दुसरी' असें नांव दिलेलें असे. ह्याचा आकार 'सरस्वती मंदीर' किंवा 'बालबोध' ह्या मासिकापेक्षां जरा मोठा (७"×४॥" लांबीरुंदी) असे. अंकाचीं पानें १२. वार्षिक वर्गणी वगैरे माहिती, मिळालेल्या अंकास मुखपृष्ठ नसल्यामुळें कळली नाहीं.

गुणामुळेंच गेलें. त्यांची स्मशानयात्रा रात्रीं ९ पासून १ वाजेपर्यंत चालली असून तिजबरोबर गांवांतील सर्व जातींचे आबालवृद्ध लोक जमले होते. कै. हरीपंत यांस पुत्रसंतान नाहीं. त्यांचे मागें फक्त त्यांची पत्नी (श्री. गंगाबाई) आहे. तिचे मांडीवर दत्तक देऊन भानूंच्या मूळ गांवांतील घराण्याची शाखा सजीव राहील असा प्रयत्न मेणवली वगैरे ठिकाणच्या शाखा व

सरकारकडून २४ तासांची नोटीसहि मिळाली; व बडोदा सुटलें. शिवाय इतरत्रहि संचार करणें त्रासाचें होऊं लागलें. बरोबर गुप्तचर असे. बिऱ्हाडास जागा मिळेना. म्हणून पुन्हां शक १८३५ मध्यें गुडघें येथें घर बांधून राहूं लागले. तरी प्रवास अधूनमधून चालू असे. यांचा प्रवास अखिल भारतांमध्यें झालेला आहे. कै. लो. टिळकांनीं कीर्तन–संमेलनप्रसंगीं तत्कालीन कीर्तनकारांत '**आदर्श कीर्तनकार**' म्हणून यांचा उल्लेख केलेला आहे. शिवाय तत्कालीन उच्च श्रेणींतील वृत्तपत्रांतून यांस खरे '**राष्ट्रीय कीर्तनकार**' म्हणून प्रसिद्धी मिळालेली आहे. नाशिक येथील **श्री. गणेश दामोदर सावरकर** यांजपाशीं यांचा निकट संबंध आहे अशी 'सरकारची खात्री' असल्यामुळें पोलिसांचा त्रास फार झाला व तो सन १९१८ पर्यंत विशेष झाला. यानंतर कांहीं थोर व्यक्तींचे मध्यस्थीनें इ. ज. ऑफ पोलीस यांची प्रत्यक्ष भेट होऊन बरोबर प्रवासांत असणारा गुप्तचर सुटला. १९०६ ते १९१८ या कालांत सरकारी जाचामुळें मानखंडना व आर्थिक हानि फार झाली. यानंतर १९४४ पर्यंत बिऱ्हाड गुडघे येथेंच असे व व्यवसायार्थ कांहीं दिवस प्रवास होत असे. सन १९१८ सालीं गुडघे येथें गैरहजेरींत भाऊबंदकी या सदरांत त्यांचें घरही जाळलें गेलें. व नंतरचा काळहि भाऊबंदकींतच गेला. श्रीगोकर्ण महाबळेश्वर येथील विद्वद्वरांकडुन त्यांस "**कीर्तन कलानिधि**" व श्री. वे. शा. सं. तांबे शास्त्री "भट्टविद्याभूषण" यांचेकडून "**कीर्तन वाचस्पति**" या पदव्या मिळालेल्या असून शिवाय मानपत्रें वगैरे अनेक आहेत. यांस कविता करणेचा नाद असून प्रासंगिक कविता पुष्कळ केलेल्या आहेत. हे गुडघे येथें ता. ७ नोव्हेंबर सन १९४४ रोजीं स्वर्गस्थ झाले.

—कृ. रा. दांडेकर.

फडणवीस उत्सवाचे व्यवस्थापक यांनीं करावी व त्यांचें (रा. मो. कृ. मराठे) सावकाराकडे गेलेलें उत्पन्न शक्य तितकें मोकळें करावें, अशी सूचना करितात.

[केसरी १-३-१९०३

ह्याच वर्षी मे मध्यें अन्य कारणानें प्रो. अच्युत सिताराम साठे एम्. ए. हे इकडे आले असतां त्यांचें वेळास येथें 'नानांचें चरित्र' ह्या विषयावर व्याख्यान झालें. त्याच वेळीं उत्सवाचेंहि काम व जमाखर्च चोख चालल्याचे पाहून समाधानहि त्यानीं व्यक्त केलें.

उत्सव पांचवा

श्री. नाना फडणवीस यांच्या पांचव्या पुण्यतिथीचा उत्सव वेळास येथें शुक्रवार ता. ४।३।१९०४ रोजीं थाटानें पार पडला. उत्सवांत भोंवतालच्या गांवांतून यंदा बरीच मंडळी आली होती. या समारंभाच्या हकीकतीचें पत्र उत्सवाच्या मॅनेजिंग बोर्डाचे चिटणीस यांचेकडून आलें आहे. त्याचा सारांश असा आहे.——प्रातःकाळीं श्री. नानांच्या तसबिरीचा स्थापनासमारंभ झाला. नंतर कार्यक्रमाप्रमाणें गायनास सुरुवात होणार तों लोकमान्य. रा. **बाळ गंगाधर टिळक दोषमुक्त** झाल्याची आनंददायक बातमी आल्यामुळें समारंभास आलेल्या सर्व लोकांत विशेष उल्हास दिसत होता, व याबद्दल आनंद प्रदर्शित करण्यासाठीं सर्व गांवांत समारंभानें साखरा वांटल्या. नंतर कार्यक्रमांत ठरल्याप्रमाणें ह. भ. प. **रामशास्त्री दांडेकर**

व **विनायकशास्त्री अभ्यंकर** यांचें गायन व रा. **करकरे** यांचे वाड्यांत भोजनसमारंभ होऊन दुपारीं २ पासून पुढें रा. रा. [१]**गजानन भास्कर**



रा. गजानन भास्कर वैद्य

वैद्य यांचें नेहमींप्रमाणें 'धर्माचें राष्ट्रीय कार्य' या विषयावर सुश्राव्य, बोधप्रद व मुद्देसूद व्याख्यान झालें. नंतर रा. **विष्णुपंत करंदीकर** व **विनायक-**

---

१ हे प्रभु ज्ञातीय गृहस्थ थिआसफीचे, हिंदुमिशनरी सोसायटीचे व शुद्धीचे पुरस्कर्ते असून उत्कृष्ट वक्ते होते. मुं. म. ग्रंथालयाचे व बालबोध मासिकाचे अध्यक्ष व संपादक होते. ऐतिहासिक उत्सव-प्रसंगींहि ह्यांची भाषणें प्रभावी होत. 'देवा, जगीं वाढवि हिंदु धर्म' हा शेवटचा चरण असलेले ह्यांचे श्लोक प्रसिद्ध आहेत. ह्यावरून शेवटीं शेवटीं हा अनेक ग्रंथाचा कर्ता व विचारी सद्गृहस्थ काय सांगतो हें लक्षांत घेतलें पाहिजे. नाना फडणविसांच्या उत्सवाला येऊन ह्यांनीं दोन व्याख्यानें फारच उत्कृष्ट दिलीं तीं मला अद्यापहि आठवतात. मृ. १९२१ मुंबई. हे ग्रॅज्यूएट असून अध्यापकहि होते.

शास्त्री अभ्यंकर यांचीं भाषणें आणि सदर शास्त्री यांचें भागवतांतील ११ व्या स्कंधावर पुराण व ह. भ. प. **रामशास्त्री दांडेकर** यांचें कीर्तन झालें. कीर्तनाचें आख्यान नानांसंबंधींचेंच असून संस्कृत प्राकृत पद्यें नवीन तयार केलीं होतीं. पुनः १० वाजतां मंत्रघोषानंतर स्वागत कमिटीच्या अध्यक्षांचें स्वागतपर भाषण व रा. रा. **घैसास**, वे. मू. **उपाध्ये**, आखवे यांचीं भाषणें होऊन रा. वैद्य यांचें दुसरें व्याख्यान 'ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव' या विषयावर झालें. नंतर रा. **करंदीकर** यांचें भाषण, ह. भ. प. **अभ्यंकर** यांचें कीर्तन, पानसुपारी, एडवर्ड बादशहांचें अभिष्ट चिंतन वगैरे होऊन उत्सव आटोपला. रा. रा. **रामचंद्र नारायण रानडे** यांस पुढील सालाकरतांहि उत्सवाचे पुनः अध्यक्ष नेमलें आहे. [केसरी १५-३-१९०४

ह्या उत्सवांत श्री. ग. ल. पागे व इंदुप्रकाशचे माजी एडिटर विष्णु हरि करंदीकर ह्यांचीं भाषणें झालीं. —दशवार्षिक अहवाल

श्रीमंत नाना फडणवीस स्मारक फंड
विनंतीपत्र

'नाना फडणवीस स्मारक फंडासंबंधीं फडणवीस स्मारक संस्थेमार्फत रविवार ता. १४ ऑगस्ट १९०४ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां माधवबागेंत जाहीर सभा भरणार आहे. सर्वांस येण्याची विनंति आहे. [हस्तपत्रक-चिठी]'

" रत्नागिरी जिल्ह्यांतील वेळास या गांवीं श्री. नानांनीं बांधलेल्या व त्यांचें जें कुलदैवत त्या श्रीकालभैरवाचे देवालयांत त्यांचे पुण्यतिथीनिमित्त लोकांकडून फाल्गुन व. ३ रोजीं मोठ्या उत्साहानें व एकदिलानें गेल्या ३ वर्षांपासून उत्सव करण्यांत येत असतो; हें वर्तमानपत्रांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेंच आहे.

"वेळास हा नाना फडणविसांचा मूळ व वतनी गांव आहे व वेळास येथील नानांचे कुलांतील वंशज रा. रा. हरी आपाजी भानु महाजन हे हल्लीं हयात असून सदहू उत्सवाला त्यांचें प्रमुखत्वानें साहाय्य असतें.

"पानपतच्या संग्रामापासून तों अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंतच्या इतिहासाचा शांतपणें विचार केला असतां श्रीमंत नानांनीं आपणांवर केलेल्या महद् उपकारांचें चित्र आपणांपुढें उभें राहून त्या उपकारांचें उतराई होणें शक्यच नाहीं असें वाटूं लागतें.

"श्रीमंत नानांचें अलौकिक व असामान्य मुत्सद्दी धोरण; त्यांचें महाराष्ट्रावर निर्मळ प्रेम; व खालावलेल्या महाराष्ट्राला जोरानें टेंका देऊन महाराष्ट्राचें पूर्ववैभव अथवा साम्राज्य कायम राखण्याबद्दल त्यांचा सतत उद्योग, इत्यादि नानांच्या अंगच्या अपूर्व गुणांचा आपण अल्पतः विचार केल्यास ते खरे दूरदर्शी मुत्सद्दी होते असें म्हटल्याविना कोणीं राहणार नाहीं. शिवाय एशियाटिक ॲन्युअल रजिस्टर यांतील व मेजर मॅक्डोनेल्ड, वुइल्यम हेनरीटोन व मार्क्विस ऑफ वेलस्ली वगैरे तत्कालीन युरोपियन गृहस्थांचे उद्गार वाचले असतां नानांविषयीं त्यांची किती पूज्यबुद्धि होती व त्यांना ते किती चाहत होते हें सहज कळून येणार आहे.



नाना फडणवीस

" राष्ट्रांतील प्रसिद्ध पुरुषांचे स्मारकोत्सव केल्यापासून किती फायदे होतात हें येथें सांगण्याची जरूरी आहेसें दिसत नाहीं. इंग्लंडांत ऑलफ्रेड दि ग्रेट, क्रामवेल, वॉलेस; फ्रान्सांत नेपोलियन; अमेरिकेंत वाशिंगटन; वगैरे विभूतींचे वार्षिकोत्सव होतात त्यावरून पाश्चात्य सुधारलेल्या राष्ट्रांतही असल्या गोष्टींचें किती महत्त्व मानलें जातें हें लक्षांत येईल.

" अर्थात् अशा दिव्य पुरुषाचे म्हणजे नानांचे ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्यास त्यांचा वार्षिक उत्सव करण्याचें आमचे मनांत यावें व आम्हीं त्या दिशेनें प्रयत्न करावेत यांत नवल नाहीं.

" परंतु ऐतिहासिक उत्सवासारख्या सार्वजनिक संस्था सुव्यवस्थित चालणें बहुतांशीं लोकाश्रयावर अवलंबून असतें. त्याचप्रमाणें **वेळास** येथें होत असलेला श्री. नानांचा उत्सव लोकाश्रयाशिवाय केवळ तेथील लोकांच्या शक्तीनें व द्रव्यसामर्थ्यानें सुव्यवस्थित होऊन चिरस्थाई होणें बरेंच दुरापास्त आहे.

" २ तद्वतच श्री. **नाना** व **मोरोबादादा** यांनीं बांधलेल्या **श्रीकालभैरव** व **श्रीरामेश्वर** या दोन देवालयांचा यथाशक्ति जीर्णोद्धार करणेंहि अत्यंत जरूर व इष्ट आहे. कालगतीनें इतर देवस्थानांप्रमाणें हींहि देवालयें अतिशय हीन व निकृष्ट स्थितीप्रत पोंचलीं आहेत.

" नानांच्या वार्षिक उत्सवाकरितां कायम फंड व वरील जीर्णोद्धार यांस एकंदर रक्कम रु. ५००० पांच हजारांहून जास्त लागणार नाहीं असा अदमास आहे. अर्थात् सर्व महाराष्ट्रीयांनीं मनांत आणल्यास ही अल्प रक्कम थोड्याच अवधींत जमेल यांत शंका नाहीं.

" या कृत्यास मुंबई इलाख्यांतील अनेक थोर व विद्वान् गृहस्थांची पूर्ण सहानुभूति असून त्यांचें चांगलें साहाय्य आहे. शिवाय कांहीं विशेष थोर गृहस्थांची कमिटी स्थापित झाली असून त्यांची या कामीं देखरेख राहील. फंडाचा वगैरे विनियोग यांच्याच संमतीनें होणार आहे.

" डॉ. **मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब देशमूख**, एम्. डी. व रा. रा. **महादेव राजाराम बोडस**, एम्. ए., एल्एल्. बी. हायकोर्ट वकील या दोन गृहस्थांनीं या फडणवीस स्मारक फंडाचे खजिनदार होण्याचें कबूल केलें आहे.

" तरी या राष्ट्रीय उत्सवाला स्वदेशहितेच्छू व इतिहासाभिमानी बंधूनीं व वरील जीर्णोद्धाराला धर्माभिमानी मंडळींनीं शक्त्यनुसार द्रव्यद्वारां मदत करून आपल्या राष्ट्रीय पुरुषांच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त व्हावें अशी त्यांस आमची नम्रतापूर्वक विनंति आहे.

" फंडाकरितां रक्कम देणें ती कमिटीनें नेमलेल्या एजंटाजवळ देऊन त्यापासून पावती घ्यावी. रा. रा. रामचंद्र नारायण रानडे यांस पुण्याचे व रा. गणेश नारायण जोशी वगैरे कांहीं गृहस्थांस मुंबईचे एजंट नेमिलें आहे. एजंट मार्फत देणें शक्य नसल्यास डॉ. नानासाहेब देशमुख व रा. माधवराव बोडस, फडणवीस स्मारक फंडाचे खजिनदार, गिरगांव, मुंबई यांजकडे पाठवावी.

या स्मारक फंडासंबंधीं कांहीं विशेष पत्रव्यवहार कोणास करणें झाल्यास तो **रा. रा. केशव बाळकृष्ण जोशी** यांकडे करावा. आपले,

केशव बाळकृष्ण जोशी, जनरल सेक्रेटरी–मुंबई.
रघुनाथ नारायण उपाध्ये, विष्णु बाळकृष्ण जोशी,
सेक्रेटरीज— वेळास, फडणवीस स्मारक कमिटी.

" **ताजा कलम**—या फंडाची रक्कम समाधानकारक जमल्यास श्री. नानांचीं कांहीं महत्त्वाचीं जुनीं पत्रेंहि छापण्याचा विचार आहे.

वेळास येथील 'फडणीस उत्सव कमेटीनें' यंदा बक्षीसासाठीं मराठ्यांचे इतिहासांत 'श्री नाना फडणीसांचें 'महत्त्व हा विषय नेमला होता. त्यावर आलेल्या निबंधांत परीक्षकांनीं रा. रा. कृष्णाजी महादेव संत (फर्ग्युसन कॉलेज पुणें) यांचा निबंध पहिल्या प्रतीचा व बक्षिसास योग्य ठरविला आहे. रा. रा. पांडुरंग नारायण दिवाण व रा. रामचंद्र महादेव डोंगरे यांचे निबंध नं. २।३ चे ठरले आहेत. पुढील सालाकरिता "नानांचे कविताबद्धचरित्र" हा विषय नेमला आहे."

उत्सव ६ वा

वेळास येथील श्री. नाना फडणवीस यांचा उत्सव


रा. रा. केसरी–कर्ते यांस :—

वि. वि. गेल्या आठवड्यांत **वेळास** येथें कै. श्री. **नाना फडणवीस** यांचा उत्सव मोठ्या थाटानें झाला. या उत्सवाकरितां दूरदूरच्या ठिकाणांहून पुष्कळ लोक आले होते. आजपर्यंत नानांची निधनतिथि **वेळास** येथें सतत **पांच वर्षें** पाळण्यांत आली. यंदाचे सालीं लो. रा. **टिळक** वगैरे मंडळी येथें आल्यामुळें या उत्सवास एकप्रकारचें विशिष्ट महत्त्व आलें व त्याबरोबरच सर्व लोकांस या उत्सवाची विशेष माहिती झाली. उत्सवासाठीं देवालयानजीक उभारलेल्या भव्य मंडपांत नानांची भव्य तसबीर सकाळीं वाजत गाजत नेऊन रा. **टिळक** यांच्या हस्तें ठेवण्यांत आली. तसबिरीची स्थापना झाल्यावर तिजपुढें गुरुशिष्य वे. शा. सं. रा. **विनायकशास्त्री अभ्यंकर** व रा. **रामभाऊ दांडेकर** यांचें गायन झालें. सदर प्रसंगीं वादनपटु **पानसेबुवा** यांचे पट्टशिष्य रा. **बळवंतराव रास्ते** हेही हजर होते. दोनप्रहरीं वे. शा. सं. रा. **अभ्यंकर** यांनीं भागवतांतील बलिराजासंबंधीं कथानक घेऊन पुराण सांगितलें. त्यांतील तात्पर्य असें कीं, यज्ञ केला कीं मोक्षप्राप्ति मिळते—किंवा पी हळद आणि हो गोरी असा प्रकार होत नाहीं. हाच नियम राष्ट्र–दृढीकरणासंबंधानें आहे. ईश्वर सहाय्य झाला तरी स्वतःमध्यें कांहींतरी हालचाल पाहिजे. यानंतर रा. **पागे**[1] यांचें 'राष्ट्रीय उत्सवाची आवश्यकता' या विषयावर कळकळीचें भाषण झालें. पुढें वे. शा.सं. रा. वि. **अभ्यंकर** यांचें कीर्तन झालें. रात्रीं आलेल्या मंडळींच्या भेटी झाल्यावर रा. **केशवराव जोशी** यांनीं पांच वर्षांची उत्सवाची हकीकत सांगितली; व रा. **भाऊसाहेब रानडे** यानीं पांच वर्षांचा उत्सवाचा हिशेब मांडला.

---

१ गणेश लक्ष्मण पागे, मैदानी वक्ता. केसरीचे वार्ताहर.

वेळास-उत्सव-वृत्त : लोकमान्य टिळक



नंतर रा. **नारायणराव गोगटे**[1] दापोली यांनीं ' राम ' या विषयावर भाषण केलें. त्यांत रामाच्या अंगीं एकपत्नीव्रत, वचन पाळणें इत्यादि जे गुण होते तसे गुण मनुष्यांत आले पाहिजेत. कर्ते पुरुषांत या गुणांची तेजस्विता असते. राष्ट्राच्या अभ्युदयास असले गुण पाहिजेत वगैरे विवेचन केलें. तसेंच रा. **मायदेव** व रा. **रानडे** यांनीं भाषणें करून व ह. प. **दांडेकर** यांनीं कीर्तन करून प्राचीन काळचे थोर पुरुष व स्त्रिया यांच्या अंगीं देशाभिमान किती जागृत होता याचें विवरण केलें. शेवटीं रा. **टिळक** यांचें सुश्राव्य व उत्साहजनक भाषण झालें. तें महत्त्वाचें असल्यामुळें थोड्या विस्तारानें पुढें देतों.—

रा० **टिळक** म्हणाले :—आज ह्या ठिकाणीं इतका लोकसमाज जमलेला पाहून एक प्रकारचा आनंद वाटत आहे. आज गुरुवार आहे. आतां बारा वाजण्याची वेळ झाली आहे. सुमार १०५ वर्षांपूर्वीं महाराष्ट्र-राज्यकर्त्या धुरंधर नानांचें निधन झालें तेव्हां गुरुवार असून निधन वेळ बारा वाजण्याचीच होती. आमच्या धर्मशास्त्राप्रमाणें देव, ऋषि व पितृ अशीं तीन ऋणें आहेत. नानांचे औरस नसले तरी दत्तक वंशज मेणवली येथें आहेत ते पितृतर्पण करीत असतीलच. आपणास आज ऋषितर्पण करावयाचें आहे व तें काम वेळासकर बजवावयास लागले आहेत; ही खरोखर विशेष समाधानाची गोष्ट आहे. आतां मराठशाहीच्या वेळीं किंवा पेशवाईंत साडेतीन शहाणे होते. नाना अर्धे शहाणे म्हणून प्रसिद्ध आहेत. असें असतां त्यांचेंच तर्पण करावयाचें व दुसऱ्यांचें कां नाहीं ? हा एक प्रश्न उभा राहतो. सखारामबापू सगळे शहाणे होते. देवाजीराव सबंध शहाणे होते. विठ्ठल सुंदर सगळे शहाणे. हे पुरे शहाणे तीन व चवथे नाना अर्धे शहाणे मिळून पेशवाईंत शहाण्यांची साडेतीन संख्या होती. हे सर्व लोक मुत्सद्दी होते. कांहीं शूरहि होते. आतां नाना फक्त मुत्सद्दी असतां त्यांचा जो इतका

---

१ हे दापोली येथील बोर्डिंग (मुलांचें वसतिगृह) चे मालक.

बडेजाव होत आहे त्यांतलें काय कारण असेल ? **सखाराम बापू** मुत्सद्दी असून शूरहि होते. **विठ्ठल सुंदर** निजामशाहींत सारखा सेवा करीत होता. पण **नानांत** शूरपणा नव्हता तरी मुत्सद्दीपणा व मनाचा उदारपणा हे गुण अधिक एकवटले होते. सखारामबापूंची स्वार्थपरायणते पलीकडे फार व नेहमींची मजल गेली नाहीं. राघोबादादांना इंग्रजभाईची कास स्वार्थ साधण्याकरितां धरावी म्हणून सखारामबापूंचीच मसलत व उपदेश, असें पत्रें व बखरी सांगतात. नाना स्वार्थपरायण नव्हते असें नाहीं पण प्रथम मराठी राज्य चिरस्थायी करण्याचा त्यांचा विचार व नंतर स्वार्थ-परायणता. ह्यामुळेंच ते अर्धे शहाणे असतां लोकांस पूज्य झाले. नुसता शूरपणा असून कांहीं उपयोग नाहीं. शूरपणा व मुत्सद्दीपणा हे गुण एक-वटल्यास जास्त चांगलें. **बापू गोखल्यांनीं** शौर्य काय कमी गाजविलें ? पण त्यांचा कोणी सत्कार सध्यां करीत आहेत काय ? नानांच्या अंगीं असलेल्या शहाणपणास जर शौर्याची भर मिळाली असती तर फारच बहार झाली असती ही गोष्ट खरी. आमची पूर्वींची पद्धत अशी होती कीं, शौर्य व मुत्सद्दीपणा हीं दोन्ही एकाच इसमाला दाखवितां येत असत. पाश्चात्य देशांत हा प्रघात नाहीं. **ग्लॅडस्टन**साहेब मुत्सद्दी होते, समरांगणीं ते कधीं गेले नाहींत. नाना शूर नसून मुत्सद्दीच होते व पाटीलबुवासारखा खंदा वीर नानांस क्वचित् चीत करावयास अट्टाहास करीत असतां नाना चीत झाले नाहींत; इतकेंच नव्हे तर नानांनीं आपलें वर्चस्व राज्यार्थ सारखें कायम ठेवून माहादजी शिंदे यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं; व अशा वेळीं पेशवाई व मराठी राज्य यांचा विस्तार केला. माझ्या मतें कोणाची स्मारकतिथि पाळावयाची असेल तर ती नानांची पाळली पाहिजे. नाना मुत्सद्दी होते ही गोष्ट निर्विवाद आहे. पाश्चात्य इतिहासकारांनीं ती कबूल केली आहेच. आमच्या जुन्या बखरी-वरून व जुन्या लेखांवरून याचा पदोपदीं प्रत्यय येतो. **खरा मुत्सद्दी** कोण तर स्वार्थापेक्षां स्वदेशप्रीति ज्याचे अंतःकरणांत अधिक आहे, ज्याची

स्वराज्य वाढविण्याची उत्कट इच्छा आहे व संकटपरंपरा आली असतां त्यार्शी टक्कर देऊन साम्राज्याचा शकट अबाधित चालवावयाचा ज्याचा निश्चय आहे व ज्याचें मन उदात्त आहे तो होय. हे गुण नानांत अधिक होते. सखारामबापूंत तितके नव्हते, म्हणून नाना पूज्य होते. कर्तव्यतत्परता, बुद्धि व शूरपणा यांनीं सखारामबापू मंडित असतांहि स्वार्थपरायणते पलीकडे न गेल्यामुळें त्यांस मान नाहीं. नानांच्या अंगीं मुत्सद्दीपणाचे खरे गुण नसते तर इंग्रज इतिहासकारांनीं या संबंधानें एकच अकांडतांडव केलें असतें, व सखारामबापूस अतिउच्च चढविलें असतें. असो. आतां नानांचा उत्सव राष्ट्रीय करूं नये, कारण त्यांच्या अंगीं दोष होते. त्यांच्या कारकीर्दींत नारायणरावसाहेब पेशवे यांचा खून, सवाई माधवराव याचा आत्मघात इत्यादि प्रकार झाले व त्यांचें वर्तन नीतीस धरून नव्हतें, अशा प्रकारचा कांहीं दोषारोप त्यांच्यावर करतात म्हणून तो पूज्य वाटत नाहीं, असा कोटिक्रम करण्यांत येतो. त्यास इतकेंच उत्तर द्यावयाचें कीं, नानांचा बुधवारांतील वाडा व शनवारवाडा ज्यांत नारायणरावसाहेबांचा खून झाला, हे जवळ जवळ असतां नारायणरावाच्या वधाबद्दल एक वर्ष कट पुण्यांत चालून नानास कळला नाहीं तेव्हां तो मुत्सद्दी नव्हता किंवा खुनांत तो सामील असावा, अशा प्रकारचे तर्क इतरत्र लावावयाचे तर पुण्यास ऱ्यांड साहेबांचा खून झाल्या वेळीं ती बातमी पुण्यांतील लोकांस माहीत नव्हती म्हणून पुण्यांतले सर्व लोक खुनी आहेत असें म्हणणें भाग पडेल ! सवाई माधवरावांच्या आत्मघाताबद्दल नाना त्यांना नीट रीतीनें वागवीत नव्हता, तो अन्याय म्हणजे रावबाजीबरोबर विशेष संघटण ठेवूं नको, या उपदेशापेक्षां यांत जास्त काय ? ज्यांनीं सवाई माधवरावाच्या बापाचा खून केला ते स्नेही नसून शत्रू आहेत हें सांगणें त्यांचें प्रधान कर्तव्य होतें. वचनभंगाचा नानावर एक मोठा आरोप आहे, तो कोणता तर रघुनाथरावाच्या वंशजास आपण नमस्कार करणार नाहीं अशी नानानें प्रतिज्ञा केली असतां रावबाजीस राज्यारूढ

करण्याची त्यानें खटपट केली. हा वचनभंगाचा आरोप करणारांस इतकेंच सांगावयाचें कीं, सवाई माधवराव यांच्या कुटुंबाच्या मांडीवर दत्तक द्यावयाची नानानें गुप्त खटपट केली. तिला त्या वेळच्या सरदारांचा पाठिंबा मिळेना म्हणून त्यानें तो नाद सोडून देऊन निसंतानापेक्षां कुसंतान वरें किंवा पेशवाई— इमारतींत एखादा सोमाजी बिन गोमाजी शिरण्यापेक्षां पेशव्यांत निघालेल्या दिवट्या बाजीकडून कां होईना पण मराठी राज्य-शकट चालो, या उच्च, उदात्त व देशाभिमान–परिप्लुत प्रेरणेनेंच त्यानें वचनभंग केला हा त्याचा गुण किंवा दोष याचा त्याच्यावर आरोप कर-णारांनीं विचार करावा. वचनभंग करणारा पुढारी ठरत नसल्यास आय-र्लंडच्या 'होमरूल बिल' संबंधानें **ग्लॅडस्टनसाहेब** यास काय म्हणावयाचें होतें ! पण स. माधवराव आजारी अवस्थेंत व भोंवळ येऊन पडले व वारले. त्यांच्या मरणानंतर त्यांचें चरित्र निघालें व आतां तिसरी आवृत्ति निघत आहे. वचनभंगाचा स्वार्थपरायणतेशीं जर संबंध असला तर मात्र तो निंद्य होय. शिवाय राजनीति, समाजनीति, व्यक्तिविषयक नीति व धर्मनीति या एकाच कसोटीस लावून उपयोगी नाहीं. आमच्या इंग्रजी विद्येनें (पॉलिटिक्स) राजनीतींतील शास्त्रप्रमेयें वाचून आमची फक्त बोलघेवडी मंडळी नानास जर वचनभंगाचें दूषण देतात व पुढारी नव्हता असें म्हणतात, तर १८६२ सालीं बंडानंतर **लॉर्ड कॅनिंग** साहेबांनीं संस्थानिकास ज्या नवीन सनदा व हक्क दिले त्यांत संस्थानिक निपुत्रिक मरण पावल्यास दत्तक घेण्याची परवानगी दिली होती. ४० वर्षांनंतर हीच राजनीति **कर्झन**शाहींत कशी बदलली, याचा कोणी विचार केला आहे काय ? लॉर्ड **रिपन** यांनीं जे हक्क आम्हास दिले तेच कर्झनशाहींत नामशेष झाले. हे कर्तेपुरुष असल्यामुळें आमच्यांतील कलम–बहाद्दर त्यांच्यावर वचनभंगाचा आरोप करण्याचें नैतिक धैर्य दाखवितील काय ? असो. आमच्यांत **श्रीसमर्थ रामदास** स्वामी महाराज हे मुत्सद्दी होते. त्यांच्या

प्रभावानें व उपदेशानें शिवाजी महाराज यांनीं किती कामगिरी बजावली ! महाराज शूर होतेच पण विशेष रीतीनें मुत्सद्दीहि होते. पहिले बाजीराव शूरही होते व मुत्सद्दीहि होते. बाजीरावाच्या दूरदर्शीपणाच्या धोरणानें त्या वेळीं पेशवाईची किंवा मराठीराज्याची प्रगति झाली. हाच प्रकार नानांच्या बाबतींत विशेष महत्त्वाचा आहे. बाळाजी विश्वनाथानें पेशवाई प्रसिद्धीस आणिली. बाजीरावानें आपल्या धोरणानें, शौर्यानें आणि बुद्धिमत्तेनें तिच्या शाखा वाढविल्या. नानासाहेब पेशव्यानें व्यवस्था व टापटीप ठेवून राज्य दृढ केलें; पण या मराठ्यांच्या अंतर्व्यवस्थेच्या व वैभवाच्या काळास सुरुवात होते न होते तोंच पानपत झालें व तेथील भयंकर रणसंग्रामांत नाना स्वतः होतेच. पानपतमुळें, नानासाहेब पेशवे दुःखानें मरण पावले. पुढें थोरले माधवराव गादीवर बसले. त्यांच्या कारकीर्दींत नाना फडणवीस यांचा शह बसूं लागला. नारायणराव पेशवे, सवाई माधवराव यांच्या कारकीर्दींत ते तर प्रमुखच होते. शेवटच्या रावबाजीनें नाना गेल्याबरोबर जी राज्याला तिलांजलि दिली ती नाना नसते तर केव्हांच दिली गेली असती. महादजी शिंदे हा शूर व महत्त्वाकांक्षी असल्यामुळें त्यास नानांनीं मोंगलांकडे गुंतवून निजामासारख्यास कसें कह्यांत ठेवावें तें त्याला अधिक लक्षांत आणून दिलें. टिपूस इरेला घालून मद्रासेस इंग्रजांशीं अधिक धुमाकूळ त्यांनीं घालविला. कलकत्त्यावर भोंसल्यास पाठवून मुंबईइलाख्यांत इंग्रजास चीत करावयाची मसलत नानांचीच होती. पुण्यांत राहून राजनीतीची बुद्धिबलक्रीडा नाना कशी चालवीत होते, कोणतें प्यादें पुढें द्यावयाचें, उंट कोठें ठेवावयाचा, हें हिंदुस्थानच्या भूगोलाची कोणाच्याही घरांत एक सुद्धां प्रत किंवा या देशाचा एखादाही नकाशा नसतां ते जो डाव टाकीत त्यांत मात करणें कसें मुष्कील होतें हें पाहणें फार आनंदजनक आहे. मराठीराज्याच्या चिंधड्या उडविण्यास इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज, निंजाम, मोंगल, अयोध्येचे नबाब, इत्यादि तयार होतेच. मराठी राजसत्ता खरोखर

पाहतां पुणें, पटवर्धन इलाखा, होळकरांचा मुलूख (गुजराथ) येथेंच काय ती होती. राजपुतान्यांत धुमाकूळ निराळ्याच प्रकारचा चालला होता. कोल्हापूरही विरुद्धच होतें. यांतहि पुनः आपापसांतील यादवी. असें असतां नानांनीं नुसत्या शहाणपणाच्या जोरावर सर्वांस दांतीं तृण धरावयास लावलें. टिपू किंवा निजाम प्रबळ झाल्यास गनिमी काव्यानें त्यांना मराठेशाहीखालीं आपण मांडलिक केव्हांच बनवूं, अशी त्यांना खातरी वाटत होती. पण त्यांत त्यांना यश न आल्यास मुत्सद्दी नव्हते असें म्हणावयाचें काय. नानांचें वर्तन नीतीस धरून नव्हतें असा एक आरोप कोणी कोणी करीत असतात. त्याला इतिहासाचा पुरावा आहे का? पुनः कोणीही मोठा मनुष्य योग्यतेस चढला असतां त्याच्याबद्दल मत्सर वाटून कांहीं वाईट कंड्या पिकविणारे क्षुद्र प्राणी सर्व ठिकाणीं आहेत. तसेंच नानांच्या वेळीं नसतील काय? आमच्यांत चांगल्या गोष्टी असल्या तरी त्यांचा विपर्यास करावयास आमचे इतिहासकार तत्पर असतात. मग असाच कांहीं प्रकार असता तर त्यांनीं एकच कोल्हेकुई करून सोडली असती. नानांमध्यें मुत्सद्दीपणाचें धोरण नव्हतें असें आतांचे पुस्तकपाठक मुत्सद्दी म्हणतात. तेव्हां त्यांना इतकेंच सांगावयाचें कीं, बाबांनों, १०५ वर्षांपूर्वींच इंग्रजी राज्याच्या धोरणाचा नकाशा नानांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें रेखाटला होता. म्हणजे सध्यां आमच्या संस्थानिकांस 'इंपिरियल सर्व्हिस'संबंधानें जी सक्तीची खुषी किंवा खुषीची सक्ती होत आहे ती नानांनीं तेव्हां जाणली व फेटाळली होती. ती नानांच्याच शब्दांनीं सांगणें बरें. हा भाग मी रा. वासुदेवशास्त्री खरे यांच्या नानांच्या चरित्रावरून देत आहें. पेशव्यांनीं टिपूचे वकील आपल्या राज्यांत ठेविले होते, म्हणून टिपूकडे त्यांचें अंग होतें. टिपूच्या वेळीं पेशव्यांनीं मदत केली नाहीं म्हणून टिपूच्या राज्यवांटणींत पेशव्यांचा हक्क नाहीं, तरी आम्ही दहा लक्षांचा मुलूख देऊं. मात्र खालील शर्ती पेशव्यांनीं कबूल कराव्या—

(१) म्हैसूरच्या राजास चौथाई संबंधानें पेशव्यांनीं उपद्रव देऊं नये.

(२) निजामअल्लीप्रमाणें पेशव्यांनीं आम्हांशीं तह करून आमची सहा हजार फौज आपणाजवळ ठेवून घ्यावी व तिचा खर्च चालवावा.

(३) निजामअल्ली व पेशवे यांच्यांत तंटा पडला आहे त्यांत आम्ही मध्यस्थी करूं. आमच्या मनाप्रमाणें दोघांनीं चालावें.

(४) निजामअल्ली, पेशवे व इंग्रज सर्वांनीं मिळून परचक्र आलें असतां एकमेकांस मदत देण्याविषयीं तह करावा. सदरहू तहास रघूजी भोसले नागपूरकर हे कबूल असतील तर त्यांसही या कटांत घ्यावें.

(५) सुरत शहराच्या उत्पन्नांत पेशव्यांचा हिस्सा आहे त्यावरचा वारसा त्यांनीं सोडावा. त्याबद्दल तितक्याच उत्पन्नाचा दुसरा मुलूख आम्ही देऊं तो त्यांनीं घ्यावा.

(६) पेशव्यांनीं फ्रेंच लोकांस आपल्या मुलुखांत आसरा देऊं नये, व त्या जातीच्या लोकांस आपल्या फौजेंत नौकऱ्या देऊं नयेत.

यावर नानांनीं उत्तरें दिलीं तीं अशीं—

आमच्या राज्यांत अंतःकलह उत्पन्न होऊन घोटाळा झाल्यामुळें फौज पाठवितां आली नाहीं. एवढ्यावरून आम्ही टिपूस सामील होतों असें सिद्ध होत नाहीं. टिपूचे वकील आमच्या दरबारीं होते त्याचें कारण, या देशाचा रिवाज असा आहे कीं दोन राज्यांत लढाई जुंपली असतांहि परस्परांचे वकील दरबारीं असतात. इंग्रज आम्हास दहा लक्षांचा मुलूख देत आहेत तो त्यांनीं आम्हांस दिल्यास आम्ही म्हैसूर जवळ चौथाई मागणार नाहीं व त्या मोबदला हा दहा लक्षांचा मुलूख मिळाला असें समजूं. इंग्रजांची दोन पलटणें आम्ही राज्यांत ठेवून घेऊं, व त्यांचा खर्च चालवूं. पण आमच्या मांडलिक राजांचे किंवा सरदारांचें पारिपत्य करण्याचा प्रसंग आल्यास आम्ही या पलटणींचा उपयोग करूं. आमच्या मनांत

जंजिऱ्याचें संस्थान काबीज करावयाचें आहे. त्या कामासाठीं आम्ही ही पलटण पाठवूं. सारांश सरकारची जी कामगिरी पडेल ती त्यांनीं बजावली पाहिजे. आमचा निजामअल्लीशीं जो तंटा आहे त्यांत आम्ही इंग्रजांची मध्यस्थी साफ कबूल करीत नांहीं व या तंट्यांत पडण्याचें इंग्रजांसही कांहीं कारण नाहीं. एकमेकांच्या रक्षणार्थ जर मोंगल व इंग्रज यांच्याशीं तह करणेचा झाला तर त्यांत भोसल्यांचें नांव घालण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण भोसले हे आमच्या छत्रपतींच्या हाताखालचे आहेत. आमच्या संमतीशिवाय परराज्याशीं तह करण्याचा त्यास अधिकार नाहीं. फ्रेंच लोकांनीं हिंदुस्थानवर स्वारी केल्यास त्यास हाकून लावण्याकरितां आम्ही इंग्रजांस मदत करूं पण त्या जातीच्या लोकांस आमच्या सैन्यांत नौकऱ्या देऊं नयेत असें जें इंग्रजांचें म्हणणें, तें आम्हास कबूल नाहीं. सुरतेंत आमच्या उत्पन्नाच्या ज्या बाबी आहेत त्या आम्ही कधीं सोडणार नाहीं. त्या शहराच्या उत्पन्नावर आमचे जे हक्क आहेत ते मामूलप्रमाणें चाललेच पाहिजेत. याप्रमाणें नानानें उत्तरें दिलीं तीं अर्थातच लॉर्ड वेलस्ली यास आवडलीं नाहींत व त्यानें टिपूच्या राज्यापैकीं वांटणी पेशव्यास दिली नाहीं. यावरून आमच्या सरकारचा कावा १०५ वर्षांपूर्वीं ओळखणारा नाना धोरणी किंवा सध्यांची इंग्रजी नीति वाचून नीतीची मीमांसा करणारे धूर्त, याचा विचार करा. तेव्हां वचनभंग या शब्दाची व्याख्या धर्मशास्त्रानें किंवा व्याकरणाच्या नियमानें करावयाची नाहीं, आमच्या सरकारचें धोरण अशा प्रकारचें आहे कीं–आम्हांस केव्हांही राजनीतितत्त्वें सरकार शिकविणार नाहीं. सरकार आमच्यांत अशा प्रकारची बुद्धिविषयक पारंगतता दाखवील तर त्याचें डोकें नमविण्यास तत्पर आहेच. इंग्रजी नीतिशास्त्रवाल्यांस नाना बोले एक व करी एक या संबंधानें इतकेंच विचारावयाचें कीं, थिबा रत्नागिरीस आणला, तिबेटला थंडें मिशन इराणला गरम मिशन गेलें. ही राजनीति तर्कानें पारखावयाची किंवा बायबलच्या आज्ञेप्रमाणें पारखावयाची. धर्मनीति व राजनीति ही एका कसास

लावूं नका. सध्यां आमचा पडता काळ आहे म्हणून इतिहास–ज्ञानाची भर मिळविण्यासाठीं तुम्ही यत्न केल्याशिवाय राहूं नका. सरकार या बाबतींत युनिव्हर्सिटीक्रम बदलीत असले तरी **आम्ही इतिहासज्ञानाबद्दल लालसा नेहमीं द्विगुणित करीत गेलें पाहिजे.** मागच्या पिढीनें आम्हास कांहीं ठेविलें नाहीं म्हणून ओरड करणारांनीं पुढल्या पिढीपुढें तरी पूर्वजांचा इतिहास व अनुभवाचा आरसा ठेविला पाहिजे. नानांना वचन-भंगाबद्दल न्यायासनापुढें आणणारांनीं इंग्रजी हस्तीदंती वचनपद्धति नानांस पूर्वींच अवगत होती याचा विचार करावा. लॉर्ड कर्झन साहेबांच्या युनिव्हर्सिटी कॉनव्होकेशन भाषणांत, आम्ही असत्याचे पुतळे, असे उद्गार आले आहेत, त्याला नानांचे स्वदस्तूरचें पत्रांतील इंग्रजांविषयींचे उद्गार पहा !

> " इंग्रजांशीं तहनामा करणें तो फार विचार करुन करावा लागतो. त्यांचे बोलण्यांत व लिहिण्यांत एका अक्षरांत फार पेंच असतात. ही पूर्ती माहीतगारी येथें आहे. पाटीलबुवास ही माहीतगारी सर्व असावी या करितां पूर्वीं येथून हस्टनच्या तहनाम्याच्या नकला व कलमाकलमांचे अर्थ सविस्तर लिहून पाठविले होते...असो. इंग्रजांशीं तहनामा करणें त्यास पुढील मागील गुणदोष फार पहावे लागतात व एकेक अक्षरास जपावें लागते. याकरितां पूर्वीं व हल्लीं लिहिलें हें अर्थ सविस्तर मनांत चांगलें आणून करावें. "

यावरून नाना शहाणे किंवा आम्ही शहाणे हें पहा. आतां नानांच्या अंगीं दोष नसतील असें माझें म्हणणें नाहीं, पण ह्या दोषांपेक्षां स्वसुख-निरभिलाष वृत्ति कितपत होती, याचा विचार करा. इंग्रजीनीति आम्हास बिलकूल उपयोगाची नाहीं. आम्हास राजकारणपटु बनलें पाहिजे. आमच्या अंगीं अधिकार किंवा सत्ता नसेल म्हणून सरकार इतिहासज्ञानाची

आसक्ति तरी काढून घेत नाहींना ? हा प्रकार पाहून **वेळासकर** यांनीं उत्सव साजरा करण्याचा जो उपक्रम केला आहे तो फार चांगला आहे. आमची सध्यां प्रत्येक बाजूनें पीछेहाट होत आहे. अशी स्थिति आहे तरी आम्ही हताश होतां उपयोगी नाहीं. इतिहास हा देशाच्या अवनतस्थिती-मध्यें लोकांस समाधानवृत्ती प्राप्त करून देण्यास व पुढील काळ चांगला येईल या आशेवर दिवस काढण्याचें सामर्थ्य आणण्यास एक प्रकारची शक्ति आहे. काश्मीर देशाचा राजकवि कल्हण यानें "राजतरंगिणी" म्हणून राजपुत्रांचा इतिहास लिहिला आहे. हा ग्रंथ राजनीतिपर आहे. त्यांत तो असें म्हणतो कीं **राष्ट्राचा उत्कर्ष किंवा अपकर्ष झाला तरी दोन्ही प्रसंगीं इतिहासज्ञान हें रामबाण औषध आहे.** केव्हांतरी अभ्युदय होईलच. मात्र आम्ही धीर सोडतां कामा नये. धीर धरून आमच्यामधील जे नरवीर, उदात्त पुरुष किंवा मोठमोठ्या विभूती यांचे उत्सव जितके जास्त करवतील तितके करून मुलांपुढें त्यांचा उदात्त कार्यक्रम ठेवा. आपली भावी पिढी देशाभिमानी, धैर्याभिमानी, राष्ट्राभिमानी व स्वाभिमानी होईल याबद्दल दक्ष रहा. इंग्रजी ज्ञानाचा गड्डा म्हणजे सर्व झालें असा टेंबा पाजळणारे, नानाला राष्ट्रीयत्वाची कल्पना नव्हती, अशी वल्गना करितात. त्यांना सध्यां आर्यावर्त जसें पार्शी, इंग्रज, हिंदु व मुसलमान या सर्वांच्या राष्ट्रीय विचारस्थानाचा केंद्र मानतात तसा नाना महाराष्ट्रालाच आपल्या इति-कर्तव्यतेचा केंद्र मानीत होता. **आम्ही अवनत स्थितीस जरी पोचलों तरी उन्नत स्थिति आणण्याचें आमच्या स्वाधीन** आहे. तेव्हां धीर न सोडतां, आपला देशाभिमान सोडूं नका. ईश्वरास शरण जा. स्वस्थ न बसतां इतिहासज्ञानाचें पान करा. मग तुम्हास खरोखर 'सुदिन' कधींतरी उगवेलच उगवेल. आतां माझी ईशचरणीं इतकीच प्रार्थना आहे कीं, त्यानें आर्यावर्तास चांगले दिवस दाखवावे. त्यानें तुम्हास सुबुद्धि द्यावी. तुम्ही कचरूं नका. हा उत्सव अव्याहत चालवा. लॉर्ड कर्झन पूज्य पुरुषाचे

चहाते आहेत. जुनीं स्मारकें राखण्याची त्यांनीं तजवीज केली आहे. तेव्हां त्यांच्याकडून तुम्हांस उत्तेजन न मिळालें तरी तुमचा हिरमोड तरी होणार नाहीं, हें खास. तुम्ही माझा मान केल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे.

आपला
परिचित
[केसरी २८–३–१९०५

'नाना फडणवीस स्मारक फंड' कमिटीचे सेक्रेटरी यांजकडून जी माहिती आली आहे तिजवरून असें दिसतें कीं, या संस्थेस आतां चांगलें स्वरूप येऊन ती कायमची उभी राहील अशी आशा वाटूं लागली आहे. या उत्सवास सुरुवात होऊन पांच वर्षें झालीं. दरसाल सुमारें १०० रु. उत्सवास खर्च लागतो. हा खर्च भागून हल्लीं सेक्रेटरी व खजिनदार यांच्याजवळ ८५ रु. शिल्लक आहेत. तथापि, अद्याप कायमचा फंड जमा होणें असून त्याकरितां स्मारकफंडाचे सेक्रेटरी रा. रा. **केशव बाळकृष्ण जोशी** हे स्वतः ठिकठिकाणीं हिंडून किंवा एजंट पाठवून खटपट करणार आहेत असें समजतें. नाना फडणवीस स्मारक संस्थेचे मुख्य हेतु तीन आहेत. (१) वेळास येथें होत असलेल्या नानांच्या उत्सवास कायमचे स्वरूप देणें. (२) नाना व मोरोबादादा फडणवीस यांनीं वेळास येथें बांधविलेल्या देवालयांचा जीर्णोद्धार करणें; (३) नाना फडणविसांच्या वेळचे कांहीं महत्त्वाचे कागद प्रसिद्ध करणें. पैकीं उत्सवास दरसाल १०० रु. खर्च होतो. तेवढी रक्कम व्याजानें वसूल होण्यास निदान २॥ हजार रु. तरी जमा झाले पाहिजेत; आणि कागदपत्राच्या प्रसिद्धीकारितां तितकीच रक्कम धरली तर किमान पांच हजार रु. वर्गणीनें जमा झाले पाहिजेत. ज्यानें आपल्या शहाणपणानें कांहीं दिवस तरी स्वराज्य कायम ठेवलें, त्याचें स्मारक त्याच देशांत

चिरस्थायी होण्यास ही रक्कम फार आहे असें नाहीं. पुष्कळ गव्हर्नरांच्या पंचवार्षिक कारकीर्दीच्या स्मारकाकरितांही याहून पांच दहा पट रक्कम गोळा होते. तेव्हां नाना फडणवीस स्मारक फंडाचे सेक्रेटरी यांनीं योजलेलें काम तडीस जाण्यास आम्हांस कांहीं हरकत दिसत नाहीं. लोकांनीं मात्र ही गोष्ट मनावर घेतली पाहिजे. उत्सव पांच वर्षें नियमितपणानें चालला असून त्यास कायमचें रूप येण्याकरितां मुंबईस विद्वान् व वजनदार गृहस्थांची एक कमिटीहि स्थापिली आहे. ज्यास या कामास वर्गणी देणें असेल त्यांनीं ती सदर कमिटीचे सेक्रेटरी रा. **केशव बाळकृष्ण जोशी** यांजकडे द्यावी. किंवा आमच्याकडे पाठविल्यास आम्ही ती त्यांजकडे पोंचती करूं. नानांच्या शहाणपणाचें स्मारक इतिहासांत चिरस्थायी झालेलेंच आहे. पण त्याची किंमत ओळखून आम्ही आपल्या शहाणपणाचें व गुणज्ञतेचें स्मारक न केल्यास त्याचा दोष सर्वस्वी आमच्याकडे आहे, हें महाराष्ट्रांत तरी कोणास सांगावयास नको. स्मारकफंडाच्या कायमपणाबद्दल शंका घेण्याचें आतां कांहींच कारण राहिलें नाहीं. तेव्हां या फंडास लागणारी स्वल्प रक्कम लवकरच वसूल होईल असा आम्हांस भरंवसा आहे.'

[केसरी २८-६-१९०४

"कै. श्री. नाना फडणविसांच्या स्मारकफंडासाठीं फडणवीस स्मारक संस्थेमार्फत मुंबईत माधवबागेंत जाहीरसभा भरणार आहे. तरी त्या प्रसंगीं सर्व महाराष्ट्रीयांनीं हजर रहावें, अशी संस्थेच्या चिटणीसांची विनंति आहे. सभेविषयीं व स्मारक संस्थेविषयीं पूर्ण सहानुभूति असून ज्यांना सदर प्रसंगीं हजर राहतां येणार नाहीं, त्यांस जर सहानुभूतिदर्शक तारा किंवा पत्रें पाठविणें असेल तर मुंबई, पोस्ट गिरगांव c/o डॉक्टर देशमुख एम्. डी. या पत्त्यावर पाठवावी असें फ. स्मा. संस्थेचे चिटणीस कळवितात."

[केसरी-ता. २८ जून १९०४

मागें प्रसिद्ध केल्याप्रमाणें परवां डॉ. देशमूख यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस माधवबागेंत नाना फडणवीस यांच्या स्मारकासंबंधानें जाहीर सभा भरली होती. सभेस पुष्कळ प्रमुख मंडळी जमली असून त्यांत सातारचे रा. रा. दादासाहेब करंदीकर यांच्यासारखे बाहेरचेही कांहीं गृहस्थ हजर होते. पंडित दीनदयाळ शर्मा; रा. रा. श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर, एम्. ए; रा. रा. घमंडे; शंकरशास्त्री पदे; रा. रा. *वामन रामचंद्र जोशी; रा. रा. अनंत बामन बर्वे व रा. रा. महादेव वामन भट वगैरे गृहस्थांचीं भाषणें झालीं. पहिला ठराव वेळास येथील उत्सवास कायमचें स्वरूप देण्यासंबंधींचा होता. दुसरा ठराव नानांसंबंधाचे जे कागदपत्र आहेत ते छापून प्रसिद्ध करावे असा होता. तिसरा ठराव [1]कमिटी नेमंण्यासंबंधींचा असून वरील दोन्हीं कामें या कमिटीकडे सोंपवावीं अशा अर्थाचा होता. तिन्ही ठराव रीतीप्रमाणें पास झाल्यावर शेवटीं अध्यक्षांचे व लोकांचे आभार मानून सभा बरखास्त झाली. सभेचें काम चांगल्या रीतीनें पार पडलें; व उद्दिष्ट कार्याबद्दल तेथें जमलेल्या मंडळींत चांगला उत्साह नजरेस आला. नानास्मारकफंड कमिटीनें हा जो उपक्रम केला आहे त्यास धरून सदर कमिटीचे सेक्रेटरी पुढेंही जर अशाच उमेदीनें व नेटानें काम चालवितील तर या स्मारकास लवकरच चिरस्थायी रूप येईल अशी आमची खात्री आहे. कमेटीचे सेक्रेटरी रा. रा. **महादेव वामन भट** व रा. रा. **केशव बाळकृष्ण जोशी** यांस नेमिलें आहे.

[केसरी–ता. १६–८–१९०४

---

* वामन रामचंद्र जोशी हे आर्यन ए. सो. चे प्रिन्सिपाल.

१ श्री. हरि सिताराम दीक्षित सॉलिसिटर, प्रि. डि. जी. पाध्ये (स्मारकाच्या घटनेचा आराखडा तयार करणारे), शेट तुकाराम जावजी, डॉ. जी. बी. प्रभाकर–नेत्रवैद्य, सालिसिटर नानू नारायण कोठारे इत्यादि नामांकित कायदेपंडित व विविध व्यवसायी थोर मंडळी ह्या कमेटींत होती.

"प्रोंच व अभिप्राय-मराठ्यांचे इतिहासांत नानांचे महत्त्व. वेळास येथें देशबंधु केशव बाळकृष्ण जोशी ह्यांच्या परिश्रमानें नाना फडणवीस ह्यांच्या उत्सवाची व स्मारकाची चळवळ किती नेटानें चालली आहे हें महाराष्ट्रांतील सर्व लोकांना माहीत झालेलेंच आहे. सदर उत्सवाच्या कामिटीमार्फत अलिकडे कांहीं वर्षें 'फडणवीस पुस्तकमाला' म्हणून एक माला सुरु झाली आहे. यापैकीं ऐ.पुरुषांचें उत्सव कां करावेत ह्या विषयावर दे. वि. दा. सावरकर ह्यांनीं लिहिलेला निबंध हें पहिलें पुस्तक असून 'मराठ्यांचें इतिहासांत नानांचें महत्त्व' हें सदर मालेंतील दुसरें पुस्तक होय. याचे ले. दे. कृष्णाजी महादेव संत हे आहेत. पुस्तक चांगल्या रीतीनें लिहिलेलें आहे. व इंग्रजांचा कावेबाजपणा नाना फडणवीस किती ओळखून होते हें ह्यांत चांगल्या रीतीनें दाखविलें आहे."

[काळ, १७-११-१९०५

नाना फडणवीस यांचा सातवा महोत्सव

रा. रा. केसरीकर्ते यांस,

वि. वि. वेळास येथें नाना फडणवीस यांचा उत्सव प्रतिवर्षी होत असतो, हें केसरीच्या हजारों वाचकांस माहीत आहेच. काळकर्ते प्रो. शिवराम महादेव परांजपे हे उत्सवास येणार, हें प्रसिद्ध झाल्यापासून वेळास व आसपासचे लोक प्रोफेसरसाहेबांचें देशाभिमान-परिप्लुत भाषण ऐकण्यास उत्सुक झाले होते. मंगळवारीं सकाळीं नाना फडणवीस यांची तसबीर मोठ्या थाटामाटानें व भव्य लव्याजम्यानिशीं मिरवणूक काढून श्रीकालभैरवाच्या उत्तम शृंगारलेल्या, भव्य व विस्तीर्ण मंडपांत ठेवण्यांत आली. नंतर वे. शा. संपन्न विनायकशास्त्री अभ्यंकर व इतर गायनपटु मंडळींचें गायन झालें. दोन प्रहरीं सर्व मंडळींचा प्रसाद झाल्यावर

तीन वाजतां प्रोफेसर परांजपे यांच्या पुराणास सुरुवात झाली. पुराणाचा विषय 'नारसिंह अवतार' हा होता. "हिरण्यकश्यपूनें सर्व पृथ्वी त्रस्त केल्यावर



दे. भ. प्रो. शिवरामपंत परांजपे-' काळ 'कर्ते

देवांस भीति वाटून शेषशाई भगवानास या महत्संकटांतून स्वतःस व सर्व पृथ्वीस मुक्त करण्याकरितां शरण जाऊन त्यांनीं प्रार्थना केली. त्यानंतर श्रीविष्णूनें सर्व भक्तांस जो उपदेश केला तो सध्यांच्या प्रसंगींसुद्धां व पुढील

काळींही मनन करण्यासारखा आहे. कोणच्याही कृत्यास काळ ऊर्फ वेळ यावी लागते. हिरण्यकश्यपूचा वध करावा म्हणून तुम्ही जी माझी स्तुति केली, त्याबद्दल मला तुम्हांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, तुम्ही त्रस्त होऊन हे विचार जसे तुमच्या मनांत घोळूं लागले होते तसे अद्यापपर्यंत इतरांच्या म्हणजे तेहतीस कोटी देवांच्या मनांत येऊं लागले आहेत काय? व आले असल्यास सर्वांचा विचार सारखाच आहे काय? मला अवतार घ्यावयाचा तो एकदोघांकरितां घ्यावयाचा नाहीं. तेहतीस कोटींचा विचार, आचार व संकट या त्रयींची एकवाक्यता झाली म्हणजे माझा अवतार झालाच म्हणून समजावें. तेव्हां आपलीं सुखदुःखें कळविण्यास सांप्रतसुद्धां सर्वांची एकवाक्यता झाल्यास शेषशाई भगवान् शोधावयास जावयास सागरच पहावयास नको. प्रत्येकाचें मन हेंच सागर आहे. व 'हृदयस्थो जनार्दनः' या न्यायानें तुम्ही त्या हृदयस्थ जनार्दनाचा नेहमीं धांवा करा, सर्वांचे विचार एकच होऊं द्या, सर्वांच्या कल्पना एकच ठरूं द्या. मग आपली संकटपरंपरा निमिषमात्रांत दूर होईल यांत शंका नाहीं. शेषशाई भगवान् निद्रित असतात ही कल्पना भ्रामक आहे. जे स्वतः निद्रित आहेत त्यांना तो निजलेला दिसतो व जे जागृत आहेत त्यांना तो नेहमीं जागाच दिसतो. तेव्हां तुम्ही सर्व जागृत होऊन प्रल्हादाप्रमाणें टाहो फोडा, म्हणजे तुमचा धांवा ऐकण्यास तत्पर राहून तुमची दीनावस्था दूर करील, असें त्यानें या अवतारांत दाखविलें आहे." इतकें सांगून त्यांनीं आपलें धार्मिक व चित्ताकर्षक पुराण टाळ्यांच्या गजरांत संपविलें.

चिटणिसांनीं सहा वर्षांचा रिपोर्ट वाचल्यानंतर उत्सव–कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष **रामचंद्र नारायण रानडे** हे बोलावयास उठले. त्यांनीं गेल्या वर्षीं **रा. बाळ गंगाधर टिळक** व यंदा **काळकर्ते रा. परांजपे** हे उत्सवास आल्यामुळें उत्सवास विशेष शोभा येऊन हा उत्सव महाराष्ट्रीयांचा आहे हें सर्वांस कळलें. म्हणून उभयतांचे आभार मानले. नंतर

प्रो. परांजपे पुन्हां टाळ्यांच्या गजरांत भाषण करण्यास उभे राहिले. "सध्यां जी परिस्थिति दिसत आहे ही परिस्थिति महाराष्ट्रास येणार असा जर कोणी शंभर वर्षांपूर्वी तर्क केला असेल तर तो एकट्या नानांनींच, व ती परिस्थिति न यावी म्हणून जर कोणी आटोकाट प्रयत्न केले असतील तर ते नाना फडणवीस यांनींच. म्हणूनच नानांचें नांव हिंदुस्थानांत उत्तम मुत्सद्दी म्हणून गाजत आहे; व तें परकीयांनींही कबूल केलें आहे. त्या वेळीं पाटीलबुवांच्या मनांत नानांप्रमाणेंच विचार घोळत असते तर किती बहार झाली असती ! पण कालचक्र प्रतिकूल असल्यामुळें तसें कोठून घडून येणार ? राघोबादादानें देशद्रोही, स्वराज्यद्रोही व स्वकुलद्रोही बनावें; आनंदीबाईनें राज्यतृष्णेनें सुमेरसिंगाकडून प्रत्यक्ष पुतण्याचा वध करावा; शूर राघोबादादा बायकोच्या मायाजालांत सांपडून नामर्दापेक्षांही नामर्द बनावा, मोरोबादादा फडणवीस–नानांचे प्रत्यक्ष चुलतबंधु–यांनींसुद्धां प्रत्येक वेळीं नानांस त्यांचे प्रत्येक कार्यांमध्यें विघ्न आणावें यापेक्षां महाराष्ट्रास शोचनीय स्थिति ती आणखी कोणची यावयाची होती ! अशा स्थितींत सुद्धां नानांनीं आपला कार्यक्रम आंखून रेखाटल्याप्रमाणेंच चालविला होता यांतच त्यांचें अलौकिक मुत्सद्दीपणाचें धोरण दिसून येतें. राघोबादादा जसा कुलांगार बनला तसे इतर लोकही बनले ही खेदजनक व महाराष्ट्रास दुर्दिन आणणारी गोष्ट ऐकून कोणाचेंही मन उद्विग्न होईल. निरापराधी नारायणरावाच्या खुनाऐवजीं जर त्यावेळेस स्वदेशद्रोही मारले गेले असते तर इतिहास निराळाच दिसला असता. परंतु 'भवितव्यता बलीयसी' असें म्हटल्याखेरीज गत्यंतर नाहीं. **स्वतंत्रता नदीचा उगम रायगड** मुक्कामीं झाल्यामुळें रायगड ही गंगोत्री आहे, तेथून ती नागपूर, ग्वाल्हेर, पुणें, बडोदा, वगैरे ठिकाणीं स्वैरगतीनें हिंडत हिंडत शेवटीं वेळास या ठिकाणीं समुद्रास मिळण्यास आली आणि म्हणूनच उगम व मुख म्हणजे रायगड व वेळास येथील **शिवरायांचा** जन्मोत्सव व **नाना फडण**विसांचा निधनोत्सव हे

राष्ट्रीय दृष्टीनें अतिशय महत्त्वाचे आहेत. हे उत्सव सर्वांनीं एकदिलानें व एकजुटीनें अव्याहत चालवावे असें फार कळकळीनें शेवटीं सांगून प्रो. परांजपे यांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर पानसुपारी, अत्तरगुलाब वगैरे रीतीप्रमाणें झाल्यावर तसबिरीची उत्थापना करण्यांत आली. मंडपांत बहुतेक देशीच वस्तु वापरलेल्या दिसत होत्या. वेळासच्या उत्सवाला कुलाबा व रत्नागिरी ह्या दोन जिल्ह्यांतील ठळक मंडळी आली होती. कळावें. ही विनंति.

आपला,

एक उत्सवास हजर असलेला

[केसरी-ता. २८-३-१९०६ पान ४

वेळास येथील नाना फडणवीस यांचा आठवा वार्षिक उत्सव

(तारेनें आलेली बातमी)

पूर्वीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें वेळास येथें नानाफडणविसांचा उत्सव गेल्या रविवारीं थाटानें व उत्साहानें पार पडला. शनिवारीं रात्रीं रा. **दादासाहेब खापर्डे** यांचे हस्तें **फडणवीस लायब्ररी** उघडण्यांत आली. रविवारीं सकाळीं मुख्य उत्सवास सुरुवात झाली. नानांच्या तसबिरीची थाटाची मिरवणूक निघून ती त्यांनींच बांधलेल्या देवालयांत आली. नंतर 'फडणवीस उत्सवबोर्ड, व 'स्वदेशी वस्तु प्रचारिणी सभा' यांच्यामार्फत भरलेला **स्वदेशी बाजार** रा. रा. खापर्डे यांच्या हस्तें उघडण्यांत आला. बाजारांत सुमारें शंभर स्वदेशी दुकानें आलीं होतीं. प्रारंभीं बोर्डातर्फे रा. रा. **केशवराव जोशी** व स्वदेशी वस्तु प्रचारिणी सभेतर्फे रा. रा. **वामनराव रामचंद्र जोशी** यांचीं स्वागतपर

भाषणें झालीं. नंतर रा. रा. **दादासाहेब खापर्डे** यांचें अध्यक्ष या नात्यानें आवेशाचें व कळकळीचें भाषण होऊन त्यांच्या हस्तें बाजार खुला करण्यांत आला. या समारंभानंतर स्वदेशी वस्तू प्रचारिणी सभेमार्फत एक मोठी स्वदेशी जाहीर सभा भरविण्यांत आली. अध्यक्षस्थानीं रा. रा. **नरसिंह चिंतामण केळकर** यांची योजना करण्यांत आली होती. स्वदेशी व्रता-संबंधानें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर मुंबईचे **वामनराव जोशी** व **विष्णुपंत गोविलकर** स्वयंसेवक, रा. **नारायणराव बर्वे**, गोरेगांवचे **गजाननराव रानडे** व दापोलीचे **विश्वनाथराव दांडेकर** यांचीं याच विषयासंबंधानें समयोचित भाषणें होऊन या सभेचें काम संपलें. दुपारीं वे. शा. सं. **घैसासशास्त्री** यांचें पुराण होऊन सायंकाळीं रा. रा. **वासुदेवशास्त्री खरे** यांनीं नानांच्या संबंधाचा एक मार्मिक लेख वाचला. प्रतिस्पर्ध्यांची सर्व कारस्थानें विफल होऊन पेशवाईतील सत्ता नानांचे हातीं येईपर्यंतच्या नानांच्या कारकीर्दीचा उत्तरार्ध रा. खरे यांनीं निबंधास घेतला असून महत्त्वाचे अस्सल कागदपत्र व आख्यायिका यांच्या आधारानें नानांच्या राजकारणाचें व चरित्राचें रा. खरे यांनीं आपल्या निबंधांत निरीक्षण केलें. निबंधवाचन चाललें असतां श्रोतृसमूह चित्रासारखा तटस्थ होऊन राहिला होता. रात्रीं रा. **खापर्डे** व इतर गृहस्थ यांचीं भाषणें झालीं. व वे. शा. सं. **अभ्यंकरशास्त्री** यांचें कीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला. कुलाबा व रत्नागिरी जिल्हे आणि पुणें व मुंबई हीं शहरें येथून बरेच लोक उत्सवास आले असून कोंकणच्या त्या भागांत हा उत्सव दिवसेंदिवस फार लोकप्रिय होत चालला आहे. या सर्वांचें श्रेय **वेळासकर-मंडळी**-विशेषतः **उत्सव कमिटी**, यांज-कडेच आहे.

[केसरी-ता. ५-३-१९०७ पान ५

रा. रा. खापर्डे हे कोंकणांत चळवळ करण्याकरतां रत्नागिरी येथें तेथील लोकांच्या आमंत्रणांवरून प्रथमतः कांहीं दिवसांपूर्वी गेले होते. तेथून आयनी गांवीं वगैरे जाऊन नंतर ते वेळास येथें नाना फडणविसांच्या उत्सवाकरितां आले. त्या ठिकाणीं त्यांचीं सुरस आणि बोधप्रद व्याख्यानें होऊन स्वदेशी बाजार त्यांच्या हस्तें उघडण्यांत आला. त्या उत्सवांत दे. न. चिं. केळकर, वासुदेवशास्त्री खरे, पेठे, रानडे, केशवराव जोशी, वामनराव जोशी, पागे, द्रवीड, बरवे वगैरे गृहस्थांचीं भाषणें झालीं. नाना फडणविसांच्या तसबीरीची मिरवणूक चालली असतां त्या समारंभाचा मुंबईचे दे. हरिभाऊ फडके यानी फोटो घेतला. नंतर श्रीवर्धन येथें ही मंडळी गेली. तेथील पेशवे यांच्या घराचा उघडा चौथरा व त्याची स्थिति पाहून सर्वांस वाईट वाटलें.

[काळ, ८–३–१९०७

पत्रानें आलेली बातमी

वि. वि. पूर्वीं प्रसिद्ध झाल्याप्रमाणें या सालचा कै. श्री. नाना फडणवीस यांचा वेळास येथील आठवा राष्ट्रीय महोत्सव फार थाटानें व आनंदानें पार पडला हें कळविण्यास आनंद वाटतो. या सालचे उत्सवाचे अध्यक्ष वऱ्हाडचे लोकमान्य पुढारी रा. रा. **गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे** हे उत्सवाच्या पूर्वींच आठ दिवस निघून स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या त्रयींवर रत्नागिरी, जयगड, दाभोळ, आयनी, परशराम वगैरे ठिकाणीं व्याख्यानें देत तारीख २ मार्च रोजीं बाणकोट मुक्कामीं दाखल झाले. त्या वेळीं वेळास येथील मंडळी व फडणवीस उत्सव कार्यकारी मंडळ यांनीं त्यांचा योग्य सत्कार केला व नंतर बाणकोट येथें इतर मंडळींकडून पानसुपाऱ्या वगैरे घेऊन सर्व मंडळी वेळास येथें आली. ता. २ मार्च रोजीं रात्रौ फडणवीस वाचनालय उघडण्याचा समारंभ रा. रा.

*वासुदेव बाळकृष्ण जोशी यांच्या घरीं करण्यांत आला. प्रथम रा. [1]केशवराव जोशी यांनीं वाचनालयाचा थोडक्यांत उद्देश सांगून ज्यांनीं पुस्तकें व वर्तमानपत्रें मोफत दिलीं त्यांचे आभार मानले व रा. दादासाहेब खापर्डे यांस वाचनालय उघडण्याबद्दल विनंति केली.




लोकप्रिय दादासाहेब खापर्डे

रा. रा. नरसोपंत केळकर, वामनराव जोशी, बर्वे, गोविलकर, जोशी वगैरे मंडळींचीं समयोचित भाषणें झाल्यानंतर रा. रा. दादासाहेब खापर्डे

* हे श्री. के. बी. जोशी यांचे बंधु. ह्यांचे सहाय्य नेहमींच असे. विशेषत: स्वदेशी वस्तु प्रदर्शन व बाजार समारंभाचे वेळीं मंडप घालणें, दुकानांची उभारणी करणें इ. कामीं ह्यांनीं फारच मेहनत घेतली होती.

१ ह्यांचें सहाय्य उत्सवांत फार मौलिक आहे. उत्सव-अहवाल छपाई, निबंध छपाई, पारितोषिक आणि उत्सवकार्यक्रमाप्रीत्यर्थ येणारा खर्चांतील तोटारोटा हे स्वत: सोशीत.

यांनीं वाचनालय उघडें केलें आहे असें जाहीर केलें. ते म्हणाले–'अशा प्रकारचीं वाचनालयें हीं राष्ट्रजागृतीला फारच उपयोगीं आहेत. वाचनाशिवाय आपण पूर्वीं कोण होतों व हल्लीं कोणत्या स्थितींत आहोंत हें कळणें अशक्य आहे व याचेंच ज्ञान म्हणजे आत्मस्थितीचें ज्ञान. तें झाल्याशिवाय राष्ट्रोद्धार कसा होणार ! अशा प्रकारचीं वाचनालयें प्रत्येक खेड्यांतून ज्या दिवशीं दृष्टिगोचर होतील तो भाग्याचा दिवस होय. सध्यां आपल्या वाचनालयांत केवळ नाटकें, कादंबऱ्या नको आहेत. ज्यांत देशस्थितीचें खरें वर्णन असेल, ज्याच्या योगानें देशस्थितीचा यत्किंचित तरी परिणाम वाचकांच्या मनावर होण्याचा संभव आहे, अशाच प्रकारचीं पुस्तकें किंवा वर्तमानपत्रें वाचनालयांत असावीं असें रा. रा. दादासाहेब खापर्डे यांनीं निक्षून सांगितलें व शेवटीं वेळासच्या मंडळीनें हा जो उपक्रम केला आहे तो स्तुत्य, अभिनंदनीय व आश्रयास योग्य असा आहे असें सांगून आपलें भाषण संपविलें. दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ३ मार्च रोजीं सकाळीं कै. श्री. नाना फडणवीस यांची तसबीर मिरवणुकीनें बाहेर काढून, नाना फडणवीस यांच्या प्राचीन घरीं, व रा. करकरे यांच्या घरीं पानसुपाऱ्या वगैरे घेऊन ती नानांनीं बांधलेल्या श्रीकालभैरव व श्रीरामेश्वर यांच्या विस्तीर्ण, सुशोभित व शृंगारलेल्या मंडपांत रा. रा. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्तें प्रस्थापित करण्यांत आली. मिरवणूक चालली असतां तिचा फोटो **मुंबईचे** रा. **हरिभाऊ फडके** नामांकित व कलावान् फोटोग्राफर यांनीं घेतला. नंतर थोडें गायन झाल्यावर तेथें भरलेला स्वदेशी बाजार रा. रा. खापर्डे यांच्याच हस्तें खुला करण्यांत आला. या वेळचेंही रा. दादासाहेब यांचें भाषण उत्साहपूर्ण व उत्तेजनपर असें होतें. ते म्हणाले—प्रदर्शनांपेक्षां स्वदेशी बाजारांची कल्पना मला फार पसंत आहे. प्रदर्शनें भरविल्यानें आपल्या लोकांचा फायदा होत नसून उलट परकीय लोकांचा मात्र होतो. स्वदेशी दुकानदारांचे बाजार फक्त ऐतिहासिक उत्सव किंवा एखाद्या विशिष्टच



१ श्री.के. बी. जोशी व २ श्री.वा. बा. जोशी, तसबिरीचे उजवे डावे बाजूस
३ श्री. वासुदेवशास्त्री खरे, ४ श्री. दादासाहेब खापर्डे.

प्रसंगीं न भरवितां खेड्यापाड्यांतून सुद्धां दैनिकयात्रा किंवा उत्सव होतात अशा वेळींही ते भरवावेत; असें सांगून स्वदेशी बाजार हे स्वदेशी चळवळीला पाठिंबा किंवा दुजोरा देणारे स्तंभच आहेत, असें बोलून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

नंतर स्वदेशी वस्तु प्रचारिणी सभेच्या विद्यमानें रा. रा. **नरसिंह चिंतामण केळकर** यांच्या अध्यक्षतेखालीं स्वदेशीची जाहीर सभा झाली



नरसिंह चिंतामण केळकर

व सकाळचा कार्यक्रम संपला. सायंकाळीं रा. रा. [1]**सखारामपंत घैसास** यांचें पुराण झाल्यावर मिरजेचे वे. रा. **वासुदेवशास्त्री खरे** यांनीं नानांवर माहितीनें भरलेला असा उत्कृष्ट निबंध वाचला व त्या दिवसाचें काम

[1]सखाराम शास्त्री घैसास हे श्रीवर्धनचे रहिवासी; सार्वजनिक कार्यकर्ते.

संपलें. रात्रौ मंत्रजागर झाल्यावर रा. रा. **केशवराव जोशी** यांनीं संस्थेचा सात वर्षांचा रिपोर्ट वाचला. रिपोर्टांत गेल्या उत्सव संबंधीं कच्ची हकीकत दिली आहे. शेवटीं आलेल्या सर्व मंडळीचे आभार मानतांना त्यांनीं सांगितलें कीं, या वर्षीं उत्सवानिमित्त **'नानांच्या ऐतिहासिक दंतकथा'** हा विषय ठेवला गेला होता. त्याप्रमाणें पुष्कळांकडून दंतकथा आल्या आहेत; त्यांचें वाचन सुरू असून निकाल



इ. सं. वासुदेवशास्त्री खरे, मिरज

सवडीनुसार प्रसिद्ध करण्यांत येईल. या कामीं बक्षिसाची रकम म्हणून तेल्हारा येथील रा. रा. **गंगाधर गणेश जोशी** व मुंबईची **वासुदेव केशव** आणि मंडळी यांनीं जी मदत केली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी

आहे असें ते म्हणाले. आलेल्या दुकानदारांना रा. रा. खापर्डे ह्यांच्या सहीचीं शिफारसपत्रें मार्च अखेर रवाना करण्यांत येतील असेंही त्यांनीं जाहीर केलें. रिपोर्ट वाचनानंतर रा. रा. **नटेश अप्पाजी द्रवीड,** रा. रा. **वामनराव जोशी, नरसोपंत केळकर, पागे, दांडेकर, जोग, रानडे** वगैरे मंडळींचीं भाषणें झाल्यावर रा. रा. दादासाहेबांचें उपसंहारात्मक मार्मिक भाषण झालें. रा. रा. खापर्डे म्हणाले—अशा प्रकारच्या ऐतिहासिक थोर विभूतींच्या राष्ट्रीय उत्सवापासून राष्ट्रीयसुधारणेस फारच फायदा होत असतो. राष्ट्रीय पुरुषांचे उत्सव गतवैभवांचें स्मरण देत असतात. आणि पूर्वीं किती वैभवयुक्त होतों व आतां किती शोचनीय स्थितींत आहों याची कल्पना हे उत्सव वर्षांतून एकदां तरी आपल्याला देत असतात. नानांचें चरित्र वाचून फायदा होतच आहे, परंतु तो शिक्षितांना होणार आहे. परंतु असे उत्सव शिक्षित, अशिक्षित, लहानथोर किंवा स्त्रिया वगैरे सर्वांसच एक-समयावच्छेदेंकरून राष्ट्रीय शिक्षण देण्यास कारणीभूत होतात. सारांश, आपल्या हल्लींच्या स्थितींत अशा प्रकारचे उत्सव फारच उपयोगी आहेत ते **वेळास** व **रायगड** येथेंच विशिष्टत्वानें होत आहेत, परंतु ते हरएक ठिकाणीं करण्याचा उपक्रम झाल्यास राष्ट्रहित साधणें सुकर होईल असें सांगून

वेळासकर मंडळींचा हा उत्साह एकोपा व जागरूकपणा उल्लेखनीय आहे. सर्वच ग्रामस्थ ह्या उत्सवास मोठें मन करून झटतात. कोठें उणें पडेल कीं काय अशा काळजीनें वागतात. ह्यांतील कोणाचा म्हणून उल्लेख करावा का. धों. जोशी, वासुदेव बाळकृष्ण जोशी, गोविंद भिकाजी जोशी, ह. ना. जोशी, बा. ज. कोंकणे, सि. ना. जोशी, कृ. र. पाध्ये वकील, रघुनाथ नारायण सन्सचे मालक दुकानदार र. ना. उपाध्ये. कृ. र. केळकर, धु. पुं. बिवलकर, वि. शं. पाटणकर, रा. म. वैद्य, वा. ल. पाटणकर, ना. गो. सोमण, ल. ग. जोशी, गोडबोले इ. इ. गांवांतील घरटीपच घ्यावी लागेल म्हणून थांबतों.

त्यांनीं आपलें मार्मिक भाषण टाळ्यांच्या गजरांत संपविलें. नंतर पानसुपारी, अत्तर गुलाब वगैरे होऊन तसबिरीची उत्थापना झाली व उत्सवाचा कार्यक्रम संपला.

मुंबई,
तारीख ७-३-१९०७ }


भानूदास
[केसरी, १९-३-१९०७

श्रीमंत नाना फडणवीस यांचा नववा राष्ट्रीय महोत्सव

रा. रा. केसरीकर्ते यांस :—

वि. वि. **वेळास** येथील श्रीमंत नाना फडणवीस यांचा नववा राष्ट्रीय उत्सव एकवीस मार्च रोजीं थाटानें व आनंदानें पार पडला. या वर्षाचे अध्यक्ष रा. रा. **रघुनाथ पांडुरंग ऊर्फ दादासाहेब करंदीकर** हे साताऱ्याहून त्यांना अनेक अडचणी असतांनाही तारीख १९ रोजीं **पंढरपूरचे** पुढारी गृहस्थ रा. रा. **वासुदेवराव जोशी** यांस बरोबर घेऊन निघाले, ते हरेश्वर येथें ता. २० रोजीं (शुक्रवारीं) दाखल झाले. बंदरावर फडणवीस उत्सवबोर्ड आणि वेळास व हरेश्वर गांवांतील मंडळींकडून त्यांचे स्वागत करण्यांत आलें. वाटेंत बाणकोट येथें रा. रा. **सखाराम बापूसाहेब केळकर** (केळशीकर) यांच्या वाड्यांत त्यांना पानसुपारी झाली व त्यानंतर कोंकणांतील सृष्टिसौन्दर्य अवलोकन करीत मंडळी वेळास येथें पोहोंचली. उत्सवाच्या मुख्य दिवशीं रीतीप्रमाणें तसबिरीची मिरवणूक निघून ती रा. **दादासाहेब करंदीकर** यांच्या हातून उत्सवाच्या मंडपांत बसविण्यांत आली. तसबिरीचीं मिरवणूक भानूंच्या घरीं शिरली असतां **कै. हरी**

आप्पाजी भानू यांच्या वयोवृद्ध पत्नींच्या दादासाहेब करंदीकर हे पाया पडून म्हणाले, 'ज्या थोर पुरुषाचा आम्ही आज उत्सव करीत आहोंत त्यांच्याच कुलांतील आपण आहांत, आपण प्रत्यक्ष नानांच्या कुलाची



दे. भ. दादासाहेब करंदीकर, सातारा

थोड्याशा प्रमाणानें आठवण करून देत आहां. कालचक्राच्या फेऱ्यांत आपण सर्वजण सांपडल्यामुळें आपणां सर्वांसच विपरीत काळ भोगावा लागत आहे, यास निरुपाय आहे असें म्हणत असतां त्यांस गहिंवर आला. तसबिरीची प्रस्थापना झाल्यावर नाना फडणवीस ज्या **नकाशाचा** सदैव उपयोग करीत त्याची थोडक्यांत माहिती दादासाहेबांनीं सांगितली. सदहू नकाशावरून त्या वेळीं मराठी राज्याचा विस्तार किती होता हें सहज समजणार आहे. शिवाय त्यावर नानांनीं स्वतः कांहीं विवक्षित खुणा

ठिकठिकाणीं केल्या आहेत. त्यावरून ह्या वेळीं किती निरनिराळीं राष्ट्रें राज्यविस्ताराकरितां धडपड करीत होतीं त्याचेंहि अनुमान होणार आहे. ह्या प्रसंगींहि रा. रा. **दादासाहेब करंदीकर** यांचें भाषण महत्त्वाचें झालें. ते म्हणाले :—“ पाश्चिमात्य राष्ट्रांत शेक्सपीअर वगैरे थोर लोकांनीं उपयोगांत आणलेली क्षुल्लकही वस्तु जर सांपडली तर ती अमोलिक समजली जाऊन, लागेल ती किंमत देऊन लोक ती विकत घेतात व एखाद्या पदार्थ संग्रहालयांत जतन करून ठेवितात. अशा प्रकारची आस्था, कळकळ, अभिमान आपल्याकडील ऐतिहासिक वस्तूबद्दल जागृत झाली पाहिजे. ऐतिहासिक वस्तु ह्या एक प्रकारें ऐतिहासिक शिक्षण देणारे शिक्षकच आहेत. ” अशा प्रकारें थोडक्यांत चटकदार भाषण झाल्यावर मंडळी घरोघर गेली. दोन प्रहरीं रा. रा. रामचंद्र विष्णु करकरे यांच्या घरीं भोजनसभारंभ झाल्यावर तीन वाजतां रा. रा. सखारामशास्त्री घैसास यांचें पुराण झाल्यावर वे. शा. सं. **विनायकशास्त्री अभ्यंकर** यांचें स्वाभिमानपूर्ण व विद्वत्तेनें भरलेलें असें दोन तास कीर्तन झाल्यावर त्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

रात्रौ चिटणिसांनीं गेल्या ८ वर्षांचा जमाखर्च व इतर माहितीचा अहवाल वाचला. तो मंजूर झाल्यावर आलेल्या पाहुण्यांचे त्यांनीं आभार मानिले. उत्सवाच्या कामाकरितां पहिल्या प्रतीची मदत केल्याबद्दल श्री. डॉ. **नानासाहेब देशमुख**, रा. रा. **वामन रामचंद्र जोशी** बी. ए., **विश्वनाथ विनायक पाठक** व रा. **माधवराव पाटणकर** यांचे आभार मानल्यावर रा. रा. दादासाहेब करंदीकर यांनींही उत्सवाच्या कायम फंडाकरितां **शंभर रुपये दिल्याचें जाहीर केलें.** ज्या इतर सद्गृहस्थांनीं कायम फंडाकरितां आजपर्यंत शक्तीनुसार मदत केली आहे त्यांचे आभार मानल्यावर महाराष्ट्रांतील इतर पुढारी व श्रीमंत लोकांनीं आपापली कायमची मदत लवकर पाठवून देण्याविषयीं विनंति केली. ज्या मंडळींनीं विशेषतः छापखान्याचे

मालकांनीं छपाईच्या रूपानें किंवा अन्य मार्गानें संस्थेला ऋणी केलें त्यांचे उपकार स्मरून आपलें वाचन पुरें केलें. नंतर रा. रा. **बापू खंडेराव जोशी** यांनी स्वागतपर कविता म्हटल्यावर रा. रा. सखारामशास्त्री घैसास व वे. रा. रा. **लक्ष्मणशास्त्री जोशी** यांचीं समयोचित भाषणें होऊन रा. रा. दादासाहेब करंदीकर यांचें मुख्य भाषण झालें. दादासाहेब म्हणाले :—नाना फडणविसांचा जन्म **सातान्यास** झाला असल्यामुळें आपण दिलेला अध्यक्षाचा मान स्वीकारण्यांत मला विशेषच आनंद व अभिमान वाटत आहे. अशा प्रकारचे ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव ह्या राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत. नानांनीं आपल्यावर इतके कांहीं उपकार करून ठेविले आहेत कीं त्यांचे रोज जरी आपण उत्सव केले तरी त्यांची यःकिंचित् सुद्धां फेड होणार नाहीं, असें सांगून त्यांनीं नानांची ऐतिहासिक थोरवी वर्णन केली व संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचें निरीक्षण केलें. त्यांत त्यांनीं ‘ राधारमण ’ कवीनें केलेलें **‘ फडणवीस काव्य ’** उत्तम साधलें आहे असें सांगितलें. नंतर संस्थेला उपदेशपर अशा चार गोष्टी सांगून वेळासकरांस आपलें कार्य नेटानें चालू ठेवण्याबद्दल विनंति करून आपले पोक्त, विचार–परिप्लुत व उपदेशपर असें भाषण संपविलें. नंतर वे. शा. सं. विनायकशास्त्री अभ्यंकर यांनीं त्यांचे आभार मानल्यावर त्यांचेच उपसंहारात्मक कीर्तन झालें व पानसुपारी वगैरे होऊन तसबिरीची उत्थापना झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं रा. दादासाहेब करंदीकर हे बाणकोटचा **‘ व्हिक्टोरिया किल्ला ’** पहाण्यास गेले व तेथूनच ते **‘ पेशव्यांचा चौथरा ’** पहाण्यासाठीं श्रीवर्धनास गेले. तेथें त्यांचा सन्मान झाल्यावर दादासाहेब मंडळींसह मुंबईकडे निघून गेले. उत्सवाला मंडळी बरीच जमली होती. कळावें, हे विनंति. आपला,

भानूदास

[केसरी, २१–४–१९०८

'स्फुट सूचना १२

नाना फडणविसांचें मूळ गांव वेळास येथें त्यांच्या पुण्यतिथिनिमित्त आज बरीच वर्षें उत्सव होत असतो, हें वाचकांस माहीत आहेच. **गेल्या वर्षीं हा उत्सव मध्येंच थांबला होता.** ह्याचें कांहीं गूढ कारण असो किंवा निव्वळ शैथिल्याचा तो परिणाम असो :—मध्यंतरीं उत्सवाच्या सुव्यवस्थित घटनेचे नियम प्रसिद्ध होऊन त्यास अनुसरून तो यंदा वेळास येथें फाल्गुन वद्य ३ सोमवार ता. २८–३–१९१० रोजीं उत्सवाच्या पंचकमिटीमार्फत होणार आहे ही समाधानाची गोष्ट होय. यंदा प्रो. **चिंतामण गंगाधर भानू** यांनीं उत्सवास हजर राहून मुख्य ऐतिहासिक भाषण करण्याचें अभिवचन दिलें आहे असें समजतें.'

[केसरी, २२–३–१९१०.

नाना फडणवीस यांची पुण्यतिथि

पूर्वीं प्रसिद्ध झाल्याप्रमाणें **वेळास** येथें नानाफडणविसांचा यंदाचा अकरावा वार्षिक उत्सव काल रोजीं नव्या घटनेप्रमाणें साजरा करण्यांत आला. यंदाचे उत्सवांत नानांचे संबंधानें **प्रो. भानू** यांचें

ऐतिहासिक व्याख्यान

झालें. त्याचा सारांश येणें प्रमाणें. ते म्हणाले:–आजचा हा मोठा पुण्य दिवस आहे. ह्या दिवशीं नानांनीं आपला अवतार संपविला. शके १७२१ सिद्धार्थीनाम संवत्सरीं फाल्गुन वद्य ३ दिवशीं हा अपूर्व भानू अस्ताचलास गेला. आजची ही १११ वी श्राद्ध-तिथि आहे. ह्या १११ वर्षांत ह्या जगांत व विशेषतः हिंदुस्थानांत किती तरी क्रांतिकारक घडामोडी झाल्या आहेत! तथापि ज्या महाराष्ट्राविषयीं व मराठ्यांविषयीं नानांस अत्यंत

काळजी असे तो देश व ते लोक संकटांस मागें टाकून पुढें सरकत आहेत व आपल्या कर्तव्यास थोडे थोडे जागृत होत आहेत हें पाहून नानांच्या



प्रो. चिं. ग. भानू

आत्म्यास खरोखर आनंद होत असेल यांत शंका नाहीं. आपण जो उत्सवक्रम नेटानें चालविला आहे, त्यांतील प्रधान पुरुष नाना फडणवीस. यांच्या श्राद्ध-तिथीचें महत्त्व तें हेंच कीं, या महापुरुषाच्या स्मरणानें संकट, भीति नष्ट होते व संकटपरिहार करणारी बुद्धि स्फुरण पावते.

आतां आजपर्यंत ज्या राष्ट्राभिमानी पुरुषांस ही तिथि साजरी करण्याचा प्रसंग आला; त्यांच्यामध्यें व माझ्यामध्यें अत्यंत भिन्नता आहे. पण एक गोष्ट मला स्वाभाविकतः अनुकूल आहे. ती ही कीं, भानुकुलांतच माझा जन्म झाल्याकारणानें नानांचें श्राद्ध करण्यास मला जितका हिंदु-धर्मशास्त्राप्रमाणें अधिकार आहे तितका आजपर्यंत झालेल्या कोणत्याहि अध्यक्षांना नव्हता आणि असल्या नित्याच्या तर्पणाला राष्ट्रीय स्वरूप येई-

पर्यंत ऐतिहासिक पुरुष हे राष्ट्रीय पुरुष, राष्ट्रकर्ते असें समजून त्यांच्या नांवानें रोजच्या रोज आधिभौतिक व आध्यात्मिक तर्पण होऊं लागेपर्यंत हा तर्पणाचा अधिकार भानुकुलाशिवाय इतर कोणास मिळणारहि नाहीं.

फडणवीस कमिटीच्या व फडणवीस मंडळाच्या आयुर्दायांतील मोठी गोष्ट म्हणजे **यंदा अुत्सवाची 'घटना'** सिद्ध झाली ही होय. तथापि, माझ्या समजुतीनें आणखीं एक दोन गोष्टी व्हावयास हव्या आहेत. पहिली आणि अत्यंत उद्वेगजनक गोष्ट ही आहे कीं, नानांचा अंत होऊन १०० वर्षें होतात न होतात तोंच वेळासच्या भानुकुलाचें उच्चाटन होण्याची वेळ यावी! नानांच्या श्राद्धतिथीचा उत्सव प्रतिवर्षीं सुरू होण्याला व वेळास येथील भानूंच्या घराचा, घराण्याचा व मालमिळकतीचा उच्छेद होऊन, जेथें भानुकुलांतील एका पुरुषाच्या सन्मानार्थ उत्सव होतो तेथेंच त्यांच्या कुलाचें, त्यांच्या घराचें व दारवंश्याचें अस्तित्व लुप्त व्हावें हा चमत्कार खिन्नताजनक होय. गेल्या दहा वर्षांत रा. **हरिपंत महाजन** यांस अकस्मात दारिद्र्यावस्था येऊन त्यांस आपली व आपल्या जिनगानीची फारखत करावी लागली! पुनः, भानुकुलांतही आजला असा कोणी भाग्यशाली पुरुष जिवंत नाहीं कीं, ज्यावर श्रीलक्ष्मीदेवीची कृपा आहे आणि म्हणून जो लीलेनें पांच चार हजार रुपये देऊं करून वेळास येथील भानूंचें घर पुनः उभें करील! तेव्हां माझी स्मारककमिटीस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं एकवार भगीरथ प्रयत्न करून वरील रक्कम उभी करावी आणि भानूंची जिनगानी सोडून आणून तिचें जें काय वार्षिक उत्पन्न येईल तें देवालयाकडे व वार्षिक उत्सवाकडे लावावें. वरील रक्कम उभी करण्याला हल्लींच्या स्थितींत बराच दिनावधि लागेल; या करितां त्या **जिनगानीपैकींच कांहीं भाग विकत घेऊन त्या *जाग्यावरच उत्सव करण्याची वहिवाट घालावी.** याला फार तर

*शक १८६९ (इ. १९४८) पासून श्री नानांच्या घराच्या चौथऱ्यावर हा उत्सव होत आहे.

२०० । ३०० रुपये लागतील. रा. म्हात्रे यांसारख्या चित्रकारांकडून नानांचा एक *पुतळा तयार करून घ्यावा. नाना फडणीसासारख्याच्या कीर्तीस असल्या पुतळ्याची फारशी अपेक्षा नसते हें खरें. पण आपल्या महाराष्ट्रांत जे अद्वितीय पुरुष झाले, त्यांचें चित्र आपल्या डोळयांपुढें, मुलांच्या डोळ्यांपुढें स्पष्ट असावें एतदर्थ असल्या तऱ्हेचें वेळासेस जर एखादें काम होईल तर कांहीं दिवसांनीं वेळास हें एक राजकीय नाहीं तरी विभूतिक्षेत्र होऊन येथें वार्षिक उत्सव साजरा करण्याकरितां म्हणून बरीच ऐतिहासिक यात्रा जमूं लागेल.

घटना झाली व या घटनेंत कालमानानें सुधारणेला वाव ठेविली आहे या गोष्टी उत्तमोत्तम झाल्या. कोणतीही संस्था वाढूं लागली म्हणजे तिची वाढ कोणत्या धोरणानें व्हावी हें ठरविणारी व्यवस्था वाढत्या काळांत ठरली म्हणजे त्या संस्थेचें कल्याण होतें. नानांचें चरित्र आपण उत्तम तऱ्हेचें वाचलेंच असेल म्हणून या घटनेसंबंधानें हें सांगावयास नकोच आहे कीं सवाई माधवरावांची जोपासना चालली असतां नानांनीं जे नियम केले, जीं बंधारणें निर्माण केलीं, ज्या पद्धती श्रीमंतांच्या कल्याणासाठीं घातल्या त्या सर्व वेळप्रसंग पडेल त्या मानानें बनवून आणल्या होत्या. त्यांचा शेवट गोड झाला नाहीं. हा नानांचा किंवा त्यांच्या योजनेचा दोष नव्हे. अत्यंत तामसी बापाचा मुलगा—सवाई माधवराव—अति तामसी निघाला. गादीनशीन श्रीमंत म्हणून सर्वांनीं त्याचें फाजील कौतुक केलें. आई बाप जिवंत नसणारा मुलगा म्हणून त्याच्यावर अतिरिक्त दया करण्यांत आली व त्याचे जास्त लाड झाले. हा प्रकार निराळा झाला. तथापि नानांनीं जी योजना केली होती ती अति श्रेयस्कर होती. सांगण्याचें

* नाना फडणीस स्मा. क. चे उपाध्यक्ष श्री. ज. भा. ऊर्फ तात्यासाहेब भानु ह्यांनीं खाजगीसाठींच एक सुंदर पुतळा सिद्ध केला आहे. बेलबाग संस्थान, पुणें.

तात्पर्य हें कीं, प्रत्यक्ष नानांस घटनेचें महत्त्व समजत होतें, व घटनाविषयक वस्तूला ते अतिशय मानीत असत. नानांस आवडणाऱ्या घटनेचा प्रवेश त्यांच्या उत्सवांत झाला, ही आनंदाची सुवार्ता आहे. घटना व घटनेबर-हुकूम कार्यक्रम अमलांत आणण्याची दक्षता, या दोन गोष्टी नानांस अत्यंत प्रिय, म्हणून त्यांचा सामान्यतः सर्वत्र जयजयकार झाला. इंग्रजांचा तरी एवढा जयजयकार कां ? ह्या सर्व लोकांचे घटना व घटनेनुसार चालणें, ह्या दोहोंवर अतिरिक्त प्रेम आहे म्हणून !

हा उत्सव किंवा असल्या प्रकारचे उत्सव कां करावे, असा प्रश्न उत्पन्न होण्याचा फारसा संभव नाहीं. कोणी इतिहासद्वेष्टा असेल, कोणी जाति-द्वेष्टा असेल, किंवा एखाद्या माथेफिरू तरुणानें अनाचार–अत्याचार–केल्यामुळें एखाद्या प्रश्नास राजकीय महत्त्व आलें म्हणून उत्सवाविरुद्ध हाकाटी होत असेल, तेव्हां मात्र या प्रश्नाचें उत्तर देणें भाग पडतें. पण असले अत्याचार, या उत्सव कमिटीची ही घटना कायम आहे तोंपर्यंत होण्याचा संभव नाहीं. तरीपण मला एवढें सांगावेसें वाटतें कीं, नानांच्या उत्सवाला मी जें हें महत्त्व देतों, तें केवळ ऐतिहासिक दृष्टीनें देतों. ऐति-हासिक म्हणून या उत्सवाला राजकीय महत्त्व कदाचित् येईल, पण त्याचा प्रस्तुतच्या म्हणजे वर्तमानकालीन राजकारणाशीं फारसा संबंध असणार नाहीं. ऐतिहासिक दृष्टीनें नानांचें महत्त्व अतिशयच मोठें आहे. फाटलेल्या आभाळास त्यांनीं ठिगळें लावण्याचा प्रयत्न केला व तो बराच सिद्धीसही गेला. ऐतिहासिक दृष्टीनें आपण नानांच्या श्राद्धतिथीला 'पुण्यतिथि' असें नांव ठेवून जर उत्सव केला तर त्यांत वावगें तें काय आहे ? त्यांच्या चरि-त्राच्या अवलोकनानें जर आपल्या आचरणावर कांहीं संस्कृति व्हावयाजोगी असेल तर ती आपण कां करून घेऊं नये ? आजमितीला जर महाराष्ट्रीय विभूतींपैकीं कोणाच्या संबंधानें कागदपत्र विशेष उपलब्ध झाले असतील तर ते नानांच्या संबंधाचे; निदान नानांच्या देखरेखीखालीं ज्या अनेक

ऐतिहासिक भानगडी उत्पन्न झाल्या, त्यासंबंधाचे मात्र पुष्कळ उपलब्ध झाले आहेत व अत्यंत पुष्कळ उपलब्ध होण्यासारखे आहेत. हे कागद मिळविण्याविषयीं व मिळवून ते एकत्र संग्रहित करण्याविषयीं एकनिष्ठतेनें प्रयत्न झाला पाहिजे. रा. रा. राजवाडे यांनीं ऐतिहासिक पंथाचा रामदासीपणा पत्करून ज्याप्रमाणें कागदपत्र गोळा करण्याचें काम चालविलें आहे त्याच प्रमाणावर व त्याचप्रमाणें काम ऐकांतिक भक्तीनें करणारी सत्यनिष्ठ पिढी पुढें आली पाहिजे. आज ज्या कित्येक गोष्टी अवश्य पाहिजे आहेत त्यांतच मराठ्यांचा चांगला लिहिलेला इतिहास—निदान ऐतिहासिक साधनें तरी—अवश्य पाहिजे आहे, पण तो आहे कोठें? रा. राजवाड्यांसारखे, वे. शा. सं. खरे शास्त्रींबोवांसारखे अंग मोडून काम करणारे ऐतिहासिक स्वयंसेवक रात्रंदिवस झटल्याशिवाय हा ऐतिहासिक पाक तयार तरी कसा होईल? नानांसारख्या, शिवाजीमहाराजांसारख्या सत्पुरुषांच्या संगतींत आपला कांहीं काळ गेला, तर कागदपत्र गोळा करितांना व त्यांची व्यवस्था लावितांना सत्यनिष्ठा, इतिहासाची एकांतिक भक्ति, नीतिनिपुणता, बहुश्रुतता इत्यादि अनेक गुणांचा लाभ होऊन आपल्या अंगांत काम करण्याची–निष्काम कर्म करण्याची जी धमक येते, तो अपूर्व लाभही आपल्यास मिळेल.

नानांचा उत्सव वेळास मुक्कामींच कां व्हावा? याला वेळासकरांचें उत्तर असें आहे कीं नाना ज्या भानुकुलांत जन्मले, त्या कुलाचें वेळास हें मूळचें गांव आहे, म्हणून नानांचा उत्सव वेळासेस व्हावा. शिवाय हा उत्सव होण्याला वेळासेसच आरंभ झाला. आणखी एक कारण असें सांगितलें जातें कीं, जीं कांहीं कोंकणांतील ठिकाणें आमच्या हल्लींच्या राजकर्त्यांच्या हातांत प्रथम गेलीं, त्यांत वेळास हें होतें. हीं कारणें किती जोरदार आहेत यांची शहानिशा मी येथें करीत नाहीं. तथापि वेळासकरांनीं आरंभ केला आहे. पुण्याचा व सातारचा पूर्ण अभिमान असणाऱ्या

'लोकांच्या पुढाऱ्यांनीं' येथें येऊन हा उत्सव साजरा करण्यानें आपली संमति दाखविली आहे. स्मारक कमिटी याच कार्यासाठीं वर्गणी गोळा करीत आहे, इतक्या गोष्टी मनांत आणितां–भानुकुलाच्या उदयानें प्राप्त झालेलें व इंग्रज सरकारच्या प्राथमिक प्रेमाला स्थान झालेलें वेळासचें महत्त्व मनांत आणितां, चालला आहे हाच प्रकार ठीक आहे असें वाटतें. तथापि, आम्ही देशावरील माणसांनीं सरळ बोलावयाचें म्हणजे नानांचा जन्म साताऱ्यास झाला तर त्यांचा उत्सव साताऱ्यास व्हावा, त्यांनीं आपल्या राजकार्यधुरंधरत्वाचीं सूत्रें पुण्याहून हलविलीं व पुण्यासच त्यांनीं आपला अवतार समाप्त केला म्हणून पुणेंकरांनीं हा उत्सव पुण्यास करावा. हें युक्तीला ठीक दिसतें. पण नाना वेळासचेच नव्हेत, सातारा–पुण्याचेच नव्हेत, अवघ्या महाराष्ट्राचे, म्हणजे अवघ्या हिंदुस्थानचे कर्ते नाना होते, म्हणून त्यांचा उत्सव सर्व राष्ट्रभर, निदान महाराष्ट्रभर, निदान साताऱ्या –पुण्यास तरी व्हावा तो होत नाहीं. जें काम साताऱ्यानें करावयाचें, जें पुण्यानें करावयाचें, निदान जें काम मेणवलीनें करावयाचें, तें काम करण्याची जबाबदारी वेळासकरांनीं घेतली हें त्यांस मोठें भूषण आहे.

असो; आतां इतिहासदृष्टीनें नानांच्या एका लेखाचा–आत्मचरित्राचा– विचार करून मी आपलें भाषण संपवितों. हें " आत्मचरित्र " काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालें आहे. आमच्या मराठ्यांच्या वैभवाला आरंभ होऊन त्याचा अस्त रावबाजींच्या कारकीर्दींत होईपर्यंत, कोणत्याही प्रसिद्ध पुरुषानें आपलें आत्मवृत्त लिहून ठेविलें आहे असें ऐकिवांतच नाहीं. बाबर आदि मोगल बादशहांनीं आपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत हें खरें; पण आमच्या इकडे शिवाजीमहाराजांपासून तों महादजी शिद्यांपर्यंत किंवा परशरामभाऊ पटवर्धनांपर्यंत अनेक वीर, अनेक मुत्सद्दी झाले' अनेक राज्यकारस्थानी व अनेक साधुसंत झाले, त्यांत आत्मचरित्र असें कोणींहि लिहिलेलें नाहीं. नानांचें जें कौतुक वाटतें तें यासाठीं कीं, आपल्या

इकडे नसलेला स्पृहणीय गुण त्यांनीं अवलंबिला. हें आत्मचरित्र अनेक दृष्टींनीं चिंतनीय आहे. काव्यसंग्रहकार म्हणतात त्याप्रमाणें तें सत्यनिष्ठेनें ओतप्रोत भरलेलें आहे. या पुरुषानें आपले दोष आपल्या प्रखर विवेकदृष्टीपुढें आणून त्यांचें परीक्षण केलें आहे. हें चरित्र केव्हांतरी प्रसिद्ध होईल, अशी कल्पना सुद्धां करण्याचा संभव नसतांहि या चरित्रांत प्रत्येक ठिकाणीं परमेश्वरनिष्ठा, स्वामिनिष्ठा व मातृपितृभक्ति व्यक्त झाली आहे. भाऊसाहेब, नानासाहेब इत्यादि महापुरुषांविषयीं मार्मिक ऊद्गार नानांनीं नमूद करून ठेविले आहेत. सामान्य मनुष्याच्या अनुदार प्रकृतीचा उल्लेख केला व गोकुळवृंदावनांतील देखाव्याचें भक्तिपरिप्लुत वर्णन केलें, हा सर्व प्रकार केवळ कौतुकास्पद होय. सर्व मराठीपदपातशाहीचा, प्रायः सर्व हिंदुस्थानचा कारभार **पेरिक्लीजच्या** किंवा **ग्लॅडस्टनच्या** हौसेनें चालविणारा, रोजच्या रोज नवीं नवीं कारस्थानें उत्पन्न करून त्यांचा पाठलाग मोठ्या इंग्रजी उत्साहानें करणारा, इंग्लिश, फ्रेंच, निझाम, हैदर, इत्यादि, बाह्य शत्रूंस दाबांत ठेवून भोंसले, शिंदे, होळकर, इत्यादि अंतःशत्रूस मराठी पातशाहीच्या राजनिष्ठ वर्तुळामध्यें गुंतवून ठेवणारा जोरकस 'फडणवीस नाना' प्रपंचांतील दुःखांनीं कसा होरपळून गेला होता, आनुवंशिक व स्वयंभू व्यसनांनीं त्याचा कसा छळ केला, वैराग्याचें वारें त्याच्या अंतःकरणांत भरून कसें उरलें होतें, इत्यादि वृत्त वाचतांना वाचकांचें अंतःकरण गहिंवरून जातें व कौतुक उत्पन्न होतें.

या आत्मचरित्रांत दोन तीन गोष्टी आदरणीय दिसतात. पहिली गोष्ट नानांची ईश्वरनिष्ठा ही होय. नानांनीं परमेश्वराच्या परब्रह्मस्वरूपाचा जो उल्लेख केला आहे. त्यावरून तरी निदान असें दिसतें कीं, मांडुक्य व श्वेताश्वतर उपनिषदांचा त्यांस बराच परिचय झाला असावा. 'अपाणिपादो जवनोग्रहीता–स शृणोत्यकर्णः' या मंत्राचें तर शब्दशः भाषांतरच त्यांनीं अवतीर्ण केलें आहे. आत्मचरित्राच्या या भागावरून असें दिसतें कीं, नानांस

अभियुक्त ग्रंथांचा बराच चांगला परिचय झालेला असावा. त्या वेळीं प्रचलित असलेली संस्कृत शिक्षणाची पद्धति लक्षांत घेतली, सुमारें १७ व्या किंवा १८ व्या वर्षीं फडणिशीचा 'चार्ज' नानांच्या गळ्यांत पडला, हें ध्यानांत ठेविलें तर नानांच्या ह्या संस्कृत ज्ञानाबद्दल आपल्यास कौतुकच वाटलें पाहिजे.

नानांच्या अंगावर सरकारी कामाचा बोजा लवकर पडला असें दिसतें. त्यांचे वडील १७५५–५६ सालीं वारले. या वेळीं नानांचें वय १५ वर्षांचें होतें. दुसऱ्याच वर्षीं नानांस पेशव्यांचे स्वारीबरोबर जावें लागलें. यांच्या घराण्याकडे फडणिशीचा दरक होता हें सांगावयास नकोच आहे. नानांनीं यालाच 'सेवाधर्म' म्हटलें आहे. म्हणजे धर्मवृत्तीनें यांनीं सेवा केली असा अर्थ समजावयाचा. फडणवीस घराण्यावर पेशव्यांचें निःसीम प्रेम असे व पेशवे घराण्यांतील सर्व पुरुष नानांस 'पुत्रवत्' लेखीत; याचा अर्थच असा कीं, फडणवीस घराण्यांतील पुरुषांनीं पेशवाईची व मराठे बादशाहीची सेवा एकनिष्ठेनें केली होती व तेंच कुलपरंपरागत व्रत नानांनीं शेवटपर्यंत चालविलें; असो. भाऊसाहेबांच्या एककल्लीपणामुळें व गर्वामुळें 'पानिपत' बिघडलें असें नानांचें स्पष्ट मत असतांहि भाऊसाहेबांचे दोषांचा उल्लेख सत्यप्रीतीस्तव करणें जेथें जेथें भाग पडलें तेथें तेथें त्यांच्या श्रेष्ठ गुणांचाहि उल्लेख नानांनीं स्वामिनिष्ठाजन्य उदार बुद्धीनें केला आहे. उदाहरणार्थ, 'श्रीमंतांचे बुद्धीस–महान् बुद्धी !–परंतु...विपर्यास पडला.' हें वाक्य किंवा 'श्रीमंत अतिबुद्धिमान्, धैर्यवान्, शूर, कार्यकर्ते, गर्व मात्र विशिष्ट ...तरतूद सैन्याची वगैरे फार केली.' सारांश, श्रीमंतांनीं आतांचा उपदेश न ऐकतां परक्यावर विश्वास ठेवून 'आपली रीत युद्धाची सोडून यवनांची रीत धरिली' व 'गर्व मात्र विशिष्ट' हें नानांस स्पष्टपणानें सांगावयाचें होतें. पण हें सांगत असतां, हें दोष दाखवीत असतां श्रीमंतांच्या अनेक सद्‌गुणांचें त्यांस कधींही विस्मरण झालें नाहीं. सद्‌गुणांचा उल्लेख नानांनीं

कृतज्ञतापूर्वक केलेला आहे. नानांच्या आजोबांनीं[1] नानासाहेब पेशव्यांच्या आजोबांकरितां देह समर्पण केला तेथपासून जे एकनिष्ठतेचें बाणें चालत आले ते बाळाजी महादेव भानूंच्या घराण्यांत शेवटपर्यंत अविच्छिन्नच राहिले. राघोबादादांच्या अमदानींत पेशवाईविरुद्ध पेशव्यांचें घर फिरलें तथापि नानांसारखे घराचे कांहीं वासे फिरले नाहींत. याचीं कारणें दोन. (१) नानांची अखंड ईश्वरभक्ति, आणि (२) त्यांची अभंग स्वामिनिष्ठा. या दोन मनःप्रेरक सामर्थ्यांच्या सहाय्यानें नानांनीं आपली एकनिष्ठ स्वामिभक्ति व्यभिचरित होऊं दिली नाही. इतकेंच नव्हें तर आपल्या अस्तित्वानें पेशवाईस धक्का बसणार असें समजल्याबरोबर सवाई माधवरावापाशीं व रावबाजीपाशीं त्यांनीं कायमची रजाहि मागीतली. ही सात्विक स्वामिनिष्ठा होय. स्वामीच्या संरक्षणासाठीं, अथवा स्वामींच्या अमूर्त भावनेची जी मूर्त वस्तु आहे त्या भावनेच्या पवित्र संरक्षणासाठीं आपला कोणाताही स्वार्थत्याग वाटेल त्या मर्यादेपर्यंत करण्याला नेहमीं सज्ज असणें याचें नांव स्वामिनिष्ठा होय. अर्थातच नुसतें आर्जव, हो-स हो देणें, यजमानाला व्यसनांत पाडणें व व्यसनाच्या कामीं त्याला सहाय्य करणें व त्याला जे सदुपदेश करतील त्यांचा निःपात करणें ही खरी स्वामिनिष्ठा नव्हे. स्वामींची मर्जी प्रसन्न होवो किंवा रुष्ट असो, ज्या भावनेचें प्रकट स्वरूप स्वामी आहे, त्या भावनेच्या विरुद्ध स्वामीस मदत करावयाची नाहीं, पण त्या भावनेला अनुकूल असें स्वामींचें वर्तन असतांना त्या वर्तनाच्या सिद्ध्यर्थ व भावनेच्या संरक्षणासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करावयाचें ही खरी राजनिष्ठा होय.

आतां नानांच्या मातृपितृभक्तीचा उल्लेख करून हें प्रकरण आटपतों. 'मातापितरां'चें अनिष्ट चिंतिलें याबद्दल नानांस पश्चात्ताप होत होता असें दिसतें. 'मातेचे ठायीं भक्ति होत्साता चाललों,' 'मातोश्रीस विनन्ति करितों. एक ईश्वरीं लक्ष असावें' 'मातोश्रीचा फार शोध केला' इत्यादि उल्लेख

व रा. राजवाडे यांनीं खंड ६ मध्यें छापिलेलीं नानांचीं २ पत्रें 'सर्वस्व खर्च झालें तरी हरकत नाहीं, पण मातुःश्रीचा ठिकाण लावावा' या अर्थाचीं जीं पत्रें आहेत, त्यांवरून नानांची आईबापांवर निःसीम भक्ति होती, हें निर्विवाद आहे. मातुःश्रींचा आशीर्वाद घेतल्यावांचून शिवाजीनें कोणतेंही महत्कृत्य आरंभिलें नाहीं, पहिले **बाजीराव**, **नानासाहेब** व **माधवराव** आपआपल्या मातुःश्रीस अत्यंत मानीत असत. **अलेक्झांडरचें** आपल्या मातुःश्रीवरील प्रेम अवर्णनीय होतें. **नेपोलियन**, **जार्ज वाशिंग्टन**, इत्यादि थोर पुरुषांचें निःसीम मातृप्रेम तरुणांनीं पाहून घ्यावें. आईबापांची जोडी ही ईश्वराची पहिली प्रकट मूर्ति आहे. आपली कृतज्ञता प्रकट करण्याचें तें पहिलें स्थळ आहे. वृद्धपणीं त्यांची सेवा करणें हा निष्काम कर्माचा उत्कृष्ट धडा आहे. ह्या गोष्टी हल्लींच्या फाजील चौकस किंवा अर्धवट चौकस काळांत आपण विसरतों आहोंत. आईबापांवरील प्रेम वृद्धिंगत झालें पाहिजे, पण त्याचबरोबर हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आईबापांनींहि पुत्रभक्तीला योग्य असें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे."

[केसरी, २९-३-१९१०

प्रारंभीं लिहिल्याप्रमाणें इ. १९११ ते १९३८ ह्या अठ्ठावीस वर्षांत केवळ गांवापुरताच व तोहि अगदीं जुजबी असा हा उत्सव होत राहिला. नंतर ४० वा उत्सव पुढील प्रमाणें झाला.

नाना फडणवीस यांची (४० वी) पुण्यतिथि

पूर्वीं १९०० सालापासून सतत १५-१६ वर्षें श्री. के. **बी. जोशी** व इतर पुढारी यांच्या नेतृत्वाखालीं चालत असलेला 'नाना फडणविसांचा उत्सव' या वर्षीं वेळास येथें फा. व. ३ बुधवार रोजीं साजरा करण्यांत

आला. **नानांनीं** व **श्रीमंत मोरोबादादा फडणविसांनी** बांधलेल्या श्रीकालभैरव व रामेश्वर या देवांवर अभिषेक करण्यांत आला. सायंकाळीं **तीच तिथि शिवजन्माची असल्यामुळें** शाळेंत श्री. **गोरे मास्तर** व रा. ***श्री. के. जोशी** यांचीं 'शिवचरित्र व नानांचें इतिहासांत महत्त्व' यांवर भाषणें झालीं.

रात्रीं नानांच्या चरित्रावर देवालयाच्या मंडपांत ह. भ. प. **भार्गवबुवा भागवत** यांचें कीर्तन झालें.

[केसरी, १७–३–१९३९

वेळास येथें नाना फडणवीस (४१ वी) पुण्यतिथि

वेळास (जि. रत्नागिरी) येथें गतवर्षांप्रमाणें चालू सालींही फा. व. ३ मंगळवार रोजीं नाना फडणवीस पुण्यतिथि साजरी झाली. गतवर्षापासून तेथील कांहीं उत्साही मंडळी हा उत्सव साजरा करीत असतात. सकाळीं देवावर अभिषेक झाला. दोन प्रहरीं येथील प्राथमिक शाळेंत **नानांची पुण्यतिथि** व **श्री शिवजयंतीनिमित्त** समारंभ झाला. नानांच्या पुण्यतिथीनिमित्त **शाळेला बोर्डाकडून सुट्टी** देण्यांत आली होती. निरनिराळ्या ग्रामस्थांचीं नानांच्या व शिवछत्रपतींच्या कार्यावर प्रकाश पाडणारीं व बोधपर अशीं व्याख्यानें झालीं. रात्रौ ह. भ. प. **अण्णाबुवा करमरकर** यांचें सुश्राव्य कीर्तन झालें.

[केसरी २–४–१९४०

---

*श्रीधर केशव जोशी हे **श्री. के. बी. जोशी,** उत्सव सुरू कर्ते, यांचे ज्येष्ठ चिरंजोव.

जाहीर खुलासा व विनंति

ले.—के. बी. जोशी, दादर

श्रीमंत नाना फडणविसांच्या पुण्यतिथीचा उत्सव सन १९०० सालापासून आजतागायत कमीअधिक प्रमाणांत वेळास येथें नानांनींच बांधलेल्या श्रीकालभैरवाचे देवालयाच्या सभामंडपांत होत असे. भानूंच्या वाड्याचा चौथरा उत्सवाच्या चालकांना उपलब्ध नसल्यामुळें सदरहू पुण्यतिथीचा उत्सव त्यांच्याच देवालयांत करणें अपरिहार्यच होतें.



श्री. के. बी. जोशी

आतां भानूंच्या ठिकाणाच्या खरेदीदारांनीं त्या ठिकाणांतील चौथरा व पुढील मोकळी जागा यांचा सार्वजनिक ट्रस्ट करून तो रजिस्टर केला व तीन ट्रस्टींच्या स्वाधीन केला हें उचित असेंच झालें यांत शंकाच नाहीं.

चौथरा व आंगण यांचा उपयोग श्रीमंत नाना फडणवीस यांच्या स्मारकासाठीं व वार्षिक उत्सवासाठींच करावयाचा आहे; अशी खरेदीदारांची अट आहे व ट्रस्टींनीं ती मान्य केली आहे.

अशा परिस्थितींत नानांचा चालू वार्षिक उत्सव नाना फडणविसांच्याच ठिकाणावर होणें ही गोष्ट औचित्याला धरूनच आहे असें माझें प्रामाणिक मत आहे. माझ्या चरित्रविषयक पुस्तकांत जी उत्सवाची व स्मारकाची रूपरेषा दिली आहे त्यांत श्रीकालभैरवाचे देवालयांत ती योजना घडावी असें आहे. पण पुस्तक–प्रसिद्धीच्या वेळीं हें ठिकाण हातीं आलें नव्हतें, किंवा लवकरच हातीं येण्याचीहि कल्पना नव्हती. यास्तव माझी स्मारकाची योजना श्रीकाळभैरवाचे देवालयांतच करण्याची स्थिर झाली व म्हणून तसा त्या पुस्तकांत उल्लेख केला गेला आहे. पण नाना फडणविसांचें ठिकाण सार्वजनिक रीत्या हातीं आल्यावर सर्व स्मारकयोजना याच ठिकाणीं होणें इष्ट आहे व क्रमप्राप्तच आहे.

म्हणून सर्व जनतेस माझी विनंति अशी आहे कीं, वेळास येथें हीं दोन जागेंत दिसणारीं निरनिराळीं नानांचीं स्मारकें नसून तीं यापुढें एकाच, नाना फडणविसांच्या चौथऱ्यावरच, होणार आहेत व या कामीं माझी नवीन ट्रस्टींस पूर्ण सहानुभूति आहे. व त्यांस शक्य तें साहाय्य करण्याचें मीं योजलें आहे. स्मारक चळवळीसाठीं एक लहानशी ‘ नाना फडणवीस स्मारक व उत्सव समिति ’ माझ्याच अनुमतीनें स्थापन झाली असून त्या समितीशीं पूर्णपणें मी सहकारिता केली आहे. तरी महाराष्ट्रीय जनतेनें या आमच्या ‘नाना फडणवीस स्मारक-निधीस’ सढळ हातानें मदत करावी अशी कळकळीची विनंति आहे.

[केसरी ६–११–१९४२

नाना फडणवीस उत्सव

वेळास येथें फाल्गुन वद्य ३ बुधवार ता. २४ मार्च रोजीं नाना फडणवीस-स्मृतिदिनोत्सव श्रीयुत ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन नाना फडणविसांच्या कामगिरीविषयीं इतिहासज्ञांचीं भाषणें होतील.

[केसरी, शुक्रवार १२–३–१९४३

नाना फडणविसांचें स्मारक व उत्सव

पेशवाईच्या काळांतले सुप्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस यांचा उत्सव वेळास गांवीं पूर्वीं अनेक वर्षें होत होता. अलीकडच्या धामधुमीच्या काळांत ही प्रथा बंद पडली होती, ती पुनश्च यंदांपासून चालू करण्याचें तेथील पुढारी मंडळींनी ठरविलें आहे. विशेष प्रशंसनीय गोष्ट ही कीं, तेथील प्रमुख मंडळींनीं नाना फडणविसांच्या **वास्तूची जागा मिळवून तिचा ट्रस्ट करून** त्या जागेवर योग्य स्मारक करण्याचें ठरविलें आहे. या स्मारकाची योजना येत्या उत्सवाच्या वेळीं ठरविण्यांत येईल. तरी या कार्याचें अगत्य पटलेल्या मंडळींनीं फाल्गुन कृ. ३ ला वेळास येथें होणाऱ्या उत्सवास मदत करून व समक्ष उपस्थित राहून स्मारकाच्या योजनेला मूर्त स्वरूप देण्याचा विचार ठरवावा व या कार्याला चांगली चालना द्यावी.

[केसरी, १२–३–१९४३ पान ६.

वेळासचा नाना फडणवीस ४४ वा स्मृतिदिन

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें वेळास येथें नाना फडणवीस स्मृतिदिन फाल्गुन कृ. ३ बुधवार ता. २४ मार्च रोजीं **नानांच्या वास्तूच्या ठिकाणावरच** अत्यंत थाटानें साजरा करण्यांत आला. पुणें मुंबईहून बरीच मंडळी या उत्सवाकरितां वेळासला आली होती. याशिवाय आसपासच्या बाणकोट,



श्री. तात्यासाहेब करंदीकर

केळशी, वेशस्वी, आंजर्ले, दापोली इत्यादि गांवांतील मंडळीहि उत्सवाच्या कार्यक्रमास उपस्थित होती. उत्सव मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. **के. बी. जोशी**, उपाध्यक्ष श्री. **ज. बा. भानू** आणि नानांच्या वास्तूचे ट्रस्टी व कार्यवाह श्रीयुत **कोकणे**, श्री. **सोमण** व श्री. **करमरकर** यांनीं उत्सवाची तयारी सुव्यवस्थित केली होती.

उत्सवाचे अध्यक्ष श्री. ज. स. करंदीकर हे श्रीमंत **तात्यासाहेब भानू**, व श्री. **शंकरराव जोशी** प्रभृति मंडळींसह श्रीयुत करमरकर यांच्या स्टीम लॉंचनें बाणकोटला मंगळवारीं संध्याकाळीं पोहोंचले. धक्क्यावर त्यांचें स्वागत झाल्या-वर बाणकोट गांवांतील मुसलमान मंडळींतर्फे श्री. परकर यांच्याकडून पाहुणे मंडळींना पानसुपारी झाली. बाणकोट येथील हिंदु-मुसलमानांचें हें ऐक्य अभिनंदनीय व अनुकरणीय आहे; असो. वेळास येथेंहि ठिकठिकाणीं पाहुणेमंडळींचा सत्कार करण्यांत आला.

वेळास येथें बुधवारीं सकाळीं नानांच्या तसबिरीची मिरवणूक निघाली. तिसरे प्रहरीं स्मारक मंडळाच्या कार्याची रूपरेषा आंखण्यांत आली. सायंकाळीं ६ ते ८ पर्यंत शाहीर **खाडीलकर** यांच्या पोवाड्यांचा कार्यक्रम झाला. त्यांत त्यांनीं नाना फडणविसांवरचा पोवाडा अल्पावधींत स्वतः तयार करून म्हटला.

रात्रीं ९ वाजतां उत्सवाच्या मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रथम श्री. **के. बी. जोशी** यांचें स्वागतपर भाषण झालें. श्री. ल. **वा. कोकणे** यांनीं उत्सवमंडळ व स्मारकमंडळ यांचा वृत्तांत सांगितला. त्यानंतर श्री. **शंकरराव जोशी** यांचें ‘ नाना फडणविसांच्या चरित्राकडे पाहण्याची दृष्टि ’ या विषयावर मुख्य व्याख्यान झालें.

श्री. शंकरराव जोशी ह्यांचें भाषणाचा सारांश असा—

महाराष्ट्रराज्याच्या किंवा साम्राज्याच्या सूत्रचालकांत प्रसिद्ध असे **तीन नाना** आढळतात. राजकाज करणाऱ्या **पुरंदरे, क्षिरे (तुळसीबागकर), पटवर्धन,** इ. इ. घराण्यांत ‘नाना’ हें टोपण नांव असलेल्या व्यक्ति आहेत आणि त्या गुणी, थोर व प्रसिद्धहि आहेत. पण ह्या तीन नानांची गोष्ट सविशेष आहे. **पहिले नाना** म्हणजे बाळाजी विश्वनाथ, श्रीवर्धनचे देशमुख भट व

छ. शाहूचे मुख्य पंतप्रधान; **दुसरे नाना** म्हणजे बाळाजी बाजीराव; हे त्याच घराण्यांतील तिसरे पंतप्रधान आणि **तिसरे नाना** म्हणजे हे **नाना फडणवीस** भानू. ह्या तिसऱ्या नानांचा आयुर्दाय, तिसरी सत्ता, जी, हें महाराष्ट्रसाम्राज्य



इतिहास संशोधक श्री. शंकरराव जोशी

आपल्या तंत्रानें चालावें असें म्हणून ह्या ना त्या बाजूनें आक्रमण करतां येतें कीं काय हें पाहात होती, त्या सत्तेला थोंपविण्यांत सर्व व्यतीत झाली आहे व ह्या मुख्य दृष्टीनें नानांच्या कारभाराकडे पाहिलें पाहिजे. ह्या भानूंचा कारभार जवळ जवळ पहिल्या दोन्हीतिन्हीं पेशव्यांच्या इतका झालेला आहे. नानांचा एकंदर आयुर्दाय १७४२ ते इ. १८०० असा ५९ वर्षांचा आहे आणि

नानांना वयाच्या १४ व्या वर्षीं प्रथम फडणिसी मिळाली. म्हणजे १७५६ ते १८०० पर्यंत ४४, ४५ वर्षें नाना कारभार करीत आहेत. ह्यांतहि १७६१ पासून नानांचा पत्रव्यवहार उपलब्ध असून १७७४ पासून तर ते प्रमुखांत गणले गेले व मुख्य सूत्रधारच झाले. म्हणजे अखिल हिंदुस्थानभर महाराष्ट्रराज्याचा व्याप पसरलेला, इतकीं वर्षें तो व्याप चाललेला आणि अशांतच अनंत कुलंगडी व अत्यंत गुंतागुंत त्यांत निर्माण झालेली; ह्यामुळें कोणत्याहि कारभारांत जशीं फुटकळ प्रकरणें पडतात तशीं, एवढ्या दीर्घ स्थलकालव्याप्त कारभारांत तर बरींच लहानमोठीं व गौणमुख्य अशीं कांहीं प्रकरणें उद्भुत होणें अगदीं सहज आहे. परंतु त्या त्या प्रकरणापुरता तो तो मुद्दा स्वीकृत करून त्या सर्व कारभाराचा वृत्तान्त ध्यानीं घेणें हा एक मार्ग असला तरी अशा दृष्टीनें इतिहासाचें मुख्य सूत्र ज तें हातीं लागण्यास आपणच आपल्यास थोडासा व्यत्यय उत्पन्न करतों असेंहि होतें. प्रस्तुतच्याच विषयांतील उदाहरणानें हें कसें घडतें व तें कां आतां वर्ज्य केलें पाहिजे हें पाहण्याजोगें आहे. ह्यांतच प्रस्तुत विषयाचेंहि विवेचन होणार आहे. नाना आणि महादजी, नाना आणि बापू, नाना आणि मोरोबादादा, नाना आणि परशरामभाऊ, नाना आणि दुसरा बाजीराव, नाना आणि सिद्दी, नाना आणि प्रतिनिधी, नाना आणि टिपू, नाना आणि घाशीराम, इत्यादि प्रकरणांचा तपशील मांडतांना, नाना ज्या तिसऱ्या परकीय सत्तेशीं झगडत होते त्या त्यांच्या झगडण्याचें सूत्र लक्षांत न राहिल्यामुळें, कित्येक ठिकाणीं नसत्या हर्षामर्षाचें लिहिणें होऊन गेलें. व त्यांत कांहीं प्रमाद राहिले. कसें तें पहा, महादजी शिंदे ह्यांचें बोलणें एका पत्रांत आलें आहे कीं, 'राजकारणें लावावीं लागतील, अनेक हुन्नरें करणें पडतील, येतों म्हणावें लागेल, वर्तमान लोपणार नाहीं. तेव्हां बापू व नाना विषम मानून कल्पना करतील. दुरारोप ठेवतील तर विकल्प सहसा न आणावा.' हा उतारा आदल्या पानावर उध्दृत करून पुढल्याच पानावर निष्कर्ष

म्हणून सांगतांना ‘बापू’ हा शब्द गळला आणि ‘नानास वैषम्य वाटेल’ असें एकस्या नानांचेंच नांव सांगितलें. म्हणजे नारायणरावाचा खून झाल्या-नंतर बापू व नाना इत्यादि मंडळींनीं गंगाबाईच्या नांवें कारभार चाल-वावयाचा, पुतण्याच्या खुनाशीं राघोबाचा संबंध आहे तेव्हां असला मनुष्य कारभारांत नको, पेशवा म्हणून तर नकोच नको, राघोबानें स्वस्थ व खेळ न करतां रहावें असें ठरविलें. पण राघोबानें पळ काढला व शेवटीं तो इंग्रजाकडे गेला. ह्या प्रसंगाचें महादजीचें वरील बोलणें आहे. म्हणजे महादजी म्हणतात; ‘अशा वेळीं, मला एकदां होय, तर लगेच नाहीं असें म्हणावें लागेल, राजकारणें लढवावीं लागतील तर त्यावरून बापूंनीं व नानांनीं माझ्या वागण्याविषयीं विकल्प मनांत आणूं नये. व वैषम्यहि वाटूं देऊं नये.’ पण जर वैषम्य वाटावयाचें तर नानास मात्र वाटेल असा निष्कर्ष सांगितला. म्हणजे महादजीचें मत ह्या वेळीं फक्त नानाविषयीं मात्र शंका व्यक्त करीत आहे; नाना फडणविसांना मात्र विषाद वाटेल, एवढेंच अली-कडील इतिहास-लेखकांनीं सांगितलें. वस्तुतः, ह्या बारभाई प्रकरणांत सखारामपंत बापूंनीच पुढाकार घेतला होता. पुरंदरे, विंचुरकर, चंद्रचूड, नाना फडणवीस, हरिपंत फडके, पेठे, रास्ते, होळकर, शिंदे, इत्यादि सर्व प्रमुख सरदार-शिलेदार मंडळी ह्यांत समाविष्ट होती. ह्या वेळीं नाना फडणवीस बापूंच्याच पुढारीपणाखालीं पण प्रमुख म्हणून होते व म्हणून महादजींनीं बापूंच्या बरोबर नानांचा उल्लेख केला. तेव्हां महादजींच्या बोलण्याचा भावगर्भ विशेषतः बापूंना उद्देशून निदान बापूसह नाना असा असतांना, फक्त नानांचेंच नांव घेऊन ते तेवढे वैषम्य मानतील, असा सांगितल्यामुळें नाना व महादजी ह्यांत ह्याहि वेळीं तेढ होती असें दर्शविलें गेलें. अशा प्रकारें ह्या नानांविषयींच्या लिखाणांत गाळ-घाल-बदल होऊन, मुख्य सूत्र वेळोवेळीं लक्षांत न राहिल्यानें, मांडणी विकृत झाली व उगाच आणि आधीच्याच दोषैकदृष्टीमुळें एकंदर इतिहासकथनास

भलता रंग चढला. दुसऱ्या एका इतिहासाभ्यासकांनीं, नानांना अहल्याबाईनें जेथें चांगलें म्हटलें तेथील नाना हा शब्द गाळला व तेथें दुसराच शब्द घातला. ह्या इतिहासज्ञांचीं नांवें मुद्दाम मीं येथें सांगत नाहीं; अन्यत्र स्पष्टता केली आहे; पण अशा प्रकारामुळें नानांविषयीं बोलावयाचें म्हणजे इतरांना नांवें ठेवूनच कांहीं सांगावयाचें; असले केवळ व्यक्तिविशिष्ट भलेबुरे शेरे द्यावयाचे असें होऊन बसलें. मघाशीं सांगितलेल्या संकुचित प्रकरणाभोंवतींच व मनाची व्यक्तिविषयक दोषैकदृष्टि केंद्रित केल्याचा हा परिणाम आहे. नानाप्रमुख सर्व मंडळींचें लक्ष कमी अधिक प्रमाणांत, आक्रमण करूं पाहणाऱ्या इंग्रजाविरुद्ध होतें. महादजी, दौलतराव, बापू, बाजीराव, मोरोबादादा, इत्यादि मंडळी व स्वतः नाना ह्या परस्परांत मुख्य तंटा होता असें वस्तुतः नाहीं. मग ह्या मंडळींत केव्हां केव्हां विरोध दिसून येतो, तो कां ? तर मागें ज्या प्रमाणें हैद्राबादकर निजाम हा महाराष्ट्र राज्यांतील मंडळींत, स्वतः छत्रपतीसह निरनिराळ्या आमिषानें, भेद करून ती सत्ता दुबळी पाडून तेथें आपलें वर्चस्व स्थापण्याचा यत्न करी व त्यामुळें जशीं एकमेकांतील वितुष्टें दृग्गोचर होत; त्याप्रमाणें ह्या वेळीं इंग्रजांच्या कारवाया चालत व त्यांस भुलून कोणी केव्हां प्रकृतिभेदानुसार वश होई आणि अशा वेळीं एकमेकांतील तंटा प्रकट होई; अशा प्रकारांत इंग्रजांशीं आपला लढा आहे हें मुख्य धोरण पाळणारा व त्या धोरणामुळें ह्या मंडळींशीं केव्हां रागानें केव्हां लोभानें वागणारा लागत असतो व हें काम करणारांत नानांचा कारभार चाले. म्हणून नानांचें ह्या मंडळींशीं, दुसऱ्या कोणच्या स्वार्थी कारणानें नव्हे, वितुष्ट होई. तर इंग्रज हा दिल्लीच्या पातशाहीकडे, निजामाकडे, गायकवाडांकडे, नागपूरकर भोसल्यांकडे आपलें स्वतंत्र राजकारस्थान सुरू करी आणि आपला पाय रोवूं पाही. हिंगण्यानीं पत्रांत लिहिलें आहे कीं, ' दिल्लीच्या दौलतीस दोन रोग, एक अबदाली व एक इंग्रज. अबदालीस त्या प्रांतीं पायबंद भारी म्हणून इकडे येणें नाहीं. पण

इंग्रज समीप; दिल्लींत इंग्रजाचा पाय शिरला कीं हिंदुस्थान हातचें गेलें.' हें पत्र नानांनाच लिहिलें आहे. बाळोबा तात्या पागनीस ह्यांनींहि भरदरबारांत सांगतलें कीं 'इंग्रज प्रबळ; त्याचा रेच मोडला पाहिजे.' स्वतः पातशहानें हेंच म्हटलें आहे 'स्वामीचे काबूंत रहावें.' पेशव्यांच्या तंत्रानें व व्यवस्थेंत दिल्लीकर पातशहा राहूं इच्छितो. 'इंग्रजाचा कदम पातशाहींतून निघो.' इत्यादि इ. असे निर्देश अनेक आढळतील. तात्पर्य, चोहोंकडून इंग्रजांच्या कारवाईनें अर्थात् आमच्या परधार्जिणेपणामुळें मराठा साम्राज्यावर एकच काहूर वारंवार उठत होतें. तरीपण 'हें शिवशाही राज्य आहे' ह्या परशरामभाऊंच्या उद्गाराप्रमाणें त्याला सांभाळण्याचें काम नाना, हरिपंत फडके, महादजी शिंदे, सखारामबापू इत्यादि मंडळी आपापल्या मनोधर्माप्रमाणें व शक्त्यनुसार करीत होती. अशांत केव्हां मतभेद होई, नाहीं असें नाहीं; पण पुनः बंधुभाव उत्पन्न होऊन मुख्य कार्याकरतां म्ह. इंग्रज गौरकायाशीं लढा देण्याकरतां सलोखा होई. असे वेगवेगळे प्रसंग नानांच्या ह्या कारभारांत झालेले उल्लेखनीय आहेत. त्यांतीलच एक प्रमुख प्रसंग कीं ज्याकरतां गोविंदराव काळे यांनीं नानांस पत्र लिहिलें आहे. हें पत्र अनेक भावनांना चालना देणारें आहे. (हें इतिहाससंग्रहांतील पत्र स्वतंत्र परिशिष्टांत पुढें दिलें आहे. तें श्री. शंकररावांनीं वाचून व त्याचा अर्थ उलगडून सांगितला. शंकराव पुढें म्हणाले,) नानांच्या चरित्रांतील सर्व प्रसंग एका भाषणांत सांगणें सर्वथा अशक्य आहे.

एकेक प्रसंगच एकेका उत्सवाचा विषय केला पाहिजे. प्रस्तुत फक्त त्या चरित्राकडे पाहण्याचा, मला वाटतो तो, मुख्य दृष्टिकोन सांगितला. अलीकडे इंग्लिश रेकार्डस् प्रसिद्ध झाल्यापासून तर नानांच्या चरित्रांतील ह्या मुख्य धोरणासंबंधानें फारच उद्बोधक माहिती आली आहे. अनेक इंग्रजी लेखकांनीं आपापल्या अगदीं तत्कालीन पत्रांतून हा नानाच आपल्या फार व सर्वत्र आड येत असल्याचें दर्शित केलें आहे. इ. १७७२

नंतरच्या इतिहासाचीं साधनेंहि पुष्कळ आहेत व गीतेवरील वेगवेगळ्या भाष्याबरोबर व भाष्यापेक्षां मूळ गीतेचाच अभ्यास श्रेष्ठ; त्याप्रमाणें अलीकडील इतिहासापेक्षां मूळ साधनीभूत पत्रेंच आपण वाचनांतआणणें अधिक इष्ट म्हणून मीं वरील पत्र वाचलें. नानांच्या व इतरांच्या पत्रांतून नानांची थोरवी सहज दृष्टीस पडल. नानांच्या निवडक उक्ति, नानांचे–चित्रें, शस्त्रें, नकाशे, नव्या कथा व गोष्टी निवडून लिहून काढविणें इत्यादि संबंधीचे प्रयत्नहि लक्षांत घेणें अवश्य आहे. नानांचें दूरांदेशी धोरण फार. अलिबहादरला महादजीचे सहायास सरकारी फौज देऊन पाठविला. ह्या बद्दल त्या वेळच्या पत्रांत आहे ‘ ब्राह्मण सरदाराची छाप हिंदुस्थानीयांवर पडावयाची नाहीं तितकी सलाबत अलिबहादरच्या नेमणुकीनें जहाली आहे. ’ महादजी म्हणतो ‘ नानाचा भाऊपणाच कामास आला. उदंड झाले तरी थोर. ’ इतिहासांतील एखाद्या व्यक्तीस कोणत्या मुद्यावर व कोणत्या साधनाधारें आपण चांगलें वा वाईट म्हणतों ह्यावरूनहि आपण त्या कालापेक्षां किती पुढें आलों व किती राष्ट्रीय, व्यापक आणि प्रगत दृष्टीचे झालों हें ठरणारें आहे. दोष लपवावेत हें म्हणणें नाहीं. उलट ते लक्षांत आणून दूर करावे, हाच तर इतिहासाभ्याचा उपयोग. पण कोणाचे दोष कोणच्या साधनाधारें आणि कसे सांगतो ह्यावर लेखकाची विकृत वा अविकृत दृष्टि आहे, हें कळून येतें. नानांच्या कारभारांत अनेक प्रकरणें उद्भवलीं. पण नानांची दृष्टि तिसऱ्या एका परकीय सत्तेशीं झगडण्यांतच पुरी खिळून गेलेली होती व हें इंग्रजी मराठी पत्रांवरून नानांच्या चरित्राचें मुख्य सूत्र आहे व त्या दृष्टीनेंच त्यांच्या व इतरांच्या हालचालीकडे पाहिलें पाहिजे.

शंकररावांनीं एक सूचना ह्या दिवसाच्या स्मरणानें केली कीं हा दिवस श्री शिवरायाच्या जन्माचा आहे. व ज्या शिवराज्याच्या रक्षणार्थ नाना फडणविसांनीं आपला देह खर्चीं घातला त्यांचेंहि स्मरण यथार्थपणें आज आपणा सर्वांना होणें उचित आहे. शिवाजीच्या उत्सवांत सर्वांचे उत्सव

येतात. ह्याचा अर्थ सर्वांच्या स्मृतिबरोबर व प्रतिमांबरोबर शिवरायाचें चिंतन व दर्शन हें व्हावें. म्हणजे ह्यापुढें ह्या उत्सवांत हीहि तसबीर गौरवपूर्वक अगत्य मांडीत जावी. ह्याप्रमाणें भाषण झालें.

नंतर अध्यक्ष श्री. **करंदीकर** यांनी समारोप करतांना १७६१ ते १८०० पर्यंतच्या ४० वर्षांत मराठेशाहीवर किती विविध घोर संकटें आलीं होतीं, पण त्या सर्व संकटांतून नानांनीं आपल्या बुद्धिसत्तेच्या आणि राजनिष्ठेच्या जोरावर मराठेशाही कशी राखली याचें वर्णन केलें.

रात्रीं शाहीर खाडीलकर यांचें ऐतिहासिक पोवाड्यांनीं युक्त असें कीर्तन झालें व प्रसाद वाटण्यांत येऊन उत्सवाची समाप्ति झाली.

स्मारक मंडळाची तात्पुरती योजना व्याख्यानाच्या वेळीं वाचून दाखविण्यांत आली. त्या मंडळांत ज्यांचीं नांवें समाविष्ट केलीं आहेत त्यांच्याकडून संमति मिळाल्यावर स्मारक मंडळ रीतसर जाहीर करण्यांत येऊन पुढील कार्यास सुरुवात होईल.

[केसरी, ३०–३–१९४३.

नाना फडणविसांची पुण्यतिथि

वेळास (ता. दापोली, जि. रत्नागिरी) येथें रविवार दि. १२ ला प्रा. दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखालीं नाना फडणविसांचा पुण्यतिथि उत्सव होणार असून त्यानिमित्त सकाळीं ८ वाजतां नानांच्या छायाचित्राची मिरवणूक; दोनप्रहरीं २ वाजतां विचारविनिमय; नंतर श्री. के. बी. जोशी यांचें स्वागतपर भाषण, प्रा. पोतदार यांचें भाषण, श्री. य. ना. सोमण यांचें अहवालवाचन वगैरे; सायंकाळीं शाहीर खाडीलकर यांचे पोवाडे इत्यादि कार्यक्रम होतील.

[केसरी, ७–३–१९४४ **पान ४**.


नाना फडणवीस उत्सव, ४५ वा, वेळास

वेळास, जि. रत्नागिरी येथें दि. १२ ला नाना फडणवीस यांच्या पुण्यतिथीचा उत्सव थाटानें व उत्साहानें पार पडला. उत्सवाचे नियोजित अध्यक्ष इतिहाससंशोधक **प्रा. दत्तोपंत पोतदार** हे पुणें येथून शनिवारीं सकाळीं निघून वेळासला रात्रीं पोंचले. सकाळीं नानांच्या छायाचित्राची मिरवणूक निघाली व ती श्रीकालभैरवाच्या देवालयांत जाऊन, नंतर



प्रा. दत्तो वामन पोतदार

देवालयाच्या सभामंडपांत आली. तेथें पानसुपारीचा समारंभ होऊन मिरवणूक उत्सवमंडपांत आली. तेथें नानांच्या तसबिरीची स्थापना



याखेरीज ब्राह्मण जन व राठी माणसें कितेक आली कितेक नाही रामाजीपंत भाऊ व लक्षुमण बलाल व हरी शिवराम नारायणराव बापुजी गंगाधर नाईक ओंकार भवानी शंकर बाबजी व बाजी हरी पितापुत्र व बगाजीपंत पारसनीस मल्हारपंत मुजमदार व कृष्णाजी अनंत बिनी (वाले?) याचे पुत्र व जनकोजी शिंदे सोनजी भापकर तुकोजी शिंदे मानाजी पायगुडे येसवंतराव पवार अंताजी माणकेश्वर इतकियांचे ठिकाण नाही पनास हजार माणूस मारले गेले घोडी उटे नगारे निशाणें दप्तर कुल दौलत बुडाली पनास साठ हजार फौजे पौ पाच सा हजार घोडी निभावली बाकी घोडी गेली पायउतारा लोक लंगोट्या लावून आले भक्षावयास नाही पधरा पधरा उपवास ते हकीकत लडाईची वगैरे लिहितां पुरवत नाही कदाचित भेट जाली तर कलेल स्त्रीची गांठ सत्वरच पडली वीरशिगराव बारावकर याणी सभाळून आणिली फार केली श्रीमत पार्वतीबाई यांसही खिजमतगाराने साभाळून आणिली मोठा वाखा जाहाला याप्रो हे वर्तमान आहे श्रीमंत भाऊंचे वर्तमान तर मी सुरजमल जाटा(कडील)ल कुंभेरीस पंचवीस दिवस होतो तेथे नजीबखान सुज्यातदौला यांचे वकील तेथे आले होते त्यांची माझी भेटी जाली स्नेहसंपादन केले तदनंतर त्यानी सर्व (यु)ध्याचे प्रकार सांगितले त्यांत भाऊचें वर्तमान खुणामुद्रा (द्या ?) नशी विपरीत सांगितले वरकड वकिलांची कोठून पत्रें येतात त्यांत लिहितात की भिकानेराकडे आहेत कोणी अला जाटाकडे आहेत असें लिहितात ईश्वरी इच्छा प्रमाण. तात्या असी गत का (क)धीही जाली नाही व पुढेंही होणार नाही. शिकस्तीचे वर्तमान आइकतांच दिलींत नारो शंकर वगैरे सात आठ हजार फौज किल्यांत दोन महिन्याचा सरंजाम खजाना सात आठ लक्ष रुपये वगैरे टाकून पलाले. तेही दिलीहून लुचानी काही लुटले काही अले असे जाहाले. मल्हारजी होलकर बाबूजी नाईक सदाशिव रामचंद्र वगैरे नवी फौज ग्वालेरीस राहिली पार्वतीबाई **धाकटे नाना** वगैरे आम्ही दरम-

मजल थोरले श्रीमंताकडे येत आहो. गोपालराव भोसले वगैरे येथे ठेविले याणी च्यार दिवस राहून घेतले पुढें येऊ अतःपर चाकरी *करणे नाही टोक्यास राहाणे हाच कृतसंकल्प आहे. पत्राचे उतर पाठवणे सविस्तर पूर्वील पत्रावरून कलेल. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे ही विनंती अबदाली दिलीस फौजसहवर्तमान आहे परंतु आपले देशास जाणार हे वर्तमान फार दाट आहे. डेरेही जाले. श्रीमंत माघारे फिरले ही गोष्ट फार वाईट जाली. बरे, आपल्यास चाकरी करणे नाही मग मनसबा कशास पाहिजे हे विनती." पत्र वाजून त्याचे विवेचनानंतर—

समारोपांत ते म्हणाले कीं, **छत्रपति श्रीशिवाजी** महाराजांच्या रूपानें जो मराठेशाहीचा महापुरुष इ. १६३० त जन्मास आला तो नानांच्या मरण-काळीं म्हणजे सन १८०० सालीं निवर्तला. मराठेशाहीचा खरा इतिहास व उत्कर्ष १६३० ते १८०० पर्यंतच्या काळांतच समाविष्ट आहे. अध्यक्षांचे भाषण संपल्यानंतर शाहीर खाडीलकर यांच्या पोवाड्यांचा कार्यक्रम झाला आणि तो सर्वांना फारच बहारीचा वाटला.

रात्रौ गांवांतील हौशी व उत्साही मंडळींनीं बसविलेला गडकरी यांच्या "पुण्यप्रभाव" नाटकाचा खेळ केला.

या जोडसमारंभाला आजूबाजूच्या गांवचे लोक बहुसंख्येनें हजर होते हें विशेष होय.

[केसरी २४–३–१९४४ पान ६.

---

* खुणे पासूनचा मजकूर श्रीकारापाशी खालचे अध्यांत ही विनंती पावेतों लिहून पुनः वरचे अध्यांत पुढील मजकूर लिहून जागा भरली आहे. हें पत्र रा. गोंधळेकर यांच्या संग्रहांतलें असून रा. पोतदार यांच्या मार्फत मिळालें. पुरंदरे द. भा. १ पृ. ३१५

नाना फडणविसांचा उत्सव

वेळास येथें नाना फडणविसांच्या पुण्यतिथीनिमित्त फा. कृ. ३ दि. १ मार्च गुरुवार या दिवशीं श्रीयुत चिं. ग. कर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं उत्सव साजरा होणार आहे. त्या उत्सवांत सकाळीं ८ वाजतां श्रीरामेश्वरावर रुद्राभिषेक, ९ ते १० तसबिरीची मिरवणूक, १० ते ११ मुलांच्या खेळांतील चढाओढी, सायं. ४॥ ते ७ शाहीर खाडिलकर यांचे पोवाडे; रात्रीं ८॥ ते ११ अहवालवाचन, श्री. नवरे प्रभृति इतर वक्त्यांचीं भाषणें आणि कीर्तन, भजन इत्यादि कार्यक्रम होणार आहे.

[केसरी, २३-२-१९४५ पान ४.

नाना फडणवीस ४६ वा उत्सव, वेळास

फाल्गुन व. ३, दि. १ मार्च या दिवशीं वेळास येथें फडणवीस वाड्याच्या वास्तूंत फडणवीस यांचा पुण्यतिथ्युत्सव श्री. चिं. ग. कर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें साजरा झाला. उत्सवांत श्री. द. गो. आपटे, रा. श्री. शं. नवरे, श्री. चिं. ग. कर्वे व श्री. के. बी. जोशी यांचीं भाषणें झालीं. त्यांत त्यांनीं बेळगांवच्या एका रानड्यांनीं आपल्या पुस्तकांत नाना फडणवीस यांच्यावर जे अश्लील व बाष्कळ आरोप केले आहेत त्यांना साधार चोख उत्तरें दिलीं. उत्सवाचा सविस्तर वृत्तांत पुढील अंकीं देऊं.

[केसरी, मंगळवार ६-३-१९४५ पान ४.

वेळास येथील नाना फडणविसांचा पुण्यतिथि उत्सव

श्री. रानडे यांच्या तर्कटांना अुत्तर

घरच्या आणि बाहेरच्या शत्रूंवर जरब बसवून ढासळूं पाहणारी पेशवाई ज्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें सुमारें तीस वर्षें उचलून धरली आणि शाहिरांनीं ज्यांचें वर्णन ' भले बुद्धिचे सागर ' असें मोठ्या अभिमानानें केलेलं आहे, त्या बाळाजी जनार्दन भानूंचा म्हणजेच नाना फडणविसांचा पुण्यतिथ्युत्सव वेळास गांवांतील फडणविसांच्या वाड्याच्या प्राकारांत वेळासकर मंडळींनी फाल्गुन वद्य ३ गुरुवार दि. १ मार्चला मोठ्या उत्साहानें व थाटानें साजरा केला. यंदाच्या उत्सवाचे अध्यक्ष पुण्याचे श्री. चिं. ग. कर्वे संपादक ' महाराष्ट्र शब्दकोष ' हे होते व मुख्य वक्ते म्हणून मुंबई येथील ' प्रभात ' पत्राचे संपादक श्री. श्री. शं. नवरे यांची योजना झाली होती. स्वागताध्यक्षांच्या जागीं श्री. द. गो. आपटे, वकील यांची निवड करण्यांत आली होती.

वेळासला जमलेला मेळावा

यंदाच्या उत्सवास पुण्याहून २० मंडळी आली होती. त्यांत नाना फडणविसांचे वंशज व बेलबागेचे मालक श्रीमंत **तात्यासाहेब भानू** सहकुटुंब होते. मुंबईहून १५ माणसें आलीं होती. याशिवाय हरेश्वर, केळशी, दापोली, आंजर्लें, बाणकोट वगैरे आसपासच्या गांवांतून बरीच मंडळी उत्सवास आली होती. पाहुणे मंडळींची राहण्याची सोय उत्सव मंडळाचे चिटणीस श्री. ग. वा. **सोमण** यांच्या घरीं व श्री. **के. बी. जोशी** यांच्या घरीं करण्यांत आली होती.

मिरवणूक, पोवाडे, सभा

उत्सवाच्या दिवशीं म्हणजे दि. १ ला सकाळीं रामेश्वरावर महारुद्राभिषेक झाला. नंतर नाना फडणविसांच्या छायाचित्राची मिरवणूक

रामेश्वर, काळभैरव यांचें दर्शन घेऊन दुर्गादेवीच्या मंदिरांत आली. तेथें आरती झाल्यावर मिरवणूक परत उत्सवमंडपांत आली; आणि तेथें नानांच्या छायाचित्राची स्थापना त्यांच्या वाड्याच्या चौथऱ्यावर करण्यांत आली. मिरवणुकीनंतर मुलांचे खेळ झाले. प्रथम धावण्याची शर्यत झाली, त्यांत तुकडी अ मध्यें मधुकर पेंटर हा मुलगा पहिला आला व तुकडी ब मध्यें नारायण नवसाळकर हा पहिला आला. नंतर शिवाजी संघ व नाना फडणवीस संघ यांत रस्सीखेचीचा सामना झाला. नंतर वरील दोन संघांत हुतुतूचा सामना झाला. त्यांत नाना फडणवीस संघाचा जय झाला. दोनप्रहरीं महाप्रसाद झाला. तिसरें प्रहरीं सुवासिनींचें हळदीकुंकू झाल्यावर मुंबईचे शाहीर, कवि व कीर्तनकार पांडुरंगपंत खाडिलकर यांचे भावनापूर्ण पोवाडे झाले. त्यांनीं नाना फडणवीस, राणी लक्ष्मीबाई, अफझुलखान वध हे पोवाडे म्हटले. रात्रीं १०॥ वाजतां श्री. चिं. ग. कर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली. प्रथम एका मुलीनें वेळास गांवाचे ऐतिहासिक महत्त्व वर्णन करणारें गीत म्हटल्यावर सौ. सुमतीबाई वर्तक यांनीं स्वागतपर पद्य म्हटलें. नंतर स्वागताध्यक्ष श्री. द. गो. आपटे, वकील यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं बेळगांवच्या कोणी एका रानड्यांनीं नानांवर केलेले आरोप बाष्कळ असून इतिहासाला सोडून आहेत असें सांगितलें.

उत्सव मंडळास सूचना

नंतर अध्यक्ष श्री. कर्वे यांचें प्रास्ताविक भाषण झालें. त्यांत त्यांनीं उत्सव मंडळाला अशी सूचना केली कीं उत्सव मंडळानें नाना फडणविसांच्या उत्सवाबरोबरच शिवजयंत्युत्सव करावा; कारण फाल्गुन व. ३ या दिवशीं नाना फडणविसांचा मृत्यु व श्रीशिवाजी महाराजांचा जन्म या दोनहि गोष्टी घडलेल्या आहेत. प्रास्ताविक भाषणानंतर त्यांच्या हस्तें खेळांच्या चढाओढींत यशस्वी झालेल्या मुलांना व संघनायकांना रोख पारितोषिकें देण्यांत आलीं.

निधिसमितीची विनंति

उत्सव मंडळाचे चिटणीस श्री. य. ना. सोमण यांनीं गतवर्षींच्या कार्याचा अहवाल वाचून दाखवून नाना फडणविसांच्या स्मारक निधीस सर्वांनीं मदत करावी अशी विनंति केली. एवढा प्रास्ताविक कार्यक्रम झाल्यावर उत्सवांतील मुख्य वक्ते श्री. श्री. शं. नवरे यांचें खालील आशयाचें भाषण झालें.



श्री. श्री. शं. नवरे

रानड्यांची विकृत मनोवृत्ति

श्री. नवरे म्हणाले, 'आपल्या देशांत कोणी काय लिहावें यावर कांहींच बंधन नसल्यामुळें रानड्यांसारखे लेखक मन मानेल तसें लिहूं

शकतात. रानड्यांचें 'नारायणरावाचा खून कीं आत्महत्या' हें पुस्तक पाहिलें म्हणजे संतापानें अंगाची लाही होते. नाना फडणवीस जर खरोखरी देशबुडवे असते तर त्यांचें नांव सूर्याजी पिसाळ किंवा आनंदीबाई यांच्या जोडीला इतिहासकारांनीं घातलें असतें. पण तसें तें घातलेलें कोठेंच आढळत नाहीं. आणि जी गोष्ट तत्कालीन मंडळींना किंवा त्यानंतरच्या इतिहास लेखकांना समजली नाहीं ती गोष्ट रानडे यांच्यासारख्या एकाच गृहस्थाच्या डोक्यांत येते हें आश्चर्य नव्हे काय?

याकरितां तरी कायदा हवा

उद्देश, हेतु व भूमिका ही लक्षांत न घेतां प्रत्येक गोष्ट नुसत्या तर्कावरच आधारून लिहावयाचें एकाद्यानें ठरविलें तर त्याला कोणाहि थोर पुरुषांचें उज्ज्वल चरित्र विकृत स्वरूपांत लिहून त्याची बदनामी करतां येईल. रानडे यांनीं नानांचें चरित्र निराधार तर्कटावर रचलें आहे; आणि म्हणूनच तें राष्ट्राचा घात करणारें आहे. थोर पुरुषाची मानहानी करणारें असलें चरित्र स्वतंत्र देशांत कोणी लिहिलें असतें तर त्याला शासन झालें असतें. पण राष्ट्राचा मानभंग करणाऱ्या रानड्यांना आम्ही कांहींच शिक्षा करूं शकत नाहीं. याकरितां तरी राष्ट्रपुरुषांची बदनामी करणाऱ्या लेखकाला शासन करणारा कायदा हवा असें वाटूं लागलें आहे.

ह्या खोट्या, टाकाऊ व गचाळ पुस्तकाचें खंडन मद्रास, कोल्हापूर, पुणें, मुंबई इत्यादि नगरांतून प्रि. पवार, पोतदार, खरे, ओतुरकर, शंकरराव जोशी, बाबुराव फाटक, दि. वि. काळे, न. चिं. केळकर, प्रो. राव इत्यादि अभ्यासू व विद्वान् मंडळींनीं केलें असून त्या पुस्तकामागें असलेल्या वाईट व चुकीच्या प्रवृत्तीचा निषेधहि केला आहे. त्याहि आधीं ह्या दुष्ट पुस्तकाचें तितक्याच सडेतोड भाषेंत पण सत्याच्या म्ह. ऐ. आधारानें केलेलें 'नव्या काळ'मधील खंडनपर लेख उल्लेखनीय होत. प्रा. न. र

फाटक ह्यांच्या या २१ लेखांचे व वरील वक्त्यांच्या भाषणांचें स्वतंत्र पुस्तक अवश्य प्रसिद्ध व्हावयास पाहिजे.

नानांच्या मुत्सद्दीपणाला इंग्रज भीत

रानडे यांनीं आपल्या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें नाना फडणवीस खरोखरच एवढे स्वार्थी, राष्ट्रघातकी व मूर्ख होते काय? १७६१ ते १८०० हा काळ मराठ्यांचा फार धामधुमींत गेला. पानिपतच्या लढाईत आपण एवढी मोठी ठोकर खाऊ अशी मराठ्यांना कल्पनाहि नव्हती. पण अशी जबरदस्त ठोकर मराठ्यांना तेथें बसली. अशा संकटकाळीं थोरले माधवराव, नाना फडणवीस व महादजी शिंदे या तिघांनींच मराठी राज्याची धुरा वाहिली. नाना फडणविसांनीं इंग्रजांची डाळ आपल्या हयातींत कधींच शिजूं दिली नाहीं. नानांचा अंत झाल्यावर दोन वर्षांनीं वसईचा तह झाला व मराठी राज्याचें उदक इंग्रजांच्या हातावर सोडलें गेलें. नाना जिवंत असेपर्यंत इंग्रजांनीं बाकीच्या टापूंत आपला दरारा बसवला असला तरी मराठ्यांच्या टापूंत त्यांना मुळींच ढवळाढवळ करतां आली नाहीं. इतका नानांच्या मुत्सद्दीपणाचा त्यांच्यावर दरारा होता.

पडत्या काळांत पेशवाई कोणी सावरली

पानपताहून परत आल्यावर नानांना सर्व आकाश फाटल्यासारखें दिसलें. त्यांच्यावर **संकटपरंपरा** कोसळूं लागली. ज्याच्यावर डोळे मिटून विश्वास ठेवावा असा निष्ठावंत सरदार दिसेना. खजिना रिता झालेला, वसुली थकलेली. अशा बिकट परिस्थितींतहि नानांनीं खर्ड्याच्या लढाईत निजामाला खडे चारले! पण त्याच वेळीं एकेक सरदार नानांना सोडून जाऊं लागला. १७९९ मध्यें टिपूचा पराभव झाला, पण त्याच वेळीं इकडे इंग्रज शिरजोर झाला. राघोबा इंग्रजांना मिळाला! नानासाहेब पेशव्यांनीं आंग्र्यांचा बीमोड करण्यासाठीं इंग्रजांची मदत घेतली व त्यांना पश्चिम

किनाऱ्यावर व्यापार करण्यास परवानगी देऊन आणखी ९ गांवें बक्षीस दिलीं. पण ह्याचा अर्थ इंग्रज महाराष्ट्र राजकारणांत शिरले किंवा आंग्ल सत्तेचा प्रवेश व विस्तार ह्या बाजूनें एव्हां झाला असा मुळींच नाहीं. व हें लक्षांत घेतलें पाहिजे. महादजी शिंदे शूर खरा पण पोटांत नानांबद्दल द्वेष ! अशा विपरीत परिस्थितींत कोणतेंहि पूर्व शिक्षण नसतां नाना फडणविसांनीं ३० वर्षें पुण्याची गादी राखली हें त्यांचें केवढें मोठें कार्य आहे ? अशा या आपल्या थोर पूर्वजाविषयीं ज्यांना कृतज्ञता वाटते त्यांनीं, कोणी कांहीं बडबडलें, अथवा लिहिलें तरी आपला बुद्धिभेद होऊं देऊं नये. उलट उत्सव आणि स्मारकें अधिक ठिकाणीं करून विकृत बुद्धीच्या लेखकांना चोख उत्तर द्यावें हेंच योग्य.' वरील आशयाचें श्री. नवरे यांचें भाषण झाल्यावर अध्यक्ष श्री. कर्वे यांचें भाषण झालें.

सरदार मुजुमदारांतर्फेचा खुलासा

श्री. कर्वे यांनीं प्रथम पुण्याचे **सरदार आबासाहेब मुजुमदार** यांच्या-तर्फेचा म्हणून असा खुलासा केला कीं, रानडे यांचें पुस्तक छापून होण्यापूर्वीं रानडे यांनीं सरदार मुजुमदार यांचेकडून वचन घेतलें असल्या-मुळेंच मुजुमदारांना सदर पुस्तक प्रकाशित करण्याच्या समारंभास अध्यक्ष या नात्यानें बेळगांवास जाऊन प्रकाशन समारंभाचें काम करावें लागलें. पण त्याच वेळीं त्यांनीं असें सांगितलें कीं रानडे यांचे पुस्तक मीं अद्याप वाचलें नसल्यामुळें त्यांत जर कांहीं कमी जास्त मजकूर असेल तर त्याचा समाचार लोक घेतीलच.

त्यानंतर सरदार मुजुमदार यांनीं रानडे यांचें पुस्तक वाचलें व त्या पुस्तकांत नाना फडणविसांच्या विषयीं जीं विधानें केलीं आहेत त्याच्याशीं आपण सहमत नाहीं असें स्पष्ट शब्दांत सांगितलें व तेंच त्यांचें मत आज मी याप्रसंगीं त्यांच्यातर्फे म्हणून जाहीर करतों.

रानडे यांची उत्तराला जमेल अशी रीत

वरीलप्रमाणें खुलासा करून श्री. कर्वे म्हणाले, ‘रानडे यांनीं आपल्यां पुस्तकांत नानांच्यावर जे पंधरा वीस आरोप केले आहेत त्यांना चोख उत्तरें देणारे अस्सल पुरावे आमच्याजवळ आहेत. रानडे यांनीं आपल्याला



श्री. चिं. ग. कर्वे

सोयीचे वाटतील तेवढेच पुरावे जमेस घेऊन त्यावरून निष्कर्ष काढले आहेत. खऱ्या संशोधकाची अशी रीत नसते. खरा संशोधक प्रत्येक पुरावा नीट पारखून बघतो. पण ज्याला खरें संशोधन करावयाचेंच नसतें आणि ज्याला मनांत अगोदरच ठरवून ठेवलेल्या उत्तराला जमेल अशीच रीत बसवावयाची असते तो आपल्या मनाला पुष्टिकारक ठरतील असेच खोटे पुरावे पुढें ठेवतो, आणि असलेंहि पुरावे जेथें सांपडणार नाहींत तेथें तो आपले तर्कट चालवतो. रानडे यांनीं आपलें पुस्तक लिहितांना याच चुकीच्या मार्गाचा अवलंब केला आहे हें त्यांच्या पुस्तकावरून स्पष्ट दिसतें.

नानांनीं तोतयास मारविलें

रानडे यांनीं आपल्या पुस्तकांत नानांच्यावर जे अनेक आरोप केले आहेत त्यांत नानांनीं खऱ्या भाऊसाहेबांना तोतया ठरवून मारविलें असा एक आरोप आहे! हा आरोप कसा निखालस खोटा व निराधार आहे हे त्यावेळचे उपलब्ध कागदपत्र पाहिले म्हणजे स्पष्ट दिसतें. भाऊसाहेबां-सारखा दिसणाऱ्या छत्रपुराजवळील कर्नाळगांवांतील सुखनिधान नांवाच्या ज्या गोसाव्याला तोतया भाऊसाहेब बनविण्यांत आला होता तो स्वतःच म्हणत होता कीं, ' मी भाऊ नव्हे, मजला कां जबरदस्ती करतां, मजवर कां जुलूम करतां पण हें कोणीच ऐकेना. ' भाऊसाहेबांची आत्या अनुबाई घोरपडे यांना प्रथम तोतया भाऊसाहेब हा खराच भाऊसाहेब असावा असें वाटत होतें म्हणून खात्री करून घेण्याकरितां तोतया भाऊसाहेबाला नगरच्या किल्ल्यांतून अनुबाईच्या वाड्यांत १५ दिवस आणून ठेवण्यांत आलें होतें. अनुबाईंनी पुष्कळ चौकशी केली आणि त्यांत त्यांना हा भाऊसाहेब तोतयाच आहे हें स्पष्ट दिसून आल्यावरून त्यांनीं तोतया भाऊसाहेबास घालवून दिला. नंतर श्रीमंत थोरले माधवरावांनीं तोतया भाऊस पुण्यांतील बुधवार पेठेच्या हौदाजवळ आणून उभा केला. पुण्यां-तील सर्वच लोकांनीं हा खरा भाऊसाहेब नव्हे असें सांगितलें. वरील अर्थाचें पत्र पेशवे दप्तरांत प्रसिद्ध झालें आहे. तोतया भाऊसाहेबाचें खूळ इंग्रजांनींच आपल्या फायद्याकरितां निर्माण केलें होतें. यावरून नानांनीं खऱ्या भाऊसाहेबांना तोतया ठरवून मारलें या आरोपाचें निराकरण आपोआपच होतें.

राघोबाचें पत्र व यूसफचा जबाब हेंच उत्तर

नानांच्यावर दुसरा आरोप असा कीं, त्यांनींच नारायणरावाला आत्महत्या करावयाला लावली. नारायणरावाच्या खुनांत राघोबादादा

व आनंदीबाई यांचा कांहीं संबंध नव्हता. पण गोपिकाबाईच्या दर्शनाला जाण्यापूर्वीं राघोबादादांनीं जें प्रायश्चित्त घेतलें त्या वेळीं त्यांनीं जो दोषाचा उच्चार केला आहे त्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं 'नारायणराव-साहेब यास धरावें असा तर निश्चय त्या प्रकरणांतील राजकारण करणारासी केला, ते समयीं त्यांनीं विचारलें कीं न जाणो धरूं जातां कलागत पडली आणि त्यांत कदाचित् मारले गेले तर दोष ठेऊं नये असें त्यांनीं (गारद्यांनीं) सोडवून घेतलें आणि कर्मास प्रवर्तले. ते समयीं त्यांनीं (नारायणरावांनीं) येऊन कमरेस मिठी घातली तेव्हा गलबल जहाली. फुरसत पडूं पावली नाही. दोहींकडे हात लावून निवारण करतो इतक्यांत घात करणाऱ्यांनी आपले जिवाचे बचावास्तव हात टाकिला तो प्रथमच पुरा बसला. त्याचा पुढील ग्रंथ तुम्हा सर्वांस समजलाच आहे. तेव्हां धरण्याच्या संकल्पांत कलागती पडून मारला गेला तर दोष नाहीं हें बोलणें झालें.'

खून करण्यामधील एक महंमद यूसफ तो आपल्या जबानींत स्पष्ट सांगतो '**नाना फडणीस, त्रिंबकराव मामा व हरिपंत फडके** यांना नारायणरावास कैद करण्याच्या कटाविषयीं कांहीं ठाऊक नव्हतें. वरकडास मात्र ठाऊक होतें.' तशीच जबानी तुळाजी पवारांनींही दिली आहे. सखारामबापूंचें त्यांत अंग होतें हें तें निश्चितपणें सांगतात.

अस्सल पत्रांत काय आहे तें पहा

तिसरा आरोप—नानांनीं गंगाबाईशीं व्यभिचार केला व व्यभिचाराचा पुरावा दडपून टाकण्याच्या कारस्थानांत गंगाबाई बळी पडली. त्या वेळेस नाना फडणवीस मुद्दाम पुण्याला राहिले व तिकडे गंगाबाई एकदम स्वर्गवासी झाली! त्या वेळची अस्सल पत्रें इतिहास-संग्रह व ऐतिहासिक लेखसंग्रह यांतून जीं सांपडतात त्यांत 'श्रीमंत मातोश्री गंगाबाई यांसी नवज्वराचा उपद्रव जाहला ज्वर आल्यापासून आठव्या दिवशीं दीड प्रहर दिवसास देवाज्ञा जाहली' असें आहे. पुरंदरची हवा कोणाला

सोसवत नसे. म्हणून त्यांनीं सखारामबापूप्रमाणें पुरंदरास घर न बांधता ते पुण्यास राहात. तेव्हां गंगाबाईच्या मरणाच्या वेळीं ते जवळ नव्हते हें साहजिकच होय. शिवाय गंगाबाईचा व त्यांचा व्यभिचारी संबंध हा राघोबाच्यापक्षानेंउठवला व इंग्रजांनीं त्याला हातभार लावला इतकेंच.

इंग्रजांची कुटिल भेदनीति

शिवाजी महाराजांची सरदारांना स्वतंत्र सरंजाम न देण्याची पद्धति शाहूमहाराजांच्या कारकीर्दींत टिकूं शकली नाहीं. याला सबळ कारणें आहेत. नाना हिशेबाच्या बाबतींत फार दक्षता घेत; सरंजाम आणि जात-इनाम वगैरे वरच्या पैशाखेरीज जो पैसा सरदारांच्या मुलुखांत शिल्लक राही तो पुण्यास मध्यवर्ति सत्तेकडे आला पाहिजे यावर नानांचा कटाक्ष असे व त्यामुळेंच सर्व सरदार नानांच्यावर नाखूब असत. हिशेबांची कटकट ही फार जुनीच आहे. नानांनीं मराठी साम्राज्याचा हिशेब, 'फडाची' व्यवस्था उत्तम रीतीनें ठेवून भाऊसाहेबांचाच कित्ता गिरविला. इंग्रजांचा प्रयत्न मराठी साम्राज्यांतून गायकवाड, भोसले, शिंदे, होळकर वगैरे मराठे सरदारांना फोडण्याचा अव्याहत चालू होता. नागपूरचे भोसले व बडोद्याचे गायकवाड प्रथम इंग्रजांच्या आहारीं गेले. पुरंदर आणि सालबाईचा तह यांत शिंदे आणि होळकर यांना, ते स्वतंत्र संस्थानिक आहेत असा फुकट मान देऊन, पेशवाईतून फोडण्याचा झालेला स्पष्ट प्रयत्न कोणासहि दिसेल.

नाना लांच घेऊन नवकोट झाले नाहींत

नाना फडणवीस आपल्या कारभारांत लांच घेत असा एक आरोप आहे. त्यांच्या 'कारकुनी' मुळें ते नवकोट नारायण बनले असें म्हणतांना 'कारकुनी' शब्दाचा अर्थ कळला नाहीं असें व्यक्त होतें. गादी बदलणें, वारसा, तह, लग्नसमारंभ, गांठी भेटी इत्यादि अनेक प्रसंगीं फडणिसांना

व सर्व कारकून, कारभारी मंडळींना ठराविक पैसे मिळत. त्याप्रमाणेंच नानांना वांटा मिळे. सखारामबापूंचीहि मिळकत, ते वारले तेव्हा, पाउण कोटीपर्यंत मोजतां येईल एवढी होती. तेव्हां लांच खाण्याचा आरोप हा अज्ञातपणानें केलेला आहे. नाना फडणवीस आपला हा पैसा अनेक धार्मिक सत्कृत्यांत खर्च करीत याविषयींची कितीतरी उदाहरणें दाखवून देतां येतील. **अहल्याबाईच्या** खालोखाल नानांच्या दानधर्माचेहि दाखले मिळतील.

महादजी नवज्वरानें मेला

महादजी शिंद्यांना नाना फडणविसांनी विष घालून मारलें हा जो एक आरोप आहे त्याबद्दल तत्कालीन मॅलेट या इंग्रज वकिलाचीं पत्रें वाचलीं असतां शिंदे हे बरेच दिवसांपासून आजारी असत व त्यांचा मृत्यु हा विषप्रयोगामुळें आकस्मिक झालेला नाहीं हें सिद्ध होतें. **देवराव हिंगणे** यांना गेलेल्या पत्रांत ‘ रा. पाटीलबाबास ज्वराची व्यथा दहा दिवस होऊन माघ शु. १३ बुधवारीं प्रातःकाळीं वायूची भावना जाहली. श्रीमंत व मुत्सद्दी डेऱ्यास गेले. उपाय बहुत केले. कांहीं उपाय लागू न होता प्रहर रात्रीस देवाज्ञा जाहली ’ असें स्पष्ट आहे.

नानांवरील आणखी निराधार आरोप

नानांच्यावर कित्येक वेळां मारेकरी घालण्यांत आले; याचें कारण नानांचा व्यभिचार आणि अनीतीनें वागणें, लोकांना, विशेषतः सावकारांना, पटत नव्हतें हें जें देण्यांत आलेलें आहे त्याबाबत कांहींच आधार नाही. ‘ दामोदर मंडळी’ म्हणजे सावकार नसून मोरोबादादा, बजाबा पुरंदरे वगैरे नानांच्या विरुद्ध पक्षांतील मंडळी होत. खरेशास्त्र्यांनीं-याहि आरोपाचा इन्कार केलेला आहे. तेव्हा गंगाबाईशीं नानांच्या

असलेल्या संबंधाबद्दल चिडून सावकार मंडळींनी त्यांना मारण्याचा बेत केला हें सांगणें अयथार्थ व धाष्ट्यांचें आहे.

याप्रमाणें ग्रंथकर्त्यानें नानांच्यावर केलेल्या सर्व कुत्सित आरोपांचें खंडन साधार करतां येतें.'

स्मारक योजनेस मदत करा

वरील आशयाचें श्री. कर्वे यांचें भाषण झाल्यावर श्री. के. बी. **जोशी** यांनीं रा. रानडे यांच्या चोपड्यांतील कुत्सित आरोपावर खरपूस टीका केली व नाना फडणवीस स्मारक योजनेस सर्वांनीं सढळ हातानें मदत करावी अशी विनंति करून अध्यक्ष, वक्ते व पाहुणे यांचे आभार मानले. शाहीर **खाडिलकर** यांनीं राष्ट्रगीत म्हटल्यावर नाना फडणविसांच्या जयजयकारांत सभा रात्रीं १ वाजतां समाप्त झाली.

सभेनंतर शाहीर खाडीलकर यांचें कीर्तन व श्री. अण्णा **करमरकर** यांच्या भजनी मेळ्याचें भजन असे कार्यक्रम पहाटे ४ वाजेपर्यंत झाले.

शुक्रवार ता. २ ला रात्रीं श्री. न. चिं. केळकर यांच्या 'तोतयाचें बंड' या नाटकाचा प्रयोग यशस्वीपणें करून दाखविण्यांत आला व उत्सव समाप्त झाला.

श्री नाना फडणवीस यांचा ४६ वा उत्सव

वेळास येथील श्रीमंत नाना फडणवीस यांचा वार्षिक उत्सव बुधवार ता. २० रोजीं मुंबईचे **प्रा. न. र. फाटक** यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें साजरा झाला. समारंभास मुंबई, पुणें व वेळासच्या आसपासची

मंडळी हजर होती. शाहीर आफळे यांचें कीर्तन व पोवाडे, विद्याभूषण तांबेशास्त्री यांचें प्रवचन, श्री. ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं



प्रा. न. र. फाटक

श्री. फाटक यांचा सत्कार आणि श्री. फाटक यांचें व्याख्यान वगैरे विविध कार्यक्रम झाले. स्थानिक मंडळींनी 'पुण्यप्रभाव' नाटकाचा प्रयोग केला.

वेळास येथील नाना फडणवीस पुण्यतिथि उत्सव

श्रीमंत नाना फडणविसांच्या पुण्यतिथीचा उत्सव-समारंभ बुधवार ता. २० रोजीं मुंबईच्या रूइया कॉलेजांतील प्राध्यापक श्री. **नरहरपंत फाटक** यांच्या अध्यक्षतेखालीं वेळास येथें मोठ्या उत्साहानें साजरा झाला. या समारंभासाठीं मुंबईहून श्री. **माधवराव नवांगुळे**, चिटणीस ब्राह्मणसभा,

श्री. केशवराव जोशी, श्री. लालजी पेंडसे, श्री. य. ना. सोमण, पुण्याहून श्री. चिंतामणराव कर्वे, श्री. ज. स. करंदीकर, श्री. रघुनाथराव वर्तक, श्रीमंत तात्यासाहेब भानु वगैरे मंडळी व वेळासच्या आसपासची मंडळी प्रामुख्यानें उपस्थित होती.

पुणेकर मंडळी भोर-महाडच्या मार्गानें मंगळवारी सकाळीं निघाली. पहिला तीसएक मैलांचा प्रवास सुखकर झाला. पुढें मात्र महाड गाठे-पर्यंत घाटांतील तांबड्या धुळीनें सर्वजण लाल झाले होते. महाडास सुमारें १२॥ च्या सुमारास पोंहचल्यानंतर श्री. गोपाळराव धारप यांच्याकडे भोजन आटोपल्यावर मंडळी दासगांव बंदराकडे मोटारीनें १५ मिनिटांनीं जाऊन पोंचली. तेथें आधींच श्री. करमरकर यांनीं तयार ठेवलेल्या मोटारलॉंचमध्यें मंडळींनी बैठक मारली. दासगांव येथें मुंबईकर येऊन मिळाले. दासगांव ते बाणकोट हा प्रवास अत्यंत सुखकर असा झाला. दासगांव सोडल्यावर आमचा वाफारा ६॥ च्या सुमारास बाणकोट बंदरास लागला. तेथें वेळासची मंडळी स्वागतार्थ होतीच. त्यांनी सर्वांचें स्वागत केल्यावर धक्क्यावरून सर्व मंडळी श्री. शिवरामपंत ओक यांच्या निवासस्थानाकडे वळली; तेथें श्री. ओक यांचा पाहुणचार स्वीकारून वेळासला रात्रीं ८ च्या सुमारास जाऊन ही मंडळी पोहोंचली.

बुधवारचा दिवस उजाडला आणि कार्यक्रमास सकाळपासूनच प्रारंभ झाला. सकाळीं श्रीरामेश्वरास रूद्राभिषेक झाला. नंतर ८॥ च्या सुमारास श्रीमंत नाना फडणवीस यांच्या छायाचित्राची मिरवणूक निघाली. नानांच्या निवासस्थानापासून श्रीरामेश्वरापर्यंतचा रस्ता लतापल्लवांनीं सुशोभित केला होता. श्री. नाना फडणवीस यांच्या जयजयकारांत छबिना निघाला. श्रीरामेश्वराचें दर्शन घेऊन ही मिरवणूक ९ वाजतां परत आली. मिरवणुकीचा कार्यक्रम संपल्यावर–मुलांच्या शारीरिक खेळांतील चढा-

७

ओढी झाल्या. रस्सीखेंच, धावणें वगैरे कार्यक्रम पार पडले. नंतर भोजन वगैरे उरकून उत्सवमंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा श्री. ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. के. बी. जोशी यांच्या निवासामध्यें झाली.

शाहीर **गोविंदस्वामी आफळे** यांचें ऐतिहासिक पोवाडेगायन उत्सवमंडळाच्या जागेंत ३॥ वाजतां सुरू झालें. शाहिरांनीं आपल्या खड्या



[श्री. गोविंदस्वामी आफळे, (माहुलीकर) बी..ए. ऑनर्स, हे उत्कृष्ट राष्ट्रीय कीर्तनकार असून ऐ. पोवाडे करतात आणि म्हणतातहि उत्तम. त्यांचे घराण्यांतच ही कीर्तन परंपरा आहे म्हटलें तरी चालेल.]

आवाजांत उमाजी नाईकाच्या पोवाड्यांतील कांही चौक, राणी लक्ष्मीबाई यांचा पोवाडा, शेतकऱ्यांचा संवाद, वगैरे प्रसंग गाऊन दाखविले. पृ. १०० पहा.



श्री. पांडुरंग दत्तात्रेय खाडिलकर, एम्. ए., बी. टी.
(खाडिलकर निवास, शिवाजी पार्क ३, मुंबई २८)

[१९२६ सालीं रायगडावर श्रीशिवाजीमहाराजांचा उत्सव सुरू असतां शाहीर खाडिलकर यांना मराठ्यांच्या ऐतिहासिक प्रसंगावर पोवाडे रचण्याची स्फूर्ति झाली. तेव्हांपासून आजतागायत अनेक ऐतिहासिक व्यक्तींवर व प्रसंगांवर प्रभावी पोवाडे लिहून त्यांनीं मराठी साहित्यांत अपूर्व अशी भर टाकली आहे. पृ. ६९, ७६, ८५ ,पहा. तेथेंच हें छायाचित्र द्यावयाचें. पण चित्रठसा तेव्हां हातीं आला नाहीं. म्हणून दोन्ही शाहीर व कीर्तनकार यांचें चित्र येथें दिलें आहे.]

पोवाडे झाल्यावर **विद्यानिधि तांबेशास्त्री** यांनीं गीता ही प्रवृत्तिपर आहे कीं निवृत्तिपर आहे असा प्रश्न प्रवचनांत घेऊन प्रवृत्ति–निवृत्ति यांचा गोड संगम गीतेंत आहे असें दाखविलें. गीतेचें अमर तत्त्वज्ञान एकांगी नसून ऐहिक व पारमार्थिक उन्नतीच्या उभयविध मार्गास पोषक असल्यामुळें प्रेयस् व निश्रेयस् या दोन्ही गोष्टींची जोड करून देणारें तें आहे असें त्यांनी प्रतिपादिलें. त्यागाची भूमिका स्वीकारूनहि गीता दोहोंचा समन्वय करणारी आहे, असें शास्त्रीबुवांनीं अनेक रसाळ उपमांनीं विवेचन केलें.

नंतर सभामंडपांत रात्रीं ९।। च्या सुमारास श्री. ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. न. र. फाटक यांनीं केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा सत्कार करण्यांत आला. स्वागताध्यक्ष श्री. बा. धों. कुटुंबे यांनीं आपल्या भाषणांत श्री. फाटक यांनीं नाना फडणवीस यांच्या संबंधानें बेळगांवच्या रानडे नांवाच्या गृहस्थानें जे गलिच्छ व तर्कटी आरोप केले होते त्यांचा खरपूस समाचार, ‘ नवाकाळ ’ वर्तमानपत्रांत २१ लेख लिहून घेतल्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें. श्री. केशवराव जोशी यांच्या प्रयत्नामुळें १९०० पासून हा उत्सव वेळास येथें होत असून त्यास कसकसें वळण मिळालें याचेंही त्यांनीं आपल्या भाषणांत विवेचन केलें. नंतर श्री. यशवंतराव सोमण यांनीं अहवाल वाचून दाखविला. त्यावरून स्मारकाची कल्पना व स्मारकनिधि वाढविण्याबद्दल झालेले प्रयत्न यांची माहिती कळून आली. ‘ तोतयाचें बंड ’ हें नाटक मुंबई व पुणें येथें झालें. तसेंच रानडे यांनीं केलेल्या आरोपांचें निरसन करण्यासाठीं पुणें व मुंबई येथें व्याख्यानमालेचा उपक्रम केल्याचें अहवालांत नमूद आहे. या कामीं स्मारकमंडळ, प्रा. **फाटक** आणि श्री. **कृ. गो. मराठे** यांनीं जो पुढाकार घेतला त्याबद्दल फडणविसांचे अभिमानी खरोखरीच ऋणी राहतील.

श्री. केशवराव जोशी यांनींहि आपल्या भाषणांत श्री. फाटक यांच्या कार्याबद्दल गौरवपर उद्गार काढून उत्सवाची हकीकत थोडक्यांत

सांगितली. श्री. चिंतामणराव कर्वे यांनीं श्री. फाटक यांनीं इंदुप्रकाशमध्यें असतांना वेलिंग्डन-स्मारकाचा प्रश्न मोठ्या कुशलतेनें कसा हाताळला याची माहिती देऊन त्यांचा सत्कार होणें हें कसें योग्य आहे याचें प्रतिपादन केलें. श्रीमंत तात्यासाहेब भानू (बेलबागकर) यांनींहि मोजक्या शब्दांत श्री. कर्वे यांनीं केलेल्या सूचनेस पाठिंबा दिला. नंतर ब्राह्मणसभा, मुंबई या संस्थेचे चिटणीस श्री. **माधवराव नवांगुळे** वकील यांनींहि श्री. नरहरपंत फाटक यांची कामगिरी किती उपकारक आहे याचें कथन केलें. रानड्यांनीं केलेल्या बेजबाबदार विधानांचा समाचार घेऊन फाटकांनीं लोकांचा भ्रमनिरास केला, ही गोष्ट उत्सवमंडळाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची होय असें सांगून सत्कार-समारंभ योग्य वेळींच होत आहे असें मत दिलें.

अध्यक्ष श्री. **करंदीकर** यांनीं आपल्या भाषणांत फाटक यांच्या लेखमालेचा उल्लेख करून, रानड्यांनीं केलेल्या आरोपांचें विस्तरशः खंडन करून, पेशवाईतील महान् मुत्सद्यावरील हल्ला फाटकांनीं परतविला याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें. रानडे यांनीं लिहिलेल्या पुस्तकाचें खंडन करावें तर पुस्तकास फुकट प्रसिद्धी मिळते व त्यामुळें अशा लोकांचें आयतेंच फावतें; तथापि वर्तमानपत्रांतून चाललेल्या एकांगी व कुत्सित प्रचाराला उत्तर दिलेंच पाहिजे म्हणून स्मारक-मंडळातर्फे व्याख्यानमालेची व्यवस्था झाली व ती अपेक्षेप्रमाणें यशस्वी झाली, याची माहिती दिली. श्री. करंदीकर यांनीं रानड्यांचा पुस्तक लिहिण्यांत किती निंद्य हेतु होता हें विशद करून, त्या पुस्तकांतील अनेक गोष्टींचा खल करून बालिश गोष्टी सप्रमाण खोडून काढण्यांत श्री. फाटक यांना जें यश लाभलें त्याबद्दल त्यांचा सत्कार होणें कसें उचित होतें व या प्रसंगीं हें आम्हीं कसें साधलें हें सांगून याबद्दल सर्वांचें त्यांनीं मनःपूर्वक आभार मानले.

नंतर श्री. **फाटक** यांनीं रानड्यांच्या पुस्तकामुळें सुशिक्षित समाजांत नाना फडणविसासंबंधानें विकृत कल्पना पुढें आल्याचें दिसल्यामुळेंच रानड्यांच्या पुस्तकाचें खंडन करण्याचें आपण योजलें हें सांगून श्री. **काकासाहेब खाडिलकर** यांच्या प्रोत्साहनामुळेंच हें कार्य सुकर झालें व '**नवा काळ**' च्या संपादकांनीं ते लेख क्रमशः छापून दिल्यानें आपलें म्हणणें लोकांपुढें मांडतां आलें याबद्दल उभयतांचें आभार मानले. नंतर चित्तपावन-संघ, स्मारकमंडळ, मुंबई ब्राह्मणसभा, वगैरे संस्थांकडून श्री. फाटक यांना हार घालून त्यांचा सत्कार करण्यांत आला.

नाना आणि महादजी

वरील सत्कारसमारंभानंतर प्रा. फाटक यांचें श्री. ज. स. करंदीकर यांच्याच अध्यक्षतेखालीं 'नाना आणि महादजी' या विषयावर पुढील आशयाचें उद्बोधक व्याख्यान झालें. ते म्हणाले "१८९४ सालीं केसरींत 'नाना व महादजी' या विषयावर लेख आले, 'श्रेष्ठ कोण ? नाना कीं महादजी ?' असा वाद उत्पन्न झाला होता. त्याची तुलना ५० वर्षांमागें झाली होती. अलीकडे मात्र याबद्दल विशेष प्रश्न उपस्थित झाला नाहीं. आज इतिहासाचीं नवीं साधनें पुष्कळच उपलब्ध झालीं आहेत. त्या साधनांचें शांत रीतीनें परिशीलन केलें नंतर त्यांतून निघणारा निष्कर्ष नानाला अनुकूल असाच निघतो, असें माझें मत झालें आहे. महादजी शिंद्यांस सरदारीचा लाभ करून देण्यांत नानांचा हात होता ही गोष्ट इतिहासज्ञांना अवगत आहे. पण सरदारी भोगूं लागल्या-पासून त्यानें पेशवाईमधील गृहकलहाचा फायदा घेऊन आपलें वैभव व वर्चस्व प्रस्थापित करण्याचा त्यास मोह झाला; हें विसरून चालणार नाहीं. नारायणरावांच्या वधानंतर त्याच्या कर्तृत्वाला संधि मिळाली आणि महादजीनें ती दवडली असें घडलें नाहीं. १७७५ ते १७७९ या चार वर्षांत **नानाची व महादजींची मित्रत्वाची आणभाक झाली होती.**

कसल्याहि बिकट प्रसंगीं त्यानें नानाचा पक्ष सोडला नाही. नानाला त्यानें सहाय्यच केलें. पण त्याच्या मुळाशीं आपल्या स्वतःच्या वैभवांत व स्वार्थांत कशी भर पडेल इकडेच त्यानें अधिक लक्ष पुरविलें. नानाला पेशवाई सांभाळणें एवढाच स्वार्थ होता. १७८० पासून १७९२ पर्यंत महादजी दक्षिणेंत आल्याचें दिसत नाही. या काळांत दक्षिणेंत इंग्रज, टिपू, निजाम वगैरेंनी पेशवाईस संकटांत आणण्याचा प्रयत्न केला; पण नानानें आपल्या स्वतःच्या हिंमतीवर व शहाणपणानें त्या सर्वांचा परिहार करून पेशवाईवर आलेलें संकट निवारलें. या अवधींत नालकी मुतालकी, अलिबहादुराचा तंटा, इंग्रजांशी सख्य इ. प्रकरणें उद्भवलीं. या संबंधी उपलब्ध झालेलीं साधनें अभ्यासलीं जावींत व तीं तशीं अभ्यासलीं गेल्यास नानांच्या धोरणांवर जास्त प्रकाश पडेल. १७६१ नंतर नानांचें मन उद्विग्न झाल्याचें दिसून येतें. आपल्यास कारभार नको, हरि हरि म्हणून स्वस्थ बसावें असें त्यांना वाटत असल्याचें त्यांच्या आत्मकथनावरून दिसून येतें. १७८० ते १७९४ सालांत महादजीनें अशीं अनेक कृत्यें केलीं कीं, त्यामुळें नानांचें मन जास्त जास्त संकटग्रस्त व्हावें. १७९४ सालीं महादजी वारला. महादजीनें बादशहाकडून स्वतःचा दर्जा वाढविण्याचा डाव टाकून त्याखालचा दर्जा पेशव्यांच्या गळ्यांत बांधण्याचा उपद्व्याप केला. परंतु तो डाव नानांच्या कर्तबगारीनें व सावधतेनें साधूं शकला नाही. शेवटीं महादजीस नमतें घ्यावें लागलें.

नानांच्या मार्गांत अनेक संकटें आलीं, त्यांतून ते सहीसलामत पार पडले. या बाबतींत पुष्कळच सांगावें लागेल. त्यावरून श्रेष्ठ कोण याचा निर्णय नानांच्या बाजूनेंच द्यावा लागेल. ''

*   *   *

वरील आशयाचें भाषण झाल्यावर शाहीर आफळे यांचें २॥ तास

कीर्तन झालें. त्यांनीं संभाजीचें आख्यान लावलें होतें. नंतर **भार्गवबुवा** यांचें सुश्राव्य गायन झाल्यावर, हा कार्यक्रम रात्रीं ३॥ वाजतां संपला.

* * *

गुरुवार ता. २१ रोजीं नाटकाशिवाय कांही कार्यक्रम नसल्यानें मुंबई-पुण्याची मंडळी श्रीहरिहरेश्वराला व श्रीवर्धनाला जाऊन आली. श्रीवर्धन येथील मूळ पेशव्यांच्या वास्तूची पहाणी करून, येथील ग्रामस्थांची मुलाखत घेऊन, श्री. **आपटे** व श्री. **पेंडसे** यांचा पाहुणचार स्वीकारून मंडळी २॥ च्या सुमारास हरिहरेश्वरास परत आली. तेथें श्री. कुटुंबे यांच्याकडे भोजन उरकून श्रीहरिहरेश्वराचें दर्शन घेऊन परत वेळासला सायंकाळीं ७॥ च्या सुमारास ही मंडळी आली. रात्रीं 'पुण्यप्रभाव' नाटकाचा प्रयोग यथासांग झाला. शेवटीं श्री. यशवंतराव सोमण यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर समारंभ विसर्जित झाल्याचें जाहीर झालें.

शुक्रवारीं पाहुणे मंडळी परत फिरली. एकंदरींत वेळासकरांनीं उत्सवाचा कार्यक्रम सुव्यवस्थित रीतीनें परिश्रमपूर्वक पार पाडला.

[केसरी-ता. २९-३-१९४६ पान २

श्रीमंत नाना फडणवीस उत्सव

वेळास येथील कार्यक्रम

(रविवार दि. ९-३-४७ फाल्गुन व. ३ शक १८६८)

रत्नागिरी जिल्ह्यांतील अस्थिर परिस्थिति व कांही ठिकाणची सभाबंदी लक्षांत घेऊन यंदाचा उत्सव पुढीलप्रमाणें स्थानिक स्वरूपाचा करण्यांत येणार आहे. यंदा उत्सवाचें अध्यक्षस्थान वेळासचे श्री. ज. कृ. दरीपकर हे स्वीकारणार आहेत.

[केसरी-ता. ४-३-१९४७

श्रीमंत नाना फडणवीस यांचा ४८ वा उत्सव

वेळास येथें रविवार दि. ९-३-४७ ला श्रीमंत नाना फडणवीस यांचा वार्षिक पुण्यतिथि–उत्सव पूर्वनियोजित अध्यक्ष श्री. ज. कृ. दरीपकर यांच्या अनुपस्थितीमुळें श्री. ग. स. **ठोसर** यांच्या अध्यक्षतेखालीं उत्साहानें साजरा झाला. व तो कार्यक्रमाच्या दृष्टीनें भरगच्च झाला. सकाळीं ८ वाजतां श्रीमंत नाना फडणविसांच्या तसबिरीची मिरवणूक निघाली.

कोनशिला समारंभ

मिरवणुकीनंतर श्रीमंत **तात्यासाहेब भानू** (फडणवीस) यांच्या हस्तें **नाना फडणवीस मंदिराची कोनशिला** बसविण्याचा समारंभ झाला. प्रथम श्री. भानू यांनी या प्रसंगाला अनुरूप असें भाषण केलें व त्यांच्या कुळांतील एका थोर पुरुषाच्या स्मारक मंदिराची कोनाशिला बसविण्याचें भाग्य आपल्याला लाभल्याबद्दल वाटणारा आनंद त्यांनी प्रदर्शित केला व हें स्मारक मंदिर आतां दृष्टीपथांत आलें असें अभिमानानें सांगितलें.

यानंतर श्री. **के. बी. जोशी** यांचें भाषण झालें. श्री. जोशी यांनी आपल्या भाषणांत कोनाशिला बसाविण्याचा इतिहास सांगून, श्रीमंत भानूंच्याच हातून तो कां साजरा व्हावा याचें मार्मिक विवेचन केलें. कोनशिला बसविणें हा एक पुढील कार्याचा करारनामा आहे, त्यांत वचनबद्धता आहे व तें कार्य पुरें करण्याचा हा एक प्रकारचा शपथविधीच आहे असें सांगून सर्वांनी या कार्यास मदत करावी अशी विनंति केली.

[केसरी, २१-३-१९४७

स्मारक फंडाची सभा

दोनप्रहरीं मुलांमुलींचे शारीरिक खेळ व सामने झाले. श्री. य. ना. सोमण यांच्याकडे प्रसाद झाला. तिसऱ्या प्रहरीं उत्सवस्थानीं सुवासिनींचें हळदकुंकू झालें. त्याच वेळीं श्री. के. बी. जोशी यांच्या घरीं निधिसमितीची सभा भरली. स्मारक-फंड यापुढें कसा जमवावयाचा यासंबंधीं सभासदांकडून आलेल्या विधायक सूचना मंजूर करण्यांत आल्या. जे दानशूर सद्गृहस्थ पांच हजार किंवा त्याहून जास्त रक्कम या स्मारक कार्याकरितां देतील त्यांचीं नांवें मंदिराच्या निरनिराळ्या विभागांना द्यावीं हा ठराव विशेष महत्त्वाचा होता.

सायंकाळीं सभेचा मुख्य कार्यक्रम झाला. त्या वेळीं प्रथम अध्यक्ष श्री. **ग. स. ठोसर** यांचें भाषण झाल्यावर श्री. य. ना. सोमण यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं मुलांमुलींच्या शारीरिक खेळांच्या सामन्यांप्रमाणेंच प्रत्येक उत्सवांत त्यांच्या वक्तृत्वाच्या चढाओढीहि ठेवाव्या असें सुचविलें.

यानंतर श्री. **के. बी. जोशी** यांनीं आपल्या भाषणांत नाना फडणवसाचें उज्ज्वल चरित्र सांगून त्यांचे अनेक गुण गायिले. श्री. जोशी यांच्या भाषणानंतर अध्यक्ष श्री. ठोसर यांचें समयोचित भाषण झालें. श्री. **काशिनाथपंत करमरकर (भाटे)** यांच्या हस्तें चढाओढींत यशस्वी झालेल्या खेळाडूंना बक्षिसें देण्यांत आलीं. रात्रीं रत्नागिरीचे श्री. **रानडे** यांचें कीर्तन झालें. वेळासचे शाहीर **श्रीकांत वैद्य** यांनीं पोवाडे म्हटले. श्री. य. ना. सोमण यांनीं शाहीरांना पारितोषिक देऊन सर्वांचे आभार मानले व उत्सव संपला.

[केसरी २१-३-१९४७

---

४९ वा उत्सव महात्मागांधींच्या स्वर्गारोहणामुळें केला नाहीं.

नाना फडणविसांची ५० वी पुण्यतिथि, वेळास

वेळास (ता. मंडणगड जि. रत्नागिरी) येथें गुरुवार दि. १७ ला नाना फडणविसांचा पुण्यतिथि उत्सव वेशवीचे श्री. काशिनाथपंत करमरकर तथा बापूसाहेब भाटे यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्यानिमित्त सकाळीं श्री. रामेश्वरास रुद्राभिषेक, नानांच्या छायाचित्राची मिरवणूक नंतर मुलांच्या शारीरिक खेळांच्या चढाओढी; दोनप्रहरीं २ वाजतां विचारविनिमय नंतर स्त्रियांचें हळदी-कुंकू; चार वाजतां अध्यक्ष श्री. काशिनाथपंत तथा बापूसाहेब भाटे यांचें व श्री. य. ना. सोमण यांचें 'नानांच्या राजकारणाचें वैशिष्ट्य' यावर भाषण, होऊन नंतर अहवालवाचन झालें. रात्रौ ९ वाजतां हरिभक्तपरायण श्री. अण्णा करमरकर (वेशवी) यांचें हरिकीर्तन झालें व समारंभ संपला.

य. ना. सोमण,

केसरी, ११-३-४९ कार्यवाह, ना. फ. स्मा. मंडळ.

(श्री. शं. ना. जोशी ह्यांचें भाषण पृ. ७४ पहा).

परिशिष्ट १

इ. सं. ऐ टि. १ ले. १३ } { श. १७१४ आषाढ शु. १३ इ. १७९२ जुलै २

श्री

" विनंती ऐसी जेः — राजश्री पाटीलबाबा जामगांवास आलियावर, तुकोजी शिंदे यांचे नातू दौलतराव शिंदे, वय बारा वर्षांचे त्यांचे लग्नाचा निश्चय करून, श्रीमंतांस व मंडळींस अक्षद द्यावयाकरितां फडणीसास

पाठविलें. त्यांनीं श्रीमंतांस व सर्व मंडळीस अक्षद दिली. सरकारांतून राजश्री गोविंदराव बाजीबराबर अहेर पाठविला. आम्ही आपला अहेर वेदमूर्ति राजश्री गोविंदभट यांजबरोबर पाठविला. त्यांसीं व पाटीलबाबासी निखालसतेचें बोलणें जालें. व त्यांत निखालसता बहुत पाहिली. नंतर मागाहून राजश्री आबा चिटणीस पुढें आले. त्यासी बोलणें होऊन परस्पर निखालसतेचा विधी राजश्री हरिपंत तात्यासुद्धा जाला. नंतर भेटीचा समारंभ जाला. कोणे गोष्टीचा संशय राहिला नाहीं. तुम्हांस कळावया-करितां लिहिलें म्हणोन आज्ञा.

" ऐशियास पत्र पाहातांच रोमांच उभे राहून अति संतोष जाला. याचा विस्तार पत्री किती लिहू? सीमा असे. यावरून ग्रंथाचे ग्रंथ मनांत आले. ते लिहिल्यानें बहुचकपणा दिसतो. दिसो; परंतु जे मनांत आले त्यातून किंचित् अमर्याद करून लिहितो. एक एक रकम मनांत आणून दिर्घ दृष्टीनें तोलून पाहिल्यास खरे आहे असेंच निघेल. ते काय? तपशील—

" अटक नदीचे अलीकडे दक्षिण समुद्र पावेतो हिन्दूंचे स्थान, तुरकस्थान नव्हे. हे आपली हद्द पांडवापासोन विक्रमाजित पावेतो. त्यांनी राखून उपभोग केला. त्यामागें राज्यकर्ते नादान निघाले, यवनाचे प्राबल्य जाले. चकत्यांनी हस्तनापूरचे पद घेतले. शेवटीं अलमगिराचे कारकीर्दीत यज्ञोपवितास साडेतीन रुपये जेजया बसून, ओलें अन्न विकावे, सर्वांनी घ्यावे, हे नौबत गुजरली. त्या दिवसांत कैलासवासी शिवाजी महाराज शककर्ते व धर्मराखते निघाले. त्यांनी किंचित् कोन्यांत धर्म संरक्षण केले. पुढे कैलासवासी नानासाहेब, भाऊसाहेब प्रचंडप्रताप-सूर्य असे जाले, कीं असे कधि जाले नाहीं. अमुक ब्राह्मणांनीं राज्य केले, असें शास्त्रीं-पुराणीं वर्णन नाही. परशुराम अवतारी काय असेल ते असो. त्या गोष्टी-यास शिंदे होळकर दोन बाजू होऊन प्राप्त जाल्या. हल्ली श्रीमंतांचे पुण्यप्रतापेकडून व राजश्री पाटील बाबांचे बुद्धि व तरवारेच्या पराक्रमेंकडून

सर्व घरांस आलें. परंतु जाले कसे? प्राप्त जालें तेणेकडून सुलभता वाटली. अगर मुसलमान कोणी असते तरी मोठ मोठे तवारीखनामे जाले असते. यवनाच्या जातींत तिळाइतकी चांगली गोष्ट जाल्यास गगना बराबर करून शोभवावी; आमचे हिंदूत गगना इतकी झाली असता उच्चार न करावा, हे चाल आहे. असो. अलभ्य गोष्टी घडल्या. उग्याच दौलती पुसत घरास आल्या. यांचे संरक्षण करणे परम कठिण. दोस्त दुष्मन फार. यवनाचे मनांत की काफर-शाही जाली हे बोलतात. लेकिन ज्यांनी ज्यांनी हिन्दुस्थानांत शिरें उचलली त्यांची शिरे पाटीलबाबांनीं फोडली. कोणाच्याहि मनांत हे वाहडले, ते शेवटास जाऊं नये. यास्तव नाना स्वरूपें व युक्तिकडून नाश करावे ऐसे आहेत. न लाभाव्या त्या गोष्टी लाभल्या, त्यांचा बंदोबस्त शककर्त्याप्रमाणें होऊन उपभोग घ्यावे हें पुढेंच आहे. कोठे पुण्याईत उणे पडेल आणि काय दृष्ट लागेल न कळे. जाल्या गोष्टी यात केवळ मुलुख-राज्यप्राप्त इतकेंच नाही. तरी वेदशास्त्र-रक्षण, धर्मसंस्थापन, गोब्राह्मण-प्रतिपालन, सार्वभौमत्व हाती लागणें, कीर्ती यश यांचे नगारे वाजणे, इतक्या गोष्टी आहेत. हे किमया सांभाळणे हक्क आपला व पाटीलबाबांचा, यात व्यत्यास पडला की दोस्त दुष्मन मवजुद. संशय दूर जाले हे अति चांगले. अति चांगले. या उपरी हे जमाव व या फौजा लाहोरच्या मैदानांत असाव्या यांचे मनसबे दौडावे. वेत्यास पडावे, तमाशे पहावे, असे जन जे आहेत ते उशा पायथ्यास लागून आहेत. चैन नव्हते. आता आपण लिहिल्यावरून स्वस्थ जाले. जितके लिहिले इतक्याचे उगेंच मनन व्हावे. खरे कीं लटके हे समजावे. रवाना छ ११ जिलकाद, हे विनंती.''

उत्सव–वृत्त–समाप्त

उत्सवयोजना

येथपर्यंत वेळास येथील श्रीनानाफडणवीस यांच्या ५० वर्षांतील उत्सवांची वार्ता दिली. ह्या उत्सवाचा हेतु--आपल्या थोर पूर्वजांविषयीं कृतज्ञ राहणें, त्यांच्यासंबंधींच्या ऐतिहासिक साधनांचें प्रकाशन करणें, त्यांच्या उदात्त धोरणाचें व सुचरितांचें चिंतन व अनुकरण करून आपल्या वर्तनांनीं इतिहासांतील आपल्या ठिकाणच्या चुकांचें निराकरण करण्याची बुद्धि धरणें; आणि थोर पूर्वजांविरुद्ध उगाच, खोटे व खोडसाळ आरोप कोणी घेतल्यास त्यांचें खंडण करणें—असा मुख्यतः चतुर्विध असून, त्या बरोबरच असल्या उत्सवनिमित्तानें आनुषंगिक म्हणून विद्याविषयक, औद्योगिक उद्योगांना चालना देणें हेंहि कार्य साधावयाचें असतें. त्याप्रमाणें ह्या नाना फडणवीस उत्सवांत ग्रंथ प्रकाशन, स्वदेशीवस्तुप्रदर्शन, ग्रंथालय ह्या गोष्टी प्रसंगपरत्वें झाल्या आहेत. अर्थात् असा हा उत्सव सातत्यानें चालू रहावा म्हणून वेळोवेळीं जी मंडळी नेमिली गेली व योजना वा घटना झाल्या त्यांचेंहि वृत्त ह्या पुस्तकांत येणें उचित आहे. त्यावरून हेंहि ध्यानीं येईल कीं, उत्सवाप्रमाणें ह्याहि बाबतींत भरतीओहोटी वा खंड पडला आहे व म्हणून पुनः पुनः ह्या योजना योजल्या जात आहेत. एखाद्या गोष्टीचा वृत्तान्त द्यावयाचा म्हणजे त्यांत त्या संबंधीच्या आवश्यक त्या सर्वबाबतचा मजकूर येणें इष्ट असतें. ह्या दृष्टीनें उत्सव-योजनाबद्दलचेंहि वृत्त पुढें दिलें आहे.

प्रथम म्ह० इ. १९०९ मध्यें, उत्सवाच्या १० व्या वर्षीं, ह्या उत्सवासंबंधीं जो अहवाल व जी घटना प्रसिद्ध झाली, त्यांतील उपयुक्त भाग उध्दृत करतों.

" वेळास येथील पुढाऱ्यांनीं श्री. नानाफडणवीस यांच्या सारख्या मुत्सद्याचा त्याच्या घराण्याचें मूळस्थान व वतनस्थान आपल्या गांवांत आहे हें जाणून प्रथम शतसांवत्सारिक श्राद्धदिवशीं म्हणजे फाल्गुन वद्य ३ शक

१८२० (सन १९००) या दिवशीं उत्सव करण्याचा विचार केला; व त्याचप्रमाणें उत्सव झाला. प्रथम हा उत्सव दरवर्षी करण्याचा मंडळीचा विचार नव्हता; परंतु उत्सव झाल्यानंतर त्याचें महत्त्व लक्षांत येऊन श्री नानांचा उत्सव वर्षास श्राद्धतिथीच्या दिवशीं करावा असें ठरलें.

'उत्सवाच्या चवथ्या वर्षी म्हणजे सन १९०३ मध्यें उत्सवाची स्थानिक व्यवस्था चांगल्या रीतीनें लागावी म्हणून 'उत्सव मंडळ' स्थापन करण्यांत आलें व त्याच्या दोन शाखा करण्यांत आल्या. वेळास येथील शाखेनें उत्सवाची सर्व व्यवस्था पार पाडावी, व मुंबईच्या शाखेनें वर्गणी



डॉ. नानासाहेब देशमूख

वगैरे जमवून मदत करावी, असें ठरलें. आणि त्याप्रमाणें काम आज पावेतों

चालल होतें.* ह्यासंबंधीचें थोडेसें वृत्त पृ. १७ व २० वर आलें आहे. ही **पहिली योजना व कमिटी** स्थापन झाली तिचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब देशमूख हे होते.

येत्या सालापासून म्हणजे सन १९१० पासून ‘उत्सव मंडळ’ व ‘स्मारक मंडळ’ स्वतंत्र असण्याचें कारण नाहीं. आणि वेळास येथील शाखेलाच पंचकमिटीचें स्वरूप देण्यांत आलें असून उत्सवाच्या **घटनेची व्यवस्था** त्यांच्या स्वाधीन केली त्या संबंधानें सविस्तर माहीतीचें पत्रक वेगळें काढलेलें आहे.

“ या उत्सवाच्या उत्पत्तीशीं रा. रा. केशव बाळकृष्ण जोशी यांचा विशेष संबंध होता. त्यामुळें दरवर्षी उत्सवाप्रीत्यर्थ बाहेरची जी जमा उत्सवाकडे येई, तींत जरूरीप्रमाणें लहानमोठ्या रकमा पदरच्या घालून उत्सव पार पडत असे. बाहेरची जमा जमविण्यामध्यें कै० रामचंद्र नारायण रानडे उत्सव मंडळाचे पहिले अध्यक्ष हे स्वतः ठिकठिकाणीं फिरून मेहनत करीत असत; ते दोन वर्षांपूर्वी कैलासवासी झाले. तेव्हां-पासून त्यांच्या मेहनतीनें जमणारी वर्गणी हातीं येत नाहीं. पत्रें गेलीं असतां ज्यांकडून अवश्य वर्गणी येते असे सभासद थोडे आहेत, व अशा-प्रकारें जी वर्गणीची रक्कम हातीं येते तींतून उत्सव कार्यक्रम पार पडणें अशक्य आहे. उत्सव मंडळाच्या जमेच्या साधनाची अशी स्थिति असल्यानें कायम–फंडाची कल्पना अमलांत आल्या शिवाय उत्सवाचा वार्षिक कार्यक्रम नीट रीतीनें पार पडणें शक्य नाहीं असें स्पष्ट दिसून आलें.

---

* वर्ष १० सन १९०९ राष्ट्रीय संकटपरंपरेमुळें व चमत्कारिक परिस्थितीमुळें या वर्षाचा उत्सव सामान्य प्रमाणावरच करण्यांत आला. अर्थात् नमूद करण्यासारखी गोष्ट या वर्षीं कांहीं झालेली नाहीं. धार्मिक कृत्यें, भजन, वगैरे प्रकार उत्सवांत करण्यांत आले (पान ५३ पहा.).

तेंव्हां फडणवीस-स्मारककमिटीमार्फत कायम—फंडासंबंधानें देशांत ठिक-ठिकाणीं पत्रें पाठविण्यांत आलीं. व त्या अन्वयें सन १९०८।०९ सालीं आतांपर्यंत एकंदर रोख व येणें मिळून हजार रुपये जमा झाले आहेत; त्याची तपशीलवार पोंच व हिशोब पुढें दिले आहेत. (मागील छा. वृ. पृ. १४, १७-२०).

"कायमफंड आज जमला आहे, त्याचें आजच्या स्थितींत सुमारें पन्नास रुपये व्याज येईल. आणि वार्षिक उत्सवाचा जमाखर्चाचा जो तक्ता दिला आहे त्यावरून अंदाज करितां, सुमारें १२५ रुपये उत्पन्न असल्या शिवाय उत्सव चांगल्या प्रकारें होणें शक्य नाहीं. उत्सवांत ऐतिहासिक व्याख्यान, कीर्तन, पुराण, मंत्रजागर, समाराधना, शिष्टसत्कार, दिवाबत्ती इत्यादि ज्या खर्चाच्या गोष्टी होतात, त्या सर्व लक्षांत घेतां ही रकम विशेष नाहीं. म्हणजे कायम फंडांतून उत्सवाला कायम रूप आणण्या करितां आणखी दीड दोन हजार रुपये पाहिजेत. ह्या गोष्टीकडे श्रीमंत नाना फडणीसां-संबंधानें प्रेम व पूज्यभाव बाळगणाऱ्या सर्व महाराष्ट्रीयांचें लक्ष जाईल अशी आशा आहे. (छापील दशवार्षिक अहवाल पृ. १३).

"**प्रकाशन** :—श्री. नानांच्या संबंधी ऐतिहासिक माहितीचा प्रसार होऊन नानांची योग्यता नवीन पिढीच्या मनांत यावी या हेतूनें गेल्या नऊ वर्षांत उत्सव मंडळानें शक्य तें काम केलें आहे. सर्व पुस्तकें रा. रा. गणेश नारायण जोशी, विजय छापखान्याचे मालक, यांनीं उदार अंतःकरणानें छापण्याचें अंगावर घेतलें, हे त्यांचे उत्सव-संस्थेवर उपकार आहेत. या पुस्तकांचे विषय उत्सवमंडळानें आगाऊ प्रसिद्ध करून त्यावर बक्षिसें लाविलीं व ज्यांचीं पसंत ठरलीं, त्यास तीं बक्षिसें देण्यांत आलीं. (पान १३, २०, टीप ३६, ४१ व ४७, ५२ पहा, छा. दशवार्षिक अहवाल पृ. १३).

१९०४ वि. दा. सावरकर 'ऐ. पुरुषांचे उत्सव कां करावे'. १९०५ कृ. म. संत 'मराठ्यांचे इतिहासांत नानांचें महत्त्व.' इ. १९०६ सालीं

श्री. नानांनीं बांधून आणिलेल्या पाण्याचे पाटाची दुरुस्ती केली. (खर्च रु. ३०) व रा. कृ. पां. (ऊर्फ राधारमण) लिमये 'नानांचे कविताबद्ध चरित्र'. तसेंच इ. १९०७ ह्या वर्षी स्वदेशी बाजारासंबंधानें सर्टिफिकिटें वगैरे देण्याकडे विशेष खर्च झाला. शिवाय रा. एस्. एम्. भागवत व रा. एन्. एस्. भाटे यांना 'नानासंबंधीं ऐ. गद्य नाटक' व 'नानासंबंधीच्या ऐतिहासिक दंतकथा' ह्यांबद्दल बक्षीस दिलें. तसेंच 'नानांचा अधिकारयोग' हा श्री. वासुदेवशास्त्री खरे-ह्यांचा छोटा पण उत्तम ऐ. निबंध वाचला; 'फडणीस वाचनालय' हेंहि ह्याच वर्षी सुरु केलें. ह्याप्रमाणें ह्या उत्सवप्रसंगानें इतर कार्यें झालीं आहेत.

"येत्या वर्षा पासून घटनेअन्वयें उत्सवाला नियमित स्वरूप देण्यांत आलें; व त्यांत आंखून दिल्या मार्गाप्रमाणें तो प्रतिवर्षी पार पाडण्याचें काम वेळास येथील पंचांवर सोंपविण्यांत आलें. (इ. १९१० अहवाल पृ. २१).

"गेल्या दहा वर्षांत उत्सवाला ज्यांनी मदत केली त्यांचा उल्लेख पूर्वी एकदां आलेलाच आहे. परंतु त्यांतले त्यांत रा. रा. माधवराव नारायण पाटणकर यांनीं केलेल्या मदतीचा पुन्हां एकदां उल्लेख करणें इष्ट आहे. त्यांच्या देणगीनें फडणीसांच्या ७ व्या व ८ व्या उत्सवाला बरीच मदत झाली. रा. रा. के. टी. डोंगरे यांच्या मदतीनें ९ व्या उत्सवाचा भार कमी झाला आहे. त्याचप्रमाणें इतर मंडळींनीं वेळोवेळीं आपआपल्या शक्तीप्रमाणें शारीरिक व द्रव्याची अल्पस्वल्प मदत केली असल्यामुळें उत्सवाच्या चालकांचा भार अंशतः कमी झाला हें खरें आहे. तथापि फडणिसांचा हा ९ वर्षे उत्सव, माधवबागेंतील सभा, संस्थेचें दप्तर, प्रवासखर्च, टपाल, छपाई व इतर अनेक प्रकारांनीं होणारा खर्च ध्यानांत घेतां वरील मदत पुरेशी नव्हती; अशा स्थितींत भरीचा खर्च रा. रा. केशव बाळकृष्ण जोशी यांनीं जरूरीप्रमाणें मोठ्या प्रेमानें पदरचाच केला

असल्यामुळें त्यांनीं संस्थेला एकप्रकारें ऋणी करून ठेविलें आहे. (सदर अहवाल पृ. २२).

[२]


" नाना फडणविसांचें स्मारक व उत्सव वगैरेकरितां, त्यांच्या मूळच्या



श्री. य. ना. सोमण, कार्यवाह ना. फ. स्मा मं.

ठिकाणचा ट्रस्ट करण्यांत आला. त्यासंबंधीची माहिती अहवालांत थोडक्यांत नमूद करणें इष्ट वाटल्यावरून ती पुढें दिली आहे.

" कोकणांतील रत्नागिरी जिल्हा हा महाराष्ट्राला ललामभूत झालेल्या अनेक व्यक्तींची खाण म्हणून समजला गेला आहे. याच जिल्ह्यांतील वेळास या गांवीं, सुप्रसिद्ध मुत्सद्दी **नाना फडणवीस** यांच्या पूर्वजांचें मूळचें ठिकाण आहे. फडणविसांचे (भानूंचे) घराण्यांतून हें ठिकाण कालचक्राच्या तडाक्यांत सांपडून, खरेदीहक्कानें रा. उपाध्ये यांच्याकडे गेल्याला आज सुमारें पंचवीस तीस वर्षें झालीं असतील. या ठिकाणांत पूर्वपरंपरेनें चालू असलेले भानूंचे मानपान देण्याघेण्याकरितां ज्या जागेंत, ज्या वेळीं ग्रामस्थ उपयोग करीत असत, त्या जागेंत ते हक्कसंबंध तसेच चालू ठेवण्याची परंपरा रा. उपाध्ये यांनीं चालू ठेवावी, म्हणून ग्रामस्थांकडून प्रयत्न करण्यांत आले. त्यांत हें प्रकरण ग्रामस्थांना कोर्टांत नेणें भाग पडलें. अखेरीस भानूंचे मानपान देण्याघेण्याच्या ज्या जागा पूर्वापार पद्धतीनें चालू होत्या, त्याच जागा ग्रामस्थांना ठराविक दिवसांकरितां कोर्टाकडून आंखून देण्यांत आल्या. पुढें भानूंचे ठिकाणाचे खरेदीदार रा. विष्णु रघुनाथ उपाध्ये, हे श्री. य. ना. सोमण यांजकडे, अहवाल-लेखकाकडे व. रा. ल. बा. कोंकणे यांच्याकडे मुंबईस आले. आणि आपल्या जन्मभूमीचा गौरव वाढविण्यास व आपली जन्मभूमि इतिहासप्रसिद्ध होण्यास जी महान् विभूति कारणीभूत झाली, त्या विभूतीचें स्मारक स्थापण्याच्या मार्गांतील कांहीं महत्त्वाच्या अडचणी दूर करतां येतील तर कराव्यात, या एकाच व निःस्वार्थ बुद्धीनें व सर्व दृष्टीनें विचार करून, रा. विष्णुपंत यांनीं फडणवीस ठिकाणचा घरटा व घरट्यासमोरील रस्त्यापर्यंतची खुली जागा, नाना फडणविसांच्या स्मारक व उत्सव वगैरे कार्यासाठीं देणगी म्हणून देण्याचें कबूल केलें. या सुमारास त्या ठिकाणाचे लिलावदार रा. धोंडो रामचंद्र उपाध्ये यांनींही देणगीपत्राला मान्यता देण्याचें कबूल केलें. श्री. कोंकणे यांनीं ज्या चिकाटीनें मेहनत घेतली, व मदत केली ती अलौकिक होती हें नमूद करणें जरूर आहे. उपाध्ये लिलावदार रा. धों. रा. उपाध्ये यांनीं वेशवी येथील



श्री. य. ना. सोमण, श्री. ल. बा. कोकणे, श्री. पु. वा. करभरकर–ट्रस्टी

रहाणारे तडजोडकुशल श्री. पुरुषोत्तम वामन उर्फ अण्णा करमरकर व सोमण आणि कोकणे असे त्रिवर्ग मुंबईहून ता. १० आक्टोबर १९४२ रोजीं वेळासला जाऊन त्यांनीं उभयतां उपाध्ये-बंधूंत, निर्णयात्मक अशी अखेरची तडजोड घडविली. उपाध्ये बंधूंकडून फडणवीस ठिकाणचा ट्रस्ट त्याच दिवशीं घडविला गेला. या प्रकरणांत श्री. सोमण, श्री. कोकणे व श्री. करमरकर या तिघांनीं, निःस्वार्थ बुद्धीनें जी अवर्णनीय मेहनत घेतली त्याबद्दल उपाध्ये बंधूंनी त्या तिघांनाच फडणवीस ठिकाणाचे ट्रस्टी म्हणून नेमण्यांत, फारच औचित्य दाखविलें असें कोणीही कबूल करील. याप्रमाणें उपाध्ये बंधूंनी ट्रस्टी नेमून व देणगीपत्र घडवून, फडणीस ठिकाणाचा ताबा ट्रस्टींना तारीख ११ आक्टोबर १९४२ रोजीं ग्रामस्थ मंडळींच्या समोर दिला. व देणगीपत्राचा दस्तऐवज घडवून, तो तारीख १५ आक्टोबर १९४२ रोजीं मेहरबान रजिस्ट्रार साहेब मुंबई यांच्या कचेरींत रजिस्टर करण्यांत आला. (इ. १९४३ चा अहवाल पृ. १ ते ४)

देणगीपत्र

तारीख ११ माहे आक्टोबर] सन १९४२.

वे. रा. रा. **विष्णु रघुनाथ निजसुरे, उपाध्ये** राहाणार वेळास, पेटा मंडणगड. वे. रा. रा. **धोंडो रामचंद्र निजसुरे, उपाध्ये** राहाणार वेळास, पेटा मंडणगड.	देणगीपत्र घडविणार,

आम्हीं या लेखानें देणगीपत्र घडवितों कीं,

मौजे वेळास पेटा मंडणगड या गांवीं ठिकाण सर्वे नंबर १३४ पोट विभाग ० जमीन १.२६ आकार रुपये २१.५.० यांत असलेले खुलें चिरेबंदी चौथरा लांबी फूट ४४ रुंदी फूट २८ व पूर्व, उत्तर, दक्षिण या

बाजूस चौथऱ्याखालील व पूर्व बाजूस तिन्ही अंगांस दोन फूट प्रमाणें खुली जागा व पश्चिम बाजूस चौथऱ्यापासून राजरस्त्यापर्यंत खुलें आंगण त्याची लांबी फूट ४८ व रुंदी फूट ३७ हें क्षेत्र असलेल्या चौथऱ्यासह मूळ खरेदीदार व वहिवाटदार म्हणून विष्णु रघुनाथ व आज खरेदीदार धोंडो रामचंद्र यांनीं आपसांत घडविलेलें करारपत्रांत केलेले उल्लेखाप्रमाणें देणगी म्हणून दिलें आहे. त्याचे देणगीपत्र कायदेशीर रजिस्टर करणेचें आहे. व :या मिळकतीचा कब्जा आम्हीं नेमून दिलेले ट्रस्टी खालीलप्रमाणें

१. **श्री. रा. लक्ष्मण बाळकृष्ण कोकणे, रा. वेळास.**
२. **श्री. रा. यशवंत नारायण सोमण, रा. वेळास**
३. **श्री. रा. पुरुषोत्तम वामन करमरकर, रा. वेशवी**

या तिघांचे कब्जांत आज रोजीं प्रत्यक्ष सदर मिळकत ताब्यांत दिली आहे. सदर देणगी देणारे यांनीं त्यांचे वडील यांची इच्छा कै. बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस हें आपले यजमान व आपण त्यांचे कुलगुरु उपाध्याय असल्यामुळें त्यांचे स्मारक-उत्साह करणें करितां देणगी म्हणून देणेची होती, ती इच्छा पुरी करण्याकरितां म्हणून आम्हीं स्वखुषीनें देणगीपत्र घडवून वरील ट्रस्टी नेमून त्यांचे स्वाधीन केली आहे.

वरील ट्रस्टींपैकीं एकाद्यास कमी करणेचा अगर होणेचा असल्यास नवीन नेमून घेणेची जबाबदारी बाकी दोघांवर राहील. व तसा नेमून घेणेचा आहे.

सदर मिळकतींत कब्जा त्रिवर्गांनीं अगर व्यक्तिशः स्वतःकरितां करणेचा नाहीं, फडणीस यांचे स्मारक, पुतळा अगर उत्साह करणेकरितां करावयाचा आहे. कोणास कोणत्याही प्रकारें आम्हांस अगर ट्रस्टीस गहाण, बक्षीस, करून देणेचा हक्क नाहीं. सदर नंबरांत अगर ठिकाणांत विहीर आहे. तिचा उपयोग या संस्थेकरितां जरूर तितका करणेचा आहे. स्वतः-

करिता मात्र करणेचा नाहीं. सदर ठिकाण बक्षीस आहे. यापुढें काहीं सरकार बाबत आल्यास ती ट्रस्टींनीं दूर करणेची आहे.

सदर ठिकाणीं कागदी नाना फडणीस यांचें नांव दाखल होणेचे असलेबद्दल आम्हीं कबूली देऊं. हें देणगीपत्र आम्हीं दोघांनीं स्वसंतोषानें केलें आहे. तारीख मजकूर हस्तअक्षर यशवंत कृष्ण वैद्य, राहाणार वेळास.

साक्ष	सह्या
महादेव विष्णु निजसुरे, उपाध्ये द. खु.	विष्णु रघुनाथ निजसुरे, उपाध्ये द. खु.
अनंत विष्णु निजसुरे, उपाध्ये द. खु.	धोंडो रामचंद्र निजसुरे, उपाध्ये द. खु.

हरी केशव कोकणे. द. खु.

गणेश आत्माराम गैलाडवर्तक द. खु.

[३]

" हा ट्रस्ट घडल्यानंतर श्री. के. बी. जोशी यांच्या चरित्र पुस्तकांत, त्यांनीं स्वतःची म्हणून एक स्मारक योजना दिली होती. परंतु नाना फडणविसांचें वास्तु ठिकाण, ट्रस्टींच्या ताब्यांत आलेलें पाहून, त्यांनीं आपली योजना रद्द केल्याचें केसरींत प्रसिद्ध केलें. व ट्रस्टींनी आंखलेल्या स्मारक योजनेस मनःपूर्वक पाठिंबा दिला (पृ. ६५, ६६ पहा). याबद्दल श्री. के. बी. जोशी यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच होईल. श्री. केशवरावजींची ही खेळीमेळीची वृत्ती लक्षांत घेऊन, आम्ही त्यांच्याच नेतृत्वाखालीं एक तात्पुरतें स्मारक मंडळ नेमलें. ह्या मंडळानें एक जाहीर पत्रक काढून, स्मारकाची व उत्सवाची रूपरेषा तयार केली. व केसरीद्वारां सर्व जनतेपुढें मांडली.

" ज्या लोकमान्यांच्या प्रेरणेनें व शुभाशीर्वादानें उत्सव सुरू झाला, ते लोकमान्य आज हयात असते तर भानूंचा घरटा उत्सवार्थ मिळाला व त्या

भानू घराण्याच्या वास्तूंत होणारा उत्सव पाहून त्यांना धन्य धन्य वाटलें असतें यांत संदेह नाहीं. (सदर १९४३ चा अहवाल पृ. ४).

"रत्नागिरी जिल्ह्यांतील वेळास या प्रसिद्ध गांवीं पेशवाईतील सुप्रसिद्ध मुत्सद्दी **नाना फडणवीस** यांच्या **पुण्यतिथीचा उत्सव** इ. सन १९०० सालापासून १९१६ पर्यंत मोठ्या थाटानें व पूर्वकालीन अभिमानानें होत असे हें महाराष्ट्रीयांस अवगत आहेच. १८९९ सालीं रायगडास श्रीशिवाजीमहाराजांचा महोत्सव लो. टिळकांच्या प्रोत्साहनानें मोठ्या प्रमाणावर झाला. त्याच उत्सवांतून ही कल्पना निघाली, कीं, पुढील म्हणजे १९०० सालीं राज्यकार्यधुरंधर श्री नाना फडणवीस ह्यांची शतसांवत्सरिक पुण्यतिथी येत असल्यानें त्यांचा उत्सव मोठ्या प्रमाणांत वेळास येथें व्हावा. लो. टिळकांनीं या योजनेला उत्साहपूर्वक पाठिंबा दिला. श्री नानांचें एक मोठें चित्र, थोडेसें प्रोत्साहक लेखपत्र आणि रु. २५ असे श्री. के. बी. जोशी यांचेकडे लो. टिळकांनीं पाठवूनहि दिले. आधींचीच उत्साही व कर्तृत्वशील वृत्ती व त्यांत ही लोकमान्यांची प्रेरणा व प्रोत्साहन, मग उणें काय? उत्सवास एकदम प्रारंभ झाला. पुढेंही त्यांच्याच प्रोत्साहनानें हा नानांचा पुण्यतिथीचा उत्सव वेळास येथें बरीच वर्षें चालू राहिला, व त्याला त्यांचेमुळें राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें. कै. लोकमान्य टिळक, कै. दादासाहेब खापर्डे, कै. शिवरामपंत परांजपे. कै. वासुदेवशास्त्री खरे, कै. दादासाहेब करंदीकर, कै. प्रो. भानु, कै. गजानन भास्कर वैद्य, श्री. नरसिंह चिंतामण केळकर, श्री. द्रवीड, इंदुप्रकाशचे एडिटर–करंदीकर वगैरे अनेक थोर थोर पुरुष व इतिहासज्ञ वेळास गांवीं उत्सवानिमित्त येऊन, त्यास त्यांनीं पुनीत केलें आहे. तसेंच या उत्सवाच्या निमित्तानें नानासंबंधीं अनेक पुस्तकें व निबंध बाहेर पडून मराठी वाङ्मयांत थोडी फार भर पडली आहे. (जाहीर विनंतीपत्र).

नवीन चालना

" चालू सालच्या उत्सवापासून **नानांच्या पुण्यतिथीच्या उत्सवाला** परत सुरुवात होत असून त्याला महत्त्वाचें स्वरूप प्राप्त होत आहे. प्रारंभीं हा उत्सव नानांनींच बांधलेल्या श्रीकाळभैरवाच्या देवालयाच्या सभामंडपांत होत असे. पण **आतां श्री. भानूंचें ठिकाण त्यांच्या इस्टेटीच्या खरेदीदारांनीं नानांच्या स्मारकासाठीं उत्सवासाठीं म्हणून कायदेशीर ट्रस्ट करून तें ठिकाण ट्रस्टींच्या स्वाधीन** केलें आहे. अर्थात् भानूंच्या मूळ ठिकाणावर **उत्सव करणें आतां औचित्याला धरून आहे, व त्यांत वैशिष्ट्यहि आहेच आहे.**

स्मारकाची योजना

" स्मारकाची साधारणपणें रूपरेषा खालीलप्रमाणें राहील:——१ भानूंच्या स्मारक ठिकाणाला चारी बाजूनें **तटबंदी**, २ नानांच्या नांवें सुंदर **फडणवीस मंदिर.** ३ मंदिराच्या मध्यभागीं नानांचा **अर्धपुतळा,** ४ **वार्षिक** उत्सव **सुरू ठेवण्याची योजना.** ५ मंदिराच्या उजव्या बाजूस एक **सभागृह.** ६ मंदिराच्या दुसऱ्या बाजूस **फडणवीस वाचनालय,** ७ वर्षास एक ऐतिहासिक **निबंध बक्षिसार्थ नेमणें** व तो **छापून प्रसिद्ध करणें,** ८ विशिष्ट अशा मोठ्या रकमा देणाऱ्या सद्गृहस्थांचीं नांवें संगमरवरी दगडावर कोरून मंदिरामध्यें दर्शनी भागावर बसविलीं जातील. (सदर पत्र).

अदमासे खर्च व व्यवस्था

,, ह्या सर्व संकल्पित कार्यास अदमासें खर्च रुपये (२५०००) पंचवीस हजार लागेल असा अंदाज आहे. महाराष्ट्रीय संस्थानिक, सरदार, श्रीमंत लोक व सर्वसाधारण इतिहासप्रेमी स्त्री–पुरुष ह्यांनीं मनांत आणल्यास ही रक्कम सहज उभी रहाण्यासारखी आहे. अशी आमची मनोदेवता सांगत आहे.

" ह्या कार्याप्रीत्यर्थ मिळणाऱ्या सर्व रकमेची पोंच वेळोवेळीं **केसरींत** प्रसिद्ध केली जाईल.

"स्मारकाच्या रकमेच्या व्याजांतून वार्षिक उत्सवाची व्यवस्था शक्य होईपावेतों, चालू उत्सव, स्मारकाच्या फंडांतून ठराविक प्रमाणांतच साजरा केला जाईल.

सारांश

आमची योजना स्पष्ट आहे, रकम सुरक्षित ठेवण्याची त्यांत व्यवस्था आहे. तसेंच सदरहू योजना लोकादरास मान्य होण्यासारखी आहे. तरी सर्व **महाराष्ट्रीय जनतेनें संस्थानिकांनीं व धनिकांनीं** आम्हांस सढळ हातानें मदत करून आम्हीं योजिलेलें श्री नाना फडाणवीसांचें स्मारक पूर्णपणें यशस्वी करावें अशी कळकळीची विनंती आहे.

आपले,

ल. बा. कोंकणे
य. ना. सोमण
पु. वा. करमरकर
ट्रस्टीज व कार्यवाह

के. बी. जोशी, अध्यक्ष
नाना फडणवीस स्मारक व उत्सव कमिटी
ज. बा. भानू
उपाध्यक्ष

[३]

"भानूंच्या ठिकाणांत जी जागा फडणवीस स्मारक व उत्सव वगैरेकरितां देणगीपत्रानें मिळाली आहे; त्या जागेंत, ज्या ठिकाणीं भानूंचे मानपान दण्याघेण्याचे ग्रामस्थांचे जे हक्कसंबंध, पूर्वपरंपरेनें चालत आलेले आहेत, त्यांत देणगीपत्रामुळें कोणताही बाध अगर अडचण येणार नसून, ते हक्क-संबंध यापुढेंही तसेंच चालू राहतील. किंबहुना ते हक्कसंबंध यावच्चंद्रदिवाकरौ टिकावेत, व ग्रामस्थांना भानूंच्या कामकाजाकरितां अथवा उत्सव वगैरे कार्याकरितां भानूंच्या ठिकाणांत मोकळेपणानें व उत्साही अंतःकरणानें कामें करितां यावींत, म्हणूनच ती जागा मिळविण्याकरितां आमची खटपट चाललेली होती. परमेश्वरकृपेनें ती जागा मिळविण्यांत आपणांस यश

आलेलें आहे. त्या जागेचें योग्य तें चीज व उपयोग सर्व ग्रामस्थांनींच करून घ्यावयाचा आहे. तरी गांवांतील ब्राह्मण अथवा ब्राह्मणेतर मंडळींनीं, त्या जागेबद्दल अगर हक्कसंबंधाबद्दल कोणताही गैरसमज करून घेऊं नये व झाला असल्यास किंवा कोणी करून दिला असल्यास तो गैरसमज दूर करावा अशी सर्वांस आमची विनंती आहे (१९४३ अह. पृ. ८).

"महाराष्ट्र व्यापारी परिचय" ह्या नांवाखालीं श्री. के. बी. जोशी यांच्या चरित्राचें एक पुस्तक प्रसिद्ध झालेलें असून, त्या पुस्तकांतील पहिल्याच पानावर "या पुस्तकाचे सर्वाधिकार श्री. नाना फडणीस स्मारक समितीकडे आहेत" असें छापलेलें आहे. या पुस्तकाचें प्रकाशन ज्यावेळीं झालें, त्यावेळीं फडणीस ठिकाणाचा ट्रस्ट झालेला नव्हता. अर्थात श्री. केशवराव जोशी यांची स्मारक योजनेची कल्पनासुद्धां, अन्य जागेबद्दलची होती, व त्यांची स्मारक योजना घडण्यावर फडणवीस समितीची स्थापना अवलंबून होती. आतां फडणविसांच्या स्मारक योजनेकरितां जागा मिळाली असल्यानें त्यांच्या स्मारक योजनेच्या सर्व कल्पना त्यांनीं रद्द केल्याचें जाहीर केलेलें आहेच. तरी श्री. के. बी. जोशी यांचे चरित्र–पुस्तकाचे सर्वाधिकार वैयक्तिक त्यांचेकडेच असून, आमचे स्मारक–किंवा उत्सव–समितीकडे त्या पुस्तकाचे कोणतेहि हक्कसंबंध नाहींत. (१९४३ अह. पृ. ८).

"आमच्या विनंतीला मान देऊन यंदाच्या उत्सवाला दूरदूरच्या गांवची बरीच मंडळी आलेली होती. जी मंडळी दोनप्रहरीं २ वाजेपर्यंत येऊं शकली त्यांची जेवणाखाण्याची व बसण्याउठण्याच्या जागेची व्यवस्था, व्यवस्थापक मंडळीनें केलेली होती. परंतु सायंकाळपासूनच मुख्य कार्यक्रम व्हावयाचे असल्यानें, रात्रौ बऱ्याचशा मंडळींची गैरसोय झाली त्याबद्दल आम्हीं दिलगीर आहोंत. (१९४३ अह. पृ. ८).

"वेळासच्या चैत्री यात्रेंत, रथ यात्रेच्या दिवशीं, भानूंच्या ठिकाणासमोर ज्यावेळीं रथ बसविण्यांत येतो, त्यावेळीं भानूंची मानाची पूजा होत

असते. ती झाल्यानंतर नाना फडणविसांची अशी स्वतंत्र पूजा घेतली जावी अशी विनंती ट्रस्टींनीं कारभारी श्री. गणेश आत्माराम गैलाड यांस पत्र पाठवून केली तरी श्री. गैलाड आमचे पत्राचा सहनुभूतिपूर्वक विचार करतील अशी आम्ही आशा बाळगतों. (१९४३ अह. पृ. ९).

" दासगांव ते बाणकोटपर्यंत अध्यक्ष व पाहुणेमंडळी ज्या मोटार लॉंचनें आली, त्या मोटार लॉंचचे मालक श्रीमंत कृष्णाजी वामन करमरकर (वेशवी) यांनीं निःस्वार्थ बुद्धीनें वाजवी भाडें सुद्धां न घेतां जी मेहनत घेतली, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. तसेंच वेळासचे फडणवीस स्मारक जागेंत, सांजवाती लावण्याकरितां एक कंदील वरील श्री. करमरकर यांनीं स्वखर्चानें देणगी म्हणून दिला आहे. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. याच कंदिलाला लागणाऱ्या तेलाचा खर्च (स्मारक मंडळाकडून थोड्याच दिवसांत खर्चाची योजना होईपर्यंत) मुंबईतील यशवंत आरोग्य भुवनाचे मालक श्री. य. ना. सोमण यांनीं देण्याचें कबूल केलें आहे, त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. (सदर).

" नाना फडणविसांनीं बांधलेल्या कालभैरवाच्या देवालयाला आज जवळ जवळ दीडशें वर्षें होऊन गेलीं असावींत. एवढ्या दीर्घ मुदतीच्या अवधींत बांधकामाची दुरुस्ती होणें जरूर, हें ओळखून जरूर तेवढी दुरुस्ती करण्याचें काम श्री. सखाराम रघुनाथ उपाध्ये (हल्लीं मुक्काम रोहा) यांनीं स्वखर्चानें सुमारें दहा वर्षांपूर्वीं केलें. या जीर्णोद्धारास त्यांनीं बरीचशी रक्कम खर्च केल्याचें समजतें. त्यांनीं केलेल्या या बहुमोल व प्रशंसनीय कामगिरीबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतों. (सदर अह. पृ. ९).

"कै. नारायण गोविंद सोमण यांच्या व कै. कृष्णाजी रघुनाथ निजसुरे यांच्या स्मरणार्थ अनुक्रमें रु. १२५ व रु. २५० अशा देणग्या त्यांचे चिरंजीव यशवंत नारायण सोमण व बळवंत कृष्णाजी निजसुरे यांनीं स्मारकाकरितां म्हणून दिल्या, त्याबद्दल स्मारक मंडळ त्यांचे आभारी आहे.

" मुंबई, पुणे इ. येथें राहणाऱ्या वेळास ग्रामस्थांनीं व खुद्द वेळासच्या ग्रामस्थांनीं, उत्सवाबद्दल जी आस्था, कळकळ व कर्तव्यतत्परता दाखविली व उत्सवसमाप्तीपर्यंत सर्वांनीं एकजुटीनें जी मेहनत घेतली व घेत आहेत ती अभिनंदनीयच ठरेल. विशेष उल्लेखनीय अशी मदत ज्यांची झाली त्यांचा नामनिर्देश करणें जरूर वाटतें:—रा. यशवंत कृष्ण वैद्य, रा. दामोदर महादेव जोशी, रा. गदाधर सखाराम ठोसर, रा. दत्तात्रय नारायण सोमण, रा. कमळाकर वासुदेव जोशी, रा. अनंत गणेश जोशी, रा. गजानन गोविंद जोशी, रा. गणेश आत्माराम गैलाड, रा. वासुदेव धोंडो कुटुंबे, रा. विनायक हरी जोशी, रा. चिंतामण गोविंद जोशी, रा. दत्तात्रय विश्वनाथ जोशी, रा. रघुनाथ परशुराम गैलाड, रा. पुरुषोत्तम रामचंद्र वैद्य, रा. बळवंत कृष्णाजी निजसुरे, रा. वि. र. उपाध्ये, रा. वि. ल. वैद्य, रा. यशवंत रावजी चोळकर, रा. गोपाळ कृष्ण वैद्य, रा. केशव कृष्ण वैद्य, रा. भास्कर हरी जोशी, रा. अण्णा करमरकर, रा. गोविंद पुरुषोत्तम जोशी, सदाशिव शिवराम ओक, रा. हरी गंगाधर पाटणकर, रा. सत्यबोध विष्णू वर्तक, रा. शंकर धोंडो कुटुंबे, रा. शिवराम गजानन ऊर्फ शिवा जोशी, रा. नारायण गोपाळ ऊर्फ अप्पा मेहेंदळे, रा. हरबा करमरकर, नारायण केशव जोशी, पंढरीनाथ वामन जोशी, दत्तात्रय गदाधर ठोसर, भालबा पंडित वगैरे तरुण मुलांनीं स्वयंसेवक पथक स्थापून उत्सवांतील कार्यक्रम शिस्तीनें पार पाडण्यांत जी अमूल्य मदत केली त्याबद्दल त्यांचा उल्लेख करणें अवश्य आहे. (पृ. १४).

या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों. ब्राह्मणेतर मंडळीमध्यें उत्सवासंबंधीं कांहीं गैरसमज उत्पन्न होऊन, त्यांची जी निष्कारण दिशाभूल होणार होती तशी न होऊं देण्यांत व झालेले गैरसमज दूर करण्यांत रा. जगन्नाथ कृष्णाजी दरीपकर यांनीं जी मनःपूर्वक मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. (सदर अह. पृ. १०).

" या उत्सव प्रसंगीं रत्नागिरी जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांपासून तो खालच्या अधिकाऱ्यांपर्यंतच्या सर्व अधिकाऱ्यांनीं, उत्सवाबद्दल जी सहानुभूति दाखविली, त्याबद्दल त्या सर्व अधिकाऱ्यांचे आम्हीं आभारी आहोंत.

" उत्सवाकरितां खालील सद्‌गृहस्थांकडून शुभसंदेश आले होते. श्रीसदगुरु नारायणमहाराज (केडगांव), बॅरिस्टर जमनादास मेथा (मुंबई) श्रीमंत बाबासाहेब खापर्डे (उमरावती); श्री. दामोदर विश्वनाथ ऊर्फ बाबुराव गोखले (केसरी ऑफिस पुणें), श्री. भालचंद्र गजानन निजसुरे (आंजर्लें); वे. शा. दांडेकरबुवा कीर्तनकार (गुडघें); श्री. सखाराम रघुनाथ उपाध्ये (रोहा), श्री. सखाराम गोविंद जोशी (पुणें), श्री. भालचंद्र काशिनाथ जोशी (पुणें).

आवर्जून साभारोल्लेख करावासा वाटतो तो वृत्तपत्रकारांचा. ह्यांत केसरी, प्रभात, लोकमान्य, काळ, सकाळ, इ. इ. सर्व पत्रें व त्यांतील संपादकादि मंडळी येतात. संपादकांसमवेत सहसं०, वार्ताहर येतातच. पण त्यांचा स्वतंत्रपणें उल्लेख अवश्य आहे. सहसं० श्री. रा. शि. सहस्रबुद्धे, श्री. द. गो. भिडे, इ. इतर सर्वांचीं नांवें माहीत नाहींत; त्या त्या सर्वांचे आभारी आहों.

" वेशवीचे श्रीमंत करमरकर हे स्वतःची मोटार लॉंच उत्सवाकरितां येणाऱ्या जाणाऱ्या परस्थ पाहुण्यांसाठीं दरवर्षी विनामूल्य देत असतात. (पृ. १२).

" श्री. पुरुषोत्तम वामन ऊर्फ अण्णा करमरकर यांनीं उत्सवाला देणगीदाखल रुपये चारशें देऊन, उत्सवांत या रकमेचा खर्च महारुद्राभिषेक, ब्राह्मण दक्षणा, श्रीसत्यनारायणाची महापूजा, महाप्रसाद वगैरे धार्मिक कार्यक्रमांत करावा अशी इच्छा प्रदर्शित केली होती. त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या देखरेखीखाली तसे धार्मिक कार्यक्रम घडवून आणण्याकरितां त्यांनीं अत्यंत मेहनत घेतली. याबद्दल त्यांचे आभार मानावे तेव े थोडेच होतील. त्यांची उदार देणगी व शारीरिक श्रम याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार व्यक्त करणें प्राप्त वाटतें. (पृ. १२).

"परगांवच्या मंडळीपैकीं श्री. हसबनीस मास्तर, श्री. बाळासाहेब लागू, श्री. सितारामपंत जोशी, श्री. भालबा पंडित, श्री. रघुनाथराव जोशी, श्री. हरिभाऊ बोडस, श्री. सदाशिवराव ओक, श्री. भिडे या मंडळीकडून नाट्यप्रयोगांत व इतर प्रसंगीं जी मदत झाली व होते त्याचा आणि यंदाचा प्रयोग त्यांच्या सहकार्यानें यशस्वी रीतीनें पार पडला त्याचा उल्लेख करणें इष्ट वाटतें. (पृ. १४).

परिशिष्ट (अ)

नाना फडणीस स्मारक कमिटी

अध्यक्ष **श्री. ज. स. करंदीकर**, संपादक केसरी पुणें,

उपाध्यक्ष **श्री. जनार्दन बाळाजी भानू** फडणीस बेलबाग संस्थान, पुणें.


सेक्रेटरी श्री. यशवंत नारायण सोमण, मुंबई.

खजिनदार श्री. लक्ष्मण बाळकृष्ण कोकणे मुंबई.

सभासद—श्री. नरसिंह चिंतामण केळकर पुणें, ना. डॉ. एन. बी. खरे, व्हाइसरॉय यांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद नागपूर, प्रा. न. र. फाटक, श्री. के. बी. जोशी, पूर्वींच्या उत्सवांचे प्रवर्तक मुंबई, श्री. कृष्णाजी वामन करमरकर–वेशवी, श्री. के बी. जोशी–सॉलिसिटर मुंबई, यशवंत वासुदेव-शास्त्री खरे–मिरज, श्री. शंकर नारायण जोशी–भारत इतिहास संशोधक मंडळ पुणें, श्री. माधव नारायण नवांगुळे–बी. ए. एलएल. बी. मुंबई, श्री. गोपाळ हरी धारप–महाड, श्री. नारायण दत्तात्रय लिमये–एल. एम. ई. मुंबई, श्री. पुरुषोत्तम वामन करमरकर–वेशवी, श्री. यशवंत कृष्ण वैद्य–वेळास, श्री. वासुदेव धोंडो कुटुंबे पुणें, श्री. रघुनाथ परशुराम गैलाड पुणें श्री. बळवंत कृष्णाजी निजसुरे–मुंबई, श्री. वामन वासुदेव जोशी, मुंबई. श्री. चिं. ग. कर्वे, प्रो. म. म. द. वा. पोतदार. (इ. १९४६ अह. पृ. ११).

(ह्यांत कांहीं नांवें नव्यानें समाविष्ट केलीं आहेत.)

नाना फडणीस व्याख्यान माला–पुणें–मुंबई (फोटोस्थल–बेलबाग मंदीर)



व्याख्यान–मालेंतील भाषक व्यवस्थापक व सहायक–

रांग १–२–शं. ना. जोशी, प्रा. ओतुरकर, ग. ह. खरे, य. ना सोमण, बरवे, र. प. वर्तक, नाना द्रोही रानडे.

रांग २–दि. वि काळे, वा. सि. बेंद्रे, चिं. ग. कर्वे, द. वा. पोतदार, न. र. फाटक, य. रा. गुप्ते, वि. स. वाकसकर.

रांग ३–कृ. वि. मराठे, ज. बा. भानू फडणीस, चि. माधव फडणीस, द. गो. भिडे.

छायाचित्राची मिरवणूक इ. १९४५



"नाना फडणीस-ठिकाणचा ट्रस्ट घडण्यापूर्वीं रा. श्री. के. जोशी रा. धुं. स. जोशी, रा. म. अ. जोशी व रा. शां. बा. जोशी वगैरे मंडळींनीं कालभैरवाचे देवालयांतील पटांगणांत १–२ वर्षें उत्सव साजरा केला होता. या त्यांच्या उपक्रमाबद्दल आम्हीच काय परंतु कोणीही त्यांचें कौतुकच करील (पृ. १५).

"फडणीस स्मारक जागेंतील कंदिलाला लागणारा तेलाचा खर्च (स्मारक मंडळाकडून थोड्याशा दिवसांत खर्चाची योजना होईपर्यंत) मुंबईतील यशवंत आरोग्य भुवनचे मालक श्री. य. ना. सोमण यांनीं देण्याचें कबूल केलें आहे याबद्दल त्यांचें आम्ही अभिनंदन करितों.

(१) स्मारक जागेंत वार्षिक उत्सव सुरू ठेवणें.
(२) उत्सवांत ऐतिहासिक निबंधांसाठीं बक्षीस ठेवणें, आणि वर्तमानपत्रांतून त्याची प्रसिद्धी निदान १ महिना आगाऊ करणें.
(३) स्मारक ठिकाणाला चारी बाजूंनीं तटबंदी करणें.
(४) स्मारक जागेंत दुमजली "नाना फडणीस मंदिर" उभारणें.
(५) मंदिराच्या मध्यभागीं नानांचा पुतळा बसविणें.
(६) मंदिरांत सोईस्कर जागेंत 'फडणीस वाचनालय' ठेवणें.
(७) मराठेशाहींतील प्रसिद्ध पुरुषांचे फोटो मंदिरांत लावणें. (सामान्यतः हीच योजना पृष्ठ १२२ वर आली आहे.)

"हा ठराव सर्वांनुमतें पास झाल्यावर कामाच्या सोईसाठीं एका उपाध्यक्षाऐवजीं दोन उपाध्यक्ष असणें श्रेयस्कर अशा योजनेनें श्री. के. बी. जोशी (पंपवाले) यांना आणखी एक उपाध्यक्ष या नात्यानें निवडण्यांत आले. नंतर स्मारक निधि जमविण्याकरितां सात मंडळींची एक उपसमिति नेमण्यांत आली. निदान २५००० (पंचवीस हजार) रुपये गोळा होण्याची आवश्यकता आहे. नेमलेल्या उपसमितीनें १९४६ च्या उत्सवापर्यंत याप्रमाणें निधि जमविण्याची शक्य तेवढी खटपट करावी. उपसमितीचे सदस्य पुढीलप्रमाणें :—

(१) श्री. के. बी. जोशी, (पंपवाले) मुंबई.
(२) ,, ल. बा. कोकणे, (मुंबई).
(३) ,, बा. धों. कुटुंबे, (हरेश्वर).
(४) ,, अ. कृ. करमरकर, (वेशवी).
(५) ,, ना. द. लिमये, एल्. एम्. ई. (मुंबई).
(६) ,, मा. रा. नवांगुळे, बी. ए., एल्एल्. बी. (मुंबई).
(७) ,, गो. ह. धारप, (महाड).

या उपसमितीला आणखी ८ पर्यंत तज्ञ लोकांना आपल्याशीं संयुक्त करून घेण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. एकूण सभासद १५ पर्यंत असावेत. (पृ. १७).

परिशिष्ट २

नाना फडणवीस-व्याख्यानमाला

पुणें, मुंबई इत्यादि

१९४४ सालीं आगस्ट महिन्याच्या ३० व्या तारखेस बेळगांव शहरीं अनेक नामवंतांच्या विद्यमानें 'नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या ?' या नांवाच्या एका अगडबंब पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ झाला. हें पुस्तक सुमारें १४०० पानांचें (डेमी आकार) व दोन खंडांत विभागलेलें होतें. ता. ३० आगस्ट या दिवशीं १७७३ सालीं नारायणराव पेशव्यांचा खून झाल्यामुळें त्या विषयाच्या पुस्तकाचें प्रकाशन त्या तारखेस करण्याचा हेतु स्पष्ट कळणारा आहे. ग्रंथ-लेखक कै. पां. गो. रानडे यांनीं आपल्या हातून इतिहासाची कांहीं अद्भुत कामगिरी झाली आहे व तिचा महाराष्ट्रांत सर्वत्र गौरव व्हावा, अशा समजुतीनें आपल्या पुस्तकाच्या प्रती बहुतेक सर्व वृत्तपत्रांना व इतिहासाभिज्ञ समजल्या जाणारांपैकीं बऱ्याच ठळक व्यक्तींना पाठविल्या. या पुस्तकाचा गाजावाजा इतर कोणीही केला नाहीं, पण मुंबईच्या एका साप्ताहिकानें दर आठवड्यास ह्या पुस्तकांतील गलिच्छ मजकूर भडक रीतीनें छापण्याला प्रारंभ केल्यामुळें पुष्कळांचें लक्ष तिकडे वेधलें. नाना-फडणीस-स्मारक-मंडळाला तर तिकडे लक्ष देणें हें त्याचें कर्तव्यच होतें. त्याप्रमाणें त्याचें लक्ष वेधून ता. २६ नोव्हेंबर १९४४ रोजीं मंडळाची सभा मुंबईस भरली व त्या सभेंत ह्या पुस्तकासंबंधीं तीव्र निषेधाचा ठराव पास करण्यांत आला. हा ठराव सदर ग्रंथकाराकडे पाठविल्यानंतर त्याच्याकडून जें उत्तर आलें, (ता. ७।१२।४४) त्यांतील पुढें दिलेल्या उताऱ्यावरून सदर लेखकाच्या मनोवृत्तीवर प्रकाश पडल्याशिवाय रहाणार नाहीं—

'ता. २६-११-४४ रोजीं पास केलेला तीव्र निषेधाचा ठराव पोंचला. तो वाचून आम्हांला फार समाधान वाटलें. मंडळानें आम्हांस दिलेलें तीव्र

निषेधाचें हें शिफारसपत्र आम्ही चौकटींत बसवून आमच्या बैठकीच्या जागीं सर्वांना सर्वदा दिसेल असें आजच लाऊन ठेविलें आहे.'

नाना फडणवीस स्मारक मंडळाची सभा झाली त्याच वेळीं चित्पावन दीन वत्सल संघाची सभा भरून तिच्यांत वरील पुस्तकांतील विषारी मजकुराचा विचार होऊन त्याचा निषेध सर्वत्र कळविण्याची योजना अंमलांत आली. परंतु त्या पुस्तकाचा जसा एका साप्ताहिकानें उदोउदो चालविला होता, तसा त्याच्या निषेधाचा जोरदार आवाज वृत्रपत्रांतून निघणें अवश्य होतें. तें कार्य कसें करावें याविषयीं ना. फ. स्मा. मंडळाचे अध्यक्ष श्री. ज. स. करंदीकर यांनीं विचार करून महाराष्ट्रांतील अनेक इतिहासज्ञांना पत्रें लिहिलीं. ह्या पुस्तकासाठीं परीक्षकमंडळ नेमावें आणि त्यांत भाग घेणारांनीं आपापल्या विशेष ज्ञानाचा विषय निवडून त्याबद्दल साधार लिहावें, असा हीं पत्रें पाठविण्यामागील हेतु होता. ज्यांना पत्रें गेलीं, त्या सर्वांनीं मूळ पुस्तकाच्या निराधार व बाष्कळ मांडणीसंबंधीं आपली नापसंती दर्शवून परीक्षणाच्या कामीं हातभार लावण्याची तयारी सुचविली होती. १९४५ च्या जानेवारी-फेब्रुवारींत हा पत्रव्यवहार झाला. त्या पुस्तकाचें खंडन लिहिण्याला प्रोत्साहन मिळावें म्हणून रु. २०० एवढ्या रकमेचें बक्षीस ना. फ. स्मा. मंडळानें जाहीर केलें होतें. परंतु तसें एकही पुस्तक मंडळाकडे आलें नाहीं. पुढें श्री. फाटक यांच्या लेखांनीं खंडनाचें काम केल्यामुळें बक्षिसाचा व्यवहार करावा लागला नाहीं.

१९४५ जानेवारीपर्यंत त्या पुस्तकाबद्दल साधारणपणें इतिहासज्ञांचें मौन कायम होतें, जानेवारींत म. म. दत्तो वामन पोतदार यांनीं कोल्हापूर येथें एका समारंभांत 'नारायणरावांचा खून' या विषयावर भाषण करून हें मौन निकालांत काढलें. पुढें मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस नानांच्या पुण्यतिथीचा उत्सव दरसालप्रमाणें वेळास येथें व्हावयाचा होता व त्या पुस्तकाच्या अधिकृत निषेधाला तोच प्रसंग योग्य होता. या उत्सवाचे अध्यक्षस्थान पुण्यांतील भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस श्री. चिं. ग. कर्वे यांनीं स्वीकारलें होतें. मुख्य वक्तृत्वाची कामगिरी मुंबईंतील 'प्रभात' दैनिकाचे संपादक श्री. श्री. शं. नवरे यांनीं आपल्याकडे घेतली होती. श्री. नवरे यांनीं फेब्रुवारी ६ व २२ या तारखांच्या प्रभात दैनिकाच्या

अंकांत थोरले माधवराव पेशवे यांच्या चरित्राचे लेखक श्री. सहस्त्रबुद्धे यांचे दोन लेख छापून या विषयाला तोंड पाडलें हें येथें नमूद करणें अवश्य आहे. वेळास येथें उत्सवांत श्री. कर्वे आणि श्री. नवरे या दोघांनीं नाना फडणविसांवरील अनेक आरोपांचा समाचार घेतला.

यानंतर २१ मार्च पासून २१ जुलईपर्यंत श्री. न. र. फाटक यांनीं सदर पुस्तकांतील अनेक दुष्ट निराधार आरोपांची 'नवाकाळ' दैनिकांत लांबलचक २१ लेख लिहून झणझणीत हजेरी घेतली. त्यांनीं याच विषयावर ता. २५ मार्च रोजीं कल्याण शहरीं एक व्याख्यान दिलें होतें व त्याचा अहवाल कांहीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला होता. श्री. फाटक हे नवाकाळचे पत्राचे गाढ ऋणानुबंधी म्हणून सदर पुस्तक त्यांच्याकडे नवाकाळच्या संपादकांनीं अभिप्रायार्थ पाठविले. श्री. फाटकांनीं लेख लिहिण्याचे ठरविले तेव्हां कै. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांनीं श्री. फाटकांना मनःपूर्वक प्रोत्साहन दिलें व त्यामुळेंच फाटकांना निःसंकोचपणें आपले लेख लिहितां आले. कै. खाडिलकरांच्या प्रोत्साहनाबद्दल येथें कृतज्ञता व्यक्त करणें अवश्य व उचित आहे. प्रा. फाटकांचे लेख प्रसिद्ध होऊं लागल्यावर त्या पुस्तकाच्या कर्त्याचा साप्ताहिक उदोउदो बंद झाला.

मे महिन्यांत पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेमध्यें प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनीं एक व्याख्यान दिलें. इतका त्या पुस्तकाचा निषेध झाला तरी लोकांना समाधान वाटलें नाहीं. त्याचा परिणाम म्हणजे पुण्यास ता. २१ ते २८ जुलई याप्रमाणें आठवडाभर गुंफली गेलेली व्याख्यानमाला हा होय. ही व्याख्यानमाला नानाफडणीस स्मारकमंडळाच्या विद्यमानें झालेली असली तरी तिचें श्रेय श्री. फाटक व श्री. कृष्णराव मराठे यांनाच दिलें पाहिजे. त्यांतल्या त्यांत श्री. मराठे यांनीं व्याख्यात्यांना भेटण्याचे, जागा व अध्यक्ष मिळविण्याचे जे श्रम केले तिकडे पहातां या श्रेयाचा वाटा जास्त प्रमाणांत त्यांच्या पदरांत पडतो. व्याख्यानाला लोकमान्य टिळक स्मारक मंदिर मिळालें व कै. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकरांनीं आठही दिवस अध्यक्ष-स्थान मंडित करण्याची जबाबदारी पत्करली. यामुळें व्याख्यानमालेविषयींचा पुणेंकर नागरिकांचा उत्साह शेवटपर्यंत चढता वाढता असल्याचा अनुभव येऊन वक्त्यांची उमेद दुणावली हें निराळें सांगावयास नको.

व्याख्यानमालेचा तपशील पुढीलप्रमाणें—

ता. २१ जुलै १९४५	प्रा. कृ. पां. कुळकर्णी	मराठेशाहीचें समालोचन
,, २२ ,, ,,	श्री. ज. स. करंदीकर	बारभाईची कारकीर्द
,, २३ ,, ,,	,, य. ग. फफे	सवाई माधवरावाची कारकीर्द
,, २४ ,, ,,	प्रा. राजाभाऊ ओतुरकर	दुसऱ्या बाजीरावांची अमदानी
,, २५ ,, ,,	श्री. चिं. ग. कर्वे	नानांचें खाजगी जीवन
,, २६ ,, ,,	प्रा. द. वा. पोतदार	नारायणरावांचा खून
,, २७ ,, ,,	प्रा. न. र. फाटक	तोतयाचें प्रकरण
,, २८ ,, ,,	,, ,, ,,	राघोबाचें चारित्र्य
,, २९ ,, ,,	श्री. न. चिं. केळकर	व्याख्यानमालेचा समारोप

यांतल्या प्रत्येक वक्त्यानें आपल्या विषयास अनुसरून टीकाविषयक पुस्तकांतील अनेक विधानांचें खंडन केलें. पुण्याच्या केसरी पत्रांत या व्याख्यानांचे सविस्तर अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. पहिल्या व्याख्यानाच्या वेळीं श्री. ज. स. करंदीकर यांनीं व्याख्यान मालेची भूमिका समजावून दिली. 'लेखकाला कोर्टांत खेचण्याचा मार्ग परावलंबी, अनिश्चित, मत-भेदाचा व खर्चाचा म्हणून स्वीकारला नाहीं. दुसरा उपाय व्याख्यानद्वारां निषेध करण्याचा, त्याचा अवलंब केला आहे.' अशी माहिती श्री. करंदीकरांनीं श्रोत्यांच्या कानीं घातली. प्रा. कुळकर्ण्यांचा अभिप्राय–'हें पुस्तक इतिहासाचें नसून कादंबरी आहे, असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. अनेक चुका व विपरीत मतें या पुस्तकांत करण्यांत आलीं आहेत.' श्री. करंदीकरांनीं आपल्या व्याख्यानांत सदर पुस्तकांविषयीं संकलित रीतीनें जो अभिप्राय व्यक्त केला तो असा—'विविध कल्पित आरोप नानांच्या माथीं मारून ग्रंथकर्त्यानें नाना हे राजद्रोही, मित्रद्रोही, आप्तद्रोही वगैरे वगैरे म्हणजे सर्व सद्‌गुणांचे द्रोही होते असें लिहिलें आहे...एकेक चांगला शब्द घ्यावयाचा व त्याच्यापुढें फक्त द्रोही हा शब्द जोडून एकेक आरोप नानांच्या माथीं मारावयाचा एवढाच जेथें पुरावा तेथें हात आंखडण्याला मर्यादा तरी कोणची असणार ! असल्याच गचाळ शब्दांनीं हें पुस्तक भरलें आहे...सर्वच ऐतिहासिक घटना

उलटया चष्म्यांतून पाहून आणि अप्रतिष्ठित तर्क लढवून व वितंडवाद घालून बेलगामी लेखकानें नानांच्या कीर्तीला काळें फासण्याचा उपद्व्याप केला आहे, पण ऐतिहासिक पुराव्यापुढें तो मुळींच टिकूं शकत नाहीं." श्री. फफे यांनीं नानांच्या उज्ज्वल कामगिरीचें योग्य समालोचन करून शेवटीं म्हटलें—'एवंच लेखकानें सर्वच लिखाण विकृत मनोरचनेनें लिहिलें आहे. इतिहास लेखकांना तें एक प्रकारें आव्हान आहे व महाराष्ट्रानें त्याचा स्वीकार करून त्याला चोख उत्तर दिलें आहे. प्रा. ओतुरकर—'ग्रंथकर्त्यानें आपल्यास गैर लागू अशीं विधानें व कागद पत्रांची दखल घेण्याचें टाळून वाटेल तो मजकूर आपल्या ग्रंथांत लिहिला आहे. श्री. कर्व्यांनीं आपल्या व्याख्यानांत 'नानांच्या चारित्र्यासंबंधीं बेळगांवच्या लेखकानें जे अत्यंत घाणेरडे व चीड आणण्यासारखे अनेक अश्लील आरोप केले आहेत, त्यांतील मुख्य मुख्य आरोपांचा मी विचार करणार आहे' असे आरंभीं उद्गार काढून कांहीं आरोपांचें सप्रमाण खंडन केलें. शेवटीं एका ज्योतिषानें सदर पुस्तकास जोडलेली कुण्डली व तिच्यावरून काढलेलीं अनुमानें याबद्दल श्री. कर्वे यांनीं सांगितलें कीं 'तो भाग एक विकृत नमूना म्हणून पहाण्यासारखा आहे.' प्रा. द. वा. पोतदार–'या संबंध पुस्तकांत १४ ओळी सुद्धां नव्या नाहींत. ऐतिहासिक नवे आधार देऊन कांहीं सिद्ध केलेलेंहि नाहीं..विषय जरी इतिहासाचा घेतला असला तरी सारा थाट नाटकी व पुस्तकाचा वेष नाटकाचा आहे. शीर्षकांनीं सुरवात केलेल्या मूळ विषयावर या १३०० पानांच्या ग्रंथांत जमतेम २०० पानें आढळतात. त्यांतही 'खून कीं आत्महत्या या शब्दांतील खून शब्दसुद्धां नाहीं. सगळेंच निराळें आहे. याला काय म्हणावें ? शुद्ध फसवणूक असेंच म्हणावें लागेल..'ऐतिहासिक प्रमाण वा आधार कोठेंही दिलेले नाहींत. सर्व प्रकरणांशीं नानांचेंच कारस्थान होतें, राघोबा निर्दोष होता, असें भासविण्याचें सारें नाटक या पुस्तकांतील भारुडांत आढळतें; परंतु ते साधार वा सप्रमाण नसल्यानें इतिहासाला केव्हांही उपयुक्त ठरणार नाहीं व सत्याच्या कसोटीवर तें उतरत नसल्यानें कोणालाही तें पटणार नाहीं.' शेवटीं प्रा. द. वा. पोतदार यांनीं 'आत्महत्या'–कार रानडे हे प्रमाणद्रोही, तर्कद्रोही, शास्त्रद्रोही, सुसंगतिद्रोही, आचार्य-द्रोही, गुरुद्रोही, पूर्वजद्रोही–एतावता नानाद्रोही आहेत, अशी आपल्या

विवेचनाला कलाटणी दिली तेव्हां श्रोतृवर्गानें टाळ्यांचा कडकडाट केला. द्रोहांचा आरोप सिद्ध करून प्रा. पोतदारांनीं जेव्हां याबद्दल शिक्षा सांगितल्या तेव्हां श्रोत्यांना एकप्रकारें कृतार्थता वाटली. त्या शिक्षा अशा होत्या.

(१) रानडे यांचें नांव ग्रंथलेखकांच्या यादींतून काढून टाकावें आणि त्याचें नांव ग्रंथगुंडांच्या यादींत घालावें.

(२) कोणीही ही प्रत हातीं घेऊं नये. घेतल्यास शुद्धतेसाठीं स्नान करून शुद्ध व्हावें.

(३) ग्रंथप्रकाशनाची तिथि दिवाळींतील प्रथम दिनासारखीच अशुभ म्हणून मानण्यांत यावी.

(४) यापुढें पां. गो. रा. हें नांव कोणीच ठेवूं नये.

(५) त्यास इतिहास– भास्कर या ऐवजीं 'इतिहास-तस्कर' ही संज्ञा देण्यांत यावी. अर्थात् या शिक्षेला मुदतीचें बंधन नाहीं.

श्री. फाटकांनीं आपल्या दोन व्याख्यानांत 'मूळ तोतया' व 'राघोबा' या दोन व्यक्तीसंबंधांतील लेखकानें सादर केलेल्या पुराव्याचें अवडंबर भ्रामक असल्याचें दाखवून दिल्यानंतर शेवटच्या दिवशीं श्री. न. चिं. केळकर यांनीं सर्व व्याख्यात्यांशीं आपलें १०० टक्के सहमत असल्याचें सांगून प्रा. पोतदारांनीं काढलेल्या निष्कर्षाला दुजोरा दिला व एक प्रकारें मूळ पुस्तकाचा निषेध वज्रलेप केला. त्यांच्या भाषणांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे—

या दिवशीं श्रोत्यांची अलोट गर्दी लोटली होती. श्रोत्यांचा उत्साह इतका दांडगा होता कीं, श्री. केळकरांचें व्याख्यान चालू असतां दिवे गेले तरी लोक जागचे हालले नाहींत. उलट टार्चेस, मेणबत्त्या, पणत्या यांचा प्रकाश पुरवून त्यांनीं व्याख्यानांत खंड पडूं दिला नाहीं. त्याच जुजबी प्रकाशांत पुण्याच्या नागरिकांना व्याख्यानासाठीं आलेल्या वेळासकर मंडळींची ओळख करून देण्याचा विधि मोठ्या उत्साहानें पार पडला. श्री. केळकरांनीं म्हटल्याप्रमाणें पुण्याच्या गेल्या ५०–६० वर्षांच्या इतिहासांत प्रस्तुत व्याख्यान–मालेचा प्रसंग अपूर्व होऊन गेला.

ह्याच सुमारास तिकडे म्ह. मद्रासमध्यें श्री. शं. ना. जोशी हे ह्या वेळीं तिरुपती येथें मद्रास सरकारचे ऐ. दप्तरखान्यापैकीं मराठी हस्त-

लिखितसंग्रहाची सवर्णन यादी तयार करण्यासाठीं सरकारी निमंत्रणावरून गेले होते. त्यांचें एक व्याख्यान तेथील मराठा समाजांत झालें. विषय हाच होता. त्याचाहि विस्तृत सारांश केसरींत पुढें आला आहे. शंकररावजींनीं सांगितलें–खंडाळापेटचांत (जि. सातारा) एक जागा अशी आहे कीं, तेथें जातां जातां पायानें, हातानें एक धोंडा टाकावयाचा. कारण काय, तर तेथें मुलानें बापाचा खून केला ती ही जागा. ह्या स्थलास 'बापमारीचा वड' असें म्हटलें जातें. तशासारखें डोळस व जाणत्या इतिहासाभ्यासकानें ज्या चोपड्याचा तीव्र निषेध करावा असें हें पां. गों. चें पुस्तक आहे. ह्यांत सर्वांत वाईट हें आहे कीं इतिहासाचे आधार फारसे दिले नाहींत. दिले आहेत त्यांतहि फिरवाफिरव आणि अदलाबदल करून म्हणजे विकृतता हवी तेवढी आणिलेली आहे.' शंकररावांचें महाराष्ट्रांत आल्यावर फलटण हायस्कूलमध्येंहि शिक्षकमंडळींमध्यें बोलणें झालें. शंकररावांच्या आहिताग्निमंदिरांतील भाषणाचे वेळीं ग्रंथकर्ते रानडे यांस आधीं कळवून व्याख्यानप्रसंगीं उत्तरें द्यावीं व खुलासा करावा असें स्पष्ट आव्हान दिलें होतें. पण त्याप्रमाणें रानड्यांनीं कांहीं केलें नाहीं.

श्री. फाटक यांनीं १९४५ सालीं या पुस्तकाची हजेरी अनेक ठिकाणीं व्याख्यानें देऊन घेतली. त्या वर्षीच्या जुलई महिन्यांत धुळ्यास राजवाडे संशोधन मंदिरांत व्याख्यान झालें. पुण्याचीं व्याख्यानें आटोपल्यावर श्रीगणेशोत्सवांत मुंबई ब्राह्मण सभा येथें एक व्याख्यान दिलें. हैद्राबाद (निजाम) येथील मंडळीनें त्यांना पाचारून या विषयावर त्यांचें तेथें गणशोत्सवांत एक स्वतंत्र व्याख्यान करविलें. १९४६ च्या प्रारंभीं त्यांचें इंदुरास व नागपुरास याप्रमाणें दोन व्याख्यानें झालीं. ह्याच सालीं जळगांवासहि व्याख्यान झालें.

पुण्याची व्याख्यानमाला झाल्यावर मुंबईंत नाना फडणीस स्मारकमंडळानें ब्राह्मण–सभेचें साह्य घेऊन तशीच एक व्याख्यानमाला घडवून आणली. तिच्यांतील व्याख्याते व त्यांचे विषय यांचा अनुक्रम पुढें दिला आहे.

ता. २४ नोव्हेंबर १९४५	श्री. माधव पांडुरंग सबनीस	नाना आणि जातिद्वेष
,, २५ ,, ,,	,, स. अ. सहस्रबुद्धे	नाना आणि परशुरामभाऊ
,, २६ ,, ,,	प्रा. डॉ. व. दि. राव	बारभाईची उभारणी

,, २७ नोव्हेंबर १९४५	श्री. दा. मो. भट	तोतया, आंग्रे व इंग्रज
,, २८ ,, ,,	,, शं. ना. जोशी	माधवरावांची कारकीर्द
,, २९ ,, ,,	,, ग. ह. खरे	नानासाहेब पेशवे
,, ३० ,, ,,	,, दि. वि. काळे	अस्तप्राय भानूचें अंतिमदर्शन
,, १ डिसेंबर ,,	,, वा. सी. बेंद्रे	राघोबाचीं कारस्थानें

सर्व व्याख्यात्यांनीं आपापल्या विषयाच्या अनुरोधानें 'खून कीं आत्महत्या' या पुस्तकांतील निराधार विधानांचें सप्रमाण मार्मिक खंडन केलें. ता. ३० नोव्हेंबर या दिवशीं श्री. न. चिं. केळकर मुद्दाम पुण्याहून व्याख्यान मालेला आशीर्वाद देण्याकरितां आले होते. ह्यांनीं आपल्या भाषणांत सर्व व्याख्यानांचें एक स्वतंत्र पुस्तक छापून त्याचा प्रचार करावा असा सल्ला दिला. त्या रात्रीं श्रीशिवराज मंडळानें तोतयाचें बंड या नाटकाचा प्रयोग केला. नानांचें काम मंडळाचे चिटणीस श्री. य. ना. सोमण यांनीं केलें. त्यालाही श्री. केळकर हजर होते. तेथें त्यांचें उत्तेजनपर भाषण झालें. यानंतर १९४६ च्या जानेवारींत पुणें येथें नाना फडणवीस स्मारक निधीकरितां 'तोतयाचें बंड' या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. त्यालाहि श्री. न. चिं. केळकर उपस्थित होते.

मुंबईची व्याख्यानमाला गुंफली जाण्यापूर्वी पुण्याला १६ आक्टोबर ते १९ डिसेंबर (विजया दशमी ते दत्तजयंती) पर्यंत अग्निहोत्री शंकरराव राजवाडे यांच्या अग्निहोत्र मंदिरांत 'नारायणराव पेशव्यांचा खून की आत्महत्या' या पुस्तकाच्या लेखकानें आपल्या पुस्तकाच्या समर्थनाचें ज्ञानसत्र सुरू केलें होतें. व्याख्यानासाठीं एकंदर ५० मुद्दे काढून त्यांचीं छापील पत्रकें अनेकांच्याकडे पाठविलीं होतीं. परंतु त्या पत्रकानुसार व्याख्यानाचें निमंत्रण कोणींच स्वीकारलें नाहीं. आरंभीं लेखकानें बोलावून आणलेल्या कित्येक वक्त्यांचीं भाषणें झाल्यावर श्रोत्यांमध्यें प्रतिकूलता संचरूं लागली. 'आत्महत्या'काराचे हुकमी वक्ते आपली पोपटपंची करून गेले. ता. २८ आक्टोबर रोजीं एका शाळामास्तराचें व्याख्यान ठेवलें होतें. त्यानें पूर्वी लिहिलेल्या एका पुस्तकांत नाना फडणीस, हरिपंत फडके वगैरे मंडळीविरुद्ध कांहीं मजकूर घातला असल्यानें त्याला पाचारण झालें होतें. परंतु त्यानें

अग्निहोत्री राजवाडे व रानडे यांची आशा वाया दवडली. त्याचें भाषण प्रतिकूल झालें. ता. २९ रोजीं पुण्यांतील एका नाणावलेल्या वकिलाचें भाषण झालें. या भाषणाचा 'भरंवशाच्या म्हशीला टोणगा' याप्रमाणें श्री. राजवाड्यांना अनुभव आला. त्यांच्यामागून श्री. डी. बी. बर्वे यांनीं एकंदर चार भाषणें लागोपाठ चार दिवस करावीं, अशी योजना होती. ती जाहीर झाली होती; परंतु योजना मोडून आहिताग्नीच ता. ३० रोजीं अनपेक्षितपणें व्यासपीठावर आले आणि पूर्वी ज्या वक्त्यांनीं आपणांस फसविलें अशी त्यांची समजूत होती, त्यांवर मनमुराद तोंडसुख घेतलें. अग्निहोत्र मंदिरांत वक्तव्य करणारांची संभावना मंदिरामार्फत करण्याचा रिवाज असतां पूर्वीच्या वक्त्यांचा सत्कार मंदिराच्या जागेंत आहिताग्नींच्या डोळ्यादेखत स्वतंत्रपणें गौरवाचे शब्द उच्चारून श्रोत्यांनीं केला, याचाही राग आहिताग्नींच्या मनांत होता. मंदिरांत व्याख्यानें चालू असतां श्रोत्यांनीं दगडाच्या पुतळ्याप्रमाणें आपल्या भावना दाबून बसावें, या नियमाचा भंग करायला एका वक्त्यानें उत्तेजन दिलें होतें. अशा सर्व गोष्टींच्या रागानें आहिताग्नींचें व्याख्यान झालें. नंतर श्री. बर्वे बोलूं लागले. त्यांनीं पहिल्या १५ मिनिटांतच सर्व आडपडदा झुगारून आहिताग्नींची अहिताग्नींच्याच पद्धतीनें अशी झणझणीत हजेरी घेतली कीं, बसल्या जागीं शालजोडी विसरून आहिताग्नींनीं आपल्या खोलीची वाट धरली !

ता. ३१ रोजीं बर्व्यांचीं व्याख्यानें बंद अशी सूचना फलक बाहेर लावून जाहीर केली व आहिताग्नींनीं मात्र स्वतः व्याख्यान देण्याची तयारी केली. बर्व्यांना याची माहिती आगाऊ कळल्यामुळें त्यांनीं सभेच्या जागीं लवकर येऊन व्यासपीठ हस्तगत केलें! व्याख्यानाची वेळ होतांच आहिताग्नींची स्वारी बर्व्यांजवळ आली व दमदाटीनें त्यांस उठवूं लागली. बर्वे ऐकत नाहींत असें दिसल्यावर त्यांनीं श्रोत्यांना हाकलून देण्यास सुरवात केली. दिवे मालवून टाकले. श्रोत्यांत आरडाओरडा माजला. बर्वे पहाडी आवाजानें श्रोत्यांना गर्जून सांगत होते कीं, सभा सोडण्याचें कारण नाहीं. दिव्याची व्यवस्था होत आहे. आपलें व्याख्यान होणारच. अर्धा तास गडबड चालू राहिली. शेवटीं आहिताग्नी नाइलाज होऊन स्वस्थानीं गेले आणि बर्वे यांनीं आपलें व्याख्यान यथासांग शेवटास नेलें. दुसऱ्या दिवशीं अग्निहोत्र मंदिराबाहेर हें व्याख्यानांचें ज्ञानसत्र बंद

केल्याची पाटी लटकली. ज्यांना ज्ञानसत्राची आस्था असेल त्यांनीं आहिताग्नींना भेटावें, सह्या द्याव्या, अशा भरपूर सह्या मिळाल्या म्हणजे नव्या व्यवस्थेखालीं नवी व्याख्यानमाला सुरू करतां येईल, असेंही त्या पाटीवर आश्वासन होतें. ही पाटी पाहून बऱ्यानीं आहिताग्नींची भेट घेतली आणि व्याख्यानव्यवस्थेंत कसलेही फेरफार झाले तरी आपलीं उरलेलीं दोन व्याख्यानें झाल्याशिवाय व्याख्यानमाला आपण चालू देणार नाहीं, असें आहिताग्नींस बजावलें. याप्रमाणें हें ज्ञानसत्र अकालीं विझण्याचा योग आला. त्याच्या खेदानें आहिताग्नींनीं व्याख्यानमाला आपल्या दोन विश्वासू मित्रांच्या हवाली करून पुढें सत्राला चालतें केलें. नंतर अ. हो. मंदिरांत विरोधी व्याख्यानें होण्याचा योग आला.

नोव्हेंबर १९४५ उत्तरार्धांत मूळ पुस्तकाच्या खंडनाचीं एकंदर ७ व्याख्यानें अग्निहोत्र मंदिरांत लागोपाठ झालीं. त्यांतील पहिलीं तीन अनुक्रमें श्री. शं. ना. जोशी, श्री. ग. ह. खरे आणि श्री. दि. वि. काळे यांचीं होतीं. पुढील ४ व्याख्यानें प्रा. फाटक यांनीं दिलीं. या व्याख्यानाला सपाटून गर्दी लोटत असे. ता. २ डिसेंबर १९४५ या दिवशीं प्रा. फाटक यांनीं आणखी एक व्याख्यान देऊन खंडन पक्षाचा समारोप केला. ता. ३ रोजीं खंडनपक्षाचा समाचार पुढें विवाद्य ग्रंथाच्या लेखकाकडून व्हावयाचा होता. त्याप्रमाणें लेखक व्यासपीठावर उभा राहिला व उत्तराच्या आधाराचे उतारे काढण्यासाठीं ग्रंथ चाळूं लागला. इतक्यांत तिघे तरुण व्यासपीठाजवळ गेले. एकानें श्रोत्यांना सांगितलें कीं, आपल्याला पूज्य असलेल्या पुण्यश्लोक स्त्रीपुरुषांची ज्या तोंडानें नालस्ती झाली, त्या तोंडावर आपण थपडा मारणार असून ज्यांची तशी इच्छा असेल त्यांनीं हा उपाय आचरावा. हा प्रकार पाहून सभेच्या व्यवस्थापकांपैकीं एकानें त्या तरुणाला असला आततायीपणा या जागीं चालणार नाहीं, असें दरडावतांच त्या तिघांनीं 'खून कीं आत्महत्या'काराला व्यासपीठावरून खालीं ओढून फरफटत मुख्य दरवाजापर्यंत नेलें. दरवाजाच्या लहानशा बोळांत अंधेर होता. तेथें सदर लेखकाला मारहाण करून इतर रीतीनेंही त्याची विटंबना केली. या दंगलींत एकाचें डोकें फुटून त्याला इस्पितळांत पाठवावें लागलें. नंतर पोलीस आले. त्यांनीं चवकशी केली. मारामारीचें पर्यवसान याहून अधिक झालें नाहीं. शारदीय ज्ञानसत्राच्या निमंत्रण पत्रांनुसार

व्याख्यानें निरध्यक्ष होतील, दोन्ही पक्षांचें म्हणणें मांडलें जाईल, १७ पंच निर्णय देतील, नंतर एक इतिहासपरिषद भरविण्यांत येईल, वगैरे मजकूर होता. तो सारा कागदावरच राहिला. या शारदीय ज्ञानसत्राबद्दल स्थानिक वृत्तपत्रांनीं मौन स्वीकारलें होतें व अनेक जाणत्या नागरिकांनीं त्यावर बहिष्कार घातला होता. अखेरच्या मारामारीमुळें वृत्तपत्रांचें मौन मोडलें.

खंडनाचीं व्याख्यानें सुरू होण्याच्या सुमारास (ता. १९ नोव्हेंबर १९४५) पुणें येथें नाना फडणीस स्मारक मंडळातर्फे पूर्वीच्या व्याख्यानांत भाग घेणारांना एक मेजवानी देण्यांत आली व मेजवानीस आलेल्या मंडळीचा एक फोटो बेलबागेच्या अंगणांत काढण्यांत आला.

(केसरी :—शुक्रवार ता. १७ माहे आगष्ट सन १९४५)

श्री. तात्यासाहेब केळकर अध्यक्ष यांचें भाषण :—

" मी शंभर टक्के इतर वक्त्यांशीं सहमत आहे असें स्पष्ट शब्दांत सांगतों " असें म्हणून तात्यासाहेब पुढें म्हणाले

कुटिल कारस्थानींचें फल.

रानडे असें म्हणतात कीं, मी जर अपराधी असेन तर घाशीराम कोतवालाला पेशव्यानी जी शिक्षा दिली ती मला शनिवार वाड्या समोर द्यावी. परंतु या शतकांत अशी शिक्षा कोणीहि देणार नाहीं, म्हणून मताची गोळी मतानींच टिपून काढली पाहिजे. कांहीं लोकांना वाटलें, ह्या पुस्तकाचा निषेध कशास करावयास पाहिजे, हें पुस्तकच स्वतःचा निषेध करीत आहे! परंतु जनतेलाच सात्विक संताप येऊन ह्या पुस्तकाची उपेक्षा करूं नये असें ठरलें. प्रत्युत्तर दिलें नाहीं तर मौनाचा अर्थ संमति असा झाला असता. शिवाय इतिहासाची यांत अनास्था होत असल्यानें हा ग्रंथ उपेक्षणीय नाहीं. तरुण वर्गानें ह्या व्याख्यांनाना उपस्थित राहून, जी जिज्ञासा व्यक्त केली त्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करितों. ग्रंथकर्त्यानें हें पुस्तक प्रसिद्ध करून महाराष्ट्राला उपदेश करण्याचा आव आणला आहे. पण हें

त्याचे दुष्ट बुद्धीचें प्रदर्शन आहे. लोक विचारतात पण तुम्ही हा ग्रंथ जवळ कां ठेवता? माझें उत्तर हें कीं, आपण विषारी नाग, त्याचें तोंड ठेंचून, त्याच्या कातीं करितां जवळ बाळगतो. खून कीं आत्महत्या हा विषयच अमंगल आहे. वकिलाचा अभिप्राय तोंड उघडल्या शिवाय कळतो. न्यायाधिशाचा अभिप्राय सर्व गोष्टीचा पूर्ण विचार केल्यावर कळतो; परंतु मतसद्दी कितीही बांधला तरी त्याचा अभिप्राय कळत नाहीं, तसा हा ग्रंथकार वावदूक आहे व हें पुस्तक कुटिल कारस्थानाचें फळ आहे. ग्रंथकाराला न्यायबुद्धी तर मुळीच नाहीं.

नारायणरावांचा 'खून कीं आत्महत्या' ह्या पुस्तकाचें प्रयोजन म्हणजे रघुनाथराव हा तलवार बहाद्दर म्हणून राष्ट्रपुरुष व नाना फडणीस हा लेखणी बहाद्दर म्हणून कली पुरुष असें ठरविण्याकरितां होय, असा निष्कर्ष रानडे यानें एका व्याख्यानांत सांगितला असें कळतें. पण शाहू महाराजांपासून पुढें पन्नास वर्षें पर्यंत पेशव्यांनींच हिंदुपदपादशाहीची वाढ केली यांत शंका नाहीं. शाहूनंतरच साम्राज्यशाही स्थापण्याचें प्रयत्न झाले असें माझें प्रांजल मत आहे. त्यांत ज्यानीं तलवार गाजविली ते मोठे होतेच पण त्यामुळें बाकीचें लेखणीबहाद्दर मुत्सद्दी कमी योग्यतेचे ठरत नाहींत.

बेछुट व उलटचा काळजाचा

हें पुस्तक लिहून रानड्यानें अप्रसिद्धीच्या सुखाला सोडून कुप्रसिद्धीच्या दुःखांत उगीच उडी घेतली. त्यानें ह्या विषयावर नाटक लिहिलें असतें तर चांगलें झालें असतें. कारण त्यांत निरनिराळ्या पात्राकडून समर्थन व निंदा दोनही करता आली असती (ह्यावेळीं अध्यक्षांनीं तोतयाचें बंड ह्या नाटकांतील नाना फडणीसानें स्वतःच्या समर्थनार्थ केलेल्या भाषणाचा कांहीं भाग वाचून दाखविला.) हां ग्रंथ म्हणजे नसता उपद्व्याप आहे. हा ग्रंथकार उलटच्या काळजाचा असून त्यानें नसतें कुभांड रचलें आहे. ख्रिस्ती पुराणांत सैतानाचा वकील (डेव्हिल्स ॲडव्होकेट) माणसाच्या दुष्कृत्यांची यादी घेऊन बसलेला असतो. तसा रानडे हा दिसतो.

पण सैतानाच्या वकिला जवळ जसा पुरावा असतो तसा याच्या जवळ नाहीं. सात दिवसांच्या व्याख्यानांची छाननी केल्यावर मी असें

निश्चतपणें म्हणतों कीं रानडे हा बेछूट, बेदरकार व उलटया काळजाचा मनुष्य आहे. साधनांच्या उपयोगाचें ज्ञान असूनहि त्यानें—अप्रामाणिकपणा केला आहे.

लेखकानें "ध" चा "मा" केला

'ध' चा "मा" नानांनीं केला असें हा ग्रंथकार बेलाशक म्हणतों; परंतु नाना व हरिपंत फडके याना कटाची बिलकुल माहिती नसतां त्याना ती माहिती होती असें म्हणण्यांत या लेखकानें मात्र 'ध' चा 'मा' करण्याची कलम बहाद्दूरी केली आहे! नानानेंच 'ध' चा 'मा' केला असें बेछुट विधान या ग्रंथकारानें बिनदिक्कत् केलें आहे. नानांनी पेशव्यांच्या स्त्रियांना छळलें अशींहि विधानें ग्रंथकारानें केली आहेत. पण हा खऱ्या परिस्थितीचा विपर्यास आहे. गोपिकाबाईला वाडयांतून हांकून देणें, गंगाबाई संबंधीं विकृत भावना, रमाबाईच्या विडे खाण्यावर बंदी, इत्यादि संबंधी जीं भरमसाट विधानें ग्रंथकारानें केलीं त्यावरून त्याचें स्त्रियांच्या शीलाचें, शिस्तीचें आणि सदाचाराचें अज्ञानच व्यक्त होतें. महादजी शिंद्याला नानानें कपटानें मारविले असें विधान ग्रंथकारानें केलें आहे! त्यांत ऐतिहासिक पुराव्याचा आणि शक्याशक्यतेचाहि विचार केलेला दिसत नाहीं. गृहकलह हे प्रत्येक देशांत होते, पण त्याना किती किंमत द्यावयाची याबद्दल विचार करावयास पाहिजे. जेथें स्वार्थ, लौकिक व महत्वाकांक्षा असतात, तेथें गृहकलह सगळयाच देशांत असतात. पण नानानें महादजीला मारविलें हें विधान धादांत खोटें आहे.


नानानें सखारामबापूना तुरुंगांत फार छळलें असें हा लेखक म्हणतो. परंतु सखाराम बापूला कैदेंत असतांना कसे वागविलें जात होते तें पाहा. कानेटकरांच्या 'सखाराम बापूच्या' चरित्रांतलाच हा उतारा वाचून दाखवितों. यांत लिहिलें आहे कीं "बापूंना उत्तम जेवण, दानासाठी १० रुपये, प्रत्येक व्यतिपाताच्या दिवशीं २। तोळयाच्या २८ पुतळया दानार्थ, अशी नेमणुकच होती." हाच का छळाचा पुरावा? शिवाजी पासून बाजीरावापर्यंत गृहकलह होतेच. शिवाजीचा प्रत्यक्ष मुलगा शत्रूकडे गेला. उलट शत्रूचा मुलगा संभाजीकडे आला. ह्यांत बापाला कमीपणा येण्याचें कारण

नाहीं. परंतु असल्या गोष्टींची चर्चा करितांना अगदीं निर्भेळ सत्य कसें सांपडणार ? पण तेवढ्यानें भलता विपर्यास क्षम्य ठरत नाहीं. तो अक्षम्यच होय. पण याची रीतच कांहीं और आहे. त्याला सरळ पुरावा दिसत नाहीं, आणि नसलेला पुरावा ग्राह्य मानून त्यावरूनहि भलतेसलते तर्क या पुस्तकांत काढलेले आहेत. अशा रीतीनें हें पुस्तक लिहिण्यांत एक प्रकारचा कट दिसतो; कारण अशाच मासल्याचीं आणखी कांहीं पुस्तकें बाहेर पडणार आहेत असें कळतें ! असला विपर्यास निंद्य होय.

———



श्री. वा. धों. कुर्टुरे



श्री. द. गो. आपटे, वकील

केसरी २०-३-१९०० अग्रलेख

मुत्सद्दी नाना फडणवीस

" खूप शर्तिनें राज्य राखिलें। यशवन्त फडणीस नाना "–पोवाडा

सोमवार ता. १९ माहे मार्च फाल्गुन वद्य ३ हा दिवस पेशवाईतील प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस यांच्या शतसांवत्सरिक श्राद्धतिथीचा होय. ही तिथी काल रोजीं पुण्यास साजरी करण्यांत आली. त्या संबंधीची हकीकत थोडक्यांत *दुसरीकडे दिली आहे. नानांनीं आपला देह ठेवल्यास आज पुरीं शंभर वर्षें होऊन गेलीं. तथापि, अद्याप ते कीर्तिरूपानें आम्हां मध्यें कायम आहेत. खुद्द नानांच्या हयातींत, त्यांच्या ऐन कारभाराच्या प्रसंगीं त्यांच्या योग्यतेचें खरें व मार्मिक स्वरुप सर्व हिन्दुस्थानांत फारच थोड्या दूरदर्शी मुत्सद्यांच्या नजरेस आलें होतें. व ज्या थोड्या इसमांना नानांची खरी किंमत ओळखण्याची योग्यता होती ते बहुतेक सर्व जलवासी टोपीवाल्यांपैकीं असून तितके आम्हां पैकीं कोणी ही नव्हते ही दुर्दैवाची गोष्ट होय. नानांच्या मृत्युसमयीं तर त्यांच्या सल्लामसलतीस महाराष्ट्रांत कोणी विचारीत नव्हतें, इतकेंच नव्हे, तर दौलतीचा दरारा वाढविण्या-करितां झिजलेल्या त्यांच्या वृद्ध शरीरयष्टीचें कारागृहवासांत अखेरचे हाल होत असलेले पाहून दुर्व्यसनी पेशव्यांची चांगली कान उघाडणी करणारा त्यावेळच्या कर्त्या पुरुषांत कोणीही नव्हता. पेशवाईच्या अन्तकाळीं व त्यानन्तर बरीच वर्षें नाना एक मोठा वस्ताद, युक्तिबाज, आपमतलबी, अलोट बुद्धीचा; स्वार्थसाधु पुरुष होऊन गेला अशा तऱ्हेच्या नानां-विषयींच्या वेड्यावांकड्या कल्पना लोकांच्या मनांत होत्या. पुढें इतिहासा-वलोकनाचा काळ सुरू झाल्यावर नानांचे समकालीन मुत्सद्दी, समकालीन तरवारबहादर, पेशव्यांचे त्यावेळचे प्रतिस्पर्धी निजाम, टिपू, टोपीवाले

*पृ. १७१-७२ पहा.

इत्यादि मंडळी व खुद्द नाना व त्यांनीं हिन्दुस्थानभर, कलकत्त्यापासून हिमालयापर्यन्त व कलकत्त्यापासून अटके पर्यन्त पेरलेले वकील, या सर्वांचे खाजगी व दरबारी कागदपत्र प्रसिद्ध झाले असल्यामुळें व होत असल्यामुळें १८ व्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानचें साम्राज्य मिळविण्याकरितां जीवापाड मेहनत करणाऱ्या निरनिराळ्या पक्षांचीं खरीं अन्तःकरणें आतां सर्वांस खुलीं झाल्यासारखीं झालीं आहेत. परस्परांपासून परस्परांचीं मतें व कृत्यें आतां चोरून ठेवण्याची जरूरी नसल्यामुळें प्रत्येक जण आपल्या मनांत अती खोल दडवून ठेवलेली गुप्त गोष्ट जगापुढें मांडीत आहे. नानांच्या कर्तबगारीविषयींचा अभिप्राय त्यांचेच वैरी व त्यांचेच प्रतिस्पर्धी आज मोकळया मनानें आम्हांस सांगत आहेत. जी बातमी कलकत्तेकर टोपीवाल्यांपासून चोरून ठेवण्याकरितां नाना जीवापाड मेहनत घेत असत ती बातमी आज जुन्या कागदपत्रांच्या सहस्र जिव्हांनीं नाना चव्हाट्यावर ओरडून सर्वांस सांगत आहेत. आम्हांपासून कोणतीच गोष्ट गुप्त ठेवावयाची नानांना आतां जरूर नाहीं. व इंग्रजसरकारनें विद्यामृत दिल्यामुळें नानांच्या कृतीचें कौतुक करून त्यांच्या मुत्सद्दीपणाचें खरें स्वरूप अंशतः तरी ओळखण्याची शक्ति आज शंभर वर्षांनीं महाराष्ट्रांत आली आहे. तेव्हां नानांच्या शतसांवत्सरीक श्राद्ध तिथीच्या दिवशीं

नानांचें श्रेष्ठत्व

इतिहासज्ञांस आज कां कबूल करावें लागत आहे हा प्रश्न सर्वांच्या मनांत घोळत असणें साहजिक होय. ह्या प्रश्नाचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, नाना हाडापिंडाचे खरे मुत्सद्दी होते. ग्लॅडस्टन, डिझरायली, बिस्मार्क, पिटर धी ग्रेट इत्यादि नांवाजलेल्या युरोपियन मुत्सद्यांच्या चरित्रांचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें असतां खऱ्या मुत्सद्याच्या अंगीं कोणते गुण असावे लागतात याची कल्पना बांधतां येते. स्वदेशावर अकृत्रिम प्रेम, स्वदेशाचा इतरांनीं योग्य प्रकारें बहुमान ठेवावा म्हणून सतत उद्योग,

इष्ट कार्यसिद्धी साधण्यास काय केलें पाहिजे हें तत्काळ समजण्याजोगी तीक्ष्ण बुद्धि, आपल्या देशाचा बोज निरंतर अबाधित रहावा म्हणून पुढील संकटांची आगाऊ तरतूद करणारी दूर दृष्टि, सभोंवारच्या सामुग्रीची जुळवाजुळव करून इष्ट साहित्य निर्माण करणारी योजकता, इत्यादि गुण मुत्सद्यांच्या अंगीं असावे लागतात, व आज पर्यन्त नानां-संबंधानें जे कागदपत्र व जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून स्पष्ट दिसणारें महाराष्ट्रावरचें त्यांचें निर्मळ प्रेम, महाराष्ट्राचा बडेजाव सर्व हिन्दुस्थानांत व्हावा म्हणून त्यांचा सतत उद्योग, महाराष्ट्राच्या शत्रूचें खरें स्वरूप ओळखून त्यांच्या ढोंगाचें पूर्ण आविष्करण करून त्यांना महाराष्ट्रा-पासून व हिन्दुस्थानापासून दूरवर ठेवण्या संबंधानें त्यांचें अपूर्व धोरण, खालावलेल्या महाराष्ट्राच्या साम्राज्याला जोरानें टेका देऊन पानिपतच्या लढाईच्या वेळीं मराठ्यांनीं गमाविलेलें हिन्दुस्थानचें साम्राज्य पुनः मराठ्यांच्या आटोक्यांत आणून देऊन चोहोंकडे महाराष्ट्राचें पूर्वीचें वर्चस्व कायम राखण्याची त्यांची हांव इत्यादि नानांच्या अंगच्या अनेक गुण-समुच्चयाकडे पाहिलें म्हणजे 'खरा दूरदर्शी मुत्सद्दी' असे उद्गार तोंडानें निघाल्यावांचून राहात नाहींत. श्री शिवाजीमहाराजांनीं स्वराज्याची स्थापना केली. राजाराममहाराजांच्या कारकीर्दींतील थोरपुरुषांनीं त्याच स्वराज्याचें जतन केलें. पण आपण तेवढे स्वतंत्र झालों म्हणजे मराठ्यांचें कर्तव्य संपलें असें त्यावेळच्या मराठ्यांना वाटलें नाहीं. मराठ्यांनीं महाराष्ट्र ज्या वेळीं स्वतंत्र केला त्यावेळीं हिन्दुस्थानांतील पुढारी या नात्यानें महाराष्ट्रावर दुसरी जंगी जबाबदारी येऊन पडली. आपण तेवढें स्वतंत्र होऊन बसावें व शेजारच्या आपल्या बन्धूनें, हाडारक्ताच्या आपल्या इतर देशबांधवांनीं, परक्यांच्या गुलामगिरींत दिवस कंठावेत ही स्थिती राजाराममहाराजां-नन्तरच्या मराठ्यांना पसन्त पडणें बिलकूल शक्य नव्हतें. हिन्दुस्थानांतला इतर कोणताही भाग स्वतंत्र झाला नसतांना महाराष्ट्र एकटा स्वतंत्र

झाला, 'धुरीयोधुरीयो नियुज्यते' या न्यायानें सर्व हिन्दुस्थानचा पुढारीपणा स्वीकारून, सर्व हिन्दुमात्राचें नायकत्व संपादन करून, हिन्दुस्थानांत हिंदूंचें साम्राज्य करण्याचा बोजा पुढें सरसावलेल्या तरुणबांड महाराष्ट्रास आपल्या शिरावर घेणें भाग होतें. रामदासस्वामींनीं शिवरायाला म्ह० एका प्रकारें महाराष्ट्राला स्फूर्ति दिली; महाराजांनीं महाराष्ट्रास स्वतंत्र व कसलेल्या तारुण्याची शक्ति दिली; व संभाजीमहाराजांच्या कारकीर्दीत त्या तारुण्याच्या होत असलेल्या दुरुपयोगापासून महाराष्ट्राला राजाराममहाराजांनीं बचाविलें. रामदास व शिवाजी ह्या प्रतापी गुरुमित्रांच्या जोडीनें महाराष्ट्रास दिलेल्या देणगीचा उपयोग ह्यापुढें व्हावयाचा होता. हिन्दूंचें हिन्दुस्थानांत साम्राज्य व्हावें व ही इष्ट कार्यसिद्धी महाराष्ट्राच्या हातून तडीस जावी म्हणूनच परमेश्वरानें ही अमोलिक गुरुशिष्यांची जोडी महाराष्ट्रांत पैदा केली. रामदास स्वामींनीं आपला अवतार समाप्त केल्यानन्तर ब्रह्मेन्द्रस्वामींनीं पुढील कार्यभागास आरंभ केला व पहिल्या तीन पेशव्यांच्या कारकीर्दींत महाराष्ट्राच्या हातून सर्व हिन्दुस्थानचें नष्टचर्य नाहींसें करण्याचा उद्योग बऱ्याच अंशीं फलद्रूपहि झाला. रामदासस्वामी व शिवाजीमहाराज यांनीं महाराष्ट्रभर हिन्दु-साम्राज्याचा पाया रचला. ह्या पायावर तीन मजली इमारत रचून हिन्दुस्थानास सुशोभित स्वरूप देण्याचें काम ब्रह्मेन्द्र स्वामींनीं स्वीकारलें. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व बाळाजी बाजीराव या तीन पेशव्यांच्या कारकीर्दींत हिन्दुपदपादशाहीची इमारत कळसास आतां खास जाणार असें वाटूं लागलें. नन्तर ब्रह्मेन्द्रस्वामींनीं आपला अवतार संपविला.

हिंदुस्थानावर कोणीं साम्राज्य (Empire) करावें, हिंदुस्थानचें सार्वभौमत्व कोणाकडे असावें ह्या प्रश्नाचा रणांगणावर अखेरचा निकाल लावण्याकरतां पानिपतचा रणसंग्राम माजला. भाऊसाहेबांच्या ईर्षेमुळें पेशवे अबदालीवर चाल करून गेले असें म्हणण्यापेक्षां सर्व हिन्दुस्थानावर हिन्दूंचें साम्राज्य करण्याच्या महत्त्वाकांक्षेची महाराष्ट्रभर जी लाट

उसळली होती त्या लाटेच्या धक्क्यानें त्या वेळच्या सरकारला पानिपतच्या रणभूमीवर ढकलून नेलें असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. हिन्दुस्थानांत मुसलमानांनीं गुण्यागोविन्दानें रहावें. हिन्दूंशीं सलोख्यानें वागून योग्य अधिकाराचा उपभोग घ्यावा ह्याबद्दल पेशव्यांचा वाद मुळींच नव्हता. तर परक्यांकडे हिन्दुस्थानचें साम्राज्य असण्यापेक्षां महाराष्ट्राकडे हिन्दुस्थानचें साम्राज्य असणें हिन्दुमात्राला अधिक श्रेयस्कर होय, महाराष्ट्राच्या उज्ज्वल कीर्तीला अधिक शोभादायक होय; या पवित्र महत्त्वाकांक्षेमुळें महाराष्ट्रांतील हजारों वीर गिलच्यांशीं झुंझण्या करितां पानिपतच्या सभोंवती गोळा झाले होते. हिन्दुस्थानावर इतर सर्व हिन्दुवासियांच्या एकीसह **महाराष्ट्राचें साम्राज्य** करावयाचें ही स्तुत्य कल्पना त्यावेळीं महाराष्ट्रांत प्रबळ असून सर्व महाराष्ट्र वीरांचीं डोकीं त्या एका कल्पनेनें भणाणून गेलीं होतीं. सांप्रतच्या इंग्लंडच्या इतिहासाकडे लक्ष दिलें असतां साम्राज्याची कल्पना म्हणजे काय, हें वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. अशा स्थितींत, अशा बुद्धीनें व अशा धोरणानें महाराष्ट्राचें अस्सल रक्त यमुनापार जात असतांना त्या अफाट सेनेचे नायक जे भाऊसाहेब त्यांजपाशीं खाजगी कारकून (Private Secretary) या नात्यानें अगदीं तरुणवयांत नाना फडणवीस लढाई पहावयास गेले होते. त्यावेळीं महाराष्ट्राचें दल म्हणजे साम्राज्याच्या कल्पनेनें पूर्ण गुंगलेले व भाऊसाहेब म्हणजे त्या कल्पनेचा सजीव पुतळाच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्राचें वर्चस्व म्हणजे काय, मराठ्यांचें साम्राज्य म्हणजे काय, कित्येक पिढ्यांत धोरणी मुत्सद्यांनीं व शूर वीरांनीं महाराष्ट्राचें कोणतें यश साधण्यासाठीं येवढी खस्त खाल्ली, महाराष्ट्राच्या वैभवाच्या वाढत्या प्रभावाचें धोरण कोणतें, इत्यादि प्रश्न सभोंवारचा तो प्रचंड खटाटोप पाहून नानांच्या मनांत त्या तरुण वयांत त्यावेळीं नेहमीं घोळत असले पाहिजेत व भाऊसाहेबांच्या सान्निध्यानें महाराष्ट्रराज्यकर्त्यांच्या शिरावरची जबाबदारीहि पूर्णपणें त्यांच्या लक्षांत आली असली पाहिजे. कोणचें

वारें अंगांत भरल्यामुळें लाखापर्यंतचे जवान मर्द मराठे गिलच्यांवर चालून गेले हें नानांच्या तरुण वयांत त्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबलें होतें. शिद्यांच्या घराण्यांतील सर्व कर्ते पुरुष एका मागून एक कोणत्या देशकार्यासाठीं धारातीर्थी मरण्यास तयार झाले; त्याचा ठसा त्या तरुण मुलाच्या कोंवळया अन्तःकरणावर पूर्णपणें उमटला होता. महाराष्ट्र–राज्यलक्ष्मी कोणचा लौकिकाचा दागिना चढविण्याकरितां भाऊसाहेब व विश्वासराव पानिपतच्या रणभूमीवर मृत्यूस कवटाळण्यास धावले हें त्या स्वामिनिष्ठ व देशभक्त मुलाच्या हृदयावर कोरून ठेवल्यासारखें झालें होतें. नानासाहेब व भाऊसाहेब यांच्या तालमींत नानांचें बालपण गेलें होतें. पण तारुण्याच्या ऐन प्रारंभीं ज्या भयंकर कुस्त्या त्यांना पहाव्या लागल्या, त्यामुळें महाराष्ट्र-मुत्सद्यांचे सर्व डावपेंच प्रत्यक्ष खेळतांना त्यांच्या नजरेस पडून सर्व पकडा त्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबल्या. पानिपतच्या लढाईनें त्यांना जितकें सज्ञान केलें तितका फायदा पूर्वीच्या शिक्षणामुळें त्यांना मुळींच मिळाला नाहीं व पानिपत रणभूमीवर घडलेल्या प्रकाराची प्रखर आठवण त्यांची स्वदेशभक्ती नेहमी जागृत ठेवण्यास पुरेशी होती. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींत साम्राज्याची महत्त्वाकांक्षा पुरी करण्याचा पुनः प्रयत्न करण्यांत आला. त्या उद्योगांत माधवरावांना नानांचें पूर्ण साह्य होतें. सेनानायकत्व व मुत्सद्दीपणा हीं माधवरावांत एकवटलीं असल्याकारणानें पानिपतच्या दुर्दैवी फेऱ्यांतून महाराष्ट्र सुटून पूर्वीच्या साम्राज्याचें धोरण पुनः फलद्रूप होतेसें वाटलें; पण परमेश्वराची इच्छा कांहींशी निराळी होती. माधवराव अकालीं वारले, नारायणराव पेशव्यांचा खून झाला, पानिपतच्या भयंकर पराभवामुळें अंगांत शिरलेले रोग दुप्पट जोरानें बाहेर पडून शेकडों संकटांनीं महाराष्ट्रास वेढा दिला; अशा वेळीं स्वराज्याचा बचाव करून पूर्वींचे साम्राज्याचें धोरण कायम ठेवून महाराष्ट्राची सत्ता व महाराष्ट्राची अब्रू सतत पंचवीस वर्षें एकट्या नानानें आपल्या बुद्धि-

प्रभावामुळें व दीर्घोद्योगानें कायम राखली. येथें एक गोष्ट लक्षांत घ्यावयाची कीं, महाराष्ट्र व अखिल हिंदुस्थान ह्यांची समव्याप्ति होती. शिवाजीमहाराजांस रामदासस्वामींचें साहय होतें; व पहिल्या तीन पेशव्यांस ब्रह्मेन्द्रस्वामी मदत करीत होते; माधवरावांच्या अंगीं सेनानायकत्व व मुत्सद्दी-पणा हीं दोन्हीं होतीं; पण नानांना केवळ स्वतःच्या देशभक्तीवर व अलौकिक मुत्सद्दीधोरणावर अवलंबून रहावें लागलें. तेव्हां पूर्वींच्या थोर पुरुषांप्रमाणें महाराष्ट्राकरितां नवीन कीर्ति संपादून अधिक कार्यभाग उरकणें शक्य झालें नाहीं. व हें साहाजिक आहे. तथापि त्यांनीं महाराष्ट्र साम्राज्याची ढांसळती इमारत सतत २५ वर्षें कायम उभी ठेवली होती व हें कांहीं लहान सहान काम नव्हतें. मॅसिडोनियाच्या फिलिपचा कावा एकट्या दिमॉस्थेनिसास जसा समजला व ज्याप्रमाणें अथेन्सची परिस्थिती दिमॉस्थेनिसच्या मुत्सद्दी धोरणांस अनुकूल नसल्यामुळें अथेन्स अखेर परतंत्र झालें; त्याप्रमाणें महाराष्ट्र साम्राज्यास चोहोंबाजूंनीं वेढणाऱ्या टोपीवाल्यांचें धोरण एकट्या नानांच्या लक्षांत आलें; पण महाराष्ट्राच्या दुर्दैवानें पानिपतास बसलेल्या धक्क्यामुळें सर्वत्र संकुचित स्वहिताचा बाजार पसरून नानांच्या मुत्सद्दीधोरणांस महाराष्ट्राची अनुकूल स्थिती नसल्यामुळें मराठ्यांचें स्वराज्य व साम्राज्य हीं दोन्ही अखेरीस नानांच्या पश्चात् लयास गेलीं. 'दौलतीचें कल्याण हीच रीत' ह्या लहानशा वाक्यांत नानांच्या अमदानीच्या २५ वर्षांच्या इतिहासाचें सार आहे. नानांच्या समकालीन पुरुषांत सखारामबापू-सारख्या अेक दोन असामींत नानांच्या सारखी तीक्ष्ण बुद्धिमता होती. पण ह्या बुद्धिमत्तेची वरील राजनीतीशी सांगड पडली नसल्यामुळें नानांचा मुत्सद्दीपणा अितरांच्या मनांत बिंबला नाहीं. अितकेंच नव्हे तर त्यांच्या पश्चात् मुत्सद्दीपणाची परंपराही चालविण्यास कोणीच समर्थ नव्हता. हरिपंततात्या फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, महादजी शिंदे अित्यादि सेनानायकांच्या ओंजळीनें कित्येक वेळीं पाणी पिण्याचा प्रसंग नानांवर जर न येतां खऱ्या मुत्सद्दीपणाबरोबर सेनानायकत्वहि त्यांच्या अंगीं असतें तर त्यांच्या कृतीचे परिणाम अधिक वेळ टिकणारे होऊन त्यांच्या पश्चात्

अितक्या लौकर महाराष्ट्राच्या शक्तीची समाप्ती झाली नसती. हल्लींच्या युरोपियन राष्ट्रांतून ज्याप्रमाणें मुत्सद्दी व सेनानायक निरनिराळे असतात व सर्व लष्करी अंमल मुत्सद्यांच्या मुठींत असतो त्याप्रमाणें जर महाराष्ट्रांत कांहीं अंशी व्यवस्था असती तरी देखील नानांचे मुत्सद्दीपणाच्या परिणामांना अधिक स्थायिकपणा आला असता. नाना केवळ मुत्सद्दी असल्यामुळें त्यांची तुलना महाराष्ट्रांतील पूर्वींच्या थोर पुरुषांशीं करणें गैरवाजवी आहे. अिंग्लंडांत हल्लींचे ज्याप्रमाणें डिझरायली, सॅलिसबरी, ग्लॅडस्टन, रोजबरी हे मुत्सद्दी होत; त्याच प्रकारचा मुत्सद्दीपणा नानांच्या अंगीं होता. व्यक्तीच्या किंवा अेकाद्या लहानशा प्रांताच्या हितानहितांत गुंग न होता सर्व साम्राज्याच्या अभ्युदयाकडे व संकटाकडे लक्ष पोंचविणें व अशा तऱ्हेच्या विस्तृत दृष्टीनें हरेक गोष्टीचा विचार करणें हें जें मुत्सद्दीपणाचें मुख्य स्वरूप तें नानांच्या अंगीं होतें. दृढ स्वदेशभक्ती, साम्राज्याची दृष्टी, विलक्षण बुद्धिमत्ता, अपूर्व योजकता, व सतत अुद्योग हे गुण नानांच्या अंगीं अेकवटले होते व म्हणूनच युरोपांतील मुत्सद्यांना व हिंदुस्थानांतील अितिहासज्ञांना ते वंदनीय झाले आहेत.

वरील विवेचनावरून महाराष्ट्रांत साम्राज्याच्या कल्पनेची वाढ कशी होत गेली व तिचा पूर्ण विकास नानांचे अंगीं कसा झाला व अितर अवश्य गुणांची जोड तिला मिळाल्यामुळें सांप्रतच्या सुप्रसिद्ध मुत्सद्यांची योग्यता नानांना कशी प्राप्त झाली हें वाचकांच्या ध्यानांत येअील. नानांचें चरित्र महाराष्ट्रास अवगत आहेच. शतसांवत्सरिक श्राद्ध तिथीच्या प्रसंगींहि वर्तमानपत्रांतून नानांचें सुसंगत सविस्तर चरित्र देणें शक्य नाहीं. तथापि त्यासंबंधाच्या कांहीं ठोकळ गोष्टी आम्ही आतां वाचकांस सादर करितों.

नानांच्या चरित्राचीं उपलब्ध साधनें

नाना फडणविसांची मुत्सद्देगिरी व शहाणपण ह्यांची कीर्ती सर्व हिन्दुस्थानभर दुमदुमूं लागल्यामुळें त्यांच्या चरित्र–श्रवणाची अिच्छा अिंग्रज, फ्रेंच वगैरे विदेशीयांस उत्पन्न झाली होती. हैद्राबाद, श्रीरंगपट्टण, दिल्ली वगैरे ठिकाणच्या मुसलमानी दरबारांतही पेशव्यांच्या पट्टप्रधानांच्या तसबीरी व त्यांच्या दिनचर्येच्या अखबारा जमविण्याचा क्रम सुरू असे. तात्पर्य,


नानांच्या लोकोत्तर गुणांमुळें त्यांच्या हयातींतच त्यांचें जीवनचरित्र समजण्याची उत्कंठा राजकारस्थानी पुरुषांच्या ठिकाणीं दिसून येते. नाना मृत्यु पावल्यानंतर त्यांच्या चरित्राची प्रसिद्धी व्हावी अशी सूचना अिंग्लंडमधील 'अेशियाटिक अन्युअल रजिस्टर' नामक प्रख्यात ग्रंथांत प्रसिद्ध झाली. व त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील राजकारणाशीं ज्यांचा संबंध होता असे युरोपियन लोक नानांच्या चरित्राची सामुग्री गोळा करूं लागले. ह्या मंडळींत ग्रँट डफ, अेलफिस्टन व जनरल ब्रिग्‌झ हे प्रमुख होत. ह्यांनीं नानांचें स्वतंत्र चरित्र ग्रंथ लिहिले नाहींत; तथापि जनरल ब्रिग्‌झ ह्यांनीं नानांच्या पत्नीची मुद्दाम भेट घेऊन नानांच्या दप्तरांतील ९ हजार अस्सलपत्रें अिंग्लंडांत नेलीं. त्यांत नानांचें आत्मचरित्र म्हणून अेक अस्सल प्रकरण होतें. तें व कांहीं महत्त्वाचीं पत्रें त्यांनीं भाषांतर करून अिंग्लंडमधील रॉयल अेशियाटिक सोसायटीस अि. स. १८२८ मध्येंच सादर केली. त्यांची तिकडे फार वाहवा होऊन नानांच्या चरित्राची विशेष प्रशंसा झाली. जनरल ब्रिग्‌झ ह्यांचा नानांचें चरित्र प्रसिद्ध करण्याचा विचार पुष्कळ दिवस घोळत होता. त्यांना खानदेशांतही नानांच्या चरित्राची विस्तृत बखर मिळाली होती. त्यांनीं ह्या चरित्राबद्दल मिस्टर जॉन सलिव्हन व ग्रँडडफ यांचीही सल्लामसलत घेतली होती असें दिसतें. मि. सलिव्हन ह्यांनीं ह्यासंबंधानें लिहितांना 'what poor pigmies we are, as Indian administrators when compared with natives of that stamp!' असे उद्‌गार काढिले आहेत. ग्रँटडफ साहेबानेंही जनरल ब्रिग्‌झ ह्यास हें चरित्र लिहितांना तें 'क्रिमियन वॉर'च्या प्रसंगास अनुरूप करून त्यांत गोल्डन हार्न, सेंट सोफाया आणि तुर्कस्तानचा सुलतान, ह्यांचें सादृश्य दाखवून पाश्चात्य वाचकांच्या अभिरुचीस साजेल असें करावें अशी सूचना केली होती! परंतु हा ग्रंथ त्यांच्या हातून सिद्धीस गेला असें दिसत नाहीं. जनरल ब्रिग्‌झ ह्यांच्यानंतर कॅ. अेम्. व्ही. हार्ट ह्यांनीं नानांचें चरित्र लिहिण्याबद्दल कॅ. अे. मॅक्डोनल्ड ह्यांस सूचना केली व त्याबद्दल त्यानें मेणवलीस जाअून नानांच्या वंशजाजवळील कागदपत्रांचें संशोधन करून अेक अिंग्रजी चरित्र अि. स. १८५१ मध्यें प्रसिद्ध केलें. त्याचेंच भाषांतर मराठीमध्यें 'नानांची बखर' म्हणून प्रसिद्ध आहे. ह्याशिवाय

नानांच्या राजकारस्थानाची आणखी विस्तृत माहिती प्रसिद्ध व्हावी ह्या उद्देशानें सर बार्टल फिरयर व जस्टिस न्यूटन ह्यांनीं यत्न केला. अर्थात् नानांच्या अितिहासाचें प्रकाशन करण्याची खटपट प्रथमतः परदेशी लोकांनीं केली. पुढें आमच्या लोकांत अितिहासाभिरुची उत्पन्न झाल्यानंतर मग "काव्येतिहाससंग्रहा"चा अुदय झाला; आणि त्यांत नानांचें 'स्वलिखित आत्मचरित्र' प्रकाशित झालें ! ! अि. स. १८२८ मध्यें जें चरित्र अिंग्लंडमध्यें प्रसिद्ध झालें तें अि. स. १८७८ सालानंतर मराठी वाचकांस माहीत झालें ! !' 'काव्येतिहाससंग्रहांत' नानांचे बरेच कागदपत्र प्रसिद्ध झाल्यानंतर नानांचें साद्यंत चरित्र लेखनाची अिच्छा रा. खरे ह्यांस होऊन त्यांनीं नानांचें चरित्र अि. स. १८९२ मध्यें प्रसिद्ध केलें. रा. खरे ह्यांच्या चरित्रानन्तर राजवाडे ह्यांनीं मेणवली दप्तर तपासलें. शिवाय आतां मिरज दप्तर वगैरे ठिकाणीं जो नवीन कागदपत्रांचा संग्रह अुपलब्ध झाला आहे त्यावरून नानांचें चरित्र सध्यांपेक्षां अधिक प्रचंड होऊन त्यांतील माहितीवरून फार निराळा प्रकाश पडेल ह्यांत संशय नाहीं.

नानांचा पूर्व वृत्तान्त

नाना फडणवीस यांचे मूळ पुरुष महादाजी कृष्ण भानू हे असून ह्यांचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यांतील 'वेळास' हें गांव होय. ह्या गांवीं महादजी कृष्ण हे सुखवस्तु गृहस्थ होते. त्यांस ४ पुत्र होते. त्यांपैकीं तिघे पुत्र हरी महादेव, रामाजी महादेव व बाळाजी महादेव हे हबशांच्या त्रासामुळें त्रस्त होऊन अुद्योगधंदा करण्याकरितां बाळाजी विश्वनाथ यांच्या बरोबर देशीं आले. भट व भानू यांचा विशेष ऋणानुबंध असल्यामुळें त्यांनीं परस्परांवर आलेलीं संकटें दूर करून ते सातार्‍यास पोहोंचले. पुढें बाळाजी विश्वनाथानें धनाजी जाधवराव सेनापति यांजपाशीं नोकरी करून राजदरबारांत प्रवेश केला आणि आपल्या कर्तृत्वशक्तीच्या जोरावर शाहू महाराजांकडून पेशवाअीचीं वस्त्रें मिळविलीं. त्यावेळीं त्यांनीं भानूंचे पूर्वीचें उपकार स्मरून त्यांस फडणीसीचा अधिकार दिला. बाळाजी महादेव यांचे वडील बंधु हरी महादेव ह्यांनीं कांहीं दिवस त्याचा उपभोग घेतला. त्यांच्या पश्चात् त्यांचे बन्धु बाळाजी महादेव यांस तो अधिकार मिळाला. बाळाजी

महादेव हे पेशव्यांचे स्वारीमध्यें नेहमीं असून त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें व शहाणपणानें त्यांची मर्जी सुप्रसन्न करून सोडली होती. बाळाजी विश्वनाथ सय्यदबन्धूस सहाय करण्याकरितां ज्यावेळीं दिल्लीस गेले व तेथून चौथसर-देशमुखीच्या बादशाही सनदा शाहू महाराजांचे नांवें घेऊन आले, त्याप्रसंगीं बाळाजी महादेव ह्यांनीं स्वामीकार्यार्थ आपले प्राण खर्ची घातले अशी आख्यायिका प्रचलित आहे. बाळाजी महादेव यांचे पश्चात् रामाजी महादेव यांजकडे फडणविसीचें काम आलें. ते त्यांनीं खि. स. १७२४ पर्यंत चालविलें. तदनंतर तेहि मृत्यु पावले. त्यांचे मागें त्यांचे पुत्र बाबुराव राम व बाळाजी महादेवाचे पुत्र जनार्दन बल्लाळ हे दोघेही अल्पवयी होते. म्हणून फडणविसीचें काम पेशव्यांनीं त्यांच्या आप्तांकडून करवून घेतलें. पुढें उभयता बन्धु मोठे झाले. त्यांच्यावर पेशव्यांची मेहेरनजर जडून ते नांवारूपास आले. जनार्दन बल्लाळ यांचें लग्न बळवन्तराव मेहेंदळे यांची भगिनी रखमाबाई यांजबरोबर झालें. त्यांच्याच पोटीं बाळाजी जनार्दन यांचा सातारा मुक्कामीं जन्म झाला. नानांची जन्मतिथी शके १६६३ दुर्मतीनाम संवत्सरे माघ कृष्ण ४ शुक्रवार असून जन्मवेळीं चित्रा नक्षत्र होतें, व नानांचीं ग्रहकुण्डली त्यांच्या पत्रिकेंत पुढें दिल्याप्रमाणें दिली आहे.



नानांचे वडील जनार्दन बल्लाळ व चुलते बाबुरावराम हे अेकत्र असल्या-मुळें त्यांचे चुलतबंधु मोरोबा हे नानांच्या जवळच असत. ह्या उभय मुलांवर नानासाहेब व सदाशिवरावभाऊ ह्या उभय पेशव्यांचें विशेष लक्ष असून त्यांचें शिक्षण विश्वासराव व माधवराव यांच्या संगतींत आस्थापूर्वक झालें. नानांची बुद्धि जात्या कुशाग्र असल्यामुळें ते सदाशिवराव भाऊंच्या प्रेमास तत्काल पात्र झाले.

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब ह्यांची नाना फडणविसावर भक्ती होती; येवढेंच नव्हे, तर, पानिपतचा पराभव झाल्यानन्तर जी मंडळी पळून आली त्यांत त्यांनीं नानांची बऱ्हाणपूर मुक्कामीं फार आदरानें भेट घेतली. तेव्हांपासून नानांच्या संगतीची त्यांस लालसा अुत्पन्न होऊन ते त्यांस पुण्यास येण्याबद्दल आग्रह करूं लागले. परन्तु नानांची बायको यशोदाबाअी आजारी पडल्यामुळें त्यांना नर्मदातीरीं रहाणें भाग पडलें. पुढें लौकरच नाना पंतप्रधानांस भेटण्यास जाणार, तोंच त्यांस पारनेर मुक्कामी पेशव्यांच्या मृत्यूचें वर्तमान समजलें; तें ऐकून नानांस फार दुःख झालें. नानासाहेब पेशवे मृत्यु पावल्यानन्तर माधवराव हे धनी झाले व रघुनाथरावदादा कर्ते झाले. त्यांनीं नानांची योग्यता जाणून त्यांस पुण्यास लौकर येण्याबद्दल विनंती केली. त्याप्रमाणें नाना पुण्यास गेले. नानांचा व माधवरावांचा पूर्वीचा स्नेह असल्यामुळें त्यांनीं नानांस आपल्याजवळ ठेवून घेतलें. ते पेशवाअीचीं वस्त्रें घेण्याकरितां साताऱ्यास छत्रपतींच्या दरबारीं गेले त्यावेळीं नानांस आपल्याबरोबर नेलें होतें. थोरले माधवराव व त्यांचे चुलते राघोबा ह्यांचें रहस्य न जमल्यामुळें स्वराज्यांत दुही उत्पन्न झाली व तिचा परिणाम आपसांतील युद्धापर्यन्त झाला. त्यावेळीं राज्यांतील सखारामबापू, मोरोबादादा, चिन्तो विठ्ठल वगैरे मंडळी दादासाहेबांस मिळाली. परन्तु या वेळीं तरुण पेशव्यांस नानासारखा तरुण मुत्सद्दी साह्यकारी झाल्यामुळें त्यांनी मोठ्या उमेदीनें पेशवाअीची घडी नीट बसवून प्रतिपक्षावर सरशी केली; आणि महादजी शिंदे, तुकोजी होळकर, पटवर्धन, हरिपन्त फडके, बिसाजी कृष्ण, रामचंद्र गणेश वगैरे सरदारांस नांवारूपास आणून हैदर, अिंग्रज, निजाम ह्यांच्यावर नक्षा केला. थोरल्या माधवरावांची कारकीर्द म्हणजे नानांच्या राजकारस्थानाचा उदय होय असें म्हटलें तरी चालेल. थोरले माधवराव मृत्यु पावले त्यावेळीं दौलतीला बरेच पेंच होते. ते सर्व दूर करून मोठ्या हिय्यानें व उमेदवारीनें राज्यकारभाराचें तारु चालविण्यास नानांवांचून दुसरा अेकहि पुरुष तयार नव्हता. म्हणून नानांनीं थेऊर मुक्कामीं थोरले माधवरावांच्या अंतकालसमयीं छातीस हात लावून सर्व दौलतीचें कर्ज वारीन व धन्याच्या अिच्छा पूर्ण करीन असें अभिवचन दिलें. थोरल्या माधवरावांचें अस्सल मृत्युपत्र मराठीमध्यें जरी प्रसिद्ध नाहीं तरी श्रीगणपतीची शपथ वाहून थेऊर मुक्कामीं ता. ३०

ऑगस्ट १७७२ रोजीं लिहिलेला कागद जनरल ब्रिग्झ ह्यांनीं अिंग्रजीमध्यें प्रसिद्ध केला आहे. त्यावरून नानांची कर्तृत्वशक्ती व स्वामिनिष्ठा व्यक्त होते.

नारायणराव पेशव्यांचा वध हें पेशवाअीस लागलेलें ग्रहण

नानांनीं थोरल्या माधवरावास वचन देऊन राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं व नारायणरावांस पेशवाअीचीं वस्त्रें मिळवून देऊन त्यांच्या नांवानें राज्यकारभार चालविला. तों राघोबादादा राज्याचें कल्याण-अकल्याण विसरून आपमतलबासाठीं आपल्या पुतण्याचा वध करण्यास तत्पर झाले व त्यांनीं दौलतींत भयंकर तुफान माजविलें; परन्तु बापूंसह नानांनीं बिलकूल न डगमगतां 'बारभाअीचें कारस्थान' रचून व राज्याभिष्ट–चिन्तक दरबारी मंडळ आपणांस अनुकूल करून घेऊन गर्भवासी श्रीमंतांच्या नांवानें राज्यकारभार चालविला. ह्या वेळीं निदर्शनास आलेले नानांचें बुद्धिचातुर्य, स्वराज्याभिमान, स्वामिनिष्ठा, राष्ट्रैक्यवर्धनेच्छा, दूरदर्शित्व अित्यादि गुण केवळ अलौकिक होते, असेंच म्हटलें पाहिजे. ह्यावेळीं दुसरा अेकादा अडाणी कर्णधार असता तर महाराष्ट्रराज्याची नौका ह्या भयंकर वादळांतून पार पडली नसती. संकट-परंपरा अेकसारखी आली असतां तीस हार न जातां धैर्यानें व शहाणपणानें जो तींतून निसटून जातो त्याचीच शहामत विशेष समजली पाहिजे. गर्भवासी श्रीमंतांच्या नांवानें राज्यकारभार सुरू केल्यानन्तर त्यांस विवेकशून्य राघोबा व त्याचे अंतस्थ अनुयायी सखा-रामबापू ह्यांनीं आणलेले अनंत अडथळे, अिंग्रजांचीं राजकारणें, हबशी, टिपू, निजाम, दिल्लीपती, अित्यादिकांचे मनसुबे, तोतयाप्रकरण, वगैरे किती बिकट प्रसंग निवारण करावे लागले हें अितिहासज्ञांस अवगत आहेच. ह्यावेळीं नानांची लोकोत्तर बुद्धिमत्ता प्रकाशीत होऊन 'मनसोबीची तरवार' चालवून आपली करामत दाखविली. 'दौलतीचें कल्याण' व 'श्रीमंतांचें यश' ह्या दोन गोष्टी नानांच्या हृत्पटावर पूर्ण बिंबल्यामुळें नानांनीं त्याकरितां भगीरथ प्रयत्न केले व तेच महाराष्ट्रीयांस नानांचें कौतुक गाण्यास कारण झाले.

नाना आणि बापू

मुत्सद्दी सखाराम बापू यांशीं वैर पडूं नये म्हणून, मुत्सद्या-मुत्सद्यांतील वैमनस्यामुळें दौलतीचें नुकसान होऊं नये म्हणून, नानांनीं बापूंशीं गुप्त करार मदार केले. वडीलपणाचा बापूंचा मान नानांनीं राखावा व दौलतीचें कल्याण तीच नीती नानांनीं दाखवावी, हीं कलमें सदर करारांत मुख्य आहेत. अंतस्थ करारापैकीं अेक करार मात्र मासल्याकरितां येथें देतों.

* 'यादी श्रीमंत राजश्री माधवराव नारायणराव पंतप्रधान यांचे दौलती विषयीं राजश्री बापू व नाना यांनीं सरळ चालून अकृत्रिमपणें दौलतीचा बन्दोबस्त करावा ह्याविषयींचीं कलमें:—सुा तिसा सबअीन मया व अलफ. (श. १७०० = इ. १७७८)

(१) श्रीमन्त रावसाहेब यांच्या पायाशीं उभयतांनीं अेकनिष्ठपणें असोन अकृत्रिमपणें सरळ रीतीनें दौलतीचा बन्दोबस्त करावा, श्रीमन्त दादासाहेब यांचे बरे-वाअीटाचे लक्षण उभयतांचें सारखें असावें, व आंत-बाहेर असूं नये.

(१) नानांनीं बापूंचें दौलतींत वडीलपण सर्वप्रकारें रक्षावें. बापूंनीं नानांवर दौलतीचा भार ठेवावा. उभयतांनीं सरळ चालून अकृत्रिपपणें असावें. आपपर किमपि लेखूं नये. बरें–वाअीटास उभयतांनीं परस्परें अनुकूल असावें. सारांश, उभयतांनीं काडीचा संशय न धरितां अेकदिलपणें वर्तणूक करावी. दिक्कत वाढली व संशय आला तरी समक्ष बोलून संशय-निवृत्ति घेत जावी. किन्तु वाढूं देअूं नये. आंत बाहेर नसावें. द्वैतार्थ तिळमात्र नसावा.

(१) दौलत संबंधें कारभाराचे यादीवर बापूंनीं 'देवावें' करावें. नानांनीं 'देणें' करावें. या प्रकारें उभयतांनीं चिन्हें करीत जावींत.

(१) बापूस पुत्र होअील अथवा दत्तक घेतील त्यांस नानांनीं शहाणे करावें, स्वरूपास आणावें. बापूप्रमाणें स्वरूप पाहून त्यांच्या हातून 'देवावें' करीत जावें. त्यांस वडील सर्व प्रकारें नाना.

(१) दौलतींत पैक्याची ओढ. यांजकरितां जमेचीं कामें येतील तीं उभयतांनीं मन घालून अुलगडींत जावी; अथवा हरेक तरतूद करणें ती

* इतिहास संग्रह ऐ० टिपणें भाग १ पृ. ४१–४३.

उभयतांनीं अन्तःकरणपूर्वक परस्परें अनुकूल राहून करावीं. दिक्कत नसावी. कसर करूं नये. आंत-बाहेर असूं नये.

(१) बापूंच्या व नानांच्या जातीस परस्परें आंच लावूं नये. बापूंनीं नानांस पैक्याचा उपद्रव देऊं नये.

(१) मागील गुणदोष उभयतांनीं मनांत तिळमात्र वाओीट आणूं नयेत व करण्यांत वाओीट आणूं नये.

(१) किल्लेकोटाचा बन्दोबस्त पूर्ववत्प्रमाणें उभयतांचे विचारें आहे तसा असावा. त्यांत वाकडें असल्यास बापूंचे कानांवर घालून बन्दोबस्त करीत जावा.

(१) उभयतांचे मनांत व करण्यांत दौलतसंबंधी दरज नसावी.

९

१—(फाटलें)

(१) साताऱ्याचे खालील कारभारास कारकून पुरंदरे यांचा असावा. त्यांशी उभयतांनी सरळ असावें. फडणशीस कारकून नानांकडील असावा.

(१) सचीवपन्तावर उभयतांची ममता असावी.

(१) राजश्री मोरोबादादा व बज्याबा यांसी बरें-वाओीट बोलणें व करणें उभयतांनीं लक्ष धरून करून आंत बाहेर असूं नये.

(१) दौलतींत वाकडे फंदफितुर करतील त्यांचा बंदोबस्त आपपर न पाहतां उभयतांचे विचारें करीत जावा आंत बाहेर असूं नये.

(१) बापूंच्या मनांत कोणास देणें असलें तरी नानांस स्पष्ट सांगत जावें. नानांनीं मान्य करीत जावें. नानांच्या मनांत असल्यावर नानांनीं स्पष्ट सांगत जावे बापूंनीं मान्य करत जावें.

(१) दौलतींत न समजून वांकडे आले असेल ते, योग्य अयोग्य असेल तें उभयतांनीं विचार करून नीट करावें.

(१) दौलतीचें कल्याण तीच नीत बापूनीं नानांस सांगत जावीं. त्याच प्रमाणें नानांनीं लक्ष रक्षीत जावें.

(१) दौलतींत कामें काजें व खर्च वेंच करणें तो परस्परें परस्परांस बोलून करीत जावा. त्यांत कुन्हा ठेवूं नये. आंत अेक बाहेर अेक नसावें.

(१) बाहेर राजकारण करणें व पहाणें हे उभयतांनीं अन्तःकरणपूर्वक अेकी असावी. परस्परें कळवीत जावी. आंतून एक बाहेरून अेक नसावें.

२०

हृया करारनाम्यावर उभयतांनी शपथा वाहून ते परस्परांजवळ दिले होते. परन्तु बापूंच्या स्वराज्यहिताच्या अकुंचित कल्पनेमुळें करार कागदावरच राहिले !

नाना व महादजी

नाना पुण्याच्या दौलतीचा कारभार मोठ्या उमेदीनें व हिय्यानें चालवीत असतां महादजी अुर्फ पाटील बावा हे अेक प्रतिस्पर्धी निर्माण झाले. नाना मुत्सद्दी व महादजी तरवार-बहादूर अशी जोडी अेक-दिलानें अखेरपर्यंत असती तर मराठ्यांचा राज्यसूर्य कधींच मावळला नसता. परन्तु दुर्दैवानें हृया उभयतांमध्यें पुढें पुढें वैमनस्य उत्पन्न होऊन राज्याची घडी विस्कलित झाली. तथापि नाना व महादजी या उभयतांनीं दौलतीचा विस्तार करून लौकिक वाढविला असें प्रांजलपणानें सांगितल्यावांचून रहावत नाहीं. पाटील बावांचा हिंदुस्थानांत बोलबाला होण्यापूर्वीं ते नानांच्या तंत्रानें चालत असत आणि वडीलपणाचें नातें ठेवून त्यांच्या विषयीं आदर बाळगीत असत. टिपू, अिंग्रज, राघोबा वगैरेंशी जीं महत्त्वाचीं राजकारणें झालीं तींत नाना व पाटीलबावा यांचा अैक्यभाव होता. परन्तु पाटील बावांचा हिन्दुस्थानांत उत्कर्ष झाला त्यावेळीं दिल्लीदरबारांत पादशाहांकडून वकील मुतालकी, व नायब मुनायबी वगैरे पदव्यांचा त्यांवर वर्षाव झाला तेव्हांपासून त्यांस आपल्या वैभवाचा अभिमान वाटूं लागला. हृयाच समयास नानांनीं पाटीलबाबा दौलतीचे आज्ञाधारक सरदार ही कल्पना मनांत बाळगून त्यांच्या सर्व पराक्रमाचें यश श्रीमंतांस यावें व त्यांचा वरचष्मा हिंदुस्थानांत होऊं नये म्हणून अलीबहाद्दरास पाठवून जो महादजीस शह दिला तो त्यांच्या वैमनस्यास व पर्यायेंकरून राज्यनाशास कारण झाला. पाटील बावांनीं विजयोत्सवामध्यें श्रीमंतांचे नांवें बक्षिगिरी व

नायबी मुनायबी हीं पदें घेऊन वकील मुतलकीचें महत्पद आपल्या नांवानें घेतलें अशी दिल्लीहून प्रथम बातमी आली. त्यावेळीं नानांनीं शिंद्यांचे दिवाण आप्पाजीराव दाभोळकर ह्यांस असें लिहिलें कीं, 'बक्षिगिरी व नायबी मुनायबी हीं पदें श्रीमंतांचे नांवें करार करून घेतलीं. त्यापेक्षां वकील मुतलकीचें पद थोर. तेव्हां श्रीमंतापेक्षां अधिकपद आपले नांवें करार करून कसें घेतले? दुसऱ्यापासून अेकादी गोष्ट चुकली असतां त्यांस उपपत्ति लावून दुसऱ्याला दोषपूर्वक लिहितात बोलतात हें ध्यानांत येतें, आणि ही गोष्ट कशी मनांत न आली? धन्याचे पदापेक्षां सेवक लोकांनीं अधिकपद घ्यावें कीं काय?' (नानांच्या पत्राचा अस्सल मसुदा). नानांस ही गोष्ट नापसंत झाल्यामुळें शिंद्यांस बादशहाजवळ दुसरी अर्जी करून तें पद श्रीमंतांच्या नांवानें करार करून घेणें भाग पडलें. परन्तु हा किन्तु मनांत राहून ह्या दोन्ही पुरुषांचीं मनें परस्परांविषयीं कलुषित झालीं. नानांनीं केवळ दौलतीच्या कल्याणाकरितां जरी अलिबहाद्दरास उत्तर हिंदुस्थानांत पाठविलें तरी त्यांचें व शिंद्यांचें रहस्य राहिलें नाहीं. शिंद्यांच्या यशोवैभवाचा मत्सर करणारे होळकर हेही शिंद्यांविरूद्ध कारस्थानें करूं लागले. व त्यांनीं अलिबहाद्दरांस सामील करून घेऊन राष्ट्रीय कार्यास विघातक असें वर्तन केलें. अशा संबंधानें खुद्द शिंद्यांनीं पेशव्यांकडे व नानांकडे तक्रारी केल्या आहेत. नानांनीं होळकरांस 'आजपर्यन्त मनांत कित्येक वाकुडीं आलीं असतील तीं परस्परें सोडावीं. सरकार कामावर लक्ष ठेऊन अेक विचारें चालोन सरकारचा नक्ष रक्षावा.' वगैरे बोध केला होता. परन्तु शिन्दे, अलिबहाद्दर व होळकर ह्यांच्या तिघांच्या तीन तऱ्हा होऊन अखेर त्यांच्यामध्यें फूट झाली. त्याच समयीं शिंद्यांचा शत्रु हिम्मत बहाद्दर गोसावी ह्यास अलिबहाद्दरानें साह्य केलें. त्यामुळें वितुष्ट वाढत जाऊन नाना व महादजी ह्यांचीं मनें गढूळ झालीं. ह्या सर्व प्रसंगाचा अितिहास अस्सल कागदपत्रांनिशीं प्रसिद्ध होअीपर्यंत ह्या वादाचा बरोबर निकाल करितां येणार नाहीं. तथापि त्यामध्यें नानांची स्वदेशहिताची परमोत्कट अिच्छा असून त्यांच्या दूर पल्ल्यावरील राजकारणाचा नीट खुलासा न झाल्यामुळें गैरसमजानें व कांहीं अंशीं दुराग्रहानें हा राष्ट्र-विघातक कलह निर्माण झाला असें आम्हांस वाटतें.

नानांचा दौलत राखण्याचा बाणा

नानांचा राज्यकारभारांत प्रवेश झाल्यापासून त्यांना दौलत कशी रक्षावी हा निदिध्यास असे. राघोबा, इंग्रज, तोतया वगैरे सर्व राजकारणांवरून तोच प्रशंसनीय हेतु व्यक्त होतो. महादजी सारखा शूर व मराठ्यांच्या राज्याचा आधारस्तंभ नष्ट झाला तरी त्यांच्या पश्चात् राज्यरक्षणाचीच त्यांची कळकळ व्यक्त होते. महादजी शिंदे मृत्यु पावल्यानन्तर त्यांनीं होळकर व शिंद्यांचे चार कारभारी ह्यांस जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांतही हाच उन्नत हेतु दृष्टीस पडतो. महादजी शिंदे यांस नवज्वर झाला. अकरावें दिवशीं माघ शुद्ध १३ बुधवारीं वायूची भावना होऊन अवशीचे प्रहर रात्रीस काळ झाला. ही गोष्ट ठीक न झाली. हीं वर्तमानें तिकडे जातील. त्यांचे मुलुखांत गलबल होईल. त्यास पूर्व द्वेष मनांत न आणितां त्यांचें महालांस अगर खेड्यांस उपद्रव न लागे असा बन्दोबस्त करणें...समय रक्षावा. प्रांताचा बन्दोबस्त राखावा. दुही होऊं न द्यावी' इत्यादी अर्थाचे उद्‌गार व पादशाहीचा बन्दोबस्त करून रजपूत रजवाड्यावर जरब ठेवण्याबद्दलची सूचना ह्या सर्व गोष्टी केवल राज्यहितचिंतक अन्तःकरणाच्या दर्शक नव्हेत काय ? नानांचा सर्व मसलतींचा जीव केवळ दौलतीचें कल्याण हेंच असल्यामुळें त्यांना जेथें तद्विरुद्ध प्रकार दिसून आला तेथें स्पष्ट रीतीनें निषेध करणें भाग पडे. राघोबादादांनीं दौलतीच्या कल्याणाची इच्छा व पुढील हिताहित न पाहतां इंग्रजांस मिळून त्यांना मराठी राज्यांत पाय शिरकविण्यास जागा करून दिली ही गोष्ट नानांस विषदग्ध शराप्रमाणें दुःखदायक वाटत असे. इंग्रजांविषयीं नानांचा द्वेषभाव होता असा अर्थ नाहीं; परन्तु नानांस मराठ्यांचें राज्य हिंदुस्थानांत कायम ठेवण्याची इच्छा होती व इंग्रजांस स्वराज्य स्थापण्याची हांव होती; त्यामुळें उभयतांच्या कृतींत व आचरणांत विरोधीभाव असणें साहजिकच आहे. इंग्रजलोक धूर्त, मतलबी आहेत अशी नानांची बालंबाल खात्री झाल्यामुळें ते मराठीराज्याचा केव्हां ग्रास करतील ह्याचा त्यांस भरंवसा नव्हता. त्यामुळें हैदर, टिपु, निजाम, दिल्लीचा बादशहा, 'ह्यांशी सख्य जोडून इंग्रजांस खुषकीवर तरी येऊं देऊं नयें असा नानांचा विशेष यत्न असे. परन्तु नानां-

सारखी व्यापक व दूर दृष्टि त्यावेळच्या सरदारांत नसल्यामुळें ते स्वार्था-साठीं तेव्हांच अिंग्रजांस मिळत. सखारामबापू, मोरोबादादा हीं दोन माणसें नानांच्या बरोबरीचीं खरीं, परन्तु त्यांच्यामध्यें स्वराष्ट्र–हिताचें पाणी बिलकूल नसल्यामुळें ते स्वार्थासाठीं व स्वोन्नतीसाठीं वारा वाहील तिकडे वळत असत. महादजी शिंदे व हरीपन्त तात्या फडके हे दोन शूर व पराक्रमी पुरुष होते. परन्तु त्यांना नानांचें मुत्सद्दी धोरण अवगत नव्हतें. पाटील बोवांस नाना वारंवार टोपीकरांचा प्रवेश खुषकींत होऊं देऊं नका म्हणून आग्रहपूर्वक उपदेश देत होते. परन्तु नानांच्या अंगी लष्करी सामर्थ्य नसल्या-मुळें त्यांना पाटीलबोवांस गोड शब्दांनीं वळविण्याचा प्रयत्न करावा लागे. परन्तु नुसत्या शब्दांचें तेज पराक्रमी व कर्तबगार माणसावर पडत नसल्या-मुळें नानांच्या शाब्दिक अुपदेशाचा पाटीलबावावर नीट ठसा न उमटून ते अिंग्रजांच्या स्नेहपाशांत लौकरच सांपडले. नानांनी पाटीलबावांस अनेक वेळां 'बादशाहीत अिंग्रजांचा पाय न शिरावा. बादशाहींत अिंग्रज शिरल्यास झाडून खुषकींत पेंच पडेल.' असें भविष्य कळविलें होतें. अेवढेंच नव्हे, परन्तु त्यांनीं आपल्या अेका वकिलाच्या पत्रांत टिपूच्या मसलतीसंबंधानें लिहितांना 'अिंग्रजांचा मुख्य अिरादा अवघा खुषकीचा कबजा आपण करावयाचीं साधनें त्यांचीं फार दिवसापासून आहेत. पुढेंही दहावीस तीस वर्षें त्यांचे मतलब्याचे पल्ले आहेत. जे समयीं जसा प्रसंग, नरमाअी अथवा प्रामा-णिकता, चाकरीचा अिरादा अथवा सौदागिरीचा बहाणा अथवा लढाअी बिघाड ज्या रीतीनें होईल त्या रीतीनें जबरदस्त खुषकीवाला असेल त्याचे पारिपत्य करावें; नन्तर दुसऱ्याचें करावें, अशा रीतीनें कबजा करणार, असें मत दर्शविलें होतें. तात्पर्य, अिंग्रज लोक महाधूर्त, स्वहितदक्ष, आणि देश-प्रसंग जाणणारे असून ते हिंदुस्थानांतील दुहीचा फायदा घेतील अशी नानांची समजूत होती. म्हणून नानांचा मुख्य कटाक्ष सर्वांनीं अेक होऊन ह्या प्रबल राष्ट्रास अिकडे प्रवेश करूं देऊं नये असा होता. अर्थात् ज्या मुत्सद्याचे मुख्य व्रत स्वराज्य रक्षण करणें हें होतें त्यांस परराष्ट्रास प्रतिरोध करण्यावांचून त्यावेळीं दुसरा मार्ग नसावा हें साहजिक आहे. नानांनीं आपले दिल्लीचे वकील पुरुषोत्तम महादेव हिंगणे ह्यांस ता. ६ मे अि. स. १७८० रोजीं पत्र लिहिलें आहे. त्यांत त्यांच्या राजकीय धोरणाचा उल्लेख स्पष्ट आहे.

'कलकत्तेकर अिंग्रज पादशहाशी राजकारण करणार, मिळवून घेणार, अशी बातमी येथें आली आहे. त्यास तुम्ही पादशहासी व नजबखानासी चांगले रीतीनें बोलावें कीं, टोपीकराची चाल खोटी, कावेबाज, प्रथम बहुत ममतेंत शिरावें, नफे दाखवावे, आणि त्यासच कैदेंत आणून दौलत आपण करावी. याचे दाखले सुजाउद्दौला व महंमदअलीखान, अर्काटचे सुभे व चंदावरकर वगैरे पाहावें. याकरितां टोपीकर यांचें पारिपत्य करावें. तरच खुषकीवाल्याचा नक्ष. नाहींतर पाण्यांतील टोपीकर ह्यांनीं खुषकींतील दौलती घ्याव्या आणि सर्वत्र व्याप करावा हें चांगलें नाहीं. सर्व दौलतदारांस पुढें वाईट. त्यांत पादशहा तर सर्व पृथ्वीचे खावंद. त्यांस अिरे या गोष्टीची असावी, हें विहित आहे. दक्षिणचे रयासतदार सर्व अेक झाले. नबाब, निजाम अल्लीखान व हैदर नाअीक व श्रीमंत सरकार चौघे अेक होऊन चोहोंकडे अिंग्रजाचें पारिपत्य करावें ह्याप्रमाणें ठराव होऊन सर्वांनीं फौजा व तोफखाने वगैरे तयारी लढाअीचे सरंजामाची मजबूत करून आपआपले प्रांताकडील अिंग्रजावर चालणें. हिंदुस्थानांत पादशहा व नजबखान यांनीं सर्वांस मिळवून घेऊन अिंग्रजांचें पारिपत्य करावें. यांत पादशाहीचा नक्षा व लौकिक मोठा आहे. ह्यासंबंधानें बादशहाशीं संभाषण पेशव्यांच्या वकिलांनीं लिहिलें असून त्यांत शेवटीं बादशहाचे तोंडचें असें अेक वाक्य लिहिलें आहे कीं 'आम्हांस (पेशव्यांकडील) वृत्त विस्तारें कळलें आहे. त्याचा तात्पर्यार्थ हाच कीं, अिंग्रजांचें पारिपत्य करावयास अेक श्रीपन्त नाना मात्र अिच्छितात. वरकड सरदार आपआपले मतलबावर कृतकृत्यतेचे संतुष्टांत आहेत'. ह्या वाक्यावरून मराठी राज्यांत स्वदेशहित जाणणारा असा नानांवांचून अेकही पुरुष नव्हता असा दिल्लीदरबारपर्यन्त समज झाला होता असें दिसून येतें.

सवाअी माधवराव मृत्यु पावल्या नंतर म्हणजे अि. स. १७९६ पासून अि. स. १८०० पर्यन्त नानांवर अनेक संकटें आलीं. तथापि त्या संकट-प्रचुर स्थितींतहि नानांनीं स्वराज्य-रक्षणा करितां आटोकाट खटपट केली. ह्या संबंधानें पेशव्यांचे सैन्यावर असलेल्या वुअिल्यम हेन्री टोन नामक अधिकाऱ्यानें सर्व स्थिती अुत्तम प्रकारें वर्णन करून नानांची फार तारीफ

केली आहे. त्याच पत्रांतील अेक अुतारा दिल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं :—

'Though this great politician was driven by the storms of time into the shades of temporary obscurity, yet his enlightened genius, like the beams of departed sun, still reflected a strong light through the remote political hemisphere, sufficient to guide through the intricate mazes those inferior satellites that were but the precursors of the returning luminary, more bright from temporary darkness. To attempt a character of this great statesman, would be to detail a history of Mahratta politics for the last twenty-five years, during which time he discharged the duties of a minister with abilities perhaps unequalled. During the long and important period of his administration, by the force and energy of his single mind, he held together this vast empire composed of members whose interests were as opposite as the most anomalous elements, and by the versatility of his genius, wisdom, firmness, and moderation of his government, he excited this mass of incongruities to one mutual and common effort.'

नानांच्या संबंधानें नानांचें चरित्रकार मेजर मॅकडोनल्ड ह्यांनीं नानांच्या स्वदेशाभिमाना बद्दल व स्वराज्यनिष्ठे बद्दल उल्लेख करून असें कबूल केलें आहे कीं, 'During the latter unhappy years of his life, on the testimoney of both English and Mahratha authority he is entitled to the highest praise of having acted with the feelings and sincerity of a patriot.' त्याच प्रमाणें नानांच्या इंग्रजांविषयींच्या मतांबद्दल व स्वराज्यधोरणाबद्दल लिहितांना असें लिहिलें आहे कीं,—

He respected the English, admired their sincerity of character and the vigor of their government, but as political enemies no one regarded them with more jealousy and alarm. He had the wisdom to perceive the overpowering influence which the English must eventually obtain should they be permitted the footing desired by the Governor General.'

[ह्याचा तात्पर्यार्थ असा कीं, इंग्रजांविषयीं नानांची पूज्यबुद्धि होती व त्यांचा खरेपणा आणि त्यांचा राज्याचा जोम ह्याबद्दल ते तारिफ करीत. परन्तु राजकीय शत्रुत्वाच्या नात्यानें ते त्यांच्या विषयीं मत्सर व भिती बाळगीत असत. इंग्रजांना जर खुषकींत प्रवेश करण्यास परवानगी दिली तर ते एकदम प्रबल होतील हें जाणण्याचें शहाणपण नानांच्या अंगीं होतें.]

नानांच्या इतर गोष्टी

'नानांच्या पश्चात् मराठीराज्यांतील शहाणपणा व नेमस्तपणा नष्ट झाला.' म्हणून पुण्याचे रेसिडेन्ट कर्नल पामर ह्यांनीं उद्गार काढिले आहेत ते अगदीं सत्य आहेत. नानांची राज्यव्यवस्था, त्यांची वसुलाची पद्धति, त्यांची न्याय पद्धति, त्यांची युद्ध–सामुग्री, त्यांचें बातमी–खातें, त्यांचा फड वगैरे गोष्टींचा वृत्तांत फार मनोरंजक आहे. नानांच्या अमदानींत पेशवाईचा चांगला उत्कर्ष होऊन सुमारें बारा कोट रु. उत्पन्नापर्यंत मजल गेली होती. सैन्याची संख्या चार लक्षांपर्यंत असून सुमारें सातशें किल्ले त्यांच्या ताब्यांत होतें. एवढ्या विस्तीर्ण राज्याचा बन्दोबस्त नानांनीं ज्याअर्थीं उत्तम ठेविला होता त्याअर्थीं त्यांना राजकारणाचें ज्ञान नव्हतें वगैरे लोकहितवादींचे वेडगळ उद्गार आतां कोणीही खरे मानणार नाहींत. नानांस भूगोल-ज्ञान नव्हतें म्हणून जो मागें आरोप आला होता त्याचें निरसन करण्याचें निराळें प्रयोजन नाहीं. नानांच्या दप्तरांत देशोदेशींचे असलेले नकाशे ह्या आक्षेपांचें उत्तम खंडण करितात. नानांची बातमी ठेवण्याची हातोटी तर अपूर्वच होती. चेनापट्टण, फुलचरी, कलकत्ता,

वगैरे ठिकाणची बित्तं बातमी त्यांस येत असे. दिल्ली, श्रीरंगपट्टण, हैद्राबाद, लखनौ येथील अखबारामध्यें खडानखडा ती नमूद होत असे. येवढेंच नव्हे पण इंग्लंड, फरान्स, पोर्तुगाल, आस्ट्रिया, तुर्कस्थान येथील कच्ची बातमीहि नानांस कळत असे. नानांच्या दप्तराचा बहुत नाश झाला आहे; तथापि ह्या गोष्टी नवीन उपलब्ध होणाऱ्या कागदपत्रांवरून चांगल्या निदर्शनास येतात. नानांचा फड म्हणजे सध्यांच्या सेक्रेटरीएट सारखें खातें असून तेथें सगळ्या राज्याच्या उलाढाली होत असत. जमिनींची पाहणी व जमाबंदी, निरनिराळे दानधर्म व देवस्थानें वगैरे सर्व कामें तेथें होत असत. तात्पर्य, त्यावेळच्या देशस्थितीच्या मानाप्रमाणें नानांनीं राज्यव्यवस्थेचें स्वरूप पूर्ण सुधारलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाना स्वतः चार तास निजून बाकी सर्व वेळ काम करीत असत. ह्यावरून ग्लॅडस्टन सारख्या माणसांनीं सांप्रत सुधारणेच्या शिखरांस पोहोंचलेल्या राष्ट्रांत जें केलें तें करण्याची क्षमता पूर्वीच्या मुत्सद्यांच्या अंगीं होती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. तात्पर्य, नानांच्या अंगीं अशी अलौकिक कर्तृत्व-शक्ति होती म्हणूनच त्यांची सर्व महाराष्ट्र मंडळींवर छाप बसून २५ । ३० वर्षें पेशवाईचा उत्कर्ष झाला.

नाना फडणविसांचा शंभर वर्षां पूर्वींचा मृत्युलेख

नाना फडणविस यांच्या शहाणपणाची व राजकीय धुरंधरत्वाची कीर्ति इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल आदिकरून सर्व देशांत प्रसृत झाल्यामुळें त्यांच्या मृत्यूचें वृत्त सर्व राष्ट्रांस समजतांच जिकडे तिकडे ह्या चतुर व बुद्धिमान् मुत्सद्यासंबंधानें स्तुतिपूर्ण खेदोद्गार व्यक्त होऊं लागले; व निरनिराळ्या राष्ट्रांतील वकीलांकडून दुखवट्याचीं पत्रें श्रीमन्त पन्त प्रधान पेशवे बहाद्दर यांस सादर झालीं. ह्या उद्गारावरून व बहुविध पत्रांतून नाना फडणविसां-विषयीं परराष्ट्रीय लोकांची किती आदर बुद्धि होती हें चांगलें दिसून येतें. त्या सर्वांचा समावेश करण्यांत प्रकृत स्थलीं अवकाश नसल्यामुळें आम्ही फक्त इंग्रज लोकांचेच लेख सादर करितों. इंग्लंड मधील इ. स. १८०० साल-च्या 'एशियाटिक ॲन्युअल रजिष्टर' नामक पत्राच्या मार्च महिन्याच्या

'Chronicle' (वृत्तान्त) मध्यें नानांच्या मृत्यू बद्दल पुढील लेख लिहिलेला आहे त्यांतील महत्वाचा भाग येथें देतों :—

'Death of Nana Furnavese:—Our last advices from Poona contain the intelligence of the death of that great and distinguished Mahratta minister and statesman, Ballajee Junardan, but more generally known by the name of Nana Furnavese. He died on the night of the 13th instant, after a short illness....Few characters at their. have ever appeared on the political theatre of India, perhaps in the world, are more deserving of extendee record than Nana Furnavese. A biographical account of that great man's life would embrace the history of India for the eventful period of the last 30 years. The latter part of it he found marked with vicissitudes of no ordinary kind; he was at one period the high source of authority and honours through out a vast and extended empire, aggrandized by the force of his genius and abilities, and apparently only held together by his efforts.


On the hole we may justly say of Nana, that he possessed talents so splendid as hardly ever to have been equalled, and never surpassed in India.'

ह्या लेखावरून गुणज्ञ अिंग्रज लोकच नानां सारख्या मुत्सद्याची गणना सर्व जगांतील राष्ट्रीय रंगभूमीवर चमकणाऱ्या प्रख्यात राजशासनकुशल नरपुंगवांच्या मालिकेंत अग्रस्थानीं करण्यास कसे तत्पर झाले होते, हें लक्षांत घेण्यासारखे आहे.

नानांच्या मृत्यूसंबंधानें त्या वेळचे गव्हर्नर जनरल मार्क्विस ऑफ वेलस्ली ह्यांनीं श्रीमंत दुसरे बाजीराव साहेब पेशवे ह्यांस जें सांत्वनपत्र लिहिलें आहे तेंहि सर्वप्रसिद्धच आहे.

नानांचें निवासस्थान


नाना बहुतकरून सर्वकाल राज्यकारस्थानामध्यें गुंतल्यामुळें त्यांना पुण्यास रहावें लागे. त्यांचा पुण्यांतील 'नानावाडा' प्रसिद्धच आहे. त्यांना क्वचित् फुरसत सांपडल्यास ते वाअी नजीक मेणवली म्हणून अेक लहान खेडें गांव आहे तेथें रहात असत. तेथें कृष्णातीरीं त्यांचा सुन्दर व टुमदार वाडा असून तेथून अेक सारखा सुन्दर घाट बांधला आहे, ह्या घाटा सन्निध दोन



नाना वाडा—मेणवली

रमणीय देवालयें बांधिलीं असून त्यांची रचना फार कुशलतेची केली आहे. ह्यांपैकीं अेका देवालयासमोर अेक घंटामंदिर बांधिलें आहे. त्यांत मराठ्यानीं पोर्तुगीज लोकांकडून काबीज केलेली अेक प्रचंड घंटा टांगली आहे. तिच्यावर अि. स. १७०६ हा सन आहे व तिच्या सभोंवती 'Landate Dominam Cymbilis bene Sanetibus' अशीं अक्षरें कोरलीं असून तिच्यावर अेका कुमारीकेचें व अेका बालकाचें चित्र काढलेलें आहे. ह्या देवालयाच्या आसमंतात् प्रदेशाचा देखावा फारच मनोहर व सृष्टि-सौंदर्य-प्रचुर आहे. येथें धोम–महाबळेश्वराकडून वाहात येणारा कृष्णा नदीचा प्रवाह अर्धचन्द्राकृति झाला असून त्याच्या सभोंवती घनदाट आम्र-वृक्षाची मालिका लागलेली आहे. कृष्णा-प्रवाह मन्दगती व शान्त असल्या-

मुळें तो त्या गर्द झाडींतून येताना फारच रम्य दिसतो. त्यामुळें जणूं तो गगनचुंबित तरुगण श्रीकृष्णेचें नानांस दर्शन करून देण्याकरितां मोठ्या



मेणवली घाट—घंटा मंदीर


लीनतेनें नानांच्या राजवाड्याकडे पाठवीत आहे असें दिसतें. आणि त्या वृक्षांचा ध्वनी जणुं मोरोपंताच्या वाणीनें—

गंगे संदर्शन दे, श्री विष्णु–स्वामि–भक्त नानातें ।
जग तोक माय तूं, हें पूर्ण करु मनोरथास या नातें ॥

अशी श्रीकृष्णेची प्रार्थना करीत आहे असें वाटतें. येथील देखावा अत्यंत चित्ताकर्षक व हृत्तापहर असा असून येथें येणाऱ्या प्रवाशास नानांच्या रसिकतेची पूर्ण साक्ष पटवितो.

कृष्णातीरीं असलेला नानांचा राजवाडा अद्यापि कायम आहे. परन्तु त्याचा भक्कम कोट रावबाजींनीं तोफा लावून पाडल्यामुळें त्यांचें पूर्वीचें अजस्त्र स्वरूप व्यक्त होत नाहीं. ह्या राजवाड्यांत नानांच्या संग्रहांतील अनेक मुल्यवान् व कलाकुसरीच्या वस्तू, बहुविध तसबिरी आणि इतर जिन्नस नानांच्या पत्नी जिऊबाई ह्यांनीं फार जतन करून ठेवल्या होत्या. येथेंच नाना व त्यांचे यजमान सवाई माधवराव ह्यांच्या दोन सुन्दर तसबिरी होत्या. त्या पुण्याचे रेसिडेन्ट सर चार्लस म्यालेट ह्यांच्या

पदरच्या कोणी युरोपियन चित्रकलाकुशलानें काढिल्या असाव्यात अशी माहिती मिळते. सांप्रत ह्या *तसबिरी पुणें येथील बेलबाग संस्थानांत आणून



मेणवली–घाट

ठेविल्या आहेत. तात्पर्य, डिझरायली किंवा ग्लॅडस्टन ह्या मुत्सद्यांची निवासस्थळें पाहून त्या विषयीं इतिहास-प्रिय आंग्लजनांस जसा सकौतुक अभिमान वाटतो व त्यांचीं सचित्र वर्णनें आनन्दभरानें 'रिव्हयू ऑफ रिव्हयू' किंवा 'ग्राफिक' पत्रांतून प्रसिद्ध करतात, त्याच तोडीचें किंबहुना त्याहून अधिक योग्यतेचें हें स्थळ असून तें त्या जगद्विख्यात मराठी मुत्सद्याची कीर्ति सदैव करण्यास कारणीभूत झालें आहे ह्यांत शंका नाहीं.

पुणें येथील स्मृतिदिन


काल रोजीं येथें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत नानांच्या शतसांवत्सरिकश्राद्ध-तिथी निमित्त रा. बाळ गंगाधर टिळक यांचे रा. विनायक रामचंद्र पटवर्धन यांचे अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. व्याख्यानानंतर प्रो. जिनसीवाले यांच्या भाषण झालें. दोन्हीं भाषणांतील बरेच मुद्दे दुसरीकडे दिलेल्या लेखांत आलेच आहेत. अखेर अध्यक्षांनीं स्वदेशप्रीति,

* आतां त्या श्री. सांगलीकराच्या संग्रहीं असल्याचें कळतें. महाराष्ट्र इतिहासभक्त शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी यांजकडील ऐ. वस्तु संग्रहांत त्या होत्या.

राजनिष्ठा, स्वार्थत्याग इत्यादि चांगले गुण अंगीं येऊन इंग्रजी विद्येचें व इंग्रजी राज्य पद्धतीचें चीज करून दाखविण्यास आम्ही लायक होण्याकरितां आमच्या देशांतील नाना फडणविसांसारख्या मुत्सद्यांचें मनन करणें किती आवश्यक आहे याचें विवेचन केलें. नंतर रात्रौ मोरोबादादा फडणवीस यांच्या वाड्यांत बेलबागकरांचे तीन पिढ्यांचे आश्रित वेदशास्त्रसंपन्न पारखेशास्त्री यांचें ऐतिहासिक माहितीस धरून स्वकृत संस्कृत कवितांवरून सुश्राव्य पुराण होऊन हरि-कीर्तनोत्तेजक समाजाचे मार्फत हरिभक्ति-परायण रामाचार्य-बोवांचें तीन वाजेतों कीर्तन झालें. सर्व समारंभास मंडळीचा समुदाय चांगला जमला होता. (केसरी १९०० मार्च २०)

हिंमतगड = व्हिक्टोरिया

वेळास व बाणकोट यांच्या दरम्यान सध्यां जो 'व्हिक्टोरिया' नांवानें किल्ला दिसतो तो कंपनी सरकारनें बांधला नसून तो मराठ्यांनीं शिवकालांत बांधला आहे. या किल्ल्याचें पूर्वीचें नांव 'हिंमतगड' असें आहे. हा किल्ला व त्याचे आजुबाजुचा मंडणगड वगैरे भाग जंजिऱ्याच्या शिद्दीनें जिंकून घेतला होता. त्याजकडून मराठ्यांनीं तो जिंकून परत मिळविला. पुढें तुळाजी आंग्र्याचे प्रकरणांत मराठ्यांकडून तो व त्याचे आजुबाजूचे कांहीं गांव वेळास वगैरे इंग्रजाकडे गेले. त्यावेळीं या किल्ल्याचें नांव 'व्हिक्टोरिया' असें कंपनीनें ठेविलें. हल्लीं जो पाणबुरूज म्हणून बाणकोटच्या खाडीच्या मुखाजवळ समुद्रकिनारीं दिसतो तो शिद्दीनें बांधला व सिद्दी-सात नांवाचा सरदार त्याचें संरक्षणार्थ ठेविला. बाणकोट हें ठिकाण इ. स. १८६० पर्यंत रत्नागिरी जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होतें, अशी माहिती मिळते. (वैद्य स. शा. वेदक, दादर)




विश्वनाथ रघुनाथ भाटे ऊर्फ काशिनाथ कृष्ण करमरकर
स्टीम लांचचे मालक–बाणकोट.

नाना फडणवीस पंत प्रधान स. माधवराव महादजी शिंदे



विश्वविद्यालय—सभागृह पुणें. गणेशखिंड—पुण.

नाना फडणीस उत्सव-कार्यकारी मंडळ—वेळास इ. १९४५



प्रास्ताविक

अलिकडे महाराष्ट्रेतिहासाचा आणि महाराष्ट्र–सारस्वताचा अभ्यास कांहीं अधिक पद्धतिबद्ध चालला आहे असें दिसून येतें. पत्ररूप इतिहास, साधनरूप इतिहास, मराठी भाषेच्या कालानुक्रमिक उल्लेखांचें अभ्यासपुस्तक, निरनिराळे कोष ग्रंथ, महाराष्ट्रीय संतांच्या मूळ संहिताग्रंथांच्या अभ्यासावृत्ति, इतर भाषांचे मराठींतून कोषग्रंथ, इत्यादि ग्रंथांच्या प्रसिद्धीवरून हें लक्षण दर्शित होतें. विशेषतः इतिहास–सारस्वताकडे पाहतां ही शास्त्रीय पद्धति निश्चितपणें अनुसरली जात आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्या ऐतिहासिक शाखेंत प्रथमतः बखरी पुष्कळ प्रमाणांत उपलब्ध झाल्या व त्या प्रसिद्धहि झाल्या. हें बखरग्रंथ प्रसिद्धीचें युग कै. राव ब. साने यांनीं पत्रयुगांत आणून सोडिलें. म्हणजे त्यांनीं हा पत्रमहिमा जाणून 'पत्रें यादी' प्रसिद्ध केल्या. पुढें ह्या पत्रयुगाची महति आधींपासूनच जाणणाऱ्या कै. राजवाडे–खरे–पारसनीस–वाड आदि मंडळींनी फार परिश्रम घेतले आणि पत्रादिकांची चांगलीच प्रसिद्धी करून पत्रयुग मार्गीं लावलें. इकडे ह्या पत्रगर्दींतून वाटचाल करून खरेशास्त्री, राव ब. सरदेसाई यांनी कांहीं राजपुरुषांच्या गांठी भेठी घेतल्या, त्यांच्या रम्य व स्फूर्तिदायक पराक्रम–कथा ऐकविल्या आणि वर मराठी इंग्रजी पत्रें आणखी प्रसिद्ध करून पहिल्या गर्दींत मौलिक भर टाकली. असें हें साधनग्रंथ—प्रसिद्धीचें आणि त्यावरून इतिहासग्रंथ—प्रकाशनाचें, अशीं दोन्ही कामें सारखींच होत राहिलीं. अशांतच अभिलषित असा जो (इ. स. १५९४ ते १८४८) संकलित अर्वाचीन इतिहास काल त्या कालांतील सर्व राजवटींचा इतिहास प्रसिद्ध झाला. पण पत्रयुगाचा महिमा असा मोठा व मूलगामी कीं सिद्धेतिहासाचे ग्रंथ प्रसिद्ध झाले तरी पत्रादि साधनांचे ग्रंथ सारखे प्रकाशित होतच राहिले. एका अर्थी पाहतां असें कोणीं म्हणेल कीं, जर सर्व राजवटींचा इतिहास लिहून प्रसिद्ध झाला तर मग पत्रें प्रसिद्ध करण्याचें काम थांबावयास हवें होतें. कारण, हीं पत्रें त्या इतिहासार्थ व त्या इतिहासाचीं साधनें

म्हणूनच प्रसिद्ध होत होतीं. व तें इतिहासाचें काम तर होऊन गेलें. घर बांधून झाल्यावर मालमसाला व गवंडी सुतार हे शिल्पकार कामगार कशाला ? पण असें नाहीं. ग्रंथ–प्रासादाचें काम पुरतें झालेलें नाहीं. इतकेंच नव्हे; तर ग्रंथ–पडवी,–सोप्यापुरतेंच हें इतिहासरचनेचें काम झालें आहे; मुख्य प्रासाद बांधण्याचें काम पुढेंच आहे. पण तें बांधकाम करण्या करतांच जसें एखादें घर बांधून रहावें लागतें त्याप्रमाणें ही ग्रंथ–निर्मिती आहे. हा वाटचालींतील मुक्काम आहे; मुख्य सुखवासाचें गांव व घर हें नाहीं. असें स्वतः ग्रंथकारच ज्या अर्थी सांगत आहेत; त्या अर्थी पावणे दोनशें, दोनशें वर्षांचा इतिहास लिहून झाला; त्या कामीं ही पत्रादि इतिहास–साधन–सामग्री कांहीं उपयोगांत आणली हें खरें असलें तरी; हें महाराष्ट्रेतिहासाचें काम वर म्हटल्याप्रमाणें दुहेरी पद्धतीनें–पत्रादि साधन—प्रसिद्धी व सिद्धेतिहास—प्रसिद्धी, ह्या पुढेंहि चालणार आहे., चाललें पाहिजे. इतकेंच नव्हे तर तिहेरी पद्धतीनेंहि तें आतां चाललें पाहिजे व त्यांतीलच प्रस्तुत 'शकावली' हें पुस्तक आहे.

२ ही तिसरी पद्धती कोणती ? वर ह्या बाबतींतील दोन पद्धती म्ह० दोन युगें सांगितलीं. बखर–युग व पत्रयुग किंवा बखरसमावेशित पत्र-युग; आणि इतिहासग्रंथयुग म्हणजे रियासत–युग. बखरी प्रसिद्ध झाल्या तेव्हां बखरींच्या आधारें 'रियासती' तयार होऊन त्या प्रकाशित झाल्या; पुढें पत्रें प्रसिद्ध झालीं तर पत्राधारें त्याच रियासती सुधारून पुनः प्रसिद्ध झाल्या. आतां तिसरी पद्धती तिसरें युग त्यांत समाविष्ट होऊन हें इतिहास–कार्य चाललें पाहिजे व थोडेसें चालूं झालें आहेही. ठोकळ मानानें व प्राति-निधिक रूपानें सांगावयाचें तर **बखर–युग साने** यांनी सुरूं केलें, **पत्र–युग राजवाडे** यानीं चालविलें व परिपुष्ट केलें आणि तिसरें **अभ्यासयुग,** म्हणतां येईल तें, **दत्तोपंत आपटे** यांनीं सुरूं केलें. ह्या तिन्ही युगांशीं समांतर असलेलें 'रियासत–युग' **रा. ब. सरदेसाई** यांचें आहे. वस्तुतः रियासतयुगाला 'युग' हें नांव देण्याला थोडा अवधी आहे. कारण सध्यां तें एकतंत्र आहे. संस्थेचें म्हणजे शाळेचें स्वरूप त्याला प्रस्तुत आलेलें नाहीं. असो; तर ह्या तिसऱ्या अभ्यास–युगाची आवश्यकता कशी ? व त्याचें प्रत्यक्ष कार्य कोणचें ? 'पत्र' हें इतिहासाचें साधन आहे हें स्पष्ट आहे. आणि त्यांपासून

इतिहासरचना करावयाची हें त्या साधनानंतरचें उद्दिष्ट आहे. पण हीं जर दोन्हीं सारखीं सुरूं राहणार तर प्रश्न असा कीं, कोणचें पत्र उपयोगांत आणिलें व तें कसें आणिलें आणि राहिलें कोणचें, हें कळलें पाहिजे. हेंच एखाद्या उदाहरणानें व तेंहि प्रस्तुत शकावलीच्या अनुरोधी उदाहरणानें सांगतों. खरे शास्त्री यांनीं 'अधिकार योग' म्हणून 'नाना फडणिसांकडे राज्यकारभारांतील प्रामुख्य कसें आलें' त्यासंबंधी ग्रंथ लिहिला (इ. स. १९०८); व नानांचें स्वतंत्र चरित्रहि (इ. १९२७ तिसरी आवृत्ती) प्रसिद्ध केलें. पण त्या दोन्हीं ग्रंथांत, ते ग्रंथ प्रसिद्ध होण्याच्या आधीं जें साधन प्रसिद्ध झालें होतें त्याचा अंतर्भाव होण्याचा राहिला. इतकेंच नव्हे तर, एका गोष्टीविषयीं ती गोष्ट आपल्या पुस्तकांत देऊनहि संशयितच व जरा वेगळेंच लिहिलें. आणि दुसऱ्या एका गोष्टीकरतां स्वतंत्र ग्रंथ लिहूनहि तोच विचार तसा मांडण्याचा राहिला. नानांचा आजा बाळाजी महादेव हा दिल्लींतील लढाईंत ठार झाला हें इतिहास संग्रहांत (इ. १९१० ११) व कैफियत यादींत (इ. १९०८) पत्ररूपानेंच प्रसिद्ध असतां चरित्रांत लिहिलें कीं 'ही गोष्ट खरी ठरेल तर आम्हांला आनंदच आहे. पण आधार नाहीं.' (ना. फ. च. पृ. ५) आणि नानांना सर्वाधिकार कसकसा येत गेला हेंहि इतिहास संग्रह आणि ऐतिहासिक लेख संग्रह (इ. १८९८) व थो. मा. रोजनिशी (१९११)ह्या ग्रंथांतून पत्ररूपानींच प्रसिद्ध असतां तेंहि विवेचन होण्याचें राहिलें. (ह्या मुद्याचा विचार प्रस्तावांतच पुढें आलेला आहे.) इतिहास ग्रंथ प्रसिद्धीनंतर जें साधन प्रकाशित झालें तें इतिहासांत घेणें राहिलें एवढ्या म्हणण्यानें भागत नाहीं. कारण, अशीं कांहीं पूर्वप्रसिद्ध पत्रेंच दृष्टिआड राहिलीं व तीं नेमकीं पुढें असण्याचें साधन नसल्यामुळें इतिहासांत उणेपणा राहिला. कांहीं पत्रें त्यांचा काल ठरविण्याचें साधन नसल्यामुळें त्यांना काल देतां आला नाहीं व काल नाहीं म्हणून इतिहासांत त्यावरूनच्या मजकुराचा अंतर्भाव नाहीं. तेव्हां एकीकडे विस्कळित व कालरहित पत्रें आणि दुसरीकडे तयार इतिहास ग्रंथ, ह्यांचा मेळ पाहाणारा, ताळा सांगणारा, खातेवार जमाखर्च असणारा, मधला जो हिशेबी अभ्यास–विभाग त्याची सहजच आवश्यकता उत्पन्न झाली. म्हणजे साधन व सिद्ध ह्या दोन्ही परस्परावलंबी ग्रंथांची प्रगति व शास्त्रशुद्धता-

साधक असें जें 'अभ्यासयुग' तें दत्तोपंत आपटे ह्यांनीं 'शिवकालीन–पत्रसार–संग्रह' आणि 'शिवकालीन शकावली' हे दोन ग्रंथ प्रसिद्ध करून प्रचलित केलें. व हीच ती तिसरी अभ्यासांतील एक पद्धती होय. पत्र, पत्राचा अभ्यास आणि पत्रावरूनचा इतिहास अशा ह्या तिहेरी पद्धतीनें हें महाराष्ट्रेतिहास–कार्य वर म्हटल्याप्रमाणें चालावयाचें आहे. व त्यांतील एक ही 'नाना फडणवीस शकावली' आहे.

ह्या अभ्यास-युगासंबंधानें आणखी दोन तीन आवश्यक गोष्टी सांगून त्याचें महत्त्व विदर्शनास आणावयाचें आहे पण त्यांपैकींच 'शकावली' हें एक अभ्यास अंग आहे आणि तसलीच एक शकावली प्रस्तुत पुढें दिली आहे म्हणून प्रथम त्याबद्दल दोन विचार सांगून मग त्या दोन्ही गोष्टीबद्दल लिहिणें बरें.

३ 'शकावली' म्हटली म्हणजे ओळखीचा थोडासा काल सांगून त्यापुढें एखाद्या वाक्यांत ऐतिहासिक घटना सांगितलेली असावयाची, असें सामान्यतः मनांत येतें; आणि ही 'नाना फडणीस शकावली' तर दोनशें चवदा पृष्ठांइतकी विस्तृत आहे. त्यांतील घटना सांगणारे उतारेहि क्वचित् एकेक सबंध पृष्ठाएवढे लांब लांब आहेत. तरीहि ती 'संक्षिप्त' च म्हटलें आहे. अर्थात् शकावली ही मूळ वस्तु काय त्याचे प्रकार किती ह्यासंबंधानें थोडक्यांत येथें विवेचन करणें प्राप्त वाटतें.

४ 'शकावली' ही संज्ञा रूढार्थानेंच प्रथम लक्षांत घेतली पाहिजे. शकावलींतील शक–शब्द वर्ष या अर्थाचा वाचक आहे; विशिष्ट लोक-वाचक शब्दाचा येथें कांहींच संबंध नाहीं हें सांगणें नको. निरनिराळ्या ज्या वर्ष –गणनापद्धती म्हणजे निरनिराळे जे शककाल, त्यांचा संग्रहहि शकावली-शब्दानें प्रस्तुत अभिप्रेत नाहीं. तर एका कालगणना—पद्धतींतील म्हणजे शालिवाहन शकांतील वर्षसंख्या येथें गृहीत आहे. तरीहि तीं शकवर्षें एकापुढें दुसरें अशा क्रमानें नुसतीं यद्यपि सांगितली म्हणजे त्यांत शकावली शब्दांतील शक आणि त्यांची आवली = ओळ जरी आलेली असली, तथापि त्यास शकावली म्हणतां येणार नाहीं. व्याकरण–दृष्टीनें शकावली हा समास षष्ठीतत्पुरुष म्हणतां येईल. परंतु वक्त्याच्या विवक्षेनुसारच विग्रह केला पाहिजे. तरच उद्दिष्ट त्या अर्थाची प्रतीती होते. म्हणून शकावली हा

मध्यमपदलोपी समास म्हणणें इष्ट आहे. शकावली म्हणजे शक काला-सह सांगितलेले प्रसंग, सुटे नुसते शक नव्हत. 'वर्ष महिना पक्ष तिथी वार ह्यांपैकीं क्रमानें उपलब्ध त्या त्या कालाला जो जो प्रसंग घडला त्या प्रसंगांची अनुक्रमानें नोंद केलेलें स्मरण पत्रक' म्हणजे शकावली. शकाव-लींत किंवा सनावलींत कालाला जरी प्राथम्य असलें तरी त्या कालापुढें जी घटना, जी हालचाल किंवा जो प्रसंग सांगितलेला असेल त्यालाच प्राधान्य आहे. नुसत्या शक वर्षांची पंक्ति ती शकावली नव्हे हें जसें सांगितलें तसेंच नुसत्या प्रसंगाची आवली हीहि वेळीं निरुप-योगीच होते. किंबहुना नुसत्या प्रसंगांची आवली करतांहि येणार नाहीं. कारण, त्यांत कालाशिवाय पौर्वापर्य कसें ठरवितां येणार? म्हणजेच कालरूपी धाग्याशिवाय प्रसंगांचीहि आवली बनणार नाहीं, म्हणून प्रसंगाला प्राधान्य असून सुद्धां प्रसंगावली असा शब्द बनला नाहीं. तर प्रसंग सांगण्यासाठीं अत्यंत आवश्यक जो वर्ष म्हणजे शककाल तो आधीं पाहिजे आणि नांव पडण्याच्या ज्या कांहीं रीती आहेत त्यांपैकीं शब्द–प्राथम्येन व्यपदेशा भवन्ति ह्या रीतीअनुसार शकावली हा शब्द लोकरूढ झाला.

५ आणखीहि एक पोट विचार येथेंच जातां जातां लक्षांत घेण्या-जोगा आहे. काल निदर्शक वर्ष—शब्द शक—शब्दानें सांगितला आहे. महिना–पक्ष–तिथी–वार हेहि काल–दर्शकच शब्द आहेत. आणि प्रसंग–कथनांत महिना इत्यादि काल ह्यांचेहि अगत्य सर्वस्वी आहे. पण वर्ष–विरहित महिना–तिथी हा काल उपयोगांत आणतां येत नाहीं. ऐतिहासिक पत्रांतून, मराठी किंवा मुसलमानी नुसता महिना आणि तिथी अथवा तारीख सांगितलेलीं अशीं पत्रें फारच फार आढळतात. विशेषतः राजकीय वा सामाजीक घडामोडी सांगणारीं जीं चिठ्यापत्रें आहेत त्यांवर बहुधा वर्ष सांगितलेलें नसतें, आणि अशा पत्रांतून ऐतिहासिक प्रसंगाचा तपशील इतका सूक्ष्म व सविस्तर असतो कीं त्या पत्राचा उपयोग करण्याची मोठी उत्कंठा वाटते. पण ह्या पत्रादिकांतून वर्ष दिलेलें नसल्यामुळें केवळ हिर-मोडून बसण्याचा प्रसंग येतो. म्हणूनच ऐतिहासिक पत्रांचा काल ठरविणें हें एक इतिहास संशोधकाचें प्रमुख गुण—लक्षण होऊन बसलें आहे. पत्राचा काळ सांगणें ही एक संशोधन शास्त्रांतील कसोटी ठरली गेली आहे. असो;

प्रस्तुत इत्यर्थ कीं ऐतिहासिक पत्रांतून नुसता महिना व तारीख असली तरी वर्ष–राहित्यामुळें त्यांतील प्रसंग इतिहास—देवतेच्या पूजनोपचारांत समाविष्ट करतां येत नाहीं. तें सुगंधीत प्रसंग—पुष्प असून सुद्धां ' वनींच कीं एक सुकोनी ' जाण्याचा प्रसंग ओढवतो. म्हणून वर्षकालप्रमुख शकशब्द सांगितला आणि वर्षसंज्ञेनें त्याच्या पोटांतील महिना इत्यादि जे उपकाल ते ग्रहण करावयाचे आहेत.

६ शकावलीनें प्रसंग सांगण्याचें काम जसें करावयाचें तसेंच शकावलीसाठीं आणखी एका शब्दाची आवश्यकता नेहमीं असते. त्यावांचून शकावली ही नुसती सुटी संज्ञा अपुरीच राहते. तो शब्द म्हणजे शकावली कोणाची एखाद्या राजाची, कीं एखाद्या स्थलाची, कां एखाद्यां विषयाची ? सारांश, शकावलीकडून जशी प्रसंगाची अपेक्षा त्याप्रमाणें शकावलीसाठीं तत्संबद्धक एखाद्या नांवाची अपेक्षा आहे.

७ वस्तूच्या नामरूपगुणात्मक ओळखीपैकीं शकावली ह्या वस्तूच्या नामासबंधीं एवढें लक्षांत घेतल्यानंतर आतां त्या वस्तूच्या रूपगुणाची ओळख करून घेणें इष्ट होईल. शकावलीचे मुख्यतः प्रकार दोन. सिद्ध म्हणजे बनविलेला जो तयार इतिहास तो वाचण्यापूर्वीं आणि वाचल्यानंतर त्यांत काय आढळेल व काय आढळलें हें ठोकळमानानें ध्यानांत आणून देण्याची सोय हा **शकावलीचा पहिला प्रकार.** ह्याचाच उल्लेख परि. ३ वर केला आहे. ह्या प्रकारच्या शकावलींत दिलेला काल तशाच स्वरूपांत प्रत्यक्ष इतिहासकालीं नव्हता; जो होता त्याचें हें नामांतर किंवा रूपांतर करून तो त्या शकावलींत सांगितलेला आहे. जी गोष्ट कालासंबंधानें तीच गोष्ट कालापुढें सांगितलेल्या प्रसंगासंबंधानें आहे. ह्या शकावलींत जो प्रसंग सांगितला असतो त्याचेंहि कालाप्रमाणें रूपांतर करून तो दिलेला आहे. आणि काळाच्या रूपातरापेक्षां प्रसंगाचे रूपांन्तरांत बदल होण्याचा संभव फार. कालविषयक शब्दाचें रूपांतर गणितबद्ध असल्यामुळें, तें रूपांतर, प्रसंग कथन करणाऱ्या भाषेच्या रूपांतराइतका फार फरक होण्याला अवसर देत नाहीं. मोहरमचा चैत्र करणें अथवा चैत्राचा एप्रील सांगणें हें अधिक बांधीव आहे. सुहूर किंवा आर्बीसनाचा किंवा फसली सनाचा शक अथवा इसवी सन सांगणें संख्यागत व निश्चित आहे. सारांश, इतिहा-

सांतील अनोळखी सनाचें व अनोळखी भाषेचें ओळखीच्या शकांत आणि भाषेंत भाषांतर वा रूपांतर ह्या पहिल्या शकावलींत केलें जातें आणि तेथेंच मनुष्यसुलभ जो दृष्टिभेद त्यामुळें इतिहासघटनेचें अर्थान्तरहि होण्याचा संभव असतो. आणि ते होऊं न देतां, इतिहासकालीन व्यक्तीकडूनच त्याच्याच भाषेंत त्याची ती ऐतिहासिक घटना आपणांस मूळाबरहुकूम जशी घडली तशी कळावी ह्यासाठीं हें रूपान्तर करतांना जपावयाचें असतें. आणि ही जपणूक ज्यांत साधिली आहे तो शकावलीचा **मुख्य व दुसरा प्रकार** होय. (१) ज्ञानेश्वरीचें नुसतें भाषांतर, (२) मूळ ज्ञानेश्वरी आणि भाषांतर व (३) नुसती मूळ ज्ञानेश्वरी हे जसे तीन प्रकार व त्यांत मधला प्रकार हा जसा सर्वमान्य, समाधानकारक आणि बिनधोक्याचा, तोच प्रकार ह्या दुसऱ्या शकावलीचा आहे. गीता, तुळशीदास रामायण, तुकोबारायांची गाथा आणि स्वतः वेद इत्यादि ग्रंथांच्या अभ्यासांत मूळ संहितेला जें प्राधान्य, जी आवश्यकता, जें महत्व तेंच ह्या दोन शकावलीं-तील दुसऱ्या शकावलीला आहे. इतिहासाचार्य राजवाडे ह्यांनीं आमच्या अर्वाचीन इतिहासाचें मूळ वेद म्हणजे स्वसंवेद्य अशीं ही पत्रें होत, असें जें म्हटलें तें ह्यावेळीं ध्यानांत येतें. सारांश, इतिहासकालांत तो इतिहास ज्यांनीं प्रत्यक्ष घडविला त्यांच्याचकडून तो समजावून घेणें हा दुसऱ्या शकावलीचा प्रकार होय.

८ एकाद्या उदाहरणानें हे शकावलीचे दोन प्रकार कसे व त्यांत मुख्य कोणचा व कां हे उलगडून सांगितलें म्हणजे नेमकें व पुरतें ध्यानांत येईल. त्यासाठीं प्रस्तुत शकावलींतीलच एक प्रसंग घेतों. नाना हे ज्या फडणिसीच्या कामामुळें पुढें त्या हुद्यासह प्रख्यात झाले तें फडणिसीचें पद त्यांस केव्हां मिळालें? ह्या प्रश्नांत दुसरा एक उपप्रश्न अंतर्भूत आहे. फडणिसीचे प्रकार आहेत कीं काय? कीं नानांना प्रथम एका प्रकारची फडणिसी होती व नंतर दुसरी मिळाली आणि म्हणून ते मुख्य व विख्यात झाले? आजच्या तयार व ओळखीच्या इतिहासांत हा प्रसंग 'इ. १७६३ आक्टोबर ५ ह्या दिवशीं नानांना फडणिसीं पुनः मिळाली' जसा सागितलेला आहे. (खरे शास्त्रीकृत नाना फड० चरित्र पृ. २१) आतां हाच प्रसंग दुसऱ्या म्ह० प्रस्तुत

शकावलींत कसा आहे तो पहा 'श्रीमंत माधवरावांनीं कार्यांत मन घालावें अशी आज्ञा केली. नाना व मोरोबादादा यांस त्यांनीं १ ल. १० ह. रु. फडणिसी उत्पन्नांपैकीं सरकारांत द्यावे असें करून फडणिसीचीं वस्त्रें दिलीं. दादानी दिकती घातल्या होत्या. प्रथम नाना लष्करांत गेले. पण पुण्याचा कारभार म्ह० मुक्कामची फडणिसी नानाकडे व लष्करांतील फडणिशी मोरोबादादा अशी वाटणी झाली. खासे कलमदान, कीर्दीचा रुमाल व स्वतंत्र राहुटी झाली.'. (शकावली पृ.५) पहिल्या प्रकारच्या शकावलींतील १७६३ आक्टो. ५ हा इसवी सन नानांच्या वेळीं महाराष्ट्रांत चालू नव्हता, सुहूरसन चालू होता व तो ११६४ रबिलावल २७ हा आहे. ह्या मुसलमानी सनाचा शक १६८५ भाद्रपद वद्य १३ बुधवार हा येतो आणि १७६३ आक्टो.५ हा इ. स. येतो. पैकीं इ. स. आतांच्या ओळखीचा सिद्ध इतिहासांत दिला आहे. आतां फडणिसी मिळाली त्या प्रसंगाची नोंद इतिहासकाळीं कशी व आतांच्या इतिहासांत कशी तें पाहण्यासारखें आहे. मूळ इतिहासकालांत बऱ्याच तफावतीची आणि सूक्ष्म माहिती देणारी अशी आहे. त्यावरुन ध्यानांत येतें कीं, फडणिसीचे त्या वेळीं प्रकार दोन. एक स्वारींतील म्ह० लष्करी फडणिशी व दुसरी मुक्कामची म्हणजे दरबारांतील, राजधानींतील फडणिसी. हे फडणिसींतील भेदहि राज्यकारभाराच्या स्वरूप-भेदामुळें व विस्तारामुळें पुढें स्पष्ट झाले. नानाफडणिसांकडे त्यांच्या बापआजापासून स्वारींतील फडणिसी आणि मजमू फडणिसी मुख्यत: होती; आणि म्हणूनच नाना सदाशिवराव भाऊबरोबर उदगीरला गेले, पानिपतला गेले, त्याहि आधी श्रीरंगपटणकडे, त्याहि पूर्वीं कोकणांत गेले होते. (कोकणांत स्वारीबरोबर गेले होते ही नोंद ह्या शकावलींतच नानांच्या नांवें प्रथम स्पष्टपणें मांडली जात आहे. पूर्वींच्या इतिहासांत ती नमूद नाहीं व तें सरळच आहे) नानांचे वडील जनार्दनपंत हे उत्तर हिंदुस्थानांत स्वारीवर असतांच मृत्यु पावले आणि आजे बाळाजी महादेव हे बाळाजी विश्वनाथाबरोबर दिल्लीस गेले असतां तेथेंच हल्ला होऊन लढाई झाली तींत ठार झाले. सारांश, अशी ही स्वारी फडणिशी नानांचेंकडे परंपरेनें आली असतां थोरले माधवरावांचे राजवटींत नानांच्या अंगच्या-हिशोबाकडे बारीक क्ष्य, टीपबंद व्यवस्था, सावधानता, विचारांतील गांभीर्य, वचनांतील

सचोटी, धर्मपरायणता, सतत उद्योगी वृत्ति इत्यादि गुणविशेषामुळें नानांनी स्वारींत न येतां पुण्यास राहावें तें अधिक बरें असें अनुभवांतीं थो. माधवराव यांस व सखाराम बापूंसहि वाटलें म्हणून ते मुक्कामच्या फडणिसीचे धनी झाले. हा मुक्काम शब्द स्वारींतील कुचमुक्काम ह्यांपैकीं नाहीं; तर राजधानीचें, मूळ दरबारचें, राज्यकारभाराचें मुख्य ठिकाण, तो मुकाम असा अर्थ ह्या मुक्काम—शब्दाचा येथें घ्यावयाचा आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या फडणिसी भानु घराण्यांतील व्यक्तींकडे चालावयाच्या. छत्रपती, प्रतिनिधी, सचीव, मंत्री, चिटणीस हे अधिकार व हीं पदें ज्याप्रमाणें त्या त्या घराण्याकडे योग्य व्यक्ति आहेत तों चालावयाचीं, त्याप्रमाणें ह्या फडणिशी–पदाचीहि गोष्ट आहे. तात्पर्य, दोन फडणिशींचा उल्लेख अलिकडील तयार इतिहासांत नाहीं. मूळ पत्रांतील उल्लेख दिलेल्या शकावलीवरूनच तो ध्यानांत येत आहे. तसेंच फडणिसीचे हे दोन्ही अधिकार नाना व मोरोबादादा ह्या उभयता भानु व्यक्तींकडे इ. स. १७६३ मध्यें विभागले गेले. नाना व दादा हे दोघे सख्खे चुलत भाऊ. त्यांत नाना थोडे वयानें वडील. दोघांकडे ह्या दोन्ही फडणिशीचे अधिकार देतांना त्यांतल्या त्यांत कोण कोणच्या फडणिशीस अधिक योग्य हें सहजच पाहिलें. आणि वर म्हटल्याप्रमाणें यौद्धिकगुणी मोरोबादादा व बौद्धिकगुणी बाळाजीपंत नाना असें थोरले माधवराव पेशवे, सखाराम बापू आदि राजकाज करणाऱ्या दरबारी मंडळींना वाटलें व ही विभागणी झाली. नाना हे क्रमाक्रमानें पुढें सर्व राज्यकारभाराचें प्रमुख होऊन बसले त्यास त्यांच्या अंगचे गुण हें कारण तर खरेंच. पण त्या गुणांच्या विकासाला अवसर ह्या दरबारी फडणिशीच्या प्राप्तीमुळें मिळाला ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. नानांच्या अंगच्या गुणामुळें म्हणजे गुणांच्या वाढीमुळें नानांना पुढें सातारा–राजमंडळाचीहि फडणिसी पांच वर्षांनी मिळाली (पहा शकावली पृ. १७) आणि चोवीस वर्षांनी (म्ह. १७९२) नानांना दिल्लीच्या वजीरीचीहि फडणिशी मिळाली आहे (शकावली पृ. १७१) सारांश, नाना फडणविसाकडे महाराष्ट्र राज्याचे किंवा साम्राज्याचे राज्यकारभारांतील प्रमुखत्व कसें आलें म्हणजे त्यांच्या अंगच्या गुणाची व त्यामुळें अधिकाराची वाढ कसकशी होत गेली आणि त्याचें बीज राजधानींतील

मूळ दरबारची फडणिशी नानांना मिळाली हें आहे इत्यादि भाग मूळ ऐ० पत्रांतील तत्संबंधीचे उल्लेख डोळ्यांसमोर असले व तेहि उल्लेख कालक्रमागत मांडलेले असले म्हणजे ध्यानांत येतो. फडणिसीचें उत्पन्न किती, कीं ज्यांतील १ ल. व १० ह. रु. सरकारांत प्रति वर्षी द्यावयाचे आहेत, तेंहि त्या उल्लेखावरून ध्यानांत येतें. 'राघोबादादांनी दिकती म्हणजे हरकती घेतल्या होत्या.' 'प्रारंभी थो. माधवरावांनीं कार्यांत मन घालावें अशी आज्ञा केली' त्याहि उल्लेखांवरून राघोबादादांनी हरकत कां घेतली? फडणिशी स्वीकारण्याबद्दल नानाना श्रीमंत माधवरावांनी आज्ञा केली म्हणजे नाना ती घेत नव्हते कीं काय? इत्यादि आणखी माहिती ह्या उल्लेखावरून सूचित होते. व हा गुण रूपांतरित किंवा नामांतरित शकावलीचा नाहीं; मूळ पत्रांतील उल्लेख साधार दिले असलेल्या शकावलींत तो मिळू शकतो. येथें हेंहि सांगणें इष्ट होईल. कीं, सातारा राजमंडळाची फडणिशी नानांना मिळाली तेव्हां ती सखारामबापूंकडे होती. म्हणजे भानूंच्या घराण्यांत फडणिशीचा धंदा जेव्हां केव्हां सांगितला गेला तेव्हां प्रथम तो मर्यादित असला पाहिजे. असो; फडणिशी संस्था हा ह्या प्रस्तावांतील प्रतिपाद्य विषय नसल्यामुळें ह्याहून अधिक विवेचन येथें करण्याचें कारण नाहीं. केलें ह्या विवेचनावरून एवढें ध्यानांत येईल कीं मूळ पत्रांतील उल्लेखांच्याच आधारें एखाद्या ऐतिहासिक विषयाचा विचार व्हावा.

९ येथें आणखी एका प्रश्नाची स्पष्टता केली पाहिजे. तो म्हणजे वर म्हटल्याप्रमाणें शकावली कोणाची? तर नाना फडणिसांची. ह्यासंबंधाचा प्रश्न असा कीं, नानांची शकावली, त्यांतून ती इतकी विस्तृत कशी? कारण तो बैठा पुरुष. ह्या म्हणण्यांतला भावगर्भ हा कीं, शिवाजीची शकावली, थो. बाजीराव शकावली, महादजी शिंदे शकावली, ह्या शब्दयुग्मांना अर्थ आहे. पण नानांची शकावली विस्तृत कशी? दोन्ही दृष्टीनें हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण मोहिमांच्या पलिकडे इतिहासाची व्याप्ती नाहीं, असें म्हणावें लागेल तेव्हां हें खरें नाहीं. इतिहासांत राजकारणाला प्राधान्य असलें तरी तेवढ्यानें पूर्णत्व नाहीं. आणि राजकारणांतहि यौद्धिक कामगिरीबरोबर बौद्धिक म्हणजे मंत्र—सभेंतील कामगिरीहि तितकीच महत्त्वाची आहे. महाराष्ट्राच्या राजकारणांत पहिल्या पांचसहा राजवटी जशा युद्ध-

तंत्रप्रमुख आहेत तशा पुढील पांच राजवटी युद्धतंत्रा इतक्याच मंत्रप्रमुख आहेत.

१० शिवाजी, संभाजी, राजाराम, ताराबाई, शाहू म्हणजे बाळाजी विश्वनाथ, आणि बाजीराव ह्यांच्या राज्यकारभाराचें स्वरूप आणि बाळाजी-बाजीराव, थोरले माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव आणि शेवटचे बाजीराव ह्यांच्या कालांतील राज्यकारभाराचें स्वरूप भिन्न आहे. आणि त्यांतहि कारस्थान, मनसुबा, मसलत, खलबत, तह, वाटाघाटी, वकिली, संकेत, भेटी, वार्ता, दगा, फितवे, ह्यांना जितके उत्तरोत्तर महत्त्व आहे; ह्यावर जितका भर पडला आहे ; हे प्रसंग जितके अधिक आहेत, तितके ह्या मागील कारकीर्दींत नाहींत. युद्धें, हल्ले, स्वाऱ्या, मोहिमा, चकमकी, छापे, वेढे हे कोणाच्या कारकीर्दींत नाहींत असें नाहीं. सर्व कारकीर्दींत आहेतच ; पण त्यांसह, राजकारणांत ह्या वरील कारस्थानी गोष्टी अधिक घडल्या आहेत अशा पुढील पुढील राजवटी आहेत. आणि अशांत ह्या नाना फडणविसांचा आयुर्दाय सर्व व्ययित झालेला आहे. महादजी व नाना हे जे दोन ह्या कालांतील प्रमुख कालहांके धुरंधर पुरुष तेच एकमेक जेथें 'सरदारी तुमची आणि फडणिसी माझी' इतक्या बंधुभावाचे स्वतःला मानीत आहेत (शका. पृ. ७२ पहा) तेथें इतिहासाचें जें अंतःस्वरूप मंत्र—आणि ह्या मुळेंच रामशास्त्री यांनीं नानांना ' मंत्र्युत्तम ' हें विशेषण योजिलें—त्या नाना फडणविसांची ही जवळ जवळ दोन विसां वर्षांच्या राज्यकारभारांतील प्रसंगांची शकावली सहजच मोठी आहे. व ती विस्तृतहि असणारच. राज्यकारभाराचें क्षेत्र इतकें ह्या कालांतील वाढलेलें आहे, कालहि सर्वांपेक्षां मोठा आहे, तसेंच इतकें गुतागुंतीचें तें आहे कीं राजधानी पुणें येथें कोणी तरी राहून हा सगळा व्याप व हा पसारा त्यांतल्यात्यांत सावधानतेनें, संग्राहक वृत्तीनें, हिशेबीपणानें संशुद्ध राजकीय दृष्टीनें सांभाळणें आणि बहिश्चर जे सरदार त्यांचा पाठपुरावा करणें, हें अत्यंत अत्यंत आवश्यक होय. राज्याच्या योगक्षेमास ' अप्राप्तस्य प्रापणं योगः प्राप्तस्य रक्षणं क्षेमः—ह्या ज्या दोन गोष्टी आवश्यक, त्यांची महती सारखीच आहे व ती इतिहासप्रभु शिवरायांनींहि थोड्या शब्दबदलानें सांगितली आहे.

११ तात्पर्य ऐतिहासिक घटनांचें स्वरूप जेथें विचारप्रधान म्हणजे मंत्र युक्त आहे तेथें केवल तंत्ररूप म्हणजे नुसत्या कार्यरूपाप्रमाणें त्या घटनांचें कथन थोडक्यांत होणारें नसून एकाधिक वाक्यांनींच सांगितलेलें असणार हें उघड आहे. कार्यरूप हालचाल आणि कारणरूप वाटाघाटी ह्यांच्या मांडणीमध्यें बिस्तार हा दुसऱ्याच्या वाट्याला येणार हें ओघानेंच येतें. जन्म, मृत्यु, लग्न, मोर्चे बांधले, लढाई, तहास मान्यता, मुक्काम, निशाण लावलें, कैद, सुटका, जप्ती, आजार असल्या घडामोडींची नोंद असलेली शकावली आणि तहांतील मतभेद, विचारांतील फरक, वकिली खुलासे, शंकांचें निरसन, आक्षेपाचें निराकरण, अमक्याच ठिकाणी सैन्याचा मुकाम कां, दुरोखी शह कोठें होईल, कारभारांतील सोयी गैरसोयी, मुत्सद्देगिरीचें सवाल जबाब अशा प्रकारच्या नोंदी असलेली शकावली ही अंगानें विस्तृत व गुणानें वेगळी म्हणजे माहिती अथवा तपशील सांगणारीच असावयाची हें सरळ आहे. ह्या नाना फडणविसांच्या शकावलींतील नोंदीला कोठें कोठें नव्हे बऱ्याच ठिकाणीं पत्रसारसंग्रहाचेंच स्वरूप आल्याचा भास होईल, इतक्या त्या नोंदी मोठ्या झाल्या आहेत त्याचेंहि कारण हेंच आहे. त्यांतहि मूळ पत्र केवढें हें पाहिल्यानंतर घेतलेली नोंद ही मोठी तरी कशी सुयुक्त व थोडक्यांत आहे तें ध्यानांत येईल.

१२ आरंभीं म्हटल्याप्रमाणें शकावलीचे सामान्य व विशेष असे जे दोन प्रकार ते आतां पर्यंतच्या विवेचनावरून ध्यानीं येतील. म्हणजे एक सिद्ध, तयार इतिहासाची शकावली व दुसरी साधनरूप शकावली. ह्या साधनरूप शकावलींत सिद्ध जो इतिहास त्याच्या शकावलीचेंहि कार्य होतें. पण तिचें रूप एकंदरींत साधनात्मक म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या साधनरूप शकावलीचे पोट प्रकार हे कीं, क्रियात्मक नोंदीची शकावली आणि कारणात्मक विचारांची मांडणी असलेली, तपशील स्वरूपाची शकावली.

१३ नानांच्या शकावलीचा विशेष व विस्तृतता कशी हें सांगितल्यावर ती विस्तृतता किती आणि तरीहि संक्षिप्त कां ह्याविषयींची स्पष्टता केली पाहिजे. वर एके ठिकाणीं नानाच्या फडणिसीचा काल दर्शित केलाच आहे. ठोकळमानानें नानांच्या फडणिसाचा काल १७६२ – १८०० हा लक्ष्यांत घेतां एवढा अवधींतील पत्रें १४, १२२ आहेत. ह्यांपैकीं इंग्रजीपत्रें २१८५ आणि

मराठीं पत्रें ११, ९३७ आहेत. नानांच्या फडणिसीचा हा कालच महाराष्ट्रेतिहासांत सर्वांत अधिक आहे. उदगीरच्या लढाईपासून नानांचीं पत्रेंच प्रत्यक्ष उपलब्ध व प्रसिद्ध आहेत, स्वतः नानांचीं व नानासंबंधानें छापलेलीं पत्रें ७० ग्रंथांतून आलेलीं आहेत. अर्थात् ह्यांत इंग्रजी ग्रंथ २०-२१ आहेत. ग्रंथवार ह्या पत्रांची संख्या येथें पृष्ठसंख्येच्या भयास्तव देतां येत नाहीं. सारांश, असा हा पत्रसंभार नानांच्या फडणिसी कालांतील पत्रांचा आहे. ह्यामध्यें वाडांच्या रोजनिशींतील उतारे धरलेले नाहींत हेंहि सांगून ठेवणें अवश्य आहे. अर्थात् इतक्या पत्रसंख्येतील ही शकावली २१४ पृष्ठांइतकी मोठी झाली तरी संक्षिप्तच होय हें आतां निराळें सांगणें नको. शकावलीच्या संक्षिप्तपणाविषयीं आणखी असें सांगतां येईल कीं, ह्या बहुसंख्य पत्रांतून नानांविषयींचे उल्लेख जे अनेक सहाय्यकां करवीं काढले ते १९६१ काढले आणि त्यांतील ह्या प्रस्तुतच्या शकावलींत ७९१ च फक्त घेतले आहेत. हे उल्लेख काढले किती व ह्यांपैकी छापले किती हीहि शकवर्षवार गणना केली आहे. तींतील कांहीं वर्षांचे आंकडे दर्शवितों. पहिला आकडा शकाचा, पुढचा कंसांतील आंकडा काढलेल्या उल्लेखांचा व त्या पुढील आंकडा छापले त्या उल्लेखसंख्येचा आहे. (१७२० (१७६) ३१, १७१८ (१६०) २६, १७१७ (१२६) ११. १७०२ (११८) ६५, १७०० (११०) ४७, १७२१ (१०९) ८, १७१९ (९७) १३, १७०३ (७१) ३२, १७०४ (७१) ३६, १७०७ (६२) २४, १७१३ व १६९९ (६०) १७ व ३८, (१७०१) (५७) ३३, १७०५ (५४) २३, १६९६ व १७१५ (४६) ३७ व १७ इत्यादि. ह्यावरून शकावलीची संक्षिप्तता स्पष्टपणें कळून येईल. कोणच्या साधनग्रंतांतील किती उल्लेख आहेत हेंहि सांगतां येईल. पण त्यांची तादृश आवश्यकता नाहीं. ह्यांतील इंग्रजी उल्लेख खरे ह्यांनी भाषांतरित करून दिले आहेत. आणि श्री. खोले, पेशवे, नगरकर, बेल्हे, घाणेकर, (ब. द. आपटे) इंग्रजी ह्यांनी मराठी पत्रोल्लेख काढून दिले आहेत.

१४ ह्या शकावलींतील उल्लेखांमुळें पुढील गोष्टी कळून येतील. सिद्ध ग्रंथांत गोळाबेरजेनें आधार दिलेले असले तर त्यांतील कोणत्या विधानास कोणता आधार तें नेमकें कळून येईल (रियासत). जेथें आधार दिलेले नाहींत (खरे चरित्र) तेथील आधार कळून येतील, कांहीं उल्लेखांना मुळांत काल–निर्देशच नाहींत त्यांचा काल लक्षांत येईल (नाना वरील

आपत्प्रसंग व पत्रें इ.), ज्यास आधार नाहीं असें म्हटलें त्यांतील काहीं गोष्टी आतां साधार ठरतील. नानांचा मुकाम पुणें, पुरंदर ह्या बाजूस असतांना जर पत्र त्यांस मिळालें तर त्या पत्रावर नुसती पोंचमिति म्हणजे पैवस्ती घातली आहे. आणि त्याहून दूर अन्य गांवी जर मुक्काम असला व तेथें जर पत्र मिळालें तर पोंचमितिबरोबर मुकामाच्या गांवाचाहि निर्देश नानांनीं सामान्यतः केलेला आहे. म्हणजे अशा पैवस्तीच्या उल्लेखावरून नानांचे मुकाम आढळले ते येथें दर्शविले आहेत.

इतिहासकालीं पत्रलेखनाचीहि एक पद्धती होती. त्यासंबंधीच्या नियमांचें शास्त्रच होतें व ते 'लेखनकल्पतरू' ह्या ग्रंथांत आलें आहे. त्यांत, आलेल्या पत्रांतील मजकूर कलमवार उद्धृत करून तसे उत्तर लिहिणें, एकदम सर्व मजकूर घेऊन उत्तर देणें, संक्षेपानें आलेल्या पत्रांतील मथितार्थ सांगून त्यावरील आपलें म्हणणें सांगणें इत्यादि लेखन–प्रकारांस सात्विक, शुद्ध, ऱ्हस्व म्हणजे रहस्यरीती अशीं नांवें दिलेलीं आहेत. प्रकट, गुप्त, प्रगल्भ इत्यादि आणखीहि भेद त्यांत दिलेले आहेत. असो, त्यांपैकीं 'शुद्धरीती' नें जीं पत्रें लिहिलीं आहेत म्हणजे जीं नानांनाच आलेल्या पत्रांतून काढावीं लागतात, स्वतंत्रपणें तीं प्रस्तुत उपलब्ध व प्रसिद्ध नाहींत. इतिहासकालीं अशा पत्रांना 'मालुमातीचीं पत्रें' म्हटलें आहे. अशींहि पत्रें त्यांच्या कालासह ह्या शकावलींत घेतलीं आहेत. ह्या पत्राचें आधारस्थल तेथें दिलें आहे; पण हा खुलासा लक्षांत घेतला म्हणजे तें नानांनीं पाठविलेलें पत्र त्या स्थळीं आढळेल.

१५ कांहीं पत्रें अद्याप हातीं आलीं नाहींत. उ. वेरूळ परगण्याची देशमुखी नानांकडे असे च. सं. पृ. २१९ वर आणि (पे. सा. पृ. १८) सरज्यापूर हा गांव बेलबागेकडे असें सांगितलें आहे. पण त्यासंबंधींची पूर्ण पत्रें मिळालीं नाहींत. येथेंच हेंहि सांगणें इष्ट होईल कीं, शकावलींतील उल्लेख केवळ नानांना बरें म्हटलें तेवढेच घेतले असें नाहीं. नानांचें करणें बदलविलें आहे, कोठें त्यांना ठपका दिला तेहि उल्लेख घेतले आहेत. जे उल्लेख स्थलाभावी घेतां आले नाहींत त्यांत तसें निर्देश असणें शक्य आहे. पण त्यास इलाज नाहीं. नानाविषयीं एखादा कवि दुरुद्गार काढतोहि आणि केवळ तसल्याच उद्गाराकडे कोणाचें लक्ष्य जातें हेंहि आढळतें. येथें पत्रांतीलच आढळले ते उल्लेख विवक्षित दृष्टि न ठेवता घेण्याचा यत्न केला आहे.

१६ श्री. म. ग. डोंगरेकृत ' सिद्धान्तविजय ' (कोल्हापूर १९०६) ह्या ग्रंथामध्यें पृ. १०६ वर ५ व्या परिशिष्टांत नानांचें सातारा किल्ल्यावरील अधिकारी बाबुराव आपटे ह्यांस लिहिलेलें पत्र छापलें आहे. ह्यांत छत्रपतींची मुंज वैशाख वद्य ५ स झाली, लग्न ज्येष्ठ शुद्ध द्वितीयेचें आहे, अडीचशें स्वार पाठवितों, कार्य विधिपूर्वक होऊन त्यांच्या आईंना संतोष होईल असें करा, पंधरा हजार रु. खर्च करा, इत्यादि मजकूर आहे. डोंगरे ह्यांनीं छत्रपतींकडील सामाजिक व धार्मिक कृत्यें विधिपूर्वक सांग होत असत हें दर्शित करण्याकरतां हे नानांचें पत्र त्या ग्रंथांत दिलें आहे. त्या दृष्टीनें पत्र महत्त्वाचें आहे. पण त्यावर वर्ष नाहीं वा छत्रपतींच्या नांवाचा उल्लेख नाहीं. तथापि नानांच्या राजवटीमध्यें रामराजे व दुसरे शाहू ह्याच दोन छत्रपतींचा संबंध येतो व दु. शाहू ह्यांस दत्तक घेतले, त्यांचा राज्याभिषेक झाला ह्या गोष्टी अन्य पुराव्यावरून लक्षांत आणिल्या, पत्रावरील रवाना आणि पोंचल्याची मुसलमानी महिनातारीख व पत्रांतील वैशाख वद्य हे उल्लेख जमतात केव्हां तें ध्यानीं घेतलें म्हणजे वर्ष निश्चित सांगतां येतें. आणि ह्या पत्राचा काल श. १७०० वैशाख वद्य १० इ. १७७८ मे २१ असा निश्चित देतां येतो. अशीं कांहीं पत्रें ह्या शकावलींत घेण्याचीं राहिलीं आहेत. कांहीं पत्रें घेण्याचीं राहिलीं हें सांगण्याकरतां हें पत्र उदाहरणार्थ घेतलें ह्याचें दुसरें कारण असें कीं, नाना फडणिसांची सामाजिक व धार्मिक दृष्टि उदार व शास्त्रशुद्ध होती आणि समाजांतील असलीं ग्रामण्यें व भांडणें मिटविण्याकडे त्यांचा कल होता हें सूचित व्हावें. शकावलींत पृ. १७४ वर प्रभु आणि ब्राह्मण ह्यांत कांहीं गांवापुरतां मोठा तंटा कित्येक वर्षें चालला होता. अर्थात् तो धार्मिक विधिसंबंधाच्या अधिकाराविषयीं होता. पण हा तंटा नानांनीं पुढाकार घेऊन मोडल्याचें आनंदाचें वृत्त स्वतः प्रभुगृहस्थ खंडेराव दौलतराव चिटणीस हेच कळवीत असल्याची नोंद दिली आहे. चिटणीस महेश्वर येथील आपल्या स्नेह्यास—हाहि स्नेही वेदमूर्ती आहे—लिहितात ' नानाहि थोर, आठा वर्षांचा तंटा मोडून टाकिला. शांतिक पौष्टिक सर्व कृत्यें यथासांग करविलीं. कोणी दिकती—हरकती—आणतील तर बंदोबस्तासाठीं सरकारी गारद्यांचे पाहारे व हुजरे दिले होते. सर्वा सरदारांस संस्थानांत तशीं पत्रें देविलीं.'

१७ ह्या शकावलीचा आणखी विशेष हा कीं, आतांपर्यंत उपलब्धहि नव्हतीं अशीं कांहीं पत्रें येथें प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. तीं पत्रें शकावलींत कालानुक्रमामुळें जेथल्या तेथें समाविष्ट झालीं असल्या कारणानें एकत्र व नेमकें कळण्याकरतां येथें त्यांचे पृष्ठांक देणें इष्ट आहे. पृ. ११, १२, १६, १८, २३, २६, २७, २८, १७५ व २२९. ह्या पत्रांवरून नानांकडे गांवें कोण कोणतीं व कोणच्या प्रकारें आणि कोणीं दिलेलीं होतीं त्यांची जी एक यादी ऐ. सं. सा. खं. ३ पृ. १३५ वर प्रसिद्ध झालेली आहे. त्या यादीला दुजोरा मिळतो आणि कांहीं गांवाच्या सनदा अद्याप फडणवीसांकडे असल्या पाहिजेत हेंहि कळून येतें.

१८ नानांच्या भेटीसाठीं जे निरनिराळे वकील वा त्यांचे कारकून त्यांजकडे येत शिवाय इतरहि अनेक कारणांनीं इतर लोक येत त्यांना आपण अमक्या करण्याकरतां आलों व भेट पाहिजे हें आधीं चिठी पाठवून कळवावें लागे. अशा भेट चिठ्याहि ऐ. सं. सा. खं. ६ पृ. ७७ वर प्रसिद्ध आहेत. त्या दोन बोटें रुंद व टीचभर लांब असलेल्या व्हिजिट कार्ड—चिठ्या शकावलींत घेतल्या नाहींत. पण ह्यावरून तेव्हा ही पद्धत होती हें ध्यानांत येतें.

इतिहास कालांतील शकावली

१९ आज ज्याप्रमाणें इतिहासाभ्यासाठीं आपण त्या त्या कालांतील प्रसंगांची शकावली तयार करतो त्याप्रमाणें इतिहासकालांतहि अशा शकावली बनत असल्याचें पुष्कळच आढळून येतें. मात्र त्या शकावलींचीं नांवें भिन्न आढळतात. सोलापूर किल्ल्याची कैफियत (इ. वृ. १८३७ पृ. २२८) विजयदुर्ग किल्ल्याची यादी (इ. वृ. १८३४ पृ. ८७), अंजनवेल तालुक्यांची वहिवाट (इ. वृ. १८३५ पृ. ३१९ व इ. सं. ऐ. टि. भाग ४ पृ. ३८), घडफळे यादी (इ. वृ. १८३५ पृ. ३७५), राजावली (इ. वृ. १८३६ पृ. २६), महाराष्ट्र राजे व मुसलमान पातशहा यांची यादी (खं. ८ ले. ४९), कोकणांतील घडामोडींची यादी (इ. सं. ऐ. टि. ३ ले. ३), यादी नामे (शि. च. सा. खं. ६ पृ. ५८), तळे सुभ्याच्या कारकीर्दी, (ऐ. सं. सा खं. ३ ले. १०५), इ.इ. ह्या शिवाय जेधे शकावली, गदाधर प्रल्हाद

शकावली, सहा कलमी शकावली, वाकेनिसी टिपण, स्मरणें यादी, यादी, फेरिस्त, वंशावळ, मेस्तक, शिवापूरकर शकावली, घोडेगांवकर वहींतील शकावली, दिनचर्या, इ. इ. इतिहास साधनग्रंथांतून आलेल्या आहेत. त्यांत कांही शकावली स्थलप्रधान आहेत म्ह० त्या त्या किल्ल्यावर कोणकोण अंमलदार क्रमानें आले ते सांगितलें आहे. सहा कलमी शकावली म्हणून म्हटलें ती मुरार जगदेव हा जो अदिलशाहींतील प्रसिद्ध सुभेदार व दरबारांतील पक्षसंघटक त्या एकटयाचीच मुख्य मुख्य कामें व अंमलदारी त्यांत दर्शित आहे. मुसलमान पातशहा ह्यांची यादी व मुसलमान नव्हेत त्या राजांची यादी देतांना 'महाराष्ट्र राजे' हें नाव योजिलें आहे. पण त्याचा अर्थ आर्य, क्षत्रिय किंवा हिंदु राजे असा घ्यावयाचा आहे. कांहीं नोंदी केवळ सृष्टींतील अनर्थ किंवा चमत्कार ह्यांच्याच आहेत भूकंप, उल्कापात इ. कांहीं शकावलींचीं नांवें ती शकावली ज्यानीं तयार केली किंवा ज्यांकडे ती सांपडली त्यांचीच दिलीं आहेत. पुष्कळ शकावलींना यादी स्मरण, दिनचर्या, हें नाव दिलेलें आहे व तेंच योग्य आहे. एका शकावलीला 'मेस्तक' असें प्रारंभीं म्हटलें आहे. म्हणजे त्यांतील नोंदीचा काल शालिवाहन शक, सुहुरसन, राजशक, फसली हे चारपांच सन देऊन दर्शविला आहे. मात्र असा काल देतांना वर्षच फक्त दिलें आहे त्यांतील महिना पक्ष तिथी हा पोटकाल सांगितलेला नाहीं. त्या शकावलींतून आलेल्या कित्येक नोंदी एकेक संबंध पानहि आहेत.

२०. ह्या जुन्या शकावली आणि प्रस्तुतच्या शकावली ह्यांत फरक असा आहे कीं, प्रस्तुतची शकावलींतील नोंद ही ज्या मूळ पत्रातून घेतली तें पत्रादि साधन कोणचें हें त्या नोंदीच्या शेवटीं दिलेलें असतें, देतां येतें. तसें इतिहासकालांत घडलेल्या शकावलींतील नोंदीविषयीं नाहीं. वस्तुत: शकावली ही वस्तुच अशी आहे कीं तिच्या मध्यें, ज्या घटनेची नोंद व्हावयाची ती घटना घडल्याचा काल आणि त्या घटनेची ह्या शकावलींतील नोंद व्हावयाचा काल ह्यांत बराच अवधी गेलेला असावयाचा व अशाच नोंदी शकावलींत पुष्कळ. ह्यासाठीं जून्या शकावलींतील नोंदी तपासण्याचें मूळ साधन नाहीं आणि आतांच्या शकावलींत तें आहे. जुन्या शकावलींना स्मरणें, स्मरणटिपणें असें कित्येक ठिकाणीं लिहिलें तेंच युक्त आहे. असें

आहे तरी जुन्या शकावलींतील नोंदी पत्रसिद्ध आहेत, खऱ्या व विश्वसनीय आहेत हेंहि लक्ष्यांत घेतां येतें. म्हणजे ती घटना घडत असल्यावेळचें पत्रहि मिळतें आणि त्यावरून ती नोंद तपासतां खरी आहे असेंहि प्रत्ययास येतें. ह्याच शकावलींत पृ. ५४ मध्यें राज्याभिषेकास मुहूर्त नाही म्हणून शिक्के जुनेच वापरावेत, असें नाना व बापू यांचें पत्र ऐ. ले. सं. तील दिलें आहे. आणि धडफळे शकावलींत बरोबर अशीच नोंद आली आहे. नाना बापूंनीं हा राज्याभिषेकशक गैरसोयीचा म्हणून हुकूम काढून बंद केला असें कोठें लिहिलें आहे, (शक कर्ता शिवाजी पृ. १६३) तें मुळांत म्हणजे धडफळे यादींतहि (इ. वृ. १८३५ पृ.३८९) नाहीं आणि त्याचेंहि मुळ जें तत्कालीन पत्र त्यांतहि नाहीं. असो. सांगण्याचा मुख्य मुद्दा कीं जुन्या शकावल्या किंवा स्मरणें लिहितांना त्या लेखकां पुढेंहि मूळ पत्रादि साधन होतें.

नानांचा शिक्का मोर्तब

२१ हे 'शिक्के' दोन असून 'मोर्तबें' तीन आहेत. असल्या अलभ्य व अपूर्व वस्तूंचा लाभ म्हणजे इतिहासब्रह्मानंद होय. आजपर्यंत म्हणजे संशोधनाला प्रारंभ होऊन अर्ध शतकावर वर्षें झालीं असतां आणि शिक्का मोर्तब उठविलेले सहस्रावधि कागद प्रसिद्ध असतां प्रत्यक्ष शिक्का मोर्तब ही वस्तु येथेंच प्रथम प्रसिद्ध होत आहे. कांहीं संशोधकांना अशा प्रत्यक्ष मुद्रा कोठें पाहण्यास सांपडल्या आहेत. कांहीं पुस्तकांत मुद्रांतीलच अक्षरें ठसा उठवून दिलीं आहेत. तथापि इतिहासकालीन एखादी मुद्राच प्रत्यक्ष छायारूपानें ही येथेंच प्रथम प्रकाशित होत आहे, असें म्हटल्यास चालेल. ह्याहूनहि विशेष हें कीं ह्या मुद्रा दोन आहेत. एकाच मुद्राधिकाऱ्याच्या एकाधिक मुद्रा असूं शकतात. हें कांहीं अभ्यासकांना अद्यापि पटत नाहीं. कांहीं अभ्यासक प्रत्यक्षा शिवाय इतर प्रमाणें मानण्यास कांहीं बाबतींत अगाच आग्रही असतात. अशांची प्रस्तुत दोन मुद्रा पाहून निश्चिती होईल. एकहि मुद्रा जेथें नव्हती तेथें दोन दृष्टीस पडत आहेत; इतकेंच नव्हे तर ज्यांची, कागदावर सुद्धां उठलेली मुद्रा आढळली नव्हती त्या नानाफडणविसांच्याच ह्या दोन मुद्रा प्रसिद्ध होत आहेत हें तर सर्वांत कौतुकाचें होय. ह्यावरून नाना फडणविसांचा शिक्का होता. ह्या गोष्टीबरोबर आणखीहि दोन गोष्टींची

स्पष्टता होत आहे. नानांचीं शंकडों पत्रें प्रसिद्ध झालीं असून त्यांवर हा शिक्का कोठें कसा कां आढळला नाहीं आणि आतांच हातीं येत आहे ह्यावरून काय समजावयाचें. तर ह्या बाबतचा भाग असा सांगतां येईल कीं, ज्या राजकार्यधुरंधराकडे, तो जरी सर्व राज्याचा व साम्राज्याचा कारभार प्रसंगी चालवीत असला तरी, स्वतः त्याजकडे म्हणून राजकीय दृष्टचा जो विशिष्ट प्रांतभाग मुलकी अंमल चालवून तेथील सर्व व्यवस्था व बंदोबस्त ठेवण्यासाठीं सुपूर्त केला असेल तेवढ्या प्रांतभागापुरतें त्याच्या शिक्यानें तें दप्तर चालावयाचें. सदाशिवरावभाऊ हे नानासाहेब पेशव्यांचे राजवटींत सर्व महाराष्ट्रसाम्राज्याचें जमाबंदी म्हणजे वसुली काम पहात असत. तथापि स्वतः सदाशिवरावभाऊंकडे कल्याण भिवंडी, जुन्नर ह्या प्रांतविभागाचा राजकाजांतील जो मुलकी अंमल तो स्वतंत्रपणें सोंपविला असल्यामुळें त्या प्रांतापुरते सरकारी कागदपत्र सदाशिवरावभाऊंच्या शिक्यानें चालत. ह्यां पैकीं जुन्नरकडील भाऊंचा शिक्का परत घेतल्याची नोंद भा. व. श. पृ. ५३ वर आलीहि आहे. त्याप्रमाणेंच नाना फडणवीस हे जरी सर्वसाम्राज्याचीं सूत्रें चालवीत म्हणजे सर्व राज्यकारभारांतील जे कागद शिक्कामोर्तबाचे बनावयाचे ते पेशव्यांचा शिक्का उपयोगांत आणून तें सर्व दप्तरी काम व राजशासन जरी चाले; तरी स्वतः नानाफडणवीसांच्या दिमतीस लोहगडाकडील किल्यासह कांहीं भाग दिला होता. तेवढ्यापुरता नानांना शिक्का मिळाला होता व तो त्यांनीं त्या विशिष्टमुलखाच्या कारभारप्रसंगींच वापरावयाचा असे. (नानांचा एक फारशी शिक्का असलेलें फारसीपत्र हि. रे. क. च्या सभाप्रसंगीं प्रदर्शनांत मांडलें होतें. ग. ह. खरे व डॉ. दिघे) पृ. २२९ वर नानांचें पत्र तळेगांवदाभाडे दप्तरांत आढळलें तें लोहगडयेथील बेगमीसंबंधानें येशवंतराव दाभाडे यांस लिहिलेलें आहे. लोहगडावर नानांचा म्हणून अधिकारी धोंडोपंत नित्सुरे हा नियोजित केलेला होता. नानांना पुणें सोडून सुरक्षितेसाठीं जेव्हां आपलें जडजवाहीर हलविण्याचा प्रसंग येई तेव्हां ते ह्या लोहगडावर पोंचवीत व स्वतःहि जाऊन रहात. निजामानें थो. माधवरावांच्या कारकीर्दीत इ. स. १७६३ मध्यें जी पुण्यावर चाल केली त्या वेळीं सर्व पुणें ओस पडलें त्यांत नानांनी आपलें सर्व कुटुंब व चीजवस्त लोहगडावरच पोंचविलीं व

स्वतःहि राहण्यास गेले. (शकावली पृ. ४ पहा) सारांश, लोहगड व त्याच्या घेऱ्यांतील मुलूख हा खास नानांच्या ताब्यांतील व व्यवस्थेचा भाग असल्यामुळें लोहगडावर २०० खंडी बाजरी, ५ खंडी तुरीची डाल ४०।५० बैल जोडचा तेल वार्षिक बेगमीपैकीं म्हणून पाहिजे व हें सर्व तलेगांव बाजारांतून नानांनी मागविलें आहे. तळेगांव हा त्या कालीं चांगल्या मोठया उतारपेठेचा गांव होता व अजूनहि तें वळण तेथें आहे. ह्या पेठेला आसपासचे व जरा दुरूनहि वाणी आपापले तांडे घेऊन येत. हे असे तांडेंच लोहगडावर यावे व बेगमी व्हावी आणि त्या बद्दल तळेगांवच्या पेठकरीना सेटेमहाजनाना व वाण्यांना ताकीद करावी असें नाना त्या पत्रांत दाभाडयांना लिहीत आहेत. ह्या पत्रावर शेंवटीं मागील बाजूस वर्तुळी आकाराचा नानांचा शिक्का आहे. कोणच्या दर्जाच्या माणसाला पत्र पाठवितांना कोठें शिक्का उठवावयाचा, हें हि ठरलेलें असें. केवल हाताखालच्या कनिष्ट अधिकाऱ्यास पाठवावयाच्या पत्रावर प्रारंभीं वर शिक्का असे; त्यापेक्षां वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्रांत प्रांरंभीच पण पहिल्या दोनतीन ओळींच्या सुरवातीस डाव्या बाजूला शिक्का व्हावयाचा आणि बरोबरीच्या व्यक्तींस जावयाच्या पत्रावर पत्राच्या मागें शिक्का उठवावयाचा अशी सामान्यतः नियमव्यवस्था दिसून येते व ती सुयुक्त वाटते. काहीं पत्रांवर नुसता 'मोर्तबंच' म्हणजे 'पत्रसमाप्तिचीच मुद्रा' उठवावयाची असे. पुष्कळ मजकूर असला म्हणजे कागद अनेक लागत व मग ते एकापुढें दुसरा असें चिकटवून जोडून ठेवीत. ह्या जोडगिरींवर मागील बाजूस उठविला जाई तो फक्त 'मोर्तब'च असे. पत्र बंद करून थैली–रूपानें पाठवीत तेव्हां त्याच्या वर उठवावयचा तोहि मोर्तब असे. 'शिक्का' आणि 'मोर्तब' ह्यांतील मोर्तब वेगळा आणि जोडावर व पत्राच्या तबलखावर म्हणजे वेष्टनावर आणि थैलीवर उठवावयाचा मोर्तब वेगळा. नाना फडणविसांचा हा स्वतंत्र मोर्तबहि पृष्ठ २३१–३२ वर दिसून येईल. दाभाडे यांस पाठविलेल्या पत्रावर मागील बाजूस नानांचा शिक्का आहे त्या अर्थीं नाना यशवंतराव दाभाडयांस मोठया मानानें व स्नेही म्हणून पत्र लिहीत आहेत. ह्या पत्रावर उठविलेला शिक्का बहुधा मुतालिकी असावा.

२२. 'मुतालिकी शिक्का' व खास 'स्वतःचा शिक्का' असे शिक्याचे दोन

प्रकार. मुतालिकी हा स्वारींतील शिक्का आणि खास स्वतःचा शिक्का हा दरबारांत म्हणजे राजधानीच्या जागीं हुजूर दप्तरांतील कचेरी शिक्का. त्या कालीं मुलुखगिरींतून म्हणजे स्वारींतूनहि राज्यकारभार चाले. व त्या दृष्टीनेंच निरनिराळ्या दूरवरच्या प्रांतांत जे अंमलदार नेमीत किंवा नामजाद अंमलदार म्हणजे विशिष्ट कालापुरते व विशिष्ट प्रांतविभागापुरते, जे प्रसंगप्राप्त अधिकार देऊन योजना होई (स्पेशल अपॉइन्टेड आफिसर) त्यांस जो शिक्का दिला जाई तो मुतालिकी शिक्का असे. ह्या शिक्यांतील व खास स्वतःच्या शिक्यांतील उल्लेख मजकूरदृष्ट्या अगदीं सारखा; पण शिक्याच्या आकारांत, मजकुरांतील एकाद्याअक्षराच्या वळणांत, ऱ्हस्वदीर्घांत सूक्ष्म फरक असे. व्यवस्थेच्या दृष्टीनें कोणचें पत्र मूळ ठिकाणचें आहे कोणचें स्वारींत असतांचें आहे हें नेमकें ह्या फरकावरून हेरतां येतें. आणि म्हणून मुतालिकी शिक्के एकाधिकहि असण्याचा संभव. तसेंच कोणाला फक्त मोर्तबच वापरण्यास सांगून कामावर पाठवीत. भारतवर्ष शकावलींत व रा. खं. २ मध्यें अनेक निर्देश आलेले आहेत ते ह्या व्यवस्थेंतील होत. ह्या शिक्यांची देण्याघेण्याची म्ह० जमाखर्चाप्रमाणें दिल्याआल्याची स्वतंत्र नोंद असे. असो. नाना फडणविसांच्या ह्या दोन शिक्यांतहि व स्वतंत्र असलेल्या मोर्तबांतहि असें अंतर ठेवलेलें दिसून येतें. दोन्ही शिक्यांतील मजकूर ‘श्रीशिवचरणनलिननिरत जनार्दनसुत बाळाजीपंडीत’ हा सारखाच आहे. पण एका शिक्याचा आकार पूर्ण वाटोळा आहे व दुसऱ्या शिक्याचा आकार लंब वर्तुळी आहे. लंब वर्तुळी शिक्यांत पंडीत ह्यांतील ‘प’ उलटा व डी दीर्घ आहे. मोर्तबांतहि लेखनसीमा; लेखनावधी, मर्यादेयं विराजते; लेखनावधिरीयं भाती,–समुल्लसति; इत्यादि वेगवेगळ्या प्रकारानें ‘पत्राची समाप्ती झाली’ ह्या अर्थाचाच मजकूर असतो. ‘मोर्तबसुद’ हा फारसींतील मजकूरहि समाप्तिसूचकच आहे. हाच शब्द नानांच्याहि समाप्तिमुद्रेंत आहे. असो. ह्यां शिक्काप्रकरणांत पुष्कळच लिहिण्याजोगें आहे तें लिहिण्याचें स्थल हें नव्हे. येथें फक्त नानांच्या नवीनोपब्ध शिक्यापुरतेंच लिहावयाचें आहे. ह्या नानांच्या मुद्रांचें प्रत्यक्षच दर्शन छायाचित्ररूपानें होत असल्यामुळें लिहिलें त्याहून अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. शिक्का मोर्तब ही जोडी आहे. ही जोडी एका रेशमी गोफांच्या टोकाला बांधून ठेवलेली असावयाची. कांहीं मुद्रा रुप्याच्या, तांब्याच्या,

सोन्याच्या, पंचधातूच्याहि आहेत. असा अनेक मुद्रांचा संग्रह मुंबईच्या रायल एशिआटिक सोसायटीच्या संग्रहीं आहे. तेथील ह्या जोड्या चांदीच्या सांखळ्यांतूनहि गुंफून ठेवल्याचें पाहिलेलें आठवतें. नानांच्या ह्या मुद्रांत दोन शिक्क्यांना गोफांतच अडकविलेलें गजनीचें एक तशाच आकाराचें आवरण आहे. फोटोंत तें वर सरकविलें आहे. मुद्रांची कडीसोडून उंची २॥" व १॥।" असून घेर ५" व ५।" आणि त्रिज्या १. ८५ सें. मि. आहे. दोन्ही मोर्तवांची उंची १।" आहे. वर्तुली मुद्रेचा कळसडेरा फिरता असून त्या खालीं आठ पाकळ्या आहेत. पृ. २३१ वर मुद्रांचे ठसे दिले आहेत आणि पृ. २३२ वर मुद्रांतील अक्षरें दिसतील असें केलें आहे. त्यांत क्र. ३ वरील शिक्क्यांत प उलटा व डी दीर्घ आहे. पहावें.

नानांचें दिल्ली–वजिरीच्या फडणीसीचें कलमदान

२३ हें कलमदान सर्व चांदीचें व जाळीदार असून १० इंच लांब, ३॥ इंच रुंद, व झाकणासह रुंदी इतकेंच उंच आहे. रुंदींत २।२ लांबींत ५।५ षड्दली कमलें दाखविलीं आहेत. कमलाच्या भोवतीं कमलवेलीतंतूंचें बांकदार वेष्टन आहे व ह्या वेष्टनांत ५।५ कमल कलिका दर्शित केल्या आहेत; हा वेल, त्या कलिका व कमल हें सर्व सुवर्णाचें आहे आणि सभोंवार जी दुहेरी पट्टी आहे तीहि सोन्याची असून कलमदानाच्या दोन्ही बिजागिऱ्या कडीकोयंडा हेहि सर्व सुवर्णांकितच आहे. झाकणास अगदी वरच्या बाजूस ४, दोन्ही बाजूंस ५।५ कमलें काढिलीं आहेत व त्याहि कमलांना कलिकांसह वेलीचा वेढा आहे. झाकणास रुंदीच्या बाजूस मधोमध व त्यालाच समांतर मूळ कमळदानास सछिद्र गुंडी, त्यांतून सोन्याचा गोफ घालण्यासाठीं बसविलेली आहे. कमलदानांत कलम म्हणजे लेखण्या ठवण्यासाठीं दोन पुडें, कप्पे, असून त्यांच्या टोंकास दोहींकडे मेहरपी आहेत. १॥ इंच खोल व डाव्या बाजूस चौकोनो दोन दौती चांदीच्याच आंहेत पुडांसहि चारी बाजूंस कमलें वगैरे सुवर्णांकित आहेत. ह्या सर्व कलमदानाचें काम फारच नक्षीदार जाळीबंद व प्रेक्षणीय आहे. कलमदानाचें खूरहि जाळीदार जाडसर चांदीचे व नक्षिदार आहेत. विशेष कीं, लेखण्या ठेवण्याच्या पुडाच्या मागें चांदीचा ३। इंची पत्रा आहे तो मात्र जाळीदार नसून साधा चांदीचा सपाट आहे, त्यावर ४, ४। ओळी लिहिलेल्या

आहेत. त्यांतील जो मजकूर वाचता आला तो असा 'वजिरीचे फडणविसीचीं वस्त्रें जालीं सा। कलमदान दिल्हे × × × × कर वजन १३५।। सरकारातून नजर छ १ सवाल' पांचवी ओळ पुसून गेली आहे. (ह्या फडणिसीचा उल्लेख शकावली पृ. १७० वर पहावा. महिना तेथें जिलकाद आहे?)

२४ अभ्यासयुग सुरू केले व त्यांतील ही एक शकावली, असें जेव्हां वर सांगितलें; तेव्हां पुढें सांगेन म्हटलेल्या एकदोन गोष्टी सांगतों. ह्या युगाचें एक लक्षण हें कीं प्रसिद्धीपेक्षां हस्तलिखितांतच हे युग मुख्यतः नटलेलें राहावयाचें. पत्रसारसंग्रह, शकावली किंवा निरनिराळ्या सूची आणि स्वारीमार्गाचें रेखाचित्र इत्यादि हें प्रसंगीं जरी प्रसिद्ध केलें तरीं आज सकाळीं प्रसिद्ध केलेला तो सारसंग्रह किंवा सूची ग्रंथ त्यां दिवशीं सायंकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या पत्रादि साधन–साहित्य–ग्रंथामुळें भर घालण्याजोगा म्हणजे अपुरा ठरणारा आहे. म्हणून ह्या युगाचें मुख्य लक्षण अभ्यासशालेमधील विविध व लावून ठेवलेल्या सूचिचिठ्या हें आहे. अभ्यासयुग म्हटलें तें ह्यासाठीं. दुसरें लक्षण हें कीं, ज्या पत्रांत राजकीय वृत्त असतें त्या पत्रांत इतरहि अनेक विषयास उपयोगी असा मजकूर असतो; म्हणून त्या त्या विविध विषयांचे पत्ते सांगणारी सूची सिद्ध ठेवणें हें पत्रप्रसिद्धीनंतरच्या अभ्यासशालेचें काम आहे. तथापि मधून मधून पत्रसारसंग्रह, शकावली, सूची, चर्चा निबंध हे हे प्रसिद्ध केले पाहिजेत. व हें संस्थाप्रधानच चाललें पाहिजे. भा. इ. स. मं. आपलें कार्य इतिहास तयार करण्याऐवजीं पत्रादि साधनप्रसिद्धी, आणि त्या पुढील दुसरी पायरी जी ह्या अभ्यासयुगानें दर्शित होतें. त्या रूपानें चालविलें आहे तेंच योग्य आहे. आणि वृत्तान्तग्रंथाऐवजीं 'शकावली' पुरस्कृत केली त्याचेंहि कारण हेंच होय.

२५ इतिहास–सारस्वतांत न बदलणारा आणि रूपांतर पावणारा, बदलणारा असे दोन भाग असतात. पैकीं न बदलणारा, शाश्वत असा भाग कोणता तर मूळ पत्रें. त्यावरून पुढें निरनिराळ्या रूपानें यादी, स्मरणें, बखरी आजच्या मराठींत व निरनिराळ्या भाषांतून तयार होणारे इतिहास इत्यादि ग्रंथ होतात. मूळ जी स्वसंवेद्य आद्य वस्तु पत्र, त्याच रूपांत तो ऐतिहासिक प्रसंग पाहण्याचा यत्न करणें हाच त्या काळच्या वृत्तान्ताची सत्य, शुद्ध व पूर्ण ओळख करून घेण्याचा राजमार्ग होय. तो ह्या शकावलींत अनुसरला आहे.

२६ ह्या शकावलीसंबंधानें श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनीं अधिकारी लेखणीनें शकावलींतील उल्लेखांचा परिचय करून दिलाच आहे मला आनुषंगिक जे दोन विचार मांडावयाचे ते येथवर सांगितले. आतां आभारोल्लेख करून हा प्रस्ताव पुरा करतों. पहिले आभार श्री. केशव वाळकृष्ण (के. वी.) जोशी ह्यांचे. त्यांचा विषय नसतां शकावलीच्या छपाईस त्यांनीं मान्यता दिली ह्या बद्दल त्यांचे मनापासून आभार मानणें भाग आहे. ह्या सर्वच पुस्तकाचें काम त्यांनीं मजवर सोंपविलें होतें. मीं जें सुचविलें व लिहिलें तें सर्व त्यांनीं मान्य केलें. खरोखर आभारी आहे. दुसरे आभार श्री. तात्यासाहेब भानू यांचें. श्री. भानू ह्यांना ह्या पुस्तकाबद्दल काय वाटत असलें पाहिजे हें निराळें सांगणें नको. त्यांनीं आपल्या संग्रहांतील ऐ. अप्रसिद्ध कागद, ऐ. बहुमोल वस्तु प्रकाशनार्थ दिल्या. विशेषतः त्यांसंबंधीचा जो ह्या सर्व पुस्तकांतील भाग त्याच्या छपाईचा वगैरे खर्चांतील भार त्यांनीं घेतला ह्याबद्दल त्यांचे आभार मानणें अत्यंत आवश्यक आहे. ह्या शकावलींतील इंग्रजी पत्रांचा सारांश श्री. द. ना. खरे ह्यांनीं बहुतेक सर्व काढून दिला आहे. मित्रश्रेष्ठ प्रो. पां. स. पिसुर्लेकर ह्यांनीं पोर्तुगीज पत्रांतील उल्लेख पाठविले. नानावाड्यांतील कमानीचे रेखाचित्र वेळास येथील स्मारकासाठीं काढून देणारे इंजिनीयर श्री. व्ही. व्ही. आगाशे व व त्यांचे सहकारी श्री. नाईक ह्यांचाहि येथें उल्लेख करणें इष्ट आहे. पूर्व निवेदनांत हा निर्देश राहिला तो येथें करीत आहे. अशा अनेकांच्या साहाय्यानें व मंडळानें दिलेल्या सवडीमुळें ह्या शकावलीचें व सर्व पुस्तकाचेंहि काम झालें. अ. वि. गृ. मुद्रणालयांतील कामगारांचाहि उल्लेख केला पाहिजे. (तसेंच आमच्या कारभारणीचेंहि साह्य ह्या कामीं नेहमींप्रमाणें झालें आहे.) त्या सर्वांचेच आभार मानून हा लांबलेला प्रस्ताव आवरतों.

शंकर नारायण जोशी

———

परिचयात्मक चार शब्द

धुरंधर मुत्सद्दी नाना

घर बांधून पाहावें आणि लग्न करून पाहावें अशी आपल्यांत एक अनुभवसिद्ध म्हण आहे. घर बांधण्याचा बेत ठरवितांना आणि लग्नाचा करार करतांना आपण जो अंदाज करतों त्याहून कितीतरी अधिक खर्च झाला असें घराची व लग्नाची पूर्तता झाल्यावर आढळून येतें. अशा या म्हणींतच आतां 'पुस्तक प्रसिद्ध करून पहावें' या वचनाचीहि भर घातल्यास तें शोभून दिसेल. ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करते वेळीं त्याच्या आकाराचा व त्याच्या खर्चाचा जो अंदाज असतो, त्याचें अतिक्रमण केव्हांच होऊन जातें आणि मग जी एकेक नवी कल्पना सुचेल वा इतरांकडून सुचविली जाईल, तिचा समावेश ग्रंथांत न केला तर ग्रंथाला पूर्तता येणार नाहीं या शंकेनें, आणि अंशत: अभिमानाच्या भरीस पडून, ग्रंथाचें स्वरूप इतकें वाढत व बदलत जातें कीं ते अनावर होऊं लागतें.

प्रस्तुतच्या ग्रंथाची अक्षरशः अशीच स्थिति झाली आहे. प्रथमची कल्पना एवढीच होती कीं, वेळास येथील **'नाना फडणविसांच्या'** उत्सवास १९५० ला पन्नास वर्षें होतात, तेव्हां पन्नास वर्षें चाललेल्या या उत्सवाचा वृत्तान्त एकत्र छापून प्रसिद्ध केला जावा. ही कल्पना निश्चित झाली तरी हें कार्य पार पाडण्याला कोणी तरी खंबीर निश्चयी पुढारी पुढें यावयास पाहिजे होता. तेव्हां ती कामगिरी **श्री. के. बी. जोशी** यांनीं मोठ्या हौसेनें व आत्मीयतेनें आपल्याकडे घेतली. अलीकडे श्री. य. ना. सोमण हे या उत्सवाचे व स्मारकाचें काम पाहात असतात. पण **श्री. के. बी. जोशी** हेच एक या उत्सवाच्या चालकांपैकीं आरंभापासून आतांपर्यंत एकसारखे झटणारे गृहस्थ आहेत. त्यामुळें या उत्सवाच्या उत्पत्तीपासून तों आजपर्यंतचीं सर्व स्थित्यंतरें त्यांनीं स्वत: पाहिलेलीं आहेत. अर्थातच ही **'उत्सवपन्नाशी'** तयार करून प्रसिद्ध करण्यास त्यांच्याइतका कळकळीचा व माहितगार दुसरा कोणीहि

नसल्यानें त्यांनींच हें काम अंगावर घेतलें हें ठीक झालें. इतरांकडून हें कार्य इतक्या नेटकेपणानें व इतकी झीज सोसून पार पडलेंच नसतें.

वृत्तान्तप्रकाशनाची कल्पना ठाम झाल्यावर त्या प्रकाशनांत कसकशी भर पडत गेली हें श्री. **जोशी** यांनीं आत्मनिवेदनांत नमूद केलेंच असल्यानें त्याची द्विरुक्ति करीत नाहीं. समग्र वृत्तान्त, केसरींतील अग्रलेख, कार्य-कर्त्यांचीं व नानांच्या वास्तूंचीं छायाचित्रें इत्यादि सर्व सजावट झाली असती तरी 'शकावलीची' जोड मिळाल्याशिवाय इतर मजकूर हा पाया-शिवाय नुसताच टांगता राहिला असता. शकावलीनें त्या वृत्तान्ताला पक्क्या पायाचा आधार दिला. ऐतिहासिक ग्रंथाला अस्सल कागदपत्रांचा आधार असल्याशिवाय त्यांतील विधाने लंगडीं पडतात. ही उणीव राहूं नये म्हणून इतिहाससंशोधक **श्री. शंकरराव जोशी** यांनीं यांतली शकावली तयार केली. तींत नानांच्या हातच्या व त्यांच्यासंबंधाच्या इतरांच्या पत्रांतील वेचक भाग त्रोटकरूपानें त्यांनीं नमूद केला. पण असा संक्षेप करतांना महत्वाचा मुद्दा कोठेंहि गाळलेला नाहीं.

नानांच्या अचाट कर्तृत्वावर प्रकाश पाडणारीं अनेक भाषणें या उत्सवप्रसंगानुरोधानें अनेकांनीं केलीं. अशीं सगळीं भाषणेंहि या पुस्तकांत सारांशरूपानें दिलीं आहेत. त्याचबरोबर १९०० सालचा या उत्सवाच्या प्रारंभींचा केसरींतील अग्रलेख, त्याचप्रमाणें प्रो. भानूंच्या **'नाना व महादजी'** या लेखांचा सारांश, इतकी सामुग्री या ग्रंथांत आहे. त्याशिवाय पुण्यांतील व्याख्यानमालेचाहि **सारांशरूपानें** उल्लेख आला आहे. नानांच्या चरित्रावर प्रकाश पाडणारीं इतकीं साधनें असलीं तरी 'शकावलींतील' अस्सल पत्रां-तील उताऱ्यांची उणीव इतर कशानेंहि भरून निघाली नसती. **श्री. शंकर-राव जोशी** यांनीं हि शकावली अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केली आहे. त्यां-तील अस्सल पुराव्यांवरून नानांच्या एकनिष्ठेसंबंधानें आणि धुरंधर मुत्सद्दीपणासंबंधानें निर्विवाद असा पहिल्या प्रतीचा पुरावा मिळून नानांच्या राज्यसंरक्षणाच्या विस्मयावह कर्तृत्वावर पूर्ण प्रकाश पडतो.

मराठी राज्याच्या १७२ वर्षांच्या कारकीर्दींत अनेकांचें बाहुबळ व बुद्धिबळ राष्ट्रकार्याच्या उपयोगीं पडलें. तथापि त्यांतल्या त्यांत चार मह-त्वाच्या टप्प्याशीं चार महापुरुषांचीं नांवें निगडित झालीं आहेत. श्री.

शिवाजी महाराज हे मराठी राज्याचे संस्थापक होत. **पहिले बाजीराव** हे स्वराज्यसंवर्धक होत. **थोरले माधवराव पेशवे** हे मृतप्राय स्वराज्याचें पुनरुज्जीवक असून त्या पुनरुज्जीवित स्वराज्याचे संरक्षक म्हणून **नाना फडणीस** हे इतिहासांत विख्यात आहेत.

नानांच्या अशा प्रशंसनीय कर्तृत्वावर शिंतोडे उडवून त्यास काळिमा फासण्याचा निंद्य उपद्व्याप कोण्या एका भाडोत्री लेखकानें केला. त्याची जी काय संभावना व्हावयाची ती त्यावेळींच झाली. त्या लेखकाच्या विपर्यस्त विधानांच्या खंडनासाठीं पुण्यास व मुंबईस दोन व्याख्यानमाला झाल्या आणि त्याशिवाय श्री. **न. र. फाटक** यांनीं **नवा काळ** पत्रांतून एक लेखमाला लिहून नानांच्या कर्तबगारीचें साधार मण्डन केलें. नानांची योग्यता पटवून देण्याच्या दृष्टीनें हे जे अनेक प्रयत्न झाले, त्यांची दखलगिरी घेणें हें नाना फडणवीस स्मारक मंडळाचें कर्तव्य होतें. म्हणूनच **उत्सवपन्नाशीच्या** वृत्तान्ताला या अवान्तर झालेल्या प्रयत्नांची सारांशरूपानें जोड देण्यांत आली. ही जोड देतांना सध्यांच्या चिकित्सक वृत्तीच्या काळांत कोणतेंहि विधान अस्सल पुराव्याच्या आधाराविना टिकूं शकत नाहीं, म्हणूनच त्या वृत्तान्ताला 'शकावलीची जोड' देण्यांत आली.

या शकावलींत पत्रव्यवहाराचा जो भाग मुद्द्यापुरता निवडून उध्दृत केला आहे त्याची नीट संगति लावून पाहिल्यास तींतून नानांची स्वामिनिष्ठा, कार्यनिष्ठा, स्वराज्याच्या संरक्षणाची कळकळ, अलोट बुद्धिमत्ता, दूरदृष्टि, अखंड सावधानता, राजकारणपटुता, संकटाचे पर्वत कोसळले तरी विचलित न होणारा आत्मविश्वास, इत्यादि गुणांची मालिका सुस्पष्ट होते. कोणाहि महापुरुषाच्या कर्तृत्वाची कसोटी पाहावयाची झाल्यास त्या महापुरुषाच्या कारभाराला प्रारंभ होण्याच्या वेळची परिस्थिति, त्या परिस्थितींतून त्यानें उभा केलेला कार्याचा डोलारा आणि त्या महापुरुषाच्या निधनानंतर त्याच्या अभावीं कर्तृत्वशक्तींत भासणारी उणीव, अशा तीन गोष्टींचा विचार करावा लागतो. नाना फडणविसांनीं १७७५ त आपल्या हातीं अधिकारसूत्रें घेतलीं. त्यावेळीं मराठेशाहीची इभ्रत जणू काय रसातळासच पोंचली होती. अशा हीनदीन व संकटग्रस्त परिस्थितींत स्वराज्याची धुरा आपल्या अंगावर घेऊन आपल्या अद्भुत बुद्धिबळाच्या जोरावर

त्या धुरंधर मुत्सद्द्यानें वीस वर्षांत मराठेशाही वैभवाच्या कळसास पोंचविली. खडर्यांच्या लढाईंतील विजय हा नानांच्या कर्तृत्वाचा परमोत्कर्ष होय. त्यानंतर दैवाचा फांसा उलटाच पडत गेला. तथापि पांच वर्षेपर्यंत या महापुरुषानें पडती बाजू कशीबशी सांवरून धरली. मराठेशाहीचा हा आधारस्तंभ ढळतांच पुढें १८०० पासून कोणते अश्लाघ्य प्रकार घडले हे इतिहासज्ञांस विदित आहेच. असला हा भयंकर अधःपात नानांनीं आपल्या राजकारणपटुत्वानें थोंपवून धरला होता व त्यांच्या पश्चात् तो आंवरून धरण्याची शक्ति एकांतहि नव्हती, यावरूनच नानांचें कार्यकौशल्य आणि इतरांची असहाय्यता यांतील महदंतर प्रत्ययास येतें. मनुष्य जिवंत असतां ज्यांना त्याच्या कार्यकर्तृत्वाची यथार्थ कल्पना येत नाहीं त्यांना त्या महापुरुषाच्या स्वर्गवासानंतर त्याची जाणीव पदोपदीं होऊं लागते. नाना जिवंत असतांना पुण्यावर होळकराची धाड व त्या शहराची लुटालूट होऊं शकली नसती आणि बाजीराव वसईला पळून जाऊन इंग्रजांच्या आहारीं गेला नसता. नानांचा वचक नाहींसा झाल्यावरच असले अनर्थापात होऊं शकले; यावरूनच नानांचा वचक किती होता हें व्यतिरेकप्रमाणानें सिद्ध होतें. परंतु नानांच्या अंगचे गुण अनुमानानें दर्शविण्याचें आतां कांहीं कारण नाहीं. 'शकावलींतील' उतारेच त्यांच्या गुणांची साक्ष देउं शकतात. यास्तव ते साक्षीदार काय सांगतात तेंच आपण आतां पाहूं.

नानांचा लष्करी हालचालीशी संबंध

भानूंचें घराणें फडणविसांचें घराणें म्हणून प्रसिद्ध असलें तरी धन्यांच्याबरोबर रणांगणावर जाण्यास ते सतत तयार असत आणि प्रसंगविशेषीं त्या कुळांतील पुरुषांनीं आत्मबलिदानहि केलें आहे. नानाफडणविसांचें लक्ष रणभूमीकडे असून रणभूमीवर लागणाऱ्या साहित्याची तरतूद करण्यांत ते दक्ष असत. त्याचप्रमाणें प्रसंग विशेषीं ते सरदारांना डावपेंचाविषयींहि इषारा देण्यास चुकत नसत. याची साक्ष पुढील उतारे देतील.

१. नानांचे आजे बाळाजी महादेव हे बाळाजी विश्वनाथ प्रधान यांजबरोबर दिल्लींतील स्वारींत असतां युद्धप्रसंगीं जखमा लागोन मृत्यु पावले (इ. स. १७१९ आगस्ट २). २. नाना फडणीस पेशव्यांबरोबर कोंकणांत स्वारीवर होते. मुक्काम विजयदुर्ग (१७५६ मार्च ३०).

३. नानांचे वडील जनार्दनपंत यांचा उत्तर हिंदुस्थानांत मृत्यु (१७५६) ४. श्रीरंगपटणच्या स्वारींत पेशव्यांबरोबर नाना फडणीस (१७५७). ५. भाऊसाहेबांबरोबर नाना पानिपतावर जाण्यास निघतात. (१७६० मार्च १९). ६. इंद्रप्रस्थ (दिल्ली) येथें मुक्काम (१७६० सप्टें. १५). ७. पानपतांतून परत येतांना शिरोंज येथें मुक्काम (१७६१ मार्च ३१). ८. थोरले माधवराव कर्नाटकांत स्वारीवर गेले असतां नानांनीं लष्करांतील निकड जाणून ४३ हजार रुपयांच्या हुंड्या पाठविल्या (१७६३ जून ४). ९. माधवरावांच्या लिहिण्यावरून नानांनीं तोफांचे गोळे, दारू, शिसें इत्यादि युद्धसाहित्य पाठविलें (१७६७ सप्टें. ३); १०. माधवरावांच्या सांगण्यावरून नानांनीं पुण्यास तोफा ओतण्याचा कारखाना काढला (१७७० मार्च ३१). ११. नाना लिहितात कीं, 'हैदरचा वकील आला पण रंग पडेलअसें बोलणें नाहीं. (१७७० जाने. १२). १२. नाना धुळपास लिहितात–' विजयदुर्गपासून तो सुरतेपर्यंत छबिना करावा. (·१७७२ नवं.). १३. सरदारांना तंबी–गॉडर घाट चढून येतो, त्याची नुकसानी कांही होत नाही, हें काय ? (पृ. १०५) तुम्ही इतके सरदार घाटाखाळीं असतां हे इंग्रज रसद घेऊन येतात, याचा अर्थ काय ? (इ. स. १७८१ मार्च २२). १४. ब-हाणपुरावर छावणी केली असतां मसलतीचा रोख सुटतो, या करितां कोंडाईबारीवर छावणी करावी. (महादजीस पत्र १७८० मे २७). १५. कोंडाईबारीवर छावणी करावयाचें मी बोलतों, याचें कारण इंग्रजांच्या उरावर कटचार राहील. (१७८० मे २४) १६. इंग्रज रेवातीरीं असतां पाठीवरील फौज काढून आणली, येणेंकरून इंग्रज मोकळे झाले. ब-हाणपुरावर छावणी केली असतां मसलतीचा रोख सुटतो. या करितां कोंडाईबारीवर छावणी करावी हें चांगलें. उज्जनीस छावणी, असें झालें तर फारच विलग पडेल (१७८० मे २७). १७. आग्र्याची पलटणें फरासिसी किंवा इंग्रजी ? इंग्रजी असल्यास पुढें ठेवीत जावीं. (१७८१ मार्च ८). १८. कोहज किल्ल्याकडे तुम्ही गेल्यास सुरतेहून मुंबईस रस्त येते, ती बंद होईल, लूट मिळेल. (१७८१ एप्रिल ९). याशिवाय टिपूच्या लढाईंत तर नाना तोफांच्या मोर्चाजवळच असलेले उल्लेख आहेत.

नानांची माणसाची पारख

नानांना माणसाची उत्तम पारख होती. त्यामुळें कोण मनुष्य काय लायकीचा व कोणास कसें वश करावें हें त्यांच्या तत्काल ध्यानांत येत असे. या गुणामुळेंच त्यांनीं इंग्रजांविषयीं विचारपूर्वक ठाम मत बनविलें होतें व त्यास अनुसरून ते त्यांच्याशीं वागत व इतरांना सावधगिरीचा सल्ला देत. याची साक्ष पुढील उताऱ्यांत पहा. १ इंग्रज जात पक्की. प्रथम लिहिणें, बोलणें परम गोड. दुसऱ्यास असें वाटावें कीं, काय इमान वचन आहे यांच्यापाशीं, खरेपणाची रास, अशी भुलथाप पडावी. पण परिणामीं उमजते. त्यांची नजर केवळ वांकडी. एकास मिळून घ्यावें, एकास हलकें करावें. फोडा फोड करावी, नाद राखावा, ऐसें आहे. (१७८० फे. ७). २. इंग्रजांच्या बोलावण्यावरून चिटणिसास सुरतेस पाठविलें. चार महिने नुसतें बोलणें. बाहेर गोड बोलावें, आंतून सामान (लढाईचें) करावें. तेव्हां गोष्ट मगरूरीची जाणोन पारिपत्य करणें जरूर (१७८० जाने. ४). ३. इंग्रज व महंमद अल्लीखान (अर्काट) मनसबा करतात, 'शकटभेद करून द्वैत पाडावे;' तरी सावधता असावी. इंग्रजांचें मानस कीं हैदरखान, श्रीमंत व नबाब तिघांच्याहि दौलता घ्याव्या. कोणेहि प्रकारें एकासी शकटभेद करून एकास खालीं पाडावें. असें करतां एक राहील, त्यास आपण शेवटीं गुंडाळावें. (१७८० आगष्ट ४). ४. चरकाची गत आणि इंग्रजांची चाल एक. दौलतकर्ते दूरंदेशी आहेत तेच हें समजतील. ज्या राज्यांत टोपीकरांची चाल, तेथील गत काय हें कांहीं लोपलें नाहीं. (१७७८ नवं २४). ५. इंग्रजांची मसलत शिजली आहे. कलकत्त्याहून इंग्रजकंपू येतो. तोपर्यंत तुम्हांसी बोलतील. मग तीव्रता करतील. तर त्यासी बोलणें युक्त नाहीं. जोंवर कंपू आला नाहीं तोंवरच जलदी करून पारिपत्य होय, ऐसें करावें. ६. इंग्रज माघारी जाऊं द्या म्हणतात, पण तें ऐकूं नये. ते दगाबाज आहेत. आपली फौज चोहोंकडे गेली कीं, हे हालचाल करतील. आयते भैदानांत सांपडले. पारिपत्यच करावें (१७८१ मार्च १४). ७. इंग्रजांचें पारिपत्य केल्याखेरीज पादशाहींत कोणास चैन पडणार नाही; हें पुर्ते समजावें. (१७८१ मे २९). ८. इंग्रजांची पेरवी खुशकींत झाल्यास कोणाचेंहि रूप राहणार नाहीं. बंगाल्यापावेतों खरडीत नेऊन मुलूख सोडविला

पाहिजे. ९. इंग्रजाचें पारिपत्य बंगाला मारल्याखेरीज होत नाहीं. (१७८२ जाने.). १०. कालहरणाने इंग्रज हावभारी होतील (१७८० सप्टे. १४). ११. सरदार गॉडर सुरतेहून मुंबईस येऊन सरंजाम लढाई करीत आहे. लबाडीस चुकणार नाहीं (१७८० सप्टें. २६).

नानांची सावधानता

नानांच्या विरुद्ध अनेकांनीं अनेकवेळां कट रचिले व त्यास पेंचांत पाडण्याचा घाट घातला; परंतु त्या सर्व कटांतून स्वतः पार पडून नानांनीं कटवाल्यांचेंच पारिपत्य केलें. ही नानांची सावधानता पुढील अवतरणांवरून व्यक्त होईल.

१. रा. नानांस कोणी गाड्यांकरवीं दगा करावासा केलें होतें; परंतु वर्तमान कळोन सावध झाले. (१७७७ जून ६). २. जांबगांवीं शिंद्याच्या लष्करांत कट झाला. शिंदे व होळकर पुण्यावर चाल करून येणार. सावध असावें. (१७७९ जून-जुलै). ३. नानास व हरीपंतास दगा करावा ही मसलत बळवंतराव पटवर्धन व गोपाळ जोशी यांनीं केली. ह्या दग्याच्या मसलतींत पार्वतीबाईहि होती! दुसराहि फितुर नारो गोपाळ, त्रिंबकजी भालेराव गोगटे यांचा इंग्रजाकडे कीं 'सोमवारीं छापा घालावा.' अशी निरोपचिठी. तें उमगलें (१७८० एप्रील २४). ४. कवडी मुक्कामीं बापू मोरोबाच्या भेटीस गेले. त्याचा परिणाम नानावर प्राणसंकट ओढवलें. तसेंच ते आतां निरेवर शिंद्यास भेटणार. तुम्हांस दगा होईल या करितां सावध रहा (१७७८ जून ६). ५. इंग्रजाकडील चार माणसें आलीं; घालवून द्यावीं. बातमी घेऊन जातील (१७८० मार्च ६). ६. पुण्यास रात्रीं वाड्यांत फितुर झाला, सर्व लोक देवडीचे फितुरले. दादासाहेब निघोन जात. तों बातमी नानास कळली. त्यावरी वाड्यांत बंदोबस्ती केली. गाडदी यांचे जमायतदार व खिजमतगार ५०–६० तेहि चतुर्भुज केले. चौक्या बदलून खडे पहारे केले. कागद फितव्याचे सांपडले (१७७० मार्च २३). ७. चार पिढ्या ज्यांचें अन्न भक्षिलें त्यांचें सार्थक करावें हें चित्तांत आणून मी व सखारामपंत गंगाबाईला घेऊन, मोरोबा व हुजुरांच्या फौजेसह सातान्यास येणार होतों. पण बंदोबस्तासाठीं येथें (पुरंदर गडावर) राहिलों. लवकरच सातान्यास येऊं (१७७४ फेब्रु. ३). ८. मोरोबादादांनीं पुरंदरास गडकऱ्याशीं

कांहीं गुप्तसंधान केलें. हें नाना व बापू यांस समजतांच त्यांचा प्रमुख शिंदे यास पारिपत्य करून बंदोबस्त केला (१७७४ दिसें.). ९. नाना फडणीस यांस, विष्णु नरहर व खंडेराव निंबाजी हे उभयतां, दगा करावा अशा मतलबांत होते. तें वर्तमान नानांस कळतांच विष्णु नरहर यांस शृंखला जोडून सिंहगडावर व खंडेरावास रुद्रमाळेवर घातले. (१७७६ एप्रील) १०. सखारामहरि यांस नगरच्या किल्ल्यांत पाठविलें आहे. चौकीवरचीं माणसें नेहमीं बदलीत जाणें. प्रभु कारकुनांस जवळ जाऊं देऊं नये. **जेवणाची वस्त्रपात्राची आबाळ न करणें. खेळचा राजकारणी आहे. बेडी असो देणें** (१७७६ आक्टो. ४). ११ कोल्हापुराकडील घाटांनीं माणूस व राऊत तोतयाकडे जातात. त्यांची बातमी राखून कांहींचीं डोकीं मारावीं. तोतयाकडे चाकरीस गेलेल्यांचीं बायकामुलें धरावीं. घरें लुटून जाळावीं. आम्ही शास्त्रार्थ मात्र लिहितों परंतु सत्वेंच आम्हाकडील सरदारांचीं जात चाललीं त्यास उपाय काय? (१७७६ आक्टो २७). १२. इंग्रजाशीं तह करतांना फार सावधगिरी ठेवावी लागते. पुढील मागील गुणदोष पहावे लागतात. एकेका अक्षरास जपावे लागतें. त्यांच्या बोलण्यांत, लिहिण्यांत, अक्षराअक्षरांत फार पेंच असतात (१७८२ जाने-फेब्रु.). १३. इंग्रजांनीं खुशकींतील दौलतींत आपला कदम टाकून त्या पेंचांत आणिल्या. याची चाल दुरुस्त नाहीं. १४. दादांना मुदतींत युक्तीचे वाटेनें तुमचे स्वाधीन करूं असें बोलण्यांत आहे. पाटीलबावांचे स्वाधीन करूं असें कलम नाहीं. बोलण्यावर जाऊं नये. ते दगाबाज आहेत. अगोदर हातीं घ्या; किंवा कचेश्वरीं पोंचते करा (१७८२ आगस्ट ८). १५. भिकाजीपंत नाईक कोलटकर व त्यांचे बंधु धोंडोपंत यांनी राजश्री नाना न राजश्री तात्या हे उभयता कारभारी ठीक नाहींत, यांशी धरून आपण दिवाणगिरीचा कारभार करून त्यांस दगा करून येथें आणावे, असा कट केला. परंतु शेवटीं हें साध्य न होतां आपणच पेंचांत आले. १६. तीन वेळां इंग्रजाशीं मजकूर केला. त्याचीं उत्तरें तीन वेळां निरनिराळीं आलीं. यांत इतबार कोणत्याचा धरावा? यांचा विश्वास धरतां येत नाहीं, बोलणें फार स्वच्छतेचे बोलतात, पण कोणे वेळे काय करतील याचा इतबार नाही (१७८८ आक्टो. २३). १७. पातशहाजादा यांची भेट नाना वाड्यांत. नाना व तात्या परत भेटीस जाऊन दोन घटका बोलोन आले. (१७८९ जुलै २८).

१८ प्रयाग क्षेत्रांत हिंदूंकडून घेण्यांत येणारा कर इंग्रजांनी रद्द केला. या मध्येंहि इंग्रजांचे कांहीं राजकारण असावें अशी नानांना शंका. (१७९० ऑगस्ट १५). १९ मिसेस जेम्स हॉल ही स्त्री, सैन्याची पलटण तयार करणारी लष्करी कवायत जाणणारी स्त्री, हिला अटक व लोहगडावर ७ वर्षें कैद (पृ. १६९). २०. नबाबाकडील दिवाण मशीरुन्मुल्क यानें नानांवर मारेकरी घातले. त्यावर नाना लिहितात– "आम्हांस दगाफटका केला असतां श्रीमंतांची दौलत हातीं लागते असा अर्थ नाही. शिवाय मनसब्यानें फौजा ठेवून मनांत असेल तें करून दाखवावें. तें सोडून ही चाल थोरपणास चांगली नाहीं (१७९४ जुलै). २१. नाना यांनीं टोक्यास राहण्याविषयीं शिंद्यांचा आग्रह फार. नाना मंदवारीं रात्रीं वाईहून रायगडकडे गेले. २२ रायगड किल्ल्यावर नानांची तयारी–तोफखाना, दारूगोळा, अन्नधान्य व सैन्य यांचा भरपूर सांठा (१७९६ जून १६). २३. माणसें लाऊन घाट खालीं उतरावयास उपाय नाहीं, याप्रमाणें केलें. मोठमोठे वृक्ष तोडून घाट बुजवून टाकिले (१७९६ जून २६). २४. निजाम व कंपनी यांजमध्यें झालेल्या तहासंबंधीं नानांस विचारलें असतां नानांचें उत्तर–'तहाचीं कलमें पाहिलीं असल्याशिवाय मत देतां येत नाही' (१७९८ नवं. ६). २५. नाना व पंतप्रधान लवकरच एकरूप होतील. रात्रीस गुप्तपणें पंतप्रधान लेखकाकडे (नानांकडे) आले होते. निखालसता झाली. किंतु किमपि राहिला नाहीं, असें दिसतें. (१७९८ नवं. १५).

नाना आणि महादजी

नानांच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धांत नाना व महादजी यांच्यांत वितुष्ट आलें. तें वितुष्ट मोडून उभयतांत समेट झाला व उभयतांची मनें परस्पराविषयीं स्वच्छ झालीं. परंतु टीकाकारांचीं मनें स्वच्छ झालीं नसल्यानें त्यांनीं या बाबतींत नानांवर निष्कारण दोषारोप लादले आहेत ! ते आरोप किती निराधार व विपर्यस्त आहेत आणि नाना फडणवीस पाटीलबाबांची मर्जी राखण्यासाठीं किती जपत असत तें शकावलींतील अनेक उताऱ्यांवरून सिद्ध करून देतां येतें. मात्र त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, लढाईच्या डावपेंचाच्या दृष्टीनें आणि दादांची फितुरी व इंग्रजांचा कावेबाजपणा यांच्या कात्रींतून पेशवाईचा बचाव करण्यासाठीं नानांकडून महाद-

जीला ज्या अनेक सूचना वेळोवेळीं मिळत, त्या पाटीलबाबांनीं मानल्या नाहींत; एवढेंच नव्हे तर उलट नानांनीं आपल्याला सूचना कराव्यात, याचें महादजींस वैषम्य वाटे व त्यामुळें त्यांची नानांबद्दल असूयाहि वाढत गेली. पण त्याचा दोष नानांकडे येऊं शकत नाहीं. सूत्रधार मुत्सद्दी या नात्यानें तशा सूचना देणें हें नानांचें कर्तव्यच होतें. आतां आपण या संबंधांत शकावली काय सांगते तें पाहूं. या संबंधांत प्रथम पृ.४०-४१ वरील नानांचे उद्‌गार वाचावेत. इ.स. १७७५ तच नानांनीं हें ताडलें होतें.

१. महादजी शिंदे मातबर सरदार त्या प्रांतीं (मिरज) आहेत. त्यांना खाशांनीं जाऊन भेटून मेजवानी करावी. हजार रुपये खर्च झाला तरी चिंता नाहीं (१७७७ जून५). २. महादजी शिंदे नानांस लिहितात– "आपण शपथपूर्वक खातरजमा करून श्रीवरील तुळशी दिल्या व निश्चयपूर्वक बोलला की, सरदारी माझी आणि फडणिसी तुमची. बंधुत्वाप्रमाणे वर्तणूक करूं. ज्यांत सरदारीचें कल्याण तें संधान चालवूं. जो अनिष्ट चिंतील त्याचें पारिपत्य करूं. हें समजोन परम संतोष जाहला. आम्हीहि श्रीवरील बेलभंडार पाठविला आहे आणि ही सरदारी आपली आणि फडणिसी आमची. जेथें आपण तेथें मी, हें शपथपूर्वक जाणावें (१७७९ मार्च १४). यानंतर महादजीच्या वर्तणुकींत फरक पडत चालला. त्या संबंधांतील उतारे—(२ अ) प्रस्तुतकाळांत सर्व मदार पाटीलबाबावर आहे. (१७७८ जुलै१२). ३. रा. दादा (राघोबा) हरीबाजीबरोबर देऊन झांशीकडे रवाना केले. त्यास नर्मदा उतरते समयीं दादांनीं हल्ला करून हरीबाबाजीस कैद केलें व फौज विसकटली. त्याजवर सुरतेस इंग्रजांस मिळावयाचा अथवा हिंदुस्थानांत जावयाचा प्रकार करतील. त्यास आपण फौज सुद्धां पिच्छावर पाहोचोन दादास हस्तगत करावयाचा उद्योग केलाच असेल. (१७७९ मे२८). दादांच्या या पलायनापासून नाना व महादजी यांचीं मनें बिनसलीं व या वेळेपासून महादजी शिंदे नानांचें न ऐकतां स्वेच्छेनें वागूं लागले. ४. जांबगावीं शिद्यांचे लष्करांत खलबत झालें. नाना व हरीपंत फडके यांना दगा करण्याचा विचार ठरला. त्यासंबंधी नानांना इशारा देणारें पत्र (१७७९ जून-जुलै). ५. महादजी शिंदे यांसी दुष्टबुद्धि निर्माण झाली आहे. फौजेची अद्यापि तयारी नाहीं. इंग्रजांचा तर बिघाड करविला. शिंदे स्वस्थ

जांबगांवीं आहेत. त्यांचें म्हणणें हरिपंत तात्या तुम्हांजवळ (नानांजवळ) आहेत ते नसावे. आमचें त्यांचें ठीक नाहीं. ते मनस्वी तुम्हासी शिकवितात. यास्तव त्यांनी घरीं असावें. ६. राजेश्री नानांचा फार भरंवसा पाटलांवर. असें असतां अशीं चिन्हें होऊं लागलीं आहेत. कोठवर जाऊन कशीं ठरतात पहावें (१७७९ डिसेंबर २३). महादजी शिंदे यांची चलबिचल पाहिल्यावरुच नानांनी इंग्रजाविरुद्ध मोठी जूट केली. ७. "रावपंतप्रधान नबाब निजाम अल्लीखां, हैदरखान व भोंसले इतक्यांची एकी होऊन 'ठायीं' ठायीं' त्यांस (इंग्रजांस) ताण बसेल असें ठरविलें (१७८० फेब्रु. ७). इतकें झालें तरी नानांनीं महादजीची समजावणी करून सलोखा करण्यांचा प्रयत्न चालविलाच होता. वरील एकजुटीला अनुसरून हैदरखानानें मद्रासवर चाल केली. निजामानें उगाच थोडी हालचाल केली. भोंसले बंगालवर गेले. पण २५ लाख रुपये घेऊन माघारे फिरले. मुंबई प्रांतांत मात्र हरिपंत फडके व भाऊसाहेब पटवर्धन यांनी गॉडर्डचा मोड करून त्यास माघारें पिटाळलें. या वेळीं महादजींनीं उत्तरेंत इंग्रजांविरुद्ध हालचाल करून त्यास ताण बसवावयाचा तो बसविला नाहीं; म्हणून नानांचा त्यावर राग होता. तरीपण सर्व राग गिळून नाना पाटीलबाबांना लष्करी हातचालीच्या सूचना देतच होते व पाटीलबाबांची समजूत घालीतच होते. यासंबंधांतलें १७८० एप्रिल३०चें नानांचें पत्र वाचण्याजोगें आहे. तें फार लांबलचक असल्यानें उतारा दिला नाहीं. तें मुळांतूनच वाचावें. अशीं पत्रें जाऊन दिलजमाव करण्याचा प्रयत्न झाल्यावर पाटीलबाबा लिहितात– ९. "सारांश श्रीमंतांचे पायांशीं व आपले भाऊपणाशीं अंतर जालें नाहीं. पुढें व्हावयाचें नाहीं. आपणांकडूनहि तसेंच असावें (१७८० मे १९). १०. भाऊपणाशीं अंतर नाहीं' असें नुसतें पत्रोपत्रीं लिहिलें; पण सैन्याची हालचाल कांहीं केली नाहीं. गुजराथ मोकळी सोडून उज्जयिनीकडे छावणी केली. 'रेवा उतरणार नाहीं' 'दुसऱ्या छायेस पोट भरूं' अशीहि भाषा महादजींच्या तोंडून निघाली. तरीपण नाना खुलाशाचीं पत्रें लिहीतच होते. अखेरीस निदान हैदरखानास सोडून इंग्रजांशीं तहनामा करूं नका; तह करावा तो चौघांच्या विचारें करावा, असें नाना लिहीत असतां सालबाईचा तह परभारें केला; इत्यादि अनेक प्रकार या शकावलींतील पत्रव्यवहारावरून उघडकीस येतात, ते कोठवर लिहावें? ते सर्व मुळांतूनच

वाचावे. ''घरांतील गोष्ट, एक आईचीं लेकरें, संदेह टाकले म्हणजे स्वच्छ-ताच आहे- नवें जडावें लागत नाहीं (१७८०सप्टें.१५). १२. ''हिंदुस्थानच सुरत यांतून कोणता निश्चय तो ठरवून इंग्रजावरी जरब बसेल तें करावें. इकडे वज्रजोगणी, बदलापूर, कोकण, येथें इंग्रजांशीं लढाई हरिपंत, तुकोजी होळकर, रघुनाथ निलकंठ यांची होत आहे, कोणतीहि मसलत लवकर व्हावी, हें उत्तर सत्वर यावें (१७८१ जाने. तिसरा आठवडा). १३. पाटीलबावांचे चित्तास वाईट वाटावयाजोगें तर लिहिलें नाहींच, तथापि त्यांच्या समजेस जें वाईट भासेल, तें वाचून दाखवू नये, तोंडी सांगावें. (१७८१जून ५). १४. 'सारे निसुर बसून तमाशा पाहतात; आम्हांवर दगड टाकतात' या पाटीलबाबांच्या तक्रारीस नानांचें समर्पक उत्तर– 'बोरघाटावर गॉडरची मसलत पडली, तेव्हां होळकर वगैरेनीं लढाई दिली, कसाला सोसला, हें तमाशा पहाणें कीं मसलत करणें? सरकारच्या मोठ्या मसलती होऊन पाटीलबावांस यश यावें; भाऊपणांत अंतर पडूं नये, हाच संतोष मोठा आहे (१७८२ मे २७). १५. उदीष्टिन साष्टी देत असतां अधिक नफे होतील हें जाणून इंट्रसेनाशीं तह केला. आतां साष्टी नाहींच. दादांचा भरंवसा कोणीहि मानीत नाहींत; याकरिता इकडे आणावयाचें केलें (१७८३ सप्टेंबर २८). १६. अहिल्याबाई लिहिते– अलीकडे शिंदे यांच्या चाली व रीतभात वेगळी पडली. शिंदे यांची प्रकृति छद्मी, फुटीर, भूलथाप द्यावयास व औडंबर आणावयास चुकणार नाहींत (१७९२ जून १४). १७. 'नाना व तात्या यांनीं सांगावें व महादजीस मार्गानें वर्तवितील हा भरोंसा आम्हांस' असें अहिल्याबाई लिहिते (१७९२ जुलै २६). १८. विल्यम पामर लिहितो—शिंद्यांचें पुणें दरबाराविषयीचें मत विरोधी स्वरूपाचें दिसतें. (१७९२ आक्टो. ९). १९. नानांचा काशीस जाण्याचा निश्चय. शिंदे हिसके घेत होते, पण रुकार दिला. शिंद्यांचें व तात्यांचें नीट झालें, नाना गेल्यावर मागें तात्यांनीं सांभाळावें (१७९२ आक्टो. ३०). २० हरिपंत व परशुरामभाऊ यांनी राज्यान्तर्गत कारभार व महादजीनें बाहेरील कारभार बघितला तर नाना काशीस जाणार-पण शिंदे परत फिरणार आहेत व हरिपंत प्रकृतीच्या सबबीवर घरीं आहेत २१. नानांचा काशीस जाण्याचा विचार तहकूब, महादजी शिंदे यानेंहि आपला

लवकर परतण्याचा विचार नानांस कळविला (१७९३ फेब्रु.९). २२. हरिपंत फडके यांचें वाढतें वर्चस्व व कीर्ति यांमुळें महादजी फडक्यांचा द्वेष करितो. हरिपंतास दूर केल्याशिवाय शिंद्यांचा डाव सफल होणार नाहीं. (१७९३ एप्रिल १). २३. मथुरा, वृंदावन या पवित्र स्थळाबरोबर श्री काशींतील विश्वेश्वराचें देवालय मशीद केली ती मोकळी होऊन पूर्ववत् देवालय व देवस्थापना व्हावी व ही गोष्ट फिरोन दावा न राहे, कोणाकडून उपद्रव न होय, असें होऊच व्हावी, असें नानांनीं लिहिलें. त्यावर पाटीलबावा बोलले, ही गोष्ट केल्यानें सर्व यवनांस वांकडें पडेल, असतउद्दौला व इंग्रज एक आहेत. अशीं पर्यायाचीं बोलणीं होऊन लांबणीचे जाबसवाल झाले (१७८९ मार्च २२). २४. नाना व हरिपंत यांची महादजीस भेट, बेबनावाचे कारणाचा उलगडा करून सलोखा करण्याकरितां झाली. शिंद्याबरोबर झालेल्या भेटींत मित्रत्वाचे भावानें एकमेकांनीं खुलासा केला व पुढें एकसुरानें वागावयाचें आश्वासन आपआपसांत दिलें. (१७९३ मे ६) २५. महादजी शिंदे, नाना फडणीस, हरीपंत फडके यांत शपथपूर्वक देवालयांत सौरस्य झाल्याची पुण्याहून वार्ता आलेली मला समजली (१७९३ जुलै २१). २६. महादजी पुण्यास आल्यापासून त्यास नानांचेबद्दल दरबारचा आदर पाहून हेवा वाटतो व नानांचें महत्त्व कमी करण्याचा तो प्रयत्न करितो (१७९४ फेब्रु ५).

नानांचें राजकारण

१. बाबूजी नाईक बारामतीकर यांनीं हैदराशीं कारस्थान केलें, प्रतिनिघी बाबत खोटेपणा केला, याबद्दल मुलांमाणसांसह पकडून त्यांचीं घोडीं, दागिने आणविल्याची याद (१७६६ ए. ३). २. दादासाहेब याजकडे किरकोळ राऊत लुच्चे शेंपन्नास जात होते त्यांस घाटोघाट चौक्या ठेवून धरोन आणलें (१७७८मे दुसरा पंधरवडा). ३. आम्ही पावणे दोन वर्षें झालीं तुमचे स्वाधीन. तुमची फौज गुंतून धन्याचे पायाशीं वियोग. हें उभय पक्षीं नुकसान. तर आम्हांस मुंबईस जाण्याविषयीं वोढेकरांस पत्र लिहिणें! (आनंदीबाईचा कांगावा. १७७८ स्प्टें. २) ४. नाना फडणीस व धोंडोपंत नित्सुरे यांनीं कॅप्टन इस्टुर फाकडे याची बकराची रसद घाटबंदी करून बंद केली (१७७९ जाने. ४). ५. वृद्धास

(सखाराम बापूस) शिद्यांनीं कैद करून सिंहगडावर रवाना केलें. इंग्रजांचे प्रकरणांतील फितव्याची चिठ्ठी होती. एक दादासाहेबांस व व दुसरी चिंतो विठ्ठल यांस, अशा दोन चिठ्ठ्या होत्या. कांही फितुरी कागद मृदंगांत घालून मुंबईस नेत होते ते नानांनीं धरले (१७७९ फेब्रु. २६). ६. नानांनी पुण्यास तोफांचा कारखाना सुरू केला (१७७० मार्च ३१). ७. कोल्हापूरचा कारभार कळेल तैसा विल्हे लावावा. चहूंकडे खुळें कामाचीं नाहींत (१७७६ आगष्ट २८). ८. कवडीच्या मुक्कामीं नाना मोरोबास व बापूस भेटावयास गेले. तह यादी झाली, बापू वडील, दादा यकत्यारी काम कारभारी, नानांचा इतल्ला सर्व कामकाजांत असावा. राघोबादादांस तूर्त आणूं नये. नानांनीं असा विवेक केला. दुरंदेशी चित्तांत आणून आपल्यासाठीं राज्याचा नाश व्हावा हें चांगलें नव्हे ऐसें ध्यानांत आणून केलें (१७७८ एप्रिल ८). ९. पातशहानीं व नजब खानांनीं शपथ वाहून सांगितलें. कीं, नानांनी लिहिलें तेंच आमचे चित्तांत आहे. इंग्रजांचा रुपया पातशहाशीं घेऊं दिधला नाहीं, वचनींहि गुंतूं देत नाहीं. पातशहा दिल्लीस फौज आणा म्हणतात. हरिपंत अथवा महादजी एकाने दिल्लीस राहून २ लक्ष रुपये पातशहास खर्चास देऊन हे स्थळीं करोडीचीं स्थळें हस्तगत करावीं. इंग्रजांशीं तिकडे तह करूं नये (१७८० जून २०). १० **नानांकडून** पुणें दरबारची बाजू कशी योग्य आणि इंग्रजाची बाजू कशी दुटप्पी, खोटी व कांगावखोर आहे, हें सांगणारें पत्र इंग्रजांच्या बादशहाकडे गेलें (१७८० जून जुलै). ११ हैदर लिहितो—आम्ही घाट उतरून कित्येक गडकिल्लेस ठाणा घातलें. चेनापट्टणकडेहि दौड पाठविलें. फिरंगियाचीहि मदत मछलीबंदर वगैरे येत आहे. इंग्रज मैदानास निघतील तरीहि लढाई करावी म्हणून मुक्रर केलें आहे. कृष्णराव नारायण तिकडे आले, त्यासच इकडे पाठवावें (१७८० आगष्ट). १२. आपण तिकडे जाऊन पलटण्याचें पारिपत्य करून बंगाल्यावरी शह बसेल, असें केल्यानें हेहि गोष्ट मोठीच आहे. दोन्ही प्रकार लिहिले आहेत. सरकार काम होय, व कोणता प्रकार ठरेल, तो लवकर व्हावा (१७८० दिसें. २७). १३ इंग्रजांशीं बिघाड करून मसलत करणें, तेव्हां सिखाशीं बिघाड करावयाचा नव्हता, असो. शिखास सामील करून घ्यावें; इंग्रजांचें पारिपत्य केल्याखेरीज पातशाहींत कोणास

चैन पडणार नाहीं. (१७८१ मे २९) १४, घाटांत हरिपंत फडके, होळकर व परशुरामभाऊ या सेनानायकांनीं गॉडरच्या इंग्रजी सेनेचा पराभव केला, त्याची वार्ता दिल्लीस कळवून, त्याचे फारशींत भाषांतर करून, पातशहा व नजीबखान यांस देण्यास सांगितलें (१७८१ मे ३१). १५. हा सर्व प्रताप छत्रपतींचा असें लिहून सविस्तर लढाईचें वृत्त नानांनीं छत्रपतीकडे लिहिलें. (१७८१ जून १७) १६. इंग्रज. बादशहाकडे लोभ भारी दाखवून, अनुसंधान करतील, आगरे वगैरे जागा दाबावयास पाहतोल. तरी हाच समय साधून पातशहास ममतेंत घेऊन मोठी गोष्ट साधावी (१७८२ मे २०). १७. तिकडे परावा मुलूख; मसलत केल्यानें मनसबा होऊन पैका मिळेल; खालीं मैदान. या करितां सुचतें तें लिहितों (१७८२ मे २७). १८ इंग्रज. बोलतो तो आपल्या नफ्यावर बोलतो. त्या अन्वयें कबूल केलें असतां, हपटनच्या तहास नुकसानी, मग तळेगांव तह कोणीकडे? (१७८२ आगष्ट ८). १९. फराशिस पासून आज पावेतों कोणता उपयोग घडला, कीं पुढे होणार? तथापि नाद राखावा. तरी तसें करीत आहे (१७८२ आक्टो. ९). २०. आतां सरकारचे मसलतीस कांहींहि न जहालें. दादा स्वाधीन नाहींत. हैदरखानचा मुद्दा कांहींच न जहाला. साष्टी व अंतर्वेदच्या कलमांत नुकसान्या (१७८२ नवं. २३). २१. नाना व हरिपंत सवाई माधवरावसह गंगापुरास गोपिकाबाईंना भेटावयास जातात (१७८४ आक्टो.). २२. सरकारचीं पत्रें—दिल्लीस पातशाहींत इंग्रजांचा पाय शिरूं न देणें. शिरल्यास हिंदुस्थान, दक्षण गेल्यांतच आहे (१७८४ नवं). २३. फरांन्स येथील राजास मारण्यांत आलें. नाना फडणीस यानें, ह्याबद्दल काय माहीत आहे तें, कळविण्यास सांगितलें आहे (१७९१ जुलै ३०). २४. बाजीरावाचा पक्ष नानानें उचलून धरला. नानाचे सैन्यानें त्याच्यावर चालून येणाऱ्या दौलतरावाच्या सैन्यास मार दिला. बाजीरावाचे पक्षास मदत करण्याविषयीं नानानें इंग्रजांस विनंती केली. नानानें टिपू व निझाम यांस सुद्धां मदतीची विनंती केली (१७९६ आगष्ट १७). २५. आबा शेलूकरानें साताऱ्याहून बाजीरावासाठीं वस्त्रें आणलीं. बाजीराव पेशवा, चिमाजी अप्पा नायब, अमृतराव बक्षी, फडके अमृतरावाचा नायब अशी व्यवस्था ठरली (१७९६ दिसें. ६). २६. टिपू बरोबरच्या तहाच्या अटी सुकर व झटपट

व्हाव्यात म्हणून सवाई माधवरावास आघाडीवर सोईस्कर अशा ठिकाणीं न्यावें. आघाडीवर नवाबास अगर कॉर्नवालीसला मिळावें व दोन्ही जमलें नाहीं तर वाटाघाटी पेशव्याच्या मध्यस्थीनें व्हाव्या (१७९१ आगष्ट १४). २७. नाना सवाई माधवरावासह छत्रपतींच्या दर्शनास सातारा किल्ल्यावर. छत्रपतींचें सामोरे येणें व भेट, दरबार, नजराणे, देकार व राण्यांना भेट व नजराणे (१७९१ नवं. ३). २८. परेंचांनीं इंग्रजांविरुद्ध लढाई सुरू केली (इंग्लंडमध्यें) अशा संकटाचे वेळीं सर्वांची मदत इंग्रजांस पाहिजे (१७९३ जून १७). २९. अल्लीबहादूरची योजना केली, ही फारच दुरंदेशी विचाराची योजना झाली. याची हिंदुस्थानी, मोगल, रांगडे, राजेरजवाडे यांवर सलाबत पडेल, इतकी ब्राह्मण सरदारांची पडावयाची नाहीं (१७८७ सप्टें. ७). ३०. मसलतीची रीत ही कीं, मनांत करावयाचेंहि असेल, तथापि तो दिवस येईपर्यंत बोलून दाखवूं नये, सर्व बंदोबस्त होई-तों, कोणास वहीम पडे असें दिसूं नये (१७८७ सप्टें. २३). ३१. साष्टी पेशव्यास परत मिळण्याविषयीं गॉडरनें विलायतेंत खटपट करावी. त्याच-प्रमाणें इंग्लंडचे राजाचे दरबारीं पेशव्यातर्फें एक वकील बॉडमने बरोबर न्यावा, अशी विनंती (१७८७ दिसें. ३०). ३२. इंग्लंडला मराठ्यांचा वकील पाठविण्याचे नानाचे इच्छेस ग. ज. ची मान्यता (१७८९ आगस्ट २६). ३३. नाना व रावबाजी यांमध्यें बारा कलमी करार. त्यांत काशीस जाण्याचा बेत स्पष्ट आहे (१७९७ जाने. १). ३५. नानाचे मनाप्रमाणें यापुढें लहान अगर मोठ्या कार्यांमध्यें बाजीरावानें वागावें. बाजीरावाचे संरक्षणा-साठीं ठेवलेलें दौलतरावांचें सैन्य दौलतरावानें काढून न्यावें. बाजीरावांचें म्हणणें कीं, राज्यकारभार सोडून खासगी बाबतींत स्वतंत्रता असावी. इनाम देणें वगैरे यावर नानांची हुकमत नसावी. शिंदे यांचें सैन्य नानाचे हुकमतीखालींच हालचाल करील. नानाविरुद्ध कोणतेंहि कारस्थान होणार नाहीं (१७९७ जाने. २२) ३७. नानानें एकीसाठीं मसुदा पुढें टाकला. मसुद्यांत नानानें आपल्याकडे कोणते अधिकार अगर रक्कम घेतली नाहीं. फक्त स्वतंत्रतेची हमी मागीतली आणि वाटेल तेव्हां सेवानिवृत्त होण्याची परवानगी मागितली (१७९८ जुलै २६). ३६. नानांचा राज्यकारभारांतून निवृत्त होण्याचा विचार. अशा परिस्थितींत एकटचास सोडूं नये म्हणून

बाजीरावांची नानांस विनंती. नानानें मान्यता दिली (१७९९ एप्रिल १). ३७. नाना स्वतःचे आधिपत्याखालील सैन्य घऊन निघण्यास तयार. बाजीरावाकडून संमति मिळविण्याची खटपट (१७९९ एप्रिल २९) ३८. गोविंदराव काळे व शिवरामपंत या दोघांसहि नाना फडणिसाच्या प्रेरणेनें पेशव्याकडून कैद करण्यांत आलें. कारण हे नानांना शिंद्याकडून कैद करणार होते (१७९९ जाने. १६).

नानांच्याविषयीं प्रशंसोद्‌गार

नानांच्या अंगच्या गुणांचें वर्णन स्वपक्षीयांप्रमाणें परपक्षीयांनींदेखील करून त्यांच्या कर्तबगारीविषयीं गुणग्राहकबुद्धीनें माना डोलविल्या आहेत. त्यासंबंधांतील कांहीं साक्षीदारांच्या लेखांतले उतारे—

१ आंसाहेब (नाना) दुरंदेश. मजबूत मिजाज. इंग्रजाचे मकर फरेबास खूब वाकूफ. तेव्हां त्यांचे खियालावर न जातां तंबीच करतील (हैदरखान–१७८० आगस्ट २०). २. नानांचें पुण्य अधिक. उन्हाला (आळस) माहीत नाहीं. श्रीमंतांचा कांहीं विश्वास आहे तो आपल्या ठायीं. (थो. माधवराव १७६६ एप्रिल २३) ३. आपण तिकडे आहांत तों काळजी नाहीं (सखाराम बापू १७६४ जून. ४. आज वीस वर्षांचें श्रेय आपण घेतलें कीं, सर्व एकीमय करून विश्वासाची बुद्धि केली. हें सविस्तर ऐकोन जें समाधान झालें, हा बयान काय ल्याहावा! (मुधोजी भोंसले नागपूर १७८० जुलै ४). ५. लहान वा मातबर असो; करून देतो असें मुखावाटें म्हणणें हेंच दुरापास्त. (पण) अभय दिल्यास मग कोणी विक्षेप मध्यें घातले तरी तें ध्यानास न आणितां त्याचें कार्य करून द्यावेंच इतकी बळकटी आहे (हरकूबाई इंदूर १७८० दिसें.७). ६. त्याच ब्राह्मणाचा हक्क होय कीं, हें दौलतीचें ओझें, धनी लहान, पदरीं पैका नाहीं, असें हि असतांना चारी संधानें राखतात. जो ज्याचा कागदपत्र येईल त्याचें स्मरणपूर्वक उत्तर देणें, चहूंकडील मसलतीचीं संधानें राखणें, हे आवरणशक्ति त्यांचीच होय (अहिल्याबाई १७८१ जाने. १२). ७. घरच्या धन्याचा फितुर, मुख्य धणी लहाण असतां आज आठ-वर्षें इंग्रजांचें झुंजास मुस्तेद राहिले. ईश्वरें कारभारी, सरदार, मुत्सद्दी दौलतीस द्यावे तर याप्रमाणें द्यावे. नानांनीं इतकी मेहनत करून दौलत राखली.

(बादशहा नजफरखान, दिल्ली १७८१ आगस्ट). ८. पुणे दरबारीं फडणिसांचे वळण भारी. नाना फडणीस यांजवर सर्व यकत्वार आहे. त्यांनीं सांगावें तें प्रमाण (बाळाजी शंकर १७६८ फेब्रु.२). ९. नानांचा पुण्याचा बंदोबस्त भारी आहे. माणूस फार भितें, माणसापासून अंतर पडल्यास मुलाहिजा होत नाहीं (हरिपंत फडके १७६९ नवं. १३). १०. मकार नामकाचा भरंवसा धरावयाचा नाहीं. नकार नामकाचाच भरंवसा आम्हांस पुर्ता आहे. त्याचे विचारें कर्तव्य तें करावें (१७७३ सपटं. वामनराव पटवर्धन). ११. श्रीमंतांच्या पायापाशीं एक निष्ठता; कायम–मिजाज असा दुसऱ्या कोणाच्या पाहण्यांत आला नाहीं. शाबास हृयाच ब्राह्मणांची. गेलें राज्य संभाळलें. नानांच्या एकनिष्ठेस त्रैलोकीं उपमा नाहीं. उभयतांहि कारभारी चांगले (अहल्याबाई १७८३ जाने. २३). १२. श्रीमंत रा. दादा अखंड नानांचे व हरिपंततात्याचे गुण गातात. 'आमच्या दौलतींत ते कारभारी; त्यांनीं राज्य रक्षिलें,' बापू, आबाजी महादेव व चिंतो विठ्ठल यांस दोष ठेवीत; ते अप्रामाणिक (१७८३ मे ५). १३. अहिल्याबाई म्हणते—'नाना वचनाचे पक्के आहेत. बोलल्या बोलास त्यांजकडून अंतर होणार नाहीं (१७८३ मे २०). १४. राघोबादादा नानांस लिहितात—'आज पावेतों मागील कित्येक गोष्टीविषयीं आमचे चित्तांत विरुद्ध होतें परंतु आजपासोन निखालसता जाहाली. तुम्हांविषयीं आढ्या होत्या त्या सोडल्या. येविषयीं सांबाची शपथ आहे (१७८३ जुलै १९). १५. गोपिकाबाईचें मत—'फडणीसपंत तसेच विश्वासू यशस्वी आहेत. फितुरी झाले त्यांची यथास्थित पारिपत्यें केलीं. इतरहि कर्तबगारीवर फार संतोषी. इतके करतीलसा भरोंसा नव्हता. चिरंजीवांनीं कृपा केली त्याचें सार्थक उभयतांनीं केलें. संतोष आहे (१७८३ जुलै ३०). १६. अहिल्याबाई—ईश्वर करो आणि त्यांची (राघोबाची) घरांत समजूत पडो; नि दुनियेचा काच तुटो. शाबास त्यांचीच (नाना व हरिपंत तात्या) छाती; त्यास उपमा देण्यास दुसरी नाहीं. दादासाहेबांनीं इतकी घाण केली (१७८३ सप्टें. २०). १७. राघोबा—नाना व हरिपंत प्रामाणिकच आहेत. आजपावेतों दोघांनीं शपथक्रिया दिली नाहीं. इतरांनीं देऊन बदमाषी केली (१७८३ डिसे. ५). १८. जेम्स अँडरसन लिहितो, त्यांत तो 'नाना फडणिसाकडील सैन्याची सुधारणा

व त्याची शिस्त वगैरे वैशिष्ट्याचा तो गौरव करतो (१७८५ डिसें. ३१). १९. नानांचे निमंत्रणावरून मॅलेट २० मे १७८६ रोजीं रणांगणावर तोफखान्याजवळ असलेल्या नानांस भेटतो. ह्या ठिकाणावरून नाना युद्धाचीं सूत्रें हालवितो. या वेळीं नानाची वागणूक शांत व गंभीर असते. अशा गडबडीचे वेळीं सुद्धां नानांस बातम्या वक्तशीर मिळतात, असें मॅलेट लिहितो. (१७८६ मे २२). २०. मॅलेटचें मत—संकटकाळीं एकट्या नानानें पेशवाई सांभाळली. चेहऱ्यावर बुद्धीचें तेज; भाषा कांटेतोल, न्यायी, स्पष्ट व प्रामाणिक. २१. मॉशीयर गाडरने नानांस आपल्या फ्रेंच सरकारकडून कोटावर लावण्यासाठीं आणलेलें 'ऑर्डर ऑफ सेंट लुई' नांवाचें एक मानचिन्ह दिलें (१७८६ आगष्ट २१). २२. पाटीलबावा म्हणतात—संकटसमयीं कोणी कामास आला नाहीं. नानांचा भाऊपणा कामास आला. उदंड जाले, तरी थोर ते थोरच (१७८७ सप्टें. ७). २३. आनंदीबाई म्हणते—आम्ही पुण्यास असतां लहानमोठ्या कामास नाना आम्हांकडे येत असत; फार मर्यादशील आहेत. नानांची तऱ्हा इतकी अमर्यादेची नाहीं. (१७७८ जून ३०). २८. नानांचें कर्तृत्व व मनःपूर्वक सहकार्य यामुळें इंग्रज—मराठे संबंध घनिष्ठ झाले असें ग. ज. कॉर्नवालीस लिहितो (१७९२ मे १८). २४. अहिल्याबाई—नाना व तात्या यांना या दौलतीची काळजी पहिल्यापासोन व जपणेंहि मनःपूर्वक. याजमुळें ममतेनें बोलणें पडतें. इकडील सर्व भर त्यांजवर (१७९३ एप्रील १७). २५. नानांनीं खंडेराव दौलतराव ह्यांच्या मुलीचें लग्न यथासांग पार पाडण्यास सहाय्य केलें. श्रीमंतहि समर्थ व नानाहि थोर. आठा वर्षांचा तंटा मोडला (१७९५ फेब्रु. १४). २६ पामर लिहितो—मराठी राज्याची सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठीं व मुलूख परत मिळविण्यासाठीं, नाना फडणिसासारख्या कर्तृत्ववान, अनुभवी व वजनदार अशा मुत्सद्द्याची जरुरी आहे (१७९८ आगष्ट २२). २७. नाना आपलें महत्त्व उतावळेपणाने वाढवूं इच्छित नाहीं; लायख, विश्वासू माणसें गोळा करून राज्यास मजबूत पायावर उभें लवकरच करतां येईल (पामर १७९८ नवं. १०). २८. कर्नल पामर—नाना सर्वांचें छत्र. मराठी राज्याचें शहाणपण, समतोलपणा, नानाबरोबर लयास गेला. २९. **बाळोबातात्या**—राज्यांतला दाब व नेट गेला. ३०. **पामर**—सावध पुरुष,

मोहरा होता, श्रीमंताचे दौलतीचा आळा गेला. विशाल बुद्धीचा, दीर्घ प्रयत्नी मुत्सद्दी. राज्याची धडगत नाहीं. दोन वर्षें असते तर इंग्रज नाशच पावते. नाना म्हणजे ब्राह्मण्य. सर्वांच्या उमेदी उदासीन झाल्या. पुण्याची सामोग्री संपली. नानाबरोबर चातुर्य व संयम गेला. ३१. गोव्याचा गव्हर्नर काबाल—हिंदु लोकांमधील अत्यंत बुद्धिमान पुरुष असा त्याचा लौकिक होता. कोणत्याहि कठिण विषयावर त्याचें डोकें चालत असे. तो विशाल कल्पनेचा माणूस असून, आपल्या अंतःकरणाचा ठाव कोणासच लागूं देत नसे. तो कोणतेहि कष्ट सहन करी. आपल्या योजना कार्यसृष्टींत आणण्याची कर्तबगारी त्याच्यांत होती. वाईट प्रसंगास तोंड देण्यास तो कचरत नसे.

शकावलींतून काय दिसतें ?

नानांच्या आंगचे गुण आणि त्यांनीं केलेली कर्तबगारी या संबंधांत इतके साक्षीदार दिल्यानंतर नानांचें गुणवर्णन वेगळें करण्याचें कारण नाहीं. हे साक्षीदार नानांचे हस्तक किंवा मिंधे नसून कित्येक तर त्यांचे प्रतिपक्षीच आहेत. अशांनीं देखील नानांची प्रशंसा केल्यावर, नानांच्या संबंधानें कुत्सित, खोडसाळ, खोटे आरोप लबाडीनें लादणाऱ्यांचे दांत त्यांच्याच घशांत घालण्याला इतर कांहीं पुराव्याची किंवा लेखाची जरूरी आहे असें कोणीहि मानणार नाहीं. जेथें स्वतः राघोबादादा, आनंदीबाई, होळकर, शिंदे, सखारामबापू, मॅलेट, पामर, सातारचे छत्रपति आणि दिल्लीचे पातशाहा हे नानांचे गुण गातात तेथें इतिहासदूषकाच्या चोरट्या हल्लयांची किंमत काय?

इतर कोणतेहि आक्षेप लागू पडत नसले तरी ‘नाना भित्रे होते एवढा तरी आक्षेप मान्य करावाच लागेल, असें कित्येकजण म्हणतील. पण त्यांनाहि या शकावलींतील विधानांवरून दिसून येईल कीं, नाना जात्या भ्याड नसून उलट संकटांत कधींहि धीर न सोडणारे असेच होते त्यांचे वाडवडील रणांगणावरच पतन पावले आणि नानांनींहि आपल्या पूर्ववयांत रणांगणाचा पूर्वपरिचय करून घेतला. ते नानासाहेब पेशव्यांबरोबर स्वारीवर असत आणि प्रथमतः त्यांच्याकडे स्वारीचीच फडणिसी सोंपविली होती. पानिपतच्या रणसंग्रामांतील घनघोर दृश्य आणि विशेषतः मराठ्यांची पळापळ आणि त्यांतून भाऊसाहेब व स्वतः नानांची मातोश्री बेपत्ता

होणें, या घटनांचा त्यांच्यावर कायमचा परिणाम झाला होता. तरी पण तेवढयानें त्यांनीं रणांगण वर्ज्य मानलें नाहीं. सेनापतींना ते हालचालीच्या अचूक सूचना देत आणि प्रसंगानुरोधानें ते स्वतः सैन्याबरोबर स्वारीला निघत. टिपूवरील स्वारींत तर ते तोफखान्याच्या शेजारीं जेथें शत्रूचे गोळे पडत अशा जागीं उभे राहून लढाईच्या डावपेंचांचें निरीक्षण करीत होते. टिपूवरील शेवटच्या स्वारीच्या वेळीं, बाजीराव लष्कर पाठविण्यास नाखुष आहे असें पाहतांच, नानांनीं स्वतःच्या आधिपत्याखालील सैन्य घेऊन स्वतः लढाईवर निघण्याची तयारी चालविली होती. एकदां तर दौलतराव शिंद्यांच्या पलटणीला त्यांनीं आपल्या शिपायांकडून चांगलाच हात दाखविला!

त्यांच्या अंगचा सावधपणा, त्यांचें दूरदर्शीपणाचें राजकारण, प्रतिपक्षावर छाप पाडून त्याला कह्यांत आणण्याची त्यांची हातोटी या सर्व गुणांचा भरपूर पुरावा या शकावलींत सांपडतो. प्रतिपक्षीयांना त्यांनीं कारावासांत ठेवून छळलें, असा त्यांच्यावर वृथा आरोप आहे. फितुरीचा किंवा कटाचा भरपूर पुरावा हातीं असल्याशिवाय त्यांनीं कोणालाहि बंदिशाळा दाखविली नाहीं. बंदिवासांत डांबून ठेवलें तरी ज्याला त्याला त्याच्या इतमामाप्रमाणेंच ते वागवीत. सखारामबापू व सखाराम हरि, यांच्या बंदिवासांतील त्यांची मिजास पाहिली म्हणजे या विषयीं खात्री पटते.

सर्वांत महत्वाची व श्लाघनीय गोष्ट ही कीं, सगळ्याच प्रतिपक्षांशीं त्यांनीं अनेक वेळां समेट करण्याचा प्रयत्न केला; आणि ज्यांच्या ज्यांच्याशीं त्यांनीं करारमदार करून तडजोड केली, त्यांच्याशीं ते अगदीं कराराबरहुकूम वागले. नाना वचनाचे धड, त्यांनीं आपला शब्द कधीहि मोडला नाहीं. आणि दिलेला शब्द खालीं पडूं दिला नाहीं, अशी प्रतिस्पर्ध्यांचीच साक्ष आहे.

असें असतां मोरोबा, सखारामबापू, महादजी, दौलतराव आणि राव बाजी या सर्वांनीं नानांना वचनें देऊन, ती न पाळतां, तोंडघशीं पाडण्याचा प्रयत्न केला.

महादजीशीं तंटा नको म्हणून ते काशीयात्रेला जाण्यास सिद्ध झाले होते. रावबाजीशीं बोललेल्या प्रत्येक करारांत काशीला जाण्याची मोकळीक मिळावी, असें कलम नमूद असे. पण त्यांचा एकहि प्रतिस्पर्धी त्यांच्याशीं वचनाला स्मरून सरळपणानें वागला नाहीं. इंग्रजांना तिहेरी शह देण्याचें

कारस्थान रचून त्यांनीं इंग्रजांना पेंचांत आणले होतें. परंतु महादजीची बुद्धि फिरून पाटिलबावांनीं, आपलाच हेका चालवून सालबाईचा तह केला. 'तो तह पुरंदरच्या तहाहून हलका ठरतो. मग तळेगांवच्या तहाशीं तर तुलनाच करावयास नको' या नानांच्या हातच्या एका वाक्यावरून सगळ्या गुणदोषावर चांगला प्रकाश पडतो.

छत्रपतींना नाना मानसन्मान देत नसत, सवाईमाधवरावाला त्यांनीं काचांत ठेवलें होते, इत्यादि आक्षेप या शकावलीवरून फोल ठरतात. नानांना धड आपल्या देशाचा नकाशाहि अवगत नव्हता आणि टोपीकरांच्या देशाची व त्यांच्या राजकारणाची मुळींच माहिती नव्हती, असल्या आक्षेपांतला फोलपणा सहज सिद्ध करतां येण्याजोगा आहे. त्यांच्याजवळ महत्त्वाच्या प्रदेशांचे व किल्ल्यांचे अगदीं हुबेहूब नकाशे तयार असत. आणि एखाद्या स्थळाचा नकाशा चुकीचा आहे असें कळतांच तो नकाशा दुरुस्त करून घेण्याची ते तजवीज करीत.

फ्रान्समधील राज्यक्रान्तींत १६ व्या लुईला ठार करण्यांत आलें. ही बातमी नानांस कळतांच त्यांनी त्यासंबधांत अधिक तपशील मिळविण्याचा प्रयत्न केला. पेशव्यांचा वकील विलायतेंत इंग्रजांच्या दरबारीं ठेवावा अशा विषयीं त्यांनीं चिकाटीनें प्रयत्न चालविला होता.

सारांश, पानपतचा वज्राघात, नानासाहेबांचा मृत्यु, राघोबाची बंडखोरी, माधवरावांचें अकालीं निधन, नारायणरावांचा खून व राज्यांत बजबजपुरी, इतक्या विविध संकटांतून त्यांनीं मराठेशाहीचें तारूं कुशलतेनें बचावलें आणि वैभवतीराला नेऊन पोंचविलें. नानांनीं पेशवाईचा दरारा आसेतुहिमाचल बसविला आणि नानांच्या सल्लामसलतीशिवाय कोणतेंहि महत्त्वाचें राजकारण घडेनासें झालें.

स्वतःची वृद्धावस्था, हरीपंतासारखा लष्करी सहाय्यकर्ता काळानें ओढून नेणें, महादजीच्या जागीं दौलतरावासारखा उल्लू, बालिश व विश्वासघातकी सरदार अधिकारपदस्थ होणें आणि ज्याच्या शब्दाला अळवावरच्या पाण्याइतकीहि स्थिरता नाहीं, असा हलक्या कानाचा बाजीराव पेशवा होणें असल्या चतुर्विध संकटांनीं चोहोकडून घेरल्यामुळे नानांची मुत्सद्देगिरी अखेर-

च्या चार वर्षांत चालेनाशी झाल्यास त्यास त्यांचा नाईलाज होता. ही विपरीत परिस्थिति जाणून नाना अधिकारत्याग करून काशीस जाण्यास अनेकदां सिद्ध झाले होते. यावरून त्यांना अधिकारलोभ नव्हता हें सिद्ध होतें. त्याचबरोबर कितीहि संकटें कोसळलीं तरी त्यांच्याशीं टक्कर देण्यांतली त्यांची चिकाटी व धीरवृत्ति व्यक्त होते.

असो. वेळासच्या मंडळींनी आपुलकीनें आणि नानांच्या विभूतिमत्वाच्या प्रेमामुळें, इतकीं वर्षे त्यांचा स्मृतिदिन साजरा करण्याची प्रथा चिकाटीनें चालविली आणि त्यांतून श्रीयुत के. बी. जोशी यांनीं स्वतः झीज सोसून आणि अत्यंत परिश्रम करून हा पन्नाशीचा वृत्तान्त लिहून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें, त्यामुळें नानाच्या चरित्राचें सूक्ष्म दृष्टीनें संशोधन होऊन हा ग्रंथ तयार होऊं शकला. त्यांतल्या त्यांत **श्री. शं. ना. जोशी** यांनीं शकावली जोडण्याची कल्पना पुरस्कारिली आणि सुमारें १४० मराठी इंग्रजी ग्रंथांतील पत्रव्यवहाराच्या भाराभर गठ्ठयांतून मुद्द्यापुरतीं नेमकीं पत्रें वेंचून त्यांतून निवडक उतारे घेऊन नानांच्या कर्तबगारीवर आणि त्यांच्या मुत्सदेगिरीवर प्रकाश पाडण्याची मोठी कामगिरी केली, याबद्दल सर्व महाराष्ट्र-इतिहासप्रेमी त्यांना धन्यवादच देतील.

पुणें.
२२-८-५०

ज. स. करंदीकर.

नाना फडणवीस शकावली
कांहीं चुकांची शुद्धि

पृष्ठ	ओळ	चूक	बरोबर
९	१३	४६	४३
१२	१७	शुद्ध ५	शु. १५
२८	२४	इ. १७१२	इ. १७७२
४८	२५	साल मारी	साल मजकुरी
७३	२१	१७०१	१७००
,,	,,	१७७९	१७७८
७४	१८	याजा	याचा
१०२	१५	१७८०	१७८० डिसें. ७
१५५	१४	१७७९	१७८९
१६९	२६	शुा	वद्य

बाळाजी जनार्दन भानू

अर्थात्

नाना फडणवीस संक्षिप्त शकावली

श. १६४१ श्रावण वद्य १३ भानुवासर इ. १७१९ आगष्ट २ (राजशक ४१ (४६) सु. ११२० रमजान २६) शाहू छ० ची सनद–रामाजी महादेव व जनार्दन बल्लाळ भानू यांस नाणे मावळ पैकी वाकसई हा गांव बाळाजी महादेव–नानांचे आजे–हे बाळाजी विश्वनाथ प्रधान यांज बरोबर दिल्लींतील स्वारींत असतां युद्धप्रसंगीं जखमा लागोन मृत्यु पावले, सबब इनाम दिला. [इ. सं. पे. द. स. मा. पृ. १७४]

(१६६३ माघ वद्य ४ शुक्रवार) इ. १७४२ फेब्रु. १२
सातारा येथें बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणवीस यांचा रात्रीं १०॥ वाजतां जन्म. [कुंडली–केळकर यांचा ‘राजा संग्रह’; नानांचें च. पृ. ६–७].

१६६८ वैशाख इ. १७४६ एप्रील
जनार्दन बल्लाळ फडणवीस यांस चिरंजीवाचे व्रतबंधाबद्दल बक्षीस [पे. द. ४५ ले. १५ पृ. ८४]

१६७३ . . . इ. १७५२ नानांचा पहिला विवाह. वय १० (गद्रे यांची कन्या यशोदा) [काव्ये. सं. आत्मच. ले. १९२]

१६७७ फाल्गुन वद्य ३० इ. १७५६ मार्च ३० (जखर २८) नाना फडणवीस नानासाहेब पेशवे व दादासा० यांजबरोबर कोंकणांत स्वारी-वर असल्याचें पत्र. मुक्काम दिजयदुर्ग. [शि. इ. सा. ३ ले. ३३७–३८]

१६७८ इ. १७५६
नानांचे वडील जनार्दनपंत यांचा उत्तर हिंदुस्थानांत स्वारीवर असतां मृत्यु. [ना. च. पृ. १०]

श. १६७८ मार्ग. शु. ८ इ. १७५६ नोवें. २९ सोमवार

पुणें येथें नानांस फडणविशीचीं वस्त्रें मिळतात. [ना. च. पृ. १०]

,, —इ. १७५७

श्रीरंगपट्टणच्या स्वारींत पेशव्यांचे बरोबर नाना फडणवीस [काव्ये. सं. आत्मच. ले. १९२]

१६८१ माघ शु. ८ इ. १७६० जाने. २५ (जखर ६)

नानांचे बुणगे-पथकाच्या हालचाली विषयीं लिहिणें, कीं, बुणगियाचा कारभार अनिवार, रव पडणें ते तीन कोस पावेतों, मनास येईल तिकडे जातील. यवनापासून पांचा कोसावर राहिल्यास ठीक. [पे. द. १ ले. ४७]

१६८२ (चैत्र शुा २) इ. १७६० मार्च १९

भाऊसाहेबांबरोबर नाना पानिपतकडे जाण्यासाठीं मातोश्री व कुटुंबासह निघाले. उत्तरेकडील क्षेत्रावलोकन, त्रिपथगामिनीचें स्नान व त्रिस्थली यात्रा हा हेतु. [ऐ. ले. सं. १. पृ. ३२ ले. २१. पटदूरहून शिंदखेड येथें. तेथून डेरेदाखल व तेथेंच दोनचार दिवस हिशेब अजमास मनास आणण्यासाठीं मुकाम व नंतर प्रयाण खं. १ पृ, २६४, खं. २ पृ. १५४]

,, —भाद्रपद शु. ६ इ. १७६० सप्टें. १५ (सफर ५)

नाना इंद्रप्रस्थ = दिलीहून चुलते बाबुराव यांस तिकडील सैन्यवृत्त कळवितात. सुजा लबाड, आपल्या सैन्याची हलाखी पोटाचें संकट इ. इ. [पे. द. २ ले. १३१]

१६८२ माघ शु. २ इ. १७६१ फेब्रु. ७ (जखर ३०)

सटवोजी जाधवराव नानांना लिहितात. तुमच्या पत्राप्रमाणें तुम्ही आम्ही समागमेंच (दक्षिणेंतील आपल्या) परगण्यांत जाऊं. चिंता नाहीं. परगण्यांतील आमची ठाणीं कायम आहेत. [पे. द. २९ ले. १]

श. १६८२ फाल्गुन शु. १४ इ. १७६१ मार्च १९ साबान (११)
नानांचा बुकिसराई येथें मुक्काम [खं. ६ ले. ४१०]

श. १६८२ फाल्गून वद्य ६ इ. १७६१ मार्च २७ (साबान १९)
नानांचें पुरुषोत्तमपंत नाना हिंगणे यांस शिरोंजजवळच्या मुकामाहून पत्र. कीं, सर्वस्व खर्च करून मातोश्रींचा शोध करावा, सोडवावी, यात्रा करविणें तरी करवावी हेंच पुत्रजन्माचें सार्थक. ग्रहस्थपण व भलेपण तुमच्या प्रमाणेंच आम्ही व वडिलानी पैशावर नजर न देतां मेळविलें. [खं. ६ ले. ४११]

" —फाल्गुन वद्य १० इ. १७६१ मार्च ३१ (साबान २३)
नानांचें हरिपंत फडके यांस शिरोंज मुक्कामाहून पानपत लढाईचें वृत्त—(मेले कोण जखमी कोण ती यादी) श्रीमंत नानासा० माघारे फिरले हें चुकलें. आपण टोक्यास राहूं, अतःपर चाकरी नको. [पुरं. द. १ ले. ४१७]

१६८३ ज्येष्ठ शु. १५ इ. १७६१ जून १७ (जिलकाद १३)
नानांचा टोके येथें मुक्काम [खं. ६ ले. ४१५]

" —आषाढ शु. ७ इ. १७६१ जुलै ८ (जिल्हेज ५)
विजयदुर्गाहून दादो हरी नानांना लिहितो ' थोरले वर्तमान—नानासा० मृत्यु—अवतार समाप्त झाल्याचें आलें; शोकार्णवीं पडलो. आपण स्वाक्षरामृतवर्षणें संजीवन करणार खावंद आहेत.' [पे. द. २ ले. १४७]

१६८३　—पिता जनार्दन माता रुक्मिणी यांचा पुत्र बाळाजी (नाना फडणीस) भानु ह्यांनीं गोदावरी नदी काठी कायगांव ह्या क्षेत्रीं श्री सिद्धेश्वर–प्रसादार्थ घाट बांधला. [संस्कृत दोन शिलालेख ऐ. सं. सा. खं. ५ पृ. ५ (वृषनाम संवत्सर इ. १७६१)] (जन्म पत्रिकेंत आईचें नांव ' रखमाबाई ' असें दिलें आहे. शिलालेखांत श्लोक–रचनेसाठीं ' रुक्मिणी ' हें नांव आलें असावें.)

श. १६८४ वैशाख वद्य १३ इ. १७६२ मे (इसने सवाल २६)

नाना नागोपंत यांस सुरतकर इंग्रजाविषयीं लिहितात, खुषकीचा जाहला. असा जलमार्गाचा बंदोबस्त, सुरतेचा वारा बंद करून व्हावा. बाहेरील इंग्रज कुमक करणार, त्यास मातबर फौज व गारदी असावे हें एकंदरीत लांबणीवर पडतें व मसलत वाढते. म्हणून सध्या सुरतकराकडील आलेल्या भल्या माणसा करवी सलूख करावा. गुदस्ताची बाकी घेऊन त्याहि मागील सालांच्या बाकीचा नाद लाऊन ठेवावा. पत्रोत्तरास दिवसगत लागली. कारण, आम्ही एक ल्याहावे, स्वारींतून आणीक सारखें उत्तर आलें. तर ठीक नाही. या करतां उत्तर आणवून पाठविलें. [पे. द. ३९ ले. ६]

,, –मार्ग. इ. १७६२ नोवें. डिसें.

राघोबादादा मुख्य झाल्याबरोबर जी कारभारांत उलथापालथ झाली तींत नानां कडील फडणिसी काढली [ऐ. ले. सं. १ ले. १३७ पृ. १५७ टीप]

,, –पौष वद्य ७ इ. १७६३ जाने. ६ (जखर २१)

माधवरावांचें नानांस पत्र कीं रायाजी पवार छावणीचे हंगामसमयीं न पुसतां गेला. करतां त्याचा सरंजाम जप्त करावा [इ. सं. पे. द. नि. का. पृ. ६१ यादी १२]

,, फाल्गुन इ. १७६३ फेब्रु.

निजामी सैन्याच्या येण्यामुळें पटवर्धन व गांवकरी गांव सोडून पळाले. नाना फडणीसहि लोहगडावर गेले. चित्रगुप्त म्हणजे फडणीस मोरोबा व नाना ह्यांचें कांहीं जडजवाहीर व द्रव्य पटवर्धन यांचजवळ रक्षणार्थ होते. (धाकटे चित्रगुप्त म्हणज नाना. थोरले म्ह. बाबूराव.) [ऐ. ले. सं. १ पृ. ३०४, २८८]

१६८५ वैशाख व. ७ इ. १७६३ मे ४. निजामानें पुणें लुटलें. नाना लोहगडावर, वद्य ५ [पे. द. ३८ ले. ९१, ९२]

श. १६८५ ज्येष्ठ वद्य ८ इ. १७६३ जून ४ सु. ११६४ जिलकाद २१
नानांनीं प्रधान माधवराव यांजकडे कर्नाटकांत स्वारीवर ४३ ह. रु०च्या हुंड्या, पुण्यांत ऐवजाचा तोटा होता तरी, लष्करांतील निकड जाणून मुबादला करून पाठविल्या. त्याबद्दल माधवरावांची सोय व अर्थात् संतुष्टता झाली. [पे. द. ३८ ले. ९९]

,, –श्रावण वद्य १० इ. १७६३ सप्टें. २ (सफर २३)
नानांना ते सिंहगडच्या पायथ्यास कल्याण गांवीं मुकाम असतां फडणिसीचीं वस्त्रें घेण्यासाठीं थो. माधवराव साहेब पेशवे यांजकडून निमंत्रण [ऐ. ले. सं. २ ले. ३५५ व ३६३]

,, –भाद्र. वद्य इ. १७६३ सप्टें.
नाना फडणीस पैठण येथें मुकाम. पंचमीचा पक्ष करतील व येतील [ऐ. ले. सं. २ ले. ३६६ पृ. ६०७]

,, –भाद्र. वद्य इ. १७६३ सप्टें.
मोरोबादादा आले म्हणजे त्यांस व नानांस वस्त्रें द्यावीं असें श्रीमंत म्हणत असल्याचें गोपाळरावाचें गोविंद हरीस पत्र [ऐ. ले. सं. २ पृ. ६०९, ६१२]

,, –भाद्र. वद्य १३ बुधवार ११ घ इ. १७६३ आक्टो. ५ (सु० ११६४ रवल २७)
श्रीमंत माधवरावांनीं ' कार्यांत मन घालावें अशी आज्ञा केली. नाना व मोरोबादादा यांस त्यांनीं एक लक्ष दहा ह. रु. फडणिसी-उत्पन्नापैकी सरकारांत द्यावे असें होऊन फडणिशीचीं वस्त्रें दिलीं. खासे कलमदान, कीर्दीचा रुमाल, व स्वतंत्र राहुटी झाली. दादांनीं दिकती घातल्या होत्या. प्रथम नाना लष्करांत गेले. पण पुण्याचा कारभार म्ह. मुक्कामची फडणिशी नानाकडे व लष्करांतील फडणिशी मोरोबाकडे अशी वाटणी झाली. [भा. व. श. पृ. ५०, ऐ. ले. सं. १ पृ. २९७, ५५७, ५९६ ६२३, ६०९, ६१२]

श. १६८५ पौष शुा १ इ. १७६४ जाने. ४ सु. ११६४ जखर २९
बाळाजी जनार्दन यांचें १५ खंडी धान्य धामणगांव अकोले येथून पुणें येथ येत आहे; बैल १५० आहेत, जकात हंशील न घेणें. तसेंच इमारतीसाठीं लाकूड रायवळ गाडे घांटाखालून पुण्यास येत असतां अंताजी मल्हार दिा रामजी पवार यांनीं वडगांव येथें अटकाविले. तरी तेहि सोडून द्यावे व इतर तोडीव लाकडे आणूं देणें. [खं. १० ले. १५, १६]

,, —पौष वद्य १० इ. १७६४ जाने. २८ (सु. ११६४ रजब २४)
प्रधान माधवरावांनीं नानांस कळविलें की, अलिबहादरकडील पावलकर याच्या घराकडे गाड्यांकडील कारकुनाच्या घराचें पाणी येत असल्यास मना करणें. कटकट करूं न देणें [पे. द. ३९ ले. २१]

,, —माघ शुा ८ इ. १७६४ फेब्रु. १० (सु. ११६४ साबान ७)
राघोबादादा नानांना लिहितात, मौजे सिनोली हा गांव कुकाजी सिवराम यांस गुदस्ता तैनातेंत दिल्हा. तेव्हां त्या गांवचे कुरण सहजच त्याजकडे जाहाले. तरी तमाम कुरणाच्या चवकशींत ह्या कुरणास त्यांतील झाडासह अडथळा करूं न देणें [पे. द ३९ ले. २२]

,, —फाल्गुन शुा १२ इ. १७६४ मार्च १५ (आर्बा रमजान ११)
माधवरावसाहेबांनी नानांस लिहिलें सरकारचे वाड्याभोंवती आपापलें ठिकाणीं छपरें घालून राहतील त्यास राहूं द्यावे. नवी मातबर इमारत व खपरेल कोणी करूं नये. ज्याणी थोडीबहुत घरें बांधिली तीहि तूर्त असूं द्यावी. स्वारी पुण्यास आलियावर आज्ञा करणें ते करूं. कसब्यांत फार करून वतनदार आहेत. [पे. द. ३९ ले. २६]

,, —फाल्गुन वद्य १४ इ. १७६४ मार्च ३१ (सु. ११६४ रम. २७)
राघोबादादांचें नानांस पत्र–पुरुषोत्तमपंत हिंगणे वकील यांस शहाअबदालीकडे व जवाहरसिंग जाठाकडे बहुमानाचीं वस्त्रें ६ व हत्ती ३ देऊन पाठवावे [पे. द. २९ ले. ५४]

श. १६८६ चैत्र शुा १ इ. १७६४ एप्रील २ (सु. ११६४ रमजान २९)
प्रधान माधवराव नानांना लिहितात, बालाजी गोविंद खेर यांच्या बुंदेलखंडच्या मामलतीच्या महालवार याद्या पाठविल्या आहेत. त्याप्रमाणें सनदापत्रें देणें. पुढील वर्षी वैशाखांत व जेष्ठांत मिळून रु. २ लक्ष घ्यावयाचा करार केला आहे. लष्करांत उंट खरेदी केलें त्याचे रु. १४०२५ ची वरात द्यावी. [पे. द. ३९ ले. २५]

,, —चैत्र शुा १५ इ. १७६४ एप्रील १६ (आर्बा सवाल १४)
नाना, पेशव्यांना कळवितात–दमाजी गायकवाडांकडे यावयाच्या पैशांतून त्यांस २ लक्ष जानोजी भोसले व १ लक्ष बसालतजंग यांना देविले होते व त्यांस मल्हारराव होळकर मध्यस्थ. पण ह्या पैकीं १० ह. पावले. व बाकीबद्दल गायकवाडावर वराता करून वसुलास कृष्णाजी नाईक कडून रवाना जाहाले. हली ऐवज करार केला त्यांत कदाचित् हा लावून घेतील तर हा ऐवज सरकारचाच आहे यास्तव विनंती. [पे. द. ३९ ले. २७]

,, —ज्येष्ठ शुा ९ इ. १७६४ जून ८ (जिल्हेज ७)
नाना गोविंदराव खाजगीवाले यांस लिहितात, श्रीमंतांची आज्ञा नसतां मध्येंच लबाडी करून श्रीमंतांचें नांव करून पुरंदर किल्ला घेतला हा निश्चय लष्करांतून पत्रें आली तेव्हां जाहला. दादासाहेबांचे मनांत संशय वाढत चालले. बखेडा मातबर व्हावा असे डौल दिसतात. पाहाते अर्थी उभयतांहि श्रीमंतांचे मनांत कांहीं नाहीं. परंतु मध्येंच क्षुल्लक आहेत ते नानाप्रकारें उपद्व्याप करून संशय घालून कलह वाढवितात. [खं. १४ ले. ७२]

,, —ज्येष्ठ वद्य १२ इ. १७६४ जून २६ (सु. ११६५ जिल्हेज २५)
नानांना माधवराव लिहितात, सरकार हांडे येथें १५ खंडी तुपाची नेमणूक दरसालचीच आहे व त्यांबद्दल ३ ह. रु.

कमाविसदारास कमी करावयाचे. हें तूप हांड्याहून ब्र्हाणपूर, तेथून गंगथडीस नारोबाबाजीकडे व त्यांनीं पुण्यास पोंचवावयाचें. सध्यां हांडे दादासाहेबांनीं खाजगीकडे ठेवला व महादशेट वीरकर ह्यांनीं तूप द्यावयाचे व वीरकरांस ३ ह. कमाविसदारांनीं देऊन भाडेंहि भागवावयाचे. ते त्यांनीं न केले तर ढालाईत पाठवून भाडे वसूल करावें [पे. द. ३९ ले. ३१]

१६८६ ज्येष्ठ इ. १७६४ जून

सखाराम बापू नानांना कर्नाटकांतून लिहितात, आपण तिकडे आहेत तों काळजी नाहीं. [पे. द. ३७ ले. ३५, ४४]

,, —आषाढ शुद्ध ९ इ. १७६४ जुलै ७ (सु. ११६५ मोहरम ७)

माधवराव नानांना लिहितात, तुम्ही राघोबादादांच्या बोलावण्यावरून नाशकाकडे जाता तर जा. आम्ही तीर्थस्वरूपांस दोनच्यारदां लिहिलें कीं पुण्यासच जाऊन कमाविसदारांस तेथेंच बोलावून रसदांचा फडाशा करावा. पण ते न ऐकत. असो. तुम्ही जाऊन त्यांस समजाऊन ऐवज रवाना करणें. येथून रसदा ऐवजी वराता केल्या त्यांचे ऐवज मुदती प्रमाणें पावता करावा. [पे. द. ३९ ले. ३४ श्रावण वद्य ३ पहा]

,, —श्रावण शुा ३ इ. १७६४ जुलै ३१ (सु. ११६५ सफर १)

नानांचा मुक्काम नाशीक येथें [पे. द. ३९ ले. ३४]

,, —श्रावण शुा ६ इ. १७६४ आगस्ट ३

भवानराव प्रतिनिधींना त्यांचें प्रतिनिधीपद देवऊन नानांनीं त्यांचा रुसवा काढला [रि. उ. वि. १ पृ. ४३४]

,, —श्रावण शु. १२ इ. १७६४ आगष्ट ८ (सफर ९)

नाना गोविंदराव खाजगीवाल्याना लिहितात. लक्ष्मण कोन्हेराचे फाजील ७ लक्ष रु. ही गप्प. शोध केल्यास ४ ल. पावेतों होईल. शिवाय मुरादखानाची जहागीर जेव्हां त्यास कैद करून जप्त केली व लक्ष्मण कोनेरास सांगितली तेव्हां त्यांतील निदान ४० ह. रु. तरी त्यास रद्दकर्जी मिळाले. तात्पर्य, पाउण लाख

(१६८६ श्रा.) पावेतो जाजती देण्याबद्दल आम्ही विष्णु महादेव गद्रे यांसी बोलून ठीक केलें आहे. त्यास मामलत सांगण्याविषयीं संधान पाहून पत्र घ्यावें. मर्जी नसली तर तितकेंच राहूं द्यावें. विष्णुपंताचें नांव व माझी चिटी प्रकट न करतां हें करावें. समयास सांगावें हि. खामखा नारो बाबाजी व लक्ष्मण कोनेरच्या उलट व्हावें असेंच करून ठेविलें आहे. [खं. १४ ले. ४]

,, –श्रावण इ. १७६४ जुलै (सु. ११६५ सफर)

बापू नानांना लिहितात, आपले लक्ष धरून कमाविसदारांच्या पाठी थोपटून सरकारकाम करतो. त्यास आमची इच्छा हीच होती की, सर्व कारभार आपल्या हातीं घ्यावा येणेंकरून सरकारकिफायत आहे. व तीच गोष्ट श्रीमंतांनीं केली. उत्तम जालें. [पे. द. ३७. ले. ४६]

,, –श्रावण वद्य ३ इ. १७६४ आगष्ट १४

श्रीमंत दादांनी नाना फडणीस ह्यांस पुण्याहून आपणासंनिध नाशिक त्रिंबकाकडे बोलावून घेतलें. रसदा घेणें वगैरे कारभार येथून येके जागीं राहून करूं, या अर्थें बोलाविलें [पे. द. ३७ ले. ४४; ऐ. ले. सं. २ पृ. ८८० आषाढ शुा ९ पहा.]

,, –भाद्रपद शुा ८ इ. १७६४ सप्टें. ३ (सु. ११६५ रवल ६)

माधवराव नाना फडणविसांस कळवितात, १७३४ तोफांचे गोळे, १॥ खंडी शिसे, १ खंडी १ मण दारू. पुनः २५७१ गोळे, ८ खंडी दारू व २॥ शिसें पाठविले ते मिरज येथून लष्करांत येतील. पण वसईहून विसाजी केशवाकडे एक नेहमींचा कारकून ठेऊन दारूगोळा आणवून त्यास नवी पुटे तयार करवून तो रवाना करणें. पुण्याच्या कारखाना चालीस लाऊन नवी दारू करून वरचेवर पाठविणें. भाद्रपदांत पोचेसे कपडे पाठविणें. [पे. द. ३९ ले. ३७]

,, –भाद्र. शु. ११ इ. १७६४ सप्टें. ६ (सु. ११६५ रवल ९)

नानांचा नाशीक येथें मुक्काम [पे. द. ३७ ले. ४४ पण नाना लवकरच पुण्यास परत आले.]

श. १६८६ भाद्र. वद्य १३ इ. १७६४ सप्टें. २३ (सु. ११६५ रवल २६)
नाना फडणिसांचा मुक्काम भोगूर येथें. [पे. द. ३९ ले. ३७]

,, –आश्वीन वद्य ९ इ. १७६४ आक्टो. १९ (सु. ११६५ रखर २३)
राघोबा दादा नानांना कळवितात, पुस्तकाकडील लेखक तिघे व कारकून सदाशिव कृष्ण यांना वाड्यांतच भोजनास घालून कागद, शाई वगैरे सामान लागेल तें देणें [पे. द. ३२ ले. ३३]

,, कार्तिक शुा १५ इ. १७६४ नोवें. ८ (सु. ११६५ जवल १३)
नानांना माधवराव प्रधान लिहितात, हैबतराव निंबालकरांचे वकील त्रिंबक जगन्नाथ हे बीड येथें असतात; त्यांस रु. ५०० खर्चास बीडप्रांतीं कोणाकडे येणें असेल तर त्याकडून, नाहीं तर दुसरें ऐवजीं पावते करणें [पे. द. ३९ ले. ४३]

,, –कार्तिक शु. १५ इ. १७६४ नोवें. ८ (सु. ११६५ जवल १३)
थो. माधवराव नानांना पुण्यास पत्र पाठवून ३० खंडी दारू व बाण तयार होतील तितके मागवितात. [पे. द. ३७ ले. ५४]

,, –मार्गशीर्ष शुा १ इ. १७६४ नोवें. २४
राघोबादादा नानांना लिहितात, पुरंदरचे मोर्चेबंदीस राजाराम गोविंद पाठविले. तरी त्यास दारू, शिसे लागेल तें पुण्याचे कोठारांतून द्यावें [पे. द. ३९ ले. ४४]

,, –मार्ग. व. १० इ. १७६४ डिसें. १८ (सु. ११६५ जखर २४)
दमाजी गायकवाड यांजकडे ५। लक्ष रु. येणें. पैकीं २। लक्ष आमचे स्वारीचे नालबंदीस पाहिजेत. तरी गायकवाडांवर इतरा कोणाची वरात न करणें म्हणून दादांचें नानांना पत्र [पे. द. २९ ले. ७६]

,, मार्ग. वा १० इ. १७६४ डिसें. १८ (सु. ११६५ जखर २४)
नाना वेंकाजीपंत पोतनीस यांस लिहितात, त्रिंबक नारायण मंत्री यांजकडील ऐवजाची घालमेल झाली नाहीं व ज झालें तें श्रीमंतांकडूनच झालें आहे. पुण्याचे खर्चाची ओढ असता

वाईचा ऐवज यावयाचा तो तुम्हाकडे दिला आणि पुढील मुदतीचा पुण्याचे खर्चास लागला. असें असोन तुम्ही कांहीं लिहितां हे अपूर्वात आहे. सातारा खर्चास ऐवज जरूर असावा हेंच लक्ष आमचें आहे. [पे. द. ३९ ले. १३३]

श. १६८६ पौष शु. १३ इ. १७६५ जाने. ५ (सु. ११६५ रजब १२)
बाळाजी जनार्दन फडणीस यांजकडे मौ० घोटवडे (तर्फ आश्र आधारणें) हा गांव पूर्वी प्रमाणें आहे. पण साल मजकुरा पुरतें ह्या गांवचें पीक मात्र नरसी रघुनाथ याजला देऊन त्याचे पैशाची फेड माधवराव पंतप्रधान यांनीं केली. [भानुफडणीस बेलबाग संस्थान संग्रह अप्रसिद्ध कागद]

,, –फाल्गुन शुद्ध ३ इ. १७६५ मार्च २४ (रमजान १)
नाना गोपिकाबाईंना लिहितात, गुदस्तां पुणें जाळल्यामुळें रावसाहेब पुण्यास न आलें. यास्तव पुण्याची वस्ती यथास्थित न जहाली. फुटकी आहे. तशांत समीप पुरंदरचा दंगा. दहशत खाऊन लोक तजावजा. पण नारायणराव आल्यामुळें लोक धीर धरून घरें बांधूं लागले. अशांत आपण नारायणरावांस बोलावतां. तेव्हां लोकांस धीर पुरोन गांवची भरवस्ती होईल म्हणून पाठवूं नये. आपणच येथें यावें. रावसाहेबांची पत्रें कीं, लष्करांत पैका नाहीं तो पाठवा. [ऐ. ले. सं. ३ ले. ५६०]

,, –फाल्गुन शुा ८ इ. १७६५ फेब्रु. २८ (खमस रमजान ७)
मालवण इंग्रजानीं घेतलें. तें त्यांस २ लक्ष किंवा अधिकहि देऊन परत घेण्याची बोली चालली आहे असें नानांना कळविलें. [पे. द. ३९ ले. ४९]

१६८६ इ. १७६४

बाळाजी जनार्दन = नाना फडणविस गोविंदरावतात्या लिमये खाजगीवाले यांना कळवितात, माधवराव प्रधानांचें पत्र कीं, पुरंदरीं दागिने होते त्यांपैकीं पुण्यास आले ते वजा करून

बाकीच्यांची याद दादांना समजवावी. कन्नड-फुलमरी, पैठण, बीड व वऱ्हाडचे गांव इत्यादि ३॥ लक्ष रु. चे चितोपंताचें मार्फतीनें बोलतात. चेहलदू निराळे; चितोपंतांना मी येण्याच्या आधी खानदेशच्या वसुलाची जी तेरीज धरली ती मी आल्यावर ६०।७० हृ. नीं वाढविलीं व विल्हेस लाविली [खं. १४ ले. ४६]

१६८६ इ. १७६४
नानांनी माधवराव स्वारीस कर्नाटकांत गेल्यामुळें पत्नी रमाबाईंची खाण्याचीं विडयाचीं पानें खर्चयादींतून रद्द केलीं. [लोक हि. ऐ. गो. भा. १ पृ. ३०]

१६८७ कार्तिक शु. २ इ. १७६५ आक्टोबर १६ (रखर २०)
नानांनीं ४ ला. २७ हृ. च्या हुंड्यापैकीं २७ हृ. चें ठिकाण लावावें असें माधवरावांस लिहिलेवरून माधवराव सर्व हिशेब कळवितात व २७ हृ. चा भरणा करावा हें सुचवितात [पे. द. २० ले. १५५]

,, –मार्ग. शु. ५ इ. १७६५ नवं. २७ (सु. ११६६ जखर १३)
नाना फडणीस यांजकडे मौजे घोटवडे (प्रा पाली) येथील खोती आहे. म्हणून सिलेदार व रहदारीच्या लोकांस माधवरावांनीं बजाविलें आहे कीं ह्या गांवास जातां येतां हजर बेगारीचा वगैरे उपसर्ग न लावणें. [भानूफड० बेलबागसंस्थान संग्रह अप्र. कागद]

,, –फाल्गुन वद्य १० इ. १७६६ मार्च ६ (सु. ११६६ रम. २४)
नानांना किल्ले देहरसानी येथील सबनिशीकडील फडणिसी सांगितली [थो. मा. रो. १ पृ. ४१]

श. १६८८ अ. चैत्र वद्य ३ इ. १७६६ मार्च २९ सु. ११६६ (सवाल १७)
पुण्यांत विष्णूचें देवालय करून लहानशी पुष्यवाटिका करावी व त्यासाठी बुधवारांत मानाबाईची जागा रिकामी ती त्यांच्या संतोषें घेऊन देवालयास काम लाविलें. ही जागा

(श. १६८८ अ. चैत्र) द्यावयाची नव्हती. परंतु तुमचे भिडेस्तव देणें प्राप्त. ही पागेस्तव ठेवली होती. बरें, आतां तुम्ही करतां हेंहि उत्तम. [भानु फडणीस बेलबाग सं. हस्तलिखित संग्रह अप्र. हें बांधकाम ४ वर्षे चाललें होतें. भा. वर्षांत आलेली श. १६८७ तील नोंद ह्यामुळें चित्य वाटते.]

,, —अ. चैत्र वद्य ८ इ. १७६६ एप्रील ३ (सु. ११६६ सवाल २२)
नाना फडणविसांनीं बाबूजी नाईक बारामतीकर ह्यांस त्यांनी हैदराशीं कारस्थान केलें, प्रतिनिधीबाबत खोटेपणा केला, ह्याबद्दल, मुलामाणसांसह पकडून त्यांची घोडी, दागिने आणविली ती याद [पे. द. ३७ ले. ९५, ९९; ऐ. ले. सं. ३ ले. ६४१]

,, —चैत्र शुा १४ इ. १७६६ एप्रील २३ (सु. ११६६ जिलकाद १३ पोंच)
नाना विषयीं माधवरावांचा आपलेपणा व नानांची दिनचर्या— श्रीमंत म्हणतात ' नानाचें पुण्य अधिक. उव्हाला = आळस चालढकल—माहीत नाहीं. स्नान संध्या करतात. प्रातःकालीं स्नान, प्रहर दिवस पर्यंत देवपूजा, तदोत्तर दोन प्रहरपर्यंत कारभार. मग भोजन, नंतर घटकाभर कारभार. मग चार घटका निद्रा. फिरोन संध्याकालपर्यंत कारभार. तदोत्तर संध्या. नंतर पुराण. मध्यरात्र नित्य निजावयास होते. श्रीमंतांची नित्य संतोष मर्जी. समयीं गोष्ट निघाली तर ' ये समयी नाना काय करीत असतील ' असें श्रीमंत विचारतात. परंतु वैपरित्य गोष्ट मुखांतून कधींहि ऐकण्यांत आले नाहीं. असें असता, ' नानावर यखितयार टाकला त्यामुळें गर्व फार जाला. चिठ्या माडीवरून खालीं, खालून वर टाकाव्या, बाल्याचे पडदे; ' अशा गोष्टी कधीं निघाल्या नाहींत. एकान्ती ज्या जवळ श्रीमंत बोलले त्या प्रामाणिकानेंच स्वामिजवळ सांगितल्या हें श्रीहरी जाणें. श्रीमंतांचा विश्वास कांहीं आहे तो आपले ठाई, असें कोठेंहि बोलण्यांत दिसतें. [पे. द. ३९ ले. ६१]

श. १६८८ आश्वीन . १७६६ आक्टो. नाना हुबळीचे ताळेबंद पाहतात [ऐ. ले. सं. ३ पृ. ११०१]

,, –मार्ग. वद्य १३ इ. १७६६ डिसें. २९ (सु. ११६७ रजब २६) बाबूजी नाईक यांजकडून १ ल. १३ ह. नख्त सरकारांत आले. पैकीं ४० ह. रु. ची वरात अलाहिदा होईल बाकी ८३ ह. देविले. बाकी कर्ज घेऊन देणें. ऐवजाकरतां गोविंद शिवराम यांचा खोळंबा न करणें असें नानांना पत्र [पे. द. ३९ ले. ७२]

,, –पौष शुा २ इ. १७६७ जाने. २ (रजब ३०) बाबूजी नाईक यांजकडील यादवराव याजपासून ५ ह. रु. नजर घेतली तो पैका माघारा देण्याविषयीं थो. माधवरावांचें नानांस पत्र [खं. १४ ले. ७३]

,, –पौष शुा ३ इ. १७६७ जाने. ३ सखारामबापूंचा पुत्र अकोपंत नानांना लिहितो, वंदनगड येथील बेगमीस लाकडे पाहिजेत ती मेढे खोरियांतून आणूं. पत्र द्यावें. [पे. द. ३६ ले. ३०८]

,, –माघ वद्य ९ इ. १७६७ फेब्रु. २३ सु. ११६७ रमजान २३ नानांनी वे. रा. मोर जोशी यांजकडून पद्मपुराणाचे (मधील) गणपती–सहस्रनाम लिहून घेतले. [पे. द. ३२ ले. ३७]

श. १६८८–८९ इ. १७६६–६७ नानांनी हरिपंत तात्याकडे स्वारींत. शागीर्द, ढालाईत, जिलबी, कारकून, शिलेदार, मुत्सद्दी, प्यादे, निलकंठ महादेव, सखारामपंत यांचे सरंजाम, खंडण्याचे कागद, फडांतील नवी जुनी कामकरी माणसें इत्यादींच्या हिशेब, तेरीज, सर-तेरीज, पट पाठविले ती नोंद [पे. द. ३९ ले. ७८]

१६८९ चैत्र शु. १५ इ. १७६७ एप्रील १४ (जिलकाद १४) माधवराव प्रधान नानांना कर्नाटकांतील स्वारीत मुलूख सुटला किती (३० ल.) राहिला कोणचा (जगदेवसरकार), खंडण्या व ५८ ल. कर्ज किती घेऊन खर्च चालला. एक

हैदरची मामलत राहिली. पण दिवस शेवटचे आले. अशा संबंधी कळवून २५ ल. रु. मागवितात. [भा. व. ऐ. पत्र. व्य. ले. १०८]

श. १६८९ वैशाख वद्य ३० इ. १७६७ मे २७ (जिल्हेज २८)
चिंतो विठल रायरीकर यांस सरंजाम नाहीं म्हणून ते स्वारीत येणें कैसें होतें असें म्हणतील तर नाना फडणवीस यांस (सांगून) माणसें, उंटे, घोडी, वगैरे देऊन त्यांची रवानगी करावी असें हरिपंताचें म्हणणें. [खं १३ ले. ९०]

,, –ज्येष्ठ शु. ३ इ. १७६७ मे ३० (मोहरम १ समान)
दादांचें नानांस पत्र—मल्हाररावांनंतर तुकोजी होळकर यास सरदारीचीं वस्त्रें येथें (मांडवगड) दिलीं. तरी त्याचे महालास व गांवखेडयास जप्ती वा उपसर्ग न लागावा [पे. द. २९ ले. १८३]

,, –भाद्र. वद्य १४ इ. १७६७ सप्टें. २१ (सु. ११६८ रखर २७)
प्रधान माधवरावांनीं दोन वर्षां पूर्वी (श. १६८७) समस्त सावकारास हैदराकडील आलेल्या खंडणीपैकीं रुपये देऊन फेड करण्याचा करार जाहला होता. त्याप्रमाणें गतवर्षी (श. १६८८) येवच दिम्हा. पण रामकृष्ण गंगाधर ह्यास ७ ह. रु. द्यावयाचे ते देऊं नयेत अमानत ठेवावे असें म्हटलें होते. तरी आतां ते त्यांस द्यावेत. [पे. द. ३९ ले. ८९]

,, –आश्वीन शुा २ इ. १७६७ सप्टें. २५ (पौ. जवल १)
नानानीं मोरोबादादा यांस परगणे उमरखेडची मामलत कृष्णाजी अनंत तांबे यासच १५ ह. रु. देण्याविषयीं स्पष्टतां-पूर्वक लिहिले. [पे. द. ३९ ले. ९०]

,, –आश्वीन वद्य ४ इ. १७६७ आक्टो. ११ (सु. ११६८ जवल १७)
सातारा, नगर, ताथवडा, चंदन, सिवनेर तालुका येथें राघोबादादांचे लोक होते ते उतरवून नवे माधवरावाकडील ठेविले. ती पट नगरचा किल्ला पेडगांवासह घेतला हे नानांस कळविलें [पे. द. ३९ ले. ९१]

श. १६८९ आश्वीन वद्य १२ इ. १७६७ आक्टो. १९ (सु. ११६८ जवल २५)

बालाजी जनार्दन भानू महाजन वेळास यांस भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधींनी मौजे वेणेगांव-तर्फ उंबरज प्रांत कऱ्हाड-हा गांव, तेथील जिल्हेचा खालसा अंमल व स्वराज्य निमे व मोकासा तिजाई वसतगडा बाबत व महाल मजकूर व इतर बाब व साहोत्रा घासदाणा व स्वारीपटी व इनामतिजाई इत्यादि सर्व हक्क उत्पन्नांसह श्रीविष्णु-पुणें पेठ बुधवार-च्या पूजा नेवेद्याच्या बेगमीसाठीं दिला. तो भानूंच्या विद्यमानें चालावयाचा आहे. [फडणीस भानू बेलबाग संस्थान संग्रह अप्र. का.]

,, -पौष शुा २ इ. १७६७ डिसें. २३ (साबान १)

नानांनी बाजी गोविंद बुंदेले यांजकडे हिंदुस्थान (माळवा-देखील) मधील नवे माहाल सरंजाम कोणास दिले, सरकारांत किती व कोणते राहिले, पानिपतचे स्वारींत भाऊसाहेब यानी लक्ष रु. ची वरात दिली होती त्याचा फडशा कसा, हा सर्व झाडा मागितला त्याचा खुलासा [पे. द. २९ ले. १९४ अ]

,, -माघ शुा १५ इ. १७६८ फेब्रु. २

विश्वासराव दाणी राजेबहाद्दर यांस पुण्याहून बाळाजी शंकर लिहितो—पुणें दरबारीं फडणिसांचें वळण भारी. नाना फडणीस यांजवर सर्व यकत्यार आहे. त्यांनीं सांगावें तें प्रमाण [पे. द. २९ ले. २००]

,, -फाल्गुन शुा २ इ. १७६८ फेब्रु. २० (रमजान १)

नानांचें विश्वासराव लक्ष्मण दाणी यांस पत्र कीं, रसदेचें बोलणें श्रीमंतापाशीं झालें त्या वायद्याप्रमाणें ऐवज सरकारांत पावल्यास सचोटी वाढून श्रीमंताची कृपा विशेष होईल. [पे. द. २९ ले. २०६]

,, -फाल्गुन शु. ११ इ. १७६८ फेब्रु. २८ सवाल ९

बुंदेलखंडांतील फडणीसी नारो देवजी यांना मिळावयाची तर तसें नानांचें पत्र आलें पाहिजे असें तो म्हणतो [पे. द. २९ ले. २०२]

१६९० अ. श्रावण वद्य ५ इ. १७६८ आगस्ट ३ (सुा ११६९ रवल १९)
सातारा येथील राजमंडळाची फडणिशी बाळाजी जनार्दन व बाबुराव राम यांचकडे पूर्वीप्रमाणें दिली. मध्यंतरी सखाराम भगवंत यांजकडे होती ती दूर केली. [थो. मा. रो. १ पृ. ५३].

,, –आश्विन शुा १४ इ. १७६८ आक्टो. २४
नाना फडणीस यांनी ढालाईत पाठवून गोपाळपंतास हिसेबाकरतां गडावर नेले. पण श्रीमंत राजश्री बज्याबा याणी रुमाल खाली आणिले, ते सरदीनें कुजलें, त्याला पांचसात वरसे जाली. इत्यादि इत्यादि [पुरं. द. ३ ले. ९१]

,. –कार्तिक वद्य १४ इ. १७६८ डिसें. ८ (तिसा रजब २७ पाौ)
माधवराव प्रधान नानांना पंढरपूर येथें आल्याचें व सुरापुरास जाणार असल्याचें कळवून. नागपूरकर भोसले यांजकडील देवाजीपंत येईल तरी दो तिहीं तऱ्हेनें बातमी राखण्याबद्दल बजावितात. [ऐ. पत्रव्य. ले. ११५ पुस्तकांत वद्य १० व ता. ३ पडली आहे]

,, –मार्ग. शुा १ इ. १७६८ डिसें. १० (सु. ११६९ रजब २९)
जीवनराव सेटचाजी आटोळे व जगजीवन पवार ह्यांनी त्यांजकडील पैसे न दिले तर किल्यावर अटकेत ठेवणार हें ठीक आहे. रु. दिल्हे तर पका जामीन घेऊन मोकळे करणें, असें माधवराव नानांस लिहितात. [पे. द. ३९ ले. ११८. पुस्तकांत चुकून १७६९ पडलें आहे.]

,, –(मार्ग.) शुा ५ इ. १७६८ डिसें. १४ (साबान ४ तिसा)
हरिपंत फडके मार्डी मुक्कामाहून (जि. सोलापूर) नानांस विचारतो. आपली प्रकृती कसी काय आहे, ऐकतो कीं, समाधान नाहीं. त्यावरून कालजी लागली आहे. तरी लिहून पाठवावे. बलवंतराव वैद्य लष्करात आहेत, मोरोबादादांस औषध चालू आहे. [पे. द. २० ले. २०७]

श. १६९० मार्ग. शु. १० इ. १७६८ डिसें. १९ (शक. सर्वधारी सु. ११६९ साबान ९)

नाना फडणीस महाजन वेळास यांना रघुनाथराव घनःशाम मंत्री यानीं मेणोली गांवचा आपला खालसा अमल, स्वराज्य देखील सावोत्रा नाडगौडकी हे हक्क जे रात्रपत्री इनाम आहेत ते दिले. [भानुफडणीस संस्थान बेलबागसंग्रह अप्र. कागद]

,, –मार्ग. वद्य २ इ. १७६८ डिसें. २५ (सु. ११६९ साबान १५)

गायकवाडकडील महालाच्या बंदोबस्त करतां भडोचकर मोगलांचें, खानदेशांतील दाभाडे, टोके व भिल्ल यांचे पारिपत्यासाठीं प्रत्येकीं दोनशें राऊत पाठवितां, उत्तम आहे. असें माधवरावांचें नानांस पत्र [पे. द. ३९ ले. ११९ पत्रांवर पुस्तकांत . १७६८ पाहिजे १७६९ पडला आहे.]

,, –मार्ग. व. ७ इ. १७६८ डिसें. ३० (सु. ११६९ साबान २०)

भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधींनी नानांना मेणोली गांवचाच जिल्हेकडील अमल, घासदाणा सुभेमजकूर व स्वारीपटी–सह-दिला. [भानूफडणवीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद]

,, –पौष शु. ५ इ. १७६९ जाने. १२ (सु. ११६९ रमजान ३)

नाना फडणविसांना वाईचे देशपांडे हैबतराव भवानीशंकर व वेंकाजी गिरमाजी ह्यांनी मेणोली गांवची त्यांची देशपांडे वतनाची जमीन, अदिलशाही काठीनें मोजणीचीं, बिघे ६०, थल राजाबुरजा, ही सर्व हक्क उत्पन्नासह दिली [भानू फडणीस बेलबाग संस्थान संग्रह अप्र. कागद]

,, –पौष शु॥ १३ इ. १७६९ जाने. २० (सु. ११६९ रमजान ११)

माधवराव नानांना कळवितात, महादजी शिंदे यांजकडे परगणे येदलाबाद हा सरंजाम म्हणून असतां जप्ती कां केली. तरी मोकळा करणें व वसूल घेतला तोहि त्यांच्या कमाविसदारास देणें [पे. द. ३९ ले. १०३]

१६९० पौष वद्य ३ इ. १७६९ जाने. २५ (सु. ११६९ रमजान १६)
नानांच्या विचारण्यास माधवरावानीं कळविलें—गदवालची खंडणी २० ह. वर न करणें. रंभाजी निंबालकराकडील यैवजाविसीं येथें सर्वच निंबालकर आले आहेत त्यासी बोलून मग लिहितो. हैदरनाईकाचा हवाला २ ल. १७ ह. ७२५ रु. चा, त्याचे तोडजोड करून होन नख्त करून ऐवज घेतला हें ठीक केलें. मौजे टाकलीच्या सिवेच्या सेरणी बाबत १२ शें. रु. करार, तरी गणेश गंगाधरच्या पागेकडे नालबंदी पोग्यांची, तो जमाखर्च लष्करांत आला [पे. द. ३९ ले. १०४]

,, –पौष वद्य ८ इ. १७६९ जाने. ३० (सु. ११६९ रमजान २१)
नानांस माधवरावांची आज्ञा कीं, राघोराम ह्यांचें घर बागणी नजिक इस्लामपूर व पालेकर यांचें घर चांभारगौंद्यांत आहे. तीं घरें आंतल्या वस्तभाव सुद्धां जप्त करावीं. कारण, महादजी शिंद्यांचे पदरचे हे दोघे असतां त्यांच्यावरच चालून गेले व मेलेहि. पण घरें वगैरे जप्त करावीं. [पे द. २९ ले. २२९]

,, –पौष १७६९ जाने.
—श्रीमंत नाना फडणीस पुण्यांत कारभारास आहेत. दुसरे कोणी नाहीं. त्यांचा फर्मास श्रावणमासी आपणांस लेहून पाठविली. ते बहुतच रागे. तरी लहानपणचे इष्टत्वे फर्मास जरूर पाठविणें [पे द. २९ ले. २११]

,, –माघ शु. ६ इ. १७६९ फेब्रु. १२ (सु. ११६९ सवाल ४)
माधवरावांचें पत्र नानांस, कीं, सिंहगडास सर्व वस्तभाव सुद्धां, दादासाहेब, सौ. काकूबाई वगैरे सह जाणे. [ऐ. ले. सं. ले. ७९० व ७९१; पे. द. २० ले. २६१]

,, –माघ शु. ११ इ. १७६९ फेब्रु. १६
परगणे आंबडापूरचा सरदेशमूख, मोकासदार व साहोत्रावाला लक्ष्मण खंडेराव हा लिहितो—नाना, तुमच्यामुळे श्रीमंत पेशवे तीर्थरूपावर कृपावंत झाले. व नागपूरकर भोसले यांजकडील

४ माहाल जप्तीचे सांगत होते. पण आपल्या विद्यमानें कर्तव्य तें करावें हा तीर्थरूपांचा हेत. आपलें ममतेचें पत्र महिपत प्रल्हादास यावे म्हणजे ते चालवितील [पे. द. २० ले. २२४]

„ —माघ वद्य ११ इ. १७६९ मार्च ४ (सु. ११६९ सवाल २४)
संगमरवरी बंगला व शहाजाद्याच्या कबरेची माहिती. लांबीं, रुंदी, धोंडा जात इ. पण तो आणण्या जोगा नाहीं. [पे. द. ३९ ले. १०७]

„ —फाल्गुन शुा २ इ. १७६९ मार्च १० (सु. ११६९ जिलकाद १)
नव्या तोफांचा कारखाना. तोफेचे दळ पातळ होऊं नये म्हणून २॥ तसू आंतील अंगास व मोहरीचे कंगणीसुद्धां ४ तसू जाडी धरून काम चालविले. हें भांडें दळदार होईल. पण स्वारीस भारी होईल. म्हणून २ तसू दळ कंगणी १॥ तसू. पंचरसांत तांबे फार पडेसे करावे. रस चांगला जालिया वोततां भांडेंहि चांगलें वोतेल. [पे. द. ३९ ले. १०८]

„ —फाल्गुन शु. २ १७६९ मार्च १० (जिलकाद १)
मुक्काम बोदवड येथून शिवराम नारायण हा नाना फडणीसास कळवितो—पेशजी मोठी गडवड झाली तेव्हां वाबले वगैरे सरदार ठेवले. आतां निरोप दिल्हा. त्याउपरी विठल बल्लाळ २ ह. फौज सडी करून जलगावापासून ८ कोस सोनाले घेऊन तेथें ठाणें घातलें. ह्यानें बऱ्हाणपुरास शह पोहचेल हें जाणून नेमणुके शिवाय नवीन प्यादे, पथके ठेविलीं आहेत. शहरास बंगाल्यांतील व वऱ्हाडचे मार्गी रेशीम एक बैल आल्यास २७ रु. हासील होता. गडबड झाल्यामुळें हें उत्पन्न बुडेल [पे. द. २० ले. २१५, २२१]

„ —फाल्गुन शुा ११ इ. १७६९ मार्च १८ (सु. ११६९ जिलकाद ९)
नानांस रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांचे स्वारीखर्चास ४० ह. रु. देण्याबद्दल माधवरावांचें पत्र [पे. द. ३९, १०९]

श. १६९० फाल्गुन शुा १२ इ. १७६९ मार्च १९ (सु. ११६९ जिलकाद १०)
हरि बलाल फडके कनकापूराहून नानाना लिहितो, तुमचे तर्तुदीस व मेहनतीस दुसरियानें दोष ठेवावा असें नाहीं. श्रीमंतांची खातरजमा आहे, पागेचे अधिकारी कुपियांत (गुप्तपणें), काय कळवीत असतील तें कळावयाचें नाहीं. परंतु, त्यानी काय लिहिणें आहे ? श्रीमंत कधीमधी गोष्ट काढतात. मर्जींत अंतर नाहीं. [पे. द. २० ले. २५६]

,, —फाल्गुन शु. १४ इ.१७६९ मार्च २१ (जिल्काद १२)
रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण ह्याचे पंचगूस (गोदा उत्तर तीर) हून नानांना २० ह. रु. तोफखान्या करतां पाठविले [पे. द. २९ ले. २३१]

,, —फाल्गून वद्य ५ इ. १७६९ मार्च २७
नानांच्या घरीं भोसल्यावरील स्वारीस निघतांना श्रीमंत थो. माधवराव यास मेजवानी झाली. ते समई बकुलीच्या फुलासारखे बुटी पागोटे जे ते फार दिवस बांधत होतें.– त्या प्रमाणें दुसरें करावें. वरकडहि कांहीं मेवेजात येईसी असली तर पाठवावी. [पे. द. २० ले. २५७]

१६९१ चैत्र शु. १ इ. १७६९ एप्रील ७ (सु. ११६९ जिलकाद २९)
(थो. माधवराव स्वारींत असले तरी पुण्याचे राजघरचे व राज्याचे वार्षिक वगैरे जमाखर्चाचे अजमास रावांनीं पाहून मंजूर झाल्यानंतर पुढें तशी व्यवस्था व्हावयाची व हें काम नानांचे कडे असे. त्याप्रमाणें) हरिपंत फडके नानांस लिहितात जमाजर्चाचे अजमास तुम्ही पाठविले ते श्रीमंतानी व मोरोबादादानीं पाहिले. [पे. द. २० ले. २७५]

,, —चैत्र वद्य ७ इ. १७६९ एप्रोल २८ (सु. ११६९ जिल्हेज २०)
(नानांचेकडे सर्व प्रकारचें बारीक मोठें काम असे–) हरिपंत नानांना लिहितात, श्रीमंताचे धोत्रजोडे पावले. श्रीमंतांचा पोषाक तयार होत आहे. हें कळलें. हैद्राबादबद्दचींहि पत्रें मिळालीं. [पे. द. २०. ले. २८०]

श. १६९१ चैत्र वद्य ९ इ. १७६९ एप्रील ३० (सु. ११६९ जिल्हेज २२)
नानांस माधवरावांनीं कळविलें कीं, हैद्राबादचा वकील आपाजीराम हा कराराप्रमाणें वागला नाहीं. सबब त्याजकडे असलेलें इनाम गांव व मुकासा सरकारांतून आहे ते कमाविसदाराकडून जप्त करावे. [पे. द. ३९ ले. १११]

,, –वैशाख शुा १ इ. १७६९ मे ७ (सु. ११७०)
गंगा विष्णु वैद्य नानांना लिहितात, महादजी शिंदे यांनीं बाजी नरसिंह यांचें औषध देऊन बरें करण्याबद्दल सांगितले. २५ ह. रु. देण्याची बोली केली. पुढें बाजीस गुण आला. व दिले रु. ६ ह. व २ ह. चा गांव. पुढें त्या गांवचा अमल उठवून दिल्हा. तरी आपण अजमेरच्या सुभेदारास व पाटिल बाबास पत्रें पाठवून गांव चालवीत तें करावें. [पे. द. ३९ ले. १२९]

,, –वैशाख वद्य ११ इ. १७६९ मे ३१ (सु. ११६९ मोहरम २४)
शिवाजी विठल विंचुरकर नानांना लिहितात, पूर्वीपासून या सरदारीची उभारणी आपले घरची आहे. आणकईचे मामलतीची मखलासी आपली हातची आहे. उपरोधिक लिहावेसें नाहीं. यास्तव ऐवज सत्वर देविला पाहिजे [पे. द. २९ ले. २३७]

,, –कार्तीक शु. ६ १७६९ नोव्हें. ४
नाना बाईस जाऊन कृष्णास्नान करून आले [पे. द. ३७ ले. १७७, १७९]

,, –कार्तिक शुा १५ इ. १७६९ नोवें. १३ (सु. ११७० रजब १३ पाा)
नानांचा पुण्याचा बंदोबस्त भारी आहे माणूस फार भिते. माणसापासून अंतर पडल्यास मुलाहिजा हेत नाहीं; असें हरिपंत माधवरावांना नाना फडणविसांच्या कारभारांतील व्यवस्थेविषयीं बोलतांना सांगतो. नाना पुण्यास नाहींत. [पे. द. ३९ ले. ११७]

श. १६९१ कार्तीक वद्य ८ इ. १७६९ नवंबर २१ (सु. ११७० रजब २१]

नाना फडणीसांना मेणोली गांवची सरदेशमुखी, धारकरी, कसरपंचोत्रा, महाल मजकूर, पांडवगडाकडील एक चाहूर–स्वराज्य अमलापैकी–येणेप्रमाणें पांडवगडाकडे सरंजाम आनंदराव भिकाजी रास्ते यांचे तर्फे होता तो दिला व रास्त्यांना हर एक गांवी मिळून त्याचा मोबदला दिला. माधवराव बलाल पंतप्रधानांचें गंगाधर शामराव मामलेदार प्रांत वाई यांस पत्र [भानुफडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद]

,, –मार्ग. इ. १७६९ डिसेंबर

नाना फडणवीस म्हणतात–मी लष्करांत गेलो तेव्हां माधवरावांचे आरोग्याकरतां कोटी मृत्युंजयाचे अनुष्ठान सांग होई तें करणें असें ठरलें. त्यावरून पुण्यास आल्यावर ब्राह्मण साक्षर चांगले पाहून लिहविलें, मंत्रांच्या परीक्षा ब्राह्मणांच्या घेतल्या. मधुपर्क पूजा करून संकल्प केला. शत ब्राह्मण लाविले. जपास ब्राह्मण पांच पूर्वाभिमुख व पांच उत्तराभिमुख. त्यांत एकेक आश्रितांनी जवळ बसून ब्राह्मणांचे मुखाकडे पहात बसावें. शिंक जांभई आली तर रुद्राक्ष मालेचा ओढूं नये. तो आश्रितांनीं पहावा. थो. रावसाहेबांचे दिवाणखान्यांत देवता स्थापन व जप. निद्रेस थोरले देवधर नारायणरावांचें. ब्राह्मण घरीं जाऊं देत नाहीं. हिमायती ब्राह्मण लावला नाहीं. चार महिने ब्राह्मण व्रतस्थ राहणें कठीण या करतां अर्धे बदलतो. [ऐ. ले. सं. ४ पृ. १४६५–६६]

,, –पौष शु. ३ इ १७६९ डिसें. ३१ (सु. ११७० रम. २)

येवले येथील ठाकूरांचें कर्ज पुणें येथील ठाकूराकडून ढालाईत व कारकून पाठवून वसूल करून देवावें व त्याबद्दल नजर घ्यावी. अशाबद्दल नानांस पेशव्यांचें पत्र [पे. द. ३९ ल. १२१]

श. १६९१ पौष वद्य २ इ. १७७० जानेवारी १३

मातुश्री गोपिकाबाईस नानांचें पत्र — माधवरावांचा (तुंगभद्रादक्षिणतीर स्वारींतील) वृत्तांत. आपल्या कारणें मकरसंक्रमण निमित्य तिलशर्करा पाठविली आहे. पिराजी नाईक निंबाळकर मृत्युवार्ता. म्हैसूर दरबाराचा हैदरचा वकील येथें आला. परंतु रंग पडे असें बोलणें नाही. [ऐ. ले. सं. ४ ले. ८५६]

,, —पौष वद्य ७ इ. १७७० जाने. १८ (सु. ११७० रम. २०)

प्रधान माधवराव नानांना तोफांच्या कारखान्याविषयीं लिहितात—तोफा वोतावयास पहिली जागा लहान, आतां बालाजी वामन सांगतील त्याप्रमाणें हत्तीच्या खंबाऱ्याप्रमाणें मोठी व उंच बांधवावी. घोडी, उंट, दिवटी ह्याबद्दल व्यवस्था [पे. द. ३९ ले. १२६]

,, —फाल्गुन शुद्ध १ इ. १७७० फेब्रु. २६ (शु. ११७२ सवाल २९)

मुंबईहून तोफा चांगल्या विकत आणावयास गोलंदाज व पां. कृ. गोडबोले, पाठविले. त्या तोफा आणि किल्ल्यांवरून असलेल्या उपयोगी तोफा, पाऊस पडूं लागला नाहीं तों, घाट चढून आणवाव्या, असें माधवरावांचें नानांना पत्र [पे. द ३९ ले. १२७]

,, —फाल्गुन. इ. १७७० मार्च

नाना फडणिसांनी रामशास्त्री यांज करवीं पंडित बोलवून निर्णय मागविला—कारण कीं, माघी शिवरात्रीच्या यात्रेंत पाषाण येथील शिवालयांमधील श्रीशंकराचा बाण उपटला व ढलपेहि निघाले. म्हणून कृष्णभट शिवरामभट चित्राव यांनीं सांगितलें. [पुरं. द. भा. ३ पृ. १०८]

श. १६९१ फाल्गुन व. ११ इ.१७७० मार्च २३

बारा घटका रात्रीस वाड्यांत फितूर जाला. सर्व लोक देवडीचे फितुरले. दादासाहेब बाहेर निघोन जात, तों बातमी नानास कळली. त्यावरी वाड्यांत बंदोबस्ती केली. गुलाबराव खोजास चतुर्भुज केले. काहीं गाडदी यांचे जमातदार व खिजमतगार ५० । ६० तेहि चतुर्भुज केले. चौक्या बदलून खडे पाहारे केले. कागद फितव्याचे सांपडले. श्रीमंताकडे सांडणी-स्वार गेले. आज्ञेप्रमाणें शासन होईल. ५ । ७ ब्राह्मण मंडळीहि फितव्यांत होती [ऐ. ले. सं. ३ पृ. १३७०, १३३३]

श. १६९२ चैत्र शु. ५ इ. १७७० मार्च ३१ (सु. ११७० जिल्हेज ३)

नानांनी पुण्यास तोफांचा कारखाना सुरू केला. बाळाजी वामन दामले यांजकडून त्यासाठीं घर बांधविले आणि २ शें खंडी कोळसे, मेण, राळ, तेल, तूप, सुंभ, काथा, पंचरसी धातू, तांबे, कथील, जस्त इत्यादि साहित्य जमवून किती व तोफा केवढाल्या होणार; तसेंच कांहीं खरेदी करणार तें वृत्त माधवरावांस सविस्तर कळविलें [पे. द. ३७ ले. २०२]

,, —चैत्र वद्य १ इ. १७७० एप्रील १० (इहिदे चैत्र व. १)

त्रिबंकराव शिवदेव हे नानांना लिहितात, आम्ही अंतर्वेदींत यमुना उतरोन आहों. आपण परगणे जैनाबाद, माजरोह हातगड येथील धर्मादाय खर्च पडतो. त्याचा झाडा आणावयास गोविंद अनंत कारकून सरकारचे आज्ञापत्रासह पाठविले. पण कमाविसदार नवीन त्यास माहितगिरी नाहीं. मुलुख आफतींत तरी कारकुनास परत बोलवा. बखेडा होऊन होत्या कामांत अंतर पडतें. मला कचा हिसेब समजाविणें आहे. [पे. द. ३९ ले. १३६]

,, —वैशाख व. ७ इ. १७७० मे १७ (सु. ११७० मोहरम २०)

(उभयतांत थोडा बेबनाव, त्यामुळें दोघांचाहि सरंजाम गांवें इ. जप्त व्हावयाचीं. पण सलोखा होऊन ते कामगिरीवर गेले

व सरंजाम वगैरे मिळाला. ह्या घटनेमुळें ह्या वेळच्या तिलशर्करा–पाठवणीस महत्त्व). नानानीं विसाजी कृष्ण बिनिवाले व रामचंद्र गणेश यांना अंतरवेदींत तिलशर्करा पाठविली. त्याचें अत्यादरें व संतोषपूर्वक उत्तर व स्वीकार [पे. द. २९ ले. २५६]

श. १६९२ आषाढ शु. ७ इ. १७७० जून २० [रवल ५]

काणत्या महालच्या रसदा करार झाल्या, कोणते महाल विल्हेस लागले, तूर्त व मुदतीनें यावयाचा ऐवज किती, पोता जमा किती व बाकी किती ते कळवून बाकी झाडून पोत्यास जमा करणें. असें नानांस माधवरावांचें स्वारींतून पत्र. [का. सं. प. या. ले. २२५]

,, –कार्तिक वद्य १४ इ. १७७० नवें. १६ (सु. ११७१ रजब २७ श. विकृती संवत्सर)

मौजे वावजे–तर्फे तलोजे प्रांत कल्याण हा गांव माधवराव प्रधान यांनीं नानांना तेथील स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा, देखील सरदेशमुखी, सरपाटिलकी, इनामतिजाईसुधा दरोबस्त इनाम दिला. [भानू फडणिस सं. बेलबाग संग्रह अप्र.]

श. १६९३ चैत्र शु. ५ इ. १७७१ मार्च २१ (सु. ११७१ जिल्हेज ४ शक)

माधवराव बलाळ प्रधान यांजकडून नानांना प्रांत वाई हवेली पैकीं एकसर ह्या गांवची जमीन हैबतराव भवानीशंकर व राघो व्यंकटेश देशपांडचे यांनीं वतनी होती त्यापैकी अर्धा चाहूर दिली त्याबद्दलचें भोगवटापत्र दिलें. [भानू फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद]

,, –अधिक आषाढ शु. ६ इ. १७७१ जून १८ (सु. इसने)

नाना व मोरोबा फडणीस या उभयतांचा कलह होता. गोपाळ नाईक तांबे यांनीं मध्यस्थी करून समाधान केलें. मोरोबा नानांचे घरास आले. नानांनी महादजी नारायण यानें इंदापूर परगण्यांत जकात घेतली होती ती परत घेऊन ऐवज माधारा दिला. जुने हिसेब व सर सालची दस्तकें आणविलीं. [पुरं. द. ३ ले. १०३]

श. १६९३ भाद्र. शु. ९ इ. १७७१ सप्टें १७ (जखर ७)
सखारामबापू नानांना लिहितात कीं, चिंचवडी नऱ्हेकर यांच्या सुनेनें जीव दिला. पण गोत्रजांस आपंक्त केले. शास्त्रमतें पाहतां हा दोष नाहीं. देव, रामशास्त्री यांस सांगोन मुक्तता व्हावी. यांची घराणीं थोर आहेत. [पे. द. ३९ ले. १३७]

श. १६९३ आश्विन इ. १७७१ आक्टो.
श्रीमंत रावसाहेब उभयता कोपरगांव कचेश्वरा नजिक गंगा दक्षिणतीरी नाना फडणीस वगैरे सर्व कारभारीसह आहेत [पे. द. २९ ले. ८२ त्र्यंबकरावहि आहेत [पुरं. भा ३ ले. १०४]

,, –कार्तीक शु॥ १ इ. १७७१ नवें. १३ (सु. ११७२ साबान ५)
आबाजीराव कृष्ण प्रतिनिधी यांनीं नानांना मौजे देवधे–तर्फ लाजे सुभा प्रांत राजापूर–हा गांव नूतन इनाम दिल्हा. [भानू फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद]

,, –कार्तीक वद्य ४ मंगळवार इ. १७७१ नोवें. २६
नाना फडणीस कोपरगांव, टोके, कचेश्वर येथें गेले होते ते परत आले. [पुरं. द. ३ ले. १०३ पृष्ठ ७४]

,, –मार्ग. वद्य १० इ. १७७१ डिसें. ३१ (इसने रमजान २४)
माधवरावांचें नानांना जिव्हाळ्याचें पत्र कीं, तुम्ही मेणवलीस केव्हां पोचला, पुण्यास कधीं जाल ते लिहून; गेल्यावर जो खर्च उणा केल्यानें कामास येई तो जरूर करावा. किल्ले, महाल, इमारती यांजकडील खर्चहि उणा करण्यास पेच नाहीं तो पाहून करावा. कमाविसींचें जमेचें कलम अधिक साधावयाचे तें साधण्यांत यावे. तुम्ही करीतच आहां. परंतु पुण्यास सत्वर जाऊन हें मनन करावे. ती० रा. दादांची प्रकृति कशी आहे? चौकीपहारा बंदोबस्त एकदोनदां मनास आणून दरजशी वाटेल तें नीट व्हावें. सिद्धटेकचे सुमारें जाणें होईल. [ऐ. पत्रव्यव. ले. १२७ पृ. १०६–०७ पृ. १२ श. १६८६ पहा]

श. १६९३ पौष वद्य ६ इ. १७७२ फेब्रु. २५ (११७१ सवाल १९)
—तर्फ जेऊरपैकीं खाडके येथील तनखा जहागीर नानांना मिळते. तसेंच—मौजे दसके गव्हाण -तर्फ जेऊर-हा गांव नाना व दादा फडणीस यांजला मिळतो [भानु फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद]

श. १६९४ श्रावण शुा अि. १७७२ ऑगस्ट
मोरो बल्लाळ यांचें वामनरावांस पत्र—
श्रीमंतांची मर्जी बरीच आहे. वाईंत जाऊन रहाणार. श्रीमंत रा. दादासाहेब व धाकटे राव व कारभारी व मोरोबादादा व नाना फडणीस झाडून सारे मुत्सद्दी जाणार ' [अै. लेख संग्रह ४ पृ. १९१४]

,, —श्रावण वद्य १० अि. १७७२ ऑगस्ट २३
मोरो बल्लाळ यांचें वामनरावास पत्र—
' श्रीमंताची शरीर प्रकृती प्रस्तुत बरीच आहे सांप्रत मुक्काम थेअुरास आहे. रा. नाना फडणीस समागमे होते. बाब्रूराव फडणीस वारले यांजकरितां माघारे आले आहेत. सुतक फिटले. क्रिया लौकिका प्रमाणें झाली. याअुपरी रा. नाना फडणीस जातील. ' [अै. लेख संग्रह ४–१९१७]

,, —आश्वीन वद्य १२ इ. १७७२ आक्टो. २३ (सु. ११७३ रजब २५)
तांदूळ १० खंडी फिरंगाण कल्याण प्रांतांतून पुण्यास बाळाजी जनार्दन आणतील. जकातीचा तगादा न लावणें. [खंड १० ले. ७९]

,, —कार्तीक शुा १४ इ. १७१२ नवें. ९
सखुबाई शिंदे–जनकोजीची आई–यांनीं प्रगणे नेवासे पैकीं मौजे वाघोली हा गांव स्वराज्य व मोगलाई दुतर्फा अमलासह व सरदेशमुखीसुद्धां नाना फडणीसांना इनाम दिला. सरदे०खीची अवल जमीन २ चाहूर आहे. [भानु फडणीस सं. बेलबाग-संग्रह अप्र. कागद]

श. १६९४ मार्ग. इ. १७७२ नोवें.

नाना जंजिरे येथील जानराव धुळप यांस कळवितात. आरमार वसईच्या बारियावर रवाना करावे. विजयदुर्गापासून सुर्तेपर्यंत छबिना करावा. [पे. द. ३६ ले. ६]

श. १६९५ भाद्र. वद्य इ. १७७३ सप्टें.

मकारनामकाचा (मोरोबा दादांचा) भरंवसा धरावयाचा नाहीं. नकारनामकाचा भरंवसा पुर्ता आम्हांस आहे; त्यांचे विचारे कर्तव्य ते करावें (= नकार नामक = नाना फडणीस) वामनराव पटवर्धन यांचें म्हैसकर यांस पत्र [ऐ. ले. सं. ४ ले. १२५९]

,, —भाद्र. वद्य इ. १७७३ सप्टें.

म्हैसकर यांचे पत्रांत सखारामबापूचें राघोबादादांस म्हणणें कीं, नारायणरावास मारले ही गोष्ट फटकाळ झाली. फडणीस लेखणीचे धनी, त्यांस बलावून सांगावें. लिहिण्याचें काम त्यांनीं केल्याखेरीज परिणाम नाहीं. आम्हास समाधान नाहीं. घरास जातो. [ऐ. ले. सं. ४ पृ. १९९१]

,, —भाद्र. वद्य. इ. १७७३ सप्टें०

राघोबादादांनीं, नारायणरावाच्या खुना नंतर गारद्यांकडून पेशवे झाल्याची ग्वाही फिरल्यावर कित्येक स्वकीयांस सरदाऱ्या, हुद्दे, बक्षिसें दिलीं. त्यात चिंतो विठ्ठल रायरीकर यांस कारभारी प्रमुख केले तरी जमाबंदी म्ह. मामलतीचा कारभार नानांसह करावा असेंच सांगितलें. चिकारनामक (चिंतो विठल) माहीत झाल्यावर नानास आंत घेणार नाहींतसे दिसतें [ऐ. ले. सं. ५ ले. १२६१; पृ. २०३७, २०४४, २०४९]

, —आश्विन इ. १७७३ अक्टो. १७

पटवर्धन सरदारांचे करतां नानांनी राघोबादादांची निखालसता केली व स्वतःची हमी दिली. त्यावरून परशराम भाऊंना

ससैन्य बोलाविले गेलें. मोरोबादादानींहि पटवर्धनांचे करतां मध्यस्थी केली [ऐ. लें. सं. ५ ले. १२६९ व ले. २०४१, १२६६ पृ. २०४१, २०५२ सखारामबापूहि पटवर्धनां करतां मध्यस्थ पृ. २०५६]

श. १६९५आश्विन शुा १० इ. १७७३ सप्टेंबर २५ (येथें सुहुर सन ११७४ आंकडयांत आहे.)

राघोबादादांच्या बरोबर नाना फडणवीस, सखारामपंत वरकड मुत्सद्दी मुहूर्तानें निघाले. पंचयात्रा करून साबाजी भोसल्यावर स्वारीस जातात. [ऐ. ले. सं. ५ ले. १२७०]

,, –मार्ग. शुा १ सोमवार इ. १७७३ नोवें. १५

सखारामबापू, परशरामभाऊ, नाना फडणवीस यांचें 'श्रीमंताच्या दौलत रक्षणेविषयीं एकीचा करार व गंगाबाईच्या रक्षणासाठीं उपाय योजना. सप्तऋषीचा किल्ला नकारनामक लेखक = नाना फडणवीस, यांचे स्वाधीन. तेथें गंगाबाईस नेण्याचा घाट. [ऐ. ले. सं. ५ पृ. २०९०]

,, –मार्ग. वद्य इ. १७७३ डिसें.

नाना फडणवीस यांनीं ज्यादा २५ विश्वासूक मर्द त्यांत १०–१२ बरकंदाज पाठविण्याबद्दल वामनराव पटवर्धन यांस सांगितलें [ऐ. ले. सं. ५ ले. १३०२]

,, –माघ शुा ११ (इ. १७७४ जाने. २१ रविवार)

मास्टिननें नानांना भेटण्याची इच्छा कळवून वेळ विचारिली. नानांनी, आज व उद्या उपास आहे, हें सांगून पुनः भेटीची वेळ कळवीन असें म्हटलें. नाना मोरोबादादांचे मुलाचे मुंजीकरतां आले आहेत. [मोस्टिनची रोज पृ. ३०४]

,, –माघ शुा १४ (इ. १७७४ जाने. २६ बुधवार)

मोस्टिन म्हणतो, नानांनी अद्यापहि मला भेटण्या बद्दल कळ-

विलें नाहीं. विचारलें असता नेहमींप्रमाणें काम असल्याचें सांगितलें. मला तर वाटतें कीं, नाना, पार्वतीबाई, गंगाबाई यांना सातान्यास नेणार आहेत आणि मुंज हें सगळ्या मुत्सद्यांना भेटण्यासाठीं योजलेलें एक निमित्त आहे. [मोस्टिरोज. पृ. ३०७]

श. १६९५ माघ व. ३,४ इ. १७७४ जाने. ३०,३१ सु. ११७४ जिलकाद १७, १८, १९

पार्वतीबाई, गंगाबाई, सखारामबापू व नाना फडणीस, आनंदराव राम, हरिपंत फडके असे पुरंदरास आलो. सर्वांची एकवाक्यता आहे. मोरोबा पुण्यास कामकारभार बाईच्या नांवें पाहतात. [पे. द. ३५ ले. २; खं. १० ले. ८७; ऐ. ले. सं. ५ ले. १३२२ पे. द ५ ले. ९, १२, २८]

,, –माघ वद्य ४ इ. १७७४ जाने. ३१ जिल्काद १८

नाना धारवाडकडे असलेल्या येसाजीराम ह्या अधिकान्यांस कळवितात कीं, तुम्ही आपलें तालुकियाचा बंदोबस्त राखावा व दादासाकडून वराता वगैरे आल्यास ऐवज एकंदर न द्यावा [पे. द. ३६ ले. ३६]

,, –माघ वा ७ अि. १७७४ फेब्रुवारी ३ (जिल्काद २१ अर्बा) नानांचे पुरंदरावरून बाबुराव आपटे यांना सातान्यास पत्र ‘ चार पिढया ज्यांचें अन्न भक्षिले त्यांचें सार्थक करावे हें चित्तांत आणून मी व सखारामपन्त गंगाबाईला घेऊन मोरोबा व हुजरातीच्या फौजेसह सातान्यास येणार होतो; पण बन्दोबस्तासाठीं येथें राहिलो. लौकरच सातान्यास येऊ. बापूंचा संशय घ्याल तर सर्वांनीं अभिमान सोडून खावंदाचे वंशाचे बरे व्हावे अशी अिच्छा आहे. तुम्हांस कैलासवासी श्रीमंतानी अितबारी समजून ठेवलें. त्यांचे वंशाचे कल्याणाकरितां प्राण गेलें तरी सार्थक असा चित्ताचा निश्चय करून बन्दोबस्तानें रहावे. साबाजी भोसले, वामनराव, त्र्यंबकराव मामा वगैरे सर्व सरदार व हुजरात सर्वांचे मानस एक आहे. [अै. पत्रव्यव. ले. १३८]

श. १६९५ फाल्गुन शु. ४ इ. १७७४ फेब्रु. १४ (सु. ११७४ जिल्हेज २)
नाना फडणिसास त्र्यंबकराव मामा लिहितात, आपणास सर्व तोडमोडी कळतच आहेत. या काली एक हाती, एक विचारे एक हुकमी सीय गैरसोय जाल्यानें आब राहून मजाहि पडते. [पे. द. ५ ले. ३९. पुस्तकांत ता. २८ पडली आहे]

,, –फाल्गुन शु. ५ इ. १७७४ फेब्रु. १५ (जिल्हेज ३)
साबाजी भोसले यांस सखारामपंत बापू लिहितात, तुमचे अनुसंधान बाळाजीपंत नाना फडणीस यां जवळ होते. खातरजमेची पत्रें पाहिली. या घरासी वडिलीं जोड केली ह्याचे सार्थक हेंच आहे. तरी यावें. त्याप्रमाणें साबाजी उदयीक कूच करून दर मजल येत. असें कळवितों [पे. द. ५ ले. २९]

,, –फाल्गुन शु. १० इ. १७७४ फेब्रु. २१ (सु. ११७४ जिल्हेज ९)
रा. बापू मोरोबादादा, हरिपंत फडके व नाना यांनीं एक विचार करून मनसबा केला. असत्या पदार्थी रा. बापू सर्वांस वडील, केलेले पुरुष, त्याणीच अवघे डोकीवर घेऊन करावे. आम्ही, नाना, तुम्ही, सर्व त्यास अनुकूल करून घ्यावे. दोहींकडील सरदार मंडळीस ममता शासन भय पूर्वक रक्षून वागवावे. असें त्र्यंबकराव मामा पेठे लिहितात [पे. द. ५ ले. ३३]

, -फाल्गुन शुद्ध १३ इ. १७७४ फेब्रु. २४. (सु. ११७४ जिल्हेज १२ गुरुवार)
सखारामबापूस व नानांस त्र्यंबकराव मामाचें म्हणणें उत्तमपक्ष नानास तेथें ठेऊन (पुरंधर पुण्यास) बरोबर हरिपंतास घेऊन यावें. सातार्‍याहून सर्वांस पत्रें आल्यास फारच उपयोगी साफ सरल पकेपणें मोहरेनिसी खत पाठविलीं तशी सर्वांस पाठवावी. [पे. द. ले. ५ ले. ३५]

श. १६९५ फाल्गुन वद्य २ सोमवार इ. १७७४ फेब्रु. २८

रा. मोरोबादादांचें नाना फडणीस यांशी बोलणें. पण जुन्नरास मुंजीस नानांचें जाणें होऊन तेथें निखालसता करून घेतली. पुढें सप्तऋषीस नाना व सखारामबापू जाणार आणि तेथून राघोबावर स्वारीचा बेत [ऐ. ले. सं. ५ ले. १३२९]

,, –फाल्गुन इ. १७७४ फेब्रु. मार्च

नाना, बापू, हरिपंत पुरंदरगडावर. तेथून नारो आपाजीमार्फत पुण्याचा कारभार चालतो. आनंदीबाई कडून गंगाबाईवर मारेकरी. पण तो कट उमगला आणि सातारचें जाणें रहित [ऐ. ले. सं. ५ ले. १३३०, १३४३]

,, –फाल्गुन इ.१७७४ फेब्रु. मार्च

राघोबादादा नबाब निजामुद्दौला–हैद्राबाद—यांस लिहितात, हलीचा बखेडा सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन याणी मुलाचें नांव करून केला आहे. त्यांचा पक्ष सोडावा. जे (मज) सरकारचें दुष्मन ते नबाबानी आपले दुष्मन मोजून त्यांचे पारिपत्यास सर्व प्रकारें (आम्हांस) अनकूल असावे. मागील जहाला प्रकार दोहोंकडे मनांत नसावा. आतां हा तह दोस्तीचा ठरला तो सेवटपर्यंत निभवावा. [पे. द. ५ ले. ३२]

,, –इ. १७७४

ह्या शक वर्षी गुरूचा राशिभेद होत नाहीं. त्यास ह्या वर्षास नांव काय द्यावे याबद्दल पंडीत व ज्योतिषी यांची सरकारवाड्यांत नानांनीं सभा घेऊन निर्णय केला कीं, लुप्त संवत्सर नव्हे. आर्यसिद्धांत सूर्यसिद्धांत, ब्रह्मसिद्धांत ह्यावरून नसलें तरी ग्रहलाघवाचे स्फुटगतीनें मात्र अधिसंवत्सर येतों.

(श. १६९३ त सूर्य कुंभराशिगत होता, श.१६९४ त मीनराशींत आला आणि १६९५ वर्षभर मीनराशींतच होता. व श.१६९६ मध्यें तो मेष राशींत गेला. अर्थात् १६९५ मध्यें राशीभेद नाहीं. मांगल्य कार्यें केल्यास प्रत्यवाय नाहीं. अधिमासाप्रमाणें हा प्रश्न होय) [पे. द. ४३ ले. ८०]

श. १६९६ चैत्र शु॥ २ इ. १७७४ मार्च १४

नानांचें वामनराव व परशरामभाऊ पटवर्धन यांस पत्र, योजिला मनसबा शेवटास न्यावा. आम्ही उभयतां आतां सातान्यास जाऊन राजमंडळाचें सरदार वगैरे सर्व तुम्हांस उपयोगी पडेसें करतों. सर्व एकचित्तें केलें. [ऐ. ले. सं. ५ ले. १३५१]

,, –चैत्र वद्य ३ इ.१७७४ मार्च ३० (आर्बा मोहरम १७)

नाना पटवर्धनांकडील वामनराव बाबा, परशरामपंतभाऊ व रघुनाथराव यांना लिहितात, बहुत सावध असावें. सर्वांचें मनोधारण रक्षावें. मान अपमान मनांत न आणून बातमी फार राखीत जावी. छाप्याचे वगैरे दगे होतील [ऐ. ले. सं. ५ ले. १३५५]

,, –नानांचें महादजींस पत्र, राघोबादादा खानवेशांतून पळत नर्मदापार जात असले तर जाऊं न द्यावे. तुम्ही व होळकर एक होऊन आडवें व्हावें. बलाबल पाहून हस्तगत करावें. न बने, तरी, तुम्ही त्यांस न मिळावें. रोख चुकावून एकीकडे व्हावें. तुम्ही जलदी येऊन पोहचावें. [म. शि. का. ले. १]

,, –चैत्र वद्य ७ इ.१७७४ एप्रील ३ (सु. ११७४ मोहरम २१)

विसाजीपंत लेले याची चौकी, कार्य पुर्ते खातरजमेचे जाले नाहीं त्यापक्षीं, ठेवावी. उठवूं नये. असें नानां फडणिसांचें नारोपंत नाना (तुळशीबागवाले) यांस पत्र [पे. द. ३५ ले. ५]

,, –अ. वैशाख वद्य ८ इ. १७७४ मे ३ (सफर २१)

तुकोजी होळकर नाना फडणिसास लिहितात, पत्रोत्तरें न पाठविलीं याचें कारण, महादजी सिंदे यांचे व आमचे चिताची सफाई नव्हती. त्याची दुरुस्ताई होऊन स्वामिसेवा एकरूपपणें करावी, या अर्थे निखालसता जाली. श्रीमंतांची–राघोबादादा –गांठहि अचानक पडली; निरोपाय जाणून ताकपीरहि भेटले; पुढें श्रीमंत इकडे येणार; येविसी चित्तात आमचे विषयीं विपर्यास आला असेल. पण येथील विचार आपल्याखेरीज नाहीं. जे कर्तव्य ते आपल्या लक्षानेंच होईल. [पे. द ५ ले. ४६; महा. का. ले. २]

श. १६९६ वैशाख इ. १७७४ मे

हरिपंत फडके यांचें वामनराव बाबा व परशरामभाऊ पटवर्धन यांस पत्र—कोणे अर्थें राघोबादादांच्या खेळाचा कज्जा तुटावा. बापू नाना सातारियास वस्त्रें आणावयास गेले. पत्रें आली [ऐ. ले. सं. ५ ले. १३७५. ह्या पत्राची पैवस्ती सु. ११७६ (?) रवल ४ आहे. वर्षाचा आंकडा अक्षरीं आहे.]

,, —आषाढ शु. १२ इ. १७७४ जुलै २० (सु. ११७५ जवल १०)

नाना श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधी यांस भोजनास निमंत्रणार्थ गेले. तेव्हां भेट आली रु. २५० [स. मा. रो. १ पृ. १५१]

,, —आषाढ शु. १२, वद्य ८ इ. १७७४ जुलै २०, ३० (जवल १०, २०)

माहादजी सिंदे बालाजीपंत नानांना लिहितात—

श्रीमंतास येथे पुस्तकाचें अगत्य आहे. त्यास त्या कामाकरितां खंडो व्यंकटेश व सदासिव राम शागिर्द पाठविले आहेत. तरी अलाहिदा यादी पाठविली आहे त्याप्रमाणें पुस्तकें व दयाराम भट वैद्य यांजकरवीं औषधें केलीं आहेत तीं व हरणें पुण्यातील व टोक्याहून नेली ती उभयताबरोबर सत्वर पाठऊन द्यावी. अगत्य जरूर जाणोन श्रीमंतानी शागीर्द पाठविले आहेत. [पे. द. ३२ व ५ ले. ४० व ५५]

,, —भाद्र. शु. ४ इ. १७७४ सप्टें. ९ (खमस रजब २)

नाना महादजींना म्हणतात—राघोबादादांचें राहणें (कचेश्वर) कोपरगांवीं गंगातीर येथें व्हावें. गंगापुरीं श्रीमंत मातोश्री, तें स्थळ त्यांस सोडणें नाहीं. तेव्हां (चांवडस) आनंदवलीस दादांनीं राहणें ठीक नाहीं. [महा. का. ले. ८]

,, —भाद्र. वद्य ६ इ. १७७४ सप्टें. २६ (रजब १९)

नाना रामशास्त्री यांस लिहितात. सांप्रत मनसुब्या होतात. चौघाचा उपरोध पडतो. ऐशास आम्ही आपले तर्फेनें शफतपूर्वक हेंच सांगतों की, संशय न धरतां, आपणहि शफतपूर्वक ईश्वर स्मरोन, आमची अगर दरबारांत मातबर आहेत त्यांची, मीड न धरतां, न्याय करून विल्हेस लावीत जावे. (असेंच पत्र सखारामबापूंचेंहि शास्त्री यांस आहे.) [पे. द. ५ ले. ५८]

श. १६९६ कार्तीक शुा १५ इ. १७७४ नोवें. १८

परशरामभाऊ पटवर्धन पुरंदर जवळच्या भिवडी मुक्कामाहून लिहितात–उभयता सरदार–शिंदे होळकर–यांचें मानस कीं, राघोबादादा वरील स्वारींत आतां नानाबापूनीं यावे. म्हणजे निभावणी होऊन मनसबा शेवटास जाईल. फौजेंत एकाच्या आळचांत सर्वांनीं चालावें असा कोणी नाहीं. तेव्हां सर्वांचे मतें उभयतां कारभारी गेल्या खेरीज मनसबा शेवटास जात नाहीं. [ऐ. ले. सं. ५ ले. १४०८]

,, –कार्तिक शुद्ध इ. १७७४ नोवें. प. पंधरवडा

नाना व सखारामपंत, गंगाबाई व स. माधवराव यांस दगा करून मारावें. राज्यांत खूळ करावें ह्या मनसब्याची वार्ता कळल्यामुळें नाना वगैरे सर्व पुरंदरावर माचीस सासवडहून गेले. [ऐ. ले. सं. ५ ले., १४०५]

,, –कार्तिक वद्य ५ इ. १७७४ नोवें. २३

नाना व बापू पुरंधरहून टोके येथें जातात. [पे. द. ५ ले. ६०, ६२; ऐ ले. सं. ५ ले. १४२३]

,, –कार्तीक वद्य ६ गुरुवार इ. १७७४ नोवें. २४

बाळाजी जनार्दन कोन्हेरराव पटवर्धनांस लिहितात, राघोबाच्या पिछावर औरंगाबाद ब-हाणपूरकडे जाण्यासाठीं मी व बापू काल रात्रौ डेरा दाखल जालों (२३।११।१७७४ कार्तीक वद्य ५) हें जें 'आमचे जाणें आपण घडविलें' [ऐ. ले. सं. ५ ले. १४१०]

,, –मार्ग. शुद्ध इ. १७७४ डिसें.

नाना व सखारामबापू याणी सेंदवेचे बारीनें–नर्मदेपार–भिल्लांनी हरिपंत व धोशाच्या फौजेशी पिछाडीकडे झांबडाझांबड केली म्हणून व भिल्लांस आणून समाधान करण्याचा यत्न केला. [ऐ. ले. सं. ५ ले. १४१८; इच. इ. ले. ११६]

१६९६ मार्ग. शु. २ इ. १७७४ डिसें. ५ (सवाल १) नागपूरहून बाबुराव विश्वनाथ वैद्य नानांना लिहितात; महमद इसफ, सेनाधुरंधर म्हृ. मुधोजी इत्यादिकांनी राघोबाकडे जावें असें योजिलें. त्यांची व साबाजीची (सेनासाहेब सुभा) लढाई जाली. साबाजी उधळले. सेनाधुरंधराचे पारिपत्य करून भेटीस यावे हें इच्छितात. यांची चित्तवृत्ति आपणांकडे आहे. परंतु आवघडोन कु–पेचीं पडले आहेत. [पे. द. ५ ले. ६० असेंच पत्र बापूंसहि आहे. ले. ६२]

,, –मार्ग. शु. ४ इ. १७७४ डिसें. ७ (सवाल ३ नागपूर) बाबुराव वैद्य नानांना लिहितात, स्वामीचे आज्ञेसिवाय येथें दुसरें कांहींच नाहीं. रामटेकी पानें पाठविलीं आहेत. [पे. द. ५ ले. ६५]

,, –मार्ग. शु. १३ इ.१७७४ डिसें. १५ (सवाल ११) नानांचा मुक्काम सखारामबापूबरोबर औरंगाबादेजवळ आहे. नबाबाची भेट होईल. [पे. द. ५ ले. ६८]

,, मार्ग. शुा १४ इ. १७७४ डिसेंबर १६ नानांचा बापूसह टोंके येथें मुक्काम [ऐ. ले. सं. ५ पृ. २२२७ ले. १४२३]

,, –मार्ग. इ. १७७४ डिसें. बापू व नाना कासारबारी उतरून खाली गेले. त्यांचे मार्गें नबाब तीन कोसांवर आहेत. [पे. द. ३५]

,, –मार्ग. इ. १७७४ डिसें. मोरोबादादांनीं पुरंधरगडच्या गडकऱ्याशीं कांहीं गुप्त संधान केलें. हें नाना व बापू यांस समजतांच त्यांचा प्रमुख शिंदे याचें पारिपत्य करून बंदोबस्त केला. [ऐ. ले. सं. ५ पृ. २२१६]

,, –पौष शुा ७ भानूवासर इ. १७७५ जाने. ८ पूर्वी ८–१५ दिवस नाना फडणीस यांचे स्त्रीचें वर्तमान आलें. २।३ दिवस गुंता होता. [ऐ. ले. सं. ५ पृ. २२७५]

श. १६९६ पौष शु. ८ इ. १७७५ जाने. ९
नाना व सखारामपंत बापू फौजसुद्धां बऱ्हाणपुरचे पुढें १६ कौसावर फैजपूर येथें आहेत. [ऐ. ल. सं. ५ ले. १४२८; का. प. या. पृ. ४८०]

,, –पौष वद्य ४ इ. १७७५ जाने. २० (सु. ११७५ जिल्काद १७)
निजाम अलीखान नानांना सखाराम बापूबरोबर भेटले. त्या-वेळीं कमाविस भेट वस्त्रें ६ (रु. २७०॥ व ५२५) आलीं. [स. मा. रो. १ पृ. २८१ ऐ. ले. सं. ५ पृ. २२८६]

,, –पौष वद्य इ. १७७५ जाने.
नाना यांची बापूंच्यासह राघोबादादांशी भेट श्रीभीमातीरीं झाली. ६ दिवस समागमें होते. वामनराव परशरामभाऊ, रघुनाथरावही पटवर्धन मंडळीहि भेटीचे वेळीं होती. [ऐ. ले. सं. ५, पृ. २२८३ अमावस्येस उभय कारभाऱ्यांचा मुकाम गंगेवर]

,, –माघ शु. १२ इ. १७७५ फेब्रु. १२
नाना मेणवलीस काल गेले आहेत. आल्यावर १५० रावतांस निरोप देऊन रवाना करतो. [ऐ. ले. सं. ५ पृ. २२८९–९१, २२९४; –९६]

,, –फाल्गुन शुा ३ इ. १७७५ मार्च ४
नाना मेणवलीस ग्रहणास गेलें] ते तृतियेस येणार (माघांत पौर्णिमेला चंद्रग्रहण होतें.) माघ शु. १२ स गेले. [ऐ. ले. सं. ५ पृ. २२९८]

श. १६९६ फाल्गुन शु. ८ इ. १७७५ मार्च ९ (सु. ११७५ मोहरम ६)
इंग्रज साष्टीस येऊन लागला आहे. एक ह. माणूस फार करून बरकंदाज पाठवावे. बरोबर चार सरदार व कारकून असावा. खर्चाविण चिंता न करणें. म्हणून सदाशिव रघुनाथ खाडिलकर यांजमार्फत वासुदेव अनंत यास नानांचें पत्र [स. मा. रो. २ पृ. २१]

श. १६९६ फाल्गुन लढवाई जें सामान व माणूस असेल तें देऊन, शत्रूचें पारिपत्य होऊन, पराभव जाला पाहिजे. न्यून पडो न देणें. खातरजमेनें भरती करणें. आनंदराव धुलप व सरदार भवानजी कदम व गोविंदराव हरी वगैरे एकदिल होऊन लगट करणें. १० ह. रु. ची हुंडी पाठविली आहे. [स. मा. रो. २ पृ. ११]

,, –बाळाजी जनार्दन यांस रा. रावसाहेबांचें, रायाजी पवार हा छावणीचे हंगाम समयीं न पुसतां निघोन आला. करतां त्याचा सरंजाम कुल जप्त करण्याबाा पत्र [इ. सं. पे. द. नि. का. पृ. ६१ यादी १२]

श. १६९७ चैत्र व. १४ इ. १७७५ एप्रील २८
बापू व नाना यांनीं पंधरा दिवसांत तुमच्या पाठीमागील करवीरांकडील फौजेचा त्रास होतो त्याचा बंदोबस्त करतो म्हटलें व पत्रेंहि तशीं लिहिलीं. पण उपसर्ग थांबत नाहीं. उलट वाढतो [इच. इ. ले. १२३]

,, –वैशाख शुा १५ इ. १७७५ मे १५
नाना फडणीस अनुबाईंस लिहितात–करवीरकरांचे उपद्रवाविषयीं लिहिलें तरी कोन्हेररांव यांस ६ ह. फौजेनिशी पाठविलें. लवकरच बंदोबस्त होईल जून १ = जेष्ठ शुा १ कोन्हेरराव आले ले. १३६ [इच. इ. ले. १३०]

,, –जेष्ठ वद्य ६ इंदुवासर इ. १७७५ जून १९
पुरंदरगडावर सखारामपंतांनीं घर बांधले आहे. श्रीमंत रा. नानानीं बांधिलें नाहीं. व बांधावयाचें नाहीं हा त्यांचा निश्चय. मोठ्या मनसब्याचें बोलणें चालणें झाल्यास किल्यावर चार दिवस यावें. किरकोळ जाबसाल चिठीनें व पुण्याहून व्हावा. असें नानांचें मत. नाना काल जेष्ठ वाा ४ पुण्यास गेले. पंधरा दिवस राहून आषाढ शुा ५, ६ स पुरंधरास आले व पुण्यास गेले. फार करून श्रावण मासाचा देकार करून येतील [ऐ. ले. सं. ५ पृ. ४१, ४३, ४७, ४९]

श. १६९७ ज्येष्ठ वद्य १२ इ.१७७५ जून २४ (सु. ११७६ रखर २५)

नाना व बापू यांनीं सेनासाहेब सुभा हें पद साबाजी भोसले नागपूरकर यांस छत्रपतींचे आज्ञेसह बहाल केले; श्रीमंतांचीं पत्रें असावीं ह्या आक्षेपावरून तींहि पाठविलीं व फौजेचा व मुलखाचा बंदोबस्त सांगितला. [स. मा. रो. १ पृ. १९८]

,, –आषाढ शु. इ.१७७५ जुलै

महादजी शिंदे ह्यांची पटवर्धनामार्फत मध्यस्थी. त्यावर नानांचें म्हणणें–गुदस्ता श्रीमंत दादा नर्मदा उतरोन गेल्यापासून बंदोबस्त करून देतीलसा भरंवसा आम्हास शिद्यांचा. त्या अन्वये द्यावयाचें बोलणें चालणें झालें. दादांस द्यावयाची निभावणी केली असतां निखालसता त्यांजकडून न झाली. मागती श्रीमंत तिकडे गेले (गुजराथ). हरीपंतांच्या सरदारांच्या भेटी झाल्यानंतर एकरूप साऱ्यांनीं होऊन पुर्तेपणें बंदोबस्त होईसा करावा ती गोष्ट न केली. होळकर तिकडे राहिले. शिंदे उज्जनीस. तत्राप आम्ही शिदखेड वगैरे दिलेच. मातबर दरम्यान पडले असतां कोणतीहि गोष्ट शेवटास न गेली. आतां आपणाकडे बोलतात. ते पक्के असल्यास त्यानी मसलतीचा भार घ्यावा. इकडे बलाविल्यानें इकडे यावें. गेली गोष्ट सुधारावी; म्हणजे आपली रदबदल न चालेल असा विचार काय आहे. दारमदारचा प्रकार करावा तरी मसलतीच्या उपयोगी न पडतां भांडावयासी जागा करून ठेवावी हे प्रकार त्यांचें (शिंद्याचे). त्यांनींच मनापासून नीट केल्या होईल. असें जाहल्यास सोईनें सर्व प्रकार घडतील [ऐ. ले. सं. ५ ले. १४८७]

,, –आषाढ शुद्ध १२ इ. १७७५ जुलै १० (जवळ ११)

गुदस्तां भाद्रपदापासून कित्तुरकरांनीं लबाडी केली त्यावर नानांनी ४०।५० ह. रु. खर्च झाले तरी देऊं. प्रसंग मोठा आहे असें सांगून तयारीसाठीं पत्रें लिहिलीं [ऐ. ले. सं. ५ ले. १४८४, १४८३. नाना नवमीस पुण्यास गेले जुलै ७–१४८६]

श. १६९७ आषाढ वद्य ७ बुधवासर इ. १७७५ जुलै १९

नाना महादजीसंबंधानें पटवर्धनांच्या कारकुनाजवळ सांगतात. मातबर सरदार, मर्द माणूस, इतक्या गोष्टी समजोन गुदस्तांपासोन त्यांजकडील लक्ष राखलें व देऊं घेऊं केलें. त्यांचे तीन चार मध्यस्थ झाले; त्यांच्या हातचिठ्ठ्या आल्या. त्या भरंवशावर १५ ल. रु. त्यांच्या–शिद्यांच्या–वचनावर श्रीमंत दादांस व खुद्द ५० ह. खर्चाची ओढ म्हणून दिले. असें असतां गुणास चुकले नाहींत. हरीपंतास वचनप्रमाण देऊन सवेंच आपण उज्जयनीस गेले. त्यांच्याच बाळाराव ह्या वकिलावर त्यांचाच विश्वास नाहीं. वचनाचा भरंवसा कशावरून. ती खातरजमा करून घ्यावी. [ऐ. ले. सं. ५ पृ. २३६७–८]

,, –श्रावण शु. ८ इ. १७७५ आगष्ट ४ (सु. सीत श्रावण जखर ६)

नानांनीं पटवर्धनांस समज देण्याकरतां हरिपंतास पत्र लिहिलें– सरकारांत ऐवजाची ओढ मोठी. यास्तव महालानिहाय, देखील सरंजाम, जमीदारांचा हक्क रुसूम एक साला, देखील इनामगांव व जमीनी, घ्यावयाचा अशीं सरदारांस पत्रें गेलीं. त्याप्रमाणें सखारामपंत, महादाजी नीळकंठ, रास्ते यांनी आपले महालाचा ऐवज कांहीं आणविला. पण पटवर्धनांनी तपशीलच लिहिला ! [ऐ. ले. सं. ५ ले. १४९७]

,, –श्रावण शुद्ध इ. १७७५ आगष्ट

शिंदे यांचे मध्यस्थीचा प्रकार–ते बहुचक आहेत. त्यांचेप्रमाणें त्यांसी वागणी करावी लागेल. दोन सालचा सरंजामाचा पैसा फौज न ठेवतां खाली पैका घातला आहे. तत्राप आम्ही आज जसें म्हणतील तसें कबूल करूं. यांजकरतां मध्यस्थीस पडूं नये, असें नाना म्हणाले. [ऐ. ले. सं. ५ ले. १५०२]

श. १६९७ श्रावण शु. १५ इ.१७७५ आगष्ट ११ (राजशक १०२ गुरुवासर)
शिव छत्रपतींची बाळाजी जनार्दन यांस आज्ञा जे, व्यंकटराव नारायण यांची गांव खेडीं कांहीं कजियामुळें गुदस्ता (करवीर) सरकारांतून जप्त केली होतीं. त्यास तुम्हाकडून विनंती जालेवरून पेशजीप्रमाणें वतनबाब व खेडीं स्वाधीन केली. तरी त्याविषयीं तुम्हाशीं कांहीं बोलणें आहे. तोंपावेंतों त्यांजकडून सरकार तालुकेस हरएक अमर्यादा न जालेस उपद्रवाविषयीं आज्ञा होणार नाहीं. [ऐ. ले. सं. ५ ले. १५०४]

,, –भाद्र. वद्य १ इ. १७७५ सप्टं. १० (सु. ११७६ रजब १४)
महादजी शिंदे यांसी करार—सरकार लक्ष तुम्ही परिछिन्न धरावें, दादासाहेबांचें लक्ष सर्वात्मना धरूं नये, दादांकडे कागदपत्री राजकारणें असतील तीं बिलकूल मोडावीं. शपथपूर्वक मनांत धरून हें करावें. [महादजी कागद० ले. १४ पृ. १६]

,, –भाद्र. व. ७ इ. १७७५ सप्टें. १६ (सु. ११७६ रजब २०)
बाळाजी जनार्दन यांनी मोरो बापूजी यांस पत्र दिलें कीं, सालगुदस्ता मुंबईकर इंग्रजाकडील काफील सुवर्णदुर्गचे आरमारानें पाडाव करून आणलें. व कपितान व इंग्रज ४ अटकेत ठेविले, त्यांस सोडून रु. ३६० आंखाचीं वस्त्रें व खर्चास रु. २० देऊन स्वतंत्र गलबतानें मुंबईस पोंचवावे. [स. मा. रो. २ पृ. २७]

,, –आश्वीन वद्य ११ इ.१७७५ आक्टो. २० (सु. ११७६ साबान (२४)
लखा ठाकूर नाशीककर हा त्र्यंबकेश्वराचे देवालयांत जाऊन अभिषेक करूं लागला म्हणून प्रथम त्यांस अटकेंत ठेविला व गुन्हेगारी एक ह. लाविली. [साबान १५] पण गुन्हेगारी मना केली. व ठाकुरास सोडून देण्याबद्दल सनद [स. मा. रो. ३ पृ. २५६]

श. १६९७ कार्तिक शुद्ध १७७५ आक्टो. दुसरा पंधरवडा
बाळाजी जनार्दन यांनीं पांडुरंगराव पटवर्धन यांस, सरंजाम महालच्या जमीनदारांच्या हक्कासह एक साली ऐवजाची, इतके रोज राहिला हेच अपूर्व, असें लिहून, मागणी केली. [ऐ. ले. सं. ५ ले. १५१८]

„ –कार्तिक शुा ७ अि. १७७५ आक्टोबर ३१ (रमजान ६)
मुधोजी भोसले सेना धुरंदर–नागपूर–यांस नानांचें पत्र– महमद अिसफ यांस ताजखान रोहिल्या करवी धरून बेडी घालून शिवनीस आणला. फार सरस केले. आपला व श्रीमंतांचा पूर्वी पासून घरोबा, स्नेह व एकात्मता, तेच लक्ष आपले आहे. त्याच रीतीनें येथून दुसरा विचार नाहीं. अलंकाराचा विषय –(श्रीमंत छत्र० स्वामींच्या राणीच्या पायाच्या सोन्याच्या साखळ्या प्रसादिक म्हणून आपण मागविल्या. आम्ही महाराजांकडे विनंती केली. आल्या कीं, पाठवितों. ले १४९). लिहिलें हें उचित. [ऐ. पत्रव्य. ले. १५०]

„ –कार्तिक वद्य १७७५ नोवेंबर पहिला पंधरवडा.
नाना मेणवली येथें गेले. [ऐ. ले. सं. ५ पृ. २४२१]

„ –मार्ग. शु. १ इ. १७७५ नोवें. २४ (सु. ११७६ रम ३०)
नानांनीं महिपत कृष्ण साठे यांजकड मिरजेहून रत्नागिरीस तोतया पाठविला. शिधा मध्यमप्रतीचा. [स. मा. रो. २ पृ. ११७]

„ –मार्ग. शुा ४ इ. १७७५ नोवें. २६ पूर्वी
महंमद युसफ–नारायणरावाचा एक मारेकरी म्हणतो कटाचा म्होरप्या शिरोपस्थ शिवाजी कान्हो खळदकर. तो वरकडाची नांवें सांगे. एक नाना फडणीस, मामा, हरिपंत यांस मात्र ठाऊक नाहीं. वरकडांस नारायणरावास धरणार वगैरे हें माहीत होते. [इ. सं. ऐ. चर्चा पृ. ८ श्रावण अखेर ते मार्ग.]

१६९७ मार्ग. शुा १२ सोमवार १७७५ डिसें. ४ (सु. ११७६ सवाल १०)
नाना स्त्रीच्या वर्षश्राद्धासाटीं आजच मेणोलीस गेले. पौर्णिमा करून येणार. ११॥ ह. रु. च्या वराता करूं त्याप्रमाणें यावे असें नानांनीं पटवर्धनांस सांगितलें. [ऐ. ले. सं. ५ पृ. २४३७]

,, –मार्ग. वद्य ७ इ. १७७५ डिसें. १४ (सवाल २०)
नाना परशरामभाऊ पटवर्धनांस लिहितात, सरदारीचें थोरपण तुम्हांकडे. सरकारांत पैक्याची ओढ. यामुळें हरएक तऱ्हा काढावी लागते. पाटील कुलकर्णी यांचे उत्पन्न व सावकार वाणी उदमी यांस शेंकडा १ रु., रयतीस दरसद्दे रु. १० कमाल जमिनीवर; अशी नजर पट्टी आकारली. तुमचे कडील पैका यावयास हिसका पडला त्यांनें काम नासतें. [ऐ. ले. सं. ५ ले. १५४८, १५५५ पौष शुा ९ डिसें. ३०, ले. १७६२ पौष व. ३ बापूहि पटवर्धनांवर रागावलें पृ. २४८१]

,, –पौष शुा ९, १० इ. १७७५ डिसें. ३०, ३१
इंग्रजाकडील वकील कर्नल आपटम् येऊन पुरंदरगडाखालीं डेऱ्यांत कारभारी–बापू व नाना आणि स. माधवराव यांच्या भेटी झाल्या. सर्वांनीं पेशव्यांस नजर केलीं. ह्या भेटीतील युरोपियन पोषाखाचा परिचय दृष्टीस असावा म्हणून नानांनीं आधीं तशी व्यवस्था केली होती. [ऐ. ले. सं. ५ ले. १७६४]

,, –माघ १७७६ जाने.
नाना मोरोबादादाच्या घरीं पुण्यास गेले. [ऐ. ले. सं ५ पृ. २४९६]

,, –फाल्गुन शुा ३ गुरुवार १७७६ फेब्रु. २२
नबाबाकडील वखारुदौलाची पुरंदर गडाखाली डेऱ्यांत भेट व वरणगांव वगैरे परगणे खानदेशांत देऊन निरोप. [ऐ. ले. सं. ५ पृ. २५३५]

,, –फाल्गुन शुा ८ इ. १७७६ फेब्रु. २६ (सु. ११७६ मोहरम ६)
श्रीमंत नाना खलबतांमधील बातमी अंशेकरून सांगतात. [ऐ. ले. सं. ५ पृ. २५३६] बातमी वरचेवर कळावी म्हणोन श्रीमंत रा. नानांनीं आज्ञा केली. [पृ. २५४५]

श. १६९७ फाल्गुन शुा ९ इ. १७७६ फेब्रु. २७ (सु. ११७६ मोहोरम ७ पार्)
नानांनीं पांडुरंगरावास क्रोधानें आज्ञा केली कीं, गांव वोस असले तरी वरात गांवावर द्यावी, वस्ती जाहल्यावर वरात घेतील [ऐ. ले. सं. ५ ले. १८१४]

" —फाल्गुन शुा १४ इ. १७७६ मार्च ४ (सु. ११७६)
श्रीमंत राजश्री नाना पुण्यास गेले. पंधरा दिवस संवत्सर प्रतिपदे पर्यंत राहतील. [ऐ. ले. सं. ५ ले. १८१८]

" —फाल्गुन वद्य १ इ. १७७६ मार्च ६ (सु. ११७६ मोहरम १५)
इंग्रजाकडील वकील कर्नेल इपटेन यांजकडून सखारामबापूस ३८१॥ व बाळाजी जनार्दन यांस ३६८ रु. ची शाल वगैरे वस्त्रें भेट आली. [स. मा. रो. २ पृ. ६०]

श. १६९८ वैशाख शुद्धपक्ष इ. १७७६ एप्रील दु. पंधरवडा
नाना फडणीस यांस विष्णु नरहर व खंडेराव निंबाजी हे उभयतां दगा करावा अशा मतलबांत होते. तें वर्तमान नानांस कळतांच विष्णु नरहर यास शृंखला जोडून सिंहगडावर आणि खंडेरावास रुद्रमाळेवर घातलें. विष्णु नरहरचे सातारचे घरदारहि जप्त केलें. [ऐ. ले. सं. ५ ले. १८३९]

" —ज्येष्ठ शुा १७७६ मे दु. पंधरवडा
श्रीमंत राजश्री नाना परवां पुण्यास गेले आहेत. पंधरा दिवसांत येतील. रहाणारहि होते; परंतु होळकरांचे भटीकरितां पुरंदरास जाणार [ऐ. ले. सं. ५ पृ. २६१२–१७,–२०]

" —ज्येष्ठ वद्य ६ भृगुवासर इ. १७७६ जून ७
नाना कोन्हेरराव पटवर्धन यांस लिहितात; पण रामचंद्र गणेश व विनायकपंत फडणीस यांचे बनत नाहीं; आणि रामचंद्र यास पत्र न लिहितां विनायकपंतास नानांनी उत्तर पाठविले. नानांचे स्त्रीस समाधान नाहीं. [ऐ. ले. सं. ५ पृ. २६२१]

श. १६९८ ज्येष्ठ वद्य १३ इ. १७७६ जून १४ (सु. ११७७ रखर २६)
रघुनाथराव दादासाहेब यांजकडील मराठे सरदार, कारकून, शिष्ये इत्यादींचीं घरें तालुकेहाय कोकण येथें आहेत. त्यांनीं कोणी दादांच्याकडे जाऊं नये; गेल्यास त्यांची घरें वगैरे जप्त करण्या बद्दल वसई, कल्याण, नैरले, राजपुरी, बेलापूर, बीरवाडी वगैरे ठिकाणदारांस १८ सनदा नानांनी दिल्या [स. मा. रो. १ पृ. १३२]

,, –आषाढ शुा ३ इ. १७७६ जून १९
नाना प्रातःकाळींच किल्याखालीं नारायणा जवळ आले. श्रीमंतांचे डेरे दिले होते. त्यांत सरकारच्या भेटी झाल्या. एक प्रहरपावेतों मोठी दाटी झालीं अनेक सरदार लोक आले होते. [ऐ. ले. सं. ५ ले. १८५३]

,, –श्रावण शु. १० शुक्रवार इ. १७७६ जुलै २६
नाना, पांडुरंगराव पटवर्धनाबद्दल त्यांचें पत्र पाहून म्हणतात, शिपाईगिरीचें कसम जेथें तेथें लिहिण्याचें कसब मनसब्याचें उणें असतें. येथें–पांडुरंगरावाचे ठिकाणीं–दोन्ही कसबें पूर्ण आहेत. [ऐ. ले. सं. ६ पृ. २६५६]

,, –श्रावण शुद्ध १४ इंदुवार इ. १७७६ जुलै २९
नानांची पत्नी पुण्यांत बरेच दिवस आजारी होती तीस देवाज्ञा झाली [ऐ. ले. सं. ६ ले. १८७५. जंत्रींत १४ चा क्षय आहे.]

,, –अधिक भाद्रपद शु. १४ इ. १७७६ आगष्ट २८ (रजब १३)
नानांचें शिवाजीपंत म्हैसकरास मिरजेस पत्र तुम्ही गेल्यावर फार दिवसांनी पत्र पाठविलें. तें असों. लवकरच फौज जमा करावी. म्हणजे मनसब्यास उपयोगी पडेल. त्रिवर्ग—रामचंद्र गणेश, परशराम भाऊ आणि कोन्हेरराव व कृष्णराव—एकत्र जाहल्यास उत्तम; न होय तर भाऊ व रामचंद्र यांनी जाऊन कोल्हापूरचा कारभार कळेल तैसा विल्हे लावावा. चहुंकडे खुळें कामाचीं नाहींत. [ऐ. ले. सं. ६ पृ. २६६६]

१६९८ भाद्र. शु. ५ इ. १७७६ सप्टेंबर १८
नाना व महादजी शिंदे यांची कोढिता जवळ भेट [ऐ. ले. सं. ६ ले. १८८९]

(१) १६९८ भाद्र. वद्य ७ इ १७७६ आक्टोबर ४ (सु. ११७७ साबान २०)
नानांचे नगरच्या किल्लेदारांस सखाराम हरीच्या कैदेसंबंधींत पत्र–फितुरीमुळें आपणांकडे कैदेंत ठेवण्यास पाठविले आहे. चौकीवरची माणसे नेहमी बदलीत जाणें. भोजन देत जावें. प्रभूकारकुनास जवळ जाऊं देऊं नये. मराठा माणूस खिजमगतीस द्यावा व तो १५ दिवसांनीं बदलीत जाणें. कोठ कोठे ठिकाण त्यांत टेवावे. बाहेरून कुलूप घालीत जाणें. धोत्रें शेलापागोटें लागल्यास देणें. जेवणाची वस्त्रपात्राची आबाळ न करणें याचे गुण तुम्हास ठाऊकच आहेत. खेळ्या राजकारणी आहे बेडी असो देणें. [स. मा. रो. ३ पृ. ७४ समक्ष परवानगी.]

,, –आश्वीन शु. १५ इ. १७७६ आक्टोबर २७
नानांचे परशरामभाऊ पटवर्धनांस पत्र नरसिंगराव धायगुडे हरिपंताजवळ पाहिजेत. घाटाची बंदोबस्ती करून खालीं लौकर उतरून महाडाचे सुमारे यावें. आंबेघाटावर लोक ठेवणें असल्यास शिराळेकर यांस ठेवावें. तोतयाचा शह राजमाचीकडे आहे. त्या पक्षीं त्रिकडे तुम्हांस फारसा गुंता पडणार नाहीं. कोलापुराकडील घाटानी माणूस व राऊत तोतयाकडे जातात त्यांची बातमी राखून कोहींचीं डोकीं मारावीं. तोतयाकडे चाकरीस गेलेल्यांची बायकामुलें धरावीं, घरें लुटून जाळावीं. आम्ही शास्त्रार्थ मात्र लिहितो. परंतु सत्वेंच आम्हांकडील सरदारांची जात चालली यास उपाय काय! [ऐ. ले. सं. ६ ले. १९०६]

,, –कार्तिक शु. १ इ. १७७६ नोवें. १२ (सु. ११७७ रम २९)
नानां यांनी कोकणांत तोतयाचे पारिपत्यास बापूजी शिंदे यास, २०० बरकंदाज चांगले मर्द ठेवणें व पारिपत्य करणें म्हणून सनद पत्र दिलें. हजीरी अंताजी रघुनाथ. [स. मा. रो. २ पृ. १२२]

श. १६९८ कार्तिक शु. १ इ. १७७६ नोवें. १२ (सु. ११७७ रमजान २९)
नानांनीं महादजी शिंदे देशीं आले सबब वैरणीसाठीं परगणे अकोले पैकीं मौजे चास व गणोरे येथील ताकपीर यांजकडील कुरण–शिंदे परत गेल्यावर ताकपीर यांस द्यावयाचे. अशा बोलीनें सध्यां देविलें. [स. मा. रो. १ पृ. २२१]

–कार्तिक वद्य ४ इ. १७७६ नोवें. २९ (सवाल १७)
नाना, महादजी शिंदे व आंग्रे रघोजी यांस सामोरे गेले. भेटी झाल्या. तोतया पकडल्या बद्दल आनंद. सामोरे जाण्याची चालच होती [ऐ. ले. सं. ६ ले. १९२४]

,, –मार्ग. व. २ इ. १७७६ डिसें. २६ (जिलकाद १४ बुधवार)
नाना पुरंदरास गेले. शिंदे, आंगरेहि गेले, [ऐ. ले. सं. ६ ले. १९५३]

,, –मार्ग. वद्य ५ इ. १७७६ डिसें. ३० (जिलकाद १८ इंदुवासर)
नाना वांईस लग्नास गेले आहेत. [ऐ. ले. सं. ६ ले. १९५८]

,, –मार्ग. व. ८ इ. १७७७ जाने. २ (सु. ११७७ जिलकाद २१)
नानांनी रु. ३०९, प्रत्येकी वेतन, या प्रा` १५०० राऊत म्हणजे ४।। लक्ष उत्पन्नाचे महाल लावून नवीन ठेवण्याची यादी केली. हे महाल सखारामबापू यांचे महालाप्रमाणें असावे असेंहि केले व सनदा देवाव्या हें लिहिलें. [पे. द. ५ ले. ८४ परिशिष्ट पु ७६]

,, –पौष शु. ४ इ. १७७७ जाने. १३ (सु. ११७७ जिल्हेज ३)
बाळाजी चनार्दन भानू खोत मौजे इलणे (तर्फ केळशी ता. सुवर्णदुर्ग) यांच्या विनंतीवरून इलणे गांवची खोती भानूंची भानूकडे सरकारांकडून चालती केली. मध्यंतरी बांधेकरी खोती चालवीत होते. तरी सालमारी पाहणीमुळें ठरेल ती जमाबंदी वसूल घेणें. [स. मा. रो. २ पृ. २२०]

,, –पौष शु. १५ गुरुवार इ. १७७७ जाने. २३
नाना मेणोलीस चंद्र ग्रहणासाठीं गेले [ऐ. ले. सं. ६ ले. १९८७]

श. १६९८ पौष व. ३० इ.१७७७ फेब्रु. ८ (सु. ११७७ जिल्हेज २९)
बाळाजी जनार्दन यांनीं धारवाड वगैरे महालांचे अंमलदारांस. तेथील उत्पन्न तिकडे गेलेल्या फौजेच्या खर्चास देण्याविषयीं व हैदराकडे गेलेल्या जमीनदारांचे बंदोबस्ताकडे खर्च करण्यास आज्ञा दिली आहे. [स. मा. रो. १ पृ. १२]

,, -माघ शु. ९ इ. १७७७ फेब्रु. १६ (सु. ११७७ मोहरम ७)
नानानीं व सखारामबापू व जनार्दन आप्पाजी इ. नीं रावसाहेब यांचे चूडाकर्म प्रसंगी आहेर केले [स. मा. रो. १ पृ. ९९]

श. १६९९ चैत्र शु. २ इ. १७७७ एप्रील ९ (सफर ३०)
नानांनी गंगाधरराव पटवर्धनांस कळविलें, करवीरकर, कित्तूरकर देसाई व कुमदान ह्यांच्या बंदोबस्तासाठीं, रामचंद्र व बाजी गोविंद (जोशी) तिकडे आहेत च. शिवाय हरिपंत, जाफरुद्दौला धौशा, महादजी शिंदे ह्यांस मदतीस पाठवितो. [ऐ. ले. सं. ६ ले. २०८१]

,, –चैत्र शु. इ. १७७७ एप्रील पहिला पंधरवडा
नानांनीं महादजीस कळविलें, आपलें कूच व्हावें, तोफांची तयारी सरंजाम सुद्धां करविली आहे. कूच जहाले की तोफा येऊन पोचतील. [महा. का. ले. ३५. महादजींची करवीरवरील स्वारी]

,, –चैत्र शु. ९ इ. १७७७ एप्रील १६ (रवल ७)
नानांचें गंगाधरराव पटवर्धनांस पत्र, रामचंद्र गणेश व बाजी गोविंद हे मिरजप्रांतीं फार उपसर्ग देत आहेत व सरदार हैदरच्या कैदेंत आहेत. ह्यांविषयीं आम्हांसहि येथें फिकीर व काळजी आहे. फौजा पाठविण्याची व्यवस्था झाली. [ऐ. ले. सं. ६ ले. २०८३]

श. १६९९ चैत्र शु. १२ व वद्य ४ इ. १७७७ एप्रील १९ व २६

नानांचें चिमणाजी महादेव–रामचंद्र गणेशाचे दिवाण यास पत्र, फौज सुद्धां मिरजप्रांतीं येऊन सरकारचे कमाविसदारास मारहाण करून घासदाणा मागता, गांवें लुटता, हें कळलें. तुम्हांकडे ऐवजाची ओढ म्हणून ऐवज पाठविण्याची योजणूक होती. परंतु आतां ऐवज पाठवीत नाहीं. रामचंद्र गणेशास तुमची ही असली सल्ला दिसते. पण सरकारचे महालीं रोखे करणें इत्यादि ठीक नाहीं. कमाविसदार व जमिनदार सोडून देणें. परिणाम पहावा, [ऐ. ले. सं. ६ ले. २०८८ व २०९६, ह्या पत्रास चिमणाजीचें चोख उत्तर ले. २०९३]

,, –चैत्र व. ३० व वै. शु. १ इ. १७७७ मे ७, (सु. ११७७ रबल २८, २९)

नानांचें गंगाधरराव पटवर्धनांस पत्र, तुम्ही रामचंद्र गणेश कानडे यांचे स्वारींतील व कहींतील घोडीं, उंटें नेलीं तीं सोडून द्यावीं; तुमच्या तालुक्यांतील ऐवज त्यांनीं नेला तो रुजवातीसह पाठवा, पोंचऊं. [ऐ. ले. सं. ६ ले. २१०९,– १०]

,, –वैशाख शु. ६ इ.१७७७ मे १२ (४ रखर सोमवार)

नानांच्या व सखारामबापूंच्याहि सांगण्यावरून फरासीस–सेंट ल्युबीन ह्यांची गांठभेट. [पे. द. ५ ले. ८७. ह्यास महमद-इसफ किंवा सुमेरसिंग गारदी यांची हवेली राहण्यास नेमावी]

,, –वैशाख शु. १५ इ. १७७७ मे २२ (सु. ११७७ रखर १४)

नाना फडणिसांनी राजपुरी प्रांतांतील हसमनीस येसाजी शिवाजी यांस अप्तगीर दिली. कारण त्यांनी तोतयाशी लढाई दिली. तसेंच ६ लोकांस बक्षीस रु. ५२५, देवजी नाईक सालोखे यास, त्याचा बाप तोतयाप्रकरणीं मारला गेला म्हणून असामी, जंजीरकर शामल यास सोडून कृष्ण सावंत हा सरकारकडे येऊन कामगिरी करूं लागला म्हणून रु. ५०० दिले. [स. मा. रो. १ पृ. १५]

श. १६९९ वैशाख शुद्ध इ. १७७७ मे दुसरा पंधरवडा.
नाना पुण्यांत आहेत. [ऐ. ले. सं. ६ ले. २११६]

,, –वैशाख वद्य १३ इ. १७७७ जून ३ (रखर २६ भौमवासर)
नानांचें म्हणणें कीं, होळकर तुळजापूरास गेले; तेथून त्यांनीं करकंबेचे ठाण्याचा बंदोबस्त करण्याबद्दल जावें, असें त्यांस कळविलें व येथूनहि आम्ही तरतूद करतो. रामचंद्र गणेश याजकडील फौज पाठविल्यास पोटास दिलें पाहिजे व तुम्ही म्ह. पटवर्धनानी २ ह. फौज रोजमऱ्यावर जमा करावी. ५।७ शें. गाडदी ठेदावें ते व मिरजेचे आणि मंगळवेढ्याचे सामान एकत्र करून नवे राऊत ठेऊन सारे होळकरास सामील व्हावें. परभारें हवाला म्हटल्यास होत नाहीं. [ऐ. ले. सं. ६ पृ. २९४६]

,, –वैशाख व. ३० इ. १७७७ जून ५ (रखर २८ गुरुवार)
नानांनीं आपणांस = गंगाधरराव पटवर्धन यांस–लिहिण्यास सांगितलें, महादजी शिंदे मातबर सरदार, त्या प्रांतीं (मिरज) आहेत. त्यांजकडे कारकून पाठवावा. व जवळ आलियावर खाशांनीं जाऊन २ ह. रु. खर्च जाहल्यास चिंता नाहीं मेजवानी करावी. नाना पुण्यांत, बापू सासवडांत आहेत [ऐ. ले. सं. ६ ले. २१२८ पृ. २९५०]

,, –ज्येष्ठ शु. १ व ४ इ. १७७७ जून ६ व ९ (रखर २९ भृगुवासर २ जवल गुरुवासर)
रा. नानास कोणी गाड्याकरवी दगा करावासा केले होतें. परंतु वर्तमान कळोन सावध जाले. [ऐ. ले. सं. ६ पृ. २९५२. नानांचा गोत्रज मृत्यु आज नववा दिवस शु. ४ ता. ९ पृ. २९५४] उभयता कारभारी सप्तऋषीस–सातारा–जातील. छत्रपती महाराजांस समाधान नाहीं. प्रकृतीचा भरंवसा नाहीं. ज्येष्ठमासीं महाराज जिवंत आहेत तोंच तख्तावर भोसल्यांचें मूल बसवावेसें आहे पृ. २९५५]

श. १६९९ ज्येष्ठ शु. ९ इ. १७७७ जून १४ (सु. ११७८ जवल ७)
करवीरकर येसाजी शिंदे ह्यांचे जे मातबर माणूस लढाईंत पाडाव आले त्यांस घनगड, राजमाची, कोरी ह्या गडावर कैदेंत ठेवण्याबद्दल नानांचा हुकूम. [स. सा. रो. १ पृ. १५]

,, –आषाढ शुा इ. १७७७ जुलै (सु. ११७८)
पुरंदरास गंगाबाई–स. माधवरावांची आई नवज्वरानें आठ दिवस आजारी होती मृत्यु पावली. पुरंदरींच दहन. नाना उद्यां येणार [ऐ. ले. सं. ६ ले. २१४१]

,, –आषाढ शुा १० इ.१७७८ जुलै १५ (जखर ९)
महादजीबाबा हरिपंत तात्यांना लिहितात, श्रीमंतांचे एकनिष्ठपणांत व नानांचे भाऊपण्यांत आजपावेतों अंतर जालें नाहीं व पुढेंहि व्हावयाचें नाहीं. श्रीमंतांचें कल्याण व नानांचें बरें, तेंच आपलें लक्ष आहे. [महा. का. ले. ४१]

,, –आषाढ वद्य ६ मंदवासर १७७७ जुलै २६
नाना पुरंदरास आले आहेत. [ऐ. ले. सं. ६ ले २१४७]

,, –आषाढ वद्य ३० इ. १७७७ आगष्ट ३ (जखर २८)
रहिमतपूर येथें नानांचें कुरण आहे.–महादजी शिंदे यांनीं पंतप्रतिनिधी व नाना फडणीस ह्यांच्या रहिमतपूर येथील कुरणातील कुरण्ये उठवून लावून दिले. कुरणें चारितात. [ऐ. ले. सं. ६ ले. २१५]

,, –श्रावण शुा ६ इ. १७७७ आगष्ट ९ (रजब ५)
रा. पंत अमात्य बावडेकर याणी ती. रा. तात्यांपासून १० ह. रु. कर्ज घेतले त्यास ३ वर्षें जाहलीं. ऐवज देत नाहींत. त्यास गंगाधर गोविंद भानू विजयदुर्गचे सुभेदार यांस सरकारचे पत्र पाठवून बावडेकरांचे साळसीमहालचे गांव आहेत ते जप्त करवावे. यावर नाना म्हणाले, आधीं पत्र त्यांसच देणें. पत्रावरून निकाल करून दिला तर उत्तम. नाहींतर तुम्ही सांगाल त्याप्रमाणें करावयास येईलच. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३०१०]

श. १६९९ श्रावण वद्य ५ इ. १७७७ आगष्ट २३ (रजब १९ शनिवार) नाना पुण्यास गेले. मासपक्ष पुण्यांतच राहतील [ऐ. ले. सं. ६ पृ. ३०१६]

,, –श्रावण कृष्ण १० सौम्यवासर इ. १७७७ ऑगष्ट २७ (सु. ११७८ श्रावणमास)

नानांना विनंती बहुत दिवस बहुत प्रकारें केली. त्याजवरून सरकारचें पत्र हरबा अण्णांस शुद्ध करण्याबद्दल 'कृष्णातीरीं यथाविधि शिष्ट ब्राह्मण मेळवून प्रायश्चित्त द्यावे' असें पत्र दिलें. तोतयाप्रकरणीचें हें प्रायश्चित्त, इंग्रजांकडील वकिलास निरोप दिला. तथापि तो अद्यापि पुण्यांतच आहे. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३१०८]

,, –भाद्र. शु. २ इ. १७७७ सप्टें. ३ (सु. ११७८ रजब ३०)

बाळाजी जनार्दन यांनी विसाजी केशव साने यांस कळविलें कीं, कोंकणांत भीवराव यशवंत पानसे होते त्यांस आणवून व एक ह. लोक ठेवून दादासाहेबांच्या शहावर राहणें. ३ शें. गाडदी तोफखान्याकडे. पावसाचे दिवसांत रावताचें काम नाहीं. सबब पाईचे माणूस ठेवावे. व हुजूर कळवावें. [स. मा. रो. १ पृ. १३५]

,, –भाद्र. शुा ८ इ. १७७७ सप्टंबर १० (सु. ११७८ साबान ७ बुधवार भाद्र.)

नानांचे व अग्नोजी शिंदे–मळणगांवकर–याचें समक्ष बोलणें चालणें झालें. नानांचें मानस शेतें यांनी केलीं आहेत. त्यांचा आकार होईल तो यांनी मिरजकरांस द्यावा. आम्ही देतों. आम्हांसाठीं चालवावें, असें स्पष्टपणें म्हणतात. जीं शेते पडलीं व रयताव्यांस लाविलीं त्याचा पैका मिरजकरांनीं स्वतः पासून घ्यावा. पडल्या पडसरीचा पैका यांजवळ मागो नये. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३०२३]

१६९९ भाद्र. वद्य ४ इ. १७७७ सप्टें. २० (साबान)
नाना आज पुण्यास गेले. भृगुवारीं येणार. आल्यावर होळकर कर्नाटकांत जाण्याचें पक्कें ठरेल. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३०२६]

,, –आश्विन वद्य ८ इ. १७७७ आक्टो. २४ (सु. ११७८ रमजान २१)
बाळाजी जनार्दन यांजकडे फौजेचे वेगमीस सरंजाम—परगणे सरभुवन (गुजराथ), परगणे भोकर (बागलाण), चोपडें व जलोद (खानदेश), कोतूळ, अंतू (दौलताबाद) हे सहा परगणे; सेलगांव व विंब (कऱ्हाड), माणीक दौंड (पांडेपेडगांव) ही तीन गांवें दिलीं. [स. मा. रो. १ पृ. २५७]

,, –कार्तीक शुद्ध २ रविवार ते वद्य १० इ. १७७७ नोवें. २ ते २४
नाना पुण्यास गेले आहेत. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३०३६,–४५]

,, –मार्ग. शुद्ध इ. १७७७ डिसें. पहिला पंधरवडा
रा. नाना अथवा बापू सप्तर्षीस राणीस दुखवटयाचीं वस्त्रें देण्यास जातील. अतिचार (मंगळ आदि पंचग्रह आपआपल्या राशीचा भोगकाल संपण्यापूर्वी दुसऱ्या राशीस जातात. तेव्हां त्यांस 'अतिचार' ही संज्ञा आहे.) असल्यामुळें राज्याभिषेकास मुहूर्त नाही. तोंपर्यंत शिक्के जुनेच वापरतील [ऐ. ले. सं. ६ ले. २२०२]

,, –मार्ग. ३० इ. १७७७ डिसेंबर २९ (सु. ११७८ जिलकाद २८)
सिंहस्थ असल्यामुळें राज्याभिषेक करतां न ये असे, बापूंच्या व आमच्या विचारे तुम्हांस पूर्वीच लिहिले. तोपावेतो शिक्का चालतो तो चालतच आहे. तट व दिक्कत पडत नाही. कारण महाराज असताच पुत्र घेतला. नबाब वगैरे सर्वांस पत्रें जाऊन जाबही आले. त्या पक्षीं दिकत पडावयाची नाहीं. पिंडास कावळा शिवला उत्तम झालें. [ऐ. सं. सा. खं. ४ ले. ९५ पृ. १५०]

श. १६९९ मार्ग. वद्य. इ. १७७७ डिसें. दुसरा पंधरवडा

सखारामपंतास जसा पहिलाच फौजेचा सरंजाम आहे तसा दीड हजार फौजेचा सरंजाम नाना फडणिसांस द्यावा आणि जसे हे दोघे कारभारी; तसे मोरोबादादा तिसरे व त्यांसहि दीड ह० फौजेचा सरंजाम, शिवनेर किल्ला द्यावा व त्रिवर्गाचे विचारे स्वारीस जाणें करावे असा ठराव झाला [ऐ. ले. सं. ६ ले. २२०४]

,, —नानांनीं महादजी शिंद्यांच्या दिवाणास बाळाराव गोविंद रूबरु ताकीद करवीरकडे जाण्याबद्दल केली. शिंदे मसूर व तेथून कऱ्हाडास गेले. [ऐ. ले. सं. ६ ले. २२०६]

,, –पौष शुद्ध इ. १७७८ जाने. पहिला पंधरवडा

होळकरांचें समजुतीस विसाजी कृष्ण गेले आहेत. ते बोलून येतील त्या अन्वयें बापू अथवा नाना होळकरांकडे जाऊन समजाविशीचा ठराव होईल. [ऐ. ले. सं. ६ ले. २२१३]

,, –पौष वद्य ६ इ. १७७८ जाने. १८

नाना रागें करून बोललें, शिंदे मळणगांवकरांचीं शेतें रयतांस लाविली त्याची बटाई करून माल घेतला, शिवाय ऐवज घ्यावा म्हणतात, आनंदराव शिंदे मिरजेस बसले असतां त्यांच्या कामाचा फडशा करीत नाहीं; वोलेकरास गुंतवून पाडिले; त्यापक्षीं आमच्या लिहिण्याची रुचि कोठें राहिली ! [ऐ. ले. सं. ६ ले. २२३६]

,, –पौष वद्य ७ इ. १७७८ जाने. १९ (जिल्हेज)

नाना पुण्याहून (पुरंदर) किल्लयावर आले. होळकरांची समजूत नाहीं, आंतील बाहेरील मजकूर, हरिपंताकडील फौजेची रवानगी आणि इतर कित्येक मनसबे, विचार कर्तव्य, त्याकरतां आले. बापूहि सासवडाहून आले. मासपक्ष राहतील. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३११९]

श. १६९९ माघ वद्य ४, ५ इ. १७१८ फेब्रु. १५, १६ (मोहरम १६–१८)

नाना चिचवडास गेले होते. येतांना त्यांनीं बापूंस पत्र लिहिलें कीं, तुम्ही होळकरास पत्र पाठवून ऐवजाचा फडशा करवावा म्हणजे हरिपंत जातील. त्यास बापूंचें बंदभर पाठपोठ पत्र आलें. व त्यांत हरिपंताची चव कांही राहिली नाहीं. विचार करणें प्राप्त असें बापूनीं लिहिलें. बापूनीं ' होळकराकडील पैका न देणें असी सूचना दिली. ' तेव्हां वृद्धांचें मनांतील स्थायीभाव काय. असो. ईश्वरी इच्छा प्रमाण. पैक्यामुळें दौलतच गारत होते असें दिसतें. कोठे कांहीं बोलतां येत नाहीं. होईल तें पहावें व भोगावें. ' याच समयांत आमचें जाणें जालें यामुळें हिसका ' असें बापूंचे लिहिणें, (पण) आम्हीं कार्यास आल्यानें मागें कार्यें होत असावीं, तटूं नयेत, असें असावें, याची परीक्षा बापूनीं महिनापंधरा दिवस कोठें जाणें तर जावें. मागें कांहीं पडूं देतों कीं काय. परंतू यांच्या कवायतीच येक प्रकारच्या आहेत. बरें आहे. [पे. द. ५ ले. ९२, ९३]

,, –माघ वद्य ६ इ. १७७८ फेब्रु १७ (मोहरम १८)

बापू व नाना यांनी इचलकरंजीकरांच्या मिरजप्रांताच्या देशमुखी-वतनाची घालमेल करण्याचें मनांत आणिलें हें उत्तम नाहीं. नानांचे चित्तांत असें कसें आलें. वतन स्वराज्यांतूनच मेळविलें आहे. परिच्छिन्न रदबदल करावीच लागेल [ऐ. ले. सं. ६ ले. २२४६]

,, –माघ वद्य ११ इ. १७७८ फेब्रु. २३ (मोहरम २४ भौम)

नाना पुण्याहून पुरंदरास आले. मोरोबादादा समजाविशीचे बोलणें होत असतां त्यांजकडील बोलण्यात स्वच्छता नाहीं. नाना शिवरात्रीसाठीं मेणवलीस गेले [ऐ. ले. सं. ६ले. २२५४ २२५५]

,, –फाल्गुन वद्य १३ इ. १७७८ मार्च २६ (सु. ११७८ सफर २६)
बाबा व राघोबा भिकाजी यांस अहमदाबाद शहराचा व मुलकी म्ह. मामलतीचा बंदोवस्त सांगून फौजेच्या खर्चास आमोद, देहनवरे व २० हजार रु. हि देविले. अमृतराव आपाजी फत्तेसिंग गायकवाडांच्या लष्करांत भेटीस गेले असतां तेथें अरबांच्या दंग्यांत मारले गेले [स. मा. रो. १ पृ. १८६]

,, –फाल्गुन वद्य १४ भृगुवार इ. १७७८ मार्च २७
नानांचे बाजीपंत आण्णा, आनंदराव गोपाळ यांस पत्र कीं हरिपंततात्याकडे जाणें. त्यावरून ते मांजरी, जवळे येथें गेले. तों नानांचें दुसरें पत्र कीं, जेथें मुक्काम असेल तेथें राहणें. कारण मोरोबादादांचे खूळ रूपांस आलें. नानांचे शंभर राऊत बहाणा करून गेले. [ऐ. ले. सं. ६ ले. २२७५]

,, –इ. १७७७
नाना फडणीस यांनी सरकार यादीवर 'करार करावे' हें लिहून संमति द्यावयाचा 'करार' सखारामबापूचा, येणेप्रा नारोबा परचुरे यांचे हातचें पत्र [इ. सं. पे. द. स. मा. पृ. २८९]

श. १७०० इ. १७७८ (सु. ११७९)
रा. दादासाहेब यांची पट्टी करार यादी. वसूल (१७०२ १७८०) त्यांत २५ ह. बाळाजी जनार्दन हें पहिलें नांव आहे. सात नांवें २५ ह. चीं आहेत. [इ. सं. पे. द. स. भा. पृ. १४७]

,, –चैत्र इ. १७७८ एप्रील
नाना फडणवीस यांस ते पुरंदरास चार हजार फौजेनिशीं जातांच किल्लेंत घेतलें नाहीं कोणी म्हणतात; तर कोणी घेतलें असें म्हणतात. सखारामपंत जाऊन मोरोबा व होळकर यांस मध्यस्थी पडोन उभयतां बंधूंचें (फडणीस बंधू नाना व मोरोबा यांचें) सख्य केलेंसें वर्तमान एक व नाही असें वर्तमान एक. नानांस काढून पुरंदरचें पेठेंत माचीस वेढोन होळकर वगैरे सरदार बसले आहेत. [ऐ. ले. सं. ७ ले. २३१९]

श. १७०० चैत्र शुा ४ इ. १७७८ एप्रील १ (रवल)

मोरोबादादा बारामतीहून वाफगांवगावास; तेथून होळकर व बजाबा पुरंदरेसह पुण्यास; तेथून कुंभारवळणापासी सासवडाजवळ येतांच बापू व नाना भेटले. सर्वांनीं संतोषें असावें असा करार होऊन श्रीमंत स. माधवरावांची भेट चैत्र शुा ६ (= एप्रील ३ रवल ४) स झाली. नाना पुरंदरी नारायणाजवळ, इतर कुंभारवळणावर आहेत. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३१७४]

,, –चैत्र शुा ७ इ. १७७८ एप्रील ४ (रवल ५)

नाना पुण्याहून पुरंदरास गेले. रावसाहेबांचा (स. माधवराव), नानांचा व पुरंदर किल्याचा बंदोबस्त असावा म्हणजे सर्व जोड पावली. परशरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र. नानांनी आपली पत्नी गडावर ठेऊन आपण खालीं फौजेंत आले. [ऐ. ले. सं. ६ ले. २२७९ पृ. ३१९१]

,, –चैत्र शुा १२ बुधवार इ. १७७८ एप्रील ८

नाना सोबत्याच्या विश्वासावर गेले, बापू व मोरोबादादा कवडीच्या मुक्कामीं. तेथें 'नाश दुतर्फा लढीन आहे' हें बापूंचें म्हणणें मोरोबादादांनी ऐकून तहयादी झाली. 'बापू वडील, दादा यकत्यारी कामकारभारी, नानांचा इतल्ला सर्व कामकाजांत असावा, कामकाजावरील लोकांस वाढवावें. राघोबादादांस तूर्त आणूं नये. विचार पाहोन पुढें आणणें तर आणावें.' नंतर होळकर भेट भिवडी जवळ. व नंतर सर्वजण गडावर, श्रीमंताची भेट. नानांनी बापूनीं असा विवेक केला. कारस्थानी केली. यावर ते मान्य जाहले. दूरदेशी चित्तांत आणून आपल्यासाठीं राज्याचा नाश व्हावा हें चांगलें नव्हे ऐसें ध्यानांत आणून केलें. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३१, ९३, ९५,–९६–९७, ३१९९, ३२००]

श. १७०० चैत्र शुा १४ शुक्रवार इ. १७७८ एप्रील १०

पुणेंकडेस उभयतां फडणविसामध्यें गडबड पडली सबब नानाचें कुमके करितां बोलावणें आलें. करितां राजश्री पंत फडके व धौशा आले तें देशाची वाट धरोन परत चालले. फौज बिथरली हें एक व राजश्री नाना फडणवीत यांचें बोलावणें आले तहकीक, करितां माघारे चालले. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३२३३–३४]

,, –चैत्र वद्य ८ इ.१७७८ एप्रील १८ (रवल २० मंदवार)

नाना नारायणाजवळ—पेठ सासवड-येथें आहेत. [ऐ. ले. सं. ६ ले. २३१०]

,, –चैत्र वद्य ११ इ.१७७८ एप्रील २३ (सु. ११७८ रवल २४)

करवीरकर छत्रपतींचा महादजी शिंद्यांशी तह. त्यांत बापू नाना वगैरे मुत्सद्दी यांस पेशजी यादीप्रमाणें इनाम गांवें दिल्याचीं नोंद आहे. [ऐ. ले. सं. ६ पृ. ३२१९–२०]

,, –चैत्र व. १३ इ. १७७८ एप्रील २५ (रवल २६ मंदवासर)

तिसरे गृहस्थ = नाना—स्वस्थ आहेत. बापूकडे वडीलपण, कार्यभागी एकत्यारी दादा फडणीस करतात. [ऐ. ले. सं. ७ ले. २३२४]

,, –वैशाख शुद्ध २ इ. १७७८ एप्रील २८

नानाचे ममतेंत हैद्राबादेतील कृष्णराव काळेहि आहेत. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३२४९]

,, –वैशाख शुा २ इ. १७७८ एप्रील २८)

मोरोबादादा फडणिसांनी राघोबादादासह स. माधवरावां-विरुद्ध खुळें उभें केलीं असतां मनसबाच करणें त्यापक्षीं नानांनीं जिवावर उदार असलें पाहिजे. जवळ फौज पाहिजे. श्रीमंत नाना व किल्ला ह्यांत अंतर असूं नये. होळकर इत्यादिकां-कडे अंगें असावीं. नबाबसहि उमजलें आहे कीं, मोरोबा कार-भारी जाहले तरी नीट चालणार नाहींत. त्यापक्षीं नानाचें

लक्ष राखावे. (नानानीं) नासल्यासहि हिंमत न सोडावी. मेळवावें अथवा गमवावे पण अब्रूनें राखावें. हें परशरामभाऊंचें म्हणणें [ऐ. ले. सं. ७ पृ. ३२५२]

,, –वैशाख शुा २ इ. १७७८ एप्रील २८ सौम्यवासर
परशरामभाऊस पत्र, श्रीमंत राजश्री नाना नारायणाजवळ फौजसुद्धां आहेत, बापू भिवंडी जवळ आहेत, राजश्री मोरोबादादा करेवर होळकर आदिकरून साऱ्या फौजा आहेत. त्रिवर्ग तर एक जाहले आहेत. संशय नाहीं. परंतु कारभार एकचित्तेकरून चालीस लागला नाहीं. परंतु त्रिवर्गाच्या संमते कारभार जाहल्यास चांगलें. [ऐ. ले. सं. ७ ले. २३३१]

,, –वैशाख शुा ९ इ. १७७८ मे ५
बापू गोव्यास बंदना नजिक लग्ना करितां आले. नाना गडावर गेले. होळकरानीं दगाबाजीच केली होती. परंतु क्षेमरूप नाना किल्यावर गेले ही गोष्ट मोठी जाहली. पहिला नाना कडून विप्र आला होता. त्यास आज दहा दिवस झाले. [ऐ. ले. सं. ७ ले. २३३७]

,, –वैशाख व. ७ इ. १७७८ मे १८ (सु. सबैन रबर २२)
नारायणा जवळ श्रीमंत राजश्री नानाची फौज आहे व गणेश काशी व किरकोळ पथकें होतीं. त्या साऱ्यांस तेथून आणलें भिवंडीजवळ राहिले. आतां राजश्री नानांचें खास पथक मात्र नारायणा जवळ राहिलें आहे. [ऐ. ले. सं. ७ ले. २३४५]

,, –वैशाख वद्य ९ इ.१७७८ मे २०
उभयता (कारभारी बापू व नाना) एकत्र जाहलें गुंता राहिला नाहीं. लौकर पुरंदर किल्लच्या समीप यावें" म्हणोन दोन चिठ्ठ्या रा. बापू पानशे यांस भिवराव यांच्या आल्या [ऐ. ले. सं. ७ पृ. ३२६६, ले. २३५५]

श. १७०० वैशाख वद्य इ. १७७८ मे दुसरा पंधरवडा.

श्रीमंत राजश्री नाना किल्ल्यावरच आहेत. राजश्री सखारामपंत बापू लग्नाहून आले ते नानाच्या डेऱ्यास भोजनास येतो म्हणोन सांगोन पाठविलें. या करितां नाना खालीं येऊन मेजवानी करून किल्ल्यावर गेले. तदोत्तर फराशीसाकडील वकिलास निरोप द्यावयाचा होता म्हणोन आपल्या डेऱ्यास खालीं येऊन निरोप दिला. आणि किल्ल्यावर गेले. दादासा यांजकडे किरकीळ राऊत लुच्चे शेपन्नास जात होते त्यांस— घाटोघाट चौक्या ठेऊन धरोन आणलें. [ऐ. ले. सं. ७ ले. २३५२]

" –१७०० जेष्ठ शुा २ इ. १७७८ मे २८

परवांचे दिवशीं मंगळवारी राजश्री नानाकडून कारकून आला. त्याबरोबर राजश्री मोरोबादादानीं बापूस लग्नास जावयाचें पूर्वी चिठी लिहिली होती ती, राजश्री नानांचे हातास कोणे द्वारें खर्चवेंच करून आली. चिठ्ठी येथें अस्सलच पाठविली. चिठीतींल आशय 'पटवर्धनांचे व वडिलांचें व शिंद्याचें पारिपत्य नाहीं. तर आम्ही तुम्ही सर्वच बुडतो. सर्वदौलत नानाचें हातीं याचा विचार पाहिजे. याजकरितां विसाजीपंत व दादोपंत वाघोलकर असे पाठवावें त्याशी बोलून आपणांकडे पाठवितो. तें सविस्तर सांगतां कळेल.' चिठ्ठी पाटिल बाबांकडे पाठविली. [ऐ. ले. सं. ७ ले. नं. २३५३]

" –ज्येष्ठ शुा ११ भृगुवासर इ. ११७८ जून ६

बापू महादजी शिंद्यांचे जवळ बोलले (नानास सोडून मोरोबाकडे गेलों) हा दोष मजकडे. आमचेविशीची क्षमा करावी. राखावें. मोरोबा आपल्यास कैद करीत होता म्हणून आलों. (पण आतां) नाना, तुम्ही जें सांगाल तें ऐकूं [ऐ. ले. सं. ७ पृ. ३२२९, व ३२ २१८१, ३२८६]

सखारामपंत बापूंनीं पानशांच्या विचारें नानांशीं समाधान राखलेंच होते आणि मोरोबाचे करणें ठीक नाहीं. शिंद्याकडे

जातें समयीं दगा करण्याचे योजिलें होतें, हें समजलें. आणि नानाशीं मिळाल्याशिवाय ठीक नाहीं असें समजून शिंद्याचें विद्यमानें निखालसतेची याद ठरली. आणि शपथ बेलभंडार झाला. नानाच्या डेऱ्यास आलें. मेजवानी जाहली. [पू. ३२९७ –९८, ३३०१]

श. १७०० ज्येष्ठ शुा १२ इ. १७७८ जून ६ (जवल ७)

नेनें याणी पुराहून जाणविलें जें, अजापालासह कपि निरेवर भेटीस येणार- असें ऐकलें वरून त्यानीं कळविले. त्यास जशी 'कवडी' तशीच 'नीरा' दिसते. वडिली सावध असलें पाहिजे. (कवडी मुक्कामी सखाराम बापू मोरोबाच्या भेटीस गेलें. त्याचा परिणाम नानावर प्राणसंकट ओढवलें. तसेंच ते आतां निरेवर शिंद्यास भेटणार. भेटल्यावर शिंदे व बापू व होळकर सारे एक होऊन तुम्हांस दगा होईल, या करितां सावध रहा, असा इषारा आहे.) [ऐ. ले. सं. ७ ले. २३५५]

,, –ज्येष्ठ वद्य ३ इ. १७७८ जून १३

आज दोन चार दिवस घालमेल राजश्री नानाचें व बापूचे समजाविशीची बोलणी लागली आहे. 'देवावें' नाना अलीकडे करीत होते तें करूं नये असें बापू बोलतात. कदाचित नानांचा आग्रहच असला तर माझा संतोष नाहीं. येविशीचें उत्तर प्रतिउत्तर आज दोन दिवस होत आहे. राजश्री मोरोबादादाकडीलही बोलणें (नानाकडे) लागलें आहे. त्यांतील भाव "तुम्ही आम्ही एक होऊन वृद्धांस पटकी द्यावी" परंतु शिंद्याचें विचारें, मोरोबादादा ठीक नाहीं बापू व नानानी एक व्हावें आणि काम कारभार करावा. सारांश कोणाचें पारिपत्य होत नाहीं, बखेडा आहे तो आहे असा प्रकार दिसतो होळकर यांची समजाविशी होत आहे. मोरोबादादाचें मतें 'मजला मेळवून ध्यावें नाहीं तर आपण मरून जाईन. परंतु निशाण, शिक्के कटयार देणार नाहीं. [ऐ. ले. सं. ७ ले. नं. २३६५]

श. १७०० ज्येष्ठ वा। ४ इ १७७८ जून २३

परशरामभाऊ—गंगाधररावास पत्र, होळकराचें विद्यमानें पाटील बाबाकडे मोरोबादादांचा निरोप व कारकून आलें कीं, आतां आपला जीव वांचवा. पुणें व शिवनेर येथें राहत नाहीं. चांभारगोंदे, पेडगांव, जांबगांव व वाफगांद यांतून कोठेही राहूं असें सांगून पाठविलें. तेव्हां राजश्री बाळाराम व गोपाळ नाईक तांबेकर व होळकराकडील कारकून मकार नामकाकडे जाऊन बोलून येत तो पावेतो उतावळी करूं नये असा पाटील बाबांचा निरोप राजश्री नानाकडे आला. त्याजवरून सोमवार अस्तमानपर्यंत फौज चौकी दाखल उभी राहीली. तेव्हां उभयतां सरदारानीं " मंगळवारी सकाळी दादा कडील गुंता ठेवीत नाहीं. पळोन गेले तर आम्हांस जिमा लागला असें ठरले. सोमवारी प्रदोषाचें दिवशीं इतका प्रकार जाहला. वाफगांवी तर राहूंच नये पाटील बाबांचें आश्रयास राहावें. असें ठरलें. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३०४ ले. नं. २३७९ [

,, —आषाढ शु। ४ इ. १७७७८ जून २८

परशरामभाऊ—गंगाधररावास पत्र. आज चतुर्थी रविवारीं राजश्री मोरोबादादा सडे दोनशें स्वारानिशीं निघून बहुलास भीमातीरास जातील. गोपाळ नाईक तांबेकर याणी क्षेत्रांत राहावें. अथवा मालखेडास जावें. वरकडाचें कोणी पुसलें नाहीं. याणी (नानानीं) जाबसाल केला नाहीं. काल शिक्के, कटार, जरीपटका निशाणसुद्धां राजश्री नानाजवळ आला. उभयतां सरदारांकडील हजार स्वार तूर्त समागमें जाणार—चारशें नेहमीं त्यांजजवळ राहावे असें आहे. शिवनेर किल्ला त्यांजकडें आहे त्याचें अभोगत आहे. घेतील असें वाटतें. चिरंजीव राजश्री हरीहरराव व चिरंजीव राजश्री गणपतराव उभयतांस वस्त्रें व्हावी. त्यास माघ (?) अथवा तेथें सर्वांचें विचारें करावें. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३१२ ले. २३८८]

श. १७०० आषाढ शुा १२ इ. १७७८ जुलै ६ इंदुवासर

नाना फडणवीस याणी आम्हांस बोलावून नेऊन सांगितलें कीं, सन सलासात लाख रुपये कर्ज दिले आहेत. ते व्याजसुद्धां देणें. आम्हांस ऐवजाची जरूर आहे. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३१२ ले. नं. २३८९]

,, –आषाढ शुा १२ इ. स.१७७८ जुलई ६ (सु. आषाढमास)

परशुरामभाऊ (गंगाधर) बळवंतरावास मिरजेस लिहितात, किल्ल्याचा मजकूर नानास पुसिला. त्यांस वंदन कपीकडे आहे. त्याचें नांव काढतांच नये. चंदन देतात, परंतु महिपतगड माघारा द्यावा म्हणतात. (महिमंत) गडापेक्षां चंदन चांगला नाहीं हे एक, दुसरें सिंहगडांत तूर्त मुलें माणसें आणून ठेवावी. शेपन्नास माणसें आमचें असल्यास चिंता नाहीं. असावे. सिंव्हगडचा बंदोबस्त नानाचाच आहे. तेथें मुलेंमाणसें आणून ठेवावी. महिमतगडही तुमचा तुम्हांकडे असों द्यावा. असें श्रीमंत राजश्री नानांनी सांगितलें. महिमतगड आमचा आम्हांकडे राहून तूर्त सिंव्हगडांत मुलें माणसें ठेऊन पाया शिरकल्या नंतर पुढें सोई सोईनें आपलें लगामी लावून घ्यावयास येईल, असा मजकूर आहे. सिंव्हगडास येणें उत्तम. पहाडही चांगला. अजिंक जागा. मातबर कुटुंब ठेवावयास चिंता नाहीं. तोफा देतो म्हणून राजश्रीं नानांनी कबूल केलें. सनद घेऊन मागाहून पाठवितो. [ऐ. ले. सं ७ पृ. ३३१९,–२० ले. २३९४]

–आषाढ वा ३ इ. १७७८ जुलई १२ (सु. ७९ आषाढ)

परशरामभाऊ बाळासाहेबास मिरजेस लिहितात––प्रस्तुत काळांत सर्व मदार पाटील बाबावर आहे. कपीस आंतून फारच वाईट वाटलें आहे. परंतु तेही चांगलें म्हणोनच करींत आहेत. गंगोबा होळकर यांचे चिरंजीवास वस्त्रें द्यावी असें ठरलें. होळकरांकडून देविली. राजश्री नाना राजश्री बापू होळकरांचे

समाधानास गेले होते. बोलून बेलभंडार जाहले. प्रस्तुत धडाका उठला आहे. [ऐ. ले. सं. ७ ले. २३९८]

श. १७०० आषाढ वद्य ३ इ.१७७८ जुलै १२ (जखर १६)

महादजी नानांना लिहितात, गाडराकडे तुम्ही लाला फतेचंद मुनशी यांस रवाना केलें, उत्तम केलें. [महा. का. ले. ४७]

,, –आषाढ वद्य ४ इ.१७७८ जुलै १३

नाना, बापू, शिंदे मिळोन होळकराचे समाधानास गेले होते. शिष्टाचार करून आले. बहुलाकडे फौज गेली. तिकडील वर्तमान कांहीं आलें नाहीं जितक्यांचे येथें पारिपत्य जाहलें तितक्यांचीं घरें जप्त जाहलीं. नरसिंगराव यांचा ऋणानुबंध बहुत दिवसांचा त्याणें करावयाचें तें केलेंच. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३२५ ले. २३९९]

,, –श्रावण शुा ५ इ.१७७८ जुलै २८

राजश्री नाना व शिंदे व होळकर काल रविवारी जेजुरीस देवदर्शनास गेले होते. आम्हीही गेलों होतों. देवदर्शन घेऊन नाना किल्ल्यावर एकटेच गेले. आम्ही भिवंडीस नेहमीं राहावयास आलो. राजश्री सखारामपंत गुलटेकडी जवळ रहावयास गेले. राजश्री नानाही तेथेंच जाणार. कारभारी पुण्यांत घरास जात नाहींत. बाहेर जाणार. या उपर काय मनसबा करितात पहावें. [ऐ. ले. सं. ७ ले. २४०४]

,, –श्रावण वाा १० इ. १७७८ आगष्ट १७ (रजब २३)

परशुरामभाऊ गंगाधररावास पत्रानें कळवितात "आज आठ दिवस राजश्री नाना म्हणतात कीं," तुम्ही पुढें स्वारीस भाद्रपद मासीच निघोन जावें. मागाहून दसरियास आम्हीं खामखा निघोन येतो." त्यास आम्हीं उत्तर केलें कीं, मागील देणें लोकांचें तसेंच तटलें आहे. सरंजामही गेला. त्यापक्षीं पुढील तरतूद होऊन निघावयाचें कठीण आहे. व या खेरीज हुजरांत-

संबंधें गुंतलों आहों त्याचा निकाल नाहीं. तेव्हां आमचे वस्तु जाणें होत नाहीं. " म्हणोन सांगितलें. त्यावरून राजश्री नाना (आमचे) घरपावेतों आलें, आणि सांगितलें कीं, हुजुरात संमंधें कर्ज बाकींस राहिलें आहे. त्याचा ऐवज दोहों तिहीं महिनियानीं पावें असा लावून देतो. सरंजाम तूर्त गेला त्यापक्षीं हुजरात कांहीं बरोबर देतो. शिवाय सरंजामी रास्ते वगैरे देतो. जावयाचें करावें." असें सांगितलें. वृद्धाचें चित्तांत आम्ही मान्य न केल्यास दुसऱ्यास सांगावें असें आहे परंतु नानाचे चित्तांत दुसऱ्यास पाठवूं नये. आमचीच रवानगी करावी. आम्ही जाणें तेव्हां केवळ हुजराती बरोबरच परिणाम लागेल असें नाहीं. घरची फौज तीन चार हजार तरी पाहिजे तरच ठीक. ऐशास नानाचा तर आग्रह भारी. त्यांस कसें करावें. हैदरखान तुंगा उतरून मलगनाथाकडे गेला म्हणून येथें बातमी आली आहे. राजश्री नानाचें विचारें दुसरा कोणी पाठवावा तर फौजच त्याचे लगामीं लागेल ते ठीक नाहीं. यास्तव तुम्ही जावें असें म्हणतात. आमचे घरचे प्रकार व मागील बाकीसच ठिकाण नाहीं. [ऐ. ले. सं. ७ ले. २४१[illegible]]

श. १७०० श्रावण वद्य १२ इ. १७७८ आगष्ट १९

परशरामभाऊ म्हणतात आम्हांस आज आठ दहा दिवस "बाहेर निघावे" म्हणोन राजश्री नानांनी बहुता प्रकारे लाविलें आहे. आम्ही ज्या ज्या अनुपती सांगावयाच्या त्या सांगितल्या. परंतु नानाचें म्हणणें कीं, भिवराव पानसे यांस पाठवावें तर फौज लगामीची जातें. हें ठीक नाहीं. तर तुम्ही व हरीपंत येथें राहून मागील आटपावें. आम्ही पुढें जातों. [ऐ. ले. सं. ७ ले. २४१५]

१७०० भाद्रपद शुा ११ इ.१७७८ सप्टें. २ (साबान १० तिसा)

नानांना! आनंदीबाई- राघोबादादा पत्नी—स्वहस्त–पत्रीं लिहितात, आम्ही होऊन पत्र न पाठविलें. कारणाखेरीज पत्रें पाठवितात, म्हणोन तुम्हीच हंसाल. हल्लीं कारण कीं, तुम्ही तीन पिढ्यांचे दौलतेंतील फडणीस. ब्राह्मणी दौलत यवनाक्रांत (= इंग्रज हस्तगत) होऊं पाहते. इंग्रेज बुंदेलखंडापर्यंत दोन कंपू आले! आणिकहि मागून येणार. याचा बारीकमोठा विचार तो तुम्हीच करणें, आम्हांस म्हणाल तर, आपला जीव कोणास नकोसा नाहीं. आम्ही पावणे दोन वर्षें जाहलीं. तुमचे स्वाधीन तुमची फौज गुंतून, धन्याचे पायासी वियोग. हें उभयपक्षीं नुकसान. तर आम्हांस मुंबईस जाण्याविषयीं वोढेकरांस पत्र लिहिणें. हे आशीर्वाद. [इ. सं. ऐ. टि. १–१९] (ह्याच तारखेस बापूंनाहि जवळ जवळ असेच जरा अधिक आपुलकीचें व विस्तृत पत्र आहे. ले. २०)

" –भाद्रपद शुा १३ इ.१७७८ सप्टेंबर ४

परशुराम भाऊना "राजश्री नानांनी द्वादशीस भोजनास बोलाविले होते. खाशी मंडळीसह मेजवानी झाली. वस्त्रें दिलीं. आमचा मुक्काम येथें अमावास्येपर्यंत आहे. नंतर पुरंदरास पागेची जेथील तेथेंच तयारी करावी. मग येथून लिहून पाठवूं त्याप्रमाणें रवानगी करावी. हत्तीचे गाशे व नमदे व भारकस वगैरे आहे नाहीं पाहोन नवें तयार करावें. उदईक राजश्री नाना आमचे येथें भोजनास येणार. राजश्री हरीपंत तात्या व आप्पा बळवंत व अमृतराव पेठे––त्रिबकराव मामाचे नातू–– यांसही सांगणार. राजश्री सखारामपंत बापू दोन वेळां घरास आले होते. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३४७ ले. २४१८]

श. १७०० भाद्रपद वा ७ इ.१७७८ सप्टेंबर ३

नानांचे दिवाकरपंत, नागपूरकर चोरघडे, यांस पत्र, होळकर मोरोबाचे बखेड्यांत. आमचे कडून खबर नाहीं, वगैरे ममतायुक्त लिहिलें. त्यास गेल्या सालीं पुरंदरास आपण आला तेव्हां पक्की खातरजमा जाली. 'शरिरे मात्र भिन्न' इतकें करून गेलेत. पुढें आपणांस व आम्हांस पेंच न पडो ह्या गोष्टीचा संतोष आपणांस पूर्वी पासून. पूर्वींच फितूरियांचा बंदोबस्त करावा हें आपलें वारंवार सांगणें. परंतु एकसमयावच्छेदे इतक्यांचे अंगी मुद्दे कसें लागते? बंदोबस्त करणें, तरी लौकिकांत होतें कीं नाहक पारिपत्य केलें. याकरतां त्यांस बुद्धि होऊन पुरंदरावर चालून आलें हें पृथ्वीस जाहीर जालें, येणें करून निर्दोषता जाली. आपण हरिभजन भावें करून करतां त्यांत 'आमचे कल्याण असावें' असें होत असेल. त्याचेंच फल श्रीहरीनें दाखविलें. अशी परस्पर अंतःकरणाची ममता, स्वच्छता असतां अलिकडे आपणाकडील संदेह आमचे चित्तात आला, असें आपलें चित्ती आलें. याचें कारण एकत्वभाव या काली कोणासहि सोसत नाहीं. याची परिक्षा श्रीहरीच प्रेरक होऊन खातरजमा होईल, हा माझा निश्चय आहे. पुढें कित्येक मनसुबे व कामें आपणांसच मन घालून करावीं लागतील. शिंदे एकनिष्ठे व आमचे मनसुब्यास अनुकुल होऊन पुढाकारी जालें. याचा संतोष आपणांस विशेषात्कारें असेल, असावा हें उचित. श्रीमंत लहान, तों जेथें उणें तेथें संभाळणें हा एक हा हक्क भोसल्यांचे घरापासून आपण घडवितील यांत संदेह नाहीं. [रि. उ. वि. १ पृ १६०-१६१]

,, मार्गशीर्ष शुा ५ इ.१७७८ नोव्हेंबर २४

इंग्रजांनी केलेल्या पुण्यावरील स्वारीबद्दल नानांचें नागपुरांतील वकिलांस दिवाकरपन्तदादानी काय विचार केला ते कळविण्याबद्दलच्या पत्रांत चरकाची गत आणि इंग्रजाची चाल एक. दौलतकर्ते दूरदेशी आहेत तेच हे समजतील. ज्या राज्यांत टोपीकरांचीं चाल तेथील गत काय हें कांहीं लोपलें नाहीं. हें नानांचें म्हणणें. [खं. १० ले. १९७]

श. १७०० मार्गशीर्ष वा। २ इ.१७७८ डिसेंबर ६

"पुण्याकडील वर्तमान तर इंग्रज बोरघाटावर आले. ते तेथेंच आहेत. उभयतां सरदारसुद्धां कारभारी वानवडीवरून कूच करून नदीपलीकडे खडकीजवळ उतरले आहेत. हें परवाचें पत्रीं लिहिलेंच आहे. उभयतां सरदार तडका फौज जमा करीत आहेत. खडकीवरून कूच करून तळेगांवचे रोखें जाणार होते. चिरंजीव रघुनाथरावदादा पुण्याहून निघून नेहमीं नानाजवळ लष्करांतच राहिलें आहेत. आम्ही उदईक कूच करून महादेवाकडे येतो. परशरामभाऊंचें पत्र. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३८३ ले. २४५२]

" पौष वद्य २ इ.१७७९ जाने. ४

नाना फडणीस व धोंडोपंत नित्सुरे यांनी कॅप्टन इस्टुरफाकडे याची बकराची रसद घाटबंदी करून बंद केली [पे. द. ४४ ले. ४]

" पौष वा। ११ इ.१७७९ जानेवारी १३

नानाचें मतें पुणें जाळावें. होळकर शिंदे यांचें मतें न जाळावें असा मजकूर लष्करांत आहे. तमाम मुलूख जाळिला इंग्रजाची रस्त मना केली आहे. इंग्रजाची मसलत फसलीसें दिसते. इंग्रज घाट चढून वर आला. [ऐ. ले. सं. ७ ले. २४६०]

" पौष वा। ११ इ.१७७९ जाने. १३ (सुरापुरावरील स्वारी)

आम्हासहि पत्रें राजश्री बापू व नानांचीं आलीं आहेत कीं, मिरजेतील सामान व याखेरीज तुम्हाजवळ फौज आहे त्यापैकीं दोन हजार, या प्रमाणें चिकोडीकरांच्या उपराळ्यावर पाठवून देणें" म्हणून लिहिलें आहे; त्यास आम्ही कोणत्या शहावर आहों, व आम्हाजवळ फौज किती, काही ध्यानांत न आणितां कारभारी पत्रें देतात! [ऐ. ले. सं. ७ ले. २४६५] असो. या उपर तेही लौकरच येतील राजश्री बापू व नानांची पत्रें आम्हास राजश्री नागो शामजी याणी घेऊन पाठविली.

त्यांतील मजकूर "तुम्हाकडील हजार राऊत व राजश्री आनंदराव गोपाळ यांचें पथक व शिवाय मिरजेतील सामान चिकोडीच्या कुमकेस पाठवून द्यावें." म्हणोन. त्याच अन्वयें तुमचेंही पत्र होतें. ऐशास आम्हाजवळ सामान किती व आम्हांस बेरडाचा शह अगदीं समीप असें असतां यांत काय पाठवावें, बाकी काय राहतें. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३४१७]

,, –पौष वा। १२ इ.१७७९ जानेवारी १४

इंग्रज वकील फार्मर याची शिंदे व हरिपन्त यांचे समवेत नानांनें दरबारांत भेट घेतली. [अु. वि. म. रि. १ पृ. १८३]

,, –पौष वा। १४ इ.१७७९ जानेवारी १६ (जिल्हेज २७)

पुणें शाबूत राहत नाहीं. याप्रमाणें नाना फडणवीस यांणीं साफ सांगोन पाठविलें वरून आज झाडून ओस झालें. तळेगांवास दादासाहेब व इंग्रज आले. तळेगांव इकडील फौजेनें जाळन टाकिलें" [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३९२ ले. २४६१]

,, –माघ शु। इ.१७७९ जानेवारी परशरामभाऊंचें चि. गणपरावास पत्र—दुसरा पंधरवडा (पौष वद्य ९ जानेवारी ११)

"इंग्रजांचा मोड जाहला. चार पांचशें माणूस मारिले. पांच तोफा व दोन गरनाळा सरकारांत पाडाव आणिल्या. शिवाय दोन हजार बंदुका वगैरे लूट सांपडली. तळेगांव नजिकचे वडगांव येथें इंग्रज कोंडिले आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब निघोन गेले आशी आवाई, परंतु त्यांत आहेत–" या प्रमाणें राजश्री नानांचें स्वदस्तुरचें पत्र, पुरंदराहून आम्हांस आलें ते आतांच प्रथम प्रहर रात्रीस पावलें, पत्र पाहून खुशालीच्या तोफा करविल्या. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३३९१ ले. २४५९]

,, –माघ शु। १२ इ.१७७९ जाने. २९

राघोबादादांचें कारभारी यांस म्हणणें—

इंग्रजाचे घरास राज्य जाईल या अर्थी त्याजपासोन निघोन शिंदे होळकरांकडे आलें. स्नानसंध्या करून राहूं. अतःपर

राज्याचा लोभ धरणार नाहीं. स. माधवरावांनीं धणीपण, स. बाजीरावांनीं कारभार मुतालक करीत असावे. मुलें थोर राज्याधिकारी होयेतों नाना फडणीस व सखारामबापू यांनीं कुल-अखयारी करून राज्य संभाळावें. व अशीं नानास पत्रें पाठविली. शिंदे होळकर यानीं प्रमाण पत्रें नानांस दिलीं. व सभेंत गर्जोन शिंदे बोलले कीं पुन्हा कै. श्री नानासाहेब यांचे राज्यास फंद-फितुर वाईट चितील त्यांस काशीत मात्रगमनाचे पातक घडेल. रा. नाना फडणीस यांस विनंती केली कीं, आपण ह्या राज्यांतील कुल कारभारी आहां; तर मागें लहानथोर कारभारी व सरदार आम्ही लोक यांचा अन्याय जाहला असेल ते चित्तांत कांहीं न आणावे. येथील लहाणापासून थोर कडेचा माहार देखील एकरूप असोन राज्याचा बंदोबस्त करावा. दादांनी निज्याम अली, हैदर अली, मुधोजी व अवांतर त्यांस पत्रें. शिंदे होळकर व नानास पत्रें पाठविलीं व गौरव केला कीं या राज्यास अपाय बहुत चितींत होते परंतु तुम्ही नेकजाद मातबर सरदार साहय होऊन राज्य संभाळिले. असें म्हणून हिंदुस्थानास जावयास माघ शुद्ध १० रात्रौ मुहूर्तें कूच करून देहूचे मुकाम केले. द्वादशीस डेरे खाशाचें व नानाचे पुरंधरास जावयास मुहूर्तें दाहेर दिल्हे. [पे. द. ५ ले. ९७; इ. सं. ऐ. टि. १ ले. ७]

श. १७०० फाल्गुन शुा ८ इ. १७७९ फब्रु.२४ (सफर ७)

पुरुषोत्तम महादेव (नाना) हिंगणे नाना (फडणवीस) यांस लिहितात–देशी इंग्रजाचे पारपत्य जाले हे वर्तमान पातशहा व नबाब आबदुल आहादखान यानीं ऐकून संतोष मानून खलिता पत्रे शुका श्रीमंतास पाठविला आहे. आपले आगमनाची मार्गप्रतीक्षा बहुत आहे. ईश्वर घडविल तो सुदिन, भेट घडे ती सुघडी. ह्यावरून नानांचा पुनः अठरा वर्षानीं दिल्लीस जाण्याचा बेत होता व नानांनीं यावें असें दिल्ली-करांस वाटत होते. [हिंगणे द. २ ले. ८७]

१७०० फाल्गुन शुा ११ इ. १७७९ फेब्रु. २६ (सफर ९)

रा. नाना व भीवरा व पानसे ह्यांचीं चिठीपत्रें आली कीं, वृद्धांस शिंद्यांनी कैद करून सिंव्हगडास रवाना केलें. इंग्रजाचे प्रकरणांतील फितव्याची चिठी होती. 'दक्षिणेकडे सूचना केली आहे. आम्ही पाय पसरून बसलों आहों. अशांत जलदी कराल तितकी उपयोगी आहे' एक दादासाहेबांस व दुसरी चिंतो विठ्ठल यास, अशा दोन चिठ्या होत्या. कांहीं फितुरी कागद मृदंगांत घालून मुंबईस नेत होते ते नानांनीं धरले. (वाईट गोष्ट झाली. कर्ता पुरुष. परंतु खेळ न जात त्याजमुळें हें प्राप्त जालें. होणार सुटत नाहीं.) [ऐ. ले. सं. ७ पृ. ३४४३, ले. २४८६, २४८८; म. द. रु. २ पृ. ११०]

,, –विकारी फाल्गुन वद्य ७ इ. १७७९ मार्च ९ (हि. ११९३ सफर२०)

पेशवे सरकारचा व नबाब हैदर अलीखान बहाद्दर यांचा तहनामा झाला तोच बाळाजी जनार्दन, हरी लाळ, महादजी शिंदे, आनंदराव रास्ते व कृष्णराव बलाळ यांचे विद्यमानें झाला. हाच पुढें शक १७०८ इ. १७८७ मध्यें पुनः पक्का झाला. हैदर अल्लीनें १२ ल. रु. श्रावणमासी पावते करावयाचे ठरले. [स. मा. रो. १ पृ. ३२५–३२६]

,, –फाल्गुन वद्य १२ इ.१७७९ मार्च १४ (सफर २५)

महादजी शिंदे–बाळाजीपंत नानांना लिहितात. आपण शपथपूर्वक खातरजमा करून श्रीवरील तुळशी दिल्या व निश्चयपूर्वक बोललां कीं, सरदारी माझी आणि फडणिशी तुमची; बंधुत्वाप्रमाणें वर्तणूक करूं. ज्यांत सरदारीचें कल्याण तें संधान चालवूं. जो अनिष्ट चिंतील त्याचें पारपत्य करूं, हें समजोन परम संतोष जाहला. आम्हीहि श्रीवरील बेलभंडार पाठविला आहे आणि ही सरदारी आपली व फडणीशी आमची जेथें आपण तेथें मी हें शपथपूर्वक जाणावें. [जु. ऐ. गो. इ. सं. १४]

श. १७०१ चैत्र इ.१७७९ एप्रील

वॉरन् हेस्टिंगनें नानांना वडगांवचा करारनामा मान्य नसल्याचें कळविलें. [अुत्तर भाग १–म. रि. उ. २१५]

,, चैत्र वा। २ इ. १७७९ एप्रील ३ (रवल १५)

चितापूर वगैरे मोगलाकडील महालांच्या घांसदाण्याचा फडशा व्हावयाचा आहे. त्यास सरकारची पत्रें आलीं आहेत कीं, मोंगलाचा व श्रीमंताचा (सांप्रत) स्नेह. नबाब अंत:करणापासोन या दौलतीची काळजी वागवितात. त्यापक्षीं त्यांच्या तालुक्यास एकंदर उपसर्ग देऊं नये. कांहीं ऐवज घेतला असेल तो माघारा द्यावा." याप्रमाणें निक्षून राजश्री नानांनीं लिहिलें आहे. यास्तव जरब देतां येत नाहीं. सोहलतीनेंच होईल तेथवर पहात आहो. नबाबाकडील फौजही कलबुर्गे नजीक आली आहे. कांहीं भागानगराहून बाळाजी केशव वगैरेही रवाना जाले आहेत. [ऐ. ले. सं. ७ ले. २४९१]

,, –वैशाख शु। २ इ.१७७९ एप्रील १८ (सु. ११७९ रखर १)

बाळाजी जनार्दन पुणें येथें सवाई माधवरावांचा व्रतबंध—निमंत्रणास गेले तेव्हां त्यांस अहेर आलें ते तिवट वगैरे. मुंजसमारंभ पंचमीस पर्वतीवर झाला. शिंदे होळकर वगैरे आले होते. रा. नाना गंगास्नानास जाणार. [ऐ. ले. सं. ७ ले. २४९८]

,, –जेष्ठ १७०१ इ.१७७९ (जून ते ११७९ मे जून)

नाना व बापू यांमध्यें १८ कलमी एकीचा व राज्यरक्षणाचा आणि कारभारसंबंधीचा करार. [इ. सं. ऐ. टि. १ पृ. ४१–४३]

,, –ज्येष्ठ शु। १३ इ. १७७९ मे २८ (जवल ११ समानीन)

नाना, शिवाजी विठल विंचुरकरांस लिहितात—रा. दादा, हरि बाबाजीबरोबर देऊन झाशीकडे रवाना केलें. त्यांस नर्मदा उतरतेसमयीं दादांनी दगा करून हरि बाबाजीस कैद केले व फौज विसकटली. याउपर सुरतेस इंग्रजास मिळावयास अथवा

हिंदुस्थानांत जावयाचा प्रकार करतील. त्यास आपण फौजसुद्धां पिच्छावर पोहोंचोन दादांस हस्तगत करावयाचा उद्योग केलाच असेल. शिवाजी विठलनें लिहिलें ' झांशीप्रांती रवानगी केली ह्यांत दुरांदेशी ध्यानांत आणिली नाहीं. दूर देसी पाठवून बंदोबस्त होय सारखा तरी कै. रावसाहेबास सन्निध बाळगावयाचें कारण काय? असो. [ऐ. टि. भा. ४ ले. १०] (अशींच दुसरी पत्रें नानांनीं शिवराम महादेव, कृष्णाजी पवार, सदाशिव पवार, बाबुराव शंकर, खंडी अनंत यांना लिहिलीं. [म. रि. उ. वि. १ पृ. २०९] धार दप्तर)

श. १७०१ आषाढ इ.१७७९ जून जुलै

जांबगावीं शिंद्यांचें लष्करांत महादजी शिंदे, तुकोजी होळकर हे एक विचार होऊन रा. चितो त्रिंठल, सदाशिव रामचंद्र, महादेव गोगटा व नारो गोपाळ दिा (आबाजी महादेव) यांचे खलबत झालें; मजकूर कीं उभयता सरदारांनी पुणियाचे मुकामी जाऊन आपल्यास = नाना फडणीस व हरिपंत ह्यांस दगा करावा. तरी मजबूत असावे. देवाजीपंत निा भोसले यांचें विद्यमानें आंगरेज याजा सलूख, आमचे हातीं काहीं संधान राहिलें नाहीं. व म्हणून हा दग्याचा प्रकार. म्हणून यांस बहूत कठीण. [ऐ. पत्रव्य. ले. १६४]

,, –अधिक श्रावण वद्य १ इ.१७७९ जुलै २९ (रजब १५ समानीन)

नानांनीं, गुलजारखान टोकेयाचे पारिपत्यास वगैरे बंदोबस्तास सरकारांतून फौजसुद्धा रा. विसाजी आपाजी–आठवले रवाना केले आहेत. त्यास तुम्ही अनुकूल राहून सरकार काम करणें. म्हणून नारो कृष्णाचे पदरचे गोविंद यादव परचुरे यांस पत्र पाठविलें. (त्याप्रमाणें गुलजारखानाचा पराभव. साबान १४ व १५ ला झाला) [ऐ. पत्रव्य. ले. १६३]

श. १७०१ अ. श्रावण वद्य २ इ.१७७९ जुलै ३० (रजब १६ समानीन)
नानांचें बाबुराव निकम यांस पत्र—विसाजी आपाजी बरोबर मुसा नारन (Noronha) तोफा तुम्हांकडे रवाजा केले. गुलजारखानाचें पारिपत्य पुरते करणें. तुम्ही या प्रसंगी तेथें होतेत हें फार उपयोगी पडलें. [ऐ. पत्रव्य. ले. १६५]

,, –अधिक श्रावण वद्य ५ इ.१७७९ आगष्ट २ (रजब १९)
बाबुराव निकम यांस नानांचें म्हणणें की, गोविंद कृष्ण कमाविसदार यास सोकळें करावें. तूर्त ते चोपडे येथील मसलत संबंधींचा कारभार करतील. व तुम्ही गुलजारखानाचे पारिपत्याची मसलत करावी. [ऐ. पत्रव्य. ले. १६५]

,, –श्रावण वद्य ४ इ. १७७९ आगष्ट ३१ (साबान १८)
नानांचें महादजीस पत्र, श्रावण व. ११ चा मुहूर्त आम्हांस जावयास पाहिला आहे. पुढें पाहावा तर मार्ग० पर्यंत नाहीं. तरी या मुहूर्तानें निघावें किंवा कसें? गाडर पुण्यास येणार व आपण बाहेर निघाले हें एक प्रकारचे दिसेल तर कसें करावें? दुसरा प्रकार—केसो कृष्ण दातार–दादाकडील– व हजार स्वार व गाडदी याप्रमाणें सोनगडचे मार्गें कोंडाईबारीकडून खानदेशांत गुलजारखानाकडे जातो. तर आपणाकडील भगीरथराव शिंदे व होळकराकडील पाराशर दादाजी असें कोंडाईबारीचें सुमारे गेल्यास तिकडून आला तरी पारिपत्य करतील व इकडून कोणी जाऊं पावणार नाहीं. आपण = महादजी शिंदे लवकर यावे. [महा. का. ले. ५०]

,, –आश्वीन शु॥ ११ इ.१७७९ आक्टो. २१ (सवाल १० समानीन)
नानांनी फत्तेसिंग गायकवाड यांस लिहिलें, तुम्हाकडील करारमदार पांच वर्षें होतात. त्याप्रमाणें अमलांत येत नाहीं. सरकारांतून कोण कोण प्रकारें रयाती होत आल्या आहेत हें तुमच्या ध्यानांत आहे किंवा नाहीं. याजकरता एक शहाणा मातबर दरबारांत असावा. मसलत पडते, बोलावे लागते.' (त्याप्रमाणें बाळाजी नाईक भिडे ह्यांस फत्तेसिंगांनीं नियोजित केले) [ऐ, पत्रव्य. ले. १८२]

श. १७०१ कार्तिक शु॥ ८ इ.१७७९ नोवें. १६ (जिलकाद ७)

नानांचें महादजींना पत्र–गुलजारखानाकडील फौज मोकळी जाली त्यांपैकी सरकारची फौज जी तेथें आहे ती वसईकडे पाठविण्याकरतां इकडे आणविली. भगीरथराव व होळकराकडील फौज गुजराथेस रवाना करावी. १० ह. फौज रवाना व्हावी. कोंडाईबारीवर फौज नसली म्हणजे बडोदे अहमदाबावेवरी जाऊन फैलाव करतील. म्हणून दोहों तोंडावरी फौज असल्यास फैलाव करूं पावणार नाहींत. वसईकडे फौज रवाना केली आणखीहि रवाना करूं. विसाजी केशव ह्यांनीं किल्याचा बंदोबस्त केला आहे. [महा. का. ले. ५३]

,, –कार्तिक शुद्ध इ.१७७९ नोवें. पहिला पंधरवडा (जिलकाद)

नानांनी सांडणीस्वारांबरोबर महादजी करतां सदाशिव दिनकराकडे गीवेकर 'फिरंग्याचे तहनाम्याची नकल पाठविली.' व त्याचे उत्तर येऊन फिरंग्याचे वकिलासी बोलले पाहिजे चौ दिवसांचा वायदा केला आहे. असेंहि लिहिलें. [महा. का. ले. ५४, ५५]

,, –कार्तिक वद्य इ.१७७९ नोवें. दुसरा पंधरवडा (जिलकाद समानीन)

नानांनीं मुंबईहून बाळाजी रघुनाथ यांजकडून आलेलींहि पत्रें पाटिल बाबांकडे पाहावयास पाठविलीं. [महा. का. ले. ५६]

,, –कार्तिक कृष्ण २ इ.१७७९ नोवेंबर २५

श्रीमंत राजश्री नाना ग्रहणासाठीं भीमेस भोसेगांवीं गेले होते. राजश्री मोरोबादादाच्या पुत्राच्या पोटांत कबलू जाली यास्तव तुला याणी जाऊन केली. कालच माघारें आलें. वोठेकर व पवार आदिकरून शिंद्यांकडेच कारभार होत आहे. याणीं (नानानीं) भलतें होय नाहीं म्हटल्यास शिंदे ऐकत नाहींत, त्यांचे म्हणणें यांस ऐकणें प्राप्त होते ! सारा डोल तिकडे पडला आहे. येथील कारभारात राजश्री नाना व राजश्री हरिपंत तात्या शिवाय तिसरे थोडे बहुत कृष्णराव (काळे) असतात. फार करून तात्या खेरीज कोणती गोष्ट होत नाहीं. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३४९६ ले. २५१४]

श. १७०१ कार्तिक शुद्ध ५ इ.१७७९ नोवें. (जिलकाद ४ समानीन)
नानांचें कृष्णराव नारायण जोशी, हैदरकडील पेशव्यांचा वकील, यास पत्र–पाटिलबाबा तर्फे त्रिंबकराव आपाजी येत आहेत. तुम्ही, मशारनिल्हे व रास्ते यांजकडील गोविंदराव त्रिवर्गाची एकवाक्यता असावी. तिघांचें बोलणें एक घडत असावें. दरज आंतबाहेर न पडावी. [खं. १९ ले. ४]

,, –कार्तिक वद्य १२ इ.१७७९ डिसें. ४
परशरामभाऊनी, राजश्री नानांचें मतें, घोरपडीवर मुक्काम होता तेव्हांच सामोरें येऊन भेटावें असें होते. परंतु (भाऊसाहेब) बातमी कळो न देतां गुरुवारी भोजनापूर्वीच कूच करून सूर्योदयास नानांचें डेऱ्यास आलें तों नाना हजामतीस बसले होते. तसेंच येऊन भेटले. तेथेंच भोजनास राहविलें मग बोललें कीं, आला उत्तम आहे. आमची बातमी चुकली. याप्रमाणें वारंवार कांहीं होणार नांहीं." या प्रमाणें विनोद नांनानीं केला. नाना आज येथें येणार आहेत." [ऐ. ले. सं. ७ पृ. ३४९७ ले. २५१५]

,, –मार्ग. शुा ७ इ.१७७९ डिसें. १५ (जिल्हेज ६ समानीन)
नानांचें कृष्णरावास–हैदराकडील वकीलांस—पत्र हैदरखानाच्या करीमखान ह्या मुलाचें लग्न होणार ठीक आहे. यथापद्धत अहेर रवाना होईल. पण अदवानीचा महसरा = वेढा आधीं उठेल तें नरसिंगरावास सांगून निजामअलीखानाकडून करवावे. [खं. १९ ले. ११] चेनापटकड जावें. मोठ्या मसलती याकरतां तटून राहिल्या आहेत. तरी हें सत्वर घडावें. [खं. १९ ले. २६]

,, –मार्ग. शुा १५ इ.१७७९ डिसें. २३ (जिल्हेज १४ समानीन)
परशरामभाऊ––पुण्याहून रा. बाळासाहेबास मिरजेस. राजश्री महादजी शिंदे यांसी दुष्टबुद्धि निर्माण झाली आहे. फौजेची अद्यापि तयारी नाहीं. इंग्रजांचा तर बिघाड करविला. शिंदे

स्वस्थ जांबगांवीं आहेत. त्यांचें (नानास) म्हणणें, हरिपंत तात्या तुम्हाजवळ आहेत. ते नसावें, आमचे त्यांचें ठीक नाहीं. ते मनस्वी तुम्हांस शिकवितात. यास्तव त्यांनीं घरीं बसावें, तरच तुमचा आमचा स्नेह, मी (गुजराथच्या स्वारीस) आज निघून जाईन. यावर चितो विठ्ठल व सदाशिव रामचंद्र तुम्हां जवळ आहेत तें इकडे आम्हांकडे पाठवून द्यावें ' तुम्ही निघून सुरतेच्या सुमारें जावें ' तेव्हां सनदा देऊं. हरिपंताचें नांव काढूंच नये. असें रा। नारो शिवदेव यांजसमागमे (नानांनी) सांगून पाठविलें आहे. उत्तरें आलीं नाहींत. आठ दहा दिवस झाले. शिद्यांच्या लष्करांत आवई पडली कीं "हरिपंत व परशरामभाऊ असें फौज घेऊन लुटावयासी येतात. त्याजवरून तेथें दोन प्रहरांच जिनबंदी जाहली.' राजश्री नानांचा भार भरंवसा सर्व पाटलावर, असें असतां अशीं चिन्हें होऊं लागलीं आहेत. कोठवर जाऊन कशीं ठरतात पहावें. ' येथें म्हणावें तर पांच हजार फौज चांगली आहे. शिद्यांच्या लष्करांत आवई पडली, यास्तव त्यांनीही फौजेस पत्रें पाठविलीं. हें विचारांत पडले आहेत. शिंदे जे म्हणतात तें कबूल करतात. तथापि त्यांची रीत अशी " [ऐ. ले. सं. ७ पृ. ३४९८ ले. २५१६]

श. १७०१ मार्ग. वद्य १३ इ.१७८० जाने. ४ (जिल्हेज २६)

नानांचें पत्र--इंग्रजांच्या बोलावण्यावरून लक्ष्मणराव चिटणिसास सुरतेस पाठविलें. चार महिने नुसतें बोलणें. बाहेर गोड बोलावें आंतून लढाईचें सामान करावें. तेव्हां गोष्ट मगरूरीची जाणून पारपत्य करणें जरूर. इंग्रजांनीं चहूं दिशेस आकर्षण केलें आहे. याकरतां निजामअलीखान यांनी सिकाकोल राजबंदरकडे, भोसल्यांनी बंगाला मारावा, हैदरनायकानी चेनापटणकडे व सरकारांतून सुरत, अहमदाबाद वगैरेकडे जाऊन इंग्रजाचे पारपत्याचा निश्चय परस्पर ठरला. शिंदे होळकरहि सुरतेकडे जाणार सर्वहि उत्तमच होईल [ऐ. पत्रव्य. ले. १९३]

श. १७०१ पौष शुा ८ इ.१७८० जानेवारी १५

नानांचे घरीं बळवंत महादेव भिडे हे महिना दीड महिना होते. त्या भिडयांचे घरीं एक बाटीण जात चोरून कामास होती. त्यामुळें नानांना संसर्गदोष. त्याचें प्रायश्चित दहा मासे सुवर्ण ब्राह्मणांस देऊन पंचगव्य घेऊन नानांनीं केलें. इतर पंगतीस असलेल्या कारकून भिक्षुकांनी प्रायश्चित्त केलें. [ऐ. ले. सं. ७ ले. २५१९]

,, –पौष वद्य १३ बुधवार इ.१७८० फेब्रु. २

त्रिंबकभट वाटवे—राजश्री रघुनाथराव पटवर्धन त्यासी. भाऊ म्हणालें, या नवर आपली स्वारीस जाण्याची निभावणी होणार नाहीं, तें पक्षीं रिकामें जावें, देवस्थापना करावी पंचमीचें दिवशी राजश्री हरिपंत तात्यानी येऊन राहविलें. तदनंतर राजश्री नानांनीहि बोलावून नेऊन मायाममतेनें फार भाषण केले, परंतु ऐवज जाजती द्यावा हें कांहींच नाहीं. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३४९९ ले. २५१८]

,, –पौष इ.१७८० जाने.

नानांचें पुरुषोत्तम महादेव हिंगणे (दिल्ली) यांस पत्र—तुम्ही बादशहा व नजीबखान याशीं बोलून ते गोहदकर जाठास कुमक न करीत तें करणें. तिकडून इंग्रज येतील तर ठासून राखावें. नजीबखान व हें सरकार यांची एकवाक्यता होयसें करून इंग्रजास ताण बसून इकडे न येत तें करणें. हैदरनाईकाकडील विजापूरचे सनद विषयीं फिरून पैगाम करतील तरी संधान राखून, सनद न द्यावयाचें पक्कें करणें. [इ. सं. दि. म. रा. ले. १]

,, –माघ शुा २ इ.१७८० फेब्रु. ७ (सफर १ समानीन)

नानांचें कृष्णराव जोशी यांस श्रीरंगपट्टणकडे पत्र—इंग्रज जात पकी.....संमंधा खेरीज समजत नाहीं. त्यांचे चालीस, पांच वर्षें संमंध आला त्यावरून माहितगिरी जाली. कौल करार

इमान ज्यांचे गांवीच नाहीं. प्रथम लिहिणें बोलणें परम गोड. दुसऱ्यांस असें वाटावें कीं, काय इमान वचन आहे तें यापासी, खरेपणाची रास, ऐसी भूलथाप पडावी. पण परिणामीं उमजतें. त्याची नजर केवळ वाकडी, सर्व मुलूख कबज्या केला, दक्षणचा दाइया राखितात, एकास मिळवून घ्यावें, एकास हलकें करावें हे जात करण्याची. फोडाफोड करावी, नाद राखावा, ऐसें आहे. त्यास दक्षण दोन लाख घोड्यांची विलायत. त्या गरिबानी काय करणें. परंतु न होण्याचे ते मनसबे करतात. दुसरे ज्याचे इमान सुटले आणि वचनाची कायमता नाहीं, ते दौलत काय एका दिववात बुडती हा नेम आणि ईश्वरें असें जाणूनच होणारा प्रमाणें राव पंत प्रधान, नबाब निजामअलीखां, नवाब बहाद्दर, व भोसले इतक्यांचा एका होऊन, ठाईं ठाईं त्यास ताण बसावे, ऐसें ठरविलें. त्याचा गरूर उतरल्याखेरीज दक्षणचा दाब व बंदोबसहि नाहीं. [खं. १९ ले. ५६]

" –माघ शु॥ ३ इ.१७८० फेब्रु. ८ (सफर २ समानीन)

नानांचे कृष्णराव तात्या (श्रीरंगणपटण) यांस पत्र—बसालतजंग यांचे वकील पट्टणास आहेत त्यांसी नबास बहाद्दर ५० ह. होन मागतात. ऐसियास त्यापासोन पैका घ्यावा मग उपद्रव मना करावा ऐसे करारांत नाहीं. कराराप्रमाणें अदवानींचा उपद्रव न व्हावा. मुदगल तालुक्यास नवा उपद्रव देतात तोहि न देणें. अदवार्दीचे सत्वर महसरा दूर व्हावा. थोड्यासाठीं वाकडे न दिसावें. [खं. १९ ले. ५९]

" –माघ इ.१७८० फेब्रु. पहिला पंधरवडा

नाना आणि महादजी शिंदे या मध्यें सलोख्याचा करार झाला तरी उभयतांचीं मनें तितकीं निर्मल व निःशंक नव्हतीं. प्रथम शिंदे यांनीं आपणांस नानाच्या वर्तनांतील कांहीं गोष्टीविषयीं कसा संशय आला तें सांगितलें. महादजींनीं 'राज्याचें व

नानांचें कल्याण त्याच गोष्टी केल्या असतां फलादेश ऐसा; असें म्हटलें तीं कलमें ९ [ले. ५९] व ह्या संशयाचें निराकरण नानांनीं उत्तमपणें केलें आहे. त्यांत ते म्हणतात 'गैर वाजवी ज्यांचें काम असतें त्याचें मनाजोगें जालें नाहीं म्हणजे तो भलतेंच लिहितो.' शिंदे यांशी 'आम्ही जन्माचा भाऊपणा मेळविला तेथें अशा कल्पना कशा येतील.' 'सरकार किफायतीची वाजवी कामें हजारों सांगोन पाठवावीं तीं आम्हीं करावीं हीच इच्छा आहे. तेथें तपशील कशास.' 'सर्वांचे डोळे पाटिलबाबांकडे आहेत. हें नमूद जालें म्हणजे सर्वांस गोष्ट मसलतीस लागणें प्राप्त. नाहीं तरी हाताचे पायावर घालतील. याजकरतां पैंदर पैं लिहीत गेलों' इ. इ. कलमें १० [महा. का. ले. ७७]

,, –माघ शुा १३ इ.१७८० फेब्रु. १८ (सफर १२ समानीन)

नानांचे सदाशिव दिनकर–दाजी यांस पत्र (तापीतीर)— हैदरनाईकाचा वकील नरसिंगराव यांचे विद्यमानें तह व निभावणीपत्र पाटिलबाबांचे सल्लेनें जाले ते पाठविले. बावांस दाखविणें. सांप्रत जिकडील तिकडे फौजा गुंतल्या हें जाणून नाइकानें तह फिरवून नव्या तहाचा व निभावणीचा मसुदा पाठवून 'त्याप्रमाणें जाहल्यास तह करतो, नसल्यास वकिलास निरोप देतो.' असें म्हणतो. आम्हांस नाइकाचे हे गुण ठाऊक. पाटिलबावांस कळावें आणि आम्हांस व पाटिलबावांस नाइकाची आलेली थैलीपत्रें पाहण्यास पाठविलीं. तरी काबू जाणून आज तहनामा पाठविणें प्राप्त. त्यावर पाटिलबावांचें म्हणणें 'थोरल्या दौलता वचनावर चालत असतात. तो बळकटीचा प्रकार त्याचा जर गेला. फेर पगडी जर बदलली, तर तह करूं नये. कारण, वचनाची बळकटी व निभावणीची शक्ति दोन अर्थ उणें पडले, तेथें सर्व गेले. त्यापक्षीं पत्रें पाठवूं नयेत. आम्ही त्यांस पत्र लिहिलें. येणें करून देहावर येईल.

[महा. का. ले. ८३] रा. पाटिलबावांची फौज विसाजी आपाजी व भगीरथराव यांचे मदतीस गेली म्हणजे अहमदाबादचा उपराला होईल. गायकवाड त्यास मिळून गेले. अहमदाबादकरास शिबंदीचे देणें भारी हा पेंच, दुसरें इंग्रजाचा दाब. गायकवाड इंग्रजास सामील, यामुळें त्यांचा टिकाव होईल न होईल. कदाचित इंग्रजानीं अहमदाबाद घेतली अगर सरदारांच्या दबावानें भडोचेत राहिले तरी जेथें राहतील तेथें जकड बसवावी. अनमान करूं नये. जलदी जाल्यास लवकर गुंता उरकेल. [महा. का. ले. ८४]

,, –माघ वद्य ७ इ.१७८० फेब्रु. २६ (सफर २० सु. ११८०)

नानांचें कृष्णरावांस पत्र—नबाब बहादुर यांजकडून मसविदा आला त्याप्रमाणें सरकारांतून करारनामा करून दिला. अदवानी वगैरेस उपद्रव न द्यावा इतकें मात्र अधिक. ऐसे असतां त्यांतील दोन कलमें मोठींच काहाडलीं. तेव्हां करार राहून नवें बोलणें आलें. 'दौलतीत अहाद शर्त आणि वचन हा खजाना.' करार जाला याप्रमाणें आपलाले कार्यावर जावें. नाहींतर अगोदर चेनापटणकडे चाल करतील आणि आम्हावर हार्फ ठेवतील. खंडणीचे दरोबस्त एक साल व नवा मुलूख सुटेल तो, पटणास लगता, सबब बहादरानी घेऊन, सरकारचे लगता असेल तो द्यावा वगैरे नुकसानी आहे. सरकारांत ५।६ वर्षांचा खिसारा आहे. दोस्ती जाली तेव्हां इकडील खिसारियाची फिकीर त्यांस आहे. [खं. १९ ले. ६९]

,, -माघ वद्य १४ इ.१७८० मार्च ५ (सफर २८ समानीन)

नानांचें कृष्णराव जोशांस पत्र—मुसा लाली फरासीस निजाम अलिखां यांजकडून कांहीं खतरा आला म्हणोन पटणास नबाब बहादरांकडे आला. सरकारांतहि त्यास नोकर ठेवावे असें होतें. मुसा चांगला माणूस इग्रजाचे कामावर जमाव देऊन घालवावे. नवाब बहादुरानी चेनापटणकडे जावें. [खं. १९ ले. ७३]

,, –माघ वद्य ३० इ.१७८० मार्च ६ (सफर २९ समानीन)

इंग्रजाकडील च्यार कुमसेलवाले पटणास आले. नवाब बहादरांसहि त्यांविषयीं नक्ष आहे. जात मकरी म्हणोन त्यांचें लिहिण्यांत आहे. इकडून ल्याहावेसे नाहीं. त्यांस येऊंच न द्यावें. 'तुमचें प्रयोजन नाहीं, न येणें' असें सांगावें. कारण, उगीच बातमी तरी घेऊन जातील. तीहि पोंहचूं न द्यावी. कलकत्याची पत्रें सरकारांत येत होती त्यास जाब देणें मना केलें. सिलसिला तोडला. बलकी वकील चेनापटणास आहे त्यांस इंग्रजानी रुकसत दिल्यास त्याणीहि निघोन यावें. सिलसिला राखूं नये. मसलत नासेल. [खं. १९ ले. ७४ व ८७]

,, –फाल्गुन शुा ८ इ.१७८० मार्च १४ (पौ रवल ७)

नानांचें कृष्णराव व गोंविंदराव गणेश यांस पत्र—तेथून याद आली त्याप्रमाणें तहनामा पाठविला असतां सरकार नुकसानीचा मसुदा करून पाठविला, तोच मान्य करणें प्राप्त. कारण मसलत आरंभली. सरकारचे तहनाम्याप्रमाणें त्यांचे कागदपत्र उगऊन घेणें. करार फिरऊन दुसरा पाठविला त्यापेक्षां मिरजकर वगैरेंची गोष्ट अधिक नाहीं. त्याणी ऐकावी. [खं. १९ ले. ८४]

,, –फाल्गुन वद्य ४ इ.१७८० मार्च २४

उभयपक्षीं आगत्य जाणोन व इंग्रजास तंबी करावी यांत सर्व दौलतदार यांचें कल्याण आणि नफे ऐसे समजोन नवाब बहादर यांचे मर्जीनुरूप करार व निभावणी पत्रें पाठविली. आतां विलंब न लावितां इंग्रजास ताण बसवावा. दिवसगत न लागावी. आम्हांकडे कांहीं उसीर नाहीं ऐसे उफराटें नवाब बहादुर म्हणत होते ते कांहीं आतां राहिलें नाहीं. [खं. १९ ले. ८७]

,, –फाल्गुन वद्य १३ इ.१७८० एप्रील २ (रवल २६)

नानांनी पाटिलबावांस लिहिलें, 'इंग्रजाची मसलत भिजली आहे. कलकत्याहून इंग्रज कंपू येतो तोंपर्यंत तुम्हांसी बोलतील व मग तीव्रता करतील. तर त्यासी बोलणें युक्त नाहीं. जोंवर कंपू आला नाहीं तोंवरच जलदी करून पारपत्य होय असें करावें. येथून सरंजाम जे पाहिजे ते रवाना करतों. परंतु पारपत्य होय तर बरें आहे.' पाटिलबावांसी निर्मत्सर आहोत आणि तेहि तसेच आहेत]

१७०२ चैत्र शुा १ इ.१७८० एप्रील ५

नानांनीं महादजींना कळविलें कीं, गाडदी व फौज वगैरे सरंजाम भारी करावा लागला, नित्य लढाईशीं संबंध, ऐवजाचा तोडजोडीचा विचार याउपरी राहिला नाहीं. त्यांस आपले महालचा दहकचा ऐवज आल्यास उपयोगी पडेल. (यावर शिंदे यांनीं लिहिलें कीं, दहकचा ऐवज आम्हाकडे ठरेल तो नारो शिवदेव यांजकडे कळवावा. निशा करून देववितो) [महा. का. ले. ९३; १८५]

,, –चैत्र शुा १४ इ.१७८० एप्रील १८ (रखर १२)

नानानीं महादजींस विचारलें कीं, हैदरानें फरेंचास हाताशीं घेऊन २।, २।। करोडचा मुलूख काबीज केला व इंग्रजांचें पारिपत्य केलें; हैदराशी वचन गुंतलें आहे. त्यास सोडून (व मदत न देतां कांहीं) करतां येत नाहीं. इकडे घराजवळ बोरघाटी मसलत. भारी फौज नेहमीं असावी. तथापि कृष्णराव नारायण यांजबरोबर ह. फौज देऊन रवानगी केली, हें कसें काय ? महादजींचें उत्तर कीं, रवानगी केली हें उत्तम. एक इंग्रजाचें पारिपत्य जाल्यासिवाय कोणतेही गोष्टीची सोय नाहीं. [महा. का. ९४]

,, –चैत्र वद्य ६ इ.१७८० एप्रील २४ (रखर १८)

नानांस व हरिपंतास दगा करावा ही मसलत बळवंतराव पटवर्धन व गोपाळ जोशी या उभयतांनी केली. त्यांचे बुद्धीस भ्रंश मोरो हरी, निष्णु नरहर, दादा पोतनीस, वासुदेवभट कर्वे यांनीं केला. ह्या दग्याच्या मसलतींत पार्वतीबाई होती! पण हें उघडकीस येऊन त्यांस कैद केले. स्वामीच्या निष्ठेची परिक्षा २।४ वेळ दृष्टीस पडली. सर्व जनांनीं पाहिली. जेथें ईश्वरी कृपा व निष्ठा बलवंत तेथें दुष्टाच्यानें काय व्हावयाचें आहे? दुसराहि फितूर नारो गोपाळ, त्रिंबकजी भालेराव, गोगटे ह्यांचा इंग्रजांकडे. कीं 'सोमवारी छापा घालावा 'अशी निरोप चिठी. तें उमगलें. [महा. का. ले. १०१; इ. सं. ऐ. टि. १ पृ. ५६] तसेंच गोपाळराव रामचंद्र हा फत्तेसिंग गायकवाडचा वकील पुण्यांत होता, त्यानंतर श्रीमंताकडील, स्वामीकडील व हरिपंततात्याकडील कारकून व दोन हुजरे असें सुरतेस सांबाकडे व मग गायकवाडकडे गेले. फिरोन सांबाकडे हें कळोन बावा विषण्ण झाले. 'मसलतीचा जिमा आमचा, आणि आंतून राजकाणें अशीं!' याजकरितां जी गोष्ट करणें ती बावांच्या अन्वयें जाहल्यास गोड. [महा. का. ले. १०१]

,, –चैत्र वा। ७ इ.१७८० एप्रील २५

नानांचें नरसिंगराव तमाजी—मु॥ श्रीरंगपट्टण, हैदराकडील पेशव्यांचा वकील–यांस पत्र. हैदरखान याचें निघणें अद्याप झालें नाहीं. मसलतीचे दिवस, त्यास तुम्ही, कृष्णराव, गणपत॰ राव, मिळोन सांगोन नबाबबहाद्दर चेनापट्टणास जाऊन इंग्रजास ताण बसेल तें करावें. [काव्ये. प. या. ले. २५५]

श. १७०२ चैत्र वद्य ११ इ.१७८० एप्रील ३० (रखर २४)

नानांचें महादजींना (सदाशिवपंतांकरवी) पत्र—रा. पाटील बाबांचीं बोलणीं तेथें विक्षेपाची होतात. त्यांचीं लिहिलीं लोकांच्या घरीं इकडे येतात, तेव्हां इंग्रजाचेहि घरीं बातमी जात असेलच. ही. गोष्ट मसलतीस वाईट. हें ध्यानांत येतें कीं नाहीं ! रती इतकी दरज पडली असतां शत्रूस बळ किती येते याचा विचार करतात कीं नाहीं ? त्यांतहि कोठें वांकडें पडलें असलें तरी थोर आहेत ते वांकडे दाखवीत नाहींत. मग येथें तर भाऊपण अकृत्रीम. वांकडे रतिमात्र नसतां उगेच कोतें अंदेशें माणसाच्या लिहिण्या सांगितल्यावरून निष्कारण विपरीत अर्थ करून बोलावें, हें तर फारच विलग. या पासून उमदेहि सरत्ये. अगर बोलण्यानेंच संतोष होतो तर एकांतीं बोलत जावें. पाटिलबाबांचीं तुमचीं पत्रें येतात त्यांत एक पत्र तरी सर्वांचें वकील बसलें असतां वाचून पहावें आणि शत्रु व बाहेरील आहेत त्यांस एकत्वाचा, स्नेहाचा ऐकल्यावर दाब पडावा, इष्ट आहेत त्यांस गोड वाटावें, असें पत्र नाहीं. जीं पत्रें येतात त्यांत मनांत कल्पना नाहींत व न यावयाच्या त्या घेऊन व कित्येक रोषें करून व विपरीत अर्थ करून लिहून येतात. तीं एकांतीं वाचावीं, त्याचे पाऱ्हेरे उत्तरें लिहून पाठवावीं, या खालीं दिवस गेले. होळकरांकडील मजकूर पत्रीं लिहितां परंतु प्रस्तुत मसलतीचे दिवस, वाटेंत लुटारीहि फिरतात, एखादें पत्र त्यांकडे गेल्यास तूर्त मसलतीस अपाय. याकरतां तजविजीनें पाठवीत जावें. पाटिलबाबांचें पारिपत्य जाहालें तरी सरकारकाम, अशा गोष्टी बाबांच्या मनांत येऊं लागल्या त्याचा परिहार लिहिता कशा जातील. ईश्वर त्यांच्या बुद्धीस काय साक्ष देईल ती खरी. जासूद आला कीं लखोटा फोडण्यापूर्वीं चित्तांत येतें कीं काय नवा विक्षेपाचा ग्रंथ रचला असेल ! फोडून पाहावें तों तेंच निघतें. बरें आहे. कितीहि वाईट वाटण्याजोगें बोललें व लिहिलें तरी आम्ही चित्तांत वांकडे काडीभर

आणणार नाहीं व करणार नाहीं. यांस कारण, एकतर आम्ही शुद्ध बुद्धीनें पाटीलबावांचे ठायीं चालतों, दुसरें, खावंदाचे कार्यावर नजर. मग वाईट कशास वाटेल ? [काव्ये. प. या. ले. २५३]

,, –वैशाख शुा २ इ.१७८० मे ६ (सु. ११८० जवल १)

नानांनीं महादजींच्या सल्ल्यानें इंग्रजाकडे मिळालेल्या फत्तेसिंगराव गायकवाड यांजकडे गेलेल्यांचीं घरें जमीनी जप्त करण्याविषयीं—प्रांत खानदेश, कर्डे, वांई, कऱ्हाड, आमदानगर, संगमनेर, अकोले, नाशीक, गंगथडी, जुन्नर, सोलापूर, चांदवड येथील अधिकाऱ्यांस सनदा पाठविल्या [स. मा. रो. १ पृ. १८८–१८९; महा. का. ले. १०० पृ. १०१ पहा]

,, –वैशाख शुा ४ इ.१७८० मे ८ (जवल ३)

नानांनीं हैदरखानाकडून दरबार–खर्च म्हणून जे रुपये आले त्यांतील शेंकडा दहा वजा करून बाकी सरकारमसलतीसाठीं खर्चा करतां घेतले ते रु. १४,१७,५००. ह्यांत रास्ते, कृष्णराव बल्लाळ काळे, हरिपंत फडके, पाटीलबावा व नाना त्यांचें मिळून ३॥ लाख होन आले. त्याबद्दल पाटिलबाबांकडे नारोपंत पोंक्षे यांकरवी पाठविलेला हिशेब [काव्ये. प. या. ले. २५४; महा. का. ले. १८५, १८७]

,, –वैशाख वद्य १ इ.१७८० मे १९ (जवल १४ समानीन)

महादजी नानांच्या पत्रानंतर उत्तरीं नानांना लिहितात कीं, विसाजी आपाजी यांस संकल्प–विकल्पाचे निवृत्तीचा मजकूर लिहिला त्यावरून सविस्तर कळला. ते लिहितील त्यांशी बोलण्यांत आले. सारांश श्रीमंताचे पायासी व आपले भाऊपणासी अंतर जालें नाहीं. पुढें व्हावयाचें नाहीं. आपणाकडूनहि तसेंच असावें. [महा. का. ले. १०२]

,, –वैशाख वद्य ३ इ.१७८० मे २१ (जवल १६ सु. ११८०)

नाना कृष्णाजीस लिहितात, राव पंत प्रधान यांची दौलत मोठी, सिपाई लोकांची विलायेत, येणे कडून मजबूत. दुसरें नबावबहादुर याची दौलत भारी. तर्तूद चांगली, सरंजाम पोख्त आणि तरफैन दोस्ती जाली. तेव्हां वरकडाचीं स्वरूपें व तेज राहणार नाहीं. उभयतां एक असतां इंग्रजास मोजितात ऐसें नाहीं. व सरकार व शेहर आहे तेथें मनस्वी गपा उठतच आहे. (ले. ११७) दौलतीची कामें कोठें बाजारु आवयावर चालतात कीं काय ? त्यास इतका तपसील पारहेरा (परिहारार्थ विस्तार करून) ल्याहावा लागतो. लबाड लिहिणार त्यास फजित करून पारिपत्य असावें कीं नाहीं ! (ले. १२५) [खं. १९ ले. १२७ महा. का. पृ. १६७ पहा. महादजींनी असेंच लिहिलें आहे.]

,, –वैशाख वद्य ६ इ.१७८० मे २४ (जवल १९)

नानांचे महादजींकडील वकिलांस–सदाशिव दिनकर—पत्र. 'हैदरखानाचे निभावणी पत्र मसुद्याप्रमाणें द्यावयाची परवानगी जाहली होती; इतक्यांत अशेरीचे किल्लेदारावर शिबंदी चढली होती त्यास खर्चास आले, जमातदारांस खातरजमेचे पत्र आलें, हे वर्तमानावरून, मना जाहले.' नाना लिहितात. अशेरीच्या मजकुराची संभूतीहि नाहीं; चौकशी पाहिजे तशी करावी. उगेच निमित्त काढून सरकार काम विलग पाडावे हें न व्हावें. एवढा मोठा मनसबा एका पत्रा खेरीज विलग पडतो. हैदर-खान चिनापटणाकडे गेला कीं सरकारचा पैसा येईल, नबाब शिकाकोलकडे जाणार. तरी निभावणीपत्र यावें. संदेहाचें मूळ येथें काडीमात्र नाहीं. (म्हणून एका अर्थी) एका घटकेंत ते दूर करतां येतील. मनसुबा जाहल्यास सांभाळणार नाहीं. [काव्ये. प. ले. २५८; महा. का. ले. १०० पृ. १०२]

नानांचें महादजींकडे पत्र—

बावा म्हणतात–(१) आमची विकृती कारभाऱ्यांस आली. त्यास कारभारी असतील त्यांस विकृति येईल. आम्ही श्रीमंतांचे सेवक, चाकरी करावी इतकें जाणतों. सुचेल तें ल्याहावें बोलावें, करावें, जेथवर आपले वस्तु सेवा होईल ती करावी. सर्व भार पाटीलबाबावर असतां अशीं बोलणी, याचें कारण कांहीं दिसत नाहीं. जे दौलतीचे स्तंभ, ज्यावर मदार आणि आमचा अकृत्रिम भाऊपणा असतां 'जांबगांवींच आमचें पारिपत्य करीत होते' हे बोलणें कसें निघालें ईश्वर जाणें. (२) 'डाव चुकला म्हणोन गायकवाड इंग्रेज यांस मेळवून पारपत्य करावें' हें तों त्याहून विशेष कल्पना! याचें उत्तरच नाहीं. यांत एक खरे कीं, निष्ठेंत अंतर नाहीं. येणें करून इंग्रज गायकवाड फजित पावत गेले व ज्यांनीं लबाडचा केल्या तेहि फळें पावलें हे यथार्थ. (३) बाबा म्हणतात कीं, दर जुंझांत आमचे घोडे माणूस जखमी व मरत गेले; इतर कोणाचें नाहीं. नाना :—जो तमाशा पाहणार त्याचें कशास मरेल ही उघडीच गोष्ट आहे. (४) बाबा म्हणतात कीं, आम्ही तों भ्याड; नाना :–ज्याणी बहुत लढावा मोठ्या मोठ्या मारल्या त्यांस भ्याड म्हणत असतील ते बुद्धिमान म्हणावे!! (५) पाटिल बाबा म्हणतात–गायकवाड, दादा, इंग्रज यांजकडे चौघे कारकून; त्यांतहि आम्हांला न भेटता, कां पाठविलें? —नानाचें उत्तर–ज्यापक्षीं कारकूनच येथें पाटिलबाबाकडील कारकुनास भेटविलें; तेव्हां अवघ्याच गोष्टी संदेहाच्या. मुळीं कारकून गेले नाहींत. ते बाबांस भेटून न गेले हें ठीकच आहे. त्यावरून एक खरें कीं, जिकडे इंग्रज जाईल त्याचे छातीर छावणी प्राप्त हें सिद्धच झालें. ही फार चांगली गोष्ट आहे. (६) पाटिलबाबा म्हणतात—दुरून चाकरी करून बेमानी होणार नाहीं, रेवा उतरणें नाहीं. नाना :—ही बोलणी मर्जी असल्यास त्याणीं बोलावी. परंतु श्रीमंत लहान, सर्व भार पाटिलबावां-

वर व दौलतेंत जीव काय आहे ,हें सांभाळावयास योग्य कोण हे सर्व अर्थ त्यांस समजतात; मग आम्हीं काय लिहावें ? या गोष्टी बोलण्यांत देखील येऊं नयेत, कारणहि नाहीं, ज्यांच्या घराण्याचें एक निष्ठतेचे बाणे चालत आले, त्यांच्या चित्तांत 'दुसऱ्याच्या छायेस पोट भरूं' हीं अक्षरेंच येणार नाहींत. (७) बाबा म्हणतात—इंग्रज गायकवाड मेळवून घेतले. नाना——मग त्यांचा बेलापूर, परसीक, पनवेल, तलोजा, कल्याण येथें त्यांचे ४।५ शें माणूस गोरे व फिरंकीवाले ठार, तोफा गरनाल पाडाव, कांहीं गोरे धरले. एक सरदारहि पाडाव आणिला, हें मिळवून घेतल्यावर असें कां व्हावें ? सारांश. इकडून दादांशीं व (बायका नव्हे) बॉढम, गायकवाड यांकडे कोणी राजकारणास पाठविले नाहीं. बावांचें वांकडे व्हावें हें चित्तांतहि नाहीं. इंग्रजांच्या मसलतीचा अखत्यार पाटिल-बावांवरच आहे. कोणेहि प्रकारे मसलत चांगली शेवटास जावी, भाऊपणा दिवसेंदिवस अधिक चालावा हीच इच्छा. [काव्ये. प. ले. २६२; महा. का. ले. ९७]

—वै. वद्य ६ उभयतां सरदार कोंडाईबारीवर राहिले असतां इंग्रजावर जरब चांगली राहील. व ब-हाणपूरचे छावणींत एकहि रोख राहात नाही. तेथें राहणें मसलतीस ठीक नाहीं. कोणताहि प्रकार करणें तो मसलतीस पेच न पडे असाच बाबा करतील. सुचले प्रकार लिहिले. [ले. २६२]

—वैशाख वद्य ६ इ.१७८० मे २४ (जवल १९)

नाना महादजींकडे वकिलास लिहितात, तुम्हांकडून निमूल वृक्ष उभे होऊन येतात. त्याचीं उत्तरें सरळ रीतीनें लिहीत गेलों. कोंडाईबारीवर छावणी करतां गोड लिहावें' नाहींतर गोड लिहूं नये, असा भाव येथें नाहीं. मुळींच गोड आहे, लिहीत गेलो व लिहीत जाऊं. [काव्ये. प. ले. २६१]

,, –वैशाख वा। ६ इ.१७८० मे २४

नानांचें महादजी शिंद्याकडे असलेल्या वकिलास दत्र, कोंडाई-बारीवर छावणी करावयाचें मी बोलतो यांचें कारण इंग्रजांचें उरावर कटार राहील, इत्यादि पाटिलबाबा तिकडे आल्यानंतर एखादी गोष्ट त्यांचे दृष्टीस विलग पडली तर माझें पारिपत्य होईल. परस्परें सुखदुःखाचे सोबती पाटिलबावा आणि आम्ही; त्यांत क्रियाहि झाली. त्याप्रमाणें परस्परें करण्यांत येतें. तेव्हां दगाफटक्याची शंका तुमचे चित्तानें घेऊन कसें लिहिलें! तुमचा उपाय नाहीं! तेथील मंडळी बोलतां बोलतां चित्त बेहरम झालें त्यामुळें असें लिहिण्यांत आलें. त्यास या गोष्टी घडावयाच्याच नाहींत मग लिहितां काय? [काव्ये. प. ले. २६३]

,, –वैशाख वा। ६ इ.१७८० मे २४

नानांचें महादजी शिंद्याकडे असलेल्या वकिलास पत्र ज्या नव्या गोष्टी उत्पन्न करून संदेह घेऊन तुम्ही लिहितां त्याचें पान्हेरे मात्र विस्तारें लिहितो. कांहींच लिहूं नये अशी मर्जी असल्यास तसेंही घडेल. दोष लागावा अशा भावें करून लिहिण्यांत येत नाहीं. इरेस आम्ही काय घालावयाचें? थोर आहेत ते आपल्या एकनिष्ठेची व थोरपणाची इरे त्यांस असते. इरेस घालून सरकार काम करून घ्यावें; परंतु जे काम करीत नसतात त्यांस ही गोष्ट योग्य. इंग्रज गायकवाड यांसी राजकारण केलें नाहीं. तह करणें तरी चौघांचें विचारें करावा. इंग्रज बेमान हें खरें. [काव्ये. प. ले. २६४]

१७०२ वैशाख वा। ९ इ. स. १७८० मे २७

नानांचे महादजींकडे पत्र, इंग्रज रेवातीरीं असतां पाठीवरील फौज काढून आणिली येणेंकरून इंग्रज मोकळे झाले. गोविंदराव गायकवाड याज बरोबर फौज द्यावयाची तीच

कांहीं दिवस इंग्रजांच्या शहावर असती तर इंग्रज फैलावा करूं न पावते. बऱ्हाणपुरावर छावणी केली असतां मसलतीचा रोख सुटतो या करितां कोंडाईबारीवर छावणी करावी हें चांगलें. उज्जनीस छावणी असें झालें तर फारच विलग पडेल. [काव्ये. प. ले. २६७]

,, —वैशाख वद्य ११ इ.१७८० मे २९ (जवल २४,

नाना परशरामभाऊ पटवर्धनांना लिहितात, करवीरकर स्वामी छत्रपतींकडील तहाचें बोलणें येथें लागलें आहे तरी इतःपर त्यांजकडील तोरगल वगैरे किल्यास उपसर्ग न करावा. त्यांचे उत्तरीं भाऊनीं लिहिलें कीं करवीरकरांनीं कर्जफेडींत सावकारास दिलेंलीं गांवें दरम्यान सटवोजी भोसल्यांनीं घेतलीं तीं सावकारांचींच त्यांचीं त्यांस घेऊन दिलीं. तसेंच सेनापती राणोजी घोरपडे यांचीं गांवें त्यांचे पुत्र म्हाळोजी यांस घेऊन दिलीं. वरकड कारणाशिवाय उपद्रव लाविलाच नाहीं. [ऐ. ले. सं. ७ ले. २५४८]

,, —वैशाख वद्य १३ इ.१७८० जून १ (जवल २७)

नाना व्यंकटराव घोरपडे यांस लिहितात, तुम्हा समागमे फौज देऊन रवाना केले व तुम्ही बंदोबस्त केला असें लिहितां, पण मानाजी शिंदा व सटवोजी भोसले कराड प्रांतीं येऊन लुटतात; जयरायस्वामीचे वडगांव मोठे संस्थान तेंहि त्यांनीं लुटले हजारे पांचशे फौज घेऊन अलिकडे येऊन दोन दोन मुकाम ते करतात, त्यापक्षीं बंदोबस्त कोणे प्रकारें केला ! बातमी तुम्हांस कळत नाहीं काय ? कमाविसदारांची लिहिलीं येतात. तुम्हांस इकडे बंदोबस्तास ठेविले म्हणोन भाऊंनीं लिहिलें व खातरजमाहि होती कीं करवीरांकडील उपद्रव होऊं देणार नाहींत. परंतु बंदोबस्त न झाला. प्रतिनिधींचे ५ शें राऊत रवाना केले. ते येतील. बेसावध नसावे, बातमी राखोन पारिपत्य करावें. [ऐ. ले. सं. ७ ले. २५४३]

श. १७०२ ज्येश्ठ शु. १ इ. १७८२ जून ३ (जवल २९)

आपांजी राम नानांना लिहितात, ब-हाणपूर किंवा कोंडाई. बारी येथें छावणीस जाण्याबद्दल १।२ वेळ विनंती केली. सदाशिव दिनकर यांनी फार तऱ्हेने बावांस व मुत्सद्यांस समजाविलें. परंतु मुख्यांची मर्जी उज्जनीस जावयाचीच झाली. तीं भाषणें लिहितां येत नाहीं. कांहीं सदाशिवपंत लिहिणें तर लिहतील. येथील विचार कारस्थानीचे फार, ते स्वामीस विदितच. जोंपर्यंत काम, तों पावेतों लवणभंजन यथास्थित; मग त्या गांवचें स्मरण नाही. सूचना मात्र लिहिली [महा. का. ले. १०३].

, –ज्येष्ठ शुा ६ इ.१७८० जून ८ (जखर ४ सु. ११८१)

नानांनीं कृष्णराव जोशी (श्रीरंगणपट्टणचा हैदर दरबारांतील पेशव्यांचा वकील) यांजकडून गुलाबी, कृष्णागर, मलयागीर, व साधा ऐसा सरस पक्के पांच मण सरकारांत व खासगत खरेदी करून मागविला. कुंकुमागरहि मागविला. महादेवाची व विष्णूची मूर्ति—पर्वतीस महादेवाची मूर्ती आहे त्याप्रो चांगली मात्र असावी मिळवून पाठवावी. पैका देविला जाईल असें पत्रीं लिहिलें. [खं. १९ ले. १४१]

" –ज्येष्ठ वद्य ३ इ.१७८० जून २० (जखर १६)

पातदशहानी व नजबखानानीं शपथ वाहून सांगितलें कीं नानांनीं लिहिलें हेंच आमचे चित्तांत आहे. इंग्रजाचा रुपया पातशहासी घेऊं दिधला नाहीं; वचनींहि गुंतूं देत नाहीं. पातशहा दिल्लीस फौज आणा म्हणतात. हरिपंत अथव महादजी एकानें दिल्लीस राहून २ ल. रु. पातशहास खर्चास देऊन हे स्थलीं करोडीचीं स्थलें हस्तगत करावीं. इंग्रजासी तिकडे तह करूं नयें. [खं. १२ ले. ३–६]

शक १७०२ आषाढ शुा २ इ. १७८० जुलै ४ (रजब १)

मुधोजी भोसले, नागपूर–नानांना लिहितात.–चौघानी मिळावें, बदनिशा करावी. तेव्हां शेजाऱ्यास प्रबल करावें आणि घर दुर्बल व्हावें हेंच घडत गेलें. त्यास आज वीस वर्षांचे श्रेय आपण घेतलें, कीं, सर्व एकोमय करून विश्वासाची वृद्धि केली. हें सविस्तर ऐकून जें समाधान झालें हा बयान काय ल्याहावा. श्रीहरि रा. पंतप्रधान यांशी सलामत राखो आणि त्यांचे दैवानें आपण बहुत दिवस सुखरूप राहोंत. जर ते दौलत नीट तरीच हे दौलत पुरते समजले, यांत संदेह नाहीं. हें सर्व मंडळ आपलें ऐसे जाणावें. हेहि लिहिणें काय [ऐ. पत्र-व्य. ले. २०३]

१७०२ आषाढ वद्य २ इ.१७८० जुलै १८ (रजब १५)

बाळाजी पंडित यांस फ्रँच फरासीसकडील पत्र. मुसे सोडाव व मुसे खुषबैन जमीयतस पाठविले. गुडलूरास येऊत तीन महिने आम्हांस जाले. मुसा सफरूस जलमार्गे मुंबईकडे पाठविले. आम्ही चेनापटण घेऊन. इंग्रजास तंबी देतो. [खं. १० ले. २५७].

१७०२ आषाढ वद्य ११ इ.१७८० जुलै २७ (रजब २४)

महादजींनी आपण बऱ्हाणपूर सोडून अवंतिकेस उज्जयनीस कां छावणी केली तें लिहिलें. इंग्रज व गोहदवाला जा[illegible] एक होऊन त्यांस तिकडील राजवाडे व भुमे सामील झाले आणि ग्वाल्हेर, नरवरांनजीक आले. माळव्यांत यावयाचा त्यांचा इरादा व इंगळे व खंडेराव हरीचीं पत्रें आलीं, याकरतां उज्जयनीस छावणी. येथें आल्यावर पातशहा नजबखा यांचें व पुरुषोत्तम महादेवाचें पत्र आलें इ. [महा. का. ले. १०६]

,, —आषाढ वद्य इ. १७८० जुलै दुसरा पंधरवडा.

नानांचें परशरामभाऊना पत्र कीं, मानाजी शिंदा सावंताचे वाडीस जाऊन जलमार्गें दादासाहेबाकडे जाणार. त्यास तो इकडे येत असल्यास वचन देऊन आणवावे. सावंतासहि पत्र, शिंद्यांस न ठेवून घेण्याविषयीं पाठविलें आहे. [ऐ. ले. सं. ७ ले. २५५१]

१७०२ आषाढ वद्य. १४ इ. १७८० जुलै ३० (सु. ११८१ रजब २७)

नानांचें पत्र महादजींकडे, इंग्रजांकडील कांहीं पलटणें सोनगडाकडे आलीं. चंद्रराव पवार फत्तेपुरात शिरला तो गुल्जारखानास लामील होऊन खूल उभें करणार. रा, पाटीलबावा कोंडाईबारीकडे आले म्हणजे हीं सारीं खुळें मोडतील. मुंबईकडे इंग्रजांचा सरंजाम भारी होत आहे. बावांचें येणें कोंडाईबारीकडे व्हावें. [महा. का. ले. १११]

,, —जेष्ठ आषाढ इ. १७८० जून जुलै

नानांकडून पुणें दरबारची बाजू कशी योग्य आणि इंग्रजाची बाजू कशी दुटप्पी, खोटी व कांगावखोर आहे हें सांगणारें इंग्रज बादशहाकडे पत्र. [ऐ. ले. ७ ले. २५७५]

१७०२ श्रावण इ. १७८० ऑगष्ट

नानांना हैदराकडील पत्र—आम्ही घाट उतरून कित्येक गडकिलेस ठाणा घातले. चेनापटणडेहि दौड पाठविले. फिरंगियाचीहि मदत (पोर्तु०) मछलीबंदर वगैरे येत आहे. इंग्रज मैदानास निघतील तरीहि लढाई करावी म्हणून मुक्रर केलें असे. कृष्णराव नारायण तिकडे आले त्यांसच इकडे पाठवावे [खं. १० ले. २५८]

१७०२ श्रावण शुा इ. स. १७८० ऑगष्ट प. पंधरवडा

इंग्रजांची तयारी मात्र होत आहे. राजश्री गणेशपंत बेहरे चार हजार फौजेनिशी कल्याणकडे रवाना झाले. महाड, विजयदुर्ग, रत्नागिरीकडेहि फौजा रवाना होत आहेत. राजश्री नाना फडणवीस पुण्यानजिक आहेत. महादजी शिंदे बिडाकडे जाऊन तुळजापूर करून येणार. गुलजारखान याचा सल्ला ठरोन इकडे लिहूं. तो पळून भिल्लाणांत गेला. ठाणें घेतले. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३५५२ ले. २५५९]

१७०२ श्रावण शुा ४ इ. १७८० आगष्ट ४ (साबान ३)

नानांचें महादजीकडे पत्र, कुपिया बातमी चेनापटणकडून आली कीं, इंग्रज व महंमदअलीखान–आर्काट–मनसबा करतात. पंतप्रधान यांकडे अनुसंधान लावावें कीं ' तुम्हीं आम्हीं मिळून हैदरचें पारपत्य करूं. ' हैदरखानास सांगावें ' तुम्हीं पंतप्रधानांचा काय भरवंसा धरलात, पंतप्रधानांची दौलत तुम्हीआम्ही मिळून घेऊ. ' असा शकट भेद करून द्वैत पाडावे. तरी सावधता असावी. इंग्रजांचें मानस की हैदरखान, श्रीमंत व नवाब तिघांच्याहि दौलता घ्याव्या. कोणेही प्रकारें एकाशी शकटभेद करून एकास खालीं पाडावें. असें करतां एक राहील त्यास आपण शेवटीं गुंडाळावें. [काव्ये. प. ले. २७७]

१७०२ श्रावण शु. १४ इ. १७८० आगष्ट १३ (सु. ११८१ साबान १२)

नानांचे महादजींना पत्र–इंग्रजांच्या मसलती हिंदुस्थान, गाडर, मुंबईकर ह्या तीनहि करणें प्राप्त. हिंदुस्थानकडील मसलतींत नजफखान आपणास अनुकूल यामुळें हलकी जाईल; मुलूक व पैसाहि सरकारांत येईल. खानदेश, देशची व गुजरात ही मसलत औघड आहे. पाटीलबाबा कोंडाईबारीकडे न आल्यास होळकर व सरकारी सरंजामी पवार व. रा. शिवाजी विठल भाद्रपद मासी कों० वर येसें करून मग बावांनी हिंदुस्थानचे मसलतीवर नमूद व्हावें. होळकरांचे अनुमानित असल्यास पाटीलबावांनी

परिछिन्न कों. वर यावें. पाटीलबावांनीं होळकरांस साफ पुसावें कीं तुम्ही कोणची करतां ? जी ते कबूल करतील ती सांगून तर्तुदेस लागावें. इंग्रज तों पेशकदमी करीत आहे. तेव्हां ते दसरियाची वाट पाहात नाही. हें ध्यानांत आणून लौकर तर्तूद दोहींकडील व्हावी. [काव्ये. प. ले. २७४, महा. का. ले. १०९]

१७०२ श्रावण शु. १५ इ. १७८० आगष्ट १४ (साबान १४ सु. ११८१)

हैदरखानाचें नानास पत्र, चेनापटणकडे इंग्रजास ताण बसतांच आपल्याकडे सलुखपैगाम लावतील; तरी त्यांस तंबीच करावी. टोपीकराची जात बेइमानी व फरेबी. एकीकडे राजकारण लावून एकास दगा करतील. येविशीची हुशारी असावी. इकडून सरकारशीं जो दारमदार जाला त्यांत तफावत हरगीज नाहीं. [काव्ये. प. ले. २७८]

१७०२ श्रावण शुा १५ इ. १७८० ऑगष्ट १५

नानांचें महादजीविषयीं सदाशिव दिनकरास पत्र—रा. पाटील-बावांचा सर्वांविसी भरवंसा, त्यासी दुसरा अर्थ व विलक्षण कल्पना नाहीत. (यासी) ईश्वर किंवा परस्पर चित्त साक्ष. सामान्याच्या मिथ्या, क्षुद्र गोष्टीचे संघष्टनानें बावांचे बोलण्यांत तऱ्हा, नसावी ते भाव येत गेले. परंतु दुरंदेशी व त्यामुळे ऐक्यभावना ह्यांत अंतर पडलेंच नाहीं. तेव्हां परिहार परस्परेंहि करावा लागत नाहीं. सारांश, श्रीमंतांचें दौलतीचे कल्याणाविसी व येथील संपादिले ऐक्याचे कायमी-विषयी अर्थेप्राणेसी पाटीलबावांचा दुसरा प्रकार नाहीं. हें ऐकोन संतोष; व नबाब, हैदर यांस लिहून पाठवावया-विषयीं भूषण वाटतें. [महा. का. ले. ११०]

१७०२ श्रावण वद्य ५ इ.१७८० आगष्ट २० (साबान १९ सु. ११८१)

हैदराचें नानांस पत्र, आंसाहेब दूरंदेश, मजबूत मिजाज, इंग्रजाचे मकरफरेबास खूब वाकूफ. तेव्हा त्यांचे खियालावर

न जातां तंबीच करतील. नानांनीहि हैदरास, दोनतीन सालें लागोत, लेकीन तंबीच करावी, असें लिहिलें होतें. [काव्ये. प. ले. २८४]

,, —श्रावण वद्य ५ इ. १७८० आगष्ट २० (साबान १९सु. ११८१)
नाना यांस शिंद्यांकडील आपाजीराम याचें शिंद्यांच्या दिनचर्येविषयीं व स्वभाव बोलणें यांविषयीं पत्र.—तूर्त ऐषआरामीवर नजर. आजपर्यंत स्वामीस विनंती लिहिली नव्हती. परंतु येथील प्रकार एक रीतीचा दिसतो. याजकरतां लिहिणें प्राप्त. आठ आठ महिने पाहतो. एकदोन वेळ विनंती केली की, ही गोष्ट आपणास उचित नाहीं. तेव्हां आमचें समाधान केलें जे, ' आमची प्रकृत बोलावें इतकीच मात्र आहे. स्वामिसेवेविषयीं अंतर होणार नाहीं [महा. का. ले. ११२]

,, —श्रावण वद्य १२ इ.१७८० आगष्ट २७ (साबान २६)
नानांनी खानदेशच्या कमाविसदाराचें पत्र, व सोनगडाकडील डाकेचें पत्र महादजींस पाहण्यास पाठविलें व पत्रीं लिहिलें कीं, कोंडाईबारीकडे फौज गेल्याशिवाय तिकडील उपद्रव चुकत नाहीं. गुलजारखानाच्या पारपत्यास फौज गेली ती कोणची व किती हें पाहावयास एक कारकुन प्रामाणिक व दोन खिजमतगार पाठवावे. [महा. का. ले. ११४]

,, —भाद्रपद शुा १४ इ.१७८० सप्टें. १२ (रमजान १२)
नानांनीं पुरुषोत्तम महादेव यांस दिल्लीस लिहून ध्यानासाठीं तसबीर मागविली. रोहिल्यांचे अमलापासून ही चित्रकार वगैरेंची वस्ती उठोन गेली. आतां एक तसबीर मिळाली ती अपूर्व नाहीं. सबब पाठविली नाहीं. [दि म. रा. ले. १५]

,, —भाद्रपद वद्य १ इ.१७८० सप्टें. १४ (रमजान १४)
नाना महादजींची भेट—पाटिलबावाचें म्हणणे सिरोंजभेलशाचे सुमारे फौजेचा जथ करून स्वतः बऱ्हाणपूर पावेतों यावें व तिकडून नानांनीं यावें. यावर नानांचें म्हणणें, भेट व्हावी,

मसलत ठरावी; आम्हीं येतो; परंतु इतकाहि प्रकार आश्विनमासींच जाहाला पाहिजे. तो चांगला, लांबला तर मसलतीस विरुद्ध. म्हणजे कालहरणानें इंग्रज हावभारी होतील. [काव्ये. प. ले. २८६]

,, –भाद्रपद वद्य २ इ.१७८० सप्टें. १५ (रमजान १५)

नाना, महादजींची मनस्थिती ओळखून लिहितात, 'पाटिलबावांनीं कोंडाईबारीकडे यावें' असें लिहिलें असतां 'हिंदुस्थानांत दुसरा पाठवितात हें आम्हांस उणेपण' असें म्हणतात. 'हिंदुस्थानची मसलत करावी, होळकरास कोंडाईबारीकड पाठवावे असें लिहिलें तर 'आम्हांस दूर काढून काढलें' अशी शंका निघणार. तात्पर्य दोहो सरदारांनीं अमुक मसलती कराव्या असें येथून लिहिलें तर संदेह. त्यापक्षीं जो ठराव करणें तो पाटिलबावांनींच करून उत्तर सत्वर पाठवावें. असें लिहिलें असतां वादप्रतिवाद घालतील. त्यांचें चित्तांत कल्पना उठतात, त्याचें निवारण करणार ईश्वर. आपण जी गोष्ट चांगली, दौलतीचें कल्याण, पाटिलबावांचे स्वरूपास योग्य तेंच लिहितो बोलतों. आतां पत्रें जाणें येणें यास अवकाश नाहीं. आम्ही गंगापार गेलों म्हणजे इंग्रज वगैरे काय कल्पना काढून हावभरी होतील कळत नाहीं. सरकारचीं कामें जाहिराणा चांगली दिसे अशीं केलीं म्हणजे लोकांचे संदेह जातील. घरांतील गोष्ट, एक आईचीं लेकरें, संदेह टाकलें म्हणजे स्वच्छताच आहे, नवें जडावें लागत नाहीं. भेटीचा मुहूर्त पाहून उभयतां सरदारांनीं लौकर खानदेशांत यावें, आम्हीहि येऊं, विलंब न करावा. [काव्ये. प. ले. २८७]

,, –भाद्र. वद्य २ इ.१७८० सप्टें. १५ (रमजान १५)

रामचंद्र कृष्ण रिसबूड याचें आदवानी–नजीक बसालत जंग–हून पत्र. गंटूर तालुकाच नबाबाकडे असण्याबद्दल व हैदरकडील आणि भागानगरकडील अखबार वगैरे विषयीं नानांस पत्र. [खं. १० ले. २५९]

,, –भाद्र. वद्य ६ इ.१७८० सप्टें. १९ (रमजान १९)

महादजी शिंदे यांजकडे नानांचें पत्र, तिकडून तुम्ही खानदेशांत यावें आम्ही इकडून यावें. तेथें भेटी होऊन निश्चय ठरेल त्याप्रमाणें करावें. निघंण्याचा मुहूर्त कळवावा आम्ही येतो. उभयतां सरदार इकडे आल्यानें पातशहा, नजबखान इंग्रजाशीं सलूखाचें संधान लावितील. याकरतां पाटिलबावांची पत्रें पातशहा, पुरुषोत्तम महादेव यांस जावीं कीं, एकजण येतो. आणशफथपूर्वक मसलत करावी. आतां दिवस राहिले नाहींत. (नाना महादजींच्या मतें नानांनी खानदेशांत जावें व हे तेथें त्यांस भेटणार. व नंतर लगेच माघारे येणार. पण हेंहि दोहीकडे प्रकट करावयाचें नाहीं. महादजी दक्षिणेंत तळेंगांव लढाईसाठी आले व नानाहि पुण्याहून निघोन गेले [महा. का. ले. ११९]

,, –भाद्रपद वा। १३ इ.१७८० सप्टेंबर २६ (रमजान २६)

नानांचें हरिहरराव पटवर्धनांस पत्र–" इंग्रजानी वसई कल्याण प्रांती व खानदेशांत लबाडी केली आहे त्यांचें पारिपत्यास फौजा व जमाव रवाना केलेंच आहेत. शिवाय तोफखाना, गाडदी आदि करून तयारी करविली. त्यांस गाडर सुरतेहून सरदार मुंबईस येऊन सरंजाम लढाई करीत आहे. लबाडीस चुकणार नाहीं. याज करितां आपली सरंजाम सुद्धां तयारी असावी. दसरियाचें मुहुर्तें डेरे दाखल होणार, तुम्ही पत्र दर्शनी फौज जमा करवून दसरियाचें मुहुर्तें डेरे दाखल येऊन पोंचावे " [ऐ. ले. सं. ७ पृ. ३५५४ ले. २५६२]

,, –आश्वीन वद्य १४ इ.१७८० आक्टों. २६ (सवाल २७)

नानांचे पाटिलबावांस पत्र–वसई कल्याण प्रींतांतील इंग्रजाच्या पलटणींवर चिमापा पानसी, भवानी शिवराम, रास्त्याकडील फौज मुसा नारन पोर्तु० तोफची, गाडदी असें पाठविले. करवीरकरांकडील सटवाजी भोसला निघोन आला. आश्वीन वद्य ७ आक्टोंबर २०–आम्ही गारपिरावर डेरे दिले व निघालो. दुसरें दिवशीं खडकीवर मुकाम केला. [महा. का. ले. १२१]

काव्ये. सं. प. ले. २५४ मध्यें चिमापा पानसी चैत्र वद्य ६ एप्रील २४ इ.१७८० सोमवारी मृत्यु पावल्याचें आलें आहे.]

,, –कार्तीक शुा ३ इ.१७८० आक्टों. ३० (जिलकाद १)

महादजींकडे नानांचें पत्र. म०–'अहल्याबाईस संपुष्टांत घालावें अशीच साऱ्यांची मर्जी दिसते.' नाना :—बाईस संपुष्टांत घालावयाचें प्रयोजन काय ? सरकार काम व्हावें, मातबर सरदारी, दिवस मसलतीचे समीप, फौजेची तयारी जाली पाहिजे, विना पैका फौज जमा कशी होते. बाईस संपुष्टांत घालावी ही गोष्ट येथें नाहीं. असती तर ते मार्ग निराळे घडते. फौज किती, महाल खराब कां, चाकरी काय झाली हे पुसावे तर अवघेच जाबसालास पाणी पडते. बाईकडील यादी आली. त्यास, अशा यादीनीं काम कांहीं व्हावयाचें नाहीं. बाईस पाटिलबावांनी पत्र पाठवावें डौलाचे खर्चापुरता ऐवज बाईनीं घेऊन तेथील वहिवाट बाईकडील महालकरी तीही माहाली आहेत त्यांनीं करावी. बाकीचे माहाली होळकरांस मसलत संबंधे पैका लागेल तो बाकीचे महालांपासून घेतील. [काव्ये. प. ले. २९७]

,, –कार्तिक शुा १० इ.१७८० नोवें. ६ (सु. ११८१)

जनार्दनराय म्ह. जनार्दन शिवराम हा कालहस्ती (मद्रास प्रांत चित्तुर जि०) हून ८।१० बंदांशिवाय पत्र लिहित नाहीं. अर्थात् विस्तृत राजकीय वर्तमान लिहितो. तरी नाना राग फार कां करतात म्हणून विचारतो. [चिनापटण कडील राजकारणें इ. सं. पृ. ७ ले. १]

,, –कार्तीक शुा १३ इ.१७८० नोवें. ९ (जिलकाद १२)

देवराव महादेव हिंगणे नानास लिहितात, कुटुंबसहित येथें (दिल्ली) आलो फस्ताव जाला. पैशास ठिकाण नाहीं. [खं. १२ ले. १०]

,, –कार्तीक वाा १ इ.१७८० नोवें. १३ (जिलकाद १५)
आषाढश्रावणा पासून पत्रें पाठवीत गेलों. कार्तीक संपत आला. अद्याप उभयतां सरदार आपले घरीं व निश्चय नाहीं. आम्ही आश्वीन वद्य ७ स निघून खडकीवर मुक्काम. इंग्रज गुजराथ मोकळी टाकून वसईकडे तिन्ही ठिकाणीं लढाई लागलीं ईश्वरी इच्छा असेल तशा बुद्धि सरदारांस होतील. याउपर सरदारांचे थोरपणास उचित तें करतील. दिवसगतीमुळें दौलत पेंचात आली. असें नानांचें महादजींकडे पत्र. [काव्ये. प. ले. २९५; महा. का. १२५]

,, –कार्तिक वद्य १४ इ. १७८० नोव्हें. २५ (जिलकाद २७सु. ११८१)
नानांना दिल्लीहून केतकी फुलांचा अर्क एक शिसा आणि स्फटिकाची स्मरणी पुरुषोत्तम महादेव हिंगणे यानी पाठविली. [दि. म. रा. ले. ११ व २२]

,, –मार्ग. शुा ११ इ.१७८० (जिल्हेज १०)
अहिल्याबाई कडील हरकूबाई. नाना फडणविसां बद्दलचें मत तुकोजी होळकर बाई विरुद्ध जाऊं लागले त्याप्रसंगानें म्हणतात रा. तात्या व श्रीमंत नानासाहेब असें करणार नाहींत. आम्हांस ठाऊक आहे की, नानांची कायम मिजाज (निश्चयीपणा) जितका आहे इतका आणीक कोणाचा माझ्या पाहण्यांत नाहीं. ल्हान वा मातबर असो, करून देतो असे मुखावाटें म्हणणें हेंच दुरापास्त. (पण) अभय दिल्यास मग कोणी विक्षेप मध्यें घातले तर ते ध्यानास न आणिता त्याचें कार्य करून द्यावेंच, इतकी बळकटी आहे. [म. द. बा. १ पृ. ८०,८१]

,, –मार्ग. वद्य ६ इ.१७८० डिसें. १७ (सु. ११८१)
नानांना दिल्लीहून पुरुषोत्तम महादेव यांनीं विलायती मेवा सेव दाणे तीस –१५ नानांस व १५ स. माधवरावांस–एक पेटारा पाठविला. [दि. म. रा. ले. २०, २१; काव्ये. प. ले. ३००]

,, –मार्ग. वु. पंधरवडा इ. १७८० डिसेंबर प. पंधरवडा.
नानांचें महादजींना पत्र–फरासिसाचें बादशहाकडून मुसामुतिन पत्रें घेऊन गोव्यास येऊन हल्लीं पुण्यास आला. त्याशीं बोलणें होत आहे. मागाहून लिहून पाठवूं. गाडर मुंबईहून निघून पलटणांस कल्याणास येणार. बाजीराव बरवे, सटवाजी भोसले, गाडरास सामील होऊन मसलत पाडावी हा इरादा आहे. मसलत तो भारी आहे, [महा. का. ले. १२८]

,, –पौष १७८० डिसेंबर.
नानांनी अहिल्याबाईंस लिहिलें जें सरदारीचा आब व सरकार सरकार चाकरी होय तो अर्थ करावा. अहल्याः– हे दोहो करताच मी कबूल केलें. [महा. का. ले. १२९]

,, –पौष शा। २ इ. १७८० डिसेंबर २७
नानांचें महादजींस पत्र. आपणाकडील रामजी जाधव भेटले. होळकरांची खातर जमा करून पत्र पाठविले. सुरत अठ्ठाविशींत गणेशपंत बेहरे पाठवून हिंदुस्थानचे मसलतीवर शिवाजी विठ्ठल ठेवले असतां, ते पादशहा व नजबखान वगैरेंना मिळून अंतरवेद पावेतो मसलत करतील, असें असल्यास त्यांस तिकडे ठेऊन आपण इकडे यावें. हें होत नाहीं, त्यापक्षीं आपण तिकडे जाऊन पलटण्याचें पारपत्य करून बंगाल्यावरी शह बसेल असें केल्यानें हेंही गोष्ट मोठीच आहे. दोन्ही प्रकार लिहिले आहेत. सरकार काम होय व कोणता प्रकार ठरेल तो लवकर व्हावा. [महा. का. ले. १३१]

,, –पौष वद्य २ इ. १७८१ जाने. १२ (मोहरम १६)
नानांविषयीं (अहल्या) बाई बोलली जे, त्याच ब्राह्मणाचा हक्क होय कीं, हें दौलतीचें ओझें, धनी लहान, पदरी पैका नाहीं, असेंहि असतांना चारी संधानें राखितात. जो ज्याचा कागदपत्र येईल त्याचें स्मरणपूर्वक उत्तर देणें, चहूंकडील मसलतीचीं संधानें राखणें, हें आवरण शक्त त्यांचीच होय. [म. द. बा. भाग १ पृ. १०१]

,, –पौष दु. पंधरवडा. इ.१७८१ जानेवारी

नानांचें महादजींस पत्र. कोंडाईबारीकडे होळकरांस न पाठविण्याचें कारण, सुरतेंत दादासाहेब व गायकवाड; यांस तिकडे पाठविल्यानें, न कळें कशी बुद्धि होईल ? हा विचार केला. महादजी म्हणतात हें उत्तम झालें. परंतु बाईचा इतल्ला जरूर ठेवावा. येणें करून सरकार उपयोग व बाईचा मनोदय दोन्ही गोष्टी घडतात. जिकडे फौज तिकडे दाब व कर्तृत्व. [महा. का. ले. १३२]

,, –पौष वद्य १० इ.१७८१ जाने. १९ (मोहरम २३)

नानांच्याकडे अहिल्याबाईंनीं 'मेवेजात नासपाती पेशजी ६ पाठविली व प्रस्तुतहि बाईंनीं श्रीमंताकारणें मेवा–आंगुरे पेटारा १, दाळिंबे ५, नासपाती २, शेव १ एकूण ९ डाली सफेत गळेफानें मढून लाखी मोहर करून पाठविले. [म. द. वा. १ ले. ४१]

,, –माघ शु॥ इ.१७८१ जानेवारी तिसरा आठवडा.

नानांचें महादजींना पत्र. हिंदुस्थान व सुरत यांतून कोणता निश्चय तो ठरवून इंग्रजावरी जरब बसेल तें करावें. इकडे वज्रजोगणी, बदलापूर, कोंकण येथें इंग्रजाशी लढाई हरिपंत, तुकोजी होळकर, रघुनाथ निळकंठ मिरजकर, यांचीं होत आहे. कोणतीही मसलत लवकर व्हावी. हें उत्तर सत्वर यावें. [महा. का. ले. १३४]

,, –माघ शु॥ ९ इ.१७८१ फेब्रु. ३

रघुनाथ पटवर्धन (कुरुंदवाडकर) यांस हरिपंत तात्याची चिठी आली कीं, तुम्ही लौकर यावें. नाना फडणिसांसहि तात्यांची चिठी आली कीं, " आम्ही सहा कोस बदलापुरास पुढें गेलों. इंग्रज चालोन येत असतां मागें राहणें ठीक नाहीं. यास्तव निघोन गेलों. इंग्रजास चार कोसांची तफावत आहे. एक वेळ छापा घालून आमची फौज उधळून द्यावी असें इंग्रजाचें मानस

आहे." त्यांचें लिहिण्यांत "पुढें गेलो तत्रापि घाव डाव पाहून माघारेंही येऊं; असें आहे. नानांचीही चिठी गेली आहे जे, आणखी आठ दहा कोस इंग्रजास पाठीवर घेतल्यास चिंता नाही.' अशी चिठी गेली आहे. दोन तीन रोजांत घाटाखाली जाणेची तरतूद करावी अशी नानांची रघुनाथरावास चिठी आली आहे. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३५८० ले. २५७७]

शक १७०२ माघ शु॥ ५ इंदुवार इ.१७८१ जाने. २९
नाना व तुकोजी होळकर यांची पुरंदरगडीं भेट झाली. [ऐ. ले. सं. ७ ले. २५७६]

,, —माघ वद्य ८ इ.१७८१ फेब्रु. १६ (सफर २२)
नानांनी हरिपंत फडके व तुकोजी होळकर यास रागे भरून लिहिलें कीं, गाडर घाट चढून, तुम्ही पाठीवर असतां येंतो, त्याचें कांहीं नुकसान होत नाहीं म्हणजे काय? हरिपंतांनीं व होळकरांनीं चूक कबूल केली. [ऐ. ले. सं. ७ ले. २५८५]

१७०२ फाल्गुन शु. १ इ.१७८० फेब्रु. २४ (सफर ३० सु. ११८१)
नानांचें महादजींना पत्र, सिपरी वरील पलटणांचें पारिपत्य आपणच पवार व शीवाजी विठल वगैरे सरकारचीं पथकें घेऊन जाऊन करावें. या गोष्टीस अवकाश पडला असतां इकडून कांहींच होत नाहीं असें समजून इंग्रज हांवभरी होतील. गाडर १० पलटणें, ३० तोफा घेऊन खोपोलीस, अर्धा खाली व अर्धा घाटमाथ्यावर ठेऊन बसला. पुणें रिकामें करविलें. आमची सारी फौज ५० ह. व गाडदी ७ ह. इतकी आहे. इंग्रज मैदानांत येत नाहीं. [महा. का. ले. १४०]

,, फाल्गुन शु॥ २ इ.१७८१ फेब्रु. २५ (रवल १)
नानांचें नारोपंत पोंक्षे यांस पत्र कीं, होळकर यांजकडील महालाचा सरदेशमुखीचा ऐवज फार येणें आहे. तो सरकारचा आहे. तरी बाईस पाटिलबावांकडून पत्र पाठवून ऐवज येईलसें करावें, [काव्ये. प. ले. ३०९]

,, –फाल्गुन शुा १३ इ.१७८१ मार्च ८

नानांचें महादजींकडे म्हणणें कीं, आश्वीनमासीं भेटी होत्या तर बंगाल्यावर शह पडावयाची मसलत होती. आतां दिवस पहिले नाहींत. इंगळे, बक्षी, गोसावी, बैरागी, खेचीचा राजा मिळून २८ ह. फौज झाली. तरी तुम्ही गेल्याविना पलटणांचें पारिपत्य होणार नाहीं. आग्र्याचीं पलटणें फरासिसी किंवा इंग्रजी ? इंग्रजी असल्यास पुढें ठेवीत जावी. [महा. का. ले. १३६]

,, –फाल्गुन वा। ५ इ.१७८१ मार्च १४ (रवल २१)

पाटिलबावा भेलशा नजीक जाऊन पोंचले उत्तम झाले. इंग्रजाजवळ सामान खरखुरें किती; इंगळे व बक्षी यांच्या इंग्रजाशी शिप्रीसुरंज येथें झालेल्या लढाईंत जे तुरुक स्वार सांपडले त्यांस विचारून इंग्रजाकडे खरेंखुरें सामान किती वगैरे तीही माहिती पाठवावी. खेची राजगडवाले वगैरे मिळोन आपलें किती तें लिहावें. इंग्रज माघारे जाऊद्या म्हणतात पण तें ऐकूं नये. ते दगाबाज आहेत. आपली फौज चोहोंकडे गेलीं कीं हें चाल करतील. आयते मैदानांत सांपडले, पारपत्य करावेंच असें नानांचें नारोपंतास पत्र. [काव्ये. प. ले. ३१०]

,, –फाल्गुन वद्य १३ इ.१७८१ मार्च २२ (सु. ११८१)

नानांनीं परशरामभाऊंस लिहिलें, बोरघाटचे पायथ्यास इंग्रजाची जिनसी, दाणादुणा, गूळ, तेल, तोफखाना बारुदखानासुद्धां सामग्री आहे. बारवईचे वाटेनें मौजे चौकावरून इंग्रजाचीं पांच पलटणे रसद भरून नेतात. तुम्ही १२ ह. फौजेनिशी घाटाखालीं असतां हे रसद घेऊन जातात हीं काय गोष्ट आहे ? [ऐ. ले. सं. ७ ले. २६०९]

शक १७०३ चैत्र शुा ४ इ.१७८१ मार्च ९ (रखर ३)

नानांचें नारोपंत पोंक्षे—महादजी शिंदे यांजकडील–यांस खोपवली, पनवेल, चौक, ह्या बाजूस गाडर सैन्यांतील पलटणींचा पराभव केला व लूट केली तें वार्तापत्र [काव्ये. प. ले. ३११]

,, –चैत्र वाा १ इ.१७८१ एप्रील ९ (रखर)

नानांचें परशरामभाऊंस पत्र–कोहज किल्ल्याकडे तुम्ही गेल्यास सुरतेहून मुंबईस रस्त येते ती बंद होईल. लूट मिळेल. पण भाऊ म्हणतात, खर्चास देत नाहींत. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३६१६]

,, –वैशाख शुा ११ शुक्रवार इ.१७८१ मे ४ (जवल ९)

नानांची व परशरामभाऊंची पिंपरी (नजीक चिंचवड) येथें भेट. परशरामभाऊंचा वर्ज्यवार. पण नानाच डेऱ्यास आले व भेट. [ऐ. ले. सं. ७ ले. २६२३]

,, –ज्येष्ठ इ.१७८१ मे जून (जखर)

नानांनी पांडुरंग रघुनाथ–नारोपंत पोंक्षे यांजकडील कारकून–यांस लिहिलें, जखर २५ च्या लखोटयाचा शोध जरूर करावा. मालुमात जमा धरून उत्तरें असावीं. [काव्ये. प. ले. ३२६]

,, –ज्येष्ठ शुा १ इ.१७८१ मे २४ (जवल २९)

नानांकरतां पुरुषोत्तम महादेव यांनीं दिल्लींत तसबिरा जमा केल्या. वर्षाकालानंतर पाठविणार. रांगडे दाबाचे स्नेही. [दि. म. रा. २६]

,, –ज्येष्ठ शुा ६ इ१७८१ मे २९

नानांनी दिल्लीस कळविलें, इंग्रजासी बिघाड करून मसलत करणें तेव्हां सिखाशी बिघाड करावयाचा नव्हता. असो; हली हर वजेनें शिखास सामील करून घ्यावें. इंग्रजाचें पारिपत्य केल्या खेरीज पातशाहीत कोणास चैन पडणार नाहीं. हें पुर्ते समजावें. [दि. म. रा. ले. ३५]

,, –ज्येष्ठ शु।। ९ इ.१७८१ मे ३१ (जखर ५,७)

हिंगणे नानांना विलायती अनार या दिवसांत तेथील गर्मीमुळें न पावतील. यास्तव रस काढून रुब (ह ?) करून पाठवितात. दिल्ली व पाटिलबावांविषयीं वर्तमान. इंग्रजाचे व यांचे लष्करांत महागाई. वगैरे [खं. १२ ले. ११; दि. म. रा. ले. ३२]

—नानांनी पनवेल घाटांत गाडराच्या इंग्रजी सेनेचा पराभव हरिपंत फडके, तुकाजी होळकर व परशुरामभाऊ ह्या सेनानायकांनीं केला, त्याची वार्ता दिल्लीस कळवून त्याचें फारशींत भाषांतर करून पादशहा व नजीबखान यांस देण्यांस सांगितलें. [खं १२ ले. १५; दि. म. रा. ले. ६०]

,, –ज्येष्ठ शु।। १४ इ.१७८१ जून ५ (जखर १२)

नाना म्हणतात " पाटिलबावांचे चित्तास वाईट वाटावयाजोगे तर लिहिलें नाहीं. तत्रापि त्यांच्या समजेस जें वाईट भासेल तें वाचून दाखऊं नये. तोंडीं सांगावें, [काव्ये. प. ले. ३२२]

,, –ज्येष्ठ वा।। ११ इ.१७८१ जून १७ (जखर २४)

नानांना यश यावें व इंग्रज शत्रु पराभूत व्हावा म्हणून सातारकर छत्रपती व त्यांच्या मातुश्री परमेश्वराचें चिंतन करीत होती. त्या यशाविषयीं, हा सर्व प्रताप महाराजांचा असें लिहून सविस्तर पण थोडक्यांत लढाईचें वृत्तपत्र नानांनीं छत्रपतींकडे लिहिलें. [काव्ये. प. ले. ३२७]

,, –ज्येष्ठ श्रावण इ.१७८१ जून आगष्ट

पुण्याहून कोणी पोटार्थी कुंवरसेन खतरी हा येथें दिल्लीस नजबखान वगैरेंस आणि फरुकाबाद, अयोध्या इकडेंहि लटकी, पारसी बातमी पत्रें पाठवितो. मलकाजमानीकडील वकील म्हणून नांव घेऊन हें करतों. तरी बंदोबस्त करावा असें पुरुषोत्तम हिंगण्यांचें नानांस पत्र. स्वामींचें राज्य महादेवाचें. उणें अधिक लोपत नाहीं. गुप्त गोष्टहि प्रकट होते. [दि. म. रा. ले. ३१ व ४३]

,, –श्रावण शु॥ २ इ.१७८१ जुलै २३ (साबान१)

नानांचें महादजींस पत्र व त्यांचें नानांना उत्तर. नागपूर-भोसल्यांनी इंग्रजांकडून २५ (४२ ?)ल. रु. घेतले व बंगालवरील स्वारी सोडिली. हैद्राबाद–नबाब स्वस्थ घरींच. बंगालवर कोणीं गेल्यास इंग्रजास पायबंद बसेल. कोण पाठवावा. होळकर? त्यांच्यानें होणें नाहीं व घरचा पेंच. पाटिलबावांनीं जावें तर इकडील मसलत पत्करली. हैदरनें इमान राखलें. पाटिलबावा म्हणतात, बंगालवर आम्हीच जाणार होतों. तेव्हां नानांच्या चित्तास न आलें. भोसल्यानें ती मसलत घेतली. असो. आतां तेंच संधान असावें. नाहींतर भोसले व नवाब वाकडी चाल धरतील. आम्ही यावत्प्राण मेहनत करूं व पलटण्यास ताण बसवूं. [ऐ. ले. सं. ७ ले. २६३६; महा. का. ले. १७४]

,, –श्रावण शु॥ ११ इ.१७८१ जुलै ३१ (साबान ९)

नानांनी दिल्लीस कळविलें, अनायासें काबू साधावा. शिखाकडील पातशाही फौजा शिद्याकडे आल्या तर इंग्रजाचें पारपत्य शिपरीकडे होऊन गंगापार अगर बंगाल्यांतील मनसबा होता. पैका मिळतो, पातशाहीचा लौकीक व शत्रूची कमरशिलाणी होते. दसरियाचे हंगामी अद्याप तरी निघावें. [दि. म. रा. ले. ६३]

,, –श्रावण वद्य ११ इ.१७८१ आगष्ट १५

भोसल्यांनी बंगालकडे छावणी केली. पण हवा वाईट, घोडीं मेली, ऐसें जाणून, काबूपुर्ते बोलणें करून ४२,५० लक्ष रु. पैसा घेऊन आब राखून फौजा माघारा आणल्या व चिनापटणकडे कंपूस जाण्यास मार्ग दिला. [दि. म. रा. ले. ५३,५४]

—जफ पहिल्या कौलनाम्यामुळें इंग्रजास दिल्लीकर सामील होत नाहींत. पण त्यांस भितात. व ग्वालेरास इंग्रजाचें पारपत्य होऊन सरकार व सरदार जबरदस्तसे दिसले म्हणजे हे दिल्लीबाहेर निघतील. (दि. म. रा.ले. ४४, ४७]

,, –श्रावण वद्य १२ इ.१७८१ आगष्ट १६

सेसईच्या इंग्रजांकडून फोर्ड व मुनसी तहासाठीं पाटिलबावां-कडे आले. पण पाटिलबावांनी म्हटलें 'तळेगांवावर तुमचीं पलटणें वांचवून काढलीं व तेव्हां तुम्ही इमान दिले तें सोडलें. आतां तुम्हांकडून सरकारांत तहाचे बोलण्यास आमचा विश्वास नाहीं. वगैरे सदाशिव दिनकराचें पत्र नानांस. [महा. का. ले. १६९]

,, –श्रावण इ.१७८१ आगष्ट

नानांकडील, खानदेशांतील सुलतानपूर नंदुरबार–बोरघाट; कोकणांत; कुलारस, शिपरी, अर्काट या बाजूस असलेल्या इंग्रज पराभवाचें वृत्त आलें तें पारशींत करून पातशहा व नजबखान यांस समजावितांच 'घरच्या धन्याचा फितुर' मुख्य धणी लहाण, असतां आज आठ वर्षें इंग्रजाचे जुंझास मुस्तेद राहिले, ईश्वरें कारभारी, सरदार मुत्सद्दी दौलतीस द्यावे तर याप्रमाणें द्यावे; नानांनी इतकी मेहनत करून दौलत राखली असा पातशहा–नजफरखानानीं स्तव केला. [दि. म. रा. ले. ५५ ५७, ५८, ६०]

,, –भाद्रपद इ.१७८१ सप्टें. (रमजान)

काशीच्या राजास गोष्टी मातेंत—बोलण्याच्या नादांत ठेऊन–कैद केले. त्याचे दिवाण व भाऊबंद यांनीं विचार केला कीं, हे फिरंगी कैद; पैकाहि घेतील जिवेंहि सोडणार नाहींत. या-अर्थी मरणें बरें, म्हणून २ ह. एकांडे इंग्रजाचे गोटावर रात्रींच पडले. राजा सोडवून आणिला. इष्टिन व त्याची स्त्री पलंगा-वरून पळवून गेली ती दिवस निघाल्यावर डेऱ्यास आली, अशी नानांना दिल्लीहून बातमी. इस्टिनाचें डोकें कांपले. [दि. म. रा. ले. २७, ६१]

,, –भाद्र. वद्य १ इ.१७८१ सप्टें. ३ (रमजान १४)

नानांनी सदाशिव पवार याचे महालीं व कारकुनास आनंद-राव पवार यांजकडून उपद्रव लागतो; त्याच्या बंदोबस्ताविषयीं पाटिलबोवांकडे पत्रविनंती केली. [काव्ये. प. ले. ३३१]

,, –भाद्रपद वद्य ८ इ.१७८१ सप्टें. ११

सालबाईच्या तहाबद्दल—अर्काट नबाब, गाडर्ड व मद्रासकर इंग्रज यांचे नानास तह करण्याबा पत्र. रघुनाथरावाचे वकील इंग्लडांत गेले तरी त्यांचें मागणें मान्य झालें नाहीं. पार्लमेंट, पातशहा व हिंदुस्थानांतील इंग्रज हा तह पाळतील. आपल्या अटी ग. ज. कलकत्ता यास कळवाव्या. व कायम दोस्तीचा तह व्हावा. [सिलेक शन्स फ्रॉम स्टे. पे. बाँबे पृ. ४६२; ऐ. टि. ३ ले. ४३]

,, –आश्विन दु. पंधरवडा इ. १७८१ आक्टो.

नानांचे दिल्लीस पत्र, पहिला कौलनामा ठीक, हल्ली मनस्वी कलमें यादीवर लिहिली. इंग्रजाची पेरवी खुशकीत जाल्यास कोणाचेंहि रूप राहणार नाहीं. बंगाल्यापावेतो खरडींत नेऊन मुलूख सोडविला पाहिजे. प्रस्तुत इतर घरांतील वाटाघाट करणें कांहीं चांगलें नाहीं. [दि. म. रा. ले. ४५]

,, –आश्विन वद्य १४ इ.१७८१ आक्टो. १६ (सवाल २७)

अहल्याबाई कडील म्हणणें, कारभारी श्रीमंत नाना एकवचनी आहेत. त्यांचे भरवंशावर आजपावेतों कालहरण जालें खरें. बंदोबस्त अद्याप होत नाहीं त्यांची कारणें, न जाणो, त्याच्या पक्षावर पडोन आमची उपेक्षा जाली. नानाखेरीज विश्वास आमचा कोणाजवळ नाहीं. बाईकडे फिर्याद आल्यास न्याय बाईनीं करावा, तो मान्य व्हावा. बाईकडे डौला पुरते महाल. 'तुकोजी होळकरांनीं तरी सेवेविषयीं निखालसीचो परिक्षा कोठें दिली आहे. म्हणून तर तूर्त गाडा चालून तुकोजीकडे सारा अकत्यार ठेवावा. म्हणजे कळेल. [महा. का. पृ. २१२-१३]

,, –कार्तीक वद्य ११ इ.१७८१ नोवें. १२

सुतार पांचसात असामी चांगले शाहाणे आहेत. ते सरकारांत नानांकडे नेहमीं चाकरीस आहेत. [ऐ. ले. सं. ७ ले. २६४८]

,, –मार्ग. शुा ६ इ.१७८१ नोवें. २१ (जिल्हेज ४ सु. ११८२)
नाना सेनाधुरंधर भोसले, नागपूर—यांस लिहितात नबाब (हैद्राबाद) यास शफथ लिहून देऊं नये. स्वराज्याच्या वृद्धीची कळकळ तुम्ही बाळगिता. दोन्ही दौलती एकच. भोसले व पंत प्रधान एक ही गोष्ट सर्वास असह्य. नबाबाकडे बळवंतराव व भवानीपंत गेले. पण त्यांच्या व कृष्णराव बल्लाळच्या बोलण्यांत एकवाक्यता असावी. दरज दिसूं नये. [ऐ. पत्र. ले. २१५. भोसल्यांनीं शफथ लिहून दिली नाहीं.]

,, –मार्ग. शुा १२ इ.१७८१ नोवें. २७ (जिल्हेज १०)
बनारसच्या चेतसिंगराजाचें मत, फिरोन जमाव करून इंग्रजावर जावें. तरी नानांचें मतें महादजींनी केवल पैक्यावर दृष्टी ठेवूं नये. मसलतीवर नजर ठेवून, राजा त्याच्या सैन्यांत फितुरीमुळें हलका जहाला तरी, हिंमती आहे म्हणून, अशा समयीं त्याची कुमक करून इंग्रजाचें पारिपत्य करावें. [काव्ये. प. ले. ३३२]

,, –पौष शुा ५ इ.१७८१ डिसें. २०
नानांचें म्हणणें हैदरखानाशी वचनीं गुंतलों. हैदरखान व सरकार मिळून इंग्रजाशी सलूक झाल्यास अवघेच पेंज उलगडतात. असेंच महादजींचें म्हणणें. दार मदार करणें तो सरकार व हैदरखान मिळून करावा. वरकडाचें विद्यमानें नाहीं. [महा. का. ले. १७९]

,, –पौष वाा इ.१७८२ जाने. (सु. ११८२ मोहरम)
नानांचें महादजींकडे पत्र, इंग्रजाचें पारिपत्य बंगाला मारल्या खेरीज होत नाहीं. बाबाकडून बंगाल्याची मसलत होत असल्यास चांगलें. येथून ५।४ हजार फौज पाठवूं. अथवा अंतरवेदींतच मसलत करून बंदोबस्त करावा असें असल्यास बंगल्याकडे येथून होईल तरतूद ती पाठवूं. बावांचें मत कळावें. [महा. का. ले. १८९]

„ –माघ वद्य ३ इ.१७८२ फेब्रु. १ (सफर १७)

नानांचें महादजींस पत्र, हैदरखानाचा जाबसाल जाहल्याखेरीज इंद्रसेन आला आहे त्याशीं सलूख करतां नये. [महा. का. ले. १९९] महादजींविषयीं नाना पुढें म्हणतात—

—आपणावर खर्चाचा कसाला गुदरला. इतकेंहि सोसून मसलत केली व करणार ही योग्यता आपलीच. (महादजी म्हणतात २५ ल. रु. पाठवा.) [महा. का. ले. २००–२०१.]

„ –माघ वा १२ इ.१७८२ फेब्रु. ९ (सफर २५)

आपाजी रामाचें नानांना पत्र–प्रस्तुत कारभारासंबंधीं आम्हासी संकोच फार चालतो. सरकार काम माझ्या हातून घेणें घडत नाहीं. तेव्हां उगेच कालहरण करावें, त्यांत स्वरूप रहात नाहीं. सर्व इतबार अंबाजी इंगळे व त्यांची तर रीत, दोन आपण खावे तीन सरकारांत सांगावे अशी. आम्ही आल्या तागायत कागदास शाई लागण्याचा प्रसंग नाहीं. पुरंदर व तळेगांव तहाची नकल, हैदरखानाकडील मुद्दे व सरकारचे तहाचे मुद्दे लिहून पाठवावे. [महा. का. पृ. २४०–४२]

„ –माघ इ.१७८२ जाने, फेब्रु.

नाना महादजींना लिहितात—इंग्रजाशीं तह करतांना फार सावधगिरी ठेवावी लागते; पुढील मागील गुणदोष पहावे लागतात, एकेका अक्षरास जपावे लागते. त्यांचे बोलण्यांत लिहिण्यांत अक्षराअक्षरांत फार पेच असतात. [निवडक पत्रें]

„ –फाल्गुन शुा १ सौम्यवासर इ.१७८२ फेब्रु. १३ (सफर २)

महादजींचें नानांकडे निखालसतेचें खुलाशानें पत्र–ह्यांत नानांच्या गैरसमजास बावांनीं सोदाहरण उत्तर देऊन भाऊपणा अकृत्रिम कसा व सरकारचें कल्याणच पहातो हें सखारामबापू, मोरोबादादा, पवार, अहल्याबाई, नजफखान, आंब्रोजी इंगळे,

हैदरअल्ली, गोहदकर, रणोदकर यांचे संबंधींच्या हालचालींत आपण कसे वागलो हें सांगून स्पष्ट केलें. [इ. सं. ऐ. टि. २ ले. २८. पत्रांत सफर २ आहे तेथें २९ पाहिजे.]

,, –फाल्गुन शुा २ इ.१७८२ फेब्रु. १४ (रवल १)

इंग्रजाच्या तहाविषयीं नाना महादजींचा पत्र व्यवहार. चंदेरी, दतिया व खेची हीं संस्थानें 'आम्ही घेऊंच लागल्यावर आम्हांस परवानगी कशास' असें पाटिलबावांचें म्हणणें. नानांचें म्हणणें, हीं संस्थानें सरकारचीं, त्यांचें रक्षणाचे एकीकडेच राहून हें काय? असो. सुचवीत असावे. ग्वालेर येत असल्यास गोहदची मसलत समेटावी. तेहि चांगलें तेंच करतील. [काव्ये. प. ले. ३३८]

,, –फाल्गुन शुा २,३ इ.१७८२ फेब्रु. १४,१५ (सु. ११२८ रवल १,२)

महादजींचें नानांस पत्र—इंद्रसेनाशीं इकडे बोलणें होत आहे. तिकडे गाडरकडून उद्रिष्टिन आल्याचें कळतें. तरी हैदरखान तोडून सलूख होऊं नये. तहाचें कोणे तऱ्हेनें बोलावे तें लिहून पाठवावे. तेथेच पाठवावा असें विचारास येईल. तरी पाठवावयास येईल. हैदरखानास दरम्यान आम्ही आहों. [महा. का. ले. १९५, १९६]

,, –फाल्गुन शुा १० इ.१७८२ फेब्रु. २२ (रवल ९)

हैदरनाइकासुद्धां तहाचें बोलणें बोलावें. दोन मसलतीः बंगाले व अंतर्वेद. मिर्जा अमानी व नजबखानाचीं सूत्रें आलीं, परंतु पैका पाहिजे. जें करणें तें आपल्या जोरावर करावें लागेल. हैदरनाइकाकडे ऐवजविषयीं (नानांनी) बोलणें लाविलें आहे. १५।३० ल. ची सोय झाल्यास बरें. फडणीसी व कारकुनीविषयीं पत्रीं लिहावें. असें आपाजी रामाचें व महादजींचें नानांस पत्र. [महा. का. ले. १९७, १९८]

श. १७०४ चैत्र शु. ८ इ.१७८२ मार्च २२

पूर्वीं नाना मेणवलीस गेले होते. [चंद्र. द. नि. उतारे ले. १७]

" –वैशाख शुा ४ इ.१७८२ एप्रिल १६ (जवल २)

नानांचें दिनकरपंतांस पत्र. परगणें शाहाडोराव, कामबाग, आहिरवाड्यांतील ठाणीं वगैरे इंग्रजापासून घेतलीं. उत्तम केलें. त्यास ठाणीं घ्यावयासी शिबंदी खर्च जाहला त्याचा हिशेब नारो शिवदेव यांस समजावा. ते खर्चाची हिसेरसी करून महालावर ऐवज बसवितील. तो घेऊन सरकारी सरंजामी महालचे कमाविसदारास तीं ठाणीं द्यावीं. तुम्ही उभयतां (यादवराव हरी) हुजूर यावें. [काव्ये. प. ले. ३४४]

" –अ. ज्येष्ठ शुा १ इ.१७८२ मे १३ (जवल २९)

इंद्रसेन म्हणतो वसई वगैरे कोंकण, गुजराथ हा मुलूख घेतला तो देऊं; मात्र फत्तेसिंग गाय०शीं आमचें वचन गुंतलें म्हणून तें स्थल त्यांस द्यावें. पाटिलबावा म्हणतात हें घडावयाचें नाहीं. तर नानांचें म्हणणें तिगस्ताची फत्तेसिगाची वर्तणूक पाहतां बावांनीं त्याविषयीं सांगितलें हें ठीक, गुजराथचा दरोबस्त मुलूख सरकारांत माघारा यावा असें बावा करतील ही खातरजमा. अहमदाबादची ओढ ते (इंग्रज) धरणार नाहींत. परंतु हैदरखानसुद्धां तोड पडून तह ठरणें हेंच कठीण. [काव्ये. प. ले. ३४७]

" –अ. ज्येष्ठ शुा ३ इ.१७८२ मे १५ (जखर २)

नानांकडे उदिष्टिन wather stone आला. इंद्रसेन (Anderson) पाटिलबाबांकडे आला. बावांचा आशय कीं यांचें योग्यतेस गाडर Goddard देखील पोंचत नाहीं. इंद्रसेन तह करील तो हेस्टिनास मान्यच पडेल. (नानांनीं तह बावांवरच सोंपविला. मात्र सरकारचे मुद्दे मवाफक हैदरखानसुद्धां व्हावा व तसा बावा करून घेतील ही नानांची खातरजमा व नाना) नबाबहि इंग्रजावर मसलत करतील, तो उद्योग करित आहों असें नारोपंतास कळवितात. [काव्ये. प. ले. ३४५]

नानांना महादजी कळवितात—पर्जन्यकाळीं संगमरवरी दगड चांगले निघतात; तेव्हां दीड गज लांब दीड गजभर रुंद असा पाहिजे, तो पाठवूं. [काव्ये. प. ले. ३४८]

,, —अ. ज्येष्ठ शु॥८ इ.१७८२ मे २० (जखर ७)

नानांनीं महादजींकडे पुनः लिहिलें कीं, नजफखान मेला. इंग्रज पातशहाकडे लोभ भारी दाखवून अनुसंधान करतील, आगरे वगैरे जागा दाबावयास पाहतील. तरी हाच समय साधून पातशहास ममतेंत घेऊन मोठी गोष्ट साधावी. सर्व घडावयाजोगें आहे. स्वल्प मेहतीनें महल्लाभ होईल. [काव्ये. प. ले. ३४९, ३५१]

,, —अ. ज्येष्ठ शु॥ ८ इ.१७८२ मे २० (जखर ७ सु. ११८३)

महादजी म्हणतात, अपटीननें पुरंदरवर तह केला तसा साष्टी व अंतरवेद वगळून तह करावा. नाना :—अपटीनपेक्षां तळेगांवचा तह चांगला. पाटिलबाबा :—पगडीवाल्यांचा पक्ष इंग्रजांनीं करूं नये व टोपीवाल्यांचा पक्ष सरकारांतून होणार नाहीं. यावर इंग्रज म्हणतो हैदरखानयाचा पक्ष धरणार नाहीं. पण सुजाचा लेक व महमद अलीचे तर आम्ही चाकर, यांचा पक्ष करावा लागेल. व भोसले व नबाब त्याचाहि आमचा सलूख आहे. पाटील :—ह्या त्रिवर्गानीं तर तुमच्या पारिपत्याची मसलत दिली व त्यांत नबाब बाजीकरं = पुढाईत. आणि ते तुम्हांस मिळाले ! नानांचें म्हणणें अंतर्वेदचा करोडोचा मुलूख सरकारचा जातो. व महमद०चा मुलूख हैदरखानानें घेतला, तेव्हां ती गोष्ट हैदर कशी ऐकतात. म्हणून हैदरखान सुद्धां तह व्हावा. [महा. का. ले. २०२ व काव्ये. प. ले. ३५०, महा. २०२ ह्या पत्राचें महा. ३५० हें उत्तर आहे.]

,, —अ. ज्येष्ठ इ.१७८२ मे, जून

नानांचे दिल्लीकर पातशहाकडे पत्र, इंग्रज खुशकींतील दौलतींत आपला कदम टाकून त्या पेंचांत आणिल्या. याची चाल

दुरुस्त नाहीं. त्याचें तंबीवर फौजा आहेत, सिकस्त पावून दर्या व किनारा आश्रयास जातात. तथापि पुनः पैरवी न करीत एसें केलें असतां पातशाहींत नक्ष. ऐसे समयांत पातशहा व नजबखान मसलत करावयाची उपेक्षा करतात. येणे करून इंग्रजांची चाल दूर आंदेशानें येत नाहीं असा अर्थ दिसतो. शिंदे यांनीं सलूख केला म्हणता. पण पातशहानीं निघावें, त्यांनी आपण मिळून मसलन करावी ही प्रतीक्षा जेथें शिंदे करतात तेथें सलूख केला ही आशंका धरून राहणें ठीक नाहीं. विशेष काय लिहावें. पगडीवाल्यांच्या जुरतीच गेल्या. [दि. म. रा. ले. ६४]

,, –अ. ज्येष्ठ वद्य १ इ.१७८२ मे २७ (जखर १४)
तहाची वाटाघाट–नाना म्हणतात–साष्टी उरण कसेंहि करून निदान पक्ष तीन ल. ची जागीर देऊन इंग्रजाकडून घ्यावी. दादासाहेबांस, पाटिलबावांना जर मसलती स्वारी वगैरे करणें, तर सरकारचे हवालीं करावें. पुढें मागें शब्दहि येणार नाहीं. बावांनीं मर्जी ठीक न दाखवून सरकार काम चांगले घडत असल्यास उत्तम. [३५२–५३] पाटिलबावा म्हणतात, ‘ सारे निसुर बसून तमाशा पाहतात; आम्हांवर दगड टाकतात. ’ नानांचें उत्तर बोरघाटावर गाडरची मसलत पडली तेव्हां होळकर वगैरेनीं लढाई दिली. कसाला सोसला हा तमाशा पहाणें कीं मसलत करणें; तहाचें बोलणें त्यांज (बावां) करवींच चाललें आहे; सरकारचे मुद्दे कसकसे बोलावे ते लिहीत गेलो. त्यांत मर्जी दिक्क व्हावी असें कांहीं नाहीं. मोठमोठीं कामें त्यांनीं करावी, सरकारचें मातबर उपयोग ते घडावें, बावांचें कल्याण असावें, सरकारच्या मोठ्या मसलती होऊन पाटिलबावांस यश यावें, भाऊपणांत अंतर पडूं नये, हाच संतोष मोठा आहे. तिकडे परावा मुलूख, मसलत केल्यानें मनसबा होऊन पैका मिळेल व खाली मैदान, या करतां सुचते ते लिहितों. आपलाच आपण नाश करावा असें ज्यांचें चित्तांत

असेल त्याचे मनांत तमाशा पहावा असें येईल तर कळेना. येथील समज अशी नाहीं. [३५४] सालबाईचे गढीस मोर्चे लागले होते. गढी हस्तगत झाली असेल. हैदरखानाचा ताण भारी व फराशिसांचें येणें म्हणून अंतर्वेदींतील जमाव घेऊन हेस्टीन माघारा गेला. [काव्ये. प. ३५५]

,, –ज्येष्ठ शुा १ इ.१७८२ जून १२ (सु. ११८३ जखर ३०)

नानांची स्त्री ओटभरण. ते समयीं सौ. रमाबाई घरीं गेल्या तेव्हां भेट दिली जरीपातळ वगैरे रु. १२५ [स. मा. रो. १ पृ. २५९]

,, –ज्येष्ठ वद्य २ इ.१७८२ जून २७ (रजब १५)

फरासीसांचें नानांना गुडलूरहून पत्र, खुषकी इंग्रजाखेरीज करावी म्हणून चोंहीकडून मोहीम केली. हैदराचेंहि पत्र, फरासिसांचे बादशहांस व वजिरास आले. मुसेसोडोब व खुषबैन पूर्वी पाठविलें, आतां मी (बुसी) ७ ह. फौजसह आलों. चेनापटणवर घेऊन मुंबईस मुसासमरूस पाठवूं. आम्ही आल्यानें इंग्रज तुमचे सरदारांशी फोड करण्याच्या तजविजेत आहेत. [हेंच पत्र पृ. ९४ वर आषाढ वद्य २ शक १७०२ स पडलें आहे त्याची ही मिती तारिख समजावी खं. १० ले. २५७]

,, –आषाढ वद्य १४ इ.१७८२ आगष्ट ८ (साबान २७)

पाटिलबावांनीं इंद्रसेनाशी तहाचे जाबसाल केले त्याची याद पारशी व हिंदी पाहिल्या. त्या तहनाम्यांत दिकती फार आहेत; त्याचे विस्तार पूर्वी पाठविले आहेत. त्या पाटिलबोवांच्या हि चित्तांत यावयाजोग्या आहेत. उत्तर काय करतात तें लिहून पाठवावें. [काव्ये. प. ले. ३५९] दादांना मुदतींत युक्तीचे वाटेनें तुमचे स्वाधीन करूं. हें बोलण्यांत आहे. पाटिलबावांचे स्वाधीन करूं असें कलम नाहीं. नाना म्हणतात बोलण्यावर जाऊं नये; ते दगाबाज आहेत. अगोदर हातीं घ्या किंवा कचेश्वरांस पोचते करा. हैदरखानचे मुद्दे इंग्रज कबूल करीत

नाहींत त्याअर्थी इंग्रजास द्यावयाचा म्हटलेला भडोच जवळील ३ ल. चा मुलूख सरकारचा तरी कां गमवा. हैदरखानच्या बोलण्यास ह्या मुलखाशीं संबंध नाहीं. [३६०, ३६४] पाटिल बाबा म्हणतात इंग्रजाच्या तहाचा ठराव न झाला तर बंगाल-कडे फौजेची रवानगीची तरतूद व्हावी. त्याविना इंग्रज जर-बेंत येत नाहीं. नानांचें म्हणणें—पूर्वीं मसलतीचा नक्षा ठरला तसें घडतें म्हणजे इंग्रज जरबेंत येऊन म्हटलें तसें ऐकतां. मसलत सरकार व हैदरखान यांवर पडली. तथापि इंग्रज नरम पडून चोंहीकडून सलूखाची भानगड पडली. सरकारचे मुखत्यार पाटिलबाबा, त्याशीं वरचेवर लिहित गेलो व त्याप्रमाणें उदि-ष्टिनास येथून निरोप दिला. कीं पाटिलबावांस यश यावें, सरकार काम मातबर घडावें. त्यांत तहाच्या यादी पाहता, कांहीं कलमांत नुकसान. निदान पक्ष पेशजी यादीप्रमाणें व्हावें [३६१] पाटिलबावांनीं सांगितलें, सरकारचा इंग्रजाचा तह झाल्यास भडोच पाटिलबावांस द्यावी ह्या बद्दल इंद्रसेनानें वेगळें बावांस लिहून दिलें आहे. नानांचा मनोदय सरकार उपयोगी मुद्दे पाहिजेत. इंग्रज बोलतो तो आपल्या नफ्यावर बोलतो. त्या अन्वयें कबूल केले असतां हपटनच्या तहास नुकसानी मग तळेगांव तह कोणीकडे ? निदानपक्ष लिहिल्या-प्रमाणें होत असल्यास उत्तम. [काव्ये. प. ले. ३६३]

,, –श्रावण शुा १४ इ.१७८२ आगष्ट २२ (रमजान १२)

तह नबाब व भोसले ह्यांस न कळवितां केल्यास ते वाकड्या चाली धरतील. बावांचें म्हणणें कीं, ते मसलतीस षरीक असते तर हें इष्ट. पण एक घरीं स्वस्थ व एक पैका घेऊन माघारे. मग सरकारांतून तह झाल्यास वाईट त्यांनीं कां मानावें ? पण ह्या दोघांनी इंग्रज आम्हासी बहुत नफे बोलत असतां श्रीमंतांचे दोस्ती करता ते कबूल न केले. तेव्हां त्यांस घेऊन तह केल्यास उपयोगी. आणि तहांत, नबाबाचा मक्ता दरसाल तुम्हांकडे जो करार तसेंच भोसल्यांची बंगाल्याची जी

चौथाई हीं दोहीं देत जावी एवढें इंग्रजाशी बोलून ल्याहावें. ह्यांत इंग्रजाचेंहि कांहीं नवीन जात नाहीं. त्यां दोघांसहि गोड व राजकारणास उपयोगी हें नानांचें म्हणणें. [काव्ये. प. ले. ३६७]

—वेळास हा आमचा वतनी गांव, तो, सरकारची साष्टी सुटली नसतां सोडून घ्यावा हें ठीक नाहीं. [३६८] हैदर व फराशिसाकडील मुसामुतीण ह्यांस सोडून तह केल्यास ते विरुद्धच मानतील. इतकेंहि करून इंग्रजाचा तह करावा तर सरकारचेहि मुद्दे खातरखा कोठे होतात. इंग्रज तहाप्रमाणें चालवितील हाहि भरवंसा नाहीं. सरकार, इंग्रज, नबाब, भोसले यांचें मसलतीचें धोरण एव्हांपासून बांधिलें पाहिजे. इंग्रजाशी बोलून ठेवावें कीं, तुमचा तह झाला व हैदर आम्हाशीं विरुद्ध केल्यास तुम्ही आम्ही मिळोन खानाचें पारिपत्य, खान फराशीस एक जाहलें असतांहि करावें. [३६९] तहयादीच्या नकला भोसले नबाबाकडे पाठवून पत्रें ल्याहावीं कीं, इंद्रसेन याप्रमाणें बोलतो याचें उत्तर काय. मुदत महिना दीड महिन्याची. ते काय अधिक नफा करून देतात हे गोष्ट कळतच आहे. गृप्त तह पक्का करावयाचा. पण असें केल्यास त्या दोघांचा संतोष राहिल. [काव्ये. प. ले. ३७१]

„ —भाद्रपद शुा १३ इ.१७८२ सप्टें. १९ (सवाल ११)

तहाची वाटाघाट—इंग्रजाचा व सरकारचा तह झाला त्यापासून सहा महिन्यांत टिपूकडून तो कबूल करून घेऊन महमद अल्ली व इंग्रज यांचें पाडाव व मुलूख सोडून द्यावे. नाहींतर सरकार व इंग्रज सामील होऊन टिपूचें पारिपत्य करावें. आणि हैदरचा मुलूख निमेनिम वाटून घ्यावा व सरकारचा सरकारांत घ्यावा. पाटिलबावा म्हणतात, सरकारचे सरदार मुत्सद्दी सावकार कोणी इंग्रजाकडे गेले तर त्यांचा आसरा देऊं नये. त्यांतून गायकवाडचेंच कलम कां लिहिलें ? फौजेचा व पलटणीचा खर्च बरोबर नाहीं. पलटणीप्रमाणें फोजेच्यानें काम

होत नाहीं अशा समजुतीनें इंग्रज वेगळे बोलतो. नाना म्हणतात. टिपूकडील मुलूखापैकीं दोन हिसे श्रीमंत व एक हिसा इंग्रजांनीं घ्यावा. तसेंच नबाब भोसले ह्यांनीं परस्पर इंग्रजाशीं सिलसिला व वकील ठेऊं नये. पाटिलबावा म्हणतात त्या कलमानें बाध येईल. व ती गोष्ट न घडावी. [महा. का. ले. २०८]

„ –भाद्रपद वाा ६ इ.१७८२ सप्टें. २७ (सवाल १९)
नबाबाकडे जानसन २० हत्ती, ३० पालखीनसीन घेऊन गेला तर नबाब सरकारचे पेटचांत त्यापक्षी परभारे वकील यावयाचें कारण काय? इंग्रजाकडे नबाबाचा मुलूख इजारा आहे. तथापि परभारे जाऊं नये. [महा. का. २१०]
—शामलाचें राजकारण सरकारांत आल्यास इंग्रजांनी त्याची पासदारी राखूं नये मदत करूं नये. हें नानांचें महादजींस म्हणणें. [महा. का. ले. २११]

„ –भाद्रपद वद्य १३ इ.१७८२ सप्टे. ५ (सवाल २७)
लखनौ येथें वजिराकडे मवाटीन, इंग्रजाचा मुकत्यार, व भवानीसिंग ह्यांची कापाकापी व मृत्यु. [दि. म रा. ले. ७२]

„ –आश्विन शुाा ३ इ.१७८२ आक्टो ९ (जिलकाद १)
पाटिलबावा म्हणतात त्याप्रमाणें फराशिसापासून आज पावेतों कोणता उपयोग पडला कीं पुढें होणार? तथापि नाद राखावा. तरी तसें करीत आहे. असें नानांचें म्हणणें [काव्ये. प. ले. ३७५]

„ –आश्विन वद्य इ.१७८२ आक्टोबर
दिल्लीहून नानांना सेवेचा मुरंबा २ शेर हिंगणे पाठवितात व पातशहाजाद्या आग्रचाची सुभेदारी मिळाली व नजबकलीखानाची सुटका. [दि. म. रा. ले. ७४] आणि दिल्लीतील बखेडाची वार्ता कळवून ह्यावेळीं कोणी सरदार आल्यास फार साधेल ही सूचना देतात. [दि. म. रा. ले. ७३, ७६]

,, –आश्विन इ.१७८२ नोवें.

नानांच्या सांगण्यावरून महादजींनी ४ महाल बाईकडे वरकड तुकाजीकडे. बाईकडील खर्चाची नेमणूक वजा करून बाकी पैसा बाई तुकोजीकडे देतील अशीं पत्रें लिहिण्याचें ठरलें. पण सदाशिव दिनकर म्हणतो, महेश्वरीं जाऊन बावांचीं पत्रें बाईस दिलीं पण त्यांत चौमहालचा मजकूर नाहीं! त्यांतील अर्थ ध्यानांत यावेसें आहेत. हीं पत्रें पाहिल्यावरून ध्यान दुसरेंच आढळलें. सदाशिव दिनकरचें नानांस पत्र [महा. का. ले. २१७]

,, –आश्विन इ.१७८२ आक्टो

तहाचें कलमवार लिहिणें. नाना, महादजी व इंग्रज यांतील सवाल जबाब [महा. का. ले. २१४ पृ. २६४ ते २६७]

,, –कार्तिक शुा १ इ.१७८२ नोवें. ६ (जिलकाद २९ सु. ११८३)

तहाचा निष्कर्ष आपाजीराम नानांस लिहितात, मुख्य गोष्ट कीं पहिल्यानें इंग्रसेनाशी पाटिलबावांनीं तह केला त्या करण्यांत सर्व मुत्सद्दी(गिरी) श्रीमंतांच्या घरची आपल्या अंगीं, ऐसे जाणोन केला. त्यांतील गुणदोष मनांत आणून गोष्टी केल्या असत्या तर इतका विचार नव्हता व सरमारकामहि यथास्थित होतें. परंतु या गोष्टी प्रथमच गेल्या. तहच करणें तेव्हां बावा सांगतील त्याप्रमाणें कबूल करणें प्राप्त. पाटिलबावांच्या विद्यमाने जो तह झाला तो नानांकडून जीं मतलबाची कलमें आली तीं अलाहिदा राहिलीं. [महा. का. ले. २१६]

,, –कार्तिक शुा १३ इ.१७८२ नोवें. १७ (जिल्हेज ११)

आंबोजी इंगळे बानीकर ह्यांची सरकार महालांतच (शहाडौरा महात्पूर पचावल विराटे रणोद इ.) लूट. महादजींना गढीबंद जमीनदारांविषयीं तेथील कमाविसदार जर बोभाट सांगत नाहींत तर नसतें निमित्त ठेऊन गिराशे ह्यांचें पारिपत्य न होता, सरकारचेच महाल लुटावें हें ठीक नाहीं. त्याविषयीं

बोलतां मर्जी खप्पा जाहली. राणेखानभाई म्हणाले, तूर्त इंगळ्याचे नादीं आहेत. नाना म्हणतात, लोभावर दृष्टि ठेऊन रुपये घेणें हा लौकीक एक प्रकार दिसतो. इंग्रजास रस्त पोचविली, लबाडी केली तर सरकारचे कमाविसदाराकडून गुन्हेगारी नजर घेऊन बंदोबस्त करून ते पैसे सरकारांत पावते करणें, हें थोरपणास चांगलें. सरकारचे पत्र येविषयीं पाटिलबावांस प्रविष्ट करावें. उपद्रव मना जाहला तर बरेंच. नाहींतर ईश्वरी इच्छा. मर्यादाच सुटली. [काव्ये. प. ले. ३८०]

श. १७०४ कार्तिक वद्य ३ इ.१७८२ नोवें. २३ (जिल्हेज १७ सु.११८३)
उदिष्टीनाचे बोलण्यांत दादा व साष्टी द्यावयाचे होते. परंतु पाटिलबावांकडे इंद्रसेन आला, तेंहि सरकारचें बोलणें जाणून उदिष्टिनास निरोप दिला. नबाब भोसले इंग्रजाचे तहाविषयीं बोलत होते ते न ऐकलें. आणि आतां सरकारचें मसलतीस कांहींहि न जहाले ! दादा स्वाधीन नाहीं, हैदरखानचा मुद्दा कांहींच न जाहला, साष्टी व अंतर्वेदच्या कलमांत नुकसान्या, [काव्ये. प. ले. ३८१]

,, –मार्ग. शुा १०,१२ इ.१७८२ डिसें. १४, १६ (जिल्हेज २४)
तहाच्या यादी दोन—सरकार अन्वयास प्रतिकूल तें गाळावें. दुसरीं यादी जास्त कलमें लेहून घ्यावयाची. पैकीं सरकारचा तहनामा नसल्यास महादजींनी रामजी पाटील व सदाशिव दिनकर यांस लष्करांत येऊं नये असें सांगितलें. कारण, तहनामा नाहीं तर इंद्रसेन उठोन जाईल. [महा. का. २१८,२१९]

,, –मार्ग. व. २ इ.१७८२ डिसें. २१ (मोहरम १५)
तहाविषयीं पारशी व हिंदवींत यादी. दोहोंत तफावत. एक कोरा डौलाचा कागद व लिहिलेला दुसरा. असें नानांनीं पाटिलबावांचे सांगणेवरून पाठविले. पण यादी व कागद दोहोंतहि फरक व त्याविषयींचे नानांचें लिहिणें [काव्ये. प. ले. ३८२–३८७] पाटिलबोवांस इंद्रसेनासह स. माधवरावांचे

लग्नास निमंत्रण व तोंपर्यंत कलकत्याहूनहि तहाचे कागद येतील. तह श्रीमंतापाशीं ठरला हे लौकिकांतहि ठीक [३८८]. हैदर व इंग्रज यां उभयतांत आणि हैदर अथवा इंग्रज ह्यांचें सरकारशीं बिघडलें तर त्यांविषयीं तहांत काय पाहिजे याबद्दल नानांचें तपशीलवार लिहिणें. व पुरंदरास इपटनाशीं तह व आतांचा तह यांतील अधिक उणें काय त्याविषयीं [काव्ये. प. ३९४ त्याची तारीखमिती १७ सफर धरून दिलेली आहे. पण पत्रांत मोहरम १५ आहे?]

,, –मार्ग. व. ९ इ.१७८२ डिसें. २८

इंग्रजाचे मतें थोरला तह बावांचे विद्यमाने करावा. पुण्यास पत्रें लिहिलीं आहेत. जाब आले नाहींत. येतील असें, बाजी विठ्ठल अहल्याबाईस लिहितो. [चंद्र. द. नि. उतारे पृ. १८]

,, –मार्ग. इ.१७८२ डिसें.

दिल्लींतील यादवी, पाटिलबावा व गोसावी यांचा भाऊपणा, ह्यावेळीं एकवाक्यता व एक हातीं काम व फौज येईल तर सर्व साधेल ही सूचना. [दि. म. रा. ले. ७९]

,, –पौष वद्य ५ इ.१७८३ जाने. २३ (सफर १९)

अहल्याबाई म्हणतात श्रीमंताच्या पायापाशीं एकनिष्ठता, कायम मिजाज असा दुसरे कोणाचा पाहिल्यांत आला नाहीं. शाबास ह्याच ब्राह्मणांची. गेलें राज्य संभाळलें. नानांच्या एकनिष्टतेस त्रैलोकी उपमा नाहीं. उभयतांहि कारभारी चांगलें. [म. द. बा. पृ. १७६ ले. ८३]

–पौष वद्य १३ इ.१७८३ जाने. ३० (सफर २६)

स. माधवरावांच्या लग्नसमई राव प्रधान, वधू, थो० मातुश्री, सगुणाबाई, (सौ. मा.) काकुबाई, सौ. मा. दुर्गाबाई यांस अहिल्याबाईनें अहेर पोषाख पाठविला. त्याबरोबर नानांना (शुभ्र साधा व कच्चा रंगी खिनखाबी) पाठविला. [म. द. बा. भाग १ पृ. १७९ ले. ८३]

,, –माघ शु. ९ इ.१७८३ फेब्रु. १० (सु. ११८३)
सवाई माधरात्र ह्यांच्या लग्नांतील व्यवस्थेविषयीं नेमणूकीचें कामाची विस्तृत नोंद. [काव्ये. प. ले. ३९७]

,, –माघ व. ९ इ.१७८३ फेब्रु. २५ (रवल २२)
तहांतील हैदरखानाविषयींच्या कलमाचे तीन पर्याय व त्यासंबंधी पाटिलबावांचें मत [काव्ये. प. ले. ४००] हैदर वारल्यामुळें इंग्रजांनीं तीन टोळ्यां करून पाय शिरकविला, बिदनूर त्यांनीं घेतले [४०१]. स. माधवरावसाहेबांचें लग्न झालें. सातारकर छत्रपती आले नबाबाचे पुत्र मागाहून आले. [४०२]

,, –फाल्गुन इ.१७८३ मार्च
महादजींचें म्हणणें कीं, आम्ही आजपावेतों वर्तणूक स्वबुद्धीनेंच केली नाहीं. नानांचे विचारें कागदीपत्रीं बळकटी होऊन तह झाला. नानांचें बोलण्यांत फेरफार नाहीं. ते आम्हांसी कृत्रिम करणार नाहींत. श्रीमंतांचे पक्षाचे आम्ही दोघे. अशांत टिपूस पुण्याहून पत्र गेलें म्हणतात हें तो प्रतिबाधक आहे. आमचे विरुद्धामुळें कार्य आचरले असतील. आमचे मार्फत तह ठरला, आमचे वर्चस्व व दरम्यानगिरी नको म्हणून मुंबईकर व मद्रासकर यांचे मार्फत टिपूसीं सूत्र लाविलें असें ऐकण्यांत आले. परंतु एकोणीस विश्वे नानास विदित नसतां दरम्यानच आमचे स्नेही असतील त्यांनीं केले असेल. तरी नानांस कळवावे. ते ठाऊक असल्यास चोरणार नाहींत, निवडून लिहतील, विदित नसेल तर शोध करतील व लबाडास शिक्षा करतील. [महा. का. ले. २२७]

,, –फाल्गुन शु. ७ इ. १७८३ मार्च ९ सु. ११८३
श्रीमंत रा. नानाचा व श्रीमंत (अहिल्या) मातुश्रीसोचा हेत श्रीमंत रा. पाटीलबावाचे ठिकाणीं निसीम. विनायक बाजीराव चंद्रचूड (कनेरसर-शाखा) माधवराव चंद्रचूडास लिहितो. [चंद्र. द. नि. उतारे पृ. २३]

,, –फा. शु. ११ इ. १७८३ मार्च १३ (रखर ९)
नानांनी सांगितल्याप्रमाणें तह होत नाहीं व म्हणून तहनाम्याचे कागद महादजीस देण्याचें नारोपंत पोक्षे यांनी टाळलें. तेव्हां पाटीलबावा निग्रह करून घेणार हें पाहून 'एवढें थोर, पहिल्यानें लिहिलें काय' हें सांगून व दस्त ऐवज लिहून घेऊन कागद दिला. [काव्ये. प. ले. ४०४]

,, –फाल्गुन वद्य १ इ. १७८३ मार्च (रखर १४)
महादजींचें नानांस पत्र, टिपूची मसलत सरकारांतून करणें प्राप्त. त्यास स्वदेश माळवा मिलोन त्यांजवर कोणे रीतीनें तोडजोड केली त्या अन्वयें बाईंस लिहावयास येईल. १५ ल. ची तर्तूद तुकोजीकडे व १५ ल. अहिल्याबाईकडे. [महा. कां. २२४]

,, फाल्गुन वद्य १३ इ. १७८३ मार्च ३० (रखर २६ सु. ११८३)
फरासिसांकडून पेशव्यांकडे इंग्रजास, जे त्यास सामील होतील त्यासुद्धां, आम्ही व तुम्ही मिळून खस्त करूं, असें पत्र. स. माधव०च्या लग्नाबद्दल अभिनंदन मुसा मुतीण यांजवळ बोलावे. तुमचे जाबसालास आम्ही उमेदवार आहों. [काव्ये. प. ले. ४०५]

१७०५ चैत्र व. ९ इ. १७८३ एप्रील २५ (जवल २२)
नानांनीं महादजींना नारोपंत पोंक्षे यांकरवीं कळविलें कीं, नागपूर भोसले व हैद्राबादकर निजाम ह्यांस इंग्रजांकडून उठावणी देवविणें व मग त्या उभयतांनी आपणाकडे बोलणें हें, आपणाहून भोसलेनिजामाशीं बोलण्यापेक्षां सांप्रत इष्ट. कारण टिपू विरुद्ध चाल करण्याचा हा विचार, इंग्रजांचे त्या दोघांशी आधींचेंच सूत. त्यावरून इंग्रजाचेहि व दोघांचेहि मनोगत व स्वरूप कळेल. टिपूच्या उल्लेखामुळें हे पत्र वरील मितीचें म्हणून धरलें. पुस्तकांतील शु. १३ ही तर चूकच आहे. [काव्ये. प. ३४६]

,, –चैत्र वैशाख इ. १७८३ एप्रील मे

'फौजेची तयारी व सरदार रवाना' ही गोष्ट येथें संभूतहि नाहीं. मिरजकरांकडे मुलीचे लग्न, रास्ते येथेंच, होळकरांचे घरीं बखेडा. आंतून एक मसलत व बाहेरून एक शोहरात हा प्रकार येथील नाहीं. बातम्या गेल्या हें अपूर्व. टिपूस पत्र पाठविलें. उत्तर कसें येतें तें पाहून त्यासारखें करावयास येईल; असें नानांचें पत्र. ' आंतून एक मसलत व वाहेरून एक शोहरत ' हें अक्षरें ऐकून बाबा मनांत संकोच पावले. [महा. का. ले. २२९]

,, श. १७०५ वैशाख शु. ४ इ. १७८३ मे ५ (जखर ३)

बाजीराव बरवे म्हणतात. ' फार करून मानस राजश्री नानांजवळ असावे असें आहे. ते कृपा करतील. दीर्घ द्वेष त्यांचे ठिकाणीं नाही. ' श्रीमंत रा. दादा अखंड रा. नानांचे व हरिपंत तात्यांचे गुण गातात. 'आमच्या दौलतींत ते कारभारी. त्यानीं राज्य रक्षिले.' उभयतांचे नांवें मजकूर आला तर श्रीमंती बरेच म्हटले. बापू, आबाजी महादेव व चिंतो विठ्ठल यांस दोष ठेवीत, ते अप्रामाणीक. ' [म. द. बा. भा, २ पृ. २१–२२]

,, –वैशाख व. ४ इ. १७८३ मे २० (जबल १७)

अहिल्याबाई म्हणते ' नाना वचनाचे पक्के आहेत. बोलल्या बोलास त्यांजकडून अंतर होणार नाहीं ' म्हणून पक्केपणें आपलें लक्ष राखून आहेत असें विठ्ठल शामराज़ लिहितो. मुख्यत्वें कायावाचामनेंकडून नानासाहेबांचें लक्ष पक्केपणें राखावें ' असा बाईंचा मानस [म. द. बा. पृ. १९९]

,, –वैशाख वद्य ५ इ. १७८३ मे २१ (सु. ११८३)

दादा स. माधवराव यांज मधील वागुणुकीचा करार कलमें १४. बाळाजी जनार्दन फडणीस यांचा कारकून फडणिसीचे कामकाजास असावा. कलम ३. सांबाची शपथ. [ऐ. पत्रव्य. ले. २१८]

,, –ज्येष्ठ शु. ४ इ. १७८३ जून ४ (रजब ३)

दादांच्या कारकुनाची याद व त्यावरील पाटीलबोवांचीं उत्तरें कळलीं. त्यांचे जाजती मुद्दे ऐकावयाचे नाहींत. गोदातीरीं राहण्यास येऊंच लागले तर पाटीलबावांनीं इंग्रजांचे तहांत केलेल्या धोरवटयानें घडेल. [काव्ये. प. ४२३]

,, –आषाढ शु. ३ इ. १७८३ जुलै २ (साबान १)

तहाची वाटावाट–नबाबास वाटणी देणें हें इंग्रजांशीं बोलूं नये असें पाटीलबावांचें मत. नानांचें मत बोलावें. कारण, नबाबाची समजूत पडणार नाहीं व तुम्ही व आम्ही मिळोन तोड काढावी तर तिसरा हिसेदार ठरतो. म्हणून हैंदरचा मुलूख सुटला तर फौजेवर वाटणी करावी. दोन हिस्से सरकार एक हिस्सा इंग्रेज. टिपू फराशीस एक झाले. नबाबाकडेहि त्यांची संधानें आहेत. नबाब, टिपू व फरासीस एक झाले तर मसलत भारी पडेल. याकरितां नबाब सामील करून घ्यावे [काव्ये. प. ले. ३५७]

,, –आषाढ शु. ४ इ. १७८३ जुलै ३

टिपूकडून स. माधवरावांस लग्नाचा अहेर शिरपेच वगैरे आला. त्याबरोबर नानांस हत्ती आला होता. [ऐ. ले. सं. ७ पृ. ३७०६ [

,, –आषाढ शु. १० इ. १७८३ जुलै ९ (साबान ८)

महादजींचें नानांना पत्र दादा आमचेकडे आल्यास आम्ही भारी होऊं हे विचार होतात ! आश्चर्य आहे. दादानीं इकडेच यावें असा आग्रह नाहीं. इंग्रजांचे घरांतून काढून आपले घरांत आणावें. इतका अर्थ, दादासाहेब व ठाणी हाताखालीं घालावी, टिपूकडील नाद राखावा अशा विचारें तहाचे निभावणी विषयीं मध्यस्थास फजित पाडावयाचें असल्यास तो विचार आधीं कळावा ! अहल्याबाई व तुकोजी ह्यांत नाना तुकोजीचा पक्ष घेऊन बोलतात ते खरेंहि नाहीं व योग्यहि नाहीं. आपण तसें सांगणार नाहीं, याविषयीं स्पष्ट पत्र [महा. का. २३६, २३२, २३४]

(१७०५) होळकरांकडे बाईचीच वहिवाटीची पूर्वपारची रीत हें महादजींचें म्हणणें. नानांचें म्हणणें–घोड्यावर एक, घोड्याचा लगाम दुसऱ्याचे हातीं हें कसें ? [महा. का. ले. २३६ व २५३ भाद्र. शु. १० सवाल ९ ता. ७।९]

" –आषाढ शु. १२ इ. १७८३ जुलै ११ (साबान १०)
नानांचें महादजींस म्हणणें–सरकारचा व इंग्रजांचा तह झाला त्यापेक्षा इंग्रजांकडील वकील (सरकारांत बोलणें चालणें करण्यासाठीं) येथें यावा. महादजी :—टिपूवर फौज पाठविणेचा निश्चय झाला म्हणजे येईल. [महा. का. ले. २३९]

" –आषाढ वद्य ६ इ. १७८३ जुलै १९ (सु. ११८४ साबान १८)
राधोबादादांनीं नानांना पत्र लिहिलें, आजताा मागील कित्येक गोष्टीविसी आमचे चितांत विरुद्ध होते परंतु आजपासून निखालसता जाहाली. तुम्हाविसी आढ्या होत्या त्या सोडिल्या. येविसी सांबाची शपथ असे [इ. सं. ऐ. स्फुट ले. १ पृ. १६]

" –श्रावण शु. १ इ. १७८३ जुलै ३० (सु. ११८४ साबान २९)
इंग्रजांचे वगैरे गडबडीमुळें बंदोबस्ता करतां नेमणुके शिवाय जाजती नामजाद लोक पाठविले ते हुजूर पाठविणें व जदीद ठेविले ते दूर करणें. परगणे नसरापूर निसबत बाळाजी जनार्दन दिमत जाधवराव बेलोसे, १०२ हशम [स. मा. रो. २ पृ. १९२]

" –श्रावण शु. १ इ. १७८३ जुलै ३० (सु. ११८४ साबान २९)
गोपिकाबाईंचें नाना विषयीं प्रशंसोद्गार–फडणीसपंत तसेच विश्वासू यशस्वी आहेत. फितुरी झाले त्यांची यथायोग्य पारिपत्यें केलीं. इतरहि कर्तबगारीवर फार संतोषी. इतके करतीलसा भरोंसा नव्हता. चिरंजिवांनी (माधवराव) कृपा केली त्याचें सार्थक उभयतांनीं (नाना व हरीपंत किंवा महादजी) केलें. संतोष आहे. [इ. सं. ऐ. टि. १ पृ. ३२, ३३]

,, –श्रावण वद्य १ इ. १७८३ आगष्ट १३ (रमजान १४)
विठ्ठल शामराज, हरिपंत तात्या फडके यांस लिहितात. अहिल्याबाईंचें लक्ष श्रीमंत राजश्री नानासाहेबांच्या पायाशी फार आहे. बाईंचें मानस की पक्केपणें नानासाहेबांचें अभय असावें. [म. द. बा. भा. १ ले. १०६]

,, –श्रावण. वद्य १० इ. १७८३ आगष्ट २१ (रमजान २२)
अहिल्याबाई व तुकोजी ह्यांजकडील कारभारा विषयीं [महा. का. ले. २४५ नानांचें धोरण महादजींस नापसंत]

,, –भाद्रपद शु. ११ इ. १७८३ सप्टें. ७ (सवाल ९)
अहमदाबाद विषयी इंग्रजांनीं सोडचिठी, करारांत असतां, दिली नाहीं. हें नानांचें म्हणणें. महादजींचें म्हणणें कीं सरकारचा मुलूख फत्तेसिंगाच्यानें ठेववतो असा अर्थ नाहीं. तथापि असा त्याचा विचार आसल्यास पारपत्याचा विचार करावा. पण इंग्रजाचें पत्र मागावें हें ठीक नाहीं. [महा. का. ले. २५४]

,, –भाद्रपद वद्य ९ इ. १७८३ सप्टें. २० (सवाल २२)
अहिल्याबाई बोलली जे, 'ईश्वर करो. आणि त्यांची (राघोबा व नाना इ. यांची) घरांत समजूत पडो, नि दुनियेचा कांच तुटो. यांत सर्वांचें बरें आहे. नाना कृपा करितात तेवढे आमचे तिळीं आहे. जेथें न पोहोंच, तेथेंच विस्कलित होतें. शाबास त्यांचीच (नाना, हरिपंत इ.) छाती त्यांस उपमा देयास दुसरा नाहीं. दादासाहेबांनीं इतकी घाण केली.' [म. द. बा. भा. १ ले. ११० पृ. २१९]

,, –आश्वीन शु. २ इ. १७८३ सप्टें. २८ (जिलकाद १)
इंद्रसेनास एक लक्षाची जागीर गायकवाड मुलखापैकीं देणें ठीक दिसत नाहीं. सरकार तालुक्यापैकीं द्यावीं व त्याचे मोबदला गायकवाडांतून घ्यावी. हें बावांचें म्हणणें. नाना म्हणतात, पूर्वीं अशी चाल नाहीं. शिवाय उदिष्टीन साष्टी देत असतां अधिक नफे होतील हें जाणून इंद्रसेनाशीं तह केला.

(१७०५) आतां साष्टी नाहींच. बरें. बावांनीं म्हटलें, तरी जागीर द्यावी. परंतु कलकत्त्याहून पांच कलमांचा करार यावयाचा आहे, तो आल्यावर देऊं. दादासाहेब इकडे येणार हें पूर्वींच लिहिलें असता, तुम्ही (नारोपंत) लिहिल्यावरून केलें असें (कां) म्हणतात. दादांचा भरंवसा कोणीहि मानीत नाहींत. या करतां इकडे आणावयाचें केलें. [काव्ये. प. ४१८, ४२८–४३२ महा. का. ले. २३१. ज्येष्ठ शु. १ = २. ६. ८३ :–शिंदे काल्पीचे लगत जागीर द्यावी, असें म्हणतात]

,, –मार्गशीर्ष शु. १२ इ. १७८३ डिसें. ५ (मोहरम १०)
राघोबा म्हणतात, नाना व हरिपंत प्रामाणिक आहेत. आज पावेतों दोघांनीं शपथक्रिया दिली नाहीं. वरकडांनी देऊन बदमामली केली. मीहि त्यांसी तसाच वर्तलों. नंतर शागीर्द पुण्यास तात्यांस भेटला. तात्यांनीं नानांची भेट बेलबागेंत विष्णुपाशीं घेऊन दादांचे आणण्यास मान्यता घेतली. व विष्णूची शपथहि घेतली इ. सदाशिव दिनकरचें वार्ता पत्र [महा. का. पृ. ३५८–३५९]

,, –पौष वद्य ५ सोमवार इ. १७८४ जाने. १२
श्रीमंत नाना आवशीचें दोन घटका रात्रीस मुहूर्तें डेरेदाखल जाहले. (टिपूवर स्वारी. बदामीची लढाई) [ऐ. ले. सं. भाग ८ ले. २७७७]

,, –इ. १७८३
नानांना धोतर–जोडी महेश्वर, इंदूर येथून पाठविण्याची पद्धत होती. १३ धोतर–जोड्या २७८ रु. व एक शेला सफेत जामेवार रु. २३. बाईची इच्छा धोतर जोडी आपण पाहून खर्च करून पाठवावी अशी असे. [म. द. बा. ले. १०५, १०७]
–नानां फडणीस यांचे गर्भाधान समयीं तिवट, शेला, लुगडें, खण असें कल्याण सुभेदार आनंदराव राम यांजकडोन अहेर [पे. सा. पृ. २५] येदगिरी येथें नाना यांची मोंगलाशी भेट

शक १७०६ चैत्र शुा ९ इ.१७८४ मार्च ३० (सु. ११८४ जवल ८)
बाळाजी जनार्दन व निजाम अलीखान बहादूर यांचे यादगीर येथील भेटींतील सनदा (बार पुढील वर्षी) [स. मा. रो. १ पृ. २६०]

,, –चैत्र वद्य ३ इ.१७८४ एप्रील ९
नानांच्या करतां नेसावयाचीं धोतरें जोड ११–रुंदी १ गज लांबी हात ९ (सरकारी गज कारागिराचे गजापेक्षां अधिक पृ. ५८) [म. द. बा. ले. ५२]

,, –वैशाख शुा १ इ. १७८४ एप्रील २०
नाना फडणवीस यांची स्वारी पंढरपुर क्षेत्रीं [ऐ. ले. सं. ८ ले. २७८६ व ले. २९२१]

,, –वैशाख शुा ७ इ.१७८४ एप्रील २५
श्रीमंत रा. नाना श्री क्षेत्रावर=पंढरपूरास आहेत. गोंविद-राव पिंगळे शहराहून येऊन श्रीमंत नानांशी बोलोन माघारे नबाबाकडे गेले. [ऐ. ले. सं. ८ ले. २७८७]

,, –वैशाख वा१ इ.१७८४ मे ६
बुधवार वैशाख शुा १५ रोजीं राजश्री नानांकडून पत्र आलें. फेरोजाबाद येथें कूच करून लष्करसुद्धां गेलो. तेथून नबाबास व आपल्यास विसा कोसांची तफावत राहातें. मजल दहा कोसांची नेमिली आहे. [ऐ. ले. सं. ८ ले. २७८८]

,, –वैशाख वद्य १२ इ.१७८४ मे १६ रविवार
नाना व परशरामभाऊ यांची भेट वीस घटका दिवसास व रात्रीं. नाना व नबाब यांची भेट नबाबांचेच डेऱ्यांत प्रथम प्रहर रात्रीस आजूर–(भीमातीर–यादगीरजवळ) येथें झाली. [ऐ. ले. सं. ८ ले. २७८८–९०; खं. १९ ले. २१२. २१ मे स नबाबाची नानांस परत भेट. महादजींनीं ह्याभेटीबद्दल 'मनसबा थोरला' म्हणून गौरव केला आहे. [महा. का. ले. ३२६]

१७०६–ज्येष्ठ इ.१७८४ मे, जून

माधवराव गंगाधर चंद्रचूड अहिल्याबाईस लिहितात–येथून जाबसाल होणे तों रा. बालाजीपंत नानांचे व रा. महादजी शिंदे यांचें इतल्याखेरीज कर्तव्य नाहीं. [चंद्र. द. नि. उतारे ले. ५०]

,, –भाद्रपद वद्य ६ इ.१७८४ सप्टें. ५ (सवाल १९)

नानांचें म्हणणें इंग्रजानीं मुलखाचें ऐवजीं पैका द्यावा हें ठीक नाहीं; टिपूनें सरकारचा मुलूख घेतला आहे तो सोडून द्यावा, साष्टी सरकारांत द्यावी, कलकत्याहून कलमें मुख्य यावी. पातशहाकडे मनसबा करतात तो सोडावा, टिपूच्या मनसब्याची तोड; इतकीं कामें झालीं तर पाटिलबाबांकरतां इंद्रसेनास दीड लक्षाच्या जहागीरीच्या सनदा देऊं. इंग्रजास धरावें कोठें त्यांचा दस्ताऐवज नाहीं. परभारे टिपूशीं तह केला. इंग्रजांच्या शराकतींत दगा आहे. [महा. का. पृ. ४३६]

, –भाद्रपद वा। ६ इ.१७८४ सप्टेंबर ५

नानांचें महादजींकडे—इंद्रसेन बोलतों तें कसें चूक; तसेंच टिपूचा उद्दामपणा या बद्दल पत्र. [महा. का. ले. ३३०,३३१]

,, –भाद्रपद वद्य इ.१७८४ सप्टें. प. पंधरवडा

नाना फडणवीस यांस पुत्र जाल्याचें वर्तमान [स. मा. रो. १ पृ. २६०]

,, –आश्विन शु। ७ इ.१७८४ सप्टेंबर २१

श्रीमंत राजश्री नाना फडणवीस यांची स्त्री प्रसूत जाहली पुत्र जाहला. सात दिवस होती, उपरांतिक उन्मत्त वायू होऊन आश्विन शु। ७ भौमवारीं देवाज्ञा झाली. पुत्र सुखरूप आहे. नांव जनार्दन [ऐ. ले. सं. ८ ले. २८०२–०३; पे. सा. २६]

,, कार्तिक इ.१७८४ आक्टो. नोव्हेंबर

नाना व हरिपंत सवाई माधवरावांसह गंगापुरास गोपिकाबाईंना भेटण्यास जातात.

,, —मार्ग. इ.१७८४ नोवें. डिसें.

सरकारचीं पत्रें दिल्लीस पातशाहींत इंग्रजाचा पाय शिरूं न देणें. सिरल्यावर हिंदुस्थान दक्षण गेल्यांतच आहे. [चंद्र. द. नि. उतारे ले. ५५, ६५]

,, —पौष इ.१७८५ जाने.

नाना संक्रमणासाठीं मेणवलीस गेले. [चंद्र. द. नि. उतारे पृ. ६५ माघ—नानांचीं दोन लग्नें उल्लेख] [चंद्र. द. नि. उतारे पृ. ६३]

,, —माघ वा। ११ इ.१७८५ फेब्रुवारी ५

नानांचें व तात्यांचें बोलणें होऊन निश्चय ठरला. नरगुंदची पेठ घेतली. उपराला न झाल्यास किल्ला जाईल हें समजोन राजश्री गणेशपंत बेहेरे रवाना केले. आपणांकडील फौज डेरे-दाखल होऊन आपण मागाहून जावयाचें, याप्रमाणें बेत. [ऐ. ले. सं. ८ ले. २८१५]

शक १७०७ अधिक चैत्र इ.१७८५ मार्च

हबशाची कुमक इंग्रजांनीं करूं नये; जंजिरेकराचें जाबसाल सरकारांतून समजून घेतील; असें पत्र बावांनीं कलकत्यास पाठवावें; हें नानांचें म्हणणें. पाटिलबावा (आतां) म्हणतात इंग्रज बेईमान, त्यांच्याशी बोलण्याचा संबंध राहिला कोठें ? [महा. का. ले. ३५५]

—टिपू शत्रू प्रबळ होतो म्हणोन मसलत करावी, छावणी करावी. मदारुलमहामी निघावें. हा एक पक्ष. व दुसरा पक्ष :—नरगुंदाहून खंडणी होऊन कजिया बरसातीचा चार महिने मिटत असल्यास मिटवावा. हें होत नसल्यास यंदाच मसलत करावी. "इंग्रजाचा वकील नबाबाकडे आला" मदारुलमहां =नाना फडणवीस, सामील होऊत चाल करित असल्यास आम्ही बिघाड करितों. गुंता नाहीं. असें बोलणें झालें. [ऐ. ले. सं. ८ ले. २८१८ जखर १]

शक १७०७ अधिक चैत्र शुा ३ इ.१७८५ मार्च १३ (जखर १)

नानांचें परशुरामभाऊस पत्र :—टिपूची बातमी राखीत जावी. तुम्ही होऊन कजियाची गोष्ट करूं नये. काळोपंतांचीं मुलें-माणसें वगैरे झाडून काढावीं. किल्ला लढवाई सरदार व माणूस सरंजाम मात्र असावे. येविशीं पूर्वी लिहिलेंच आहे. [ऐ. ले. सं. ८ ले. २८२०]

,, –अ. चैत्र इ.१७८५ मार्च एप्रील

नानांच्या कारकुनीच्या ऐवजाबद्दल २५ ह. रु. चे गांव दिले. मागील बाकीचा फडशा पुण्यास आल्यावर करून देऊं. असें पाटिलबावांचे सरकारी कामांतील जाबसालांमधील कलम [महा. का. पृ. ५२६]

,, –अ. चैत्र वद्य १२ इ.१७८५ एप्रील ६ (सु. ११८५ जवल २५)

माधवराव ऊर्फ रावजी गंगाधर (चंद्रचूड) यांस आशीर्वाद पूर्वक (त्यांच्या पैकीं वडील व्यक्तीनें लिहिलें कीं,) नाना व श्रीमंत यांजविसी अंतःकरणी बालाग्र विकल्प त्रिपुरुष आला नाहीं व आमचें तर सर्वात्मना भरणपोषणहि यांपासून. हे दिवस पाहावया येक नानांचा प्रसाद. [चंद्र. द. नि. उतारे ले. ६१]

,, –चैत्र शुा २ इ.१७८५ एप्रील ११ (जखर १)

परशुरामभाऊंचें घटप्रभा दक्षिणतीर नजिक मुधोळ येथून पत्र–शत्रूची फौज बेण्णीहाळावर होती. ती आवारवादी येथें मलापहारी किनाऱ्यास आली. त्यांजवर चिरंजीव दादा व गणेशपंत चालून गेले. पुण्याचे पत्रीं (नरगुंदचे) मोर्चे सलुखानें उठले असें लिहिलें आहे. परंतु तसें दिसत नाहीं. यांस (नाना फडणवीस) मात्र भरवंसा वाटतो. [ऐ. ले. सं. ८ ले. २८३३]

,, –चैत्र वाा ८ इ.१७८५ मे २

नाना फडणीसांचें शरीर अस्वस्थ होऊन बदामीचे अलीकडे तीन कोसांवर पटकलीजवळ ते राहिले आहेत. बक्षी बेगमेच्या सांगण्यावरून निजाम–' मोगल अल्लीस दहा हजार

फौज ठेवून जातो असें बोलले' तेव्हां फडणीस म्हणाले कीं, तुम्ही आमचें हुकुमांत चालावें. त्यावरून निजामाला राग येऊन अवघी फौज घेऊन माघारा गेले. नाना फडणीस पुण्यास जाणार या करितां डेरे माघारा केले. त्या डेऱ्यांत प्रस्तानास गेले. एक हत्ती व एक घोडा सरंजामसहित निजामाने नानांना पाठविला. निजाम माघारी जातात; मग आम्हांस हत्ती व घोडा नलगे, असें वकिलासी बोलोन माघारा फिरविले [ऐ. पत्रव्य. ले. २४५]

,, –वैशाख शुा २ इ.१७८५ मे १०

जोधपूरचा वकील कृष्णाजी जगन्नाथ याचें नानांना पत्र— या प्रांतांत नायक उरलेला नाहीं. मुलूख उजाड झाला आहे. हरिद्वार पर्यंत पाटील बावांनीं अंमल केला आहे. पूर्वेचा मुलूख ७ कोटीचा, चांगली जमीन असलेला आहे. उत्पन्न येईल. सिंध प्रांत ३ कोटी उत्पन्नाचा आहे, चांगणा, हरबाब, हरियाणा इ. रयत गरीब, असा प्रान्त सरकारकडे असावा. मुलतान पर्यन्त मुलूख शिखांनीं घेतला आहे तरी फत्तेसिंग गायकवाडास अगर त्याचे भावास १५ हजार स्वारांनिशी कच्छ भूजचे राजाशी सलोखा करून सिंधमध्यें दाब दिला. व पुण्याहून शिखांना पत्र पाठविल्यास कमी होण्यासारखें आहे. यवन शीखांचे शत्रू आहेत. तेव्हां त्यांचेशी सलोखा होऊं शकेल. [इ. सं. जोध० रा. ले. १]

,, –वैशाख शुा १३ इ.१७८५ मे २२ (रजब १२)

नानांचे लग्ना करितां आंबेगांवी ४ भोई पाठविले [पे. सा. २५]

,, –ज्येष्ठ शुा ६ इ.१७८५ जून १३ (साबान ५ सु. ११८६)

महादजींचें नानांना वकील मुतलकी वगैरे तीनहि पदांविषयीं स्पष्टता–पत्र. पूर्वीच्या पत्रीं लिहिण्यांत उलटें पडलें होतें [महा. का. ले. ३९१]

,, –श्रावण वाा १४ इ.१७८५ सप्टेंबर २

नानांना पुत्र झाला तें सांगावयास आला त्यास रु. ३ [पे.सा. २६]

१७०७–श्रावण वा इ.१७८५ आगष्ट सप्टेंबर
नानांचे करतां शालजोडी रु. २५०।३०० [महा. का. ले. ४१३]

,, –कार्तिक शुा ३ इ.१७८५ नोव्हेंबर ५ (मोहरम २)
श्रीमंत राजश्री नाना कार्तिक वा सप्तमीस निघणार. [ऐ. ले. सं. ८ ले. २८७३ टिपूवरील स्वारी]

,, –मार्ग. शुा १ इ.१७८५ डिसें. २ (सु. ११८६ मोहरम २९)
बाळाजी जनार्दन यांनीं तुकोजी होळकर यांस कर्नाटकाचे स्वारीस पाठविले. तेव्हां त्यांस व लांबहाते, कासिबा होळकर वागमारे, पळशीकर (कांबळे), पाराशर दादाजी, इत्यादिकांस शिरपेंच, कंठा, सोन्याचें कडे, इ. बहुमान अलंकार दिले. यादगीर स्वारी. [स. मा. रो. १ पृ. २४९]

,, –मार्ग. शुा १० रविवार इ.१७८५ डिसेंबर ११
नाना टिपूवरील स्वारीस निघाले. [महा. का. ले. ४३५; ऐ. ले. सं. ८ ले. २९२८]

,, –मार्गशीर्ष वा ३० इ.१७८५ डिसेंबर ३१
जेम्स् अँडरसनने मॅकफर्सनला पत्र पाठविलें. त्यामध्यें नाना फडणीसाकडील सैन्याची सुधारणा व त्याची शिस्त वगैरे वैशिष्टयाचा गौरव केला. [पूना रेसी. कॉर० व्हॉ. १ पृ. ३०]

,, –पौष शुा २ इ.१७८६ जानेवारी २ (सु. ११८६ रवल १)
बाळाजी जनार्दन स्वारीहून परत आले. तीन मेणे खाण्याचे पदार्थ मुंबईहून पुण्यास आणावे असें ठरलें. त्यांत दोन खाण्याचे पदार्थ; एक मेणा तांबडा अटकावणेविशी आज्ञा झाली. कां अडविलें ? यांचें उत्तर इंग्रजास पुसावे. पुण्यांत दरबार भरवून साहेबांनीं माफी मागितली. [भा. श. पृ. ७५]

,, –पौष शुा ३ इ.१७८६ जानेवारी ३ (सु. ११८६ रवल २)
चिंताग्रस्त निजामाला नानांची चिठ्ठी—दौलतींत शहाणा नाहीं, असें मानू नये. मजकडे काम सोपवा. मीहि पेशव्यांच्या हिताप्रमाणें तें करीन. [भा. श. पृ. ७७]

,, –पौष शुा १३ इ.१७८६ जानेवारी १२

जेम्स् अँडरसननें मॅक्फर्सनला लखोटा पाठवून कळविलें कीं, नानांनीं फरेंचास लढण्यास मदत केल्यास (!) टिपू ४० ल. रु. त्यांस देण्यास तयार आहे. अशी अफवा आहे. तसेंच फ्रेंच मराठ्यास मिळाल्यास एखादें बंदर फरेंचास मिळेल अशीहि बातमी कळवितो. [पुना रेसिडेन्सी कॉ. व्हाल्यू १ पृ. ४२,४३]

,, –पौष वद्य ८ इ.१७८६ जानेवारी २२

सायंकाळीं राजश्री नाना राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यांचे डेरेस गेले. इकडून तात्याहि गेले. राजश्री नाना व तात्या आमचे डेरेस आले. नानांना तोंडली, परवारी या भाज्या आवडतात, सबब त्या व कोंवळी कोंथिबीर व गुलाबाची फुलें मिळवून दररोज भोयाचे डाकेबरोबर नानांकडे लष्करांत पोचती करण्याबद्दल गंगाधरराव पटवर्धनांचें पत्र. [ऐ. ले. सं. ८ ले. २९४७ टीप]

,, –पौष वद्य १० इ.१७८६ जानेवारी २५ (रवल २४)

नाना लिहितात, इंग्रजाचा वकील येतो. यास मसलतीकरतां कुमकेस इंग्रजांचीं पलटणें चाकरीचें रीतीनें येण्याचें बोलणें सरकारकार्यास उपयोगी; उगेच पुण्यांत राहून बातमी ल्याहावी, फितूर वगैरे त्यांच्या चाली, असें असल्यास फल काय? [महा. का. ले. ४३७]

,, –पौष इ.१७८६ जानेवारी

नानांचें सांगणें कीं, बादशहापासून दक्षिणेंत कोणास बहुमान किताब अगर पत्र, वस्त्रें जाणें, तर श्रीमंतास लिहून उत्तर जाईल तसें घडावें ही मार्गाची गोष्ट. बादशहाचें पत्र जाणें तें पाटिलबावांस कळवून जावें [महा. का. ले. ४२९]

,, –माघ शुा ६ इ.१७८६ जाने. ४ (सु. ११८६ रखर ४)

लोहगड तर्फ पैकीं ज्या गांवी मेस्त्र मालीट इंग्रजाकडील वकील राहातील त्यांस जागा साहित्य देणें. [स. मा. रो. २ पृ. ६९]

१७०७–फाल्गुन शुा ९ इ.१७८६ मार्च ८

नबाबाची भेट झाल्यापासून मसलतीचीं बोलणीं होत आहेत. शवटीं नानांचें बोलणें पडलें. जे, "आम्ही पुणियास जातों. तात्या व नबाबांनीं पुढें जावें." त्यास नबाबाचें म्हणणें. "तुम्ही जातां तेव्हां आम्ही जातों. आज चाळीस वर्षें त्याचा आमचा बिघाड नाहीं; तो तुम्हामुळें करणें प्राप्त झाला. तुम्ही जातां त्या अर्थी आमचें (राहण्याचें) कारण काय? आम्हीही माघारें जातों." शेवटीं मनसुबा बुडतो, लौकिक वाईट होतो; यास्तव नानांनीं रहावयाची मसलत केली. [ऐ. ले. सं. ८ ले. २९६६]

,, –फाल्गुन शुा ९ इ.१७८६ मार्च ८

चार्लस मॅलेटचे जे. अलेक्झांडर डेविडसन–गव्हर्नर आणि कं. मद्रास यांस पत्र. नाना फडणीस व निजाम अलीखान यांची "कृष्णा" नदी जवळील यादगिरी येथें भेट. [पुणें रे. कॉं. व्हॉ. २ पत्र १ पान १]

,, –फाल्गुन वा। ९ इ.१७८६ मार्च २४ कँप बदामी

चार्लस मॅलेटचे प्रेसिडेन्ट व गव्हर्नर इन कौन्सिल यांस पत्र—ता० २५ मार्च १७८६ रोजीं नाना फडणीस पुण्यास परतणार —मॅलेटही नाना बरोबर निघणार [पुणें रे. कॉं. व्हा. २ पत्र ८ पृ. १३] नाना मॅलेटला आपले छावणींत भेटण्यास बोलावतो. पान ५–२३-३-८६ निजाम व नाना यांचें संयुक्त सैन्य टिपूनें घेतलेल्या मुलूखांत शिरतें.

१७०८ चैत्र वा। १ इ. १७८६ एप्रिल १४ (जखर १४)

नबाबानीं राजश्री नानांकडे सांगून पाठविलें. जे फिरोन राजश्री हरिपंत व परशुरामपंडित यांची भेट जाहली पाहिजे. त्याजवरून त्यांचे डेऱ्यास जावयाशीं निघालों. त्यांचें लष्करा-जवळ गेलो तों 'नबाब निजावयासी गेले. आतां गांठ पडाव-याची नाहीं.' म्हणून वकिलानें सांगून पाठविलें. त्यावरून

माघारें आलों. फिरोन नबाबाचें निरोप आलें तेव्हां राजश्री नानांनीं सांगून पाठविलें जे, ते रुसले आहेत. जाबसाल वकील बोलतच आहेत. [ऐ. ले. सं. ८ ले. २९७१]

,, –वैशाख शु. ५ इ. १७८६ मे २

चा. मॅलेटचे गवर्नर जनरल यांस सोबतच्या १५ दिवसापूर्वी नाना अजारी होता व पुण्यास परत येण्यास निघणार होता. निजाम अलीखान व भोसले यांचे आग्रहावरून पुण्यास येण्याचा बेत तहकूब. कांहीं दिवसानी निजाम अलीखान नानाची परवानगी घेऊन हैद्राबादला जातो. हें नानास पसंत नसावे असा मॅलेटचा तर्क [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ५ पान १०]

,, –वैशाख वा। ८ इ. १७८६ मे २१ (रजब २२)

नाना माघारें जावयाची योजना करूं लागले. सर्वांचें विचारें किल्ला फत्ते झाल्या शिवाय जाऊं नये. जावयाचा त्यांनीं आग्रह फार धरिला. त्याजवरून परशुरामभाऊ यानी श्रीमंत राजश्री आप्पासाहेब यांस मुहूर्तें करून बाहेर मुक्काम करून राहावें. तूर्त येण्याचें करूं नयें असें सांडणी स्वारा बरोबर तांसगावास पत्र रवाना केलें. " किल्ल्यांत गुलाब हैदर मुख्य आहे. त्यांनें नरगुंदकरांची मध्यस्थी करून फसविलें. त्यास धरावें सोडूं नये. असें परशरामभाऊंचें म्हणणें आहे. त्यांस उभयतां –नाना व हरीपंत–कारभारी यांचें म्हणणें जे, " वचन गुंतलें आहे, पार करून देण्याविषयीं. त्यास कसें करावें? " [ऐ. ल. सं. ८ ले. २९८१]

,, –वैशाख वा। ९ इ. १७८६ मे २२ रजब २३

मॅलेटचें ग.ज.स पत्र–छावणी बदामी—

१९ मे १७८६ रोजीं मॅलेट बदामीस पोहोंचला व त्यानें नानाची भेट घेतली. नानाचे आमंत्रणावरून मॅलेट २० मे १७८६ रोजीं रणांगणावर तोफखान्याजवळ असलेल्या नानास भेटतो. ह्या ठिकाणावरून नाना युद्धाचीं सूत्रें हालवितो.

येथेंच निरनिराळ्या भागांतील युद्धाची प्रगती नानास मिळते. व पुढील आज्ञा येथूनच निघतात. यावेळेस नानाची वागणूक शांत व गंभीर असते. अशा गडबडीचे वेळीं सुद्धां निरनिराळ्या युद्ध–क्षेत्रांतील प्रगति व बातम्या नानास ताबडतोब आणि वक्तशीर मिळतात. असा मॅलेटचा खुलासा [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ७ पान ११]

,, –वैशाख वा। १३ इ. १७८६ मे २५ (रजब २६)

नाना व तात्या मध्यरात्र झाल्यानंतर परशरामभाऊंच्या डेऱ्यास आले. बोलणें झाले. " नानानी आज चौदा घटका दिवसा नंतर निघून केरूरच्या मुक्कामास जाऊन राहावें, परशरामभाऊनी प्रतिपदेस निघावे " नाना व तात्या व परशरामभाऊ छ. २३ रजबी म्ह. वैशाख वा। ९ स किल्ला पहावयास गेले होते. [ऐ. ले. सं ८ ले. २९८४]

,, –ज्येष्ठ शु. ६ इ. १७८६ जून २ कँप पुसेसावळी

मॅलेटचे ग. ज. स पत्र पुसेसावळी, नाना व मॅलेट यांचे भेटीचें वर्णन. नानांची वागणूक पूर्ण शिष्टाचाराची आहे. संकटकाळी नानानें एकट्यानें पेशवाई संभाळली. वय ५०(४४? वर्ष,) मध्यम बांधा व सडपातळ. चेहऱ्यावर बुद्धीचे तेज पण चेहरा छाप पाडणारा नाहीं. भाषा खास दरबारी नाहीं. पण कांटेतोल, न्यायी, स्पष्ट व प्रामाणिक, असें मॅलेटचें मत–मराठ्यांनी कबूल केलेल्या विजापूर प्रांत व इतर सवलती दिल्या नाहींत म्हणून निजाम युद्ध सोडून निघून जातो. नाना सवलती दिल्याचें नाकबूल करतो. व निजाम ऐन युद्धाचे वेळी निघून गेल्या बद्दल असंतुष्ट [पु. रे. कॉ. व्हा. २ प. ९]

,, –ज्येष्ठ वा। ९ इ. १७८६ जून २०

मॅलेटचे ग.ज. आणि कं. कलकत्ता यास पत्र नाना ७ जून १७८६ रोजीं बदामीहून पुण्यास पोहोचतो. " इंग्रजाचे मुंबई व मद्रासहून दोन दूत हुकूम घेऊन टिपूसुलतानचे भेटीस गेल्याबद्दलची

बातमी नानास कळली ती खरी आहे. काय ? असें मॅलेट-जवळ विचारणा. मॅलेट माहीत नसल्याबद्दल सांगतो. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र १० पान २१]

,, —श्रावण शु. ६ इ. १७८६ जुलै ३१

मॅलेटचे ग.ज.स. पत्र फरेंचाबरोबर नानानें सख्य करूं नये म्हणून मॅलेट फरेंचाची कमकुवत बाजू नानास सांगतो. नाना बहुतेक फरेंचास सोडून इंग्रजाचे बाजूस वळेल असा मॅलेटचा तर्क. फरेंचाच्या टिपू व मराठे यांचेबरोबर वाटाघाटी व त्यामुळें मराठे व इंग्रज यांचे मध्यें युद्ध सुरू होईल व त्यामुळें इंग्रजाचे वर्चस्व हिंदुस्थानात कमी होईल. असें नानानें सांगितलें [पु. रे. कॉ. व्हा. २ पान १४]

,, —श्रावण वा। १३ इ. १७८६ आगष्ट २१

नानाची फरेंचाचे प्रतिनिधी मॉशर मॉन्डग (montigue) व "गदर" यांचें बरोबर मुलाखत १२–८–१७८६ आणि इंग्रजा विरुद्ध कारस्थानाचीं बोलणीं. मॅलेटच्या मता प्रमाणें पुर्व अनुभवा वरून नाना फरेंचाचे बाजूस वळणार नाहीं. मॉशीअर गदरनें नानास आपले फरेंच सरकार कडून कोटावर लावण्यासाठीं आणलेले "आर्डर ऑफ सेन्ट लुइस" नावाचें एक मानजिन्ह दिलें. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र १७ पान ३७]

,, —भाद्रपद शु. १५ इ. १७८६ सप्टें. ८

चार्लस मॅलेटचे ग.ज.स पत्र. नाना व मॉ. गदर याचे मुलाखती बाबत कळलेल्या माहीतीबद्दल मॅलेट नानाचे प्रतिनिधीस विचारतो. नानांचें उत्तर २ दिवसानी ७–९–१७८६ बहिरोपंत मेहेंदळे मॅलेटला कळवितो; हैद्राबादकडून जांताना सहजगत्या फरेंच प्रतिनीधी आपले मित्रासह नानास भेटला. मसलती व बोलणी कांहीं झालीं नाहींत. निजामाचीही त्यानीं सहज भेट घेतली. मॉं. गदर चतुर व हुषार मनुष्य आहे. त्यानें विचारलेल्या काहीं प्रश्नास उत्तरें देण्यासाठीं नानास मॅलटचा

सल्ला पाहिजे." भलत्या ऋतूंत मॉ. मार्टेग गदर कांहीं कारण नसता सहज नाना व निजाम याना भेटतात याचे कार्यकारणाबद्दल मॅलेटला शंका. मॅलेट गणेशोत्सवास वाड्यांत जातो [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र १६ पृ. ५१]

,, भाद्रपद वा। ३ इ. १७८६ सप्टें. ११

मॅलेटचे गवर्नर आणि कं कलकत्त्यास पत्र. कांहीं प्रश्नाबाबत फरेंचाचे प्रतिनिधीस द्यावयाचे उत्तराबाबत नाना मॅलेटचा सल्ला घेणार होता. तो घेण्याचे अगोदर फरेंच प्रतिनिधी परत गेला, म्हणून मॅलेटनें बहिरोपंताकडे चौकशी केली. नानाचे सांगण्यावरून बहिरोपंतानें मॅलेटास कळविलें कीं, ज्याअर्थी फरेंच सरकार टीपूस मदत करीत आहे त्याअर्थी फरेंचाबरोबर कोणत्याही तऱ्हेचे मैत्रीचे करार करण्याची जरुरी नाहीं. असा निरोप मॉशर गदरला दिला [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र २१ पान ४५]

,, –भाद्रपद वा। १० इ. १७८६ सप्टें. १७

चार्लस मॅलटचे आर्चिबाल्ड काब मद्रास गवर्नर यांस पत्र इंग्रजाबरोबर नानाची मैत्री कायम व विश्वासही आहे. फरेंचाचे प्रतिनिधी बरोबर झालेलें नानाचें बोलणें औपचारीक आहे. असा नानाचा मॅलेटला निर्वाळा. नाना सारखी चतुर, बुद्धिवान् व अनुभवी व्यक्ती फरेन्चाचे आहारी सहज जाण्यासारखी नाहीं. असें मॅलेटचें मत [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र २३ पान ५१]

,, –कार्तिक शु। ३ इ. १७८६ आक्टो. २५

मॅलेटचें गवर्नर मुंबई यास. इंग्रजांचे सैन्यांतून पळालेल्या १२ सैनिकां पैकीं ५ जणांस मॅलेट अटक करतो व ७ जण मराठ्यांचे प्रदेशांत मोकळे असतात. सालबाईच्या तहा प्रमाणें पेशव्यानें अशांची नानाजवळ मागणी. पळपुट्या लोकास दोन्हीं सरकारनीं पकडून एकमेकांचे स्वाधीन करावे या बाबतचे कलम सालबाईच्या तहांत नसून नंतर झालेल्या तहांत आहे व पाठी-

मागून झालेला तह प्रसिद्ध करून पेशव्यांस कळविला नाही व त्यानंतरही अद्याप पावेतों पळपुटचा लोकाचें बाबतींत कोणत्याही तऱ्हेची मागणी इंग्रजाकडून पेशव्यांस आलेली नाहीं. त्यामुळें सदर पुळपुटे इंग्रज सैनिक मराठ्यांचे प्रदेशांत येऊं शकले व त्यांना अशा परिस्थितींत कंपनीचें हवाली करणें पेशव्यांचे इभ्रतीस शोभत नाहीं. नानाचे उत्तर "यापुढें पळपुटे सैनीकाचे बाबतीत व योग्यती काळजी घेण्यांत येईल" अशी नानाची मॅलेटला ग्वाही. मॅलेटनें अटक केलेल्या ५ जणास मुंबईचा परवाना देण्याविषयीं मॅलेटनें विचारलें असतां नाना म्हणाला कीं, सदर इसम स्वखुशीनें कंपनीचे स्वाधीन झाले नाहींत. याबाबतीत निर्णय ताबडतोब झाला पाहिजे अशी नानाची मागणी. पळालेले सैनिकास इंग्रजाचे स्वाधीन न करण्यामध्यें नानाचा कांहीं हेतु असल्याबद्दल मॅलेटचे मत. [पूनारे. कॉ. व्हा. २ पत्र २९ पान ६१]

–कार्तिक शुा १२ इ. १७८६ नोहें. ३

मॅलेटचें सर आर्चिबल्ड कॅम्बल मद्रास गवर्नर यास, पुणें दरबारशीं चाललेल्या वाटाघाटी व त्यावर ग.ज.चे निर्णयिक मत या बाबतीत पत्रव्यवहार द्रुतगतीनें व्हावा म्हणजे सोईस्कर पडेल म्हणून मुंबई मद्रास कलकत्ता यामध्यें दळणवळण विलंब न होता व्हावें, अशी योजना आखण्याबद्दल मॅलेटची नाना बरोबर वाटाघाट. नानाची संमती या हेतूनें नानाने हरीपंत फडके यांचेकडे भरपूर रकम आदा केली. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३१ पान ६६]

" –कार्तिक वाा ५ इ. १७८६ नोव्हेंबर १० (मोहरम १८)

आपाजी रामाचे मथुरेहून नानांना पत्र 'राजकारणी कारभाराला परस्पर वर्तमानें समजावयास पाहिजेत. आम्हीं मसलतीवर–पादशहाचा कारभार गळ्यांत, इंग्रज व वजीर संधी पहात आहेत. शीख, जयपूरवाले व मारवाडी हे तिघे सभोंवती

(१७०८)–आहेत. आजपर्यंत युक्तीनें व दाबानें पाऊल टाकलें परतु मसलतीस दुरोख शह पडले आहेत. पुण्याकडील वर्तमान नीट समजत नाहीं तरी ते समजावे. तिकडील राजकारण पाहून इकडील बेत करावे लागतात. कच्ची हकीगत एकमेकांचीं समजावयास पाहिजे. नानांचे भेटीला फार दिवस झाले. भेट झाली म्हणजे विकल्प जातील. बादशहाचा खर्च व्यवस्थित चालावयास पाहिजे. नाहीं तर तो काय करील कोणजाणें [महा. का. ले. ४८८]

,, –मार्गशीर्ष शु. ७ इ. १७८६ नोवेंबर २८

मॅलेटचे रॉसनहार्ट बॉडन, मुंबई गव्हर्नर, यास पत्र–सात पळपुटे इंग्रज सैनिकास कराराचे अनुरोधाने ग.ज. चे मागणीवरून मुंबईस रवाना करण्याकरितां नानानें मॅलेटचे स्वाधीन केले. १४ सप्टेंबर १७६१ रोजीं झालेल्या तहान्वयें इंग्रजाचे सैन्यांतील पळालेल्या सैनिकाबाबत गवर्नरने जर त्याचे बद्दल क्षमा मागितली तर पेशव्यानें सदर सैनिकास इंग्रजाचे हवाली करावे अशी वहिवाट असल्यामुळें मॅलेटनें तसे आश्वासन दिले व त्याचे मार्फत क्षमा मागितली म्हणून नानानें त्याना जाण्यास परवाना दिला. यापुढें परवान्याशिवाय अशा पळपुटचांस प्रवास करू देऊं नये असा नानांचा राज्यांतील सर्व अमलदारांना हुकुम [पूरे. कॉ. व्हा. २ पत्र ३६ पान ७४]

,, –मार्गशीर्ष शुा ९ इ. १७८६ नोव्हेंबर ३०

मॅलेटचें ग.ज. अर्ल कॉर्नवालीस यास-२९ नोव्हेबर १७८६ रोजीं मॅलेट–नानाची वाटाघाट, मराठ्यांनीं मागितलेली लष्करी मदत देतां येत नाहीं असा ग. ज. चा हुकूम असल्याचें मॅलेट नानास सांगतों. 'पत्र पेशव्यांस द्यावें व नंतर मला (नाना) मिळेल.' असें नाना थंड व शांतपणें सांगतो. सर्व कौन्सिलच्या विचारानें ठरलेल्या मसुद्याला असा लवचिकपणा असतो, याबद्दल नाना आश्चर्य दाखवितो. कॉन्सीलने मदत देण्याचा ठराव केला तेव्हां टिपूचें चढाईचें धोरण होतें व परेंचही

(१७०८)–जोरानें हालचाल करीत होते. आतां परिस्थिती बदलली आहे, अशी मॅलेटची मल्लीनाथी. यावर विचार करून नानानें मॅलेटला म्हटलें की, महादजी शिंदे यानें मदत मागितली तेव्हां त्यांत 'फरेंचाचे वाढत्या वर्चस्वा विरूद्ध" असा उल्लेख होता का? आपणास (मॅलेट) तसें वाटलें असें मॅलेटचें उत्तर. इंग्रजानी आपलें धोरण दुटप्पी ठेवलें आहे. असा नानाचा मॅलेटवर स्पष्ट आरोप व त्याबद्दल आश्चर्य. कारण इंग्रजांनी मदत देण्याचा निर्णय धार्मिक दृष्टीनें मुद्दाम शुभ मुहूर्तावर घेतला होता. अशा तऱ्हेचे प्रसंग राजकारणांत येतातच, असा नानाचा मॅलेटला टोला. त्यामुळें कोणासही वाईट वाटण्याचें कारण नाहीं. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३७]

" –मार्गशीर्ष वाा ३ इ.१७८६ डिसें. ८

मॅलेटचें अर्लकार्नवालीस ग. ज. यांस समारंभाचे वेळीं जरी नाना मॅलेटचे व इंग्रजाचे औपचारीक रीतीनें मान राखतो, तरी त्याच्या अंतर्यामीची इंग्रजावरील विश्वास व निष्ठा लष्करी बाबतींतच्या ग ज.च्या नव्या निर्णयामुळे उडून गेली. देवाण घेवाण करण्यासारख्या मुलाखती नाना मुद्दाम टाळतो. व ग. ज. नें पूर्वी देऊं केलेली मदत ही फक्त लढाई लांबविण्यासाठीं होती असें नानाचें ठाम मत [पू. रे. कॉ. व्हा. ३ पत्र ३९

" –पौष शुा ८ इ. १७८६ डिसें. २८

मॅलेटचें ग ज. अर्लकार्नवालीस यास–१८ डिसेंबर १७८६ पासून नानाच्या निझामचा वकील गोविंदराव यांचे बरोबर पुष्कळ मुलाखती झाल्या. ग. ज. च्या निझामबरोबर झालेल्या पत्रव्यवहारांतील इत्यर्थ काय असावा हें काढून घेण्यासाठीं इंग्रजानी सैन्याची मदत देण्याचें नाकारलें म्हणून निझाम टिपूविरुद्ध लढाई चालू ठेवण्यास नाखूष होईल. आणि इंग्रजाकडून मिळणाऱ्या मदतीवर नाना अवलंबून नाहीं असा मॅलेटचा कयास. इंग्लंडमध्यें पेशव्यांचा वकील ठेवावा असा पुणें दरबारचा विचार असल्याबद्दल मॅलेटचा तर्क [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ४२]

१७०८–पौष वा। ८ इ.१७८७ जाने. ११

मॅलेटचें ग. ज. स पत्र. अर्काटचे नबाबाचा वकील नाना बरोबर मसलत करण्यास येतो. फ़रेंचाकडून टिपूस होणारा सैन्याचा पुरवठा तोडून टाकण्याची कारवाई; नाना व नबाबाचा वकील एकमेकास आश्वासन देतात अशी बातमी [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ४७ पान ८८]

,, –माघ शु॥ ६ इ. १७८७ जाने. २५

मॅलेटचें ग. ज. स पत्र, मॅलटचा शिपायी सेन्टीनलचे काम करीत असतांना पेशव्यांचे शिपायानें त्याला पकडून नेलें व त्याचा अपमान केला, त्याबद्दल मॅलेटनें तक्रार केली. नानानें चौकशी करून (पेशव्यांचे) त्या शिपायास शिक्षा केली. त्यावरून नानांचा निःपक्षपातीपणा व शिस्त दिसून येते. असें मॅलेटचें मत. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ५२ पान ९६]

,, –फाल्गुन वा॥ १० इ.१७८७ मार्च १४

इव्हानचें मॅलेटला पत्र टिपू, व मराठे यांचे मध्यें तहाच्या वाटाघाटी नानांचे आदेशावरून सुरु झाल्या. होळकर रास्ते मध्यस्थ. टिपूनें ३ कोट रुपये द्यावयाचे. नरगुंद किल्ल्याचे बदला गजेंद्रगड किल्ला टिपूनें ठेवावयाचा. टिपूनें काळोपंताची सुटका करावयाची. मराठ्यानी टिपूस दक्षिणचा बादशहा म्हणावे असा टिपूचा आग्रह अशा अटी ठरत असल्याबद्दल इव्हानची बातमी [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ५६]

१७०९ चैत्र शु॥ ५ इ. १७८७ मार्च २४

मॅलेटचें ग. ज. स पत्र–पूना मिनिस्ट्रीची सद्यःस्थिती त्यावर नानांचे उपाय. महादजी शिंदे यांचे बद्दल दरबारचा मत्सर–महादजी जवळ सैन्याचें बळ, नानाची मैत्री व बाजीरावास नाममात्र दिवाण नेमून त्याचा नायब दिवाण या नात्यानें पेशवाईचा कारभार हाकण्याची महत्वाकांक्षा–महादजीस पेशवाईचा विस्तार करण्यास परवानगी; होळकरास आपले प्रांतांत जाऊं द्यावे. फत्तेसिंग विरुद्ध गोविंदराव गायकवाड आणि

मुधोजी भोसलेच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांत संभवणारे बखेडे हीं दोन प्रकरणें मिटवण्याची नानावर कामगिरी राहील असें मॅलेटचें मत. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ५८ पान १०६

,, – वैशाख शुा ४ इ. १७८७ एप्रील २१

मॅलेटचे ग. ज. स पत्र–बाजीरावास कोपरगांवाहून हालवून दुसरे एकादे किल्लचांत जास्त बंदोबस्तांत ठेवावे असा नानाचा विचार–महादजी शिंदे यांची नापसंती–बाजीरावास सवाई-माधवरावचे दिवाणपदीं ठेवून बाजीराव अज्ञान असलेमुळें दिवाणाचा नायब म्हणून काम करण्याची वडगावचे ठरावा-प्रमाणें महादजीची महत्त्वाकांक्षा–राघोबाचा पक्षपाती गुलझारखान यांस नानानें स्वदस्तुरच्या पत्रानें संरक्षणाची हमी देऊन पुण्यास बोलावले–हे सुद्धां महादजीस पटणार नाहीं. कारण गुलझारखानचे जहागिरीवर महादजीनें खानाचें पुतण्यास बसविले होते. व खानाचे पुतण्यास जहागीर सोडावी लागणार [पू. रे. कॉ. व्हॉ. २ पत्र ५९ पान १०६]

,, –ज्येष्ठ व. ८ इ. १७८७ जून. ९ (साबान १४)

आनंदीबाई नाना विषयीं म्हणते भानूंच्या कुळामध्यें नाना मात्र चौकस–बाकीचे सारे भले आहेत. इ. [पे. द. ४ ले. ५]

,, –इ. १७८७ हिंदुस्थानांतील तमाम हिंदुसरदार चित्तापासून श्रीमंतांचा दाब इच्छितात. त्याचे रजामंदीत सादर राहतात. कारण कीं, इकडील सरदार श्रीमंतांचा असल्यानें हिंदुधर्माचा चिराग रोषण राहील. लेकीन पाटिलानी दक्षिणच्या सरदाराची वाट सोडून बहुतांची खराबी केली. त्यामुळें जर तमाम उमदे सरदार एकदिल जाले व आग भडकली तर तिच्या चिनगऱ्या–ठिणग्या–दक्षिणे पावेतो उठतील. [स. सं. पृ. १५]

,, –आषाढ शुा ११ इ. १७८७ जून २६

मुंबई गवर्नरचें मॅलेट यास—साष्टी मिळविण्याचा प्रयत्न–साष्टीचे बदल्यांत भडोच व आसपासचा प्रदेश इंग्रजाना परत

(१७०९)–मागावयाचा आणि सुरतेंत चौथाई वसूल करण्याचा हक्क मागावयाचा असा मुंबई सरकारचा हेतु. [पू. रे. कॉ. व्हा २ पत्र ६७ पान ११९]

,, –आषाढ शुा १२ इ. १७८७ जून २७

मॅलेटचें ग. जनरल इन कॉन्सील यास–टिपू व मराठे यांचे मधील लढाई संपुष्टांत आल्यावर तहान्वयें टिपूचाच फायदा झाला. सामील झालेल्या सरदारांच्या फौजेचे पगार, बक्षीस वगैरे देणें नानास फारच जड आहे. कारण मराठ्यांचे वर्चस्वामुळें तह झाला म्हणून [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ६८ पान १२०]

,, –श्रावण वा ५ इ. १७८७ सप्टं. २ (जिलकाद १९)

नानांनी स. माधवरावांकडून 'देणें' करावयासी श्रावणमासी मूहूर्त केला हें वर्तमान ऐकून संतोष बहुत जाला. स्वामींच्या श्रमाची सार्थकता परिपूर्ण जाली. विश्वतोमुखी स्वामींच्या कीर्तीचा घोष जाला. अहल्याबाईनीं हें वर्तमान वाचून दाखविणाऱ्या केसो भिकाजी दातार यास जालनापुरी शेला-पागोटे व रु. १०० शालजोडीसाठीं दिले [म. द. बा. भाग २ ले. १५१]

,, –श्रावण वद्य १० इ. १७८७ सप्टं. ७ (जिलकाद २४)

आपाजीराम नानांना लिहितात–पोहणार काठीं उभा आहे तो म्हणतो धैर्य सोडूं नको, मी येऊन पोहचलों, तितक्यानें तो हुषार होतो. तसा हा समय स्वामीनीं रक्षिला. पत्र आल्यापासून पाटीलबाबा फार संतोष आहेत. दक्षिणेंतून श्रीमंतांनी उपराळा केला, फौज पैका पाठवितात ह्या बातम्यांनी शत्रूकडे शौरत चांगली पडली. परंतु सरंजाम पोख्त यावा. अल्लीबहादरची योजना केली ही फारच दूरंदेशी विचाराची योजना झाली. याची हिंदुस्थानी, मोगले, रांगडे राजेरजवाडे यांजवर सलाबत पडेल इतकी ब्राह्मण सरदाराची पडावयाची नाहीं. जयपूर मारवाडवाले यांचेहि वकील पुण्यास आले आहेत. यास्तव सत्वर फौज यावी. पाटिलबाबा घरच्या बाहेरच्यांस लाजवितात कीं, संकट-

समयीं कोणी कामास आलें नाहीं, नानांचा भाऊपणा कामास आला. उदंड जाले तरी थोर ते थोरच. [महा. का. ले..५१०]

,, –श्रावण वद्य १० इ. १७८७ सप्टें. ७ (फोर्ट विल्यम)
कलकत्ता कौन्सील–मॅलेट. नानाफडणीसांशी बोलताना आपण अत्यंत दक्षता ठेवावी. [पू. रे. कॉ. ३–१३]

,, –भाद्रपद शु. ११ इ. १७८७ सप्टें. २३ (जिल्हेज १०)
नानांचें महादजींना पत्र, हिंदुस्थानच्या मसलतींत संस्थानचा अगदीं उच्छेद करणें यावरून अवघ्यांस बशा (धाक) पडला आहे. भाषणांतहि येतें. त्यामुळें बातम्या कळतात, व ते खट्टे होऊन विलग पडावयाच्या दिवसाची वाट पहातात. त्यास, मसलतीची रीत कीं मनांत करावयाचेंहि असेल तथापि तो दिवस येईपर्यंत बोलून दाखवूं नये. सर्व बंदोबस्त होय तों कोणास वहमा पडे असें दिसूं नये. [महा. का. ले. ५११]

,, –भाद्रपद शुद्ध १४ इ. १७८७ सप्टें. २६
कॉर्नवालीस– मॅलेट. टिपूशी युद्ध हें जवळ जवळ अटळ आहे. या कामीं नानाफडणीसांची मदत घ्यावी. त्यांना कबूल असेल तर आम्ही मुंबईहून मदत करूं. [पू. रे. कॉ. ३-१४]

,, –भाद्रपद वद्य १ इ.१७८७ सप्टें. २८
कॅम्बल—मॅलेट. लॉर्ड कॉर्नवालीसनें मला असें सांगितलें आहे कीं, जरी फरेंचांनी टिपूस मदत केली तरी मराठा स्टेटची सुरक्षितता धोक्यांत येईल असें नानांनीं समजूं नये. कारण कंपनी अशा वेळीं मराठ्यांना मदत करीलच. [पू. रे. कॉ. ३-१६]

,, –आश्विन वा २ इ.१७८७ आक्टो. २८
अर्ल कॉर्नवालीसचे चार्लस मॅलेट यास–टिपू विरुद्ध कारस्थान करण्यासाठीं फोस्टर याची नेमणूक–मुधोजी भोसलेचा टिपूशी लढाई बाबतचा कल– मुधोजीचा कल असेल तर त्याचे मार्फत पुणें येथें पेशव्यां बरोबर वाटाघाट–मुधोजी बरोबर स्वतंत्र वाटाघाट करूं नये. कारण नाना फडणीस व पुणें दरबार यांस

(१७०९)–मुधोजीबरोबर स्वतंत्र वाटाघाट केली ह्याबद्दल मत्सर उत्पन्न व्हावयाचा. [पु. रे. कॉ. व्हा ५ पत्र २ पान २]

,, –कार्तिक शुा ११ इ. १७८७ नोव्हें. २१
नानांची एक पत्नी मृत्यु. त्यामुळें ते उदासीन. आपण मजवर अनुग्रह केला. मी आपणांस लिहावें ही योग्यता नाही पण प्राकृत श्लोक :– संसारीं असतां अलिप्त नलिनीपत्रापरी राहणें। आ-ब्रह्मांड समस्त स्वप्न कळतां चिंता वृथा वाहणें। साक्षी होउनि वर्तणें निजसुखें, दुःखासि कां साहणें। जालें तें अवलोकिलें अथ पुनः होईल तें पाहणें (कार्यासि या लागणें)॥ गोदावरी तीरस्थांचें पत्र. अनेक सांत्वनापैकीं एक. [ऐ. टि. पृ. ४१]

,, –मार्गशीर्ष वा ६ इ.१७८७ डिसें. ३०
मॅलेटला युथॉफचें पत्र–गवर्नर बॉडम् इंग्लंडला जातेवेळीं नाना पुण्यांत नसल्यामुळें नाना तर्फे बहिरोपंत बॉडमला पत्र लिहितो– साष्टी पेशव्यांस परत मिळण्या विषयीं बॅडमनें विलायतेंत खटपट करावी. त्याचप्रमाणें इंग्लंडचे राजाचे दरबारी पेशव्यां-तर्फे एक वकील बॉडम्नें बरोबर न्यावा अशी विनंती. [पूना रे. कॉ. व्हा. २ पत्र ७० पान १२७]

,, –पौष शु. १ इ. १७८८ जाने. ९ (सु. ११८८ रवल २९)
आश्वीन शुा ९ सह विजयादशमी २ मोहरा नानांनी विजया-दशमीस सीमोलंघना नंतर वाड्यांत येऊन सदरेस बसले तेव्हां कमाविस भेट. अशीच भेट श. १७०५ मध्यें दिली आहे. [स. मा. रो. ३ पृ. ३०१, २१४]

,, –पौष शुा १० इ. १७८८ जाने. १८
नाना फडणिसांस रघुनाथ रणसोड संजगिरी मुंबई येथील पेशव्यांकडील वकील लिहितो, बॉडम जनरलच्या जागीं हलीं जनरल रामसी जाहालेत. यांचे भेटीस यावें जावें, तर ते, ' हे आपली रयत नाहीं. कोणाकडून कोणते कारभारावर आहेत,

हें कांहींच चित्तांत न आणून, बसावयास खुर्ची ठेवावी ते देत नाहीं ही चाल चांगली नाहीं. तरी मालीट पुण्यास राहणारा साहेब, ह्याजकडून ही चाल मोडण्याविसी पत्र आम्हास व रामसी यास यावें. [इ. सं. प. द. व. पृ. ८] पुनः ही तक्रार नाहीं. तेव्हां जनरल बरोबर पेशव्यांच्या वकिलांसहि खुर्ची मिळूं लागली असावी. पुढें सन्मानहि जाला आहे.

,, –पौष वद्य ३ इ. १७८८ जाने. ३०

सैन्य जात असतां पिकाची पायमल्ली होऊं नये म्हणून परगणेकरी अलीबहाद्दरास अंतस्थ पैसा देत. तोसर कारांत जमा धरावा कीं, निराळी यादी देऊन शेवटीं फडणिसांना ती समजवावी? नानांचें उत्तर ही रक्कम अंतस्थ असो कशी असो हें समजणार नाहीं असें नाहीं. तर प्रतारणा न करतां सरकारांत जमा फडणविसांकरवी धरवीत जावी. [त्रै. भा. इ. से. व. ४ पृ. २३] सैन्यास खर्चास द्यावयाचा पैका फार बट्टा असेल तर रु. ६। पर्यंत लोकांवर, बाकीचा सरकारकडे खर्च घालवा.

१७०९ फाल्गुन शुद्ध १२ इ. १७८८ मार्च १९

मॅलेटचे अर्ल कॉर्नवालीस यास–टिपू विरुद्ध युद्धांत झालेल्या कर्जामुळें नाना तंगीस आला व पुण्यांतील नागरिकांकडून बेकायदा सक्तीनें पैसा वसूल करण्याचा प्रयत्न केल्यामुळें प्रजेमध्यें असंतोष व नानाबद्दल तिटकारा उत्पन्न झाला असें मॅलेटचा तर्क. पेशव्यांची आर्थिक तंगीची परिस्थिती. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ७१ पान १२९]

,, –फाल्गुन वा। ७ इ. १७८८ मार्च २९

मॅलेटचे ग. ज. स पत्र–मराठी राज्यांत चुरस आहे असा मॅलेटचा तर्क. नाना महादजी शिंदे याचेवर नाखुष, मॅलेटला बातमी.–२० मार्च १७८८ रोजी मॅलेट व नानाची भेट. महादजी शिंदे व इंग्रज यांचे मध्यें झालेल्या करारानुसार टिपूविरुद्ध इंग्रजांनी सैन्य पाठवावें अशी शिंद्यांची पामरला

सूचना असले बद्दल व पामरने महादजीस सांगितलें कीं जर शिंद्यानें टिपूविरुद्ध लढाईंत भाग घेतला तर इंग्रज लढाईंत भाग घेतील, यास महादजीचें फडणीस जनार्दन वैद्य(?) याचे अनुमोदन. मॅलेटचें म्हणणें कीं, जर टिपूनें इंग्रजावर युद्ध पुकारलें तरच इंग्रज सैन्य पाठवितील.

शक १७१० वैशाख वा। १० इ.१७८८ मे ३० (साबान २३)

कृष्णाजी जनार्दन कोपरगांवाहून लिहितात नानांस या दौलतीचें सुख काय? घरांत मूलबाळ संसारिकाच सुख तें नाहीं. दौलत तरी काय करावी? उगाच डोईवर जी गोष्ट 'घेतली ती आतां उपाय नाहीं म्हणून करतात.' असें बाई म्हणते. [पे. द. ४ पृ. ५९] इंग्रज सैन्य पाठवितील. [पू. रे. कॉ. व्हा. २. प. ७२]

,, ज्येष्ठ वद्य १२ इ.१७८८ जून ३० (रमजान १९)

कोपरगांवाहून कृष्णाजी जनार्दन यांचें नानास पत्र = आनंदी बाईंचें म्हणणें कीं, आम्ही पुण्यांत असतां लहान मोठ्या कामास नाना आम्हाकडे येत असत. फार मर्यादशील आहेत. नानांची तऱ्हा इतकी अमर्यादेची नाहीं. [पे. द. ४ पृ. ६६]

,, –श्रावण वद्य ६ इ.१७८८ आगष्ट २३

राजश्री भिकाजी नाईक कोलटकर व त्यांचे बंधू धोंडोपंत कोलटकर यांनीं राजश्री तात्या व श्रीमंत राजश्री नाना हे उभयतां कारभारी ठीक नाहींत यांसी धरून आपण दिवाणगिरीचा कारभार करावा. त्यांस दगा करून येथें आणावें. परंतु शेवटीं हें साध्य न होता आपणच पेंचांत आले. [ऐ. ले. सं. ८ ले. ३१३०]

,, –भाद्रपद वद्य ७ इ.१७८८ सप्टें. २२ (जिल्हेज २१)

कृष्णाजी जनार्दन कोपरगांवाहून लिहितात–आनंदी बाईंचें म्हणणें नाना व हरीपंत मात्र चांगले आहेत इ. [पे. द. ४ ले. ७३ पृ. ९०]

हें कांहींच चित्तांत न आणून, बसावयास खुर्ची द्यावी ते देत नाहीं ही चाल चांगली नाहीं. तरी मालीट पुण्यास राहणारा साहेब, ह्याजकडून ही चाल मोडण्याविसी पत्र आम्हास व रामसी यास यावें. [इ. सं. प. द. व. पृ. ८] पुनः ही तक्रार नाहीं. तेव्हां जनरल बरोबर पेशव्यांच्या वकिलांसहि खुर्ची मिळूं लागली असावी. पुढें सन्मानहि जाला आहे.

,, –पौष वद्य ३ इ. १७८८ जाने. ३०

सैन्य जात असतां पिकाची पायमल्ली होऊं नये म्हणून परगणेकरी अलीबहादूरास अंतस्थ पैसा देत. तोसर कारांत जमा धरावा कीं, निराळी यादी देऊन शेवटीं फडणिसांना ती समजवावी? नानांचें उत्तर ही रक्कम अंतस्थ असो कशी असो हें समजणार नाहीं असें नाहीं. तर प्रतारणा न करतां सरकारांत जमा फडणविसांकरवी धरवीत जावी. [त्रै. भा. इ. से. व. ४ पृ. २३] सैन्यास खर्चास द्यावयाचा पैका फार बट्टा असेल तर रु. ६। पर्यंत लोकांवर, बाकीचा सरकारकडे खर्च घालवा.

१७०९ फाल्गुन शुद्ध १२ इ. १७८८ मार्च १९

मॅलेटचे अर्ल कॉर्नवालीस यास–टिपू विरुद्ध युद्धांत झालेल्या कर्जामुळें नाना तंगीस आला व पुण्यांतील नागरिकांकडून बेकायदा सक्तीनें पैसा वसूल करण्याचा प्रयत्न केल्यामुळें प्रजेमध्यें असंतोष व नानाबद्दल तिटकारा उत्पन्न झाला असें मॅलेटचा तर्क. पेशव्यांची आर्थिक तंगीची परिस्थिती. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ७१ पान १२९]

,, –फाल्गुन वा। ७ इ. १७८८ मार्च २९

मॅलेटचे ग. ज. स पत्र–मराठी राज्यांत चुरस आहे असा मॅलेटचा तर्क. नाना महादजी शिंदे याचेवर नाखुष, मॅलेटला बातमी.–२० मार्च १७८८ रोजी मॅलेट व नानाची भेट. महादजी शिंदे व इंग्रज यांचे मध्यें झालेल्या करारानुसार टिपूविरुद्ध इंग्रजांनी सैन्य पाठवावें अशी शिंद्यांची पामरला

सूचना असले बद्दल व पामरने महादजीस सांगितलें कीं जर शिंद्यानें टिपूविरुद्ध लढाईंत भाग घेतला तर इंग्रज लढाईंत भाग घेतील, यास महादजीचें फडणीस जनार्दन वैद्य(?) याचे अनुमोदन. मॅलेट्चें म्हणणें कीं, जर टिपूनें इंग्रजावर युद्ध पुकारलें तरच इंग्रज सैन्य पाठवितील.

शक १७१० वैशाख वाा १० इ.१७८८ मे ३० (साबान २३)

कृष्णाजी जनार्दन कोपरगांवाहून लिहितात नानांस या दौलतीचें सुख काय? घरांत मूलबाळ संसारिकाच सुख तें नाहीं. दौलत तरी काय करावी? उगाच डोईवर जी गोष्ट ' घेतली ती आतां उपाय नाहीं म्हणून करतात. ' असें बाई म्हणते. [पे. द. ४ पृ. ५९] इंग्रज सैन्य पाठवितील. [पू. रे. कॉ. व्हा. २. प. ७२]

,, ज्येष्ठ वद्य १२ इ.१७८८ जून ३० (रमजान १९)

कोपरगांवाहून कृष्णाजी जनार्दन यांचें नानास पत्र = आनंदी बाईंचें म्हणणें कीं, आम्ही पुण्यांत असतां लहान मोठ्या कामास नाना आम्हाकडे येत असत. फार मर्यादशील आहेत. नानांची तऱ्हा इतकी अमर्यादेची नाहीं. [पे. द. ४ पृ. ६६]

,, –श्रावण वद्य ६ इ.१७८८ आगष्ट २३

राजश्री भिकाजी नाईक कोलटकर व त्यांचे बंधू धोंडोपंत कोलटकर यांनीं राजश्री तात्या व श्रीमंत राजश्री नाना हे उभयतां कारभारी ठीक नाहींत यांसी धरून आपण दिवाणगिरीचा कारभार करावा. त्यांस दगा करून येथें आणावें. परंतु शेवटीं हें साध्य न होता आपणच पेंचांत आले. [ऐ. ले. सं. ८ ले. ३१३०]

,, –भाद्रपद वद्य ७ इ.१७८८ सप्टें. २२ (जिल्हेज २१)

कृष्णाजी जनार्दन कोपरगांवाहून लिहितात–आनंदी बाईंचें म्हणणें नाना व हरीपंत मात्र चांगले आहेत इ. [पे. द. ४ ले. ७३ पृ. ९०]

,, –आश्विन वाा ९ इ.१७८८ आक्टोबर २३ (मोहरम २२)
सदाशिव दिनकर यांस नानाचें पत्र–' मुंबईस इंग्रजांनीं फौज जमा केली त्या संबंधीं नानांनीं निरनिराळ्या ठिकाणांहून चौकशी केल्यावर लिहिलें--तीन वेळां इंग्रजाशी मजकूर केला त्याचीं उत्तरें तीन वेळां निरनिराळीं केलीं. यांत अितबार कोणत्याचा धरावा ? याचा विश्वास धरतां येत नाहीं. बोलणें फार स्वच्छतेचें बोलतात; (पण)कोणे वेळेस काय करतील याचा अितबार नाहीं. ' [अैतिहासिक पत्रव्यवहार ले. २६८]

,, –कार्तिक इ.१७८८ नोव्हें.
पुण्यांत श्रीमंताचे वाड्यांतील फडाचा चौक जुना झाला सबब तो पाडून नवा बांधावयास नानांनीं काम लाविलें. दोन वर्षे काम चालू होते. मग वास्तुशांत झाली. [पृ. ३९१-१८३५इ. वृ.]

,, –मार्गशीर्ष शुा २ इ.१७८८ नोव्हेंबर २९ (सु. ११८९ सफर ३०)
नाना प्रतिनिधीचे लग्नास गेले. [भा. श. पृ. ८०]

,, –पौष शुा १५ इ.१७८९ जाने. ११
जार्ज फोस्टरचें चार्लस मॅलेट यास :—रघुजी प्रथम होळीचे सणानिमित्त वऱ्हाडांत जातील व नंतर पुण्यास येतील. नागपूर व पुणें या दोन राजवटी मध्यें मित्रभाव, सहकार्य, व त्यांच्या फायद्याचे साठीं कांहीं योजना आखण्यासाठीं पुण्यास पेशव्यांचे प्रधानांबरोबर वाटाघाटीसाठीं यावें. असा रघुजीचा बेत–
[पुरे. कॉ. व्हा. ५ पत्र ३ पान ४]

,, –पौष वाा ११ इ. १७८९ जाने. २१
मॅलेटचे ग. ज. स पत्र—
मराठ्यांचे आरमारानी ३ फरेंच जहाजें लुटलीं. त्या जहाजाचे कप्तान माहे बंदरांत आले व त्यांनीं पुणें दरबारकडे झालेल्या नुकसानी बद्दल भरपाई मागितली असा नानांचा निरोप बहिरोपंत यानें मॅलेटला सांगितला–या वादांतून जर मराठे व फरेंच यांचें आरमारी युद्ध झालें व जर फरेंचाचें वर्चस्व राहिलें तर मराठी राज्यांतील इंग्रजांचें हितसंबंधास धोका

पोहोचेल--किंवा फरेंचाशी सलोखा करून फरेंचाना मराठी राज्यांत व्यापारी सवलती दिल्या तरी इंग्रजाचें नुकसान होईल, असा नानाचा विचार प्रवाह, त्यामुळें इंग्रज मदत करतील कीं नाहीं याचा अंदाज काढण्याचा नानाचा डाव. सांप्रत जंजीऱ्याबद्दल वाटाघाटी आहेत पेशव्यांनीं बालू मिया यास (Ballo Meah) यास खर्चा करितां ७००० रु. दिले. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ७३ पान १३५]

,, –फाल्गुन शुा ३ इ.१७८८ फेब्रुवारी २८

विसाजी नारायण वाडदेकर यांचें पुण्याहून पत्र--श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांचे लग्न फाल्गुन शुा ३ शुक्रवारी आवशीचे सात घटका रात्रीस झालें. नवरी मुलगी आडिवऱ्याहून परांजपे यांची आणली होती. [ऐ. ले. सं. ८ ले. ३१४१]

,, –फाल्गुन वद्य ११ इ.१७७९ मार्च २२　(सु. ११८९ जखर २४)

नानांनीं महादजी शिंदे यांस मथुरा वृंदावन ह्या पवित्र स्थळाबरोबर श्री काशींतील विश्वेश्वराचे देवालय मसीद केली ती मोकळी होऊन पूर्ववत् देवालय व देवस्थापना व्हावी व ही गोष्ट, फिरोन दावा न राहे, कोणाकडून उपद्रव न होय असें होऊन व्हावी. असें लिहिलें. त्यावर 'पाटिलबावांशी २।३ वेळां बोलतां एकदां बोलले, ही गोष्ट केल्यानें सर्व यवनास वांकडे पडेल. असफत द्दौले व इंग्रज एक आहेत.' अशी पर्यायाची बोलणीं होऊन लांबणीचे जाबसवाल झाले. [इ. सं. ऐ. टि. १ ले. ६]

शक १७१० इ.१७८९

नानांनीं गणेश पेठ वसविली

शक १७१० इ.१७८८–८९

नाना तुकोजी होळकरांस लिहितात. जयपूरकर, जोधपूरकरांस सामील होऊन पाटिलबोवांचेवरच स्वारी करतात. त्यांचे सैन्यांत फितुर करतात. तर (अशा) परस्पर राजरजवाड्यांत फूट असल्यानें सरकार उपयोग. अशांची एकी हें ठीक नाहीं.

कोणे समयीं काय करतील हा भरंवसा नाहीं. यांत फूट असल्यानें चांगलें असें आहे. कोटेकर यांस उपद्रव लागूं नये. जयपूर जोधपूर यांची उदेपूर कोटे यांची एकी असूं नये. असें करावें. कोणास दुखावूं नये. तिकडे पाटिलबावांवर मसलत. त्यांनीं फौजेचे बळाखेरीज काय करावें. आपण ते एक झाले असतां सर्वांवर दाब पडोन बखेडा मोडेल, सरकारचा नक्ष राहील तर लौकर जावें. [ऐ. टि. इ. सं. १ पृ. २।४]

शक १७११ ज्येष्ठ शुा ८ इ.१७८९ जून १ (सु ११९० रमजान ६)
इंग्रजाशीं तह—बाळाजी जनार्दन पुण्यांत कारभारी.
नाना पेठ वसवण्या करितां—पुण्याचे पूर्व अंगास ६००× ४५० गज इतकी जागा नानाच्या पेठेसाठीं घेतली.

,, —ज्येष्ठ शुा १० इ.१७८९ जून ३
मॅलेटचें ग. ज. स पत्र—
इंग्लंडचा राजा व कंपनी सरकार या स्वतंत्र संस्था आहेत व कंपनीचे कारभारावर राजाचें वर्चस्व आहे असें नानांचें मत असलेमुळें इंग्लंडचे राजाचे दरबारी मराठ्यांचा वकील पाठावावयाचा म्हणजे राजा मार्फत कंपनीवर दाब आणतां येईल.—जंजिऱ्याचे शिद्दीस योग्य ती नुकसान भरपाई करण्याचें अटीवर लुटारुकडून जंजिरा किल्ला पेशव्यांनीं सोडवून द्यावा. असें मॅलेटनें नानांस कळविलें. [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र ७७पान १४३]

,, —आषाढ शुा ७ इ.१७८९ जून २९,३०
कार्नवालीसचें मॅलेटला पत्र.
काशीस वाडा बांधावयाचा व ज्या वेळेस काशीस जावयाचें तेव्हां त्या वाड्यांत रहावयाचें असे नानाचें इच्छेप्रमाणें कार्नवालीसनें बनारसच्या रेसिडेन्टला कळविलें कीं, नानांचे प्रतिनिधीस काशीस वाडा बांधण्यास लागणारी सर्व मदत करावयाची.—मराठी राज्यांतील परिस्थिती अशी नाजूक झाली आहे, कीं, आपण (नाना) केव्हां तरी राज्यकारभारांतून निवृत्त होऊं व त्यानंतर काशीस स्वस्थपणें दिवस घालवूं असें नानांस वाटतें. [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र ७९ पान १४७]

„ –आषाढ शुा ७ इ. १७८९ जून ३०

जोनाथन डंकन रेसिडेन्ट बनारस याचे मॅलेटला पत्र मॅलेटच्या २० मे १७८९ च्या पत्रा प्रमाणें नाना तर्फे माधवजी पंडित जे. डंकनला भेटला व नानाचें काशीस घर बांधण्याविषयीं बोलणें झालें. [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र ८० पान १५०]

„ –श्रावण शुा ६ इ.१७८९ जुलई २८

पातशहाजादा याची भेट झालियावर हडपसरावर आहे आषाढ वाा १२ चे दिवशीं त्याचे कारभारी दोघे जण श्रीमंत राजश्री नानांचे वाड्यांत आले. नाना खालीं उतरून येऊन दिवाणखान्यांत घेऊन गेले. दोन घटका बोलणीं होऊन त्यांस पोशाख व एक जणांस–मामास मात्र–शिरपेंच दिला. नंतर आषाढ वाा चतुर्दशी मंगळवारी श्रीमंताची स्वारी व नाना व तात्या ऐसे गेलें. नाना यांस शिरपेंच दिला. व हरिपंत तात्यांस तरवार दिली. श्रीमंत निघोन गेले. मागें नाना व तात्या राहून दोन घटका बोलोन आले. सारांश "मी येथें आलों आहे. याची लाज तुम्हांस असावी." इतकें बोलणें झालें. [ऐ. ले. सं. ८ ले. ३१७७; पु. द. ३ पृ. १११]

„ –भाद्रपद शुा ६ इ.१७८९ आगष्ट २६

ग. ज. कार्नवॉलीसचें मॅलेटला पत्र. इंग्लंडला वकील पाठविण्याचे नानाचे इच्छेस ग. ज. ची मान्यता—मराठ्यांचे उरपुर जाबुसर येथील आरमारी अमलदारानीं इंग्रज निशाणाखालीं येणाऱ्या बोटी लुटल्या व नासधूस केली हा करार भंग झाला त्याबद्दल ग. ज. चे मराठ्याबद्दल मत वाईट झालें याबद्दल नानाशीं बोलणीं फारच जपून करावीत. [पु. रे. कॉ. व्हा २ पत्र ८१ पान १५०]

„ –आश्विन शुा ५ इ.१७८९ सप्टेंबर २३

आनरेबल कंपनीचे जनरल पत्रांतील उतारा(८–४–१७८९) नानाला कंपनी तर्फे करावयाचा नजराणा आगबोटीनें इंग्लंडहून रवाना झाल्याबद्दल [पु. रे. कॉ. व्हा.२ पत्र ८२ पान १५४]

„ –आश्विन वा ११ इ.१७८९ आक्टोबर १५

दुधगांव जमाबंदी खटला पुण्यास जाऊन ४ वर्षे झालीं. जमाबंदी नाहीं, वगैरे. श्रीमंत राजश्री नाना " समक्ष समजोन घेऊन नंतर गांवकरी यांस निरोप देतो " असें म्हणतात. पंचाईत त्यानें चौधे बसवून वाजवी केली असतां तुम्ही समजून कां घेत नाहीं. चौधाखेरीज काय म्हणून दिक्कत घेता असें नाना बोलले [ऐ. ले. सं. ९ ले. ३३००]

„ –कार्तिक शुा ५ इ १७८९ आक्टोबर २३

मॅलेटचे ग. ज. स पत्र. जंजिरा किल्ल्याबाबत मराठ्यांनीं करार पाळला नाहीं असा मॅलेटचा नानावर ठपका. निजामला ज्याप्रमाणें इंग्रजांनीं सैन्याची मदत केली त्या भूमिकेवर मराठ्यांस करावी अशी नाना तर्फे मागणी. पेशवे वयांत आल्यावर राजकारण सोडून काशीस जाण्याची नानांची इच्छा असल्याबद्दल [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ८५ पान १५६]

„ –मार्गशीर्ष वा १ इ.१७८९ डिसेंबर ३

श्रीमंत स. माधवरावाची स्वारी नाशकाहून निघून दरमजल खडकीचे मुक्कामास आली. तेथें राजश्री नाना श्रीमंताचें दर्शनास आले. आमच्या त्रिवर्गाच्या व नानांच्या भेटी तेथेंच झाल्या नंतर वीस घटका रात्रीं श्रीमंत मुहूर्त करून वाड्यांत आले. [ऐ. ले. सं. ८ ले. ३१६३]

„ –पौष शुा २ इ.१७८९ डिसेंबर १८

कार्नवालीसचे मॅलेटला पत्र. मराठ्यांचे ताब्यांतील किनाऱ्यावर झालेल्या इंग्रजाचे जहाजाच्या अडवणूकी बाबत ग. ज. नें केलेल्या तक्रारीस नानानें दिलेल्या उत्तरामुळें व केलेल्या तजविजीमुळें ग. ज. ला मराठ्यांचे मैत्रीबद्दल व विश्वासा बद्दल शंका राहिली नाहीं.– इंग्रजाची अडवून धरलेलीं जहाज ताबडतोब सोडून द्यावीत व या पुढें अशीं जहाजें अडवून धरूं नयेत असा नानांचा हुकूम [पु. रे. कॉ. व्हा. प. ८६ पा. १६१]

,, –पौष शुा ३ इ.१७९० जानेवारी ७

मॅलेटचें ग. ज. स पत्र.

ग. जनरल मद्रासला आले आहेत व टिपू विरुद्ध स्वतः चढाई करणार आहेत आणि नानानें सवाई माधवरावचे आधिपत्या-खालीं मराठी सैन्य पाठवावे असा मॅलेटचा नानांना सल्ला–नाना, पेशव्यांस (एकट्यास) पाठविण्यास तयार नाहीं. कारण नानाची तब्येत चांगली नाहीं–टिपूनें केलेल्या तहाची मागणी व त्याचा विचार निजाम, पेशवे व इंग्रज यांनीं ताबडतोब करावा. अशा मॅलेटच्या म्हणण्यावर नाना म्हणाला कीं, लांबलाबच्या राज्यामध्यें तह होण्यास विचार—विनिमयासाठीं कालावधी लागणारच. ग. ज. व पेशवे रणांगणावर असले म्हणजे ताबडतोब विचार होण्याची शक्यता आहे, अशा मॅलेटच्या शेऱ्यावर " पेशव्याची रणांगणावर जाण्याची शक्यता कमी आहे असा नानानें शेरा मारला––टिपूनें सुचवलेल्या तहावर नानांचें मत असें कीं टिपूनें तीनही राज्यांना मानवतील अशा तहाच्या अटी सांगितल्या नंतर नाना आपलें मत सांगणार–नाना–टिपू–इंग्रजा मधील तहांविषयीं फार उत्सुक नाहीं–रास्ते यांचे मार्फत लढाईचे सुरुवाती पासून नानानें टिपूशीं संधान बांधलें आहे व तहाचा फायदा नाना व निजाम हे दोघे उपटणार आहेत असें मॅलेटचें मत [पु. रे. कॉ. व्हा २ पत्र १०२ पान १८१]

,, –पौष वाा ८ इ.१७९० जानेवारी ८

मॅलेटचें कार्नवालीस यास पत्र

पत्रव्यवहारामध्यें पेशवे व नाना ग. ज. ला मायना दर्जाप्रमाणें लिहित नाहींत असा मॅलेटची व ग. ज. ची तक्रार. वास्तविक पेशवे हे छत्रपतींचें नोकर व नाना पेशव्याचे दिवाण–दुय्यम दर्जाचे व्यक्तीनें ग. ज. सारख्या उच्च दर्जाच्या व्यक्तीला बहुमानार्थी मायना लिहिला पाहिजे. पेशवे आपण ग. ज. चे बरोबरीचे समजतात [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ८७ पान १६५]

शक १७११ पौष वा। ८ इ.१७९० जानेवारी ७

मॅलेटचें कॉर्नवालीस यास पत्र इंग्लंडला ब्रिटीश राजाकडे पेशव्यांचा वकील धाडण्याचीं कारणें नानानें कळविलीं—१ कंपनी व कंपनीचे सैन्याचें सहकार्यानें मराठ्यानीं सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करावयाचा २ वरील हेतुशब्दशः पूर्ण झाला नाहीं तर निझामला दिलेल्या सैन्याचे मदतीप्रमाणें पेशव्यास कंपनीनें लष्करी मदत द्यावी. ३ कंपनी कडून कर्नाटक प्रांताची चौथाई वसूल करावयाची. यामध्यें नानाची अधिकार–लालसा दिसून येते असें मॅलेटचें मत. सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करावयाचा मराठ्यांचा डाव पानपतमध्यें दैवानें व सदाशिवरावभाऊचे गर्विष्ठपणानें हुकला. यापुढील नानाचा डावहि तोच असावा कीं, सर्व सरदारास त्यांचे सध्यांचे स्वतंत्र परिस्थितींतून मांडलिकीचे दर्जास आणावयाचे व आपण आपली सत्ता हिंदुस्थानभर गाजवावयाची. नानांचे व्यक्तिशः प्रभावी वजनामुळें हें शक्य आहे. उत्तरेंतील सरदारांकडून विरोध व शिंदे याची इंग्रजाचे मदतीमुळें वर्चस्वाची चढती कमान हें लक्षांत घेऊन नानाचे डाव चालले आहेत असा मॅलेटचा तर्क––ब्रिटीश राजाचे अमलाखालीं हिंदुस्थान पूर्ण जिंकावयाचा. पेशव्यानें सातारचे छत्रपतींचे प्रतिनिधी म्हणून ब्रिटीश राजाचे पूर्ण हुकमतीखाली (?) काम करावयाचें. ब्रिटीश राजाचा इतमाम व इभ्रत राखण्यासाठीं मराठा दरबारनें एक मनुष्य नेमावयाचा असाहि नानाचा विचार असल्याबद्दल मॅलेटची बातमी! इंग्रजाचे हित व्हावें अशी जर नानाची इच्छा आहे तर कंपनीचे हक्क संबंधीं वाटाघाटीस विलंब कां लागतो ? इतर सरदारांचे विरोधामुळें लागतो कीं काय ? अशा मॅलेटच्या प्रश्नावर बहिरोपंत (नानातर्फे) म्हणाला कीं, आम्ही हक्कासंबंधीं विचार न करतां सत्ता व बळ याचा विचार करतो [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ८८ पान १६७]

,, –फाल्गुन शुा ४ इ.१७९० फेब्रुवारी १८
गुरुवारीं पुणें येथें सरकार वाड्यांत नानांची भेट व्यंकटराव दादा घोरपडे भेट]

,, –फाल्गुन शुा ५ इ.१७९० फेब्रुवारी १९ मॅलेटचें कार्नवालीस यास पत्र, हरीपंत व नाना यांस स्वतंत्र भेटीसाठीं बोलवावयाचें ठरल्याप्रमाणें मॅलेटनें नानांस कळविलें कीं, "मी भेटीसाठीं तयार आहे केव्हांहीं यावें" मॅलेटनें स्वतः आमंत्रण केलें पाहिजे असा नानांचा आग्रह.पेशवे यांस जरी मॅलेटनें स्वतः आमंत्रण दिलें तरी पेशव्यांचे प्रधानास त्यांचें दुय्यम दर्जामुळें मॅलेट आमंत्रण देऊं शकत नाहीं–हा वैयक्तिक प्रश्न नसून तत्वाचा प्रश्न आहे. मॅलेट युथॉफला (असिस्टंट) आमंत्रण देण्यास पाठविण्यास तयार– नाना आपल्या निश्चयाप्रमाणें वागणार व जर नानांचें म्हणण्याप्रमाणें झालें नाहीं तर मॅलेटशीं भेट तहकूब करणार असें नानांनीं कळविलें. नजराण्याचे बाबतींतही नानांनीं असाच प्रकार केला होता. पेशव्यांचे पत्रव्यवहारांतही पेशव्यांचा वरचढपणा दिसून येतो. इभ्रत राखण्यासाठीं मॅलेट नाइलाजानें नानांची भेट नाकारतो. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ९० पान १७१]

,, –फाल्गुन शुा ११ इ.१७९० फेब्रुवारी २५ नानाचें परशुरामभाऊंस निमंत्रण आपली भेट जरूर झाली पाहिजे. कित्येक मोठमोठे मसलतीचे विचार जरूर बोलावयाचे रुबकार येऊन पडले आहेत. व नबाब व इंग्रज यांसी उत्तरें लौकर गेलीं पाहिजेत. टिपूकडील वर्तमानाच्या बातम्या चोहोंकडून मनस्वी येतात. नबाब, इंग्रज, टिपू ह्याविषयीं विचार कर्तव्य आहे. [ऐ. ले. सं.८ ले. ३१९७]

,, –फाल्गुन वाा २ इ.१७९० मार्च ३
अन्याबा बिवलकर यांजकडे पांचसात वर्षे पंचाइतीचे काम नानांनीं सांगितलें आहे; हल्ली नानांनीं यांजकडे प्यादे बसविले. [ऐ. ले. सं ८ ले. ३१७१]

,, –फाल्गुन वद्य ६ इ.१७९० मार्च ६ (सु. ११९० जखर २९)

गणेश पेठेचे पूर्वेस नवी पेठ बसावयास जागा दिली व ७ साला माफीचा कौल. शेटचेपण फिरंगोजी खाडे [स. मा. रो. ३ पृ. ३५७ श. १७१२ वैशाख शुद्ध ६ पहा.]

शक १७११ इ.१७९० (सु. ११९०)

नानांना कारकुनी मिळे ती–किल्ल्याचा हवाला देणें, दत्तक, सरंजाम, उंट खरेदी, तैनातदार, घासदाणा, कामावर नवी नेमणूक, घोडीखरेदी, गुन्हेगारी, तप्तदिव्य, लढाईंत सरकारांत मुलुख आला इत्यादि प्रसंगी मिळे. महादजी शिंदे यांनीं कारकुनीचे ऐवजी गांव दिले. [पे. द. ४५ पृ. १०९ते११५]

,, –१७११ इ.१७९०

नाना मेणवलीस गेले होते. त्यांच्या रवानगीस पालखी बिगारी रु. २१ [पे. सा. ६]

,, –फाल्गुन वा ९ इ.१७९० मार्च ९ (सफर ६)

नानांनीं जोधपूरकर बिजेसिंगाचें खलित्यास प्रश्नोत्तरें पाठविलीं कीं, मामलत संबंधीं पैका उभयतां जैपूर संस्थानिकांनी रा. पाटिलबावांशीं फडशा करावा. सरकारांत स्नेहाची इच्छा करितात तर एतदर्थ वकील पाठवावा. जोधपूरकर दूरांदेशी आहेत. सरकारांत विरुद्ध न वाढवितां मामल्याचा फडशा होऊन स्नेह राहे ते गोष्ट करावी. यांत चांगलें आहे. (रा. पाटिलबावांचा विश्वास हे राजे सर्वथैव करीत नाहींत असें नानांचा वकील कळवितो. [इ. सं. जोध. राजकारणें ले. १२]

१७१२–वैशाख शु. ५ इ. १७९० एप्रील १९ (साबान ४)

टिपूवरील दुसरी मोहिम–नबाबास सरकारांतून पत्रें गेलीं त्याचे जाब न आले आणि इंग्रजाशीं मसलत करून डेरेदाखल होतात. नबाबानें सांप्रदाय बदलला ! मालीट म्हणतो पेशवे, नाना, निदान तात्यांनी फौज घेऊन निघावें. नाना परशराम-

भाऊंस निघावे म्हणतात पण खडी गणती व सरंजामाचा ऐवज ह्यांचाच घोळ घालतात. सरकार कारभारी ह्यांचा भितांना जन्म गेला. सरदारांवर विश्वास नाहीं. फौजेस पैका नाहीं. (श्रीकाशीहून फाजिलखान यांचे चिरंजीव आले ह्याचीं दोन गाणीं नानांच्या वाड्यांत झालीं.) [ऐ. ले. सं. ८ ले. ३१८८]

,, –वैशाख शुा ६ इ. १७९० एप्रील २० (सु. ११९० साबान ५]
नानांना नवी पेठ वसवावयास गणेशपेठेचे पूर्वेस, भवानीपेठेचे उत्तरेस, रास्तेपेठेचे दक्षिणेस वोढा आहे तेथपर्यंत, दक्षिणउत्तर रुंदी गज ४५० लांबी पूर्वपश्चिम ६०० नागझरीपासून. या प्रमाणें जमीन दिली. म्हणोन बापूजी आनंदराव कमाविसदार पुणें यास सनद. हीच 'नाना पेठ' [इ. वृ. १८३४ पृ. ८३-८४] ह्या पेठेंत नारो निलकंठ मुजुमदार यांच्या २५ बिघे जमिनी पैकीं ७ बिघे जमीन गेली म्हणून त्याचा मोबदला त्यांस प्रांत पुणें पैकीं हरएक गांवीं ३१ रु. कमाल आकाराची जमीन दिली [श. १७१६ आषाढ शु. ६ इ. १७९४ जुलै ३]

,, –आषाढ वाा १ इ. १७९० जुलै २७
मॅलेट कार्नवालीसास लिहितो–मी नानांशी परशरामभाऊंस कृष्णाकाठ उतरण्यास लागलेल्या विलंबाबद्दल व टिपूच्या वकिलास लवकर निरोप कां दिला नाहीं याबद्दल वाटाघाटी केल्या. [पूना रे. कॉ. ३–१३९ पृ. १८६]

,, –श्रावण शुा ५ इ. १७९० आगष्ट १५
मॅलेटचें ग. ज. स पत्र, अलाहाबाद क्षेत्रांत हिंदुकडून घेण्यांत येणारा कर इंग्रजानी रद्द केला. यामध्येंहि इंग्रजाचें कांहीं राजकारण असावें असें नानाचें मत [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ९४]

,, –भाद्रपद शुा १४ इ. १७९० सप्टं २२
फोर्टवुइल्यम. कार्नवालीस मेजर पामरला लिहितो, पुणें दरबारांतील सर्व पक्षांचें व नाना फडणिसांचे एकंदर बल किती त्याचें पूर्ण ज्ञान असणें आपणांस पुढें उपकारक होईल [पूना रे. कॉ. ३ ले. पत्र. १५१ पृ. २०५]

,, –मार्गशीर्ष वा। ३ इ. १७९० डिसें. २४

मॅलेटचें ग. ज. स पत्र–२२ डिसेंबर १७९० रोजीं झालेल्या नाना व मॅलेटचे मुलाखतींत " सवाईमाधवरावास टिपूविरुद्ध स्वारीवर पाठविणेसाठीं नानाचा विचार नाहीं. नानाची तब्येत बिघडली आहे. नाना इंग्रज डॉक्टरचें औषध घेण्यास नाखूष. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १०० पान १७९]

,, –मार्ग. वा। ३० इ. १७९१ जाने. ४

कॅप्टन केनवे कार्नवालीस यास कळवितो, आमच्याशीं सहकार्य करण्याचें नानानें कबूल केलें व आपण जेथें सैन्याची रवानगी करण्यास सांगू तेथें आपण आपलें सैन्य पाठवूं असेंहि सांगितलें. [पुना रे. का. ३ पत्र. १९६ पृ. २६२]

,, –माघ शु॥ ९ इ. १७९१ फेब्रुवारी १२

नानांचे स्त्रीस पौष वद्य अष्टमी गुरुवारीं पहाटेस पदर प्राप्त जाहला [ऐ. ले. सं. १० ले. ३३०८]

,, –फाल्गुन शु. १३ इ. १७९१ मार्च १८

मॅलेटचें कार्नवालीसला पत्र कीं, हरीपंताच्या विलंबाबद्दल मी नानांशीं बोललों व नानानीं हा मुद्दा कबूल केला. बंगलोर काबीज करणें दुरापास्त होईल. [पूना रे. कॉ. ३ प. २५५ पृ. ३५३]

शक १७१३–चैत्र वा। ११ इ. १७९१ एप्रील २८ मेजर पामरचें मॅलेटला पत्र. नाना व शिंदे याचे एकीचा (एकाचे बळ व दुसऱ्याची बुद्धि) उपयोग आपआपल्या राज्यावर दाब ठेवण्याचें दृष्टीनें होईल. [पूरे. का. व्हॉ. २ पत्र ५ पान १८८]

,, –वैशाख वद्य ११ इ. १७९१ मे २८

श्रीमंत रा. नानांचे मर्जीस फार जपत जाणें. तुमचा तंतु तितकाच आहे. हें विनायक बाजीराव चंद्रचूड दादाजीस (यशवंत गंगाधर) लिहितात. [चंद्र. द. नि. उतारे ले. ८७]

,, –ज्येष्ठ शुा १३ इ.१७९१ जून १४ (पौ सवाल ११)

स. रावसाहेब यांचे बरोबर नानांची जिलीब = स्वारींतील शृंगारलेला घोडा–चालतां श्रीमंतानीं विचारलें, असा थो. रावसाहेबांचे वेळीं चालत असे काय ? नानांना हें कळतांच रद्द केले. पण पुनः ३।४ वेळां सांगितल्यावरून जिलीब चालविली. ' त्र्यंबकेश्वरी प्रयोग करणारे ब्राह्मणास अटक [ऐ. ले. सं. ९ ले. ३३५२]

,, –ज्येष्ठ वद्य ५ इ.१७९१ जून २०

नाना फडणीस ह्यांनी पुण्यांत सदाशिव पेठेंत हौदांत मुहूर्तानें पाण्याचा नहर सोडला. [काव्ये. प. या. पृ. ४७१]

,, –आषाढ वाा ३० इ.१७९१ जुलै ३० मॅलेटचें ग. ज. स पत्र.

नानानें बहिरोपंतास बाजूस सारून हरिपंतामार्फत ग. ज. बरोबर वाटाघाटी करण्याची योजना केली, यांत नाना–– वेळ पडल्यास तहाच्या वाटाघाटी फिसकटल्या तर नाना हरि-पंतावर त्याची जबाबदारी टाकून आपण निराळा राहील असा मॅलेटचा तर्क.[पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ११२ पान २०१]

,, –श्रावण वाा १ इ. १७९१ आगष्ट १४

मॅलेटचे ग. ज. स पत्र. टिपू बरोबरच्या तहाच्या अटी सुकर व झटपट व्हाव्यात म्हणून सवाई माधवरावास आघाडीवर सोईस्कर अशा ठिकाणीं न्यावें; आघाडीवर नबाबास अगर कार्नवालीसला मिळावें व दोन्ही जमलें नाहीं तर वाटाघाटी पेशव्यांचे मध्यस्थीनें सुरू व्हाव्या असा नानांचा विचार. व हा बेत कार्नवालीसला कोठपर्यंत पटतो याबद्दल नाना मॅलेटचें मत विचारतो. मिर्झा इस्माईल गुजरातच्या उत्तर सरहद्दीवर पोहोंचला त्याचा बेत संशयास्पद असलेमुळें नाना मॅलेट जवळ २ पलटणीसाठीं मागणी मुंबई अगर सुरत येथून पुरी व्हावी असें सांगतो व त्यांचा (फलटणीचा) खर्च पेशवे देतील असें नाना सुचवतो. नाना वाटाघाटीमध्यें अडथळे आणील असें मॅलेटचें मत. [पू. रे. कॉ. व्हॉ. २ पत्र ११४ पान २०६]

„ –श्रावण वा ७ इ.१७९१ आगष्ट २०

मॅलेटचें ग. ज. स पत्र. हरिपंताचे सूचनेवरून ग. ज. नें टिपूचे वकिलाचे नेमणुकीस (तहाच्या) वाटाघाटी करितां संमती दिली. आणि मराठे व निझाम यांचे संमती शिवाय कोणताहि निर्णय घ्यावयाचा नाहीं असें जाहीर केलें–नानास समाधान–निजामचा प्रतिनिधी मीर अलम यास किती अधिकार आहेत, याबद्दल नानाची मॅलेटजवळ चौकशी; मीर आलमनें तहाच्या वाटाघाटी करून निर्णायक निकालासाठीं निझामचें मत घ्यावयाचें–हरिपंतासहि निर्णायक निकाल घ्यावयाचा सर्वाधिकार नाहीं. शत्रूचें बेदनूरकडे सैन्य येत आहे. [पू. रे. का. व्हॉ. २ पत्र ११५]

„ –श्रावण वद्य १४ ते भाद्रपद शुा ४ इ.१७९१ आगष्ट २८–३१

घांसीराम सावलदास पुण्याचा कोतवाल, याचा, त्यानें २२ तेलंगी ब्राह्मण भुयारांत कोंडल्यामुळें मेले याबद्दल तेलंगी ब्राह्मणांकडून धोंडमार होऊन मृत्यु. [ऐ. ले. सं. ९ ले. ३३४७; पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ११६] —पेशवे युद्धाच्या अघाडीवर गेले म्हणजे तहाच्या वाटाघाटीचीं सूत्रें पेशव्यांकडे असें ग. ज. ला कळविण्याबद्दल नानांचें मॅलेटला सांगणें. मॅलेट लेखी कळविल्याशिवाय कांहीं करण्यास नाकबूल (भाद्र. शुा ६ = सप्टें. ४ व्हा. २ प. ११६)

„ –आश्विन शुा १५ इ.१७९१ आक्टो. ११

नाना स. माधवरावांसह कन्यागत व चंद्रग्रहण असल्यामुळें वांईस कृष्णा–स्नानास आले. नानांनीं ग्रहण समयीं घोडा व रु. २०० ची जमीन आणि ३ ह. भूयसी असा दानधर्म केला.

शक १७१३ (श्रीमंत पेशव्यांनीं हत्ती व २० ह. रु. धर्म केला. मॅलेटचा कॅंपहि वांईस होता. नाना व स. माधवराव नंतर महाबळेश्वरीं गेले) [ऐ. ले. सं ९ ले. ३३८५]

,, –आश्विन वद्य ६ इ.१७९१ आक्टो. १८ (सफर १९)

चिरं. नाना यांस–(तुमची बायको वारली हें) अप्रिय वर्तमान ऐकिलें. तुमचे जन्मास पन्नास वर्षें जालीं. पुढें बायको किंवा मुलें कांहींच थांग नाहीं. आतां दोन लग्नें करावीं. पूर्वींच्या बायकोचे टांक करून गळ्यांत घालावें, जाणते कोणी त्यांचें (कडून) अंगारे करावे. हें तुम्हां पुरुषांस नीट करतां येत नाहीं आणि सारे लटकेंच वाटतें; परंतु आम्हांस अनुभव आहेत. तुम्ही तालेवार, तुम्हास (इतर कामापुढें) हा उद्योग होणार नाहीं. यास्तव तुमची मासी चिमाबाई त्यांस हे गोष्टी विसी सांगितल्यास आंगारा औषध वगैरे ती करील. तुमचे चित्तांत आल्यास लेक घ्यावयाचा तर बरें आहे. इतकें कां लिहावयाचें तर बहिणाबाई तों आमचीच होती; आणि बाबा तुमचे तीर्थरूप त्याणी आमचे घरामध्यें कोणे तऱ्हेनें चाकरी मेहनत केली तें आइकली आहे. तें स्मरोन, त्यांचा व आमचा वंश ईश्वरें समान चालवावें, या अर्थी इतकें उद्योगें लिहिलें. तुम्ही सुज्ञ आहा. [इ. सं. ऐ. टि. २–३६]

,, –आश्विन वा ८ इ.१७९१ आक्टो. २० (कृष्णेवरील वाईजवळ कँप)

मॅलेटचें ग. ज. स पत्र. १५ आक्टोबर रोजीं नाना पेशव्यांसह, महाबळेश्वरहून परत आले.–नानानें मराठ्याच्या सैन्याच्या टिपूविरुद्ध यशस्वी हालचाली मॅलेटला सांगितल्या–पेशव्यांचा आघाडीवर न जातां पुण्यास परत फिरण्याचा विचार नानानें मॅलेटला कळविला. –मॅलेटनें कारण विचारलें असतां नानानें सांगितलें कीं, "पुण्याहून निघण्याचे वेळेस पेशव्याचे पुढील बेत ठरले नव्हते व ग. ज. चें आघाडीवर जाणें शंकास्पद आहे, अशी बातमी कळली. म्हणून पुण्यास परतणें नक्की ठरविलें. या बेतामुळें दोस्ताचें (Confederacy) हितसंबंधास धोका नाहीं." नानाचे एकदम परतण्याचे विचारामुळें मॅलेट अस्वस्थ. सरळ व स्पष्ट कारण मॅलेटला कळत नाहीं.–पेशव्यां-

चें परतण्याचें दुसरें कारण असें कीं, हरिपंताकडून नानास कळलें कीं शत्रु–विरुद्ध दोस्ताचें सैन्याशीं ताडून पाहतां मराठ्यांचें सैन्य भरपूर आहे. नानानें हरिपंत व परशरामभाऊंस कळविलें कीं, सर्व अडचणी बाजूस सारून १०००० घोडेस्वार व २०००० पायदळ घेऊन ग. ज. ला मिळावे. पण दक्षिणेंतील दुष्काळामुळें परशरामभाऊंचें मोठ्या सैन्यासह जाणें शंकातीत नाहीं. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ११९ पान २१६]

,, –कार्तिक शुा ८ गुरुवार १७९१ नोवें. ३ (सु. ११९२)

नाना स. माधवरावसाहेबांसह छत्रपतींच्या दर्शनास सातारा किल्ल्यावर. छत्रपतींचे सामोरे येणें, भेट, दरबार, नजराणे, देकार व राण्यांना भेट नजराणे; पुण्याकडे येतांना लिंब, किकवी, भुइंज येथें आपटे, बरवे, ठाकूर, बाबर, जाधव यांचे घरीं मेजवानी. नंतर वाई मेणवली [ऐ. ले. सं. ९ ल. ३३९१; पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १२०]

—नाना नंदिदुर्ग मराठ्यांनीं घेतल्याचें मॅलेटला सांगतो. हरिपंताकडून बातमी जलद कळावी म्हणून नानांनीं डाक सुरू केली ती इंग्रजापेक्षां जलद पोचते. वेळीं सदर डाकेचा आपण उपयोग करावा अशी मॅलेटची ग. ज. स सूचना [पत्र १३०]

,, –मार्ग. शुा ८ इ.१७९१ डिसें. ३ (सु. १२०१ रखर ६)

नाना फडणीस ह्यांचा हिंदुस्थानांतील सर्व प्रांताचे नकाशे एतद्देशीयांकडून, इंग्रजांकडून मिळविण्याचा सारखा प्रयत्न चालू असे. त्यांतील एक पत्र हरिपंत फडके ह्यास कर्नाटकांत पाठविलें. तें बेंगरूळ, नंदिगड, श्रीरंगपटण इत्यादि नक्षे एकादो रोजीं तयार होतील. बेंगरूळचा इंग्रजांनीं तयार केला तो व इतर पाठवून देतो; प्रत्यक्षास व नक्षास अंतर पडलें सबब पटणचा पाठविला नाहीं. नक्षा तयार करविला, जाला, म्हणजे पाठवितों. [इति. सं. ऐ. टि. २ पृ. २ व २१]

,, –माघ वद्य ३० इ. १७९२ फेब्रु. २२
पुणें रेसिडेन्टचे ले० विल्यम स्टूअर्ट ॲसिस्टंट टू हैद्राबाद रेसिडेन्ट यास पत्र. मराठ्यांचे फौजानीं निजामचा कांहीं प्रांत बळकावला अशा हैद्राबाद रेसिडेन्टनें केलेल्या तक्रारीस मॅलेटचें उत्तर—मराठ्यांविषयीं (नाना) मॅलेटची थोडीफार खात्री. जो निझाम कांहीं दिवसां पूर्वी मराठ्यांबद्दल पूर्ण विश्वास दाखवितो तोच आतां त्यांचे विरुद्ध तक्रार करतो, यांत निझामचा डाव असावा असा मॅलेटचा तर्क. [पुना रे. कॉ. व्हा. २ पत्र १२६ पान २२५]

शक १७१३ इ.१७९१
नानांकडून मिसेस जेम्स हॉल (म्ह. जमालखान सरदार) ही स्त्री सैन्याची पलटण तयार करणारी लष्करी कवायत जाणणाऱ्या युरोपीय बाई. तिला लोहगडावर ७ वर्षें कैद. [इ. सं. ऐ. जु. गो. पृ. १९]

१७१४ चैत्र शुा १० १७९२ एप्रील २
कार्नवालीसचें मॅलेटला पत्र. निझाम व पेशवे यांचे मध्यें उत्पन्न झालेल्या कटकटी ग.ज. नें मध्यस्थी करून मिटवाव्यात असें हरीपंत फडके यानें ग. ज. ला सांगितलें. निझामचा प्रधान अझीमउलउमरनें ही तसेंच सांगितलें. "पेशव्याचे विरुद्ध जर महादजीनें खटपटी केल्या तर इंग्रज महादजीस मदत करतील का ?" असेंहि हरिपंतानें ग.ज.ला विचारलें. त्याचप्रमाणें वरील दोन्ही परिस्थिती संबंधीं मॅलेटनें बहिरोपंतास न लिहितां नानास लिहावें अशी इच्छा हरीपंतानें ग.ज. जवळ केली. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १३० पान २२९]

,, –वैशाख शुा १४ इ. १७९२ मे १९
गोव्याहून नाना फडणीस ह्यांस भेट म्हणून आंबे आले. [पोर्तु. वकील विठलराव गोरक्ष वालावलीकर यांचें पत्र–पिसुर्लेकर]

" वैशाख वा १३ इ. १७९२ मे १८

कार्नवालीसचें मॅलेटला पत्र. नाना फडणीस व महादजी यांचे मध्यें बेबनाव झाला. व नानास राजकारण निवृत्त व्हावयाचे असल्यास नानाची बनारस (काशी)ला इंग्रजातर्फे उत्तम सोय होईल. नानाचें कर्तृत्व व मनःपूर्वक सहकार्य यामुळें इंग्रज मराठे संबंध घनिष्ठ झाले [पुरे. कॉ. व्हा २ पत्र १३६ पान २४८]

" –ज्येष्ठ वद्य १० इ. १७९२ जून १४ (सु. ११९३ सवाल २३)

अहल्याबाईचें यशवंत गंगाधर चंद्रचूड यांस पत्र. शिंदे तिकडे आले आहेत. त्यांचे व बाळाजीपंत नाना यांचे इतके दिवस नीटच होतें. आलीकडे शिंदे यांच्या चाली व रीतभात वेगळी पडली. शिंदे हरीपंत तात्यासी सरलता धरतील हें दुरापास्तच. हरिपंतासहि जख द्यावी येविसीचे यत्नास तत्पर होतील. हे भाव नाना व तात्या ह्यांचे ध्यानांत नसतीलते नाहीं. परंतु (शिंदे यांची) प्रकृती छद्मी, फुटीर, भुलथाप द्यावयास व औडंबर आणावयास चुकणार नाहींत. यास्तव प्रसंगोचित तुम्हाकडून सूचना झाल्यास उत्तम [चंद्र. द. उतारे ले. ९८]

" –आषाढ शु. ३ शुक्रवार इ. १७९२ जून २२

गुलामकादराच्या जाचांतून दिल्लीच्या शहाअलम बादशहास सोडवून सुखासीन केल्यामुळें वकील मुतालकीची सनद पेशव्यांस आणि महादजी शिंद्यांना मीरबक्षिगिरी दिल्याची फर्मानवाडी समारंभ पुणें येथें पाटिलबावांच्या आग्रहामुळें झाला. गोविंदराव काळे लिहितात ही कारकीर्द म्ह. नाना व महादजी यांची. 'कीर्तीचे ध्वज दिगंतरास गेले सहस्त्रवाटे प्रशस्त' [इ. सं. ऐ. टि. १ ले ९; पू. रे. का. व्हा. २ पत्र १४०]मोगलसाम्राज्यांत बैल मारावयाचा नाही. असें फर्मानांत कलम. [शिंद्यांना वकील मुतलख पदाची दिवाणगिरी व नांनांना त्याची फडणीशी ऐ. ले. से. ९ ले. ३४८३]अहल्याबाई सांगतात

शक १७१४–महादजींच्या भिडेनें फरमानवाडी होईल तर होईल. नाना व तात्या विचारवंत, ते असा सल्ला देऊन पातशाही चाकर होऊन नजर घेऊं नये, हेंच सांगतील. नाहींतर पूर्वी पातशाहीच केली असती तर योग्यता होती, पातशाही आपले हातें स्थापीत, बाजीराव यांचे कीर्दीपासून तसा पृथ्वीत लौकीक. पण आतां महादजींचा अन्वय व वहिवाट अशी; असो; तुम्हीं प्रसंगोचित सुचविणें [चंद्र. द. उतारे ले. १०५] आषाढ नानांनी छत्रपतींना लिहून त्यांची संमति आणविली मग पदें व वस्त्रें घेण्याचें ठरविलें वद्य १ जुलै ५ सु. ११९३ जिलकाद १४; ऐ. पत्र. ले. २९६–२९८; ऐ. ले. सं. ९ ले. ३४८१–८२]

,, –आषाढ शु. ५ इ.१७९२ जून २४
कार्नवालीसचें मॅलेटला पत्र. कर्नाटक व इतर ठिकाणीं चौथाई वसुल करण्याचा पेशव्यांचा (नाना फडणीस) विचार आणि काशीचा न्याय खात्याचा कारभार करण्याची इच्छा, त्यास पूर्ण विरोध करण्याबद्दल मॅलेटला पत्र, [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १४१]

,, –आषाढ शु. ७ ते १० इ. १७९२ जुलै २६ (सु. ११९३ जिल्हेज ६ ते ९)
रा. बालाजीपंत नाना व हरिपंत तात्या ह्यांचें बोलणें विस्तरपूर्वक कळलें तें सरळ, सरकार–हिताचें असतां महादजी चढीस लागले. महादजींचे मर्जीकरतां मार्गाची गोष्ट सोडली जाते. महादजी फौज पाठवितात पण ते तर आमचे सोबती. असें असतां तेच असी चाल पाडतात. तर हीहि दौलत मार्तंडाचे प्रसादाची आहे तो साह्य करील. वोढूच लागले तर दांत खटे होयेत तेच घडेल. नाना व तात्या यांनीं सांगावें व महादजीस मार्गानें वर्तवितील हा भरोंसा आम्हांस. [चंद्र. द. उतारे ले. ११० ते ११३]

,, आषाढ शु. ९ इ. १७९२ जून २८ (सु. ११९३ जिलकाद ७)
तुकोजी होळकरांचे चंद्रचूडांना पत्र, महादजी बाबा जामगावीं दाखल जाले. पुण्यास येतील. त्यांचे भेटीचे बोलण्याचे प्रसंगी वजनदार व माहितगार पाहिजेत. तुम्हीं त्या प्रसंगीं असावें. वाटणीचे वगैरे जाबसाल व्हावे. आमचें लक्ष श्रीमंताचे ठाई व नाना व हरिपंत यांचे भाऊपण्यावर अकृत्रीम आहे. समयास सुचविण्याविषयीं तुमचे जपणें असावें. [चंद्र. द. उतारे ले. १००]

,, –आषाढ शु. १३ इ. १७९२ जुलै २ (सु. ११९३ जिलकाद ११)
जामगांव येथील दौलतराव शिंदे ह्याचें लग्न महादजी शिंदे यांनीं केलें. त्या समारंभास नानाफडणीस निमंत्रणावरून गेले. तेथें अर्थात् पाटिलबावांच्या भेटीचा समारंभ जाला. कोणे गोष्टीचा संशय राहिला. नाहीं. ही नाना–महादजींची एकी ऐकून रा. गोविंदराव काळे म्हणतात ' रोमांच उभे राहून अति संतोष जाला. विस्तार पत्रीं किती लिहूं. ग्रंथाचे ग्रंथ मनांत आले, इ. इ. [इ. सं. ऐ. टि. १ले. १३]

,, –आषाढ शु. १४ इ, १७९२ जुलै ३ (सु. ११९३ जिल्काद १२)
अहल्याबाईचें यशवंत गंगाधर चंद्रचूड यांस पत्र कीं, एकानें सिद्ध एकानें साधक होऊन रजवाडे यांचे पारपत्य करून सरकार काम करीत असावे. असें असतां महादजीबावा शिंदे यांनी मेवाडहून उज्जनीस जातांना, देवले सं. पुरातन आमचें, त्याजकडून १॥ ल. रु. जोर पोहचाऊन घेतले; हांडी घाटे बऱ्हाणपुरी जातांना आमचें सरकतीतील नेमावर पंच महालांतील सतवास ह्या किल्ल्यांतील आमचें ठाणे उठवून आपलें बसविलें; मेवाडप्रांतीची आमचीं खेडीं जप्त केलीं. फौज पाठवूं असें मथुरेहून म्हणतात, ह्या चाली कोणच्या रीतीच्या हें नानाशीं बोलावें. ते सरकार रीतीनें त्यांस सांगणें तें सांगतील. [चंद्र. द. उतारे ले. १०२]

शक १७१४ आश्विन शु. ५ इ. १७९२ सप्टें. २१

कार्नवालीसचें मॅलेटला पत्र-इंग्रजांनीं मराठे (पेशवे) दरबारशीं पत्रव्यवहार करतांना उपयोगांत आणावयाचा मायना पूर्वी प्रमाणें ठेवावयाचा. फर्जंद हा शब्द गाळावयाचा (नानानें या बाबत तक्रार केली होती) [पू. रे. कॉ. व्हा. २पत्र १४८ पान २५२]

,, –आश्विन वा ९ इ. १७९२ आक्टो. ९ उज्जैन

विल्यम पामर कॉर्नवालीसला लिहितो मला मिळालेली हकीकत जर खरी असेल तर शिंद्यांचें पुणें दरबाराविषयीं मत विरोधी स्वरूपाचें दिसतें. या त्याच्या विरोधामुळें त्याचें वर्चस्व तरी कमी होईल किंवा पेशव्यांच्या मंत्रिमंडळांत तरी बदल होईल. असेंहि कळतें कीं, शिंदे हे पेशव्यांना आर्थिक मदत करीत आहेत. या प्रकारांमुळें नाना फडणीस व हरिपंत या दोघांनीहि सावधगिरीची सूचना घेतली. तुकोजी होळकर याच्या हातून शिंदे यांच्याशीं उत्तर हिंदुस्थानांत लढाई-देणें शक्य होणार नाहीं. [पू. ना. रे. कॉ. व्हा. १–२८०]

,, कार्तिक शु. ११ शुक्रवार इ. १७९२ आक्टो. २६(सु ११९३ रवल ९)

जंजिरा घेण्याचें कारस्थान नानांनीं नारो गोविंद वर्तका-मार्फत केलें. त्या मसलतींतील कलमें ८. तीन महिन्यांत जंजिरे दंडा राजपुरी किल्ला सरकारांत आल्यानंतर सदर कलमांची निभावणी व्हावयाची [इ. सं ऐ. टि. १ ले. ५ पृ ६–७]

,, –कार्तिक वद्य १ इ. १७९२ आक्टो. ३० (सु. ११९३ रवल १३)

नानांचा काशीस जाण्याचा निश्चय. शिंदे हिसके घेत होते पण रुकार दिला. तात्यांचाहि बहुत प्रकारें बोलल्यावर रुकार जाहला. शिंद्यांचें व तात्यांचें नीट जहालें. नाना गेल्यावर मागें तात्यानी सांभाळावें. [ऐ. ले. सं. ९ ले. ३६२६–२७]

,, कार्तिक वा। ५ इ. १७९२ नोव्हेंबर ४

मॅलेटनें ग.ज.ला धाडलेल्या पत्रासोबतच्या कागदाची नकल (बातमी पत्र)–नाना फडणीस व त्याचे अनुयायी सरदार यांना असें वाटतें कीं, पेशवे हे शिंदे याचे आहारीं जात आहेत, मानकरी सरदार व लक्ष्मणराव रास्ते शिंद्यांचे बाजूने आहेत, याबद्दल नानानें पेशव्यांस पूर्वीं लिहिलें होतें. ३–११–१७९२ रोजीं पुन्हा नानानें पेशव्यांस सांगितलें कीं, " स्वत:च्या कुवती प्रमाणें नानानें पेशवेगादीची सेवा केली. वृद्धापकाळामुळें काशी, गया, दगरे यात्रा करणेचा विचार आहे. १४ महिन्याची रजा व १ कोट रुपये बरोबर नेण्याची परवानगी द्यावी. " सावकारांचें महादजीस देणें. पेशव्यांजवळ पैसा नाहीं. अशा परिस्थितींत मी (नाना) काशीस गेलो तर तुम्ही (शिंदे) राज्यकारभार हाकावा व पैसा जमवावा. " नाना जर वृद्ध झाला तर महादजीस कारभार हांकतां येणें शक्य नाहीं. सैन्यास तनखा देण्यासाठीं शिंद्यास जामगांवास गेलें पाहिजे. त्याना मुक्त करून पुन्हां पुण्यास आलें पाहिजे. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १५३]

,, –मार्गशीर्ष वा। ३ इ. १७९२ डिसेंबर १२

मॅलेटनें ग.ज.स पाठविलेलें. शिंदे यांचे छावणींतील बातमीपत्र ९ नोव्हेंबर १७९२ रोजीं नानानें पेशव्यास सांगितलें कीं शिंदे परतण्याची इच्छा करतात. व लग्न करणार आहेत तर त्यांना लग्नाचें वेळीं " खिलात " द्यावो. १० नोव्हेंबर रोजीं नानानें परशुरामभाऊच्या सर्व सैन्यास पुण्यास बोलावलें, कारण दाखविलें कीं दक्षिणेंत कोणत्या व किती सैन्यानें कामगिरी केली हे पाहावयाचें. हरीपंत व भाऊ यांचें सैन्यांत हालचाल. १४ नोव्हेंबर १७९२ नाना काशीस केव्हां जाणार असें निझामचे वकिलानें विचारलें असतां नाना

(१७१४) म्हणाला कीं, हरीपंत व परशराम भाऊ यांनीं राज्यांतर्गत कारभार व महादजींनें बाहेरील कारभार बघितला तर नाना काशीस जाण्यास तयार. पण शिंदे परत फिरणार आहेत व हरिपंत प्रकृतीच्या सबबीवर घरीं आहेत, निझाम पेशव्याची भेट घेऊं इच्छितों नानाची सुद्धां तशीच निझामला भेटण्याची इच्छा. पण तह पूर्ण झाल्यावरच भेटतां यैईल. असें नानाचें गोविंद भगवंतला उत्तर. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १५७]

,, माघ वाा ८ इ. १७९३ जाने. ४ (जखर २२)

शंकरराव सचीव नानांना लिहितात बाजी मोरेश्वर यांनीं पुण्यास बालाजी जगनाथाचें मार्गें गारदी लावून त्यास व आणखी कारकून जे कामकाजास पाठवावे त्यास धरावयास जपतात. आपले उरुबुरु धराधरी करतात. तेव्हां इकडे आल्यावर काये करतील? येथें ५० व दिव्यावर ३ शें. गारदी ठेविले व तेच वडलांचें पत्र घेऊन येणार म्हणजे आमची स्थित कसी राहील? तेव्हां त्यास इकडे न येण्याची ताकीद करावी. जेजुरीचेहि गारदी उठवावे. [बेलबाग सं. अप्रकाशित]

,, –माघ वाा १४ इ. १७९३ फेब्रुवारी ९

कॅप्टन केनवे याचें ग.ज.स पत्र. नानाफडणीस व हरीपंत फडके यांचें मधील गैरसमज दूर होऊन पुन्हां त्यांचे मध्यें ऐक्य झालें. नानांचा काशीस जाण्याचा विचार तहकूब. महादजी शिंदे यानेंही आपला लवकरच परतण्याचा विचार नानास कळविला [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १६५; ऐ. ले. सं. ९ ले. ३४९२ हरीपंत आजारी म्हणून नाना काशीयात्रेस निघण्याचें रहित करतात]

शके १७१५ चैत्र शुा १३ इ. १७९३ मार्च २५
सरजॉन शोअरचे विचार–नामधारी छत्रपती–अल्पवयी पेशवा यामुळें मराठी राज्याची सर्व सूत्रें नाना फडणीसाकडून हलविली जात आहेत. इंग्रजांचा पत्रव्यवहार नाना उर्फ बाळाजी पंडीत फडणीस याजबरोबर होत आहे. नानाची वागणूक साधी न्यायी व लवचीक आहे. त्याचे भित्रे स्वभावामुळें राजकारणांत त्याचें महत्व वाढलें आहे. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र २२३ पान ३४०] दौलत. शिंदे व नाना यांत वितुष्ट. शिंद्याचा पेशव्यावर छाप पाडण्याचा प्रयत्न. हिंदुस्थानांतील चार राज्यांपैकीं मराठ्यांचें राज्य जास्त बलवान आहे.

,, –चैत्र वाा ५ इ. १७९३ एप्रील १
पामरचें कार्नवालीस यांस पत्र महादजीचें पुण्यास जाण्याचा हेतू सत्तेचा अभिलाष व पेशव्यावर आपले वर्चस्व ठेवावे असा असावा—हरीपंत फडके याचें वाढते वर्चस्व व कीर्ती यामुळें महादजी फडक्यांचा द्वेष करतो. हरीपंतास दूर केल्याशिवाय महादजीचा डाव सफल होणार नाहीं. हरीपंतास दूर करून त्याचे जागी मोरोबा फडणीस यास आणण्याच्या महादजीच्या बेतास नाना संमती देणार नाहीं. होळकर व शिंदे यांचेमध्यें सलोखा करण्याचा नानांचा प्रयत्न. पण दोघेही नानाचे हेतु-बद्दल साशंक [पू. रे. कॉ. व्हा.२ पत्र १७० पान २७६]

,, –चैत्र वाा ९ इ. १७९३ एप्रिल ५
मॅलेटचें कार्नवालीस यास पत्र–नानाची भेट घेऊन मॅलेटनें तीन राष्ट्रांत संरक्षक तहाच्या अटी व मसुदा नानास वाचून दाखवला–नानानें पसंती अगर नापसंती दाखवली नाहीं–मॅलेटनें नानाचें मत विचारले असतां नाना म्हणाला कीं या तहांत तिसरे राष्ट्राचे हितसंबंध आलेमुळें व तहाचीं कलमें गुंतागुंतीचीं असलेमुळें निझामचें मत अजमावल्या शिवाय आपले (नानाचे) मत देतां येत नाही. " कार्नवालीस लवकरच जाणार असल्यामुळें उत्तर लवकर द्यावें " अशा मॅलेटच्या मागणीस " उत्तर

(१७१५)–लवकर देण्याचा प्रयत्न होईल " असें नानाचें उत्तर. पंतसचीवांचे व त्यांचे अनुयायांचे बाबतींत नानाचें कडक धोरण–आपली बाजू बळकट करण्याकरीतां या तऱ्हेचा विचार प्रवाह असल्या-बद्दल मॅलेटचे तर्क––नानाप्रमाणें राज्यकारभार कोणासही चालवितां येणार नाहीं असें मॅलेटचें मत–मराठ्यांच्या राज्यांत व सरदारांत दुही उत्पन्न झालेबद्दल मॅलेटची खात्री [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र १७५ पान २८१]

,, –अ. वैशाख शु. ७ इ. १७९३ एप्रील १७ (सु. ११९३ रम. ५) अहल्याबाई म्हणतात, चिरंजीवाविशी–तुकोजी–इकडून दुसरा अर्थ नव्हता व नाहीं. मधे सोबती (महादजी पाटीलबावाशिंदे) याचा विग्रह वाढून, च्यार रु. उत्पन्न होऊन फौज वारावी हें न घडलें. नाना व तात्या यांजला या दौलतीची काळजी पहिल्यापासोन व जपणेंहि मनःपूर्वक, याजमुळें ममतेनें बोलणें पडतें. इकडील सर्व भर त्यांजवर, अलीबहादरास बाहेरून पत्र द्यावयास उपरोध पडेसा असल्यास आंतून खुणेची चिठी येऊन उपयोग घडे तें करणें. नानानी सोबत्यास धणीपणाचे रीतीनें बोलण्यांत आणून बंदोबस्त जाल्यास उत्तम. [चंद्र. द. उतारे ११८, १२०]

,, –अधिक वैशाख वा १ इ. १७९३ एप्रील २७
सर जॉन केनवे— कॉर्नवालीस. आम्ही चालविलेली मध्यस्थी नाना फडणीसास नको आहे हें त्यांच्या वागण्यावरून मला आढळून आलें. [पू. रे. कॉ. ४-१७]

,, अधिक वैशाख वा ६ इ. १७९३ मे १
केनवे यांचे मॅलेटला पत्र. अझीमउल उमरला कारभारांतून दूर करण्यास नानानें निझामाजवळ खटपट केली त्यामुळें उमरला शिंद्याबरोबर संबंध ठेवणें भाग पडलें असें उमरचें म्हणणें. नानानें उमर विरुद्ध कारवाई केली तर त्यास तोंड देण्यासाठीं अझीम उल उमरची तयारी, " आपल्या (नानाच्या) राजकारणास अप्रिय असलेल्या इसमास दूर करावे " असा नानांचा बेत. [पू. रे. का. व्हा. २ पत्र १८२ पान २९०.]

,, –अधिक वैशाख वा। ११ इ. १७९३ मे ६

मॅलेटचें कार्नवालीसला पत्र. नाना व हरीपंत यांची महादजीस भेट, बेबनवाचें कारणाचा उलगडा करून सलोखा करण्याकरितां दिली. निझामचें पत्रास नानानें दिलेलें उत्तर. राज्यांत अंतस्थ भांडणें नेहमींच चालतात तरी निझामला मध्यस्थीपणाबद्दल त्रास देण्याइतकें तीव्र स्वरुपाचे बेबनाव नाहींत. शिद्यांबरोबर झालेल्या भेटींत मित्रत्वाचे भावानें एकमेकानी खुलासा केला व पुढें एकसुरानें वागावयाचे आश्वासन आपआपसांत दिलें. [पू. रे. का. व्हा. २ पत्र १८५ पान २९२]

,, –ज्येष्ठ शु॥ ८ इ. १७९३ जून १७

ग.ज. कार्नवालीसचें पेशवे, नाना व हरीपंत यांस पत्र. फरेंचानी इंग्रजाविरुद्ध लढाई सुरूं केली (इंग्लंड़मध्यें). अशा संकटाचें वेळीं सर्वांची मदत इंग्रजास पाहिजे. [पू. रे. का. व्हा. २ पत्र १९० पान २९६]

,, –जेष्ठ वद्य १० इ. १७९३ जुलई ३ (जिलकाद २३)

नाना यानीं दुसरा नळ आणावयाची योजना केली. [ऐ. ले. सं. भा. ९ पान ४६५४ ले. ३५१९]

,, –आषाढ शु॥ १३ इ. १७९३ जुलै २१

पामर (फत्तेगड) कॉर्नवालीस. महादजी शिंदे, नाना फडणीस, हरीपंत फडके यांची शपथ पूर्वक देवालयांत सौरस्य झाल्याची पुण्याहून वार्ता आलेली मला समजली. पेशव्यांसी एकनिष्ठ राहण्याचें ठरविलें. [पू. रे. कॉ. १–२८३]

,, आषाढ वा॥ ८ इ. १७९३ जुलै ३०. फरान्स येथील राजास मारण्यांत आलें. नाना फडणीस यानें ह्याबद्दल काय माहीत आहे तें कळविण्यास सांगितलें आहे. [पोर्तु. वकील पत्रव्य. पिसुर्लेकर]

,, –आषाढ वा। ११ इ. १७९३ ऑगष्ट २

मीरअलम व महमदइकराम यांमधील संभाषण. बाळाजी पंडितानें तहाचा मसुदा नवीन करावयास लावला. व त्याची हरिपंडीत, महादजी शिंदे, आणि इतर यांच्यासमवेत चर्चा केली. [पू रे. कॉ. ४ ले. ११]

,, –भाद्रपद व।। १० इ. १७९३ सप्टें. २९ (बिदर)

वि. स्टुअर्ट —लॉर्ड कॉर्नवालीस महादजी शिंद्यांच्या मार्फत, अझीम उल-उमरा व नाना फडणीस यांच्यात तडजोड करण्या-साठी, बाबाराव व हरिराव हे दोघे येथून थोड्याच दिवसांत निघणार असें मीरअलमनें मला कळविलें आहे. [पूना रे. कॉ. ४-३७]

,, –आश्विन शु।। १४ इ. १७९३ आक्टो. १८

मॅलेटचें डंकन बनारस रेसिडेन्ट. नानानें भास्करपंत कुंटे यास काशीक्षेत्रीं आपल्या (नाना) साठीं मोठा वाडा बांधण्याकरितां नेमले व त्या कुंट्यांना सर्व तऱ्हेचे सहकार्य करावें असे डंकनला सूचनापत्र. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र १९५ पान ३०१]

,, –मार्ग. वा। ४ इ. १७९४ जाने. २१

नाना आले. त्या दिवशीं गुलाबी कलावंतीण आणली तीस बिदागी रु. २० [तुळशीबागवाले जमाखर्च पे. सा. पृ. २१५]

,, –माघ शु।। ६ इ. १७९४ फेब्रु. ५

मॅलेटचें कोर्ट ऑफ डायरेक्टर्स लंडन यांस– पेशवे वयांत आले पण नानाबद्दल आदर असल्यामुळें राज्याचा सर्व कारभार नानाच पहातो. पेशव्यांचें लहानपणापासून नाना सर्व कारभार पहात असलेमुळें आतां त्यांत खंड पडून नानाकडून अधिकार काढून घेण्यांत येईल असें वाटत नाहीं. पण महादजी पुण्यास आल्यापासून त्यास नानाचेबद्दल दरबारचा आदर पाहून हेवा वाटतो व नानाचें महत्व कमी करण्याचा प्रयत्न करतो. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र २०६ पान ३१२]

,, —फाल्गुन शुा २ इ. १७९४ मार्च ३

मॅलेटचे सरजॉन शोअर यांस—दौलतराव शिंदे याचे कारभारांतील दोन पक्ष—एक पक्ष भाऊ बक्षी, जिवाजी बक्षी व बापुतात्या पागनीस इत्यादी शेणव्यांचा व दुसरा आप्पा चिटणीस, कृष्णा चिटणीस व गोपाळ भाऊ इत्यादी ब्राह्मणांचा—नाना फडणीस व इतर ब्राह्मण सरदार शिंद्यांचे ब्राह्मण पक्षास उचलून धरतील. ब्राह्मण पक्ष उचलून धरणे परीणाम कारक ठरेल—ब्राह्मण पक्षाचे कारभाराखाली दौलतरावाचा पक्ष उचलून धरणें म्हणजे शिंद्याचे सर्व सैन्याचा उपयोग पेशव्याचे हितासाठीं निझाम विरुद्ध लढण्यासाठीं होईल. [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र २१७ पान ३३२]

शक १७१६ वैशाख शु. ३ इ. १७९४ मे ३

मॅलेटचे जॉन शोअर यास—शिंदे यांचा प्रधान गोपाळभाऊ याचे नाना फडणीस बरोबर संबंध उत्तम व घरोब्याचे असले मुळें शिंदे शाहींतील राजकारण नाना सल्ल्यानें चालेल व नानाचें वर्चस्व तेथें राहील [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र २३० पृ. ३५३]

,, —वैशाख शुा १३ इ.१७९४ मे १२

जे युथॉकचे जान शोअर यास शक १७१६ (वैशाख शुा ११) १९–५–१७९४ रोजीं पेशव्यानें दौलतराव शिंद्यास शिकाकट्यार वगैरे राजचिन्हें व " नायब वकील इ मुतालक " ही पदवी दिली. पेशव्याचें (अर्थात् नानाचे) इच्छे प्रमाणें शिंदे याचे राज्याची व व्यवहाराची व्यवस्था होईपर्यंत सदर वस्तू देण्याचे तहकूब केले होते. नानाफडणीस महादजीचा नामधारी फडणीस होता पण आतां दौलतराव शिंदे याची फडणीशी नानांस दिली. त्यामुळें शिंदे याचा कारभार पेशव्यांचे इच्छे प्रमाणें चालेल दौलतरावास पुण्यास ठेवण्याचा पुणें दरबारचा विचार [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र २३४]

,, –ज्येष्ठ शुा ११ इ. ९–६–१७९४

युट्रोफ कॅप्टन विल्यम कीर्क पॅट्रिक. अझीम उल्लउमरा व नाना-फडणीस यांमधील वयक्तिक द्वेष वाढत असल्यामुळे समेटाची भाषा दूर होत आहे. त्यांतच पुन्हा अझीम उल उमरा हा तंटेखोर असल्यामुळें तर समेट अधिकच दुरावत आहे. [पूनारे. कॉ. ४–७२]

,, –ज्येष्ठ वाा ९ १७९४ जून २१ (जिल्काद २२)

नानांचा हरिपंत फडके (ज्येष्ठ वाा ७ गुरवार) ह्यांजविषयीं दुःखवटा व हृदयापासूनचे बोल [इ. सं. ऐ. टि. १ पृ. २३, २४, २५]

,, –ज्येष्ठ वाा ३० इ. १७९४ जून २७

युथॉपचें जान शोअर यास–दौलतरावचे प्रधानांमधील भांडणें विकोपास गेलीं. आबा चिटणीस १०।१२ दिवसांत दरबारांत गेला नाहीं. या वेळांत नानानें आबा चिटणीसाचें बाजूनें भाग घेतला, समेट झाला. आबानें कारभाऱ्याचे काम शेणवे प्रधानाचे सल्ल्यानें करावयाचें. शिंदे यांच्या प्रधानाच्या कमकुवतपणामुळें त्याना पेशव्याचें तर्फे नानाचें वर्चस्व मान्य करावें लागलें. बाजीराव आणि मोरोबा फडणीस याना अटकेतून सोडवून आणणेचा दरबारचा विचार असल्याबद्दल [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र २३८ पान ३६३]

,, –आषाढ इ. १७९४ जुलै (सु. ११९५)

नबाबाकडील दिवाण मौनतदौला मशिरुन्मुल्क याणें नानावर मारेकरी घातले. नाना म्हणतात. ‘ आम्हास दगा फटका केला असतां श्रीमंतांची दौलत हातीं लागत्ये असा अर्थ नाहीं. शिवाय मनसब्यानें फौजा ठेऊन मनांत असेल तें करून दाखवावें तें सोडून ही चाल थोरपणास चांगली नाहीं. ’ [ऐ. ले. सं. ९ ले. ३६३९]

,, –आषाढ वा। ७ इ. १७९४ जुलै १९

मॅलेटचे सेक्रेटरी एडवर्ड हे फोर्टविल्यम यास–नानास इंग्रज सरकारतर्फे देणगी देण्याच्या विचारास कॉर्नवालीस सहमत असल्याबद्दल. सुरत अगर खंबायत याचे चौथाईचे बदल्यांत काशी जवळ एकादे गांव नानांस भेट म्हणून द्यावी अशी मॅलेटची सूचना. नानास सदर देणगी फार पसंत पडेल! [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र २४२ पान ३६५]

,, –भाद्र. शु. ३ इ. १७९४ आगष्ट २८ (सु. ११९५ सफर २)

नानांचे घरीं पार्थिव गणपती होत असे. त्याचे दर्शनांस स. माधवराव आले तेव्हां त्यांस देकार भेट सनगे रु. ६५० [स. मा. रो. १ पृ २६१]

,, –भाद्रपद वा। ७ इ. १७९४ सप्टें. १६

मॅलेटचें चेअरमन कोर्ट ऑफ डायरेक्टर्स लंडन यास–पेशव्यांचे निझाम प्रदेशांतील वसुली बाबत पेशवे व निझाम याचे मध्यें मतभेद—मीर अलम मतभेदाबद्दल वाटाघाटी करतां पुण्यास येतो. "पाठीमागील बाकी बद्दल व्यवस्था पुढील वसुली साठीं आणखी" झाली तर मराठ्याची निझाम बरोबर शत्रुत्व करण्याची इच्छा नाहीं. होळकर, भोसले (रघुजी) व परशुरामपंत पटवर्धन यास सैन्य घेऊन जमण्यास आदेश दिला. शिंदे याचे प्रधानांमध्यें बेबनाव [पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र २४५ पान ३६८]

• –कार्तिक शु। १ इ. १७९४ आक्टोबर २४

पंतसचीव, श्रीमंत व नाना आदिकरून सरकारांत नवी पलटणें तयार होत आहेत त्यांची कवाईत पाहिली व सलकांही करविल्या [ऐ. ले. सं. भा ९ पान ४७१५ पत्र ३५८२]

,, –कार्तिक शुा ११ इ. १७९४

मॅलेटचे सरजॉन शोअर यांस बुंदेल खंडांत पेशव्यांचें सैन्य असल्याची बातमी. तेथील खऱ्या वस्तुस्थितीची बातमी मॅलेटला पाहिजे. नाना " कर्मनस " नदीवर पूल बांधत आहे असें मॅलेटला कळलें. जर खरोखरच पूल बांधला जात असेल व त्या ठीकाणाचें महत्त्व असेल तर फक्त भाविक लोकाच सोईसाठीं पूल बांधला जात नसून त्या मागें कांही तरी कारस्थान असावें असा मॅलेटचा तर्क [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र २४७ पान ३७०]

,, –कार्तिक शुा १४ इ. १७९४ नोव्हेंबर ६

आज अकरा दिवस झाले नाना फडणीस यांच्या दोन बायका पैकीं एक बायको मरण पावली [पोर्तुगीज वकिलाचें पत्र. पिसुर्लेकर]

,, –माग. शु. ९ इ. १७९४ डिसें. १ (सु. ११९५ जवल ७)

स. माधवराव पेशव्यांनी दामोदर बलाळ भानू फडणीस म्ह. नानांचे दत्तक पुत्र यांस फडणिसांचा दरक चालेल म्हणून सनद दिली. सरंजाम, नेमणूक, वेतन, गांव चालतील. आणि नवीन देश सरकारांत येतील शिवाय जमा ह्याजवर शेकडा १॥~ प्रमाणें ऐवज पावेल. [इ. सं. पे. द. स. मा. पृ. १७५]

,, –मार्ग. वा १०इ. १७९४ ड़िसें. १६ (सु. ११९५ जवल २२)

रा. बाळाजीपंत नाना यांचे विचारें निश्चय होऊन लेख येईल त्याप्रमाणें इकडून घडेल, असें होळकर हिंगणे यांस कळवितात. [खं. ६ ले. ४३८]

,, –मार्गशिर्ष वा १० इ. १७९४ डिसेंबर १७

अझीम उल्-उमरा यानें परशुरामभाऊ यांस मतभेदाचे मुद्दे मिटविण्यासाठी लिहिलें आहे. निजामकडून परशुरामभाऊस

पत्र आलें आहे. त्यांत निजाम लिहितो कीं, "आम्ही (निजाम) आणि पेशवा यांमध्यें तंटा नसून खरें वैमनस्य अझीम उल्-उमरा व नाना फडणीस यांमध्यें आहे". [पूना रेसि. कॉ, ४-१४९-२०५]

„ –मार्गशीर्ष वा॥ १३ इ. १७९४ डिसें. २०

परशुरामभाऊचें निजाम अलीखानास पत्र. (मराठ्यांशी निजामचे संबंध काय स्वरूपाचे होते हे परशुरामभाऊ निजामास सांगत आहे, एदघीर (Edgher) येथें भेटीच्या वेळीं कायम स्वरूपाच्या मैत्रीचा तह नाना फडणीसांच्या सल्यानें केला.[पु. रेसि. कॉ. ४-१५१]

„ –माघ वद्य १० इ. १७९५ फेब्रु. १४

नानांनी खंडेराव दौलतराव ह्याच्या मुलीचें लग्न यथासांग पार पाडण्यास साह्य केलें. श्रीमंतहि समर्थ व नानाहि थोर. आठा वर्षाचा तंटा मोडला. जिवाजी बलाळ चिटणीसाचे नातवाचें हें लग्न.[पे. का. सा. आ. प. ले. १४०]

शक १७१६ फाल्गुन वद्य ५ इ. १७९५ मार्च ११

खर्ड्याच्या तहांतील, मराठ्यांना मिळालेल्या मुलखाच्या व पैशाच्या तपशिलांत नाना फडणीस आणि इतर राव पं. प्र. यांचे नोकर यांस सालिना २॥ ल. रु. उत्पन्नाचा प्रांत मिळाला असा उल्लेख कलम २ [पू. रे. कॉ. ४–२२१]

„ –फाल्गुन वा॥ ७ इ. १७९५ मार्च १३

(सर चार्लस मॅलेटच्या मुनशीचें, मीरअलीशी जें बोलणें झालें त्याचें वृत्त) आम्ही, आप्पा बळवंत, बहिरो पंडीत व त्याचा मुलगा, गोविंदराव पिंगळे, पेशवे व नाना फडणीस, यांच्या बैठकींत जाऊन बसलें. पुण्यांतील मुत्सद्यानी अमीर उल्उमरा यास निजामांनी घालवून द्यावे याबद्दल मुख्य आग्रह धरला. [पूना रेसि. कॉ. ४-१८२]

शक १७१७ चैत्र वा १० इ. स. १७९५ एप्रिल १४ रम २३ (रमजान २२)
नानांचें बाबुराव आपटे (सातारा) यांना खर्ड्यांचे लढाई-विषयीं विस्तृत पत्र :--श्रीमंतांची शरीरप्रकृती नाजूक ही चिंता तुमचे मनांस खरी, परंतु ईश्वरी कृपेनें खाशांचे प्रकृतीस श्रम पडावे येथपावेतों आलेच नाहीं. एक उष्ण काळ आहे तर त्याचे उपचारही होतात व दौलत आहे तेथें सोसावेंहि लागतें. परंतु अलिकडे नबाबाचे कारभारी मैनुद्दौला झाले. त्यांनीं अगदींच वाट सोडून श्रीमंतांची दौलत घ्यावी, नबाबाचे झेंडे पुण्यांत लावावे, याखेरीज राजकारणें सरकार नाशाची व दंगे मारेकरीहि पाठविले, अशी बहुतच केली. ते दस्त-ऐवजही सांपडले. नर्मदापार करावें हें भर कचेरींत बोलूं लागले. नबाबाचेंहि बुद्धिभ्रंश फार केला. तथापि आम्ही गाडद खात गेलो. पुढें जमियत भारी, पन्नास हजार फौज, पन्नास हजार गलद चांगली करून श्रीमंतांवर चालून यावयाचा इरादा केला. ईश्वरी कृपा व महाराजांचा आशीर्वाद. महाराज व मातोश्री बाईसाहेब यांस पेशव्यांचे यशाविषयीं शुभ चिंतन बहुत, श्री शंभुमहादेव सर्व घडवील असे नित्य म्हणतात. त्यांस हें सर्व त्यांचे आशीर्वादाचें फल आहे. (ऐ. पत्र व्य. ले. ३१३)

१७१७ आषाढ शुा ७ इ. १७९५ जून २३
युथॉफचे हैद्राबाद रेसीडेन्टला पत्र :--नानांची बायको (८, ९ ?) वारली--नानास एकही मूल नाहीं.
[पू. रे. कॉ. व्हॉ. २ प. २४५]

,, -१७१७ आषाढ शुा ११ इ. १७९५. जून २७
युथॉफचे हैद्राबाद रेसीडेंट यास :--पुणें दरबारची सूत्रें नानाचे हुकमतीखालीं चालतात. सवाई माधवराव जरी वयांत आला आहे आणि राज्याचा प्रमुख आहे तरी नानाचे सल्ल्यावाचून व संमती वांचून कोणतीही गोष्ट करीत नाहीं. ज्या सवलती-

मुळें सर्व मराठे सरदार पुणे दरबारचें कलानें वागतात त्या सवलतीमुळें सर्वांवर पुणें दरबारची हुकमत आहे. वाढते वैभव आणि यश यामुळ पूर्वीची कंटाळवाणी त्रासदायक व काटकसरी राजवट नानानें बदलली.

बीन लगामी महत्वाकांक्षा व परप्रांतावर आक्रमण हे मराठ्यांचें वैशिष्ट्य दिसतें. :--नानांचें उतार वय, अशक्तता आणि आजार यामुळें नाना मृत्यु पावला तर इंग्रजास हल्याची भीति कमी. कारण, सध्याचें वैभवसंपन्न व शक्तीशाली मराठा राज्य हे नानाचें स्वतःचें कतृत्व व वजन यांचें फळ आहे. इंग्रजांनी मराठ्यांचे शत्रूस मदत करून मराठे राज्य निकृष्ठावस्थेला पोहोचवले असतांनाही गेल्या १० वर्षांतील नानाची इंग्रजाबरोबरची वागणूक ीस जर श्रेय दिले तर तें न्यायी ठरेल. (पु. रे. कॉ. व्हॉ. २ पत्र २५४ पान ३७६).

१७१७ भाद्रपद शुा ५ इ. १७९५ सप्टेंबर १८ (सु. ११९६ रवल ४)

नानानीं सवाई माधवराव हे पार्थिव गणपतीचे दर्शनास गेले तेव्हां भेट. ६७०. (स. मा. रो. १ पृ. १२२)

बाजीरावचा धाकटा भाऊ चिमणाजी आप्पा यास गादीवर आणण्याची बोलवा [पुरे. कॉ. व्हा. २ पत्र २६२३]

शक १७१७ आश्वीन वद्य २ इ. १७९५ आक्टोबर २९

,, –स. माधवरावाचे मृत्यूनंतर पुणें शहरांत कडक बंदोबस्त. कंपनीचे लोकास दिवसा जाण्यायण्यासहि परवाना. मॅलेटचें पत्र (पु. रे. कॉ. व्हॉ. २ प. २६३ ३८८)

शक १७१७ आश्विन वाा १० नोव्हेंबर ६   पुना १७९५

चार्लस मॅलेटचे जॉन शोअर यांस :--सर्व उपस्थित सरदारांचे मतें बाजी चिमाजी यास वगळावे.

बहीरोपंताचें म्हणणे कीं ज्या न्यायी रीतीनें सवाई माधवरावास पेशवे पद दिलें व प्रजेचा कंपनीचा विश्वास संपादन केला त्यास अनुसरून राघोबाचें मुलाकडे पेशवेपद जावे. म्हणजे यादवी

श. १७१७ टळेल--सत्तेच्या आभिलाषानें कोणतीही वावगी गोष्ट करू नये. 'इतर मराठे सरदार आल्यावर त्यांचे विचारानें गादीबद्दल निर्णय घण्यांत येईल' असें नानाचें मत. शिंदे-होळकरांचीहि लेखी अनुमती. (ऐ. ले. सं. ९ ले. ३६५४- ५९ पु. रे. कॉ. व्हा. २ (पत्र २६६ पान ३९४)

,, माघ शुा १२ इ. १७९६ फेब्रुवारी २०.
ता. १५ रोजीं बाजीराव व त्यांचे बंधू यांनीं नाना फडणीस व शिंदे याकडे तह केला. व सकाळीं ४ वाजतां हे सगळे राजवाड्यांत आले. दुसऱ्या दिवशीं नाना फडणीस ह्यानें फारसा गाजावाजा न करितां आपलें लग्न केलें. (पोर्तु. वकील पत्र. पिसुर्लेकर)

,, माघ वाा १० इ. १७९६ मार्च ४ पोर्तु० वकील विठलराव
आपल्या ता. ८ मार्च १७९६ च्या पत्रांत लिहितो. "चालू महिन्याच्या ४ तारखेस ह्या शहराच्या एक कोसावर असलेल्या लाडकी (खडकी ?) नदीच्या तीरावर बाजीराव व चिमणाजी आपा यांचा तळ पडला. शुक्रवारीं, ता. ५ रोजीं रात्रौ दहा वाजतां नाना त्यास भेटण्यास गेला. व तेथून शनिवारीं सकाळ झाल्यावर परत फिरला. सायंकाळीं नाना त्यास परत भेटून प्रधान मंडळास व सर्व सरदारांस त्यांस भेटण्याविषयीं परवानगी मिळविली. त्याप्रमाणें ह्या भेटी रात्रीच्या सुरवातीस झाल्या. फिरंगी लोकांपैकीं
D. Manoel de Noronha Yoaquim Antonio Vogz gore Antonio Pinto
सरदार त्यांस भटण्यास गेले. चांगला दिवस नसल्या कारणानें होळकर त्यांस भटला नाहीं. तसाच मालोजी राजे (ह्याचा मुलगा वारल्यामुळें हा अंथरुणावर आहे). यांनीं त्यांची भेट भेट घेतली नाहीं. शिंदे अद्याप पोहचला नाहीं. पण तो जामगावजवळ आहे. आणखी कित्येक भेटले नाहींत. होळकराचे सरदार दरबारामध्यें ता. ६ रोजीं १० वाजतां राज-

कुमारानी प्रवेश करावा, असें नानानें ठरविलें होतें. पण तसें घडलें नाहीं. शिंदे व होळकर यांच्या भेटी न झाल्यामुळें वरील प्रवेश झाला नसावा, असें म्हणतात. [पोर्तु० वकील विठलराव वालावल्कीकर, पिसुर्लेकर]

१७१७ फाल्गुन शु. ४ इ. १७९६ मार्च १३ (रमजान ३)

परशरामभाऊ पटवर्धन, नाना व दु. बाजीराव ह्यांत निखालसता जाहली. कां, तर श्रीमंत अद्याप गैरमाहीत व दौलत, किल्ले कोट कारभारी यांचे स्वाधीन. शिंदे व लेखक (नाना) यांत बहुत विरुद्ध वाढलें आहे. जर कारभारी व श्रीमंत एक जाहले व शिंदे यांशी बदलून गोष्ट केली, तर मोठा प्रश्न व व पेंच. शिंदे :—दहा कोट पावेतों मला कर्ज, त्याचा फडशा करा मग हिंदुस्थानांत जाजती मुलूख (मी) सोडविला तो सरकारांत घ्यावा. नाहींतर जड जाईल. दुसरें म्हणणें, तुम्ही जन्मभर कारभार करावा ऐसें कां? फडणिसीचा दरक तुम्ही तेवढा करावा. सरकारचा कारभार श्रीमंत करतील किंवा तुम्हाशिवाय ज्यास आज्ञा होईल तो करील (ए. ले. सं. ९ पृ. ४८५४).

––श्रीमंत बोलले पुण्याचा क्षय व पापाचा उत्कर्ष जाला याजमुळें धान्याचें व वनस्पतीचें तेज गेलें. गंगातीरी वास किंवा नानांचा समागम असावा. आमचे दौलतीत मनुष्य आहे पैका नाहीं. नाना असल्यास सर्व गोष्टी घडतील. नबाबानी पैका जमा केला मनुष्य नाहीं. पटवर्धन वगैरे सरदार दौलतींत तेथें अशक्य काय? (ऐ. ले. सं. ९ पृ. ४८५६).

शक १७१७ फाल्गुन शुा १२ १७९६. मार्च २० पत्र २८९ पान ४१८

मॅलेटचे ग. ज. स पत्र :––दौलतराव शिंदे यांचे परत पुण्यास येण्याचे बातमीमुळें नानानें १९ मार्च १७९६ रोजीं तंबूत प्रस्थान ठेवले. आदले रात्रीं आपले कुटुंबांतील व अनुयायांच्या कुटुंबांतील बायका मंडळीस कोकणांत बंदोबस्तानें किल्ल्याकडे नानानें रवाना केले. छत्रपतींस पेशव्यास भेटवण्याची तयारी

करण्याकरितां साताऱ्यास जाण्याची सबब. पण खरोखर स्वतःचें सुरक्षिततेसाठीं कंपनीचे ताब्यांतील वेळास येथें नानास संरक्षण शिळेल कीं कसें काय? अशी नानाची मॅलेटला विचारणा. शिंदे याची समजूत पाडण्याची मॅलेटनें तयारी दाखविली म्हणून पुढें जाण्याचा बेत नानानें तहकूब केला. नानानें आपली व इष्ट मित्रांची संपत्ति ५ बोटीं भरून तयार ठेवल्या आहेत. अशी बहिरोपंताची बातमी. (पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र २८९ ऐ. ले. सं. ९ ले. ३७२३, ३१;)पोर्तु. वकीलाचें पत्र— २१ मार्चला नाना साताऱ्यास राज्याचा शिक्का आणावयास म्हणून गेले. पिसुर्लेकर (सोमवार फा. शु. १४ घ. ५।६ रात्रीं प्रयाण. मंगळवारीं दुपारीं पुरंदर ऐ. ले. सं. ९ ले. ३७२६)

१७१८–चैत्र शुा १० इ. १७९६ एप्रील १७

नानांनी कारभार करूं नये, मेणवलीस राहावें, इत्यादि कलमांची शिंद्यांनी बाजीरावाजवळून याद लिहून घेतली––मु. थेऊर (ऐ. ले. सं. ९ ले. ३७६०)

,, –चैत्र शुा ११ इ. १७९६ एप्रील १८ (सवाल ९ इंदुवासर सु. ११९६)

शिंदे दौलतराव यांनीं बाजीरावकडून 'करार' करून घेऊन नानांना सर्वस्वी हतबल करण्याचीं कलमें लिहिलीं (उक्त ३७६१, ३७५८ शिंदे :––फडनिशी सुद्धां गुमास्ता ठेवावा नानांनी स्वतः करूं नये. पत्रें तर कारभाराबद्दल लिहूंच नयेत (३७७८)

शक १७१८ चैत्र वाा १ इ. १७९६ एप्रिल २३

शिंदे याजकडील कारभारी यांचे चढावाचे बोलणें जे, नाना साताऱ्यास गेले आहेत त्याणीं आम्हावर इंग्रज, मोंगल अथवा टिपू यासी सामील करून मसलत करावी, आम्ही दोन महिन्यांची फुरसद देतो. असें झाले असतां लढाई मारून नानास धरूनच आणूं पुण्यांत मातबर साहुकारांवर श्रीमंतांनीं कर्जपटी घातली आहे. साहुकारांचे गुमास्ते लष्करांत आले आहेत. [ऐ. ले. सं. भा. ९ पा. ४९५० प. ३७७०; पू. रे. का. व्हा. २ पत्र ३१०]

शक १७१८ चैत्र वा। ८, १७९६ एप्रिल ३०

चार्लस एचमॅलेटच्या मुनशीचा रिपोर्ट :––शिंद्याचे कारभारी व मंत्री परशुरामभाऊचें सल्ल्याकडे दुर्लक्ष्य करतात. परशुराम भाऊ शिंदेबद्दल नाराज. बाजीरावास आपले बाजूस वळविण्याचा भाऊचा प्रयत्न व नानास परत बोलावण्याचा हेतू (शिंदे यांचे संमतीस अगर विरोधास न जुमानतां) रिपोर्ट. (पुरे. कॉ. व्हा. २ पत्र २९७ पान ४२८)

शके. १७१८ वैशाख शु॥ ५ इ.१७९६ मे ११

पामरचे मुनशीचां रिपोर्ट :––शिंदे, परशुरामभाऊ, नाना यांचे गुप्त कटाप्रमाणें शिंदे यानें बाजीरावास आपले छावणींत आडकवून ठेविले. परशुरामभाऊनें चिमाआप्पास जबरदस्तीतें पुण्यास रास्ते यांचे वाड्यांत नेलें. चिमा आप्पास गादीवर बसविण्याचा डाव व बाजीरावास अटकेंत ठेवण्याचा. ४ कोटी रुपये व जहागीर यांचे मोबदल्यास नाना व शिंदे यांचेमध्यें सलोखा झाला (ता. १०–५–९६) [पुरे. कॉ. व्हां. पत्र ३००]

शक १७१८ वैशाख वा। ४ इ.१७९६ मे २५

मॅलेटचें मुंबई गवर्नरला पत्र :––(१७९६) चिमा आप्पास २६ मे रोजीं पेशवाईचे गादीवर (मनसद) बसविण्याचें ठरलें. नानानें सध्याचें परिस्थितींत कोकणांत जाऊन रहावे असी दौलतरावची इच्छा––त्याप्रमाणें नाना सध्यां वांईस आहे (पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र. ३०३ पान ४३५)

शक १७१८ वैशाख वा। १४ इ.१७९६ जून ४ (जिलकाद २७ सु.११९७)

नाना यांनी टोक्यास राहण्याविषयीं शिंद्यांचा आग्रह फार आतांच बातमी आली कीं, नाना मंदवारी रात्रीस वाईहून रायगडाकडे गेले '(ऐ. ले. स. भा. ९ पा. ४९७३ प. ३७९९)

शक १७१८ ज्येष्ठ शु॥ ११ १७९६ जून १६ बाणकोट रेसि० फोर्ट व्हिक्टो० युथॉप यांस–

नाना इंग्रजाचा पत्रव्यवहार वाटेत उघडून पहातो असे फोर्ट विक्टोरीआचे रेसिडेन्टला कळले. असल्याबद्दल नाना 'घेरा'

येथें गेल्याची बातमी खोटी आहे. १३ जून १७९६ पर्यंत नाना महाड येथेंच आहे--घाटापासून महाडपयत नानानें चौक्या बसवल्या आहेत व महाडहून परवाना मिळाल्याशिवाय कोणासही प्रवास करतां येत नाहीं कोणताही पत्रव्यवहार कोणी घेऊन जात असेल तर त्यास नानाकडे आणण्याची सक्त ताकीद आहे. नाना सैन्याची व दारूगोळ्याची जमवाजमव करीत आहे. सैन्य रोज वाढतें आहे. नाना दरबारचे जवळचे घरांत रहातो. रायगड किल्ल्यावर नानाची तयारी. तोफखाना दारूगोळा, बॉम्ब्स्, अन्नधान्य व सैन्य या सर्वांचा भरपूर सांठा. (पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३१२) पान

–हबशी याणी नानास आसरा दिला. मालिट व नाना यांचा संकेत ऐ. ले. सं. ९ प. ३८१२

शक १७१८ ज्येष्ठ शुा १२ इ.१७९६ जून १७

बाळाजी गणेश जोशी याचे बाळा साहेबास पत्र :--टिपूडे संधान करावयास कारकून नानानीं पाठविला साष्टीचा किल्ला रिकामा करून लोक झाडून नानानी ठेवावे. हवा चांगली आहे तेथें नानानीं रहावे. राजश्री नानांचे व पुणेकर हुजरालपागा कार्यकारण मुत्सद्दी यांची झाडून ऐक्यता जाहली. [ऐ. ले. सं. ९ ले. ३८०८]

शक १७१८ ज्येष्ठ वाा ६ इ.१७९६ जून २६

नाना फडणीस महाडास गेल्यानंतर शिलेदार व पागा होत्या. त्या सर्वांस निरोप दिला. पंधरा दिवस लोक तेथें होते. हल्लीं नानाजवळ सरकारनिसवत कोणी एक नाहीं. खास पथकापैकीं शें दीडशे स्वार चाळीस पन्नास भले माणूस व ५०० गाडदी याप्रमाणें तेथें आहेत. रायरी खाली पाचण गांव आहे तेथें होते. किल्ल्यावर एकदोन दिवस होते. हवा बहुत सद मानत नाहीं. हल्लीं रायगडास आहेत. कोणी महाडास आहेत असे म्हणतात. साष्टी किल्ला इंग्रज रहायासी देणार. किल्ल्यांतील सरंजाम काढन मुंबईस नेत आहेत. पाचसात

घाट नानानीं माणसें लाऊन खणोन खालीं उतरावयास उपाय नाहीं याप्रमाणें केले. मोठेंमोठें वृक्ष तोडून घांट बुजवून टाकिले. मढा घाट अथवा शेवता घाट यानें खालीं जावें याप्रमाणें योजना आहे. घाट तों खटले आहेत. ते नीट करून किडूनच जावें (ऐ. ले. सं. भा. ९ पा. ४९८६ प. ३८१३)

शक १७१८ ज्येष्ठ वा। ७ इ. स. १७९६ जून २७

कारकून शिलेदार बाळाजी विश्वनाथ चाफेकर याचें पत्र नाना फडणीस यांनी इंग्रजाजवळ साष्टीचे बोलणें लाविलें तरी त्यांनीं उत्तर सहा आणेचा कागद (पेशव्यांचे दहा आणे इंग्रजांचे सहा आणे) मागें दादासाहेबांनीं लिहून दिला आहे त्याप्रमाणें तुम्ही द्यावा. तेव्हां नानानीं उत्तर केलें जे त्यांणीं कागद दिला तो कोठें प्रमाण जाहला? आम्ही कारकून लिहून देत नाहीं. तेव्हां इंग्रजांनीं दुसरें बोलणें लाविले जे दादासाहेब याणी कर्ज सत्तावन लक्ष घेऊन खत लिहून दिले आहे हा ऐवज द्यावा. तेव्हां नानांचें उत्तर जाहले जे आम्ही कारभार करूं लागलियास कर्जाचा एवज देऊं. पंधरा पलटणें इंग्रजांनीं द्यावीं. त्यास रोजमुरा नानांनी द्यावा, साष्टीं रहावयासी द्यावी. मोबदला विजयदुर्गचा किल्ला द्यावा. शिंदे यांनी गद्रे यांच्या बायकोकडेहि फितुर केला होता. नाना रायगडला जाऊन आले. इ. [ऐ. ले. सं. ९ प. ३८१४]

शक १७१८ ज्येष्ठ वा। ७ इ. स. १७९६ जून २७

कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चाफेकर याचे बाळासाहेबास पत्र. शिंदे यांचे व त्यांचे कारभारी यांचे वाकडे आले असें बोलतात. हल्लीं शिंदे यांचे त्रिवर्ग कारभारी गुलटेकडीजवळ बागेंत आले आहेत. मालीट इंग्रजांचे व शिंदे यांचे व नाना फडणीस व श्री. रा. बाजीराव साहेब हा ग्रंथ एक जाहला आहे असे बोलतात. यामध्यें शिंदे यांचे कारभारी नाहींत. पुढें कसें होईल तें पहावे. [ऐ. ले. सं. भा. ९ पा. ४९८८ प. ३८१६]

श. १७१८ आषाढ शुा ४ इ. १७९६ जुलई ८

रायगडनजीक माड(महाडास) ससैन्य नाना आहे. त्याच्यावर शिंद्यांचा एक सरदार तीन हजार सैन्य घेऊन गेला आहे. वगैरे बाळबा पिंगे (पागनीस) यानें मला येऊन सांगितलें कीं, 'मी गोवेकरास लिहावें कीं त्यानें आपले आरमार घेऊन ज्या ठिकाणीं नाना आहे तेथून तो समुद्रमार्गानें पळून जाण्याबद्दल व्यवस्था करावी व जर तो पळण्याचा प्रयत्न करील तर त्यास पकडून सरकाराच्या स्वाधीन करावें. ह्याबद्दल फिरंग्याचें बरवें करूं.' मी सांगितलें कीं, समुद्रमार्ग तूर्त बंद आहे व त्यामुळें तारवें गोव्याबाहेर जात नाहींत. त्यानें म्हटलें सप्टेंबरमध्यें व्यवस्था करूं. पेशवे सरकारास न कळतां हे त्यानें मला विचारलें आहे. [पोर्तु. वकील.–पिसुर्लेकर]

शक १७१८ श्रावण शुा १४ इ. १७९६ आगष्ट १७

बाजीरावाचा पक्ष नानानें उचलून धरला. नानांचे सैन्यानें त्याचेवर चालून येणाऱ्या दौलतरावाचे सैन्यास मार दिला. नानाचे वैभव व संपत्ति. इतर मानकरी सरदारांचा नानास पाठिंबा. बाजीरावाचे पक्षास मदत करण्याविषयीं नानानें इंग्रजास विनंती केली. नानानें टिपू व निझाम यांस सुद्धां मदतीची विनंती केली. नानाची महाड येथें शत्रुविरुद्ध जोराची तयारी चालू आहेः नाना जरी पुन्हा अधिकारावर आला तरी त्यास पूर्वीं इतके कर्तुमकर्तुम अधिकार रहाणार नाहींत व यादवी सुरूं होईल. त्यामुळें इंग्रजास धोका कमी (पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३१७ पान ४४७)

शक १७१८ भाद्रपद वाा ३० इ. १७९६ आक्टोबर १

जे. युथॉपचें गवर्नर फोर्ट सेंट जार्ज यास :—ग. ज. चें चिमणा माधवराव गादीवर बसल्याबद्दल अभिनंदनाचें पत्र युथापनें पेशव्यास दिलें. नानाचा अनुयायी बाबा फडके यास चालू राज्ययंत्रानें पकडलें. इतर अनुयायी लवकरच पकडले जातील, पळून जातील अगर चालू सरकार बरोबर स्वतंत्र वाटाघाटी करतील. (पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३२५ पान ४६१)

शक १७१८ आश्वीन शुा ६ इ. १७९६ आक्टो. ७ (सु. ११९७ रखर ५) नाना व निजाम यांत बाजीरावास अटक–मुक्त करणें वगैरेबद्दल तह (त. क. म. पृ. २२)

शक १७१८ कार्तिक शुा २ इ. १७९६ नोव्हेंबर ९ जे. यूथॉपचें ग. ज.स पत्र––नानानें निझाम बरोबर संधान बांधले असावे त्यामुळें निजामचें अझीम उल उमरला नाना व दौलतराव यांचे सल्ल्याने वागण्याचा आदेश. दौलतरावाचा अप्पा बळवंत व नारोपंत चक्रदेव यांसही नाना व स्वतःचे सल्ल्याप्रमाणें वागण्याचा आदेश. बाळोबा तात्यास अटक व परशुरामभाऊचें चिमाजी आप्पासह जुन्नरला पलायन. परशुरामभाऊनें टिपूला त्याचे युद्ध तयारीबद्दल पत्र लिहिलें नाहीं. आतां नानानें पत्र लिहावें असें अझीम उल उमरचें युथॉप ला म्हणणें. नानाचे व बाबा फडक्याचे मॅलेटला व युथॉपला गडबडीचे दिवसांत नानाबरोबर मित्रत्वाचे संबंध ठेवल्याबद्दल धन्यवाद. परशुरामभाऊ जुन्नरला शत्रुचे (नानाचें सैन्य) वेढ्यांत. पुणें–महाड डाक चालू असल्यानें नाना व पुणें येथील नानाचे पक्षाचे मंडळी यांचेमध्यें राज्यक्रांतीबद्दल विचार-विनिमय. परशुरामभाऊ बरोबर सलोख्याच्या वाटाघाटी. बाजीराव अगर चिमा आप्पा यापैकीं कोणास गादीवर बसवावयाचे याबद्दल शंका; नाना दौलतरावचे हेतू बद्दल साशंक. नानाचे मतानें जर सर्व चालले तर पेशवेपद चिमाआप्पाकडे राहील असें यूथॉपचें मत [पू.रे. कॉ. व्हा. २ पत्र ३२८ पान ४६४]

श. १७१८ कार्तीक वा ५ इ.१७९६ नोव्हेंबर १९ विठलराव गार्की याचें पत्र. नाना फडणीस आंबेगांव येथें पोहचला व पर्वतीजवळ होळकर, शिंदे व मसिर–मलुक ह्यांची भेट घेतली. रात्री चिमणाजी आपास भेटण्यास नाना गेला. चिमणाजी बांबोर्डे (भांबुर्डा) येथें होता. नानाकडे २५ हजार लोक आहेत. (पोर्तु. वकील पत्र,–पिसुर्लेकर)

शक १७१८ मार्गशीर्ष शुा ७ इ. १७९६ डिसेंबर ६

युथॉपचें ग. ज. स पत्र :—नाना फडणीस तुकोजी होळकरास भेटलो. ४=१२=१७९६ रोजीं दौलतराव नानास भेटतो. आबा शेलूकरानें सातान्याहून बाजीरावासाठीं वस्त्रें आणलीं. बाजीराव-पेशवा, चिमाआप्पा-पेशव्याचा दिवाण, नाना-चिमा-आप्पाचा नायब, अमृतराव-बक्षी व फडके-अमृतरावचा नायब, अशी व्यवस्था झाली असावी अशी बातमी. सातान्याहून (Keelat) "किलात" आली (४–१२–१७९६) मध्यरात्रीचे मुहुर्तावर बाजीरावास द्यावयाची. नानानें घरीं परत आल्यावर बाजीरावास पत्र लिहिलें. इतर सरदारांकडून अभिनंदन केव्हां स्वीकारणार त्यावेळीं नाना हजर राहणार. मॅलेट दुसरे दिवशीं येणार. मॅलेटनेंच बाजीरावास भेटावें अशी युथॉपची इच्छा. [पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३४१ पान ४८५]

१७१८ मार्गशीर्ष शुा १५ इ. १७९६ डिसेंबर १४ (जखर १४)

नाना अलिबहादर यांस लिहितात, दौलतराव शिंदे यांचें लक्ष श्रीमंतांचे पायासी व आमचे स्नेहावरच होतें. कारभारी याणी आगळीक करून बदनाम केलें. मौनुदौला व शिंदे यांची एकवाक्यता होऊन शिद्यांनी बाळोबा वगैरेंचा बंदोबस्त केला. हें समजतांच परशरामपंत आप्पासाहेबांस घेऊन शिवनेरीस गेले. सरकार फौजा पिछावर होत्या. शिंदे याणी बाजीरावास आणविलें. आप्पासाहेबहि आले. परशरामपंत वगैरेंचा बंदोबस्त जाला. आम्ही महाडाहून आलों. श्रीमंतांच्या भेटी जाल्या. आबा शेलूकर सातान्यास जाऊन पेशवाईचीं वस्त्रें आलीं. आतां तंटा पडावासें नाहीं. झांसी श्रीमंताचे काल्पीवाले खर्चास देऊन परशरामपंतांनी पत्रें पाठविलीं होती. हाली तें सर्व राहून झासीवाले यास बहालीच्या सनदा दिल्या. आतां झाशीवाल्यांच्या चिठ्या देण्याचें कारण नाहीं. शिंदे व तुम्ही परस्पर उपसर्गाचें कारण नाहीं. दौला बहादुर, भोसले, शिंदे, होळकर, हुजरात वगैरे पुण्यानजीक जमाव भारी जाला. (हो. शा. इ. सा. १ ले. ६६)

श. १७१८ पौष शुा २ इ. १७९६ डिसें. ३१ (सु. ११९७ रजब १)

नानांनी बाजीराव रघुनाथ यांस दौलतीचे बंदोबस्ताचीं कलमें ६ करार करून धन्यांनी व कारभारी यांनी वैवाट कशी करावी तें ठरविलें. राजनीतीचा आदर्श असा योग्य उपदेश. दौलतीचा दाब व बंदोबस्त चिंतिला (इ. सं. ऐ. टि. १ पृ. ४–५ ले. ४)

शक १७१८ पोष शुा ३ इ. १७९७ जाने. १

नाना व रावबाजी ह्यांमध्यें बारा कलमी करार. त्यांत नानांचा काशीस जाण्याचा बेत स्पष्ट असून नित्सुरे, गद्रे, शिरवळकर, शेलूकर, फडके चिरंजीव, गोडबोले, चक्रदेव, पिंगळे, यांचे उल्लेख आहेत. रायगड, विसापूर, वसई, अहमदाबाद, लोहगड, ह्या स्थलांचा व शिंदे, भोसले, ह्यांजविषयीं निर्देश आहे; स्वारांचा सरंजाम, जहागीर, फडणिशी, दत्तक, याजबद्दल संमती घेतली आहे.

(इ. सं. पे. द. स. मा. प. १७२–७३)

शक १७१८ पौष शुा ९ इ. १७९७ जाने. ७ रजब ८

अमृतराव व नाना यांची हिराबागेंत भेट झाली, खलबत झाले. अमृतरावानी सांगितलें "अतःपर ओढूं नये सोईस काम लावावे. दादासाहेबांचे ठायीं आम्ही आपणास म्हणतो. आपण श्रीमंतास भेटावें." नंतर ७ रजबी (काल) नाना श्रीमंताकडे गेले. बोलणीं झालीं. (ऐलसं १०–३९००)

शक १७१८ पौष वाा १० इ. १७९७ जानेवारी २२

मीर निजाम अल्लादिनची शिंदे यास भेटल्यावरचा मॅलेट यास रिपोर्ट–बाजीरावाबद्दल स्वामीभक्ती व नानाबद्दल मित्रत्व यामुळें शिंदे यानें बाजीरावास व नानास परत आणले. त्या दोघांत भट घडवून आणून एकंदर सुखाचे वातावरण निर्माण केलें. नानाचे मताप्रमाणे यापुढें लहान अगर मोठ्या कार्यामध्यें बाजीरावानें वागावें व बाजीरावाचे संरक्षणासाठीं ठेवलेलें दौलतरावाचें सैन्य दौलतरावाने काढून घ्यावें–उलट बाजीरावचें म्हणणें की, राज्यकारभार सोडून खासगी बाबतींत स्वतंत्रता असावी. उदा०

(१७१८)–हिंडावयास अगर देवधर्मासाठीं बाहेरजाणें, कपडा लत्ता देणें अगर इनाम वगैरे देणें यावर नानाची हुकमत नसावी. बाजीरावचें म्हणणें नानास अमान्य असल्यास जानवें तोडून राख फासून बाजीराव साधु होऊन निघून जाण्यास तयार. बाजीराव तापट व अननुभवी असल्यामुळें नानानें शांत राहून राज्यकारभार हाकावा. शिंदे यांचें सैन्य नानाचे हुकमती खालीच हालचाल करील. नानाविरुद्ध कोणतेहि कारस्थान होणार नाहीं. नाना शिंदे यास वडिलांचे ठिकाणीं आहे व नानाचे जीविताबद्दल हमी पत्करण्यास शिंदे तयार असें शिंदे याचें सांगणें– नानावर या सांगण्याचा कांहीं परिणाम नाहीं व त्यास विश्वास पटत नाहीं. सैन्य काढून घेण्याबद्दल बाजीरावाची परवानगी मागितली. बाजीराव नाराज. कारण, त्याचा मराठ्यावर विश्वास नाहीं. सैन्याचे जोरावर बाजीराव निर्धास्त.]

,, –पौष वा। १४ इ. १७९७ जानेवारी २६
नानांनीं कुरडूचा घाट नीट करविला (ऐलेसं १०–३९०७)

,, –माघ वा। ९ इ १७९७ फब्रुवारी २०
मॅलेटचें ग. ज. स पत्र :––नानाचे सैन्याचा मुख्य अधिकारी मि. गॉसन याचे खुनाबाबत पुण्यामध्यें व आसमंतात खळबळ. या देशाचे रिवाजाप्रमाणें मि. गॉसन आपले मोठ्या पगाराचे बाकीसाठीं नानाकडे जाऊन धरणे धरून बसला. नानाचे तंबूंतून त्यास रकम देण्यासाठीं बाहेर नेण्यांत आले व त्याचे चार सैनिकासकट तेथील जमावानें त्यास सुरे खुपसून ठार केले. मि. गॉसनचें सैन्य त्याचे खुनाबाबत सूड घेईल म्हणून नानानें मॅलेटला मदतीसाठीं ताबडतोब लिहिलें. नानानें बाकी देऊन टाकली व खुनी इसमास शिक्षा करून आपले वरील दोष धुवून टाकला [पू. रे. कॉ. २ पत्र ३५३ पान ५०५]

शक १७१९ चैत्र वा। १२ इ. १७९७ एप्रिल २३
नानांनीं कालिया मर्दनाची सुवर्णाची मूर्ति देवालयांत स्थापावी म्हणून प्रतिष्ठा केली व ती मुहूर्तावर वे. रामभट आश्रित यांस दान केली. (ऐलेसं १०–३९५८)

,, –वैशाख शुा २ इ. १७९७ एप्रिल २८

रामनवमीपासून चालू तारखेपर्यंत नानांना पेशवे बाजीराव याजकडून अनेक वेळा बोलावणी गेली परंतु 'वाड्याभोंवतीं शिंदे यांजकडील पलटणें होतीं तीं उठून जातील तरच मी वाड्यांत येईन ' असें नानांनीं उत्तर दिलें. (ऐलेसं १०–३९६१)

,, –ज्येष्ठ वा ५ इ. १७९७ जून १४

काल शिंदे नानाकडे आले होते तेथें मेजवानी होऊन मग श्रीमंतांच्या वाड्यांत आले. भोसले यांचेकडे श्रीमंतास व नानास मेजवानी. रामनवमीपासून आजपर्यंत नाना वाड्यांत गेले नव्हते आज नाना वाड्यांत गेले. (ऐलेसं १०–३९९१)

,, –ज्येष्ठ वा १४ इ. १७९७ जून २३ (पै. सु ११९८ जिल्हेज २७)

शिद्यांचें व नानांचें मिटावें येविशीं ८।१५ दिवस मध्यस्थ बाणाजी हुजरे वगैरे पडोन शिंदे नानांचे वाड्यांत भौमवारीं आले. जाबसाल मिटणेंत येऊन नानांनीं वस्त्रें व जडावाची पोहोंची शिंदे यांस दिलीं. (ऐलेसं १०–४००१)

मोरोबादादा नगरच्या किल्ल्यांत होते त्यांस आणावयास नानांनीं दादा गद्रे व बजाबा शिरोळकर यांस पुण्याहून पाठविलें. [ऐ. ले. सं. ४०४१–१०]

,, –श्रावण वा २ बुध. इ. १७९७ ऑगस्ट ९

बाजीरावाकडे शिंदे व नाना असे एकत्र झाले तेव्हां शिंदे यांनीं बाजीरावास सांगितलें, तुम्ही व नाना यांनीं एकरूप होऊन कारभार करावा. आम्ही देशास जातो. (ऐलेसं. १०–४०५१)

,, –भाद्रपद शुा १२ इ. १७९७ सप्टेंबर ३ [सु. ११९८ रवल ११]

नाना यांचे स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें. सालगुदस्ता लग्न झालें. रत्नागिरीचें ब्राह्मण कारकून सुताराची मुलगी तिगस्ता लग्न झालेली. तिला मेणवलीहून आणविलें (ऐ. ले. सं. १०।४०६५)

१७१९–भाद्रपद वा। १४ इ.१७९७ सप्टेंबर १९ (सु. ११९८ रवल २७)
बाळकृष्ण महादेव याचें बाळासाहेबास पत्र :––अमृतराव व नाना यांची गोडी झाली. बाजीरावसाहेबांचें चित्त मिळवून घेत आहेत. (ऐलेसं. १०।४०७५)

,, –आश्विन शु॥ ९ इ. १७९७ ऑक्टोबर ६
नानांचा व माझा–बाबा काळे–वांकडेपणा बहुत आहे. नानांचे चौकीतून श्रीमंतांनीं मला जबरदस्तीनें सोडविले. श्रीमंतांनीं मजवर कृपा केली. नानांची जप्तीची मनाई चिठी मिळाली (ऐ. ले. सं. १०–४०८८)

,, –मार्गशीर्ष शु॥ १४ इ.१७९७ डिसेंबर ३
महाडच्या करारांत शिंदे यांना द्यावयाचा ऐवज निम्मा जांबगांवास व नंतर निम्मा गंगापार झाल्यानंतर असा द्यावयाचा होता. परंतु शिंदे यांनीं भय, ओढ वगैरे दाखवून पुण्यासच बराचसा ऐवज घेतला. बाकी ५६ लाख रुपये राहिले. त्याकरितां शिंदे यांनीं निकड लावली. नाना म्हणाले " तुमच्या आमच्या कराराप्रमाणें ऐवज येथें द्यावयाचा नसता आजवर दिला. परंतु तुमचे कूच होत नाहीं. ऐवज मिळत नाहीं. येथून कूच करा, नंतर देऊं." शिंदे म्हणाले " आमचा ऐवज येथेंच मिळावा आम्ही लगेच कूच करतो."

,, –नाना रात्रीं वाड्यांत गेले अमृतराव यासी खलबत. त्याच्या अगोदर शिंदे वाड्यांत गेले होते. लोकांचें म्हणणें शिंदे आठ–चार दिवसांत नानांस कैदेंत बसविणार (ऐ. ले. सं. १०–४१०९)

,, –मार्गशीर्ष वा। १ इ. १७९७ डिसें. ५ (सु. ११९८ जखर १५)
भाऊसाहेब मांडवगडास असतात. त्यांस वाईकडे आणावे म्हणून आनंदराव दादास नानांनी आज्ञा केली. शिंदे व नाना यांची निखालसता होण्यासाठीं शिंदे यांचे हिंदुस्थानांत जाणें याविषयीं शिंदे यांजकडील कंपूचे सरदार, मुकीर इंग्रज, बोलण्यास आले. (ऐ. ले. सं. १०।४११६)

,, –मार्गशीर्ष वा। ४ इ. १७९७ डिसेंबर ७

जिवाजीपंत आण्णा यांस नानांनीं सिंहगडास कैदेंत घातले होते. त्यास यशवंतराव घोरपडे व गुंड या उभयतांनीं सोडविले. (ऐ. ले. सं. १०।४१११३)

,, –पौष शु।। १३ इ.१७९७ डिसें. ३१ रविवार

नानास शिंदे याजकडून मुकीर साहेब कंपूचा सरदार होता तो नानाकडे आला आणि खलबतास बोलाविलें म्हणून घेऊन गेला. नाना तेथें जातांच त्यांना कैद केले. (ऐ. ले. सं. १०।४१२६)

,, –माघ शु।। ११ इ. १७९८ जानेवारी २८

नानांना कैद करण्याविषयीं श्रीमंतांनीं शिंद्यास पैका कबूल केला होता. त्याची तरतूद झाली नाहीं. (ए. ले. सं. १०।४१४७)

शक १७२०–चैत्र वा। ७ इ. १७९८ एप्रिल ७ (सु. ११९८ सवाल १९)

नानास भृगुवारीं अर्धा रात्रीस स्थलांतरित केलें. डाकेवरून नगरचे किल्ल्यावर नेले (ऐ. ले. सं. १०।४१९४ जंत्रींत शुक्रवारीं १८ सवाल आहे.)

,, –वैशाख वा। ११ इ. १७९८ मे ११

क० पामरचे (रेसीडेन्ट) चें, सर अल्युरेड क्लार्क ॲक्टिंग ग. ज. यास. नाना व पेशवे आणि नाना व शिंदे यांचे मध्यें तडजोड करण्याचे प्रयत्न कोणाकडून झाले नाहींत. नानाचे बाजीरावचा वारसा रद्द करण्याचे प्रयत्न व पेशवे आणि दौलतराव यांचे नाना विषयींचें कलुषित मत असले मुळें तडजोडीची आशा दुरावली. शिंदे व पेशवे यांनीं वचन दिल्यास समजौत्याची आशा. कंपनीनें खात्री दिल्याशिवाय नाना तडजोडीस नाकबूल. कंपनी खात्री देऊ शकत नाहीं. नाना सारख्या न्यायी, कर्तव्यपरायण, हुषार इसमास राज्यकारभारांतून बाजूस ठेवले हें मराठ्यांचे राज्याच्या उत्कर्षास अहितकारक असें मत. [पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र ९९ पान १५४]

,,   –जेष्ठ शु॥ १० इ. १७९८ मे २५

क. पामरचे ग. ज. स पत्र :––दौलतराव शिंदे यांचें अमृतराव व बाजीराव बरोबर वितुष्ट––बाजीरावचे नाशावर आपली सुरक्षितता अवलंबून असें शिंदे यांचें मत. त्यासाठीं नाना फडणीसास मुक्त करून त्यास पूर्ण अधिकारावर ठेवून उत्तरेंत निघून जाण्याची शिंदे यांची तयारी. (पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १०३ पान १६१)

,,   –ज्येष्ठ व॥ ९ इ. १७९८ जून ८

कर्नल पामरचे ग. ज. स पत्र :––नानास सोडवून आणण्यासाठीं अहमदनगरला गेलेलें दौलतरावचें सैन्य नानास न आणतां परत आलें. (पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १०७ पान १६९)

,,   –आषाढ व॥ ३० इ. १७९८ जुलै ८

अर्ल मार्टींगटनचे कर्नल पामर यास :––आपले (कंपनीचे) हितसंबंधास पूरक अशा अटीवर जर नानाची पूर्वींचे मंत्रि-पदावर बसविण्याची संधी मिळाली तर उत्तमच. पण पेशव्यांचें मन वळविणें कठीण व अझीम उल उमर यास मत्सर वाटेल–अडचणी बाजूस सारून माझें (मार्टींगटन) असें मत आहे कीं, नाना फडणीसाचा अनुभव आणि शहाणपणा नवीन योजनास चैतन्य आणील. मात्र नानानें कबूल केलें पाहीजे. नानांस पूर्वींचे हुद्द्यावर (प्रधान) बसवावें अशी सूचना. एक नेटिव रेजिमेन्ट पामरचे दिमतीस–(पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १२७ पान २०३)

,,   –अधिक श्रावण शु॥ ११ इ. १७९८ जुलै २३

क. पामरचें ग. ज. स पत्र :––नाना व शिंदे यांच्या तीन मसलती झाल्या पण निष्पन्न कांहीं नाहीं·बाजीरावास गादीवरून काढण्यास नानाचा विरोध व शिंद्यांस पैसे देण्यापूर्वी नानास मोकळें सोडून आपले घरीं जाऊ देण्यास शिंदे यानें तयार व्हावें अशी अट–– शिंदे यांचें अझून उत्तर नाहीं––नानाच्या वागण्यांत प्रामाणिक-पणा असेल तर शिंदे, पेशवे व नाना यांमध्यें समझौता होण्यास

अडचण नाहीं. बाजीरावाचा राज्यावरील हक्क बाजूस सारून आपल्यातर्फे बाहुलें उभें करून नानानें राज्य हांकलें हा आरोप दूर करण्यास नानाची प्रामाणिक इच्छा. शिंदे याचे वर्चस्वामुळें असणारी भिती हें दुसरें कारण--जरी नाना व पेशवे यांचें ऐक्य झालें तरी दौलतरावाच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री नाहीं. बाजीराव हा शिंदे व नाना यांचे ऐक्याबद्दल विशेष आतूर नाहीं--नानाचे पैसे व संपत्ति निरनिराळ्या सावकारांकडे ठेवली असेल म्हणून सावकारांचीं घरें लुटण्यास बाजीरावाची आज्ञा--माधवराव पेशव्यांची बायको हिला बाजीराव अज्ञात स्थळीं पाठवतो. कारण तिला दत्तक घेतां येऊं नये-पामरच्या उपदेशाबद्दल नानानें त्याचे आभार मानलें व सवड सापडल्यावर त्याची भेट घेण्याची इच्छा दाखविली; पण नानावर विश्वास किती ठेवणेचा हा प्रश्न आहे असें पामरचें मत [पु. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १२३ पान १९२]

, -अ. श्रावण शु॥ १४ इ. १७९८ जुलै २६

क. पामरचे ग. ज. स पत्र :--नाना फडणीसानें दोन दिवसांपूर्वी शिंदे व पेशवे यांचे पुढें एकीसाठीं एक मसुदा टाकला-सर्वांस मान्य-मसुद्यांत नानाने आपलेकडे कोणतेही अधिकार अगर रकम घेतली नाहीं--फक्त स्वतंत्रतेची हमी मागितली व वाटेल तेव्हां सेवानिवृत्त होण्याची परवानगी मागीतली. (पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १२३ पान १९४)

,, -अ. श्रावण व॥ ५ इ. १७९८ ऑगस्ट २

घाटगे, गाढवे, यादो भास्कर व त्यांचे बंधू असे चौघेजण कैद केले. जानसाहेब व मुकीर या कंपूवाल्यांकडून शिंदेही कैदेदाखल आहेत. कंपूचे व इंग्रजाकडील वकील पामरसाहेब यांचें चित्त एक आहे. नानांचें साहच करणेविषयीं मुख्य इंग्रजांचें संमत आहे. म्हणून कंपूवाले व पामरसाहेब, यांचें चित्त आहे. दुसरा भाव-इंग्रजांनीं आपला मतलब साधावा हा अंतर्यामीचा हेतु. शिंदे नानासुद्धां कैददाखल आहेत. (ऐ. ले. सं. १०-४३४१)

,, –श्रावण शु॥ ११ इ. १७९८ ऑगस्ट २२

कर्नल पामरचे नामदार हेन्री डन्डास, मुंबई यास :––सध्याचे परिस्थितींतील मराठ्यांची विस्कटलेली घडी, अव्यवस्थित राज्यकारभार, दुर्बल व चंचल पेशवा, निर्बुद्ध व कारस्थानी व्यक्तींचा पेशव्यांवर पगडा इत्यादि कारणांमुळें नानांस मत्रिमंडळांतून वगळून जरी बाजीरावनें ग. ज. चा. सल्ला मानला असतां (टिपूविरुद्ध लष्करी मदत) तरी बाजीराव अयशस्वी झाला असतां.–मराठा राज्याची सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठीं व मुलूख परत मिळविण्यासाठीं नाना फडणीसासारखा कर्तुत्ववान, अनुभवी व वजनदार अशा मुत्सद्याची जरूरी आहे. असें पामरचें मत.––सलोख्याचें बाबतींत बाजीरावानें घेतलेली पहिली चाल व नानानें सुद्धां त्या बाबतींत केलेली विनंती. नानाचा प्रतिस्पर्धी अमृतनें सुद्धां आपण होऊन मध्यस्थी करणे बाबत पामरला विनंती केली. दौलतरावचे उत्तरेंत जाण्याबद्दलचें कार्यांत, पैशाची अडचण सैन्याची थकलेली बाकी दिल्याशिवाय हालतां येत नाहीं–– नानानें आर्थिक मदत दिली तरच शक्यता. नानाची रकम देण्यास कबुली [पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १३३ पान २१५.]

१७२०–श्रावण बा॥ २ इ. १७९८ ऑगस्ट २८

कर्नल पामरचें ग. ज. स पत्र. बाजीरावानें अमृतरावास नानाचे बरोबर सलोखा करण्यास माझे (पामर) मध्यस्थीनें परवानगी दिली. मी (पामर) या बाबतीत पेशव्यांचे संमतीची वाट पहात आहे. गोविंद कृष्ण काळे (मंत्री) यानें आजपर्यंत बाजीरावचें मत नानाविरुद्ध कलुषित केलें होतें. "नाना मंत्रिपदावर येणें धोकेबाज आहे व तो आपले (पेशव्याचे) वडीलांचा (राघोबाचा) शत्रु आहे" असे गोविंद कृष्ण काळेनें सांगतांच बाजीरावाने त्याची पुष्कळ निर्भत्सना केली. गेल्या ९ महिन्यांत राज्यांत बेदिली माजली पेशव्याचा वचक, दरारा नाहींसा झाला, कर वसुली बंद पडली

वगैरे. जरी मंत्रीपदावर आलेवर नानानी मला कैदेंत टाकले तरी हरकत नाहीं; पण नानाची पुन्हां नेमणूक करणार, अशी बाजीरावाची गोविंद कृष्णाला धमकी. बाजीरावानें गोविंदकृष्णाचे सल्ल्याशिवाय नानांस दोन पत्रें लिहिलीं. नाना फडणीसानें मला स्वयंस्फूर्तीनें आश्वासन दिलें कीं, मंत्री पदावर आल्यावर कंपनी व मराठे यांचे मधील संबंध पूर्ण सहकार्यानें चालतील असा प्रयत्न करूं." (प. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १३५ पान २२१)

,, –भाद्रपद वा १० इ. १७९८ आक्टोबर ५

बाया फौजासुद्धां मलटण म्हणोन गांव पुण्यापासून सहासात कोसांवर आहे तेथें गेल्या. शिन्दे तेथें बायांचे भेटीस जाणार श्री. रा. नानाही शिंदे बरोबर जाणार; तेथें शिंद्यांस व नानांस कैद करावे असा संकेत योजून शहराजवळून फौजेचा गवगवा (बायानी) दूर काढिला.' (ऐ. ले. सं. ११ ले. ४५२६)

,, –भाद्रपद वा ११ इ. १७९८ आक्टोबर ६

पामरचें ग. ज. स. पत्र :––लक्ष्मीबाई व दौलतराव यांचे मध्यें सलोखा घडवून आणण्याकरितां नानास मध्यस्थ म्हणन पसंत करतात––नानानें शिंद्यांचे छावणींत भेटण्यास यावें अशी शिंद्यांचे दिवाणांची खटपट. त्या वेळेस रायजी पटेल, बाबु आंग्रे यांनीं फिल्फोजच्या संगनमताने नानास पुन्हा: अटक करण्याचा डाव घातला असावा अशी नानास बातमी. नानाचा भेटीस नकार––नानाचे अनुयायी रामजी पटेल, कृष्णा चिटणीस व बनाजी हुजरा यास कारभारांतून बाजूस सारून सर्जेराव घाटगे व फक्रोजी गाढवे यास नेमण्यास दौलतरावचा पूर्ण नकार. आपल्या (नाना) जिवास शिंद्याकडून अपाय होणार नाहीं असें नानास वाटतें-नानाची जरी वरीलप्रमाणें धोक्याची कल्पना असली तरी नानास मध्यस्थीचें कार्य दूर करतां येत नाहीं. शिंद्याचे आपआपसांतील कलह मिटल्याशिवाय शिंदे उत्तर हिंदुस्थानांत जात नाहीं––म्हणजे दक्षिणेंत मराठ्यांचे राज्यां-

(१७२०)–तील गोंधळ नाहींसा होत नाहीं. पुण्यांत येऊन राहण्याबद्दल बाजीरावचा नानास आग्रह व त्याचप्रमाणें प्रधानपदाचा कारभार हातीं घेण्याबद्दल नानास बाजीरावाकडून संरक्षणाची हमी मिळत नसलेमुळें प्रथम शिंद्याचे मधील मध्यस्थी करावयाची अशी नानाची बतावणी. अमृतराव चे रायजी पटेल याचे बरोबर संगनमत असलेमुळें आपलें जीवित (नानाचे) सुरक्षित नाहीं अशा बातमीमुळें नाना दौलतरावचे संरक्षणाखालीं राहूं इच्छितो. [पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १४४ पान २४१]

,, –आश्विन शुा ११ इ. १७९८ ऑक्टोबर २० (जवल १०)
परशुराम रामचंद्र यांचें नानास पत्र :–– आपला आमचा स्नेह पूर्वीं चालत होता. परंतु मध्यें विपर्यास कांहीं कारणामुळें आला. तो आम्ही सोडला. पूर्वीं ज्याप्रमाणें आपला स्नेह होता त्याप्रमाणेंच पुढें आपण चालवूं. यांत अंतर होणार नाहीं. येविशी श्रीगणपतीच्या दूर्वा दिल्या आहेत. (ऐ. ले. सं. १०।४४१५)

,, –आश्विन वाा १० इ. १७९८ नोव्हेंबर ३
क. पामरचें ग. ज. स पत्र :–– चार दिवसापासून नाना तापानें आजारी असल्यामुळें पेशव्यास भेटू शकला नाहीं. त्यामुळें ग. ज. चे पत्राचे बाबतींत पुढील प्रगतीबद्दलही कांहीं न कळलें. (पु. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १५३ पान २५५)

,, –आश्विन वाा १३ इ.१७९८ नोव्हेंबर ६
पामरचे ग. ज. स पत्र :––एजन्ट मिर फरकुद्दिन बरोबर नानाची भेट (ता. ५–२०–१७९८) ग. ज. चे लष्करी मदतीबाबतींत मराठ्यांचे एक सरदार म्हणून शिंदे यांचे बरोबर विचारविनिमय करणें श्रेयस्कर, पण मदतीचा हेतू कळवितां कामा नये. त्याच प्रमाणें फरेंचांना हाकलून देण्याबाबत झालेल्या मसलतीबाबतही शिंदे यांस कळवितां कामा नये. कारण शिंदे याचे पदरीं फरेंच आहेत, असें नानाचें म्हणणें. निझाम व कंपनी मध्यें झालेल्या

तहाबाबत नानाचे काय विचार आहेत असें विचारलें असतां सावधगिरीचें उत्तर; तहाचीं कलमें पाहिल्याशिवाय मत देतां येत नाहीं. नानाचे ह्या उत्तरामुळें पामर साशंक [पु. रे. व्हा. ६ पान १५४ पान २५६]

,, —कार्तीक शुा ३ ता. १० नोव्हेंबर १७९८

पामरचें ग. ज. स पत्र :—नाना आपलें महत्व उतावळेपणानें वाढवूं इच्छित नाहीं व प्रयत्न करीत नाहीं—गोविंद काळेस हाकलण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्याचप्रमाणें विरोधी पक्षांतील लोकांबरोबर धोरणानें वागत आहे व पैशाची (खर्चाची) ही काटकसर चालूं आहे. अशा रीतीनें लायक विश्वासू माणसें गोळा करून राज्यास मजबूत पायावर उभें लवकरच करतां येईल असें पामरचें मत. (पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १५५ पान २५८]

,, —कार्तिक शुा ७ बुधवार इ.१७९८ नोव्हेंबर १५(सु.११९८ जखर ५)

पंतप्रधान व नाना सत्वरच एकरूप होतील. (कार्तीक शु. ७) बुधवारीं अकरा घटका आवशीचे रात्रीस गुप्तरूपें पंत प्रधान लेखकाकडे (नाना) आले होते. निखालसता झाली, किंतु किमपि राहिला नाहीं असें दिसतें. (ऐ. ले. सं. १०।४४३०)

,, —मार्गशीर्ष वाा ४ इ. १७९८ डिसेंबर २६

मोरोबा दादांचा पुत्र पुण्यांत होता त्याची व नानांची भेट बहुत वर्षे झाली नाहीं. नारोपंत चक्रदेव मध्यें पडून दादांचे वाड्यांतून दादांचे पुत्रास समारंभें नानांचे वाड्यांत मार्ग. वद्य २ सोमवारीं आणलें. त्याची व नानांची भेट झाली. नानांनीं त्यास जवाहीर कंठी, चौकडा, शिरपेच तुरा व वस्त्रें दिलीं. मोरोबादादा व नाना यांचा सलोखा सरकारांतून करून देणार. (ऐ. ले. सं. १०।४४५०)

शक १७२० मार्गशीर्ष वाा ६ इ.१७९८ डिसेंबर २८

पामरचे ग. ज. स. पत्र :––नानाचें विश्वासांतील आबा चिटणीस यास शिंद्यानें प्रधान केले. म्हणून शिंद्यांच्या ११ लाख रुपये घेऊन उत्तरेस जाण्याचे हेतूबद्दल खात्री वाटते असा तर्क. (पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १७४ पान २९२)

,, –पौष शुाा ५ इ.१७९९ जानेवारी ११

नाना अजारी असल्यामुळें ८–१–१७९९ रोजीं ठरलेली भेट दुसरे दिवशीं झाली.

रास्ते आपली फौज पुण्यास आणतील. रघुजी भोसले ५००० घोडेस्वारासकट मदत करतील.–परशुरामभाऊ कोल्हापूरकरावर चालून गेला असला तरी तो टिपूच्या सरहद्दीवर असल्यामुळें त्याची फौज टिपूवर स्वारीचे वेळेस उपयोगी पडेल असे नानांचें सांगणें. शिंदे त्यांचे भानगडींत. शिंदे अजून ठरावास मानतो आहे. असें नानाचें मत. आबा चिटणीस (नानाचा विश्वासाई मनुष्य) यांचे वर शिंदे यांचा विश्वास––नाना राजकारणांतून निवृत्त होऊं इच्छितो पण बाजीरावाचें आग्रहामुळें नानास राहणें भाग पडतें. नाना व आबा चिटणीस या जोडीच्या कारभारामुळें इंग्रज मराठे संबंध चांगले होतील असा पामरचा तर्क. पेशव्यानें टिपूच्या बरोबर संगनमत करूं नये म्हणून वकिलाची पेशव्याबरोबरची भेट नानानें लांबवली होती. पण कंपनी (पामर) चे इच्छेप्रमाणें ती लवकर घेतली जाईल म्हणजे टिपूचे वकील जाऊं शकतील. टिपूचें दोन पत्रें पाठविण्यामागें कारस्थान :––हिंदीमध्यें पत्रांत सर्वसाधारण मजकूर व पर्शीअन पत्रांत टिपूच्या कारवाईचा मजकूर निघाला असें नानानें पामरला कळविलें. रेसीडेन्टच्या नोकरांस नानाचे हुकुमावरून पुण्यातील घरांतून घालवून दिलें. त्याबद्दल पामरचा मुनशी नानास विचारतो.

(१७२०)–नाना सर्व नाकबूल करतो व गोपाळराव मुनशीस जाब विचारतो व आपलें(नानाचें) नांव वापरल्याबद्दल गोपाळरावास दोष देतो. (पू. रे. कॉ. व्हा. ६ पत्र १८३)

,, –पौष शुा ६ इ. १७९९ जानेवारी १२ (सु. ११९९ साबान ५) नानांचे शरीरीं शीतज्वराची पीडा झाली. औषध व दैवी उपाय करीत होते. [ऐ. ले. सं. ११ ले. ने. ४६२९.]

,, –पौष शुा ९ इ. १७९९ जानेवारी १५ (पै सु ११९९ साबान ८) नानास एकांत्र ज्वर फिरून आला. औषध उपाय चालूं आहेत. [ऐ. ले. सं. ११ ले. ४६३४)

,, –पौष शुा १० इ. १७९९ जानेवारी १६ गेल्या महिन्यांत ता. १६ तारखेस गोंविंदराव काळे व शिवरामपंत ह्या दोघांसही नाना फडणीसाच्या प्रेरणेनें पेशव्यांकडून कैद करण्यांत आलें. (कारण, हे नाना व चक्रदेवांना शिंद्यांकडून त्यांस ४० ल. रु. देऊन कैद करणार होते.) (पोर्तु. वकीलांचें पत्र.–पिसुर्लेकर)

,, –पौष वा १२ इ.१७९९ फेब्रुवारी १ ग. ज. स पामरचें पत्र :––नाना अजारी असल्यामुळें पामरबरोबर वाटाघाटी साठीं दिवस ठरवूं शकला नाहीं याबद्दल नानाची दिलगिरी––नाना व टिपूचे वकील यांचे मध्यें झालेल्या मुलाखतीचा निर्णय म्हणजे टिपूचे वकिलानें इंग्रजानी केलेले सर्व आरोप नाकबूल केले अशी बातमी. मुंबईहून इंग्रजी सैन्य पेशव्यांचें मदतीकरितां ७।८ दिवसांत निघेल ही बातमी ती पामरनें मुनशीमार्फत नानांस कळविली व बाजीरावाचें ताबडतोब उत्तर मागितलें. बाजीरावचे चंचलस्वभावामुळें आपणाला (नानास) कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. पूर्वी अधिकार होता आतां अधिकार नाहीं. तरी "ट्रीपल अलायन्स"ला अनुकूल अशी परिस्थिति आणण्यास खटपट करण्याची नानांची

(१७२०)–इच्छा असलेबद्दल. नाना भयंकर अजारी आहे तापा-बरोबर छातींतून (फुफुसे) रक्त पडतें व फार अशक्त झालेमुळें आधाराशिवाय बसतां येत नाहीं. उतारवयामध्यें असा आजार व त्यावर खात्रीचा उपचाराचा अभाव यामुळें नानाचे जीवास धोका आहे असें पामरला वाटतें. त्याचे मरणामुळें पेशवे व शिंदे यांचे मध्यें उत्पन्न झालेला सलोखा नाहींसा होईल. आदरणीय वर्तनामुळें उत्पन्न झालेला विश्वास नाहींसा होईल, व राज्यांत अंदाधुंदी माजेल असें पामरचें मत. [पु. रे. कॉ. व्हा. ६ पत्र २०२ पान ३३४]

,, –माघ वा। ७ इ. १७९९ फेब्रुवारी २६
पामरचें ग. ज. स पत्र :––टिपूचे वकील २८ फेब्रुवारी १७९९ स जातील असें नानाचें आश्वासन. विलंबाचें कारण पूर्वीप्रमाणें नानास पूर्ण अधिकार नाहींत याबद्दल नानानें पामरला सांगितलें. परशुरामभाऊ कडून अजून बातमी कळली नाहीं तरी दोस्ताचें हितासाठीं शक्य ती तजवीज करण्याची हमी नानानें घेतली. नानास पकडण्याचा शिंदे यांचे ख्रिश्चन सरदार व आंग्रे याचा कट कळल्याबद्दल बातमी, पण शिंद्यानें नकार दिला––पैसे उकळण्याचे साधन म्हणून नानाचे जीवितास धोका. न्याय व पेशव्यांचा कमकुवतपणा–नानाचे संपूर्ण अधिकारावर सैन्याचा दाब, सैन्यास हाकलून देणें सैन्याचे मालकास अशक्य व या सर्वांवर कांहीं अपमतलबी लोकांचें वर्चस्व, यामुळें पेशव्यांचें बेत सिद्धीस कसे काय जातील याबद्दल पामरला शंका––तरी नानानें सर्व कार्यक्रम सुरळीत होतील असें आश्वासन दिलें. [पु. रे. कॉ. व्हा. ६ पत्र २०९ पान ३४८]

,, –फाल्गुन वा। ९ इ.१७९९ मार्च २९
क. पामाचे ग. ज. स पत्र :––परशुरामभाऊनें सैन्याचा अधिकार घेण्यास नकार दिल्यामुळें धोंडोपंत गोखले यांस सैन्याधिकार

दिला व त्यांस सैन्य तयार करून कंपनीच्या सैन्यास मिळण्यास व टिपूवर हल्ला करण्यास सांगितलें. ही संधि साधून नानानें सांगितलें कीं कंपनी व मराठे यांचे मधील संबंध सलोख्याचे राहावेत व उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावेत म्हणून आपण (नाना) अंतःकरणपूर्वक प्रयत्न करीत आहोत व दोघांमधील संरक्षक तह (डिफेन्सि अॅग्रिमेंट) पूर्णपणें पाळण्याची शिकस्त करण्यांत पुढाकार घेत आहोंत; पण त्यांचा यशस्वीपणा राज्याचे सद्यः-स्थिती व आपले (नानाचे) मर्यादित अधिकार यावर अवलंबून आहे." (पु. रे. कॉ. व्हॉ. ६ पत्र २२५ पान ३७६).

शक १७२० फाल्गुन वा। १२ १७९९ एप्रिल १

पामरचें ग. ज. स. पत्र :--नानाशी संगनमत करून, त्यास पूर्ण अधिकार देऊ करून व जरूर पडल्यास बाजीरावास बाजूस सारून आपले आर्थिक प्रश्न सोडविण्याचा शिद्यांचा विचार. नानांना कबूल असेल तर त्यास अटक करून आपला कार्यभाग दंडेलीनें उरकावयाचा व दोन्ही प्रयत्न फसले तर सावकार व पुणें शहर लुटावयाचे. अशा परिस्थितींत नानाचा बाजीरावास सल्ला कीं, आपण आपले शिंद्याचे बाबतींतील ठरावास मुरड घालून माघार द्यावी. यामध्यें नानाचा अधिकाराची महत्त्वाकांक्षा आहे असें पामरचें मत. ३१ मार्च १७९९ रोजीं झालेल्या बैठकींत बाजीरावानें—नानास सांगितलें कीं यापुढें आपण(बाजीराव)नाना-चें सद्हेतूवर पूर्ण अवलंबून राहूं व त्याचे(नानाचें)सल्ल्याप्रमाणें सर्व व्यवहारांत वागूं--पेशव्यांशीं स्वामीनिष्ठ राहून मराठी राज्याची परिस्थिति सुधारावयाची येवढी च आपली (नानाची) अधिकार-ग्रहणाचे वेळीं इच्छा होती. पण तसें झालें नाहीं म्हणून नानाचा राज्यकारभारांतून निवृत्त होण्याचा विचार. अशा परिस्थितींत एकटयास सोडूं नये म्हणून बाजीरावाची नानास विनंती. नानानें मान्यता दिली (पु. रे. व्हा. ६ पत्र २२७)

शक १७२१ चैत्र वा। ३ इ.१७९९ एप्रिल २२

ग. ज. स पामरचें पत्र :––नाना फडणीस पेशव्यांतर्फे दोस्तास टीपूबरोबर लढण्यासाठीं पाठवण्याकरतां लागणाऱ्या सैन्याचा खर्च स्वतःचे खिशांतून करण्यास तयार आहे व त्याप्रमाणें बाजीरावचें मन वळवीत असल्याबद्दल शेषाद्री पंडित पामरला सांगतो. [पु. ना. रे. कॉ. व्हा. ६ पत्र २३८ पान ४०१]

,,　–चैत्र वा। १० इ.१७९९ एप्रिल २९

पामरचे ग. ज. स पत्र :––नाना स्वतःचें आधिपत्याखालीं सैन्य घेऊन निघण्यास तयार. फक्त करार पाळण्याचे हेतूनें. (संरक्षक करार) बाजीरावकडून संमती मिळविण्याची खटपट. [पु. रे. कॉ. व्हॉ. ६ पत्र २४० पान ४०६]

,,　–चैत्र वा। १०　इ. १७९९ एप्रिल २९ (सु. ११९९ जिल्काद २३) इंदुवार. नबाबाचे फौजेत् अधिकार नानांचा आहे. वडिलास दोन पलटणें सामील. हीं नानांचे विचारें आलीं असेंही लोकांचें म्हणणें आहे. (ऐ. ले. सं. ११।४९१३ ले.)

–वैशाख शु॥ ५ इ.१७९९ मे १०

ग. ज. स पामरचें पत्र :––स्वतःचे आधिपत्याखालीं सैन्य उभारून दोस्तास मदत करावयाची अशी बाजीरावची भूमिका. आर्थिक अडचणीमुळें सैन्य उभारणें बाजीरावास अशक्य. नाना फडणीसांचे व्यक्तिगत वजन व पत उपयोगी आणल्या-

(१७२१)–शिवाय सैन्य भरती व आर्थिक मदत होणें अशक्य–नानांचे विरुद्ध कागाळी करून व त्याचेवर सर्व दोष ढकलून आपला (बाजीराव) इंग्रजाबद्दल सद्हेतू व कराराबद्दल एकनिष्ठता दाखविण्याचा प्रयत्न. शिंद्याबरोबर संगनमत करून नानाचा विश्वासघात करणें व त्यास शिंद्याचे स्वाधीन करणे हा बाजीरावाचा हेतू (पु. ना. रे. कॉ. व्हॉ. ६. पत्र २४५ पान ४१३)

,, –वैशाख वा। ३ इ.१७९९ मे २२

कर्नल पामरचे बनारसचा रेसिडेन्ट यांस पत्र :––४।५ वर्षांपूर्वी "कर्मनस" (Kasnonas) नदीवर पूल बांधणे व काशीस इमारती बांधणे बद्दल नानास मिळालेल्या परवानगीनुसार अर्धवट राहिलेलें काम पुरें करण्यास नानातर्फे त्रिंबकराव नारायण परचुरे यास मदत व संरक्षण (पु. रे. कॉ. व्हा. ६ पत्र २५५ पान ४२५)

,, –ज्येष्ठ शु॥ ४ इ.१७९९ जून ७

पामरचें ग. ज. स पत्र :––इंग्रजाबरोबर झालेले करार (ट्रीपल अलायन्स) पाळून आपलें (बाजीराव) राज्यांतील वर्चस्व टिकवावें असें नानानें बाजीरावास पुष्कळ वेळां सांगितलें. अजूनही चालू परीस्थितीकडे बघून केलेल्या चुका सुधाराव्यात व पुन्हा ग. ज. च्या पूर्वीच्या सूचनप्रमाणे नवीन करार करावा (तैनाती फौजेबाबत). म्हणजे तिघांचें हित होईल. (इंग्रज पेशवे व निझाम) असें नानांचें म्हणणें. (पु. रे. कॉ. व्हॉ. ६ पत्र २६२ पान ४३६.)

,,

शक १७२१ ज्येष्ठ शु॥ १३ इ. १७९९ जून १५ (सु. १२०० मोहरम १०)

बाळोबा पागनीस व नाना यांची चित्तशुद्धी झाली, स्नेह झाला. आबा चिटणीस व पागनीस यांची निखालसत्ता झाली. नानांच्या विचारें सर्वांनीं चालावें असा तह ठरला. बाजीराव, चिमाजी आप्पा व अमृतराव यांचाहि त्यास रुकार पडला. नानांच्या चित्तांत कैलासवासी नानासाहेब यांचा वंश बुडवावयाचा नाहीं. अमृतराव यांचा पुत्र दत्तक करावा असा बेत आहे. (ऐ. ल. सं. ११ ले ४९९२.) पोर्तुगीज वकिलांचें पत्र त्यांत बाळोबा पागनीस यास पिंगे म्हटलें आहे.–पिसुर्लेकर.)

,, श्रावण शु॥ १३ इ.१७९९ ऑगस्ट १३

पामरचें ग. ज. स पत्र :––सबसिडिअरी तहाबाबत नानाचे विचार व वाटघाट. (१) टिपूच्या जिंकलेल्या मुलखांतील हिस्सा वाढवून पाहिजे.

(२) फरेंचांचे हकालपट्टीबद्दल तोंडी उल्लेख––इंग्रजांचे शत्रु राष्ट्रांतील परकी यास काढून टाकण्यास नाना सहमत.
(३) सुरतेवरील चौथाईचे हक्क सोडण्यास नाकबुली. वरील कलमाविषयी नानानें आपले विचार कळविले व ते बाजीरावाचे संमतीशिवाय शेवटचे समजूं नये असें सांगितलें.
[पु. ना. रे. कॉ. व्हॉ. ६ पत्र २९० पान ४८३.]

" –आश्वीन वद्य ३ इ. १७९९ ऑक्टोबर १६ (सु. १२०० जवल १६)
(पनवेल) बाळकृष्ण सदाशिव खरे यांचेकरवी मुंबईकर मिसार मिंगेल साहुकाराकडून 'लेची' झाडाचीं कलमें, लावण्याच्या क्रियेसह नाना आणवितात. (इ. सं. ऐ. टि. १ ले १०)

" –माघ वा। १३ इ.१८०० फेब्रुवारी १२
पामरचें ग. ज. स पत्र :––"यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देण्याचा प्रयत्न करणार नाहीं" असे बाजीरावास नानाकडून बदवून पाहीजे होतें.. नाना उत्तर देण्यास टाळतो. (पु. रे. कॉ. व्हॉ. ६ पत्र ३२७ पान ५३४)

शक १७२१ फाल्गुन वा। ३ गुरुवार अडीच प्रहर रात्री इ. १८०० मार्च १३
नानांचा पुणें येथें त्यांचे वाड्यांत स्वर्गवास. १० सहस्त्र लोक व सर्व मुत्सद्दी जमा झाले होते. (इ. स. पे. द. स. मा. पृ. १८४ ह्याच पानावर फा. व. ४ भृगुवार पहाटे प्रहररात्र असाउल्लेख आला आहे. तो चूक आहे.) (ऐ. ले. सं. १२ ले. ५३३६,) पु. द. ले. ११. आंबेगांवकर गंगाधरपंत भानू यांचे बंधु प्रभाकरपंत यांनीं उत्तर कार्य केलें. गंगाधरपंतांचाच पुत्र दत्तक घेण्याचा विचार. (नानांविषयीं तत्कालीन दुःखोद्‌गार–)
नाना सर्वांचें छत्र, आतां बाळोबाला त्यांचा तेजोभंग होईल. मराठी राज्याचें शहाणपण, समतोलपणा नाना बरोबर लयास गेला. (कर्नल पामर) राज्यांतला दाब व नैट गेला (बाळोबा तात्या) सावध पुरुष, मोहरा होता. श्रीमंताचे दौलतीचा आळा गेला. विशालबुद्धीचा, दीर्घ प्रयत्नी मुत्सद्दी. राज्याची धडगत

नाहीं. दोन वर्षें असते तर इंग्रज नाशच पावते; नाना म्हणजे ब्राह्मण्य. सर्वांचे उमेदी उदासीन झाल्या, पुण्याची सामोग्री संपली. नानाबरोबर चातुर्य व संयम गेला. (पामर).

गोव्याचे गव्हर्नर व्हेग काव्राल हा आपल्या ता. ८ मे १८०० च्या पत्रांत लिहितो.--हिंदू लोकांमधील अत्यंत बुद्धिमान पुरुष असा त्याचा लौकिक होता. कोणत्याही कठीण विषयावर त्याचें डोकें चालत असे. तो विशाल कल्पनेचा माणूस असून आपल्या अंतःकरणाचा ठाव कोणासच तो लागू देत नसे, तो कोणतेही कष्ट सहन करी. आपल्या योजना कार्य सृष्टींत आणण्याची कर्तबगारी त्यास होती. व वाईट प्रसंगास तोंड देण्यास कचरत नसे.--नानांची तेव्हांची थोरली पत्नी १५ दिवसांनी वारली. धाकटी जिऊबाई स. १२ ह. ची नेमणूक व दत्तकाचा अधिकार. सांप्रत बेलबाग संस्थानचे मालक नानांचेच वंशज आहेत.

समाप्त

– ग्रंथनामांच्या संक्षेपाची स्पष्टता –

[ले.–लेखांक, प.–पत्र क्रमांक, पृ.–पृष्ठ हें ध्यान्यांत येईलच. ग्रंथाचे भागासाठीं भा. असें न म्हणतां नुसता त्याचा क्रमांक दिला आहे].

इच. इ.–इचलकरंजी सं० चा इतिहास (वा. वा. खरे कृत)
इ. सं. ऐ. चर्चा–इतिहास संग्रह ऐतिहासिक चर्चा (रा. ब. द. ब. पारसनीस)
इ. सं. ऐ. टि.–इ. सं. ऐतिहासिक टिपणें. भाग १ ते ५ (पारसनीस)
इ. सं. ऐ. स्फु. ले.–इ. सं. ऐतिहासिक स्फुटलेख. (पारसनीस)
इ. सं. जोध. रा.–इ. सं. जोधपूरचीं राजकारणें. (पारसनीस)
इ. सं. दि. म. रा.–इ. सं. दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें. (पारसनीस)
इ. सं. पे. द. नि. का.–इ. सं. पेशवे दप्तरांतील निवडक कागदपत्र. ,,
इ. सं. पे. द. स. मा.–इ. सं. पेशवे दप्तरांतील सनदापत्रांची माहिती ,,
उ. वि. म. रि.–उत्तर विभाग मराठी रियासत (रा. ब. गो. स. सरदेसाई)
ऐ. प.–ऐतिहासिक पत्रव्यवहार (समर्थ भारत छा. प्रकाशन)
ऐ. सं. सा.–ऐतिहासिक संकीर्ण साहित्य. (भा. इ. सं. मं. प्रकाशन)
ऐ. ले. सं.–ऐतिहासिक लेख संग्रह भा. १–१२ (वा. वा. खरे शास्त्री)
काव्ये. प. या.–काव्येतिहास संग्रह पत्रें यादी वगैरे (चित्रशाळा प्रकाशन)
कुंडली-केळकर यांचा राजासंग्रह; (दि. गं. केळकर, पुणें)
खं–राजवाडे यांचे म. इ. साधनें खंड २ ते १९ (वि. का. राजवाडे)
चंद्र. द. नि. उतारे–चंद्रचूड दप्तरांतील निवडक उतारे (ग्वालेर प्रकाशन)
जु. ऐ. गो. इ. सं.–जुन्या ऐतिहासिक गोष्टी. इतिहाससंग्रह भा. १, २
थो. मा. रो.–थोरले माधवराव रोजनिशी पेशवे डायरी भा. १ व २
ना. च.–नाना फडणवीस चरित्र (खरे शास्त्रीकृत)
निवडक पत्रें–नानाफडणवीस यांचीं
पुरं. द.–पुरंदरे दप्तर भा. १, ४ (कृ. वा. पुरंदरे)
पूना रेसि. कॉ.–पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉडन्स व्हाल्यूम १ ते ८ व एक्स्ट्रा
पे. का. सा. आ. प.–पेशवेकालीन सामाजीक व आर्थिक पत्रव्यवहार.
(रा. वि. ओतुरकर, भा. इ. सं. मं. प्रकाशन)

पे. सा.–पेशवाईच्या सावलींत. (ना. गो. चापेकर)

पे. द.–पेशवे दप्तर–सरकार प्रकाशित–भा. १ ते ४५
भानु फडणीस बेलबागसंस्थान संग्रह. अप्रसिद्ध कागद–ज बा. भानू
भा. व. ऐ. पत्र. व्य.–भारत वर्ष ऐ. पत्र व्यवहार यादी वगैरे (पारसनीस)
भा. व. श.–भारत वर्ष शकावली (पारसनीस)
म. द. बा.–महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें भा. १, २ इ. सं. (पारसनीस)
म. रि. उ. वि.–मराठी रियासत उत्तर विभाग (रा. ब. सरदेसाई)
महा. का.–महादजी शिंदे यांचीं कागदपत्रें (ग्वालेरदरबार प्रकाशन)
मोस्टिनची रोजनिशी (मुंबई तारापूरवाला प्रकाशन)
लोकहि. ऐ. गो. –लोकहितवादी प्रकाशित ऐतिहासिक गोष्टी (गो. ह. देशमूख)
शि. इ. सा.–शिंदेशाहीच्या इतिहासाचीं साधनें १–४ (श्री. भाऊराव फाळके)
स. मा. रो.–सवाई माधवरावाची रोजनिशी भा. १–३(मुंबई सरकार प्रकाशन)
सं. वृ.–संमेलन वृत्त–भा. इ. सं. मं. प्रकाशन
हो. शा. इ. सा.–होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें (अ. ना. भागवत)
हिंगणें द.–हिंगणे दप्तर भा. १ व २ (ग. ह. खरे. भा. इ. सं. मं. प्रकाशन)

नाना फडणीस : कांहीं चरित्र–निर्देश

शक	इ. सन	
१६६३ माघ वा ४	१७४२ फेब्रुवारी १२	जन्म
१६६८ वैशाख	१७४६ एप्रिल	व्रतबंध
१६७३ मार्ग. शुा ८	१७५१ नोव्हें. १५	पहिला विवाह. विष्णूपंत गद्रे कन्या
१६७८	१७५६	उत्तरेंत स्वारीवर असतां वडील जनार्दन बाबा यांचा मृत्यू
१६७८ मार्ग. शुा ८	१७५६ नोव्हें.२९	फडणविशीचीं वस्त्रें, मिळतात
१६८३	१७६१	गोदावरी कायगांवींतीरीं-घाट बांधला
१६८४ मार्ग.	१७६२ नोव्हें.- डिसें.	नानाकडील फडणीसी राघोबादादांनीं काढली
१६८५ भाद्र.वा १३	१७६३ आक्टो. ५	फडणीसीची पुनः प्राप्ती.
,, पौष	१७६४ जाने.	(पुणें) नानावाडा बांधणीस प्रारंभ.
१६८८	१७६६	बेलबाग–विष्णु मंदिर (पुणें),,
१६९०	१७६८	नानांना मेणवली गांवचा खालसा अंमल मंत्री व प्रतिनिधी कडून मिळाला
१६९१	१७६९	विष्णु–लक्ष्मी अर्चा, बेलबाग.—
१६९६ कार्ति.	१७७४ नोवें.	नाना, बापू, चि. स. राव यांवर मारेकरी.
१६९८	१७७६	नानास दगा करण्याची मसलत.
१६९९	१७७७	नानांचें तिसरें लग्न. सावकार गाडगीळ यांची कन्या.
१७००	१७७८	नानांस पुत्र. नांव जनार्दन.
१७०२	१७८०	नानास व हरिपंतास दगा करावा अशी तिसऱ्यांदा मसलत
१७१० फाल्गु.शुा ३	१७८१ फेब्रु. २७	नानांचें लग्न. आडिवरें-परांजपे कन्या
१७१० फाल्गु व.१२	१७८९ मार्च २२	नानांचें महादजींना [illegible]
		विण्याबा पत्र.
१७११ फाल्गुन	१७९०	पुणें येथें नाना पेठ वसाहत
१७१३ जेष्ठ	१७९१ जून	सदाशिव पेठ हौदांत पाण्याचा नहर भीमाशंकर मंदिर–बांधणी प्रारंभ


शक	इ. सन	
१७१४ आषाढ शु.३	१७९२ जून २२	(स० माधवराव ,महादजी शिंदे यांजबरोबर) दिल्लीच्या बादशहाकडून नानांना वजिरीची फडणिशी मिळते.
१७१५	१७९३ आक्टो.	काशीस दुर्गाघाटावर वाडा बांधण्यास आरंभ
१७१६	१७९४	दामोदर बळवंत भानू यांस नाना दत्तक घेतात
१७१७	१७९५	काशीस कर्मनाशी नदीवर पूल-बांधणी
१७१८	१७९६	रायगड येथें सिंहासनासमोर नगारखाना
१७१९	१७९७	दत्तक पुत्र दामोदर बळवंत हृय चा मृत्यु.
१७१९ पौष शुा १३	१७९७ डिसें. ३१	शिंदे-मुकिरकडून नानास अटक.
१७२० आषाढ	१७९८ जुलै	सुटका
१७२० भाद्र.	१७९८ आक्टो.	शिंदेबाया व इंग्रजाकडून पुनः अटकेचा यत्न.
१७२१ वैशाख	१७९९ मे	पुनः बाजीरावांकडून अटकेचा यत्न
१७२१ फाल्गु. वा।३	१८०० मार्च १३	नानांचा पुणें येथें त्यांचे वाड्यांत गुरुवारीं रात्रीं स्वर्गवास.

नानांचे कांहीं मुक्काम

१६७७ फाल्गुन	१७५६ मार्च	विजयदुर्ग—स्वारींत
१६७८	१७५७	श्रीरंगपट्टण
१६८२ भाद्रपद	१७६० सप्टेंबर	पानिपतकडे प्रयाण भाद्र. दिल्ली चैत्र,
१६८२ फाल्गुन	१७६१ मार्च	बुकिसराई-शु. १४
१६८२ फाल्गुन	१७६१ मार्च	सिरोंज-वद्य-६ ता. २७
१६८३ जेष्ठ	१७६१ जून	टोकें शु. १५–ता. १७
१६८४ फाल्गून	१७६३ फब्रु.	लोहगड

शक	इ. सन	
१६८५	१७६३	पैठण:भाद्रपद. कल्याण-(सिंहगड) श्रा.
१६८६ श्रावण	१७६४	नाशिक—राघोबादादांकडे
१६८६	१७६४	भोगूर.
१६९३	१७७१	कोपरगांव, टोकें, कचेश्वर-आश्वी. कार्ती.
१६९६	१७७४	पुरंदर माची सातारा-वैशाख, टोकें-कार्तिक,
१६९६	१७७४	औरंगाबाद-ब-ऱ्हाणपूर सेंदवेचे बारी नर्मदेपार
१६९६	१७७५	टोकें-मार्ग.;कासारबारी, फैजपूर-पौष
१६९६	१७७५	भीमातीर व गंगातीर
१६९६	१७७५	मेणवली
१६९६	१७७५	पुणें
१६९९	१७७८	चिंचवड
१७००	१७७८	जेजुरी
१७०१	१७७९	भोसेगांव
१७०२	१७८०	पुनवलें
१७०३	१७८१	(कोंकण)
१७०६ चैत्र वैशाख	१७८४ एप्रील मे	पंढरपूर, यादगिरी, गंगापूर
१७०८	१७८६	बदामीच्या लढाईंत स्वारीवर
१७१७	१७९५	खर्डे–लढाई
१७१८	१७९६	वांई, बोरवण
१७१८	१७९६	महाड, रायगड
१७१८	१७९६	सिंहगड, सातारा, वांई, महाड
१७१८	१७९६	आंबेगांव
१७२१	१८००	पुणें


श्री बाळाजी जनार्दन (नाना फडणवीस)




* हे दोघे वेळास येथें.

*कानपूर सावतागंज
घर नं ११/२५०

भानु–कुल–वंशावळ : पत्रक १ लें





‡(१)विजयदुर्ग–सुभेदार नवलगुंद व लोहगडचे सबनीस.

¶मिरजकर गं. गो. पटवर्धन यांचे जामात.

पिढीचा आंकडा

२

रामाजी (२) बाळाजी (३) हरी (४) ३
(नंवर २व३ ची माहिती पत्रक ४ वर आहे.) ०

महादाजी (३) ४
(यांची माहिती पत्रक ३ वर आहे)

५

श्रीधर (२) भास्कर (३) प्रभाकर (४) नारायण (५) ६
० (याची माहिती पत्रक ५ वर दिली आहे) ०

रघुनाथ (१) सदाशिव (२) ७

(अमृत चिंतो) केशव कृष्णाजी भिकाजी गंगाधर ८
० (१) (२) (३)
(प्रभाकर गोविंदास दत्तक गेला पत्रक ५ पहा)

विष्णु चिंतामण* नारायण मोरो गणेश ९
०

पुरुषोत्तम वासुदेव मधुकर केशव १०

बाळकृष्ण (२) मधुसूदन ११

१२

वांई ०लष्कर ग्वाल्हेर चिटणीस गोट पुणें पुणें पुणें
* प्रो. चि. गं.

पिढीचा आंकडा — पिढी नं. ४ यांतील नं. ३ चा मुलगा महादाजी नारो

१ कृष्ण

२ महादाजी

३ धा. पत्नीचे नारो (नं. १।२ चे अंताजी व भिकाजी यांची माहिती पत्रक

४ महादाजी (३)

५ *बळवंत (१) हरी (२) अप्पाजी (३)
ॱ

६ †दामोदर (नानांना दत्तक गेले) विश्वनाथ बळवंत (१)
ॱ

७ भिकाजी (१) पुरुषोत्तम (२)
ॱ

८ सखाराम

९ विनायक (१) दामोदर (२)

१० विष्णु (१) गणेश (२) सदाशिव (३) गोपाळ (४)

११ शंकर (१) वसंत (२) दत्तात्रय (३) प्रभाकर अनंत

मुंबई नाशिक पी. डब्ल्यु. डी. मंबई

* ह्या बलवंत महादेव भानूंची बहीण सदाशिवराव भाऊ पेशवे यांची पहिली पत्नी (उमाबाई) (खं. १० ले. ८४)

† नानांना दत्तक श. १७१६ मार्ग शु. ९ इ. १७९४ डिसें. १ (इ. सं. पे.द. स. प. पृ. १७५) मृ. १७९७

याची माहिती

पिढीचा आंकडा


१

२

२ वर आहे व नं. ३ महादाजीची खालीं आहे.) ३

४

५



६

७

८

९

१०

११

श्री बाळाजी जनार्दन (नाना) फडणवीस

पिढी			
१	कृष्ण		
२	महादेव		
	(थोरली पत्नीचे)	धाकटे पत्नीचे	
३	गोविंद (१)	मोरो (२)	रामाजी (३) (मृ. १७२४)
४	(यांची माहिती पत्रक १ वर आहे.)	(यांची माहिती पत्रक २ वर आहे.)	बाबुराव
५			मोरोबादादा [1]
६			रामचंद्र [2]
७			बाबुराव
८			महादाजी
९			मोरो
१०			महादेव

१ पत्नी चिमाबाई – त्रि. मामा पेठे कन्या

२ चित्रकूट–विनायक अमृत पेशवे यांजजवळ मृत्यु शक १७२५ भाद्र. व. ६.

भानु-कुल-वंशावळ : पत्रक ४ थें

पिढी

१

२

*बाळाजी (४) हरी (५) ३
०

†जनार्दन ४

बाळाजी (नाना फडणवीस) पुणें मेणवली ५

जनार्दन दामोदर महादाजी द. आले. गंगाधर रामकृष्णाचे पुत्र : पत्रक २ ६
० मृ. इ. १७९७

बाळाजी द. आले. हे विनायक नारायण पत्रक ५ ७

‡जनार्दन द. आले. हे त्रिंबक काशिनाथ " " ८

माधव (१) अशोक (२) ९

१०

* दिल्ली लढाईंत इ. १७१९ मृत्यु. † उ. हिंदु-स्वारीवर मृत्यु. इ. १७५६.
‡पुणें बुधवार सं. बेलबाग

पिढी ६ यांतील नं. ४ व ५ ची माहिती खालीलप्रमाणें

५ गोविंद भिकाजी

६ गंगाधर — श्रीधर — भास्कर — †प्रभाकर — नारायण

गंगाधर, श्रीधर (यांची माहिती पत्रक २ वर दिली आहे)

भास्कर: ०

नारायण: ०

७ केशव (दत्तक आला पत्रक २–३ पहा) [†प्रभाकर यांचा]


८ नारायण

९ विश्वनाथ (१) * — काशिनाथ (२) — विनायक (३) * (दत्तक गेला पत्रक ४ पहा)

१० †केशव (१) — त्रिंबक (२) * (दत्तक गेले. पत्रक ४ पहा) [काशिनाथ यांचे]

† आंबेगांवकर पुणें शुक्रवार, पाटसकर वाडा, काळ्या हौदाजवळ.

कलमदानांतील लेखण्या ठेवण्याच्या पुडापाठीमागील चांदीच्या तकटावरील लिखित (सं. प्रस्ताव पहा)



नानांचे शिक्कामोर्तबाचें

यशवंतराव दाभाडे यांस पत्र

श्री

राजश्री ‡यसवंतराव दाभाडे मुा तलेगाव
गोसावी यांसि

द अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य राजमान्य[१] ———— स्नेो बालाजी जनार्दन फडणीस आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत जावे विशेष किले लोहगड येथील बेगमीस दोनसे खंडी बाजरी व डाल पाच खडी तुरीची व तेल च्यालीस पनास जोडचा घेतले पाहिजे त्यास तलेगावी [२]जवारदार व [३]पेसोरी वाणी बाजरी व तेल घेऊन येतील त्यास किल्यास रवाना करावे वाजबी पैका [४]पाडाप्रो पावेल दोनसे खडी परियत बाजरीचे बैल व च्यालीस जोडचा तेलाच्या येणे प्रो रवाना करावे तलेगावी सेटे महाजन व वाणी यास ताकीद करवावी त्यास ही आज्ञापत्र सादर केले आहे रा छ१ मोहरम †बहुत काय लिहिणे †लोभ असो दीजे †हे विनती मोर्तब सुद(पान २३१ पहा)

नानांची वर्तुळी पांच ओळींची मुद्रा
(पान २३१ पहा)

(श्री० शिवचरनलिन निरत जनार्दनसुत बाळाजी पंडित)

---

१ दोनदां चुकून लिहिला आहे. † तीनहि अक्षरें भिन्नभिन्न.


‡हा यशवंतराव, खंडेराव दाभाडयांचा पणतु. ह्यांची कारकीर्द श. १७०१ ते श. १७५६ अशी आहे. हा, त्र्यंबकराव दाभाडे दुसरा यांच्या सगुणाबाई बायकोनें दत्तक घेतला होता. पा. स. ५/७२

२ शेजारचे. ३ व्यापारी. ४ बाजारभाव.

ना.ना. मिळालेलें दिल्लीच्या वजिरीचें फडणिसी कलमदान



(सं. प्रस्ताव पहा) (शकावली पृ. १७०) शक १७१४ (इ. १७९२)



५ २ १ ४ ३

(सं. प्रस्ताव पहा) नानांचा खास व मुतालिकी शिक्कामोर्तब

शिक्क्यांतील अक्षरवटिका (सं. प्रस्ताव पहा)



५ ४ ३ २ १

'श्री०' शिवचरणन' लिननिरतजना'र्दनसुतबाळा' जीपंडित'

नानांच्या वेळच्या राज्यलक्ष्मीचें वर्णन

वक्त्राग्रे वेदलक्ष्मी करतलकमले सर्वदा दानलक्ष्मी ।
दोर्दण्डे वीरलक्ष्मी हृदयसरसिजे भूतकारुण्यलक्ष्मी ।
सर्वांगे सौम्यलक्ष्मी निखिलगुणगणाडंबरे कीर्तिलक्ष्मी ।
खड्गाग्रे शौर्यलक्ष्मी जयतु विजयते सर्व साम्राज्यलक्ष्मी ।।

[इ. सं. ऐ. टि. २ पृ. ८५]

प्रकाशक, संपादक :—
श्री. के. बी. जोशी, पंपवाले, मुंबई.

मुद्रक :—वि. गं. केतकर,
'लोकसंग्रह छापखाना', ६२४, सदाशिव पुणें २.